
कविकुलगुरु - कालिदास - संस्कृत - विश्वविद्यालयः

॥ श्रीगुरुचारित्र प्रारंभः ॥

गु. च.

॥ श्रीगणेशाय नमः ॥ श्रीसरस्वत्यै नमः ॥ श्रीगुरुभ्यो नमः ॥ श्रीकुलदेवतायै नमः ॥ श्री-
पादवल्लभाय नमः ॥ श्रीनृसिंहसरस्वत्यै नमः ॥ ॐ नमो जी विघ्नहरा ॥ गजानना गिरि-
जाकुमरा ॥ जय जय लंबोदरा ॥ एकदंता शूर्पकर्णा ॥१॥ हालविशी कर्णयुगलें ॥ तेथुनि
जो का वारा उसळे ॥ त्याचेनि वातें विघ्न पळे ॥ विघ्नांतक म्हणती तुज ॥ २ ॥ तुझें शोभे
आनन ॥ जैसें तप्तकांचन ॥ किंवा उदित प्रभारमण ॥ तैसें तेज फांकतसे ॥३॥ विघ्नकानन
छेदनासीं ॥ हातीं फरश धरिलासी ॥ नागबंद कटीसी ॥ उरग यज्ञोपवीत ॥ ४ ॥ चतुर्भुज
दिससी निका ॥ विशालाक्षा विनायका ॥ प्रतिपाळिसी विश्वलोकां ॥ निर्विघ्नें करोनियां
॥५॥ तुझें चिंतन जे करिती ॥ तयां विघ्नें न बाधिती ॥ सकळाभीष्टें साधती ॥ अविलंबेंसी
॥ ६ ॥ सकळ मंगळ कार्यासीं ॥ प्रथम वंदिजे तुम्हांसी ॥ चतुर्दश विद्यांसी ॥ स्वामि तूंचि
लंबोदरा ॥ ७ ॥ वेदशास्त्रें पुराणें ॥ तुझेंचि असे बोलणें ॥ ब्रह्मादिकी याकारणें ॥ स्तविला
असे सुरवरीं ॥ ८ ॥ त्रिपुरसाधन करावयासी ॥ ईश्वरें अर्चिलें तुम्हांसी ॥ संहार करावया
दैत्यांसी ॥ पहिलें तुम्हांसी स्तविलें ॥ ९ ॥ हरि हर ब्रह्मादिक गणपती ॥ कार्यारंभीं तुज
वंदिती ॥ सकळाभीष्टें साधती ॥ तुझेनि प्रसादें ॥१०॥ कृपानिधि गणनाथा ॥ सुरवरादिकां
विघ्नहर्ता ॥ विनायका अभयदाता ॥ मतिप्रकाश करी मज ॥ ११ ॥ समस्त गणांचा ना-
यक ॥ तूंचि विघ्नांचा अंतक ॥ तूतें वंदिती जे लोक ॥ कार्य साधे तयांचें ॥१२॥ सकळ
कार्यांचा आधारू ॥ तूंचि कृपेचा सागरू ॥ करुणानिधि गौरीकुमरू ॥ मतिप्रकाश करीं
॥ १३ ॥ माझे मनींची वासना ॥ तुवां पुरवावी गजानना ॥ साष्टांग करितों नमन ॥
विद्या देईं मज आतां ॥१४॥ नेणतां होतों मतिहीन ॥ म्हणोनि धरिलें तुझे चरण ॥ चवदा

अ. १

पा. ३

विद्यांचें निधान ॥ शरणागत वरप्रदा ॥ १५ ॥ माझिया अंतःकरणींचें व्हावें ॥ गुरुचारित्र
कथन करावें ॥ पूर्ण दृष्टीनें पहावें ॥ ग्रंथसिद्धी पाववी दातारा ॥ १६ ॥ आतां वंदूं ब्रह्मकु-
मरी ॥ जिचें नाम वागीश्वरी ॥ पुस्तक वीणा जिचे करीं ॥ हंसवाहिनी असे देखा ॥१७॥
म्हणोनि नमितों तुझे चरणीं ॥ प्रसन्न व्हावें मज स्वामिणी ॥ राहोनियां माझिये वाणीं ॥
ग्रंथीं रिघू करी आतां ॥ १८ ॥ विद्या वेद शास्त्रांसी ॥ अधिकार जाणा शारदेसी ॥ तिये
वंदितां विश्वासी ॥ ज्ञान होय अवधारा ॥१९॥ ऐक माझी विनंति ॥ द्यावी आतां अखिल
माति ॥ विस्तार करावया गुरुचारित्रीं ॥ मतिप्रकाश करी मज ॥२०॥ जय जय जगन्माते ॥
तूंचि विश्वीं वाग्देवते ॥ वेदशास्त्रें तुझीं लिखितें ॥ नादविशी येणें परी ॥ २१ ॥ माते
तुझिया वाग्बाणीं ॥ उत्पत्ति वेदशास्त्रपुराणीं ॥ वदतां साही दर्शनीं ॥ त्यांतें अशक्य परि-
येसा ॥२२॥ गुरूचे नामीं तुझी स्थिति ॥ म्हणती नृसिंह सरस्वति ॥ याकारणें मजवरि
प्रीति ॥ नाम आपुलें म्हणुनी ॥२३॥ खांबसूत्रीं बाहुलीं जैसीं ॥ खेळती तया सूत्रासरसीं ॥
स्वतंत्र बुद्धि नाहीं त्यांसीं ॥ वर्तती आणिकाचेनि मतें ॥२४॥ तैसें तुझेनि अनुमतें ॥ माझे
जिव्हे प्रेरीं माते ॥ कृपानिधि वाग्देवते ॥ ह्मणोनि विनवी तुझा बाळ ॥२५॥ ह्मणोनि नमि-
लें तुझे चरण ॥ व्हावें स्वामिणी प्रसन्न॥ द्यावें मातें वरदान॥ ग्रंथीं रिघू करवी आतां ॥२६॥
आतां वंदूं त्रिमूर्तींसी ॥ ब्रह्मा विष्णु शिवासी ॥ विद्या मागें मी तयांसी ॥ अनुक्रमें करोनी
॥ २७ ॥ चतुर्मुखें असती ज्यासी ॥ कर्ता जो का सृष्टीसी ॥ वेद झाले बोल ज्यासी ॥
त्याचे चरणीं नमन माझें ॥२८॥ आतां वंदूं हृषीकेशी ॥ जो नायक विश्वासी ॥ लक्ष्मी-
सहित अहर्निशीं ॥ क्षीरसागरीं असे जाणा ॥ २९ ॥ चतुर्बाहु नरहरी ॥ शंख चक्र गदा

करीं ॥ पद्महस्त मुरारी ॥ पद्मनाभ परियेसा ॥ ३० ॥ पीतांबर असे कशियेला ॥ वैजयंती माळा गळां ॥ शरणांगतां अभीष्ट सकळां ॥ देता होय कृपाळू ॥ ३१ ॥ नमन समस्त सुरवरां ॥ सिद्ध साध्य अवधारा ॥ गंधर्व यक्ष किन्नरां ॥ ऋषेश्वरां नमन माझें ॥ ३२ ॥ वंदूं आतां कविकुळांसीं ॥ पाराशरादि व्यासांसी ॥ वाल्मिकादि सकळिकांसी ॥ नमन माझें परियेसा ॥ ३३ ॥ नेणें कवित्व असे कैसें ॥ म्हणोनि तुम्हां विनवीतसें ॥ ज्ञान द्यावें जी भरवसें ॥ आपुला दास म्हणोनी ॥ ३४ ॥ न कळे ग्रंथप्रकार ॥ नेणें शास्त्रांचा विचार ॥ भाषा न ये महाराष्ट्र ॥ ह्मणोनी विनवी तुह्मांसीं ॥३५॥ समस्त तुम्हीं कृपा करणें ॥ माझिया वचना साह्य होणें ॥ शब्दव्युत्पत्तीहि नेणें ॥ कविकुळें तुम्ही प्रतिपाळा ॥३६॥ ऐसें सकळिकां विनवोनी ॥ मग ध्याइले पूर्वज मनीं ॥ उभय पक्ष जनक जननी ॥ महात्म्य पुण्य पुरुषांचें ॥३७॥ अपस्तंब शाखेसी ॥ गोत्र कौंडिण्य महाऋषी ॥ साखरे नाम ख्यातीसी ॥ सायंदेवापासाव ॥ ३८ ॥ त्यापासूनि नागनाथ ॥ देवराव तयाचा सुत ॥ सदा श्रीगुरुचरण ध्यात ॥ गंगाधर जनक माझा ॥ ३९ ॥ नमन करितां जनकचरणीं ॥ माता पूर्वज ध्यातों मनीं ॥ जो कां पूर्वज नाम धारणीं ॥ आश्वलायन शाखेचा ॥ ४० ॥ काश्यपाचे गोत्रीं ॥ चौंडेश्वर नामधारी ॥ रागें जैसा जन्हु अवधारी ॥ अथवा जनक गंगेचा ॥ ४१ ॥ त्याची कन्या माझी जननी ॥ निश्चयें जैसी भवानी ॥ चंपानामें पुण्यखाणी ॥ स्वामिणी माझी परियेसी ॥ ४२ ॥ नमितां जनकजननीसी ॥ नंतर नमूं श्रीगुरूसी ॥ झाली मतिप्रकाशी ॥ गुरुचरण स्मरावया ॥ ४३ ॥ गंगाधराचे कुशीं ॥ जन्म झाला परियेसी ॥ सदां ध्याय श्रीगुरूसीं ॥ एका भावें निरंतर ॥ ४४ ॥ म्हणोनि सरस्वती गंगाधर ॥ करी संतांसीं

नमस्कार ॥ श्रोतयां विनवी वारंवार ॥ क्षमा करणें बाळकासीं ॥ ४५ ॥ वेदाभ्यासी स-
न्यासी ॥ यती योगेश्वर तापसी ॥ सदा ध्याती श्रीगुरूसी ॥ तयांसि माझा नमस्कार॥४६॥
विनवीतसे समस्तांसीं ॥ अल्प मती आपणासीं ॥ माझे बोबडे बोलांसी ॥ सकळ तुह्मी
अंगिकारा ॥ ४७ ॥ तावन्मात्र माझी मति ॥ नेणें काव्यव्युत्पत्ति ॥ जैसें श्रीगुरु निरो-
पिती ॥ तेणंपरी सांगत ॥ ४८ ॥ पूर्वापार आमुचे वंशीं ॥ गुरु प्रसन्न अहर्निशीं ॥ निरोप
देती मातें परियेसी ॥ चरित्र आपुलें विस्तारावया ॥ ४९ ॥ ह्मणे ग्रंथ कथन करीं ॥ अमृ-
तघट स्वीकारीं ॥ तुझे वंशीं पारंपरीं ॥ लाधती चारी पुरुषार्थ ॥ ५० ॥ गुरुवाक्य मज का-
मधेनू ॥ मनीं नाहीं अनुमानू ॥ सिद्धि पाववविणार आपणू ॥ नृसिंह सरस्वती ॥ ५१ ॥ त्रै-
मूर्तीचा अवतार ॥ झाला नृसिंह सरस्वती नर ॥ कवण जाणे याचा पार ॥ चरित्र कव-
णा वर्णवे ॥ ५२ ॥ चरित्र ऐसें श्रीगुरूचें ॥ वर्णू न शकें मी वाचें ॥ आज्ञा असे श्रीगु-
रूचें ॥ ह्मणोनि वाचें बोलतसें ॥५३॥ ज्यास पुत्रपौत्रीं असे चाड ॥ त्यासीं कथा हे असे
गोड ॥ लक्ष्मी वसे अखंड ॥ तया भवनीं परियेसा ॥ ५४ ॥ ऐसी कथा जयांचे घरीं ॥
वाचिती नित्य प्रेमभरीं ॥ श्रियायुक्त निरंतरीं ॥ नांदती पुत्र कलत्र युक्त ॥ ५५ ॥ रोग
नाहीं तया भवनीं ॥ सदा संतुष्ट गुरुकृपेकरोनी ॥ निःसंदेह सात दिनीं ॥ ऐकतां बंधन
तुटे जाणा ॥ ५६ ॥ ऐसी पुण्यपावन कथा ॥ सांगेन ऐक विस्तारता ॥ सायासाविण होय
साध्यता ॥ सद्यःफल प्राप्त होय ॥ ५७ ॥ निधान लाधे अप्रयासीं ॥ तरी कां कष्ट साया-
सीं ॥ विश्वास माझिया बोलासी ॥ ऐका श्रोते एकचित्तें ॥ ५८ ॥ आह्मां साक्षी ऐसें घ-
डलें ॥ ह्मणोनि विनवीतसें बळें ॥ श्रीगुरुस्मरण असे भलें ॥ अनुभवा हों सकळिकां ॥५९॥

तृप्ति झालिया ढेंकर ॥ जेवी देती जेवणार ॥ गुरुमहिमेचा उद्गार ॥ बोलतसें अनुभ-
वोनी ॥ ६० ॥ मी सामान्य ह्मणोनी ॥ उदास व्हाल माझे वचनीं ॥ मक्षिकेच्या मुखांतुनी ॥
मधु केंवी ग्राह्य होय ॥ ६१ ॥ जैसें शिंपल्यांत मुक्ताफळ ॥ अथवा कर्पूर कर्दळ ॥ विचा-
रितां अश्वत्थ मूळ ॥ कवणापासाव उत्पत्ति ॥ ६२ ॥ ग्रंथ कराल उदास ॥ वांकुडा कृष्ण
दिसे ऊंस ॥ अमृत निघे त्यांत रस ॥ दृष्टि द्यावी तयावरी ॥ ६३ ॥ तैसें माझें बोलणें ॥
ज्यांसीं चाड गुरुस्मरणें ॥ अंगिकार करणार शहाणे ॥ अनुभविती एकचित्तें ॥ ६४ ॥
ब्रह्मरसाची गोडी ॥ अनुभवितां फळें रोकडीं ॥ या बोलाची आवडी ॥ ज्यांसीं संभवे
अनुभवा ॥ ६५ ॥ गुरुचरित्र कामधेनु ॥ ऐकतां होय महाज्ञानु ॥ श्रोतीं करोनियां सावध
मनु ॥ एकचित्तें परियेसा ॥ ६६ ॥ श्रीगुरु नृसिंह सरस्वती ॥ होते गाणगापुरीं ख्याती ॥
महिमा त्यांचा अत्युद्भुती ॥ सांगेन ऐका एकचित्तें ॥ ६७ ॥ तया ग्रामीं वसती गुरु ॥
म्हणोनि महिमा असे थोरू ॥ जाणती लोक चहू राष्ट्र ॥ समस्त जाती यात्रेसी ॥६८॥ तेथें
राहोनि आराधिति ॥ त्वरित होय फलप्राप्ति ॥ पुत्र दारा धन संपत्ति ॥ जें जें इच्छिलें
होय जना ॥ ६९ ॥ लाधोनिया संतानें ॥ नामें ठेविती नामकरणें ॥ संतोषरूपें येऊन ॥
पावती चारी पुरुषार्थ ॥७०॥ ऐसें असतां वर्तमानीं ॥ भक्त एक नामकरणी ॥ कष्टतसे अति
गहनीं ॥ सदा ध्याय श्रीगुरूशीं ॥ ७१ ॥ ऐसा मनीं व्याकुळित ॥ चिंतेनें वेष्टिला बहुत ॥
गुरुदर्शना जाऊं म्हणत ॥ निर्वाण मानसें निघाला ॥७२॥ अति निर्वाण अंतःकरणीं ॥ लय
लावोनी गुरुचरणीं ॥ जातो शिष्य शिरोमणि ॥ विसरोनिया क्षुधा तृषा ॥ ७३ ॥ निर्धार
करोनि मानसीं ॥ म्हणे पाहीन श्रीगुरूशीं ॥ अथवा सांडीन देहासी ॥ जडस्वरूप काय

काज ॥ ७४ ॥ ज्याचें नामस्मरण करितां ॥ दैन्यहानि होय त्वरितां ॥ आपण तैसा नामां-
किता ॥ किंकर म्हणतसे ॥ ७५ ॥ दैव असें आपुलें उणें ॥ तरी कां भजावे श्रीगुरुचरण ॥
परिस लागतां लोह जाण ॥ सुवर्ण कैंवी होतसे ॥७६॥ तैसें तुझें नाम परिस ॥ माझे ह्रदयीं
सदा वसे ॥ मातें कष्टी सायासें ॥ ठेवितां लाज कवणासी ॥ ७७ ॥ या बोलाचिया हेवा ॥
मनीं धरोनियां पहावा ॥ गुरुमूर्ती सदाशिवा ॥ कृपाळुवा सर्वभूतीं ॥ ७८ ॥ अति व्याकुळ
अंतःकरणीं ॥ निंदा स्तुती आपुले वाणीं ॥ कष्टला भक्त नामकरणी ॥ करितां होय परियेसा
॥ ७९ ॥ राग स्वेच्छा ओंवीबद्ध म्हणावे ॥ वंदूं विघ्नहरा पार्वतीकुमरा ॥ नमूं ते सुंदरा ॥
शारदेसीं ॥८०॥ गुरूची त्रैमूर्ति ॥ म्हणती वेद श्रुति ॥ सांगती दृष्टांतीं ॥ कलियुगांत ॥८१॥
कलियुगांत ख्याति ॥ नृसिंह सरस्वती ॥ भक्तांसीं सारथी ॥ कृपासिंधु ॥ ८२ ॥ कृपासिंधु
भक्तां ॥ वेद वाखाणितां ॥ त्रयमूर्ति गुरुनाथा ॥ म्हणोनियां ॥ ८३ ॥ त्रयमूर्तिचे गुण ॥ तूं
एक निधान ॥ भक्तांसीं रक्षण ॥ दयानिधी ॥ ८४ ॥ दयानिधे यती ॥ विनवितों श्रीपती ॥
नेणें भावभक्ति ॥ अंतःकरणीं ॥ ८५ ॥ अंतःकरणीं स्थिरू ॥ नव्हे बा श्रीगुरू ॥ तूं कृपा-
सागरू ॥ पाव वेगीं ॥ ८६ ॥ पाव वेगीं आतां ॥ नरहरी अनंता ॥ बाळालागीं माता ॥
कैंवी टाकी ॥ ८७ ॥ तूं माता तूं पिता ॥ तूंचि सखा भ्राता ॥ तूंचि कुळदेवता ॥ पारंपरी
॥ ८८ ॥ वंशपारंपरीं ॥ धरूनि निर्धारीं ॥ भजतों मी नरहरी ॥ सरस्वतीसीं ॥ ८९ ॥ सर-
स्वती नरहरी ॥ दैन्य माझे घरीं ॥ म्हणूनी मी निरंतरीं ॥ सदा कष्टें ॥ ९० ॥ सदा कष्ट
चित्ता ॥ कां हो देशी आतां ॥ कृपासिंधु भक्तां ॥ कैंवी होसी ॥ ९१ ॥ कृपासिंधु भक्तां ॥
कृपाळू अनंता ॥ त्रयमूर्ति जगन्नाथा ॥ दयानिधि ॥ ९२ ॥ त्रयमूर्ति तूं होसी ॥ पाळिसी

विश्वासी ॥ समस्त देवांसीं ॥ तूंचि दाता ॥ ९३ ॥ समस्त देवांसीं ॥ तूंचि दाता होसी ॥
मागों मी कवणासी ॥ तुजवांचोनि ॥ ९४ ॥ तुजवांचोनि आतां ॥ असे कवण दाता ॥ वि-
श्वासीं पोषिता ॥ सर्वज्ञ तूं ॥ ९५ ॥ सर्वज्ञाची खूण ॥ असे हें लक्षण ॥ समस्तांतें जाणे ॥
कवण ऐसा ॥ ९६ ॥ सर्वज्ञ म्हणोनी ॥ वानिती पुराणीं ॥ माझे अंतःकरणीं ॥ नये साक्षी
॥ ९७ ॥ कवण कैशा परी ॥ असती भूमीवरी ॥ जाणिजेचि तरी ॥ सर्वज्ञ तो ॥ ९८ ॥ बा-
ळकं तान्हयें ॥ नेणें बापमाये ॥ कृपा केवी होय ॥ मातापित्या ॥ ९९ ॥ दिलियावांचोनी ॥
न देववे ह्मणोनि ॥ असेल तुझे मनीं ॥ सांग मज ॥ १०० ॥ समस्त महीतळीं ॥ तुम्हां दिल्हे
बळीं ॥ त्यातें हो पाताळीं ॥ बैसविलें ॥ १ ॥ सुवर्णाची लंका ॥ तुवां दिल्ही एका ॥ तेणें
पूर्वीं लंका ॥ कवणा दिल्ही ॥ २ ॥ अढळ त्या ध्रुवासीं ॥ दिलें हृषीकेशी ॥ त्यानें हो
तुह्मांसीं ॥ काय दिलें ॥ ३ ॥ निःक्षत्र करूनी ॥ विप्रांतें मेदिनी ॥ देतां तुम्हां कोणीं ॥ काय
दिल्हें ॥ ४ ॥ सृष्टीचा पोषक ॥ तूंचि देव एक ॥ तूंतें मी मशक ॥ काय देऊं ॥ ५ ॥ नाहीं
तुम्हां जरी ॥ श्रीमंत नरहरि ॥ लक्ष्मी तुझे घरीं ॥ नांदतसे ॥ ६ ॥ याहूनि आम्हासी ॥ तूं
काय मागसी ॥ सांग हृषीकेशी ॥ काय देऊं ॥ ७ ॥ मातेचे हो संगीं ॥ बैसोनियां बाळ ॥
पसरी मुखकमळ ॥ स्तनकांक्षेसीं ॥ ८ ॥ बाळापाशीं माता ॥ काय मागे ताता ॥ ऐक श्री-
गुरुनाथा ॥ काय देऊं ॥ ९ ॥ घेऊनिया देतां ॥ नाम नाहीं दाता ॥ दयानिधि म्हणतां ॥ बोल
दिसे ॥ ११० ॥ देऊं तूं न शकसी ॥ ह्मणो मी मानसीं ॥ चौदाही भुवनांसीं ॥ तूंचि दाता ॥ ११ ॥
तुझे मनीं पाहीं ॥ वसे आणीक कांहीं ॥ सेवा केली नाहीं ॥ म्हणोनियां ॥ १२ ॥ सेवा घे-
ऊनियां ॥ देणें हें सामान्य ॥ नाम नसे जाण ॥ दातृत्वासी ॥ १३ ॥ तूं हें बावी विहिरी ॥

गु. च.

असती भूमीवरी ॥ मेघ तो अंतरीं ॥ वर्षतसे ॥ १४ ॥ मेघाची ही सेवा न करितां स्वभा-
वा ॥ उदक पूर्ण सर्वां ॥ केवीं करी ॥१५॥ सेवा अपेक्षितां ॥ बोल असे दाता ॥ दयानिधी
म्हणतां ॥ केंवि साजे ॥ १६ ॥ नेणें सेवा कैशी ॥ स्थिर होय मानसीं ॥ माझे वंशोवंशीं ॥
तुझे दास ॥१७॥ माझे पूर्वजवंशीं ॥ सेविलें तुह्मांसीं ॥ संग्रह बहुवसीं ॥ तुझे चरणीं ॥ १८॥
बापाचे सेवेसीं ॥ पाळिती पुत्रासीं ॥ तेविं त्वां आह्मांसीं ॥ प्रतिपाळावें ॥ १९ ॥ माझें
पूर्वधन ॥ तुह्मीं द्यावें ऋण ॥ कां बा नये करुणा ॥ कृपासिंधु ॥ १२० ॥ आमुचें आह्मीं
घेतां ॥ कां बा नये चित्ता ॥ मागेन मी सत्ता ॥ घेईन आतां ॥ २१॥ आतां मज जरी ॥ न
देसी नरहरी ॥ जिंतोनि वेव्हारीं ॥ घेईन जाणा ॥ २२ ॥ दिसत असे आतां ॥ कठिणता
गुरुनाथा ॥ दास मी अंकिता ॥ सनातन ॥ २३ ॥ आपुले समान ॥ असेल कवण ॥ तया
सवें मन ॥ कठिण कीजे ॥ २४ ॥ कठिण कीजे हरी ॥ तुवां दैत्यांवरी ॥ प्रल्हाद कैवारी ॥
सेवकांसीं ॥ २५ ॥ सेवकां बाळकांसीं ॥ करूं नयें ऐशी ॥ कठिणता परियेसीं ॥ बरवें न
दिसे ॥ २६ ॥ माझिया अपराधीं ॥ धरोनिया बुद्धि ॥ अंतःकरण क्रोधी ॥ पहासी जरी
॥२७॥ बालक मातेसी ॥ बोले निष्ठुरेसी ॥ अज्ञानें मायेसी ॥ मारी जरी ॥२८॥ माता त्या
कुमरासीं ॥ कोप न धरी कैसी ॥ आलिंगोनि हर्षी ॥ संबोखी पा ॥ २९ ॥ कवण्या अप-
राधेसी ॥ न घालसी आह्मांसी ॥ अहो हृषीकेशी ॥ सांगा मज ॥१३०॥ माता हो कोपेसीं ॥
बोले बाळकासीं ॥ जावोनि पितयासी ॥ सांगे बाळ ॥ ३१ ॥ माता कोपे जरी ॥ एखादे
अवसरीं ॥ पिता कृपा करी ॥ संबोखोनी ॥ ३२ ॥ तूं माता तूं पिता ॥ कोपसी गुरुनाथा ॥
सांगों कवणा आतां ॥ क्षमा करीं ॥ ३३ ॥ तूंचि स्वामी ऐसा ॥ जगीं झाला ठसा ॥ दास

पा. १२

भलतसा ॥ प्रतिपाळावा ॥ ३४ ॥ अनाथरक्षक ॥ ह्मणती तुज लोक ॥ मी तुझा बालक ॥ प्रतिपाळावें ॥ ३५ ॥ कृपाळू ह्मणोनि ॥ वानिती पुराणीं ॥ माझे बोल कानीं ॥ न घालिसीच ॥३६॥ नायकसी गुरुराणा ॥ माझे करुणावचना ॥ काय दुश्चितपणा ॥ तुह्मां असे ॥ ३७ ॥ माझें करुणावचन ॥ न ऐकती तुझे कान ॥ ऐकोनि पाषाण ॥ विखुरतसे ॥ ३८ ॥ करुणा करी ऐसें ॥ वानिती तुज पिसें ॥ अजुनि तरी कैसें ॥ कृपा नये ॥३९॥ ऐसे नामांकित ॥ विनवितां त्वरित ॥ कृपाळू श्रीगुरुनाथ ॥ आले वेगीं ॥ १४० ॥ वत्सालागीं धेनु ॥ जैशी ये धांवोन ॥ तैसे श्रीगुरु आपण ॥ आले जवळी ॥ ४१ ॥ येतांचि गुरु मुनी ॥ वंदी नामकरणी ॥ मस्तक ठेवोनी ॥ चरणयुग्मीं ॥ ४२ ॥ केश ते मोकळी ॥ झाडी चरणधुळी ॥ आनंदाश्रु जळीं ॥ अंघ्रि क्षाळी ॥ ४३ ॥ हृदयमंदिरांत ॥ बैसवोनि व्यक्त ॥ पूजा उपचारित ॥ षोडशविधी ॥ ४४ ॥ आनंदभरित ॥ झाला नामांकित ॥ हृदयीं श्रीगुरुनाथ ॥ स्थिरावला ॥ ४५ ॥ भक्तांच्या हृदयांत ॥ राहे श्रीगुरुनाथ ॥ संतोष बहुत ॥ सरस्वतीसीं ॥ ४६ ॥

इतिश्रीगुरुचरित्रपरमकथाकल्पतरौ श्रीनृसिंहसरस्वत्युपाख्याने सिद्धनामधारकसंवादे प्रथमोऽध्यायः ॥ १ ॥ ओंव्यांची संख्या १४६ ॥

॥ श्रीगणेशाय नमः ॥ त्रैमूर्ति राजा गुरु तूंचि माझा ॥ कृष्णातीरीं वास करोनि वोजा ॥ सुभक्त तेथें करिती आनंदा ॥ ते सुर स्वर्गीं पहाती विनोदा ॥ १ ॥ ऐसे श्रीगुरुचरण ध्यात ॥ जातां विष्णु नामांकित ॥ अति श्रमला चालत ॥ राहिला एक वृक्षातळीं ॥ २ ॥ क्षण एक निद्रिस्त ॥ मनीं श्रीगुरु चिंतित ॥ कृपानिधी अनंत ॥ दिसे स्वप्नीं परियेसा ॥ ३ ॥ रूप दिसे सुषुप्तीत ॥ जटाधारी भस्मांकित ॥ व्याघ्रचर्म परिधानित ॥ पीतांबर कांसे देखा ॥ ४ ॥ येऊनि योगेश्वर जवळी ॥ भस्म लाविलें कपाळीं ॥ आश्वासूनि तये वेळीं ॥ अभय कर देतसे ॥ ५ ॥ इतुकें देखोनी सुषुप्तींत ॥ चेतन झाला नामांकित ॥ चारी दिशा अवलोकित ॥ विस्मय करी तये वेळीं ॥ ६ ॥ मूर्ति देखिली सुषुप्तींत ॥ तेचि ध्यातसे मनांत ॥ पुढें निघाला मार्ग क्रमित ॥ प्रत्यक्ष देखे तैसाचि ॥ ७ ॥ देखोनियां योगीशातें ॥ करिता झाला दंडवतें ॥ कृपा भाकी करुणावक्त्रें ॥ माता पिता तूं ह्मणतसे ॥ ८ ॥ जयजयाजी योगाधीशा ॥ अज्ञानतमविनाशा ॥ तूं ज्योतिप्रकाशा ॥ कृपानिधी सिद्धमुनी ॥ ९ ॥ तुझे दर्शनें निःशेष ॥ गेले माझे दुरित दोष ॥ तूं तारक आह्मांस ॥ ह्मणोनि आलासि स्वामिया ॥ १० ॥ कृपण भक्तालागुनी ॥ येणें झालें कोठोनी ॥ तुमचें नाम कवण मुनी ॥ कवणे स्थानीं वास तुह्मां ॥ ११ ॥ सिद्ध ह्मणे आपण योगी ॥ हिंडों तीर्थें भूमि स्वर्गीं ॥ प्रसिद्ध आमुचा गुरु जगीं ॥ नृसिंह सरस्वती विख्यात ॥ १२ ॥ ज्याचें स्थान गाणगापूर ॥ अमरजासंगम भीमातीर ॥ ॥ त्रयमूर्तीचा अवतार ॥ नृसिंह सरस्वती ॥ १३ ॥ भक्त तारावयालागीं ॥ अवतार त्रयमूर्ती जगीं ॥ सदा ध्याती अभ्यास योगी ॥ भवसागर तरावयासी ॥ १४ ॥ ऐसा श्रीगुरु कृपासिंधु ॥ भक्तजनां सदा वरदू ॥ अखिल सौख्य

श्रीयानंदू ॥ देता होय शिष्यवर्गा ॥ १५ ॥ त्याचे भक्तां कैचें दैन्य ॥ अखंड लक्ष्मी परि-
पूर्ण ॥ धनधान्यादि गोधन ॥ अष्टैश्वर्य नांदती ॥ १६ ॥ ऐसें ह्मणे सिद्धमुनी ॥ ऐकोनि
विनवी नामकरणी ॥ आह्मी असतों सदा ध्यानीं ॥ तया श्रीगुरु यतींचे ॥ १७ ॥ ऐशी
कीर्ति ब्रीद ख्याति ॥ सांगतसे सिद्धयती ॥ वंशोवंशीं करितों भक्ति ॥ कष्ट आह्मां कैंवि
पाहे ॥ १८ ॥ तूं तारक आह्मासी ॥ ह्मणोनि मातें भेटलासी ॥ संहार करोनि संशयासी ॥
निरोपावें स्वामिया ॥ १९ ॥ सिद्ध ह्मणे तये वेळीं ॥ ऐक शिष्या स्तोममौळी ॥ गुरुकृपा
सूक्ष्म स्थूळीं ॥ भक्तवत्सल परियेसा ॥ २० ॥ गुरुकृपा होय ज्यासी ॥ दैन्य दिसे
कैचें त्यासी ॥ समस्त देव त्याचे वंशीं ॥ कळिकाळासी जिंके नर ॥ २१ ॥ ऐसी वस्तु
पुजूनी ॥ दैन्यवृत्ति सांगसी झणीं ॥ नसेल तुझे निश्चय मनीं ॥ म्हणोनि कष्ट भोगितोसि
॥ २२ ॥ त्र्यक्षमूर्ति श्रीगुरु ॥ म्हणोनि जाणिजे निर्धारू ॥ देऊं शके अखिल वरू ॥ एका
भावें भजावें ॥ २३ ॥ एकादे समयीं श्रीहरी ॥ अथवा कोपे त्रिपुरारी ॥ राखेल
श्रीगुरु निर्धारी ॥ आपुले भक्तजनासी ॥ २४ ॥ आपण कोपें एकाद्यासी ॥ रक्षूं न शके
व्योमकेशी ॥ अथवा विष्णु परियेसी ॥ रक्षूं न शके अवधारीं ॥ २५ ॥ ऐसें ऐकोनि
नामकरणी ॥ लागे सिद्धाचिया चरणीं ॥ विनवीतसे कर जोडूनी ॥ भक्तिभावें
करोनियां ॥ २६ ॥ स्वामी ऐसा निरोप देती ॥ संदेह होतो माझे चित्तीं ॥ गुरु
कैंवी झाले त्रिमूर्ति ॥ ब्रह्मा विष्णु महेश्वर ॥ २७ ॥ आणीक तुम्ही निरोपिलेंती ॥ विष्णु
रुद्र जरी कोपती ॥ राखों शके गुरु निश्चिती ॥ गुरु कोपलिया न राखे कोणी ॥ २८ ॥ हा
बोल असे कवणाचा ॥ कवण शास्त्रपुराणींचा ॥ संदेह फेडी गा मनाचा ॥ जेणें मन दृढ

होय ॥२९॥ येणेंपरी नामकरणी ॥ सिद्धासी पुसे वंदोनी ॥ कृपानिधी संतोषोनी ॥ सांग- तसे परियेसा ॥३०॥ सिद्ध म्हणे शिष्यासी ॥ तुवां पुसिलें आम्हांसी ॥ वेदवाक्य साक्षी- सीं ॥ सांगेन ऐका एकचित्तें ॥ ३१ ॥ वेद चारी उत्पन्न ॥ झाले ब्रह्मयाचे मुखांतून ॥ त्यापासाव पुराण ॥ अष्टादश विख्यात ॥३२॥ तया अष्टादशांत ॥ ब्रह्मवाक्य असे ख्या- त ॥ पुराण ब्रह्मवैवर्त ॥ प्रख्यात असे त्रिभुवनीं ॥ ३३ ॥ नारायण विष्णु मूर्ति ॥ व्यास झाला द्वापारांतीं ॥ प्रकाश केला या क्षितीं ॥ ब्रह्मवाक्य विस्तारें ॥ ३४ ॥ तया व्यासा- पासूनी ॥ ऐकिजे समस्त ऋषीजनीं ॥ तेंचि कथा विस्तारोनी ॥ सांगेन ऐका एकचित्तें ॥ ३५ ॥ चतुर्मुख ब्रह्मयासी ॥ कलियुग पुसे हर्षी ॥ गुरुमहिमा विस्तारेंसी ॥ ब्रह्मदेवें नि- रोपिला ॥ ३६ ॥ ऐसें म्हणतां नामकरणी ॥ पुनरपि सिद्धासीं नमुनी ॥ विनवीतसे करद्वय जोडोनी ॥ भावभक्ति करोनियां ॥ ३७ ॥ म्हणे सिद्ध योगेश्वरा ॥ अज्ञानतिमिरभास्क- रा ॥ तूं तारक भवसागरा ॥ भेटलासी कृपासिंधू ॥ ३८ ॥ ब्रह्मदेव कलियुगासी ॥ सांगणें कैंवी कार्यासी ॥ आद्यंत विस्तारेंसी ॥ निरोपिजे स्वामिया ॥ ३९ ॥ ऐक शिष्या एकचि- त्ता ॥ जधीं प्रलय झाला होता ॥ आदिमूर्ती निश्चिता ॥ होते वटपत्रशयनीं ॥४०॥ अव्य- क्त मूर्ति नारायण ॥ होते वटपत्रीं शयन ॥ बुद्धि संभवे चेतन ॥ आणिक सृष्टी रचावया ॥४१॥ प्रपंच म्हणजे सृष्टिरचना ॥ करणें म्हणोनि आलें मना ॥ जागृत होय या कार- णा ॥ आदिपुरुष तयेवेळीं ॥ ४२ ॥ जागृत होवोनी नारायण ॥ बुद्धि संभवे चेतन ॥ कम- ळ उपजवी नाभीहून ॥ त्रैलोक्याचें रचना घर ॥ ४३ ॥ तया कमळामधून ॥ उदयो झा- ला ब्रह्मा आपण ॥ चारी दिशा पाहोन ॥ चतुर्मुख झाला देखा ॥ ४४ ॥ म्हणे ब्रह्मा तये

वेळीं ॥ समस्तांहूनि आपण बळी ॥ मजहून आणीक बळी ॥ कवण नाहीं म्हणतसे ॥४५॥ हांसोनियां नारायण ॥ बोले गाढ शब्द वचन ॥ आपण असे महाविष्णू ॥ भज म्हणे त- येवेळीं ॥ ४६ ॥ देखूनियां श्रीविष्णूसी ॥ नमस्कारी ब्रह्मा हर्षी ॥ स्तुति केली बहुवसीं ॥ अनेक काळ परियेसा ॥ ४७ ॥ संतोषोनि नारायण ॥ निरोप दिधला अति गहन ॥ सृष्टी रची गा म्हणोन ॥ आज्ञा दिधली तया वेळीं ॥ ४८ ॥ ब्रह्मा म्हणे विष्णूसी ॥ नेणें सृष्टी रचावयासी ॥ देखिली नाहीं कधीं कैसी ॥ केवीं रचूं म्हणतसे ॥४९॥ ऐकोनि ब्रह्मयाचें वचन ॥ निरोपी महाविष्णु आपण ॥ वेद असती घे म्हणोन ॥ देता झाला तयेवेळीं ॥ ५० ॥ सृष्टी रचावयाचा विचार ॥ असे वेदांत विस्तार ॥ तेणेंचि परी रचूनि स्थिर ॥ प्रकाश करी म्हणितलें ॥ ५१ ॥ अनादि वेद असती जाण ॥ असे सृष्टी- चें लक्षण ॥ जैसा आरसा असे खूण ॥ सृष्टी रचावी तयापरी ॥ ५२ ॥ या वेदमार्गे सृष्टीसीं ॥ रची गा ब्रह्मया अहर्निशीं ॥ म्हणोनि सांगे हृषीकेशी ॥ ब्रह्मा रची सृष्टीतें ॥५३॥ सृजी प्रजा अनुक्रमें ॥ विविध स्थावर जंगमें ॥ स्वेदज अंडज नामें ॥ जरायुज उद्भि- ज्ज उपजाविलें ॥ ५४ ॥ श्रीविष्णूचे निरोपानें ॥ त्रिजग रचिलें ब्रह्मयानें ॥ जयापरी सृष्टीक्रमण ॥ व्यासें असें कथियलें ॥ ५५ ॥ सिद्ध म्हणे शिष्यासी ॥ नारायण वेदव्यास ऋषी ॥ विस्तार केला पुराणांसी ॥ अष्टादश विख्यात ॥ ५६ ॥ तया अष्टादशांत ॥ पुराण ब्रह्मवैवर्त प्रख्यात ॥ ऋषेश्वरांसी सांगे सूत ॥ तेंचिपरी सांगतसें ॥ ५७ ॥ सनकादिकांतें उपजवोनी ॥ ब्रह्मनिष्ठ निर्गुणी ॥ मरीचादि ब्रह्म सगुणी ॥ उपजवी ब्रह्मा तयेवेळीं ॥ ५८ ॥ तेथोनि देव दैत्यांसी ॥ उपजवी ब्रह्मा परियेसीं ॥ सांगतों कथा विस्तारेंसीं ॥

गु. च.

अ. २

ऐसें ऐक शिष्योत्तमा ॥ ५९ ॥ कृत त्रेत द्वापारयुग ॥ उपजवी मग कलियुग ॥ एकेकातें निरोपी मग ॥ भूमिवरी प्रवर्तावया ॥ ६० ॥ बोलावूनी कृतयुगासी ॥ निरोपी ब्रह्मा परियेसी ॥ तुवां जावोनि भूमीसीं ॥ प्रकाश करीं आपणातें ॥६१॥ ऐकोनि ब्रह्मयाचें वचन ॥ कृतयुग आलें संतोषोन ॥ सांगेन त्याचें लक्षण ॥ ऐका श्रोते एकचित्तें ॥६२॥ असत्य नेणें कधीं वाचें ॥ वैराग्य पूर्ण ज्ञानी साचें ॥ यज्ञोपवीत आभरण त्याचें ॥ रुद्राक्षमाळा करकंकणें ॥ ६३ ॥ येणें रूपें युग कृत ॥ ब्रह्मयासीं असे विनवित ॥ मातें तुम्हीं निरोप देत ॥ केवीं जाऊं भूमिवरी ॥ ६४ ॥ भूमिवरी मनुष्यलोक ॥ असत्य निंदा अपवादक ॥ मातें न साहवें तें ऐक ॥ कवणेपरी वर्तावें ॥ ६५ ॥ ऐकोनि सत्ययुगाचें वचन ॥ निरोपितो ब्रह्मा आपण ॥ तुवां वर्तावें सत्वगुण ॥ कचित्काळ येणें परी ॥ ६६ ॥ नकरी जड तूतें जाण ॥ आणीक युग पाठवीन ॥ तुवां रहावें सावध होऊन ॥ ह्मणूनि पाठवी भूमीवरी ॥ ६७ ॥ वर्ततां येणेंपरी ऐका ॥ झाली अवधी सत्याधिका ॥ बोलावूनी त्रेतायुग देखा ॥ निरोपी ब्रह्मा परियेसा ॥ ६८ ॥ त्रेतायुगाचें लक्षण ॥ ऐक शिष्या सांगेन ॥ असे त्याची स्थूळ तनू ॥ हातीं असे यज्ञसामग्री ॥६९॥ त्रेतायुगीं याचि कारण ॥ यज्ञ करिती सकळ जन ॥ धर्मशास्त्र प्रवर्तन ॥ कर्ममार्ग ब्राह्मणांसीं ॥ ७० ॥ हातीं असे कुश समिधा ऐसें ॥ धर्मप्रवर्तक सदा वसे ॥ ऐसें युग गेलें हर्षें ॥ निरोप घेउनी भूमीवरी ॥ ७१ ॥ बोलावूनी ब्रह्मा हर्षी ॥ निरोप देत द्वापारासी ॥ सांगेन तयाचे रूपासी ॥ ऐका श्रोते एकचित्तें ॥ ७२ ॥ खड्ग खट्वांग धरोनि हातीं ॥ धनुष्यबाण एकें हातीं ॥ लक्षण उग्र असे शांती ॥ निष्ठुर दया दोनी असे ॥ ७३ ॥ पुण्य पाप समान देखा ॥ स्वरूपें द्वापार असे

निका ॥ निरोप घेउनि कौतुका ॥ आला आपण भूमीवरी ॥ ७४ ॥ त्याचे दिवस पुरल्या-
वरी ॥ कलियुगातें पाचारी ॥ जावें त्वरित भूमीवरी ॥ म्हणोनि सांगे ब्रह्मा देखा ॥ ७५ ॥
ऐसें कलियुग देखा ॥ सांगेन लक्षणें ऐका ॥ ब्रह्मयाचे सन्मुखा ॥ कैंवि गेलें परियेसा
॥ ७६ ॥ विचारहीन अंतःकरण ॥ पिशाचासारखें वदन ॥ तोंड खालतें करून ॥ ठायीं
ठायीं पडतसे ॥ ७७ ॥ वृद्ध आपण विरागहीन ॥ कलह द्वेष संगें घेउन ॥ वामहातीं
धरोनि शिश्न ॥ येत ब्रह्मया-सन्मुख ॥७८॥ जिव्हा धरोनी उजवे हातीं ॥ नाचे कली अति
प्रीतिं ॥ दोषोत्तरें करी स्तुती ॥ पुण्यपाप मिश्रित ॥ ७९ ॥ हांसे रडे वांकुल्या दावी ॥ वांकुडें
तोंड मुखीं शिवी ॥ ब्रह्मयापुढें उभा राही ॥ काय निरोप म्हणोनियां ॥८०॥ देखोनि तयाचें
लक्षण ॥ ब्रह्मा हांसे अति गहन ॥ पुसतसे विस्तारोन ॥ लिंग जिव्हा कां धरिली ॥ ८१ ॥
कलियुग म्हणे ब्रह्मयासी ॥ जिंकीन समस्त लोकांसी ॥ लिंग जिव्हा रक्षणारासी ॥ हा-
रीं असे आपणातें ॥८२॥ याकारणें लिंग जिव्हा ॥ धरोनि नाचें ब्रह्मदेवा ॥ जेथें जाईन
मी स्वभावा ॥ आपण न भियें कवणातें ॥ ८३ ॥ ऐकोनि कलीचें वचन ॥ निरोप देत ब्रह्मा
आपण ॥ भूमीवरी जाऊन ॥ प्रकाश करीं आपुले गुणें ॥ ८४ ॥ कलि म्हणे ब्रह्मया-
सी ॥ मज पाठवितां भूमीसी ॥ आपुले गुण तुम्हांसी ॥ सांगेन ऐका स्वामिया ॥ ८५ ॥
उच्छेद करीन धर्मासी ॥ आपण असें निरंकुशी ॥ निरानंद परियेसीं ॥ निद्रा कलह मा-
झेनी ॥ ८६ ॥ परद्रव्यहारक परस्त्रीरत ॥ हे दोवे माझे भ्रात ॥ प्रपंच मत्सर दंभक ॥ प्रा-
णसखे माझे असती ॥ ८७ ॥ बकासारिखे संन्यासी ॥ तेचि माझे प्राण परियेसी ॥ छळ-
ण करोनी उदरासी ॥ मिळविती पोषणार्थ ॥ ८८ ॥ तेचि माझे सखे प्राण ॥ आणीक अ-

सतील पुण्यजन ॥ तेचि माझे वैरी जाण ॥ म्हणोनि विनवी ब्रह्मयासी ॥८९॥ ब्रह्मा म्हणे कलियुगासी ॥ सांगेन तुज उपदेशी ॥ कलियुगीं आयुष्य नरांसी ॥ स्वल्प असे एक शत ॥ ९० ॥ पूर्व युगायुगीं देखा ॥ आयुष्य बहु मनुष्यलोकां ॥ तप अनुष्ठान ऐका ॥ करिती अनेक दिवसांवरी ॥ ९१ ॥ मग होय तयांसी गती ॥ आयुष्य असे अखंडिती ॥ याकारणें कष्टती क्षितीं ॥ बहु दिवसपर्यंत ॥ ९२ ॥ तैसें नव्हेचि कलियुगीं जाण ॥ स्वल्प आयुष्य मनुष्यपण ॥ करिती तप अनुष्ठान ॥ शीघ्र पावती परमार्था ॥ ९३ ॥ जे जन असतील ब्रह्मज्ञानी ॥ पुण्य करितील जाणोनी ॥ त्यांस तुवां साह्य होउनी ॥ वर्तत असे म्हणे ब्रह्मा ॥ ९४ ॥ ऐकोनि ब्रह्मयाचें वचन ॥ कली म्हणतसे नमोन ॥ स्वामी निरोपिले जे जन ॥ तेचि माझे वैरी असती ॥ ९५ ॥ ऐसे वैरी जेथें असती ॥ केवि जाऊं तया क्षितीं ॥ ऐकतां होय मज भीति ॥ केवि पाहूं तयांसि ॥ ९६ ॥ पंचशत भूमंडळांत ॥ भरतखंडीं पुण्य बहुत ॥ मज मारितील देखत ॥ कैसा जाऊं म्हणतसे ॥ ९७ ॥ ऐकोनि कलीचें वचन ॥ ब्रह्मा निरोपी हांसोन ॥ काळात्म्यातें मिळोन ॥ तुवां जावें भूमिसी ॥ ९८ ॥ काळात्म्याचे ऐसे गुण ॥ धर्मवासना करील छेदन ॥ पुण्यात्म्याचें अंतःकरण ॥ उपजेल बुद्धि पापाविषयीं ॥ ९९ ॥ कली म्हणे ब्रह्मयासी ॥ वैरी माझे परियेसी ॥ वसताती भूमंडळासी ॥ सांगेन स्वामी ऐकावें ॥ १०० ॥ उपद्रविती मातें बहुत ॥ कृपा नये मज देखत ॥ जे जन शिव हरि ध्यात ॥ धर्मरत मनुष्य देखा ॥ १ ॥ आणीक असती माझे वैरी ॥ वास करिती गंगातीरीं ॥ आणीक वाराणशीपुरीं ॥ जाऊनि धर्म करिती देखा ॥ २ ॥ तीर्थें हिंडती जे चरणें ॥ आणीक ऐकती पुराणें ॥ जे जन करिती सदां दानें ॥ तेचि माझे

वैरी जाणा ॥ ३ ॥ ज्यांचे मनीं वसे शांती ॥ तेचि माझे वैरी ख्याती ॥ अदांभिकपणें पुण्य करिती ॥ त्यांसि देखतां भीतसें ॥ ४ ॥ नासाग्रीं दृष्टी ठेवूनि ॥ जप करिती अनुष्ठानीं ॥ त्यांसि देखतांचि नयनीं ॥ प्राण माझा जातसे ॥ ५ ॥ स्त्रिया पुत्रांवरी प्रीति ॥ मायबापां अव्हेरिती ॥ त्यांवरी माझी बहु प्रीती ॥ परम इष्ट माझे जाणा ॥ ६ ॥ वेदशास्त्रांतें निंदिती ॥ हरीहरातें भेद पाहती ॥ अथवा शिव विष्णु दूषिती ॥ ते परम आप्त माझे जाणा ॥ ७ ॥ जितेंद्रिय जे असतील नर ॥ सदा भजती हरिहर ॥ राग-द्वेष-विर्वाजित धीर ॥ त्यांसि देखोनि मज भय ॥ ८ ॥ ब्रह्मा म्हणे कलियुगासी ॥ तुझा प्रकाश बहुवसी ॥ तुंवा जातांचि भूमीसी ॥ तुझे इच्छें रहाटतील ॥ ९ ॥ एखादा विरळागत ॥ होईल नर पुण्यवंत ॥ त्यातें तुवां साह्य होत ॥ वर्तावें म्हणे ब्रह्मा ॥ १० ॥ ऐकोनि ब्रह्मयाचें वचन ॥ कलियुग करीतसे नमन ॥ करसंपुट जोडोन ॥ विनवीतसे परियेसा ॥ ११ ॥ माझ्या दुष्ट स्वभावासी ॥ कैंवि साह्य व्हावें धर्मासी ॥ सांगा स्वामी उपाय यासी ॥ कवणेपरी रहाटावें ॥ १२ ॥ कलीचें वचन ऐकोनी ॥ ब्रह्मा हांसे अति गहनीं ॥ सांगतसे विस्तारोनी ॥ उपाय कलीसी रहाटावया ॥ १३ ॥ काळवेळ असती दोनी ॥ तुज साह्य होउनी ॥ येत असती निर्गुणी ॥ तेचि दाविती तुज मार्ग ॥ १४ ॥ निर्मळ असती जे जन ॥ तेचि तुझे वैरी जाण ॥ मळमूत्रें जयांसी वेष्टन ॥ ते तुझे इष्ट परियेसी ॥ १५ ॥ याचिकारणें पापपुण्यासी ॥ विरोध असे परियेसी ॥ जे अधिक पुण्यरासी ॥ तेचि जिंकिती तुज ॥ १६ ॥ याकारणें विरळागत ॥ होतील नर पुण्यवंत ॥ तेचि जिंकिती निश्चित ॥ बहुतेक तुज वश्य होती ॥ १७ ॥ एखादा विवेकि

जाण ॥ राहे तुझे उपद्रव साहोन ॥ जे न साहती तुझे दारुण ॥ तेचि होती वश्य तुज ॥ १८ ॥ याकारणें कलियुगाभीतरी ॥ जन्म होतील येणेंपरी ॥ जे जन तुझेचि परी ॥ न होय त्यां ईश्वरप्राप्ती ॥ १९ ॥ ऐकोनि ब्रह्मदेवाचें वचन ॥ कलियुग करीतसे प्रश्न ॥ कैसें साधूंचें अंतःकरण ॥ कवण असे निरोपावें ॥ १२० ॥ ब्रम्हा म्हणे तये वेळीं ॥ एकचित्तें ऐक कली ॥ सांगेन ऐका श्रोते सकळी ॥ सिद्ध म्हणे शिष्यासी ॥ २१ ॥ धैर्य धरोनी अंतःकरण ॥ शुद्ध बुद्ध वर्तती जन ॥ दोष न लागती कधीं जाण ॥ लोभवर्जित नरासी ॥ २२ ॥ जे नर भजती हरिहरांसी ॥ अथवा असती काशीवासी ॥ गुरु सेविती निरंतरेंसी ॥ त्यांसीं तुझा न लागे दोष ॥ २३ ॥ माता पिता सेवकांसी ॥ अथवा सेवा ब्राह्मणासी ॥ गायत्री कपिला धेनूसी ॥ भजणारासी न लागे दोष ॥ २४ ॥ वैष्णव अथवा शैवासी ॥ जे सेविती नित्य तुळसीसी ॥ आज्ञा माझी आहे ऐसी ॥ बाधूं नको तयांसी ॥ २५ ॥ गुरुसेवक असती नर ॥ पुराण श्रवण करणार ॥ सर्व साधन धर्मपर ॥ त्यांतें तुवां न बाधावें ॥ २६ ॥ सुकृती शास्त्रपरायणांसी ॥ गुरुतें सेविती वंशोवंशीं ॥ विवेकी धर्म करणारांसी ॥ त्यांतें तुवां न बाधावें ॥ २७ ॥ कली ह्मणे ब्रह्मयासी ॥ गुरुमहिमा आहे कैशी ॥ कवण गुरू स्वरूपें कैसीं ॥ विस्तारावें मजप्रती ॥ २८ ॥ ऐकोनि कलीचें वचन ॥ ब्रह्मा सांगतसे आपण ॥ गुकार ह्मणजे सिद्ध जाण ॥ रेफः पापस्य दाहकः ॥ २९ ॥ उकार विष्णुरव्यक्त ॥ तृतीयात्मा श्रीगुरुसत्य ॥ परब्रह्म गुरू निश्चित ॥ ह्मणोनि सांगे कलीसी ॥१३०॥ श्लोक ॥ गणेशो वह्निना युक्तो विष्णुनामसमन्वितः ॥ वर्णद्वयात्मको मंत्रश्चतुर्मुक्तिप्रदायकः ॥ ३१ ॥ टीका ॥ गणेशातें ह्मणती गुरू ॥ तैसाचि असे वैश्वानरू ॥ ऐ-

साचि जाण शार्ङ्गधरू ॥ गुरु शब्द वर्ते इतुके ठायीं ॥३२॥ श्लोक ॥ गुरुः पिता गुरुर्माता गुरुरेव
परः शिवः ॥ शिवे रुष्टे गुरुस्त्राता ॥ गुरौ रुष्टे न कश्चन ॥३३॥ टीका ॥ गुरु आपुला मातापि-
ता ॥ गुरु शंकरू निश्चिता ॥ ईश्वरू होय जरी कोपता ॥ गुरु रक्षिल परियेसा ॥ ३४ ॥ गुरु
कोपेल एखाद्यासी ॥ ईश्वर न राखे परियेसी ॥ ईश्वर कोपे ज्या नरासी ॥ श्रीगुरु रक्षील
निश्चयें ॥ ३५ ॥ श्लोक ॥ गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुर्गुरुर्देवो महेश्वरः ॥ गुरुरेकः परं ब्रह्म तस्माद्गुरु-
मुपाश्रयेत् ॥ ३६ ॥ टीका ॥ गुरु ब्रह्मा सत्य जाण ॥ तोचि रुद्र नारायण ॥ गुरुचि ब्रह्म-
कारण ॥ म्हणोनि गुरु आश्रावा ॥ ३७ ॥ श्लोक ॥ हरौ प्रसन्नेपि च वैष्णवा जनाः संप्रार्थ-
यंतो गुरुभक्तिमव्ययाम् ॥ गुरौ प्रसन्ने जगदीश्वरः सदा जनार्दनस्तुष्यति सर्वसिद्धिदः
॥ ३८ ॥ टीका ॥ ईश्वर जरी प्रसन्न होता ॥ त्यासि गुरु होय ओळखविता ॥ गुरु आपण
प्रसन्न होतां ॥ ईश्वर होय आधीन आपुल्या ॥ ३९ ॥ श्लोक ॥ गुरुः सदा दर्शयिता प्रवृत्ति
तीर्थव्रतं योगतपादि धर्मान् ॥ आचारवर्णादिविवेकयज्ञान् ज्ञानं परं भक्तिविवेकयु-
क्तम् ॥ १४० ॥ टीका ॥ गुरु भजे शास्त्रमार्ग वर्तोनी ॥ तीर्थ व्रत योग तपादि मुनी ॥
आचारवर्णादि ज्ञानी ॥ ज्ञानें परम भक्ती-विवेकयुक्त ॥ ४१ ॥ या कारणें श्रीगुरूसी ॥
भजावें शास्त्रमार्गेसी ॥ तीर्थ व्रत याग तपासी ॥ ज्योतिस्वरूप असे जाणा ॥ ४२ ॥
आचारधर्म वर्णाश्रमासी ॥ विवेकधर्म मार्गासी ॥ भक्तिविराग युक्तासी ॥ गुरुचि मार्ग
दाविणार ॥ ४३ ॥ इतुकें ऐकोनि कली आपण ॥ विनवीतसे कर जोडोन ॥ गुरु सर्व
देवासमान ॥ केवि झाला सांग मज ॥ ४४ ॥ ब्रह्मा म्हणे कलीसी ॥ सांगेन तुज विस्तारें-
सी ॥ एकचित्तें परियेसी ॥ गुरुविण पार नाहीं ॥४५॥ श्लोक ॥ गुरोर्विना न श्रवणं भवेत्

कस्यापि कस्यचित् ॥ विनाकर्णेन शास्त्रस्य श्रवणं तत्कुतो भवेत् ॥४६॥ टीका ॥ गुरुविण समस्तांसी ॥ श्रवण कैचें परियेसी ॥ श्रवण होतां मनुष्यांसी ॥ समस्त शास्त्रें ऐकती ॥ ४७ ॥ शास्त्र ऐकतां परियेसी ॥ तरतील संसारासी ॥ याकारणें गुरूचि प्रकाशी ॥ ज्योतिस्वरूप जाणावा ॥ ४८ ॥ गुरु सेवितां सर्व सिद्धी ॥ होती परियेसा त्रिशुद्धी ॥ कथा वर्तली अनादी ॥ अपूर्व तुज सांगेन ॥ ४९ ॥ पूर्वी गोदावरीचे तिरीं ॥ आंगिरस ऋषीचा आश्रम थोरी ॥ वृक्ष असती नानापरी ॥ पुण्य नामें मृग वसती ॥ १५० ॥ ब्रह्म-ऋषी आदि करोनी ॥ तप करिती तया स्थानीं ॥ तयांत वेदधर्म ह्मणोनी ॥ पैलपुत्र होता द्विज ॥ ५१ ॥ तया शिष्य बहु असती ॥ वेदशास्त्र अभ्यासिती ॥ त्यांत दीपक ह्मणोनी ख्याती ॥ शिष्य होता परियेसा ॥ ५२ ॥ होता शिष्य गुरुपरायण ॥ केला अभ्यास शास्त्र पुराण ॥ झाला असे अति निपुण ॥ सेवा करितां श्रीगुरूची ॥ ५३ ॥ वेदधर्म एके दिनीं ॥ समस्त शिष्यांसी बोलावुनी ॥ पुसतसे संतोषोनी ॥ ऐका श्रोते एकचित्तें ॥ ५४ ॥ बोलावुनी शिष्यांसी ॥ बोले गुरु परियेसी ॥ प्रीती असेल जरी आ-ह्मांसी ॥ तरी माझें वाक्य परियेसा ॥ ५५ ॥ शिष्य ह्मणती गुरुसी ॥ जें जें स्वामी नि-रोपिसी ॥ तूं तारक आह्मांसी ॥ अंगिकारू हा भरंवसा ॥ ५६ ॥ गुरूचें वाक्य जो न करी ॥ तोचि पडे रौरव घोरीं ॥ अविद्या माया सागरीं ॥ बुडोनि जाय तो नर ॥ ५७ ॥ मग तया कैची गती ॥ नरकीं पडे तो सततीं ॥ गुरु तारक हे ख्याती ॥ वेद पुराणें बोलती ॥ ५८ ॥ ऐकोनी शिष्यांची वाणी ॥ संतोषला वेदधर्म मुनी ॥ संदीपकातें बोला-वुनी ॥ सांगतसे परियेसा ॥ ५९ ॥ ऐका शिष्य सकळिक ॥ आमुचें पूर्वार्जित असे

एक ॥ जन्मांतरीं सहस्राधिक ॥ केलीं होतीं महापातकें ॥ १६० ॥ आमुचें अनुष्ठान करितां ॥ बहुत गेलें प्रक्षाळितां ॥ कांहीं शेष असे आतां ॥ भोगिलियावांचूनि न सुटे जाणा ॥ ६१ ॥ तपसामर्थ्यें उपेक्षा करितों ॥ पाप मोक्षा आड रिघतों ॥ याचि कारणें निष्कृति करितों ॥ तया पाप घोरासी ॥ ६२ ॥ न भोगितां आपुल्या देहीं ॥ आपुलें पाप निष्कृति नाहीं ॥ हा निश्चय जाणोनि पाहीं ॥ भोगावें आह्मीं परियेसा ॥ ६३ ॥ या पापाचे निष्कृतीसीं ॥ जावें आह्मीं वाराणशीसी ॥ जाईल पाप शीघ्रेंसी ॥ प्रख्यात असे आखिल शास्त्रीं ॥ ६४ ॥ याकारणें आह्मांसी ॥ न्यावें पुरी वाराणशीसी ॥ पाप भोगीन स्वदेहासीं ॥ मातें तुह्मीं सांभाळावें ॥६५॥ या समस्त शिष्यांत॥ कवण असेल सामर्थ्यवंत॥ अंगिकारावें त्वरित ॥ ह्मणोनि पुसे शिष्यांसी ॥ ६६ ॥ तया शिष्यांमध्यें एक ॥ नाम असे संदीपक ॥ बोलतसे अति विवेक ॥ तया गुरुप्रति देखा ॥ ६७ ॥ दीपक ह्मणे गुरूसी॥ पाप करितां देह नाशी ॥ न करावा संग्रहो दुःखासी ॥ शीघ्र करा प्रतीकारु ॥६८॥ वेदधर्म ह्मणे तयासीं ॥ दृढ देह असतां मनुष्यासी ॥ क्षालन करावें पापासी ॥ पुढती वाढे विपापरी ॥ ६९ ॥ अथवा तीर्थें प्रायश्चित्तें ॥ आपुले देहीं भोगोनी त्वरितें ॥ पाप वेगळें नव्हतां निरुतें ॥ मुक्ति नव्हे आपणासी ॥ १७० ॥ देव अथवा ऋषेश्वरांसी ॥ मनुष्यादि ज्ञानवंतांसी ॥ क्षालन न होय पापासी ॥ आपुलें आपण न भोगितां ॥ ७१ ॥ दीपक ह्मणे गुरूसी ॥ स्वामी निरोपावें आपणासी ॥ सेवा करीन स्वशक्तीसी ॥ न करितां अनुमान सांगिजे ॥ ७२ ॥ ऐकोनि दीपकाचें वचन ॥ वेदधर्म ह्मणे आपण ॥ कुष्टें होईन अंगहीन ॥ अंधक पांगळा परियेसा ॥ ७३ ॥ संवत्सर एकविंशत ॥ मातें सांभाळावें बहुत ॥ जरी असेल दृढव्रत ॥

अंगिकारावी तुह्मी सेवा ॥७४॥ दीपक ह्मणे श्रीगुरूसी ॥ कुष्टी होई [illegible] हर्षीं ॥ अंध होईन एकवीस वर्षीं ॥ पाप निष्कृती करीन ॥७५॥ तुमचे पापाची निष्कृती ॥ मी करीन निश्चितीं ॥ स्वामी निरोपावें त्वरिती ॥ ह्मणोनि चरणासी लागला ॥७६॥ ऐकोनि शिष्याची वाणी ॥ संतोषला वेदधर्म मुनी ॥ सांगतसे विस्तारोनि ॥ तया पापलक्षणें ॥ ७७ ॥ आपुलें पाप आपणासी ॥ ग्राह्य नव्हे पुत्र शिष्यासी ॥ न भोगितां स्वदेहासी ॥ न वेंचे पाप परियेसा ॥७८॥ याकारणें आपण देखा ॥ भोगीन आपुलें पाप दुःखा ॥ सांभाळी मज तूं संदीपका ॥ एकवीस वरुषेंपर्यंत ॥ ७९ ॥ जे पीडिती रोगें देखा ॥ प्रतिपाळणारासी कष्ट अधिका ॥ मजहुनी संदीपका ॥ तूतें कष्ट अधिक जाण ॥ १८० ॥ याकारणें आपुले देहीं ॥ भोगीन पाप निश्चयीं ॥ तुवां प्रतिपाळावें पाहीं ॥ काशीपुरीं नेऊनियां ॥ ८१ ॥ तया काशीपुरीं जाण ॥ पापावेगळा होईन ॥ आपण शाश्वतपद पावेन ॥ तुजकारितां शिष्योत्तमा ॥ ८२ ॥ दीपक ह्मणे गुरूसी ॥ अवश्य नेईन पुरी काशी ॥ सेवा करीन एकवीस वर्षीं ॥ विश्वनाथासम तुमची ॥ ८३ ॥ ब्रह्मा ह्मणे कलियुगासी ॥ कैसा होता शिष्य त्यासी ॥ कुष्ट होतांचि गुरूसी ॥ नेलें काशीपुरासी ॥ ८४ ॥ मणिकर्णिका उत्तरदेशी ॥ कंबळेश्वर सन्निधेसी ॥ राहिले तेथें परियेसी ॥ गुरुशिष्य दोघेजण ॥८५॥ स्नान करूनी मणिकर्णिकेसी ॥ पूजा करिती विश्वनाथासी ॥ प्रारब्ध भोग त्या गुरूसी ॥ भोगीत होता तया स्थानीं ॥ ८६ ॥ कुष्टरोग झाला बहुत ॥ अक्षिहीन अति दुःखित ॥ संदीपक सेवा करीत ॥ अतिभक्ती करूनियां ॥ ८७ ॥ व्यापिला देह कुष्टें बहुत ॥ पू कृमी पडे रक्त ॥ दुःखें व्यापला अत्यंत ॥ अपस्मारी झाला जाणा ॥ ८८ ॥ भिक्षा मागोनि संदीपक ॥ गुरूसि

आणुनि देत नित्यक ॥ करी पूज भावें एक ॥ विश्वनाथस्वरूप ह्मणतसे ॥ ८९ ॥ रोगें करूनी पीडितां नरू ॥ साधुजन होती क्रूरू ॥ तोचि देखा द्विजवरू ॥ होय क्रूर एखादे वेळीं ॥ १९० ॥ भिक्षा आणितां एखादे दिवसीं ॥ न जेवी श्रीगुरू कोपेसीं ॥ स्वल्प आणिलें ह्मणोनि क्लेशी ॥ सांडूनि देत भूमीवरी ॥ ९१ ॥ थेरे दिवसीं जाऊनि शिष्य ॥ आणि अन्नें बहूवस ॥ भिष्टान्नें न आणी ह्मणोनि क्लेश ॥ करिता झाला परियेसा ॥ ९२ ॥ परोपरीचें पक्वान्न ॥ कां नाणिशी ह्मणे जाण ॥ कोपें मारूं येत आपण ॥ शाका परोपरी मागतसे ॥ ९३ ॥ जितुकें आणी मागोनियां ॥ सर्वस्वें करीतसे वायां ॥ कोपें देतसे शिव्या ॥ परोपरी परियेसा ॥ ९४ ॥ एखादे समयीं शिष्यासी ॥ ह्मणे ताता ज्ञानराशी ॥ मज निमित्त कष्टलासी ॥ शिष्या राया शिखामणी ॥ ९५ ॥ सवेंचि ह्मणत वचनें क्रूर ॥ मातें गांजिलें अपार ॥ तूं आमचें विष्टामूत्र ॥ क्षणक्षणा धूत नाहीं ॥ ९६ ॥ खाताति मज मक्षिका ॥ कां न निवारसी संदीपका ॥ सेवा करितां ह्मणे ऐका ॥ भिक्षा नाणिशी ह्मणतसे ॥ ९७ ॥ याकारणें पापगुण ॥ ऐसेचि असती जाण ॥ वोखट वाक्य निर्गुण ॥ पाप ह्मणोनी जाणावें ॥ ९८ ॥ पाप असेल जेथें बहुत ॥ दैन्य मत्सर वसे तेथ ॥ शुभाशुभ नेणें क्वचित ॥ पापरूपें जाणावें ॥ ९९ ॥ एखादे दैन्यकासी ॥ दुःख प्राप्त होय जयासी ॥ अपस्मार होय जयासी ॥ पापरूप तोचि जाणा ॥ २०० ॥ समस्त रोग असती देखा ॥ कुष्ट सोळा भगांतिका ॥ वेदधर्म द्विज ऐका ॥ कष्टतसे येणेंपरी ॥ १ ॥ ऐसे गुरूचे गुणदोष ॥ मना नाणी तोचि शिष्य ॥ सेवा करी एकमानस ॥ तोचि ईश्वर मानोनी ॥ २ ॥ जैसें जैसें मागे अन्न ॥ आणुनि देतसे परिपूर्ण ॥ जैसा विश्वेश्वर नारायण ॥ तैसा गुरु ह्मणतसे ॥ ३ ॥

काशीक्षेत्र थोर असतां ॥ न करी कदा तीर्थयात्रा ॥ न जाय देवदर्शना सर्वथा ॥ गुरुसेवे-
वांचुनि ॥४॥ श्लोक ॥ न तीर्थयात्रा न देहयात्रा नच देवयात्रा नच गेहयात्रा ॥ अहर्निशं ब्रह्म-
हरी सुबुध्द्या गुरुः प्रसेव्यो नाहि सेव्यमन्यत् ॥५ ॥टीका॥ आपुलें देहसंरक्षण ॥ कधीं न करी
शिष्य जाण ॥ लय लावूनि श्रीगुरुचरण ॥ कवणा सवें न बोलेची ॥६॥ अहोरात्र येणें परी॥
ब्रह्मा शिव ह्मणे हरी ॥ गुरूचि होय निर्धारी ॥ म्हणोनि सेवा करीतसे ॥ ७ ॥ गुरु बोले निष्ठु-
रेंसीं ॥ आपण मनीं संतोषी ॥ जें जें त्याचे मानसीं ॥ पाहिजे तैसें वर्ततसे ॥ ८ ॥ वर्ततां
येणेंपरी देख ॥ प्रसन्न होवोनि पिनाक ॥ उभा येवोनि सन्मुख ॥ वर माग ह्मणतसे ॥ ९ ॥
अहो गुरुभक्त संदीपका ॥ महाज्ञानी कुलदीपका ॥ तुष्टलों तुझे भक्तीसी ऐका ॥ प्रसन्न
झालों माग आतां ॥ २१० ॥ दीपक ह्मणे ईश्वरासी ॥ हे मृत्युंजय व्योमकेशी ॥ न पुस-
तां आह्मी गुरूसी ॥ वर न घे सर्वथा ॥ ११ ॥ ह्मणोन गेला गुरूपासीं ॥ विनवीतसे
तयासी ॥ विश्वनाथ आह्मासी ॥ प्रसन्न होउनी आला असे ॥ १२ ॥ निरोप झालिया
स्वामीचा ॥ मागेन उपशम व्याधीचा ॥ वर होतां सदाशिवाचा ॥ बरवें होईल ह्मण-
तसे ॥ १३ ॥ ऐकोनियां शिष्याचें वचन ॥ बोले गुरु कोपायमान ॥ माझे व्याधीनि-
मित्त जाण ॥ नको प्रार्थूं ईश्वरासी ॥ १४ ॥ भोगिल्यावांचोनि पातकासी ॥ निष्कृ-
ती नव्हे गा परियेसी ॥ जन्मांतरीं बाधिती निश्चयेसीं ॥ धर्मशास्त्रीं असे जाण ॥ १५ ॥
मुक्ति अपेक्षा ज्याचे मनीं ॥ तेणें करावी पापधुणी ॥ शेष रहातां निर्गुणी ॥ विघ्न करि-
ती मोक्षासी ॥१६ ॥ ऐशिया परी शिष्यासी ॥ गुरु सांगे परियेसी ॥ निरोप मागोनि
श्रीगुरूसी ॥ गेला ईश्वरासन्मुख ॥ १७ ॥ जाऊनि सांगे ईश्वरासी ॥ नलगे वर आप-

गु. च.

अ. २

णासी ॥ नये गुरूचे मानसीं ॥ कैंवि घेऊं म्हणतसे ॥ १८ ॥ विस्मय करोनी व्योमकेशी ॥ गेला निर्वाणमंडपासीं ॥ बोलावून समस्त देवांसी ॥ सांगे वृत्तांत विष्णूपुढें ॥ १९ ॥ श्रीविष्णु म्हणे शंकरास ॥ कैसा गुरु कैसा शिष्य ॥ कोठें असे त्याचा वास ॥ सांगावें मज विस्तारें ॥ २२० ॥ सांगे ईश्वर विष्णूसी ॥ आश्चर्य देखिलें परियेसी ॥ दीपक शिष्य निश्चयेसी ॥ गुरुभक्त असे जाणा ॥ २१ ॥ गोदावरीतीरवासी ॥ वेदधर्म म्हणिजे तापसी ॥ त्याची सेवा अहर्निशीं ॥ करितो भावें एकचित्तें ॥ २२ ॥ नाहीं त्रिलोकीं देखिला कोणी॥ गुरुभक्ती करणार निर्गुणी ॥ त्यातें देखोनि माझे मनीं ॥ अति प्रीति वर्ततसे ॥ २३ ॥ वर देईन म्हणोन आपण ॥ गेलों होतों तया जवळी जाण ॥ गुरूचा निरोप नाहीं म्हणून ॥ न घे वर परियेसा ॥२४॥ अनेक दिव्य सहस्त्रवर्षी ॥ तप करिती महा ऋषी ॥ वर मागती अहर्निशीं ॥ नाना कष्ट करोनियां ॥ २५ ॥ तैसा तापसी योगीयांसी ॥ नव्हे मन वर द्यावयासी ॥ बलात्कारें देतां तयासी ॥ वर न घे तो दीपक ॥२६॥ तनमन अर्पुनि श्रीगुरूसी ॥ सेवा करितो संतोषीं ॥ त्रयमूर्ति म्हणोनि गुरूसी ॥ निश्चयें भजतसे ॥ २७ ॥ समस्त देव माता पिता ॥ गुरुचि असे तत्वता ॥ निश्चय केला असे चित्ता ॥ गुरु परमात्मा म्हणोनी ॥ २८ ॥ किती म्हणोनि वर्णू त्यासी ॥ अविद्या अंधःकारासी ॥ छेदितां दीपक परियेसी ॥ कुलदीपक नाम सत्य ॥ २९ ॥ धर्म ज्ञान सर्व एक ॥ गुरूचि म्हणे कुलदीपक ॥ चरणसेवा मनःपूर्वक ॥ करितो गुरूचि भक्तीनें ॥ २३० ॥ इतुकें ऐकोनि शार्ङ्गधरू ॥ पहावया गेला शिष्य गुरु ॥ त्यांचा भक्तिप्रकारू ॥ पाहे तयेवेळीं ॥ ३१ ॥ सांगितलें विश्वनाथें ॥ त्याहूनि दिसे अधिक तेथें ॥ संतोषोनि दीपकातें ॥ म्हणे विष्णु परियेसा ॥ ३२ ॥ बोला-

पा. २७

वूनि दीपकासी ॥ ह्मणतसे हृषीकेशी ॥ तुष्टलों तुझे भक्तीसी ॥ वर माग म्हणतसे ॥ ३३ ॥ दीपक ह्मणे विष्णूसी ॥ काय भक्ती देखोनि आह्मासी ॥ वर देतोसि परियेसी ॥ कवणा का-र्या सांग मज ॥ ३४ ॥ लक्ष कोटी सहस्र वरुषीं ॥ तप करिती अरण्यवासी ॥ त्यांसी करि-तोसि उदासी ॥ वरु न देसी नारायणा ॥ ३५ ॥ मीं तरी तुज भजत नाहीं ॥ तुझें नाम स्म-रत नाहीं ॥ बलात्कारें येवोनि पाहीं ॥ केवी देसी वर मज ॥ ३६ ॥ ऐकोनि दीपकाचें व-चन ॥ संतोषला नारायण ॥ सांगतसे विस्तारोन ॥ तया दीपकाप्रती देखा ॥ ३७ ॥ गुरुभ-क्ती करिसी निर्वाणेसी ॥ ह्मणोनि आह्मी जाहलों संतोषी ॥ जे भक्ती केली त्वां गुरू-सी ॥ तेंचि आह्मासी पावली ॥ ३८ ॥ जो नर असेल गुरुभक्त जाण ॥ तोंचि माझा जीवप्राण ॥ त्यासी वश्य झालों आपण ॥ जें मागेल तें देईन ॥ ३९ ॥ सेवा करी माता-पिता ॥ ती पावे मज तत्वता ॥ पतिसेवा स्त्रिया करितां ॥ तेंहि मज पावतसे ॥ २४० ॥ एखाद्या भल्या ब्राह्मणासी ॥ यती योगेश्वर तापसी ॥ करिती नमन भक्तीसी ॥ तेंचि मज पावे जाणा ॥४१॥ ऐसें ऐकोनि दीपक ॥ नमिता झाला आणिक ॥ विनवीतसे देख ॥ म्हणे सिद्ध नामधारका ॥ ४२ ॥ ऐक विष्णु हृषीकेशी ॥ निश्चय असा माझे मानसीं ॥ वेद-शास्त्र मीमांसादिकांसी ॥ गुरु आह्मांसी देणार ॥ ४३ ॥ गुरुपासोनि सर्व ज्ञान ॥ त्रयमूर्ति होती आह्मां आधीन ॥ आमुचा गुरुचि देव जाण ॥ अन्यथा नाहीं जाणपां ॥ ४४ ॥ सर्व देव सर्व तीर्थ ॥ गुरुचि आम्हां असे सत्य ॥ त्याचेनि आम्हां परमार्थ ॥ काय दूर असे सांगा ॥ ४५ ॥ समस्त योगी सिद्ध जन ॥ गुरुवांचुनि न होती सज्ञान ॥ ज्ञान होतां ईश्वर आपण ॥ केंवी दूर असे सांगा ॥ ४६ ॥ जो वर द्याल तुम्ही मज ॥ श्रीगुरु देतां

काय चोज ॥ याकारणें श्रीगुरुराज ॥ भजतसें परियेसा ॥ ४७ ॥ संतोषोनि नारायण ॥ म्हणे धन्य धन्य माझा प्राण ॥ तूंचि शिष्य शिरोरत्न ॥ बाळक तूंचि आमुचा ॥ ४८ ॥ कांहीं तरी माग आतां ॥ वर देईन तत्वता ॥ विश्वनाथ आला होता ॥ दुसरेनि आपण आलों ॥ ४९ ॥ आमुचेनि मन संतोषीं ॥ वर माग जो तुझे मानसीं ॥ तुज वश्य झालों निर्धारेसीं ॥ जें पाहिजे तें देईन आतां ॥ २५० ॥ दीपक म्हणे विष्णूसीं ॥ जरी आम्हा वर देसी ॥ गुरुभक्ती अधिक होय मानसीं ॥ ऐसें ज्ञान मज द्यावें ॥ ५१ ॥ गुरूचें रूप आपण ओळखें ॥ ऐसें ज्ञान देईं सुखें ॥ यापरतें मागें नाणिकें ॥ म्हणोनि चरणीं लागला ॥ ५२ ॥ दिधला वर शार्ङ्गपाणी ॥ संतोषोनि बोले वाणी ॥ अरे दीपका शिरोमणी ॥ तूं माझा प्राणसखा होसी ॥ ५३ ॥ तुवां ओळखिलें गुरूसीं ॥ देखिलें दृष्टीं परब्रह्मासी ॥ आणीक जरी आम्हा पुससी ॥ सांगेन ऐक एकचित्तें ॥ ५४ ॥ लौकिक सुबुद्धि होय जैसी ॥ धर्माधर्म सुमनें तैसीं ॥ उत्कृष्टाहूनी उत्कृष्टेसी ॥ स्तुती करी गा अहर्निशीं ॥ ५५ ॥ जे जे समयीं श्रीगुरूसी ॥ तूं भक्तीनें स्तुति करिसी ॥ तेणें होऊं आम्हीं संतोषी ॥ तेची आमची स्तुति जाणें ॥ ५६ ॥ वेद वाचिती सांगेंसी ॥ वेदांतभाष्य अहर्निशीं ॥ वाचिती जन उत्कृष्टेसी ॥ आज्ञा पावे निर्धारीं ॥ ५७ ॥ बोलती वेद सिद्धांत ॥ गुरुचि ब्रह्म असे म्हणत ॥ याचि कारणें गुरु भजतां सत्य ॥ सर्व देवता तुज वश्य ॥ ५८ ॥ गुरु म्हणजे अक्षरें दोन ॥ अमृताचा समुद्र जाण ॥ तयामध्यें बुडतां क्षण ॥ केविं होय परियेसा ॥ ५९ ॥ ज्याचे हृदयीं गुरुस्मरण ॥ तोचि त्रिलोकीं पूज्य जाण ॥ अमृतपान सदा सगुण ॥ तोचि शिष्य अमर होय ॥ २६० ॥ श्लोक ॥ यदा मम शिवस्यापि ब्रह्मणो ब्राह्मणस्य हि ॥ अनु-

ग्रहो भवेन्नृणां सेव्यते सद्गुरुस्तदा ॥ ६१ ॥ टीका ॥ आपण अथवा ईश्वरू ॥ ब्रह्मा जरी
देता वरू ॥ तद्वत् फळदाता गुरू ॥ गुरु त्रयमूर्ति याचि कारणें ॥ ६२ ॥ ऐसा वर दीप-
कासी ॥ दिधला विष्णूनें परियेसी ॥ ब्रह्मा सांगे कलीसी ॥ एकचित्तें परियेसा ॥ ६३ ॥ वर
लाधोनी दीपक ॥ गेला गुरूचे सन्मुख ॥ पुसतसे गुरु ऐक ॥ तया शिष्या दीपकासी॥६४॥
ऐक शिष्या कुळदीपका ॥ काय दीधलें वैकुंठनायका ॥ विस्तारोनि सांगें निका ॥ माझें
मन स्थिर होय॥६५॥दीपक ह्मणे गुरूसी ॥ वर दिधला हृषीकेशी ॥ म्यां मागितलें तयासी॥
गुरुभक्ति व्हावी ह्मणोनियां ॥ ६६ ॥ गुरूची सेवा तत्परेंसी ॥ अंतःकरण दृढेंसी ॥ वर दि-
धला संतोषीं ॥ दृढभक्ती माझी तुमचे चरणीं ॥ ६७ ॥ संतोषोनी श्रीगुरू ॥ प्रसन्न झाला
साक्षात्कारू ॥ जीवित्वें होय तूं स्थिरू ॥ काशीपुरीं वास करी ॥ ६८ ॥ तुझे वाक्यें
सर्वसिद्धी ॥ तुझे घरीं नवनिधी ॥ विश्वनाथ तुझे स्वाधीं ॥ ह्मणे गुरू संतोषोनी ॥ ६९ ॥
तुझें स्मरण जे करिती ॥ त्यांचे कष्ट निवारण होती ॥ श्रियायुक्त नांदती ॥ तुझे स्मरण-
मात्रेंसीं ॥ २७० ॥ येणें परी शिष्यासी ॥ प्रसन्न झाला परियेसी ॥ दिव्य देह झाला तत्क्ष-
णेंसी ॥ झाला गुरू वेदधर्म ॥ ७१ ॥ शिष्याचा भाव पहावयास ॥ कुष्टी झाला महाक्लेश ॥
तो तापसी अतिविशेष ॥ त्यासी कैचें पाप राहे ॥ ७२ ॥ लोकानुग्रह करावयासी ॥ गेला
होता पुरीं काशी ॥ काशिक्षेत्र महिमा ऐसी ॥ पाप जाय सहस्र जन्मींचें ॥ ७३ ॥ तया
काशी नगरांत ॥ धर्म अथवा अधर्मरत ॥ वास करिती क्वचित ॥ त्यांसीं पुनर्जन्म नाहीं
॥ ७४ ॥ सूत ह्मणें ऋषेश्वरांसी ॥ येणें प्रकारें कलीसी ॥ सांगे ब्रह्मा परियेसी ॥ शिष्य
दीपक आख्यान ॥ ७५ ॥ सिद्ध ह्मणे नामकरणी ॥ दृढ मन असावें याचि गुणीं ॥ तरीच

तरेल भवार्णी ॥ गुरुभक्ति असे येणें विधी ॥ ७६ ॥ श्लोक ॥ यत्र यत्र दृढा भक्तिर्यदा यस्य महात्मनः ॥ तत्र तत्र महादेवः प्रकाशमुपगच्छति ॥ ७७ ॥ टीका ॥ जरी भक्ती असे दृढेंसी ॥ त्रिकरण सहमानसीं ॥ तोचि लाधे ईश्वरासी ॥ ईश्वर होय तया वश ॥७८॥ गंगाधराचा नंदन ॥ श्रोतयांसीं करी नमन ॥ न ह्मणावें न्यूनपूर्ण ॥ माझे बोबडे बोलासी ॥ ७९ ॥ इतिश्रीगुरुचरित्रपरमकथाकल्पतरौ श्रीनृसिंहसरस्वत्युपाख्याने सिद्धनामधारकसंवादे शिष्यदीपकाख्यानं नाम द्वितीयोऽध्यायः ॥ २ ॥ श्रीदत्तात्रेयार्पणमस्तु ॥ ओंव्यांची संख्या २७९ ॥



॥ श्रीगणेशाय नमः ॥ येणेंपरी सिद्धमुनी ॥ सांगता झाला विस्तारोनी ॥ संतोषोनि नामकरणी ॥ विनवीतसे मागुती ॥ १ ॥ जयजयाजी सिद्धमुनी ॥ तारक तूं आह्मालागुनी ॥ संदेह होता माझे मनीं ॥ आजि तुवां फेडिला ॥ २ ॥ तुझेनी सर्वस्व लाधलों ॥ आनंदजळीं बुडालों ॥ परमतत्व जोडलों ॥ आजिचेनी दातारा ॥ ३ ॥ ऐसें श्रीगुरुमहिमान ॥ मज निरोपिलें तुवां ज्ञान ॥ आनंदमय माझें मन ॥ तुझेनि धर्में स्वामिया ॥ ४ ॥ कवणे ठायीं तुमचा वास ॥ नित्य तुह्मा कोठें ग्रास ॥ होईन आतां तुझा दास ॥ ह्मणोनि चरणीं लागला ॥ ५ ॥ कृपानिधी सिद्धमुनी ॥ तया शिष्या आलिंगोनि ॥ आशीर्वचन देऊनी ॥ सांगे आपुला वृत्तांत ॥ ६ ॥ जे जे स्थानीं होते गुरु ॥ तेथें असतो चमत्कारू ॥ पुसशी जरी आह्मा आहारू ॥ गुरुस्मरण नित्य जाण ॥ ७ ॥ श्रीगुरुचरित्रमहिमान ॥ तेंचि आह्मा अमृतपान ॥ सदा सेवितों याचि गुणें ॥ ह्मणोनि पुस्तक दाविलें ॥ ८ ॥ भुक्ति मुक्ति परमार्थ ॥ जें जें वांछिजे मनांत ॥ तें तें साध्य होय त्वरित ॥ गुरुचरित्र ऐकतां ॥ ९ ॥ धनार्थीयांसी अक्षय धन ॥ पुत्रपौत्रादि गोधन ॥ कथा ऐकतां होय जाण ॥ ज्ञानसिद्धी तात्काळ ॥ १० ॥ जे भक्तीनें सप्तक एक ॥ पढती ऐकति भक्त लोक ॥ काम्य होय तात्काळिक ॥ निपुत्रिकां पुत्र होती ॥ ११ ॥ ग्रहरोगादि पीडन ॥ न होती व्याधी कधीं जाण ॥ जरी मनुष्या असे बंधन ॥ त्वरित सुटे ऐकतां ॥ १२ ॥ ज्ञानवंत शतायुषी ॥ ऐकतां होय भरवसी ॥ ब्रह्महत्त्या पापें नाशी ॥ एकचित्तें ऐकतां ॥ १३ ॥ इतुकें ऐकोनि त्या अवसरीं ॥ नामधारक नमस्कारी ॥ स्वामी मातें तारी तारी ॥ कृपानिधी सिद्धमुनी ॥ १४ ॥ साक्षात्कारें गुरुमूर्ती ॥ भेटलासि तूं जगज्ज्योती ॥ होती वासना माझे चित्तीं ॥

गुरुचरित्र ऐकावें ॥ १५ ॥ एखादा तृषेनें पीडित ॥ जात असतां मार्गस्थ ॥ त्या आणूनि देती अमृत ॥ तयापरी तूं मज भेटलासी ॥ १६ ॥ गुरूचा महिमा ऐकों कानीं ॥ सांगिजे स्वामी विस्तारोनी ॥ अंधःकार असतां रजनी ॥ सूर्योदयापरी करी ॥ १७ ॥ इतुकिया अवसरीं ॥ सिद्धयोगी अभयकारी ॥ धरोनिया सव्यकरीं ॥ घेवोन गेला स्वस्थाना ॥ १८ ॥ असे ठाव ज्ञानपंथीं ॥ कल्पवृक्ष अश्वत्थीं ॥ बैसोनि सांगे ज्ञानज्योति ॥ ऐक शिष्या नामधारका ॥१९॥ नेणसी सोय गुरुदास्यका ॥ याचि कारणें उपबाधका ॥ होती तुज अनेका ॥ चिंता क्लेश घडती तुज ॥ २० ॥ ओळखावया गुरुमूर्तीसी ॥ आपुला आचार परियेसी ॥ दृढभक्ती धरोनि मानसीं ॥ ओळखिजे मग श्रीगुरु ॥ २१ ॥ ऐकोनि सिद्धाचें वचन ॥ संतोषे नामधारक सगुण ॥ क्षणक्षणा करी नमन ॥ करुणावचनें करोनियां ॥ २२ ॥ तापत्रयाग्नींत पोळलों ॥ मी संसारसागरीं बुडालों ॥ क्रोधादि जळचरीं भक्षिलें ॥ अज्ञानजाळें वेष्टुनियां ॥ २३ ॥ ज्ञाननौकीं बसवूनी ॥ कृपेचा वायू पालाणूनी ॥ देह तारक करूनी ॥ तारावें मातें स्वामिया ॥ २४ ॥ ऐशिया करुणावचनीं ॥ विनवीतसे नामकरणी ॥ मस्तक सिद्धाचिया चरणीं ॥ ठेविता झाला पुनः पुनः ॥ २५ ॥ तंव बोलिला सिद्धमुनी ॥ न धरी चिंता अंतःकरणीं ॥ उठवितसे आश्वासोनी ॥ सांकडें फेडीन तुझें आतां ॥ २६ ॥ ज्यांसि नाहीं दृढभक्ती ॥ सदां दैन्यें कष्टती ॥ श्रीगुरुवरी बोल ठेविती ॥ अविद्यामाया वेष्टुनी ॥ २७ ॥ संशय धरोनीं मानसीं ॥ श्रीगुरू काय देईल ह्मणसी ॥ तेणें गुणें हा भोग भोगिसी ॥ नाना कष्टें व्याकुळित ॥ २८ ॥ सांडोनि संशय निर्धार ॥ गुरुमूर्ती देईल अपार ॥ ऐसा देव कृपासागर ॥ तुज उपेक्षी सर्वथा ॥२९॥ गुरुमूर्ती कृपासि-

धू ॥ प्रख्यात असे वेदांतबोधू ॥ तुझे अंतःकरणीं वेधू ॥ असे तया चरणावरी ॥ ३० ॥ तो दातार अखिल महीं ॥ जैसा मेघाचा गुण पाही ॥ पर्जन्य पडती सर्वां ठायीं ॥ कृपासिंधू ऐसा असे ॥ ३१ ॥ त्यांतचि पाहे पात्रानुसार ॥ सांगेन साक्षी एक थोर ॥ सखोल भूमी उदक स्थिर ॥ उन्नतीं उदक नाहीं जाणा ॥ ३२ ॥ दृढभक्ती जाणा सखोल भूमी ॥ दांभिक ओळखा उन्नत तुह्मी ॥ याचि कारणें मनोकर्मीं ॥ निश्चयावें श्रीगुरूसीं ॥ ३३ ॥ ह्मणोनि श्रीगुरु उपमा ॥ ऐसा कवणा असे महिमा ॥ प्रपंच होय परब्रह्मा ॥ हस्त मस्तकीं ठेवोनियां ॥ ३४ ॥ कल्पतरूसी द्यावी उपमा ॥ कल्पिलें लाभे त्याचा महिमा ॥ न कल्पितां पुरवी कामा ॥ कामधेनू श्रीगुरू ॥ ३५ ॥ ऐसा श्रीगुरु परब्रह्ममूर्ती ॥ ख्याती असे श्रुतिस्मृतीं ॥ संदेह सांडूनी एकचित्तीं ॥ ध्याय पदांबुज श्रीगुरुचें ॥ ३६ ॥ इतकें परिसोनी नामधारक ॥ नमन करूनी क्षणैक ॥ करसंपुट जोडुनि ऐक ॥ विनवीतसे सिद्धासी ॥ ३७ ॥ श्रीगुरुसिद्ध योगेश्वरा ॥ कामधेनू कृपासागरा ॥ विनवीतसे अवधारा ॥ सेवक तुमचा स्वामिया ॥ ३८ ॥ स्वामींनीं निरोपिलें सकळ ॥ झालें माझें मन निर्मळ ॥ वेध लागला असे केवळ ॥ चरित्र श्रीगुरूचें ऐकावया ॥ ३९ ॥ गुरु त्रयमूर्ती ऐकों कानीं ॥ कां अवतरले मनुष्ययोनीं ॥ सर्व सांगावें विस्तारोनी ॥ ह्मणोनि चरणीं लागला ॥ ४० ॥ मग काय बोले योगींद्र ॥ बारे शिष्या तूं पूर्ण चंद्र ॥ माझा बोधसमुद्र ॥ कैसा तुवां उत्साहविला ॥ ४१ ॥ तूतें महासुख लाधलें ॥ गुरुदासत्व फळलें ॥ परब्रह्म अनुभवलें ॥ आजिचेनी तुज आतां ॥ ४२ ॥ हिंडत आलों सकळ क्षिती ॥ कवणा नव्हे ऐशी मती ॥ गुरुचरित्र न पुसती ॥ तूतें देखिलें आजि आह्मीं ॥ ४३ ॥ ज्यासी इहपरत्रींची चाड ॥ त्यासी ही कथा

असे गोड ॥ त्रिकरणें करोनियां दृढ ॥ एकचित्तें ऐकिजे ॥ ४४ ॥ तूं भक्त केवळ श्रीगुरु-
चा ॥ ह्मणोनि भक्ती झाली उंचा ॥ निश्चयो मानीं माझिया वाचा ॥ लाधसी चारी पुरु-
षार्थ ॥ ४५ ॥ धनधान्यादि संपत्ती ॥ पुत्रपौत्र श्रुतिस्मृति ॥ इहसौख्य आयुष्यगती ॥
अंतीं गती असे जाणा ॥ ४६ ॥ गुरुचरित्र कामधेनू ॥ वेदशास्त्र संमत जाणू ॥ अवतर-
ला त्रयमूर्ती आपणू ॥ धरोनि नरवेष कलियुगीं ॥ ४७ ॥ कार्याकारण अवतार ॥ होऊ-
नि येती हरिहर ॥ उतरावया भूमिभार ॥ भक्तजनांतें तारावया ॥ ४८ ॥ ऐकोनि सिद्धाचे
वचना ॥ प्रश्न करी शिष्य राणा ॥ त्रयमूर्ती अवतार किं कारणा ॥ देह धरोनि मानुषी
॥ ४९ ॥ विस्तारोनी तें आह्मासी ॥ सांगा स्वामी कृपेंसी ॥ ह्मणोनी लागला चरणासी ॥
करुणावचनें करोनियां ॥५०॥ सिद्ध ह्मणे नामधारका ॥ त्रयमूर्तीचे तीन गुण ऐका ॥ आ-
दिवस्तू आपण एका ॥ प्रपंचवस्तू तीन जाणा ॥५१॥ ब्रह्मयाचा रजोगुण ॥ सत्वगुण विष्णु
जाण ॥ तमोगुण उमारमण ॥ मूर्ती एकचि अवधारा ॥५२॥ ब्रह्मा सृष्टीरचनेसी ॥ पोषक विष्णु
परियेसी ॥ रुद्रमूर्ती प्रळयासी ॥ त्रयमूर्तीचे तीन गुण ॥ ५३ ॥ एका वेगळे एक न होती ॥
कार्याकारण अवतार होती ॥ भूमीचा भार फेडिती ॥ प्रख्यात असे पुराणीं ॥ ५४ ॥
सांगेन साक्ष आतां तुज ॥ अंबरीष ह्मणिजे द्विज ॥ एकादशी व्रताचिये काज ॥ विष्णुसी
अवतार करविले ॥ ५५ ॥ अवतार व्हावया कारण ॥ सांगेन तुजला विस्तारून ॥ मन
करोनि सावधान ॥ एकचित्तें परियेसीं ॥ ५६ ॥ द्विज करी एकादशीव्रत ॥ पूजा करी अ-
भ्यागत ॥ निश्चयो करी दृढचित्त ॥ हरिचिंतन सार्वकाळ ॥ ५७ ॥ असो त्याचिया व्रता-
सी ॥ भंग करावया आला ऋषी ॥ अतिथी होऊनी हटेंसी ॥ पावला मुनी दुर्वास ॥ ५८ ॥

ते दिवशीं साधनद्वादशी घडी एक ॥ आला अतिथी कारणिक ॥ अंबरीषास पडला धाक ॥ कोवें घडे ह्मणोनियां ॥ ५९ ॥ ऋषी आले देखोनी ॥ अंबरीषानें अभिवंदोनी ॥ अर्घ्य पाद्य देवोनी ॥ पूजा केली उपचारें ॥६०॥ विनवीतसे ऋषेश्वरासीं ॥ शीघ्र जावें स्नानासी ॥ साधन आहे घटिका द्वादशी ॥ यावें अनुष्ठान सारोनियां ॥६१॥ ऋषी जाऊनी नदीसी ॥ अनुष्ठान करिती विधिसीं ॥ विलंब लागतां तयासी ॥ आली साधन घटिका ॥६२॥ व्रतभंग होईल ह्मणोनी ॥ पारणें केलें तीर्थ घेऊनी ॥ नानाप्रकार पक्वान्नीं ॥ पाक केला ऋषीतें ॥ ६३ ॥ तंव आले दुर्वास देखा ॥ पाहुनी अंबरीषाच्या मुखा ॥ ह्मणे भोजन केलेंसि कां॥ अतिथींविण दुरात्मया ॥६४॥ शाप देतां ऋषेश्वर ॥ द्विजें स्मरला शार्ङ्गधर ॥ करावया भक्ताचा कैवार ॥ टाकून आला वैकुंठा ॥६५॥ भक्तवत्सल नारायण ॥ शरणागताचें रक्षण ॥ बिरुद बोलती पुराणें जाण ॥ धांवे धेनु वत्सासि जैशी ॥ ६६॥ शापिलें ऋषीनें द्विजासी ॥ जन्मावें गा अखिल योनीसी ॥ तंव पातला हृषीकेशी ॥ येउनि जवळी उभा ठेला ॥ ६७ ॥ मिथ्या नव्हे ऋषीचें वचन ॥ द्विजें धरिले श्रीविष्णूचे चरण ॥ भक्तवत्सल ब्रिद जाण ॥ तया महाविष्णूचें ॥६८॥ विष्णू ह्मणे दुर्वासासी ॥ वृथा शापिलें अंबरीषासीं ॥ राखीन आपुल्या दासासीं ॥ शाप आह्मासी तुह्मी द्यावा ॥६९॥ दुर्वास ज्ञानी ऋषेश्वर ॥ केवळ ईश्वर अवतार ॥ फेडावया भूमिभार ॥ कारण असे पुढें ह्मणतसे ॥७०॥ जाणोनि ज्ञानीशिरोमणी ॥ ह्मणे तप करितां युगें क्षोणी ॥ भेटी नव्हे हरिचरणीं ॥ भूमीवरी दुर्लभ॥७१॥ शापसंबंधें अवतरोनी ॥ येईल लक्ष्मी घेऊनी ॥ तारावयालागोनी ॥ भक्तजनां समस्तां ॥७२॥ परोपकार संबंधेसी ॥ शाप द्यावा विष्णूसी ॥ भूमिभार फेडावयासी ॥ कारण

असे ह्मणोनियां ॥ ७३ ॥ ऐसें विचारोनि मानसीं ॥ दुर्वास ह्मणे विष्णूसी ॥ अवतरोनि भूमिसी ॥ नाना स्थानीं जन्मावें ॥७४॥ प्रसिद्ध होसी वेळ दहा ॥ उप अवतार पूर्ण पहा ॥ सहज तूं विश्वात्मा महा ॥ स्थूळ सूक्ष्मीं वससी तूं ॥ ७५ ॥ ऐसा कार्याकारण शाप ॥ अंगिकारी जगाचा बाप ॥ दुष्टांवरी असे कोप ॥ सुष्ट प्रतिपाळावया ॥ ७६ ॥ ऐसे दहा अवतार झाले ॥ असे तुवां कर्णीं ऐकिलें ॥ महाभागवतीं विस्तारिलें ॥ अनंतरूपी नारायण ॥ ७७ ॥ कार्याकारण अवतार होती ॥ क्वचित्प्रगट क्वचित् गुप्ती ॥ ते ब्रह्मज्ञानी जाणती ॥ मूढमती काय जाणे ॥ ७८ ॥ आणीक सांगेन तुज ॥ विनोद झालासे सहज ॥ अनुसूया अत्रिऋषीची भाज ॥ पतिव्रता शिरोमणी ॥ ७९ ॥ तिचे गृहीं जन्म जाहलें ॥ त्रयमूर्ती अवतरले ॥ कपटवेष धरोनि आले ॥ पुत्र जाहले तियेचे ॥ ८० ॥ नामधारक पुसे सिद्धासी ॥ विनोदकथा निरोपिलीसी ॥ देव अतिथी कपटवेषीं ॥ पुत्र जहाले कवणेपरी ॥ ८१ ॥ अत्रिऋषी पूर्वी कवण ॥ कवणापासूनि उत्पन्न ॥ मूळ पुरुष होता कवण ॥ विस्तारोनी मज सांगावें ॥ ८२ ॥ ह्मणे सरस्वती गंगाधर ॥ पुढील कथेचा विस्तार ॥ ऐकतां होय मनोहर ॥ सकळाभीष्टें साधती ॥ ८३ ॥ इतिश्रीगुरुचरित्रपरमकथाकल्पतरौ श्रीनृसिंहसरस्वत्युपाख्याने सिद्धनामधारकसंवादे अंबरीषवृत्तनिरूपणं नाम तृतीयोऽध्यायः ॥ ३ ॥ ओव्यासंख्या ८३ ॥

॥ श्रीगणेशाय नमः ॥ ऐशी शिष्याची विनंती ॥ ऐकोन सिद्ध काय बोलती ॥ साधु साधु तुझी भक्ती ॥ प्रीति पावो गुरुचरणीं ॥ १ ॥ ऐक शिष्या चूडामणी ॥ धन्य धन्य तुझी वाणी ॥ आठवतसे तुझ्या प्रश्नीं ॥ आदिमध्यावसानक ॥ २ ॥ प्रश्न केला बरवा निका ॥ सांगेन आतां तुज विवेका ॥ अत्रिऋषीची पूर्विका ॥ सृष्टिउत्पत्तीपासुनी सकळ ॥ ३ ॥ पूर्वीं सृष्टि नव्हती कांहीं ॥ जळमय होतें सर्वही ॥ आपोनारायण ह्मणोनि पाही ॥ वेद बोलती याचिकारणें ॥ ४ ॥ उदक आपण नारायण ॥ सर्वांठायीं वास पूर्ण ॥ बुद्धि संभवे प्रपंचगुण ॥ हिरण्यवर्णांड निर्मिलें ॥ ५ ॥ तेंचि ब्रह्मांड नाम जाहलें ॥ रजोगुण ब्रह्मयासि निर्मिलें ॥ हिरण्यगर्भ नाम पावले ॥ देवता वर्ष एक होतें ॥ ६ ॥ तेंचि ब्रह्मांड देखा ॥ फुटोनि शकलें झालीं ऐका ॥ एक आकाश एक भूमिका ॥ होऊन ठेलीं शकलें दोनी ॥ ७ ॥ ब्रह्मा तेथें उपजोन ॥ रचिले चवदाहि भुवन ॥ दाही दिशा मानस वचन ॥ काळ काम क्रोधादि सकळ ॥ ८ ॥ पुढें सृष्टि रचावयासी ॥ सप्त पुत्र उपजवी मानसीं ॥ नामें सांगेन परियेसीं ॥ सातजण ब्रह्मपुत्र ॥ ९ ॥ मरीचि अत्रि आंगिरस ॥ पुलस्त्य पुलह क्रतु वसिष्ठ ॥ सप्त पुत्र जाहले श्रेष्ठ ॥ सृष्टिकर्ता ब्रह्मा जाण ॥ १० ॥ सप्त ब्रह्मपुत्रांमधील अत्री ॥ तेथूनि पीठ गुरुसंतती ॥ सांगेन ऐका एकचित्तीं ॥ भाग्यवंता नामधारका ॥ ११ ॥ ऋषि अत्रीची भार्या ॥ नाम तिचें अनुसूया ॥ पतिव्रता शिरोमणीया ॥ जगदंबा तेचि जाण ॥ १२ ॥ तिचें सौंदर्यलक्षण ॥ वर्णूं शके ऐसा कवण ॥ जिचा पुत्र चंद्र आपण ॥ तिचें रूप काय सांगों ॥ १३ ॥ पतिसेवा करी बहुत ॥ समस्त सुरवर भयाभीत ॥ स्वर्गैश्वर्य घेईल त्वरित ॥ ह्मणोनि चिंतिती मानसीं ॥ १४ ॥ इंद्रादि सुरवर मिळूनी ॥

त्रयमूर्तीपासीं जाऊनी ॥ विनविताती प्रकाशोनी ॥ आचार अत्रिऋषीचा ॥ १५ ॥ इंद्र ह्मणे स्वामिया ॥ पतिव्रता स्त्री अनुसूया ॥ आचार तिचा सांगों काया ॥ तुह्माप्रती वि-स्तारोनी ॥१६॥ पतिसेवा करी भक्तीसीं ॥ मनोवाक्कायमानसीं ॥ अतिथिपूजा महाहर्षी ॥ विमुख नव्हे कवणे काळीं ॥ १७ ॥ तिचा आचार देखोनी ॥ सूर्य भीतसे गगनीं ॥ उष्ण तिजला होईल ह्मणोनी ॥ मंद मंद तपतसे ॥ १८ ॥ अग्नि झाला भयाभीत ॥ शीतळ असे वर्तत ॥ वायु झाला भयचकित ॥ मंद मंद वर्ततसे ॥ १९ ॥ भूमी आपण भिऊनि देखा ॥ नम्र जाहली पादुका ॥ शाप देईल ह्मणोनि ऐका ॥ समस्त आह्मी भीतसों ॥ २० ॥ नेणों घेईल कवण स्थान ॥ कवण्या देवाचें हिरोन ॥ एखाद्यातें वर देतां जाण ॥ तोहि आमुतें मारूं शके ॥ २१ ॥ यासि करावा उपाय ॥ तूं जगदात्मा देवराय ॥ जाईल आमुचा स्व-र्गठाय ॥ ह्मणोनि आलों तुह्मां सांगों ॥ २२॥ न कराल जरी उपायासी ॥ सेवा करूं आ-ह्मी तिसी ॥ तिचे द्वारीं अहर्निशीं ॥ राहूं चित्त धरोनिया ॥ २३ ॥ ऐसें ऐकोनि त्रयमूर्ती ॥ महाक्रोधें कांपती ॥ चला पाहूं कैसी सती ॥ ह्मणती आहे पतिव्रता ॥ २४ ॥ व्रतभंग क-रूनि तिसी ॥ ठेऊनि येऊं भूमीसी ॥ अथवा वैवस्वतालयासी ॥ पाठवूं ह्मणोनि निघाले ॥२५॥ वास पहावया सतीचें ॥ वेष धरिती भिक्षुकाचे ॥ आश्रमा आले अत्रीचे ॥ अभ्यागत होऊनिया ॥ २६ ॥ ऋषि करूं गेला अनुष्ठान ॥ मागें आले त्रयमूर्ती आपण ॥ अनु सूयेसी आश्वासून ॥ अतिथि आपण आलों ह्मणती ॥ २७ ॥ क्षुधें बहू पीडोन ॥ आह्मी आलों ब्राह्मण ॥ त्वरित द्यावें सती अन्न ॥ अथवा जाऊं आणिका ठायां ॥ २८ ॥ सदां तुमचे आश्रमांत ॥ संतर्पण अभ्यागत ॥ ऐकों आली कीर्ती विख्यात ॥ ह्मणोनि आलों

अनुसूये ॥ २९ ॥ इच्छाभोजन दान तुह्मीं ॥ देतां ह्मणोनि ऐकिलें आह्मीं ॥ टाकोनि
आलों याचि कामीं ॥ इच्छाभोजन मागावया ॥ ३० ॥ इतुकें ऐकोनि अनुसूया ॥ नमन
केलें तत्क्षणीया ॥ बैसकार करूनियां ॥ क्षालन केले चरण त्यांचे ॥ ३१ ॥ अर्घ्य पाद्य
देऊनि त्यांसी ॥ गंधाक्षता पुष्पेंसी ॥ सवेंच ह्मणतसे हर्षीं ॥ आरोगण सारिजे ॥ ३२ ॥
अतिथि ह्मणती तयेवेळीं ॥ करोनि आलों वो आंघोळी ॥ ऋषी येती बहुता वेळीं ॥ त्व-
रित आह्मां भोजन द्यावें ॥ ३३ ॥ वासना पाहूनि अतिथींतें ॥ काय केलें पतिव्रतें ॥ ठाय
घातले त्वरितें ॥ बैसकार केला देखा ॥ ३४ ॥ बैसवूनियां पाटावरी ॥ घृतेंसी पात्र अभि-
धारी ॥ घेऊनि आली आपण क्षिरी ॥ शाकपाक तये वेळीं ॥ ३५ ॥ तिसी ह्मणती अहो
नारी ॥ आह्मी अतिथि आलों दुरी ॥ देखोनि तुझें स्वरूप सुंदरी ॥ अभीष्ट मानसीं आ-
णीक वसे ॥ ३६ ॥ नग्न होवोनि आह्मांसीं ॥ अन्न वाढावें परियेसी ॥ अथवा काय निरोप
देशी ॥ आह्मी जाऊं नाहीं तरी ॥ ३७ ॥ ऐकोनि द्विजांचें वचन ॥ अनुसूया करी चिंत-
न ॥ आले विप्र पहावया मन ॥ कारणीक पुरुष होतील ॥ ३८ ॥ पतिव्रता शिरोमणी ॥
विचार करी अंतःकरणीं ॥ अतिथि विमुख तरी हानी ॥ निरोप केंवी उल्लंघूं ॥ ३९ ॥
माझें मन असे निर्मळ ॥ काय करील मन्मथ खळ ॥ पतीचें असे तपफळ ॥ तारील मज
ह्मणतसे ॥ ४० ॥ ऐसें विचारोनि मानसीं ॥ तथास्तु ह्मणे तयांसीं ॥ भोजन करावें
स्वस्थ चित्तेंसी ॥ नग्न वाढीन ह्मणतसे ॥ ४१ ॥ पाकस्थाना जाउनी आपण ॥ चिंतन
करी पतीचे चरण ॥ वस्त्र फेडोनि झाली नग्न ॥ ह्मणे अतिथि बाळ माझे ॥ ४२ ॥ नग्न
होउनी सती देखा ॥ घेऊनि आली अन्नोदका ॥ तंव ते झाले बाळका ॥ ठायापुढें लो-

ळती ॥ ४३ ॥ बाळें देखोनि अनुसूया ॥ भयचकित होवोनियां ॥ पुनरपी वस्त्र नेसो-
नियां ॥ आली तया बाळकांजवळी ॥ ४४ ॥ रुदन करिती तिन्ही बाळ ॥ अनुसूया र-
हावी वेळोवेळ ॥ क्षुधार्त झाली केवळ ॥ ह्मणोनि कडिये घेतसे ॥ ४५ ॥ कडिये घेवोनि
बाळकांसी ॥ स्तनपान करवी अति हर्षी ॥ एका सांडोनि एकाशीं ॥ क्षुधा निवारण क-
रितसे ॥ ४६ ॥ पाहेपां नवल काय घडलें ॥ त्रयमूर्तीचें बाळ झालें ॥ स्तनपानमात्रें तोष-
लें ॥ तपफळ ऐसें पतिव्रतेचें ॥ ४७ ॥ ज्याचे उदरीं चौदा भुवन ॥ सप्त समुद्र वडवाग्नि
जाण ॥ त्याची क्षुधानिवारण ॥ पतिव्रतास्तनपानीं ॥ ४८ ॥ चतुर्मुख ब्रह्मयासी ॥ सृष्टी
करणें अहर्निशीं ॥ त्याची क्षुधा स्तनपानेंसी ॥ कैंवि झाली निवारण ॥ ४९ ॥ भाळाक्ष
कर्पूरगौर ॥ पंचवक्त्र काळाग्नि रुद्र ॥ स्तनपान करवी अनुसूया सुंदर ॥ तपसामर्थ्यें
अत्रि ऐसा ॥ ५० ॥ अनुसूया अत्रिरमणी ॥ नव्हती मागें ऐशी कोणी ॥ त्रयमूर्तीची झा-
ली जननी ॥ ख्याती प्रगटली त्रिभुवनांत ॥ ५१ ॥ कडिये घेऊनि बाळकांसी ॥ खेळवी-
तसे तिघांसी ॥ घालोनियां पाळण्यासी ॥ पर्यंद गाय तये वेळीं ॥ ५२ ॥ पर्याय गाय
नानापरी ॥ उपनिषदार्थ अतिकुसरी ॥ अतिउल्हासें सप्तस्वरीं ॥ संबोखितसे त्रिमूर्तीसी
॥ ५३ ॥ इतुकें होतां तये वेळीं ॥ माध्यान्हवेळ अतिथिकाळीं ॥ अत्रिऋषि अतिनिर्मळी ॥
आला आपुले आश्रमा ॥ ५४ ॥ घरामाजीं अवलोकितां ॥ तंव देखिली अनुसूया
गातां ॥ कैशीं बाळें ऐसें ह्मणतां ॥ पुसतसे स्त्रियेसी ॥ ५५ ॥ तिनें सांगितला वृत्तांत ॥
ऋषि ज्ञानीं असे पहात ॥ त्रयमूर्ति हेचि ह्मणत ॥ नमस्कार करीतसे ॥ ५६ ॥ नमस्कारि-
तां अत्रि देखा ॥ संतोष विष्णु वृषनायका ॥ आनंद झाला चतुर्मुखा ॥ प्रसन्न झाले

[illegible] ॥ [illegible] ता ॥ निजमूर्ति ठाकले सन्मुखेसी ॥ साधु साधु अत्रिऋषी ॥ [illegible] पतिव्रता ॥ ५८ ॥ तुष्टलों तुझे भक्तीसी ॥ माग मनीं वर जो इच्छिसी ॥ अत्रि ह्मणे सतीसी ॥ जें वांछिसी माग आतां ॥ ५९ ॥ अनुसूया ह्मणे ऋषी-सी ॥ प्राणेश्वर तूंचि होसी ॥ देव पातले तुझे भक्तीसी ॥ पुत्र मागा तुह्मी आतां ॥ ६० ॥ तिघे बाळक माझे घरीं ॥ रहावे माझे पुत्रापरी ॥ हेंचि मागतों निर्धारीं ॥ त्रयमूर्ति आपण एकरूप ॥ ६१ ॥ ऐसें वचन ऐकोनी ॥ वर दिधला मूर्ती तिन्हीं ॥ राहती बाळकें ह्मणोनी ॥ आपण गेले निजालयासी ॥ ६२ ॥ त्रिमूर्ति राहिले त्याचे घरीं ॥ अनुसूया पोशी बाळकापरी ॥ नामें ठेविलीं प्रीतीकरीं ॥ त्रिवर्गाचीं परियेसा ॥ ६३ ॥ ब्रह्ममूर्ती चंद्र झाला ॥ विष्णुमूर्ती दत्त केवळा ॥ ईश्वर तो दुर्वास नाम पावला ॥ तिघे पुत्र अनुसूयेचे ॥ ६४ ॥ दुर्वास आणि चंद्र देखा ॥ उभे राहुनि माते सन्मुखा ॥ निरोप मागती कौतुका ॥ जाऊं तपा निजस्थाना ॥६५॥ दुर्वास ह्मणे अहो जननी ॥ आह्मी ऋषी अनुष्ठानी ॥ जाऊं तीर्थें आचरोनी ॥ ह्मणोनी निरोप घेतला ॥ ६६ ॥ चंद्र ह्मणे अहो माते ॥ निरोप द्यावा आह्मा त्वरितें ॥ चंद्रमंडळीं वास मातें ॥ नित्य दर्शन तुमचे चरणीं ॥ ६७ ॥ तिसरा दत्त विष्णुमूर्ती ॥ असेल तुमचे धरोनी चित्तीं ॥ त्रयमूर्ती तोचि हें निश्चितीं ॥ ह्मणोनि सांगती तयांसी ॥ ६८ ॥ त्रयमूर्ती जाणा तोचि दत्त ॥ सर्व विष्णुमयं जगत् ॥ राहील तुमचे धरोनि चित्त ॥ विष्णुमूर्ती दत्तात्रेय ॥ ६९ ॥ त्रयमूर्ती ऐक्य होऊन ॥ दत्तात्रेय राहिला आपण ॥ दुर्वास चंद्र निरोप घेऊन ॥ गेले स्वस्थळा अनुष्ठानासी ॥ ७० ॥ अनुसूयेचे घरीं देखा ॥ त्रयमूर्ती राहिली मूर्ती एका ॥ नाम दत्तात्रय ऐका ॥ मूळपीठ श्रीगु-

रूचें ॥ ७१ ॥ ऐशापरी सिद्ध देखा ॥ कथा सांगे नामधारका ॥ संतोषें प्रश्न करी अनेका ॥ पुसतसे सिद्धासी ॥ ७२ ॥ जयजय सिद्ध योगीश्वरा ॥ भक्तजनमनोहरा ॥ तारक संसार सागरा ॥ ज्ञानमूर्ती कृपासिंधू ॥ ७३ ॥ तुझेनि प्रसादें मज ॥ ज्ञान उपजलें सहज ॥ तारक आमुचा योगीराज ॥ विनंति माझी परियेसा ॥ ७४ ॥ दत्तात्रेयाचा अवतारू ॥ सांगितला पूर्वापारू ॥ पुढें अवतार जाहले गुरू ॥ कवणेपरी निरोपिजे ॥ ७५ ॥ विस्तारूनि आह्मासी ॥ सांगा स्वामी कृपेसीं ॥ अवतार त्रिमूर्तीसी ॥ अनुक्रमें निरोपावें ॥ ७६ ॥ ह्मणे सरस्वती गंगाधरू ॥ पुढील कथेचा विस्तारू ॥ ऐकतां होय मनोहरू ॥ सकलाभीष्टें साधती ॥ ७७॥ इति श्रीगुरुचरित्रपरमकथाकल्पतरौ श्रीनृसिंहसरस्वत्युपाख्याने सिद्धनामधारकसंवादे अनुसूयोपाख्यानं नाम चतुर्थोऽध्यायः ॥ ४ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ओंव्यासंख्या ७७ ॥

॥ श्रीगणेशाय नमः ॥ नामधारक भक्तासी ॥ सांगे सिद्ध विस्तारेंसी ॥ अवतार झाला मा
नुषी ॥ भक्तजन तारावया ॥ १ ॥ ऐक भक्ता नामधारका ॥ अंबरीषाकारणें विष्णु देखा ॥
अंगिकारिले अवतार ऐका ॥ मानुषी नाना रूप घेतसे ॥ २ ॥ मत्स्य कूर्म वराह देख ॥
नराचा देह सिंहाचें मुख ॥ वामनरूप झाला भिक्षुक ॥ झाला ब्राह्मण क्षात्रकर्मी ॥ ३ ॥
दशरथाचे कुळीं जन्म ॥ प्रख्यात अवतार श्रीराम ॥ राजा होउनी मागुती जन्म ॥ गौळि-
याघरीं गुरें राखी ॥ ४ ॥ वस्त्रें फेडुनि झाला नग्न ॥ बौद्धरूपी जाहला आपण ॥ होऊनि
कलंकी अवतार जाण ॥ तुरंगारूढ काय आवडी ॥ ५ ॥ नानाप्रकार नानावेष ॥ अवतार
धरी हृषीकेश ॥ तारावया भक्तजनांस ॥ दुष्टहनन करावया ॥ ६ ॥ द्वापारअंतीं झाला
कली ॥ अज्ञान लोक ब्राह्मणकुळीं ॥ आचारहीन होउनी प्रबळी ॥ वर्तती महीं कलि-
युगीं ॥ ७ ॥ भक्तजनतारणार्थ ॥ अवतार धरी श्रीगुरुनाथ ॥ सगराकारणें भगीरथ ॥
आणी गंगा भूमंडळीं ॥ ८ ॥ ऐसें एक विप्रवनिता ॥ आराधी श्रीविष्णुदत्ता ॥ तिचे
उदरीं अवतार घेतां ॥ आश्चर्य झालें परियेसा ॥ ९ ॥ पीठापूर पूर्वदेशीं ॥ होता ब्राह्मण
उत्तमवंशीं ॥ आपस्तंब शाखेसी ॥ नाम आपळराजा जाण ॥ १० ॥ तयाची भार्या सुम-
ता ॥ असे आचारपतिव्रता ॥ अतिथी आणि अभ्यागता ॥ पूजा करी भक्तिभावें ॥ ११ ॥
ऐसें असतां वर्तमानीं ॥ पतिसेवा एकमनीं ॥ अतिथीपूजा सगुणी ॥ निरंतर करीतसे
॥ १२ ॥ वर्ततां ऐसें एके दिवशीं ॥ आला दत्त अतिथिवेषीं ॥ श्राद्ध होतें अमावास्येसी ॥
विप्राघरीं तें देखा ॥ १३ ॥ न जेवितां ब्राह्मण घरीं ॥ दत्ता भिक्षा घाली ते नारी ॥ दत्ता-
त्रेय साक्षात्कारी ॥ प्रसन्न झाला तये वेळीं ॥ १४ ॥ त्रयमूर्तीचें रूप घेउनी ॥ स्वरूप

दाविलें अतिगहनीं ॥ पतिव्रता धांवोनि चरणीं ॥ नमन करी मनोभावें ॥ १५ ॥ दत्ता-त्रेय ह्मणे तियेसी ॥ माग मातें जें इच्छिसी ॥ जे जे वासना तुझे मानसीं ॥ पावसी त्वरित म्हणतसे ॥ १६ ॥ ऐकोनि स्वामीचें वचन ॥ विप्रवनिता करी चिंतन ॥ विनवीतसे करद्वय जोडून ॥ नानापरी स्तवोनियां ॥ १७ ॥ म्हणे जयजय जगन्नाथा ॥ तूं तारक भवासी तत्वता ॥ माझे मनीं असे जे आर्ता ॥ पुरवावी ते देवराया ॥ १८ ॥ तूं कृपाळू सर्वांभूतीं ॥ वेद पुराणें वाखाणिती ॥ कवि वर्णावी तुझी कीर्ती ॥ भक्तवत्सला कृपानिधी ॥ १९ ॥ मिथ्या नोहे तुझा बोल ॥ जें का दिलें ध्रुवासी पद अढळ ॥ बिभीषणासी लंकास्थळ ॥ देऊनी राज्यीं स्थापिलें ॥ २० ॥ भक्तजना तूं आधार ॥ तयालागीं धरीशी अवतार ॥ स्थिर असे चराचर ॥ चवदा भुवना माझारी ॥ २१ ॥ आतां मातें वर देसी ॥ वासना असे माझे मानसीं ॥ न व्हावें अन्यथा बोलासी ॥ कृपानिधी देवराया ॥ २२ ॥ माझे मनींची वासना ॥ पुरवावी जगज्जीवना ॥ अनाथतारका नारायणा ॥ ह्मणोनि चरणा लागतसे ॥ २३ ॥ ऐकोनि तियेचें करुणावचन ॥ संतोषला त्रयमूर्ति आपण ॥ कर धरिला आश्वासोन ॥ सांग जननी म्हणतसे ॥ २४ ॥ तंव बोलिली पतिव्रता ॥ स्वामी जें निरोपिलें आतां ॥ जननी नाम मज ठेवितां ॥ करा निर्धार याच बोला ॥ २५ ॥ मज पुत्र झाले बहुत ॥ नव्हेत स्थिर उपजतमृत ॥ जे वांचले आतां असत ॥ अक्षहीन पादहीन ॥ २६ ॥ योग्य झाले नाहीं कोणी ॥ काय करावें मूर्ख प्राणी ॥ असोनि नसती येणें गुणीं ॥ पुत्राविण काय जन्म ॥ २७ ॥ व्हावा पुत्र मज ऐसा ॥ ज्ञानवंत पुराणपुरुषा ॥ जगद्वंद्य देवसदृशा ॥ तुह्माखारिखा दातारा ॥ २८ ॥ ऐकोनी तियेचें वचन ॥ प्रसन्न झाला

दत्त आपण ॥ पुढें असे कार्याकारण ॥ दीक्षार्थ भक्तजनांसी ॥२९॥ तापसी ह्मणे तियेसी ॥ पुत्र होईल तुज परियेसी ॥ उद्धरील तुझे वंशासी ॥ ख्यातिवंत कलियुगीं ॥३०॥ असावें तुह्मीं त्याचे बोलीं ॥ येऱ्हवीं न राहे तुह्मांजवळी ॥ ज्ञानमार्गी आतुर्बळी ॥ तुमचें दैन्य हारील ॥३१॥ इतुकें सांगोनि तापसी ॥ अदृश्य झाला परियेसी ॥ विस्मय करितसे मानसीं ॥ विप्रवनिता तयेवेळीं ॥ ३२ ॥ विस्मय करोनि मनांत ॥ पतीसी सांगे वृत्तांत ॥ दोघे हर्षें निर्भर होत ॥ ह्मणती दत्तात्रेय होईल ॥ ३३ ॥ मध्यान्हसमयीं अतिथिकाळीं ॥ दत्त येताती तयेवेळीं ॥ विन्मुख न होतां तये काळीं ॥ भिक्षा मात्र घालिजे ॥ ३४ ॥ दत्तात्रेयाचें स्थान ॥ माहूर करवीरक्षेत्र खूण ॥ तयाचा वास सदा जाण ॥ पांचाळेश्वर नगरांत ॥ ३५ ॥ नानावेष भिक्षुकरूप ॥ दत्तात्रेय येती साक्षेप ॥ न पुसतां मज निरोप ॥ भिक्षा घाली ह्मणतसे ॥ ३६ ॥ विप्रस्त्री ह्मणे पतीसी ॥ आजि अवज्ञा केली तुह्मासी ॥ ब्राह्मण न जेवितां आपण त्यासी ॥ भिक्षा घातली ह्मणतसे ॥ ३७ ॥ ऐकोनि सतीच्या बोला ॥ विप्र मनीं संतोषला ॥ ह्मणे पतिव्रते लाभ झाला ॥ पितर माझे तृप्त जाहले ॥ ३८ ॥ करावें कर्म पितरांच्या नामीं ॥ समर्पावें विष्णूसी आम्हीं ॥ साक्षात्कारें येऊनि स्वामी ॥ भिक्षा केली आह्मा घरीं ॥ ३९ ॥ कृतार्थ झाले पितृगण समस्त ॥ निर्धारें झाले स्वर्गस्थ ॥ साक्षात् विष्णु भेटले दत्त ॥ त्रयमूर्ति अवतार ॥ ४० ॥ धन्य तुझी मातापिता ॥ जे वर लाधलीस मुख्य आतां ॥ पुत्र होईल निभ्रांता ॥ न धरीं चिंता मानसीं ॥ ४१ ॥ हर्षें निर्भर होवोनी ॥ राहिलीं दोघें निश्चिंत मनीं ॥ होती जाहली गर्भिणी ॥ विप्रस्त्री परियेसा ॥ ४२ ॥ ऐसे नवमास क्रमोनी ॥ प्रसूत जाहली शुभदिनीं ॥ विप्रें स्नान करूनी ॥ केलें

जातकर्म तये वेळीं ॥ ४३ ॥ मिळुनि समस्त विप्रकुळ ॥ जातक वर्तविती तया वेळीं ॥ ह्मणती तपस्वी होईल बळी ॥ दीक्षाकर्ता जगद्गुरू ॥ ४४ ॥ ऐकोनि ह्मणती मातापिता ॥ हो कां आमुच्या कुळ उद्धरिता ॥ आह्मा वर दिधला दत्ता ॥ ह्मणोनि ठेविती तया नांव ॥४५॥ श्रीपाद ह्मणोनि याकारण ॥ नाम ठेवि तो ब्राह्मण ॥ अवतार केला त्रिमूर्ती आपण ॥ भक्तजना तारावया ॥ ४६ ॥ वर्तत असतां त्याचे घरीं ॥ झालीं सात वर्षें पुरीं ॥ मौंजीबंधन ते अवसरीं ॥ करिता झाला द्विजोत्तम ॥ ४७ ॥ बांधितां मौंजी ब्रह्मचारी ॥ ह्मणता झाला वेद चारी ॥ मीमांसा तर्क अतिविस्तारीं ॥ ह्मणों लागला तयेवेळीं ॥ ४८ ॥ ऐकोनि सवस्त नगरलोक ॥ विस्मय करिती सकळिक ॥ होईल अवतार कारणिक ॥ ह्मणोनि बोलती आपणांत ॥ ४९ ॥ आचार व्यवहार प्रायश्चित्त ॥ समस्तांसी आपण बोलत ॥ वेदांतभाष्य वेदार्थ ॥ सांगतसे द्विजवरांसी ॥ ५० ॥ वर्ततां ऐसें तयासी ॥ झालीं वर्षें षोडशी ॥ विवाह करूं ह्मणती पुत्रासी ॥ माता पिता अवधारा ॥ ५१ ॥ विचार करिती पुत्रासवें ॥ बारे लग्न तुवां करावें ॥ श्रीपाद ह्मणे ऐका भावें ॥ माझी वांच्छा सांगेन ॥ ५२ ॥ कराल विवाह माझा तुह्मीं ॥ सांगों ऐका विचार आह्मीं ॥ वैराग्य स्त्रीसंगें असेन मी ॥ काम्य आमुचें तियेजवळी ॥ ५३ ॥ त्या स्त्रियेवांचून आणीक नारी ॥ समस्त जाण मातेसरी ॥ जरी आणाल ते सुंदरी ॥ वरीन ह्मणे तये वेळीं ॥ ५४ ॥ आपण तापसी ब्रह्मचारी ॥ योगस्त्रियेवांचोनी नारी ॥ बोल धरा निर्धारी ॥ श्रीवल्लभ नाम माझें ॥ ५५ ॥ श्रीपादश्रीवल्लभ नाम ऐसें ॥ झालें त्रिमूर्ती कैसें ॥ पितयातें ह्मणतसे ॥ जाऊं उत्तरपंथासी ॥ ५६ ॥ ऐकोनी पुत्राचें वचन ॥ आठवलें पूर्व सूचन ॥ भिक्षुकें सांगितली जे खूण ॥

सत्य झाली ह्मणतसे ॥ ५७ ॥ आतां याचें बोलासी ॥ मौंडा घालितां परियेसी ॥ विघ्न
होईल त्वरितेंसी ॥ ह्मणोनि विचारिती तये वेळीं ॥ ५८ ॥ न ह्मणावें पुत्र यासी ॥ अवतार
पुरुष तापसी ॥ जैसें याचे वसे मानसीं ॥ तैसें करावें ह्मणती दोघे ॥ ५९ ॥ निश्चय करूनि
आपुले मनीं ॥ पुत्राभिमुख जनकजननी ॥ होती आशा आह्मालागुनी ॥ प्रतिपाळिशी
ह्मणोनियां ॥ ६० ॥ ऐसीं मनीं व्याकुळित ॥ डोळां निघति अश्रुपात ॥ माता पडली
मूर्च्छागत ॥ पुत्रस्नेहें करूनियां ॥ ६१ ॥ देखोनी मातेचें दुःख ॥ संबोखित परमपुरुष ॥
उठवूनि स्वहस्तें देख ॥ अश्रुपात पुशितसे ॥ ६२ ॥ न करी चिंता अहो माते ॥ जें मागसी तें
देईन तूतें ॥ दृढ करोनी चित्तातें ॥ राहा सुखें ह्मणतसे ॥ ६३ ॥ बारे तुजकरतां आपण ॥
दुःख विसरलें संपूर्ण ॥ रक्षिसि आह्मां वृद्धांलागून ॥ दैन्याविगळें करोनी ॥६४॥ पुत्र असती
आपणा दोन ॥ पादहीन अक्षहीन ॥ त्यांतें पोशील आतां कवण ॥ आह्मां कवण रक्षील
॥ ६५॥ ऐकोनि जननीचें वचन ॥ अवलोकी अमृतदृष्टी करून ॥ पुत्र दोघेही झाले सगुण ॥
आली दृष्टीचरणादिक ॥ ६६ ॥ वेदशास्त्रादि व्याकरण ॥ सर्व म्हणती तत्क्षण ॥ दोघे येउनी
धरिती चरण ॥ कृतार्थ झालों म्हणोनियां ॥ ६७ ॥ चिंतामणीचा होतां स्पर्श ॥ सुवर्ण करी
लोहास ॥ तैसें दृष्टिसुधारसें ॥ योग्यता आली तयांसीं ॥६८॥ आश्वासून तये वेळीं ॥ दिधला
वर तात्काळीं ॥ पुत्रपौत्रीं नांदा प्रबळी ॥ श्रियायुक्त सनातन ॥ ६९ ॥ सेवा करा जनक-
जननी ॥ पावाल सुख महाज्ञानी ॥ इहसौख्य पावोनी ॥ व्हाल मुक्त हें निश्चयें ॥७०॥ ऐसें
बोलोनि तयांसी ॥ संबोधितसे मातेसी ॥ पाहोनियां दोघां पुत्रांसी ॥ राहतां सुख पावाल
॥ ७१ ॥ पुत्र दोघे शतायुषी ॥ निश्चय धरी वो मानसीं ॥ कन्या पुत्र होतील यांसीं ॥ तुम्हीं

नेत्रीं देखाल ॥७२॥ अखंड लक्ष्मी यांचे घरीं ॥ यांचे वंशपारंपरीं ॥ कीर्तिवंत सचराचरीं ॥ संपन्न होतीं वेदशास्त्रें ॥ ७३ ॥ आमची अवज्ञा न करितां ॥ निरोप द्यावा आम्हा त्वरिता ॥ जाणें असे उत्तरपंथा ॥ दीक्षा द्यावया साधुजनां ॥७४॥ सांगोनि मातापित्यांसी ॥ अदृश्य झाले परियेसी ॥ पावले त्वरित पुरी काशी ॥ गुप्तरूपें होते तेथें ॥७५॥ निघाले तेथूनि बदरीवना ॥ भेटी घेऊनि नारायणा ॥ अवतार असे आपणा ॥ कार्याकारण मनुष्यदेहीं ॥७६॥ दीक्षा करावया भक्तजनां ॥ तीर्थें हिंडणें आपणा ॥ मनोवेग मार्गक्रमणा ॥ आले तीर्थगोकर्णासी ॥७७॥ ऐकोनि सिद्धमुनीचें वचन ॥ विनवी नामधारक आपण ॥ तें परिसा श्रोतेजन ॥ म्हणे सरस्वती गंगाधरू ॥७८॥ इति श्रीगुरुचरित्रपरमकथाकल्पतरौ श्रीनृसिंहसरस्वत्युपाख्याने सिद्धनामधारकसंवादे दत्तात्रेयावतारकथनं नाम पंचमोऽध्यायः ॥ ओं० ७८ ॥



॥ श्रीगणेशाय नमः ॥ नामधारक ह्मणे सिद्धासी ॥ स्वामी तूं ज्योति अंधकारासी ॥ प्र-
काश केला जी आह्मासी ॥ गुरुपीठ आद्यंत ॥ १ ॥ त्रयमूर्ति होऊनि आपण ॥ तीर्थें
करावीं किं कारण ॥ विशेष असे काय गोकर्ण ॥ ह्मणोनि गेले तया स्थाना ॥ २ ॥ तीर्थें
असती अपरंपरी ॥ समस्त सांडूनि प्रीति करी ॥ कैसा पावला दत्तात्री ॥ अवतारी श्री-
पाद श्रीवल्लभ ॥ ३ ॥ ऐक शिष्या शिखामणी ॥ तुवां पुशिलें जें कां प्रश्नीं ॥ संतोष झाला
अंतःकरणीं ॥ सांगेन चरित्र श्रीगुरूचें ॥ ४ ॥ विस्तारोनी आह्मासी ॥ सांगा स्वामी
कृपेसी ॥ ह्मणोनि लागला चरणासी ॥ नामधारक प्रीतीकारें ॥ ५ ॥ ऐकोनि नामधार-
काचें वचन ॥ संतोषलें सिद्धाचें मन ॥ सांगतसे विस्तारोनें ॥ गुरुचरित्र परियेसा ॥ ६ ॥
तुजकरितां आह्मासी ॥ लाभ झाला असे मानसीं ॥ गुरुचरित्र सांगावयासी ॥ उत्कंठा
मानसीं होतसे ॥ ७ ॥ ह्मणे त्रयमूर्ति अवतरोन ॥ तीर्थें हिंडे केवीं आपण ॥ विशेष पावले-
गोकर्ण ॥ ह्मणोनि पुसशी आह्मातें ॥ ८ ॥ दत्तात्रेय आपण ॥ तीर्थें हिंडे तयाचें कारण ॥
भक्तजनहितार्थ जाण ॥ दीक्षा द्यावया साधुजनां ॥९॥ विशेष तीर्थ आपुलें स्थान ॥ गो-
कर्णीं शंकर असे जाण ॥ याच कारणें निर्गुण ॥ त्रयमूर्ति वसती तया ठायीं ॥ १० ॥ गो-
कर्णीचें महात्म्य ॥ सांगतां असे अनुपम्य ॥ एक चित्त करूनि नेम ॥ ऐक शिष्या नाम-
धारका ॥ ११ ॥ त्या तीर्थाचे आदी अंतीं ॥ सांगेन तुह्मां विस्तृतीं ॥ जे पूर्वीं वर लाधले
असती ॥ अपूर्व असे ऐकतां ॥ १२ ॥ महाबळेश्वर लिंग देखा ॥ स्वयंभू शिव असे एका ॥
आख्यान त्याचें ऐका ॥ लंबोदरें प्रतिष्ठिलें ॥ १३ ॥ शिष्य ह्मणे सिद्धासी ॥ तीर्थमहिमा
वानिसी ॥ विघ्नेश्वरें प्रतिष्ठिलें तयासी ॥ विस्तारोनी सांग मज ॥ १४ ॥ ऐसें शिष्य विन-

वित ॥ ऐकोनि बहु संतोषत ॥ निरोपित आद्यंत ॥ महाबळेश्वरचरित्र ॥ १५ ॥ पुलस्त्य ब्राह्मणाची भार्या ॥ नाम तियेचें कैकया ॥ ईश्वरभक्ति अतिप्रिया ॥ शिवपूजा सर्व काळ ॥ १६ ॥ नित्य करी शिवपूजन ॥ पूजेविण न घे अन्न ॥ ऐसें करितां एक दिन ॥ न मिळे लिंग पूजेसी ॥ १७ ॥ व्रतभंग होईल ह्मणोनी ॥ मृत्तिकालिंग करूनी ॥ पूजी अतिसंतोषोनी ॥ भक्तिपूर्वक अवधारा ॥ १८ ॥ तिचा पुत्र अतिक्रूर ॥ नाम तया दशशिर ॥ आला तेथें वेगवत्तर ॥ मातृदर्शन करावया ॥ १९ ॥ नमिता झाला मातेसी ॥ पुसे पूजा काय करिसी ॥ माता सांगे विस्तारेंसी ॥ लिंग पूजितें मृत्तिकेचें ॥ २० ॥ रावण ह्मणे जननीसी ॥ माझी माता तूं ह्मणविसी ॥ मृत्तिकेचें लिंग पूजेसी ॥ अभाग्य आपुलें ह्मणतसे ॥ २१ ॥ मागुती ह्मणे तियेसी ॥ पूजितां फळ काय यासी ॥ कैकया सांगे पुत्रासी ॥ कैलासपद पाविजे ॥ २२ ॥ रावण ह्मणे मातेसी ॥ कैलास आणुनि तुजपासीं ॥ देईन हें निश्चयेसीं ॥ सायास कां वो करितेसी ॥ २३ ॥ ऐसें बोले तो रावण ॥ मातेसवें करी पण ॥ आणीन त्वरित उमारमण ॥ कैलासासहित लंकेसी ॥ २४ ॥ पूजा करी वो स्वस्थ चित्तेंसी ॥ मृत्तिका लिंग कां करिसी ॥ ह्मणोनि निघाला त्वरितेसी ॥ मनोवेगें निशाचर ॥२५॥ पावला त्वरें शिवपुरासी ॥ शुभ्र रम्य पर्वतासी ॥ धरोनि हालवी क्रोधेंसी ॥ वीस बाहु भुजाबळें ॥ २६ ॥ आंदोळलें कैलासभुवन ॥ उपटीतसे तो रावण ॥ दाही शिरें टेंकून ॥ उचलीन ह्मणे उल्हासें ॥ २७ ॥ शिर लावूनि पर्वतासी ॥ कर टेंकूनि मांडीसी ॥ उचलिता झाला प्राणेंसी ॥ सप्तपाताळ आंदोळले ॥ २८ ॥ फणा चुकवी शेष आपण ॥ कूर्म भ्याला कांपोन ॥ भयचकित देवगण ॥ अमरपूर कांपतसे ॥ २९ ॥ कंप झाला स्वर्गभुवन ॥ सत्य-

लोक विष्णुभुवन ॥ मेरू पडतसे गडबडोन ॥ ह्मणती प्रळयो मांडला ॥ ३० ॥ कैलासपु-
रीचे देवगण ॥ भयाभीत झाले कंपायमान ॥ भयाभीत गिरिजा आपण ॥ होऊनि गेली
शिवापासीं ॥ ३१ ॥ पार्वती विनवी शिवासी ॥ काय झालें कैलासासी ॥ आंदोळतसे
सभेसी ॥ पडों पाहात निर्धारें ॥ ३२ ॥ नगरांत झाला आकांत ॥ बैसलेती स्वस्थचित्त ॥
करा प्रतिकार त्वरित ॥ ह्मणोनि चरणा लागली ॥ ३३ ॥ ईश्वर ह्मणे गिरिजेसी ॥ न करी
चिंता मानसीं ॥ रावण माझा भक्त परियेसी ॥ खेळतसे भक्तीनें ॥ ३४ ॥ ऐसें वचन ऐ-
कोनी ॥ विनवी गिरिजा नमोनी ॥ रक्ष रक्ष शूलपाणी ॥ समस्त देवगणांतें ॥३५॥ ऐकोनि
उमेची विनंती ॥ शंकरें चेंपिला वामहस्तीं ॥ दाही शिरें भुजांसहिती ॥ दडपलासे गिरि-
च्या तळीं ॥ ३६ ॥ चिंता करी मनीं बहुत ॥ शिव शिव ऐसें उच्चारित ॥ ध्यातसे स्तोत्र
करीत ॥ शरणागता रक्ष ह्मणोनी ॥ ३७ ॥ त्राहि त्राहि पिनाकपाणी ॥ जगद्रक्षका शिरो-
मणी ॥ शरण आलों तुझे चरणीं ॥ मरण कैचें भक्तासी ॥ ३८ ॥ शंकर भोळा चक्रवर्ती ॥
ऐकोनि त्याची विनंती ॥ चेंपिलें होतें वामहस्तीं ॥ काढिलें त्वरित कृपेनें ॥ ३९ ॥ सुटला
तेथूनि लंकेश्वर ॥ स्तोत्र करितसे अपार ॥ स्वशिर छेदोनी परिकर ॥ तंतु लाविले निजअंत्रें
॥ ४० ॥ वेदसहस्र एकवचनीं ॥ वर्णक्रमादि विस्तारोनी ॥ सामवेद अति कुसरी ॥ समस्त
रागें गातसे ॥४१॥ गण ऋषेश्वरयुक्त ॥ गायन करी लंकानाथ ॥ तयांचीं नामें विख्यात ॥
सांगेन ऐका एकचित्तें ॥ ४२ ॥ आठही गण प्रख्यात ॥ उच्चारीतसे लंकानाथ ॥ मगण
ब्राह्मण प्रख्यात ॥ नगण क्षत्रियाविशेष ॥४३॥ भगण वैश्य ध्यानेसी ॥ गगण क्षुद्रवर्णेसी ॥
जगण दैत्य परियेसी ॥ रगण प्रत्यक्ष च्यूतगुणें ॥४४॥ सगण तुरंगरूपेंसी ॥ यगण शुद्ध

परियेसी ॥ विस्तारितां गायनेंसी ॥ लंकापती रावण ॥४५॥ गायन करी नवरसेंसी ॥ नामें सांगेन परियेसी ॥ शांत भयानक अद्भुतेंसी ॥ शृंगार हास्य करुणारस ॥ ४६ ॥ रौद्र वीर बीभत्सेसी ॥ गायन करी अति उल्हासी ॥ वेणू वाजवी सप्तस्वरेंसी ॥ ध्यानपूर्वक विधीनें ॥ ४७ ॥ जंबुद्वीप वास ज्यासी ॥ षड्जस्वरनामपरियेसीं ॥ कंठीहूनि उपज ज्यासी ॥ मयूरस्वर आलापित ॥ ४८ ॥ उत्तम वंशीं उपज ज्यासी ॥ गीर्वाणकुळीं ब्रह्मवंशीं ॥ तप्तकांचनवर्णपरियेसी ॥ वन्हि देवता शृंगाररस ॥ ४९ ॥ द्वितीय स्वर ऋषभासी ॥ जन्म शाल्मली द्वीपासी ॥ उपज हृदयस्थानेंसी ॥ पंचमस्वरेंसी आलापित ॥ ५० ॥ प्रख्यात नाम क्षेत्रवंशीं ॥ विराजवर्ण यम देवतेंसी ॥ क्रीडा अद्भुतरस ऐशी ॥ वीणा वाजवी रावण ॥ ५१ ॥ तृतीय स्वर गांधारेंसी ॥ गायन करी रावण परियेसी ॥ कुशद्वीप वास ज्यासी॥ काकस्वरें अवधारा ॥ ५२ ॥ अजस्वर वर्ण त्यासी ॥ गीर्वाणवैश्यवंशीं ॥ सुवर्णवर्णकांतीसी ॥ चंद्र देवता अद्भुतरसें ॥ ५३ ॥ मध्यम स्वर चातुर्थिक ॥ क्रौंचद्वीप वास ऐक ॥ उरस्थान उच्चारि सुख ॥ क्रौंचस्वरें आलापित ॥ ५४ ॥ गीर्वाणकुळ ब्रह्मवंश ॥ कुंदवर्ण रूप सुरस ॥ ध्यान करी लंकाधीश ॥ लक्ष्मी देवता करुणारस ॥ ५५ ॥ शाल्मलीद्वीप भूमीसी ॥ जन्म पंचमस्वरासी ॥ कंठीं उपजोनि नादासी ॥ कोकिळास्वर गातसे ॥ ५६ ॥ ध्यान करी तया स्वरांसी ॥ उपज झाला पितृवंशीं ॥ कृष्णवर्ण रूप त्यासी ॥ गणनाथ देव हास्यरसें ॥ ५७ ॥ श्वेतद्वीप जन्मख्यात ॥ स्वर असे नाम धैवत ॥ ललाटस्थान नादव्यक्त ॥ दर्दुरस्वरें आलापी देखा ॥ ५८ ॥ ऐसा धैवत स्वरासी ॥ बीभत्सरस अति उल्हासी ॥ गाय रावण परियेसी ॥ ईश्वराप्रती भक्तीनें ॥ ५९ ॥ पुष्करद्वीप

उपजे त्यासी ॥ निषादस्वर नाम परियेसी ॥ उत्पत्ति आलाप संधीसी ॥ हस्तिस्वरें गातसे ॥ ६० ॥ असुरवंश वैश्यकुळीं ॥ अल्पशुद्ध वर्णपाटली ॥ तुंबरमुनी देवता सकळीं ॥ सर्व देवता अवधारी ॥ ६१ ॥ भयानक रस देखा ॥ चर्ची व्याकुळ असे निका ॥ येणेंपरी सप्त स्वरिका ॥ गायन करी लंकानाथ ॥ ६२ ॥ रागेंसहित रागिणीसी ॥ गायन करी सामवेदासी ॥ श्रीरागादि वसंतासी ॥ आलाप करी दशशिर ॥ ६३ ॥ भैरवादि पंचमरागीं ॥ नट नारायण मेघरागीं ॥ गायन करी अभ्यासयोगी ॥ लंकानाथ शिवाप्रती ॥ ६४ ॥ गौड कोल्हाळ कांदाळी ॥ द्राविडरागी कौशिकमाळी ॥ देवगांधार आनंदलिळीं ॥ गायन करी लंकानाथ ॥ ६५ ॥ धनश्रिया वराडीसी ॥ रामक्रिया फल मंजिरेसी ॥ गौडाकी दशाकी हारिसी ॥ गायन करी लंकेश्वर ॥ ६६ ॥ भैरवी गुर्जरीसहित ॥ वेळावली राग ललित ॥ कर्नाटकी हंसयुक्त ॥ गायन करी दशशिर ॥ ६७ ॥ त्राटकी मोटकी देखा ॥ टंकाक्षी सुधा नाटका ॥ सैंधवा माळाकी ऐका ॥ गायन करी लंकानाथ ॥ ६८ ॥ बंगाळीराग सोरटीसी ॥ कामबोध मधुमाधवीसी ॥ देवाक्रिया भुपाळीशी ॥ गायन करी दशानन ॥ ६९ ॥ रागवल्लभ माधुरीसी ॥ राव्हेरीराग हर्षी ॥ विहंग दात्री चंडीसी ॥ वसवीजादि रागानें ॥ ७० ॥ शीर कापून आपुलें देखा ॥ यंत्र केलें करकमळिका ॥ शिरा काढून तंतुका ॥ रावणेश्वर गातसे ॥ ७१ ॥ समयासमयीं आलापन ॥ करी दशशिर आपण ॥ प्रातःकाळीं करी गायन ॥ अष्ट रागें परियेसा ॥ ७२ ॥ मध्यमराग वेळवेळीं ॥ दशांकभैरव करी भूपाळीं ॥ मल्हारधनाश्री बंगाली ॥ प्रातःकाळीं गातसे ॥ ७३ ॥ वराडि ललिता गुर्जरीसी ॥ गौडाकी आहिरी कौशिकेसी ॥ माध्यान्हस-

मयीं गायनासी ॥ रावण करी परियेसा ॥ ७४ ॥ कुरंजी तुंडी मालश्रियेसी ॥ दशांक पंचमपरिसी ॥ अपराह्ण वेळ अतिहर्षी ॥ ईश्वराप्रती गातसे ॥ ७५ ॥ चारी प्रकार गौडियेसी ॥ रामक्रिया श्रीरागासी ॥ देवक्रियाफलमंजिरेसी ॥ वसंत राहे ऋतुकाळीं ॥ ७६ ॥ ऐसें छत्तीस रागेंसी ॥ गायन करीं सामवेदासी ॥ निर्वाणरूप भक्तीसी ॥ चंद्रमौळी सांबाचिये ॥ ७७ ॥ रावणाचे भक्तीसी ॥ प्रसन्न ईश्वर त्वरितेसी ॥ निजरूप अतिहर्षी ॥ उभा राहिला सन्मुख ॥ ७८ ॥ पंचवक्त्र त्रिनेत्रेसी ॥ उभा राहोनि संतोषी ॥ काय इच्छा तुझे मानसीं ॥ माग ह्मणे तये वेळीं ॥ ७९ ॥ ह्मणे रावण शिवासी ॥ काय मागावें तुजपासीं ॥ लक्ष्मी माझे घरची दासी ॥ आठ निधी माझे घरीं ॥ ८० ॥ चतुरानन माझा जोशी ॥ तेतीस कोटी देव हर्षी ॥ सेवा करिती अहर्निशीं ॥ सूर्य चंद्र वरुण वायू ॥ ८१ ॥ अग्निसारिखा सेवा करी ॥ वस्त्रें धूत अतिकुसरी ॥ यम माझा आज्ञाधारी ॥ निरोपावेगळा न मारी कवणा ॥८२॥ इंद्रजितासारिखा पुत्र ॥ कुंभकर्णा ऐसा भ्रात ॥ स्थान समुद्रामाजी पवित्र ॥ कामधेनू माझे घरीं ॥ ८३ ॥ सहस्र कोटी आयुष्य मज ॥ हें सांगणें नलगे तुज ॥ आलों असें यात्रि काज ॥ कैलास नेईन लंकेसी ॥८४ ॥ व्रत असे जननीसी ॥ नित्य पूजन तुह्मासी ॥ मनोरथ पुरवावे भक्तीसी ॥ कृपासिंधु दातारा ॥८५॥ ईश्वर ह्मणे रावणासी ॥ जरी चाड असे पूजेसी ॥ काय करिसी कैलासासी ॥ आत्मलिंग तुज देतों आतां ॥८६॥ जे जे मनींची वासना ॥ पुरेल त्वरित ऐक जाणा ॥ लिंग असे प्राण आपणा ॥ ह्मणोनि दिधलें रावणासी ॥८७॥ पूजा करी वेळ तिन्हीं ॥ अष्टोत्तर एक जप करोनी ॥ रुद्राभिषेकें अभिषेकोनी ॥ पूजा करी एकचित्तें ॥८८॥ वर्षें तीन जे पूजिती ॥ तेचि माझें

स्वरूप होती ॥ जें जें मनीं इच्छिती ॥ ते ते पावती अवधारा ॥८९॥ हें लिंग जयापाशीं ॥
मृत्यु नाहीं गा परियेसी ॥ दर्शनमात्रें महादोषी ॥ उद्धरतील अवधारा ॥ ९० ॥ ठेवूं नको
भूमीवरी ॥ जोंवरी पावे तुझी नगरी ॥ वर्षें तीन पूजा करी ॥ तूंचि ईश्वर होसील ॥ ९१ ॥
वर लाधोनी लंकेश्वर ॥ निरोप देत कर्पूरगौर ॥ करूनी साष्टांग नमस्कार ॥ निघाला
त्वरित लंकेसी ॥ ९२ ॥ इतुका होतां अवसर ॥ नारद होता ऋषीश्वर ॥ निघोनि गेला
वेगें सत्वर ॥ अमरपुरा इंद्रभुवना ॥ ९३ ॥ नारद ह्मणे इंद्रासी ॥ काय स्वस्थ चित्तें बैस-
लासी ॥ अमरत्व दिधलें रावणासी ॥ लक्ष्मी नेली आजि तुमची ॥ ९४ ॥ चिरायु झाला
लंकेश्वर ॥ प्राणलिंग देत कर्पूरगौर ॥ आणीक दिधला असे वर ॥ तूंचि ईश्वर होसील
॥ ९५ ॥ वर्षें तीन पूजिलें यासी ॥ तूंचि माझें स्वरूप होसी ॥ तुझें नगर कैलासी ॥ मृत्यु
नाहीं कदां तुज ॥ ९६ ॥ ऐसा वर लाधोनी ॥ गेला रावण संतोषोनी ॥ तेतीस कोटी
देव कोंडुनी ॥ सुटती आतां तुह्मासी ॥ ९७ ॥ जावें त्वरित तुह्मी आतां ॥ सेवा करावी
लंकानाथा ॥ उर्वशी रंभा मेनका त्वरिता ॥ भेटीस न्याव्या रावणाचे ॥ ९८ ॥ ऐसें वचन
ऐकोनी ॥ इंद्र भयाभीत मनीं ॥ नारदा विनवी कर जोडोनी ॥ काय करावें ह्मणतसे
॥ ९९ ॥ नारद ह्मणे इंद्रासी ॥ उपाय करावा त्वरितेसी ॥ जावें तुह्मी ब्रह्मयापासी ॥
तयासी उपाय करील ॥ १०० ॥ इंद्र नारद समवेत ॥ गेले ब्रह्मलोका त्वरित ॥ विस्तारो-
नियां वृत्तांत ॥ सांगे इंद्र ब्रह्मयासी ॥ १ ॥ ब्रह्मा ह्मणे इंद्रासी ॥ जावें त्वरित वैकुंठासी ॥
दैत्यवैरी हृषीकेशी ॥ उपाय करील निर्धारें ॥ २ ॥ ह्मणोनी निघाले तिघेजण ॥ पावले
त्वरित वैकुंठभुवन ॥ भेटला तात्काळ नारायण ॥ सांगती वृत्तांत रावणाचा ॥३॥ विरिंचि

ह्मणे विष्णूसी ॥ प्रतीकार करावा वेगेंसी ॥ कारण असे तुह्मासी ॥ राम अवतारीं परियेसा ॥ ४ ॥ तेतीस कोटी देवांसी ॥ घातलें असे बंदीसी ॥ याचि कारणें तुह्मासी ॥ करणें असे अवधारा ॥ ५ ॥ ईश्वराचें प्राणलिंग ॥ घेऊनि गेला राक्षस सांग ॥ आतां रावणा नाहीं भंग ॥ तोचि होईल ईश्वर ॥ ६ ॥ त्वरित करावा उपाय यासी ॥ पुढें जड होईल तुह्मासी ॥ निर्दाळाया राक्षसासी ॥ अवतारोनी तुह्मीच ॥ ७ ॥ ऐसें विनवी चतुरानन ॥ मग कोपोनि ह्मणे नारायण ॥ कार्य नासलें ह्मणोन ॥ निघाला झडकर कैलासा ॥ ८ ॥ विष्णु आला ईश्वरापाशीं ॥ ह्मणे शंकरा परियेसी ॥ प्राणलिंग रावणापाशीं ॥ द्यावया कारण तुह्मां काय ॥ ९ ॥ रावण क्रूर महादैत्य ॥ सुरवर सकळ त्याचे भृत्य ॥ कारागृहीं असती समस्त ॥ कैंवी सुटती सांग आह्मां ॥ १० ॥ ऐसें दुराचारीयासी ॥ वर देतां उल्हासीं ॥ देवत्व गेलें त्याचे घरासी ॥ घेईल स्वर्ग निर्धारें तो ॥ ११ ॥ ईश्वर ह्मणे विष्णूसी ॥ तुष्टलों तयाचे भक्तीसी ॥ विसर पडला आह्मासी ॥ संतोषें दिधलें प्राणलिंग ॥१२॥ आपुलें शिर छेदोनि देखा ॥ वीणा केला स्वहस्तका ॥ सप्तस्वर वेदादिका ॥ गायन केलें संतोषें ॥१३॥ जरी मागता पार्वतीसी ॥ देतों सत्य परियेसीं ॥ भुली पडली भक्तीसी ॥ लिंग नेलें प्राण माझा ॥ १४ ॥ विष्णू ह्मणे उमाकांता ॥ तुह्मी ऐसा वर देतां ॥ आह्मां सायास होय तत्वतां ॥ दैत्य उन्मत्त होताती ॥ १५ ॥ देव द्विज लोकांसी ॥ पीडा करिती बहुवसीं ॥ याचि कारणें आह्मासी ॥ अवतार धरणें घडतें देखा ॥१६॥ कधीं दिधलें लिंग त्यासी ॥ नेलें असेल लंकेसी ॥ शंकर ह्मणे विष्णूसी ॥ पांच घटी झाल्या आतां ॥ १७ ॥ ऐकतांच शिववचन ॥ उपाय करी

नारायण ॥ धाडिलें चक्र सुदर्शन ॥ सूर्याआड व्हावया ॥ १८ ॥ बोलावूनि नारदासी ॥ सांगतसे हृषीकेशी ॥ तुह्मी जावें त्वरितेसी ॥ रावण जातो लंकेसी देखा ॥ १९ ॥ मार्गीं जाऊनि तयासी ॥ विलंब करावा परियेसी ॥ जाऊं न द्यावें लंकेसी ॥ त्वरित जावें ह्मणतसे॥१२०॥ चक्र झालें सूर्याआड॥ स्नान संध्या रावणा जाड॥तुह्मी जाऊनियां दृढ॥ विलंब करावा तयासी ॥ २१ ॥ ऐकोनियां श्रीविष्णूच्या बोला ॥ नारद त्वरित निघोनि गेला ॥ मनोवेगें पातला ॥ जेथें होता लंकानाथ ॥ २२ ॥ नारदातें पाठवूनी ॥ विष्णु विचारी आपुल्या मनीं ॥ गणेशातें बोलावुनी ॥ पाठवूं ह्मणे विघ्नासी ॥ २३ ॥ बोलावूनि गणेशासी ॥ सांगे विष्णु परियेसी ॥ कैसा रावण तुजसी॥ उपेक्षितो सर्वदा ॥२४॥सकळ देव तुज वंदिती ॥ त्यांचे मनोरथ पुरती ॥ तुज जे कां उपेक्षिती ॥ विघ्नें बाधिती तयासी ॥ २५ ॥ तुज नेणतां रावण देखा ॥ घेऊनि गेला निधान ऐका ॥ प्राणलिंग अतिविशेखा॥ नेलें शिवा चाळवोनी २६॥ आतां त्वां करावें एक ॥ रावणापासी जाऊनि देख ॥ कपट-रूपें व्हावें कुब्जक ॥ बाळवेष धरोनियां ॥२७॥ वाटेसी होईल अस्तमान ॥ रावण करील संध्यावंदन ॥ नारद गेला याचिकारण ॥ विलंब करावया दैत्यासी ॥ २८ ॥ आज्ञा शिवाची रावणासी ॥ न ठेवीं लिंग भूमिसी ॥ शौचाचमनसमयासी ॥ आपणा जवळी न ठेविजे ॥ २९ ॥ बाळवेषें तुवां जावें ॥ शिष्यरूप करुणा भावें ॥ सूक्ष्मरूप दाखवावें ॥ लिंग घ्यावें विश्वासुनी ॥ १३० ॥ संध्यासमयीं तुझे हातीं ॥ लिंग देईल विश्वासरीती ॥ तुवां ठेवावें तत्काळ क्षितीं ॥ लिंग राहील तेथेंचि ॥ ३१ ॥ येणेंपरी गणे-शासी ॥ शिकवी विष्णु परियेसी ॥ संतोषोनि तये हर्षीं ॥ भातुकें मागे तयेवेळीं

॥ ३२ ॥ लाडू तिळवे पंचखाद्य ॥ इक्षु खोबरें दाळिंब आद्य ॥ शर्करा घृत क्षीर सद्य ॥
द्यावें त्वरित आपणासी ॥ ३३ ॥ चणे भिजवूनि आपणासी ॥ तांदूळ लाह्या साखरेसीं ॥
त्वरित भक्षण करावयासी ॥ द्यावें स्वामी ह्मणतसे ॥ ३४ ॥ जें जें मागितलें विघ्ने-
श्वरें ॥ त्वरित दिधलें शार्ङ्गधरें ॥ भक्षीत निघाला वेगवक्रें ॥ ब्रह्मचारीवेष धरूनी ॥ ३५ ॥
गेला होता नारद पुढें ॥ ब्रह्मऋषी माहात्म्य गाढें ॥ उभा ठाकला रावणापुढें ॥ कवण
कोठूनि आलासी ॥ ३६ ॥ रावण ह्मणे नारदासी ॥ गेलों होतों कैलासासी ॥ केलें उत्कृष्ट
तपासी ॥ तोषविलें तया शिवा ॥ ३७ ॥ तेणें प्रसन्न होउनी आह्मासीं ॥ लिंग दिधलें
परियेसी ॥ आणीक सांगितलें संतोषीं ॥ लिंगमहिमा अपार ॥ ३८ ॥ नारद ह्मणे लंका-
नाथा ॥ दैव थोर तुझें आतां ॥ लिंग लाधलासी अद्भुत ॥ जाणों आह्मी आद्यंत ॥ ३९ ॥
दाखवी लिंग आह्मांसी ॥ खुणें ओळखूं परियेसी ॥ लिंगलक्षण विस्तरेंसी ॥ सांगूं आह्मी
तुजलागीं ॥ १४० ॥ नारदाचिया वचनासी ॥ न धरी विश्वास परियेसी ॥ दाखवीतसे
दुरोनी लिंगासी ॥ व्यक्त करोनी त्या समयीं ॥ ४१ ॥ नारद ह्मणे लंकेशा ॥ लिंगमहिमेचा
प्रकार ऐसा ॥ सांगेन तुज बहु सुरसा ॥ बैसोनि ऐकें स्वस्थचित्तें ॥ ४२ ॥ लिंग उपजलें
कवणे दिवशीं ॥ पूर्वी लाधलें कवणासी ॥ एकचित्तें परियेसीं ॥ कथा असे अति अपूर्व
॥ ४३ ॥ गिळूनि सकळ सौरभांसी ॥ मृग एक काळाग्निसमेसी ॥ ब्रह्मांडखंडीं परियेसी॥
पडिला होता तो मृग ॥ ४४ ॥ ब्रह्मा विष्णु महेश्वर ऐसे ॥ गेले होते पारधीस ॥
मृग मारिले परियेसी ॥ भक्षिलें मेद तयेवेळीं ॥ ४५ ॥ तयासी होतीं तीन शृंगें ॥ खालीं
असती तीन लिंगें ॥ तिन्ही घेतलीं तीन भागें ॥ प्राणलिंगें परियेसा ॥ ४६ ॥ लिंगमहिमा ऐक

कानीं ॥ जे पूजिती वर्षें तीनी ॥ तेचि ईश्वर होती निर्गुणी ॥ वेदमूर्ति तेचि होय ॥ ४७ ॥ लिंग असे जयें स्थानीं ॥ तोचि कैलास जाण मनीं ॥ महत्व असे याच गुणीं ॥ ब्रह्मा विष्णु महेश्वरासी ॥ ४८ ॥ असें आणीक एक बरवें ॥ सांगेन ऐक एकभावें ॥ रावण म्हणे आह्मा जाणें ॥ असे त्वरित लंकेसी ॥ ४९ ॥ ह्मणोनि निघाला महाबळी ॥ नारद म्हणे तया वेळीं ॥ सूर्यास्त आहे जवळी ॥ संध्याकाळ ब्राह्मणासी ॥ १५० ॥ सहस्र वेद आचरसी ॥ संध्याकाळीं मार्ग क्रमिसी ॥ वाटेस होईल तुज निशी ॥ संध्यालोप होईल ॥ ५१ ॥ आह्मीं जाऊं संध्यावंदनासी ॥ म्हणोनि नारद विनयेसी ॥ पुसोनिया रावणासी ॥ गेला आपण नदीतीरा ॥ ५२ ॥ इतुकिया अवसरीं ॥ पातला गणेश ब्रह्मचारी ॥ रावणापुढें चरण चालीं ॥ समिधा तोडी कवतुकें ॥ ५३ ॥ रावण चिंती मानसीं ॥ व्रतभंग होईल आपणासी ॥ संध्या करावी त्रिकाळेसी ॥ संदेह घडला म्हणतसे ॥ ५४ ॥ ईश्वरें सांगितलें आम्हासी ॥ लिंग न ठेवावें भूमीसी ॥ संध्यासमयो झाली निशी ॥ काय करूं ह्मणतसे ॥ ५५ ॥ तंव देखिला ब्रह्मचारी ॥ अति सुंदर बाळकापरी ॥ हिंडतसे नदीतीरीं ॥ देखिला रावणें तये-वेळीं ॥ ५६ ॥ मनीं विचारी लंकानाथ ॥ ब्रह्मचारी कुमार दिसत ॥ न करी आमचा विश्वासघात ॥ लिंग देऊं तया हातीं ॥ ५७ ॥ संध्या करूं स्वस्थचित्तेंसी ॥ लिंग असेल तयापासीं ॥ बाळक असे हें निश्चयेसी ॥ म्हणोनि गेला तयाजवळी ॥ ५८ ॥ देखोनि दशशिर ॥ पळतसे लंबोदर ॥ रावण झाला द्विजवर ॥ अभय देऊनी गेला जवळी ॥ ५९ ॥ रावण म्हणे तयासी ॥ तूं कवणाचा सांग आह्मांसी ॥ माता पिता कवण तुजसी ॥ कवण कुळीं जन्म तुझें ॥ १६० ॥ ब्रह्मचारी बोले रावणा ॥ इतुकें पुससी कवण्या कारणा ॥

आमुच्या बापें तुझ्या ऋणा ॥ काय द्यावें सांग मज ॥ ६१॥ हांसोनियां लंकेश्वर ॥ लोभें धरिला त्याचा कर ॥ सांग बाळका कवणाचा कुमर ॥ प्रीतिभावें पुसतों मी ॥६२॥ ब्रह्मचारी ह्मणे रावणासी ॥ आमुचा पिता काय पुससी ॥ जटाधारी भस्मांगासी ॥ रुद्राक्षमाळा असती देखा ॥ ६३ ॥ शंकर ह्मणती तयासी ॥ भिक्षा मागणें अहर्निशीं ॥ वृषभारूढ उभा सरसी ॥ जननी माझी जगन्माता ॥ ६४ ॥ इतुकें आह्मां पुसतोसी ॥ तुज देखतां भय मानसीं ॥ बहुत वाटे परियेसी ॥ सोड हात जाऊंदे ॥ ६५ ॥ रावण ह्मणे ब्रह्मचारी ॥ तुझा पिता असे दरिद्री ॥ भिक्षा मागे घरोघरीं ॥ सौख्य तुज कांहीं नसे ॥ ६६ ॥ आमुचें नगर लंकापुर ॥ रत्नखचित असे सुंदर ॥ आह्मांसवें चाल सत्वर ॥ देवपूजा करीत जाईं ॥ ६७ ॥ जें जें मागसी आह्मांसी ॥ सकळ देईन परियेसीं ॥ सुखें रहावें मजपाशीं ॥ ह्मणे रावण ते वेळीं ॥ ६८ ॥ ब्रह्मचारी ह्मणे त्यासी ॥ लंकेसी बहुत राक्षसी ॥ आम्ही बाळक अरण्यवासी ॥ खातील तेथें जातांची ॥ ६९ ॥ न येऊं तुझिया नगरासी ॥ सोड जाऊंदे घरासी ॥ क्षुधें पीडिलों बहुवसीं ॥ ह्मणोनि भक्षितों भातुकें ॥ १७० ॥ इतुकें ऐकोनि लंकानाथ ॥ त्या बाळका संबोखित ॥ लिंग धरीं रे ऐसें ह्मणत ॥ मी संध्या करीन तोंवरी ॥७१॥ बाळक विनवी तयासी ॥ न धरीं लिंग परियेसी ॥ मी ब्रह्मचारी अरण्यवासी ॥ उपद्रवूं नको ह्मणतसे ॥७२॥ तुझें लिंग असेल जड ॥ मी पण बाळ असे वेड ॥ ने घें लिंग जाऊंदे सोड ॥ धर्म घडेल तुजलागीं ॥७३॥ नानापरी संबोखित ॥ लिंग देत लंकानाथ ॥ संध्या करावया आपण त्वरित ॥ समुद्रतीरीं बैसला ॥७४॥ ब्रह्मचारी तयासी ॥ उभा विनवीतसे रावणासी ॥ जड झालिया आपणासी ॥ ठेवीन त्वरित भूमीवरी ॥७५॥ वेळ तीन परियेसीं ॥ बोलावीन तुह्मांसी ॥

वेळ लागलिया परियेसीं॥आपण ठेवीन भूमीवरीं॥७६॥ऐसा निर्धार करोनी॥उभा गणेश लिंग घेउनी ॥ समस्त देव विमानीं ॥ बैसोनि पहाती कौतुक॥७७॥अर्घ्यसमयीं रावणासी ॥ बोलावी गणेश ॥ परियेसी जड झालें लिंग आह्मासी ॥ सत्वर घेगा ह्मणतसे ॥ ७८ ॥ न्यासपूर्वक अर्घ्य देखा॥रावण करी अति विवेका॥हातीं दाखवी बाळका॥येतों राहें ह्मणोनी॥७९॥आणीक क्षणभर राहोनी॥गणेश बोले वेळ दोनी॥जड जहालें म्हणोनि॥शीघ्र यावें ह्मणतसे॥१८०॥ न ये रावण ध्यानस्थ॥गणेश असें उच्चारित॥समस्त देवां साक्षी करीत ॥ लिंग ठेवीत भूमीवरी ॥८१॥ श्रीविष्णूतें स्मरोनी ॥ लिंग ठेविलें स्थापोनि ॥ संतोष झाला गगनीं ॥ पुष्पें वर्षती सुरवर ॥८२॥ अर्घ्य देवोनि लंकेश्वर ॥ निघोनि आला सत्वर ॥ लिंग देखिलें भूमीवर॥मनीं विकळ जाहला॥८३॥आवेशोनि रावण देखा ॥ ठोंसे मारी गणनायका ॥ हास्यवदनें रडे ऐका ॥ भूमी-वरी लोळतसे ॥८४॥ ह्मणे माझिया पित्यासी ॥ सांगेन आतां त्वरितेसी ॥ कां मारिलें मज बा-ळासी॥ह्मणोनि रडत निघाला॥८५॥मग रावण काय करी ॥ लिंग धरोनियां दृढ करीं॥ उचलूं गेला नानापरी ॥ भूमीसहित हालतसे ॥८६॥ कांपे धरणी तये वेळीं ॥ रावण उचली महाबळी ॥ नये लिंग शिर आफळी॥ महाबळी राहिला॥८७॥नाम पावला याचि कारणें ॥ महाबळेश्वर लिंग जाणें ॥ मुरडोनि ओढितां रावणें ॥गोकर्णाकार जाहलें॥८८॥ऐसें करितां लंकानाथ ॥ मागुती गेला तपार्थ ॥ख्याति झाली गोकर्णक्षेत्र॥समस्त देव तेथें आले॥८९॥ आणीक असे अपार महिमा॥सांगतसे अनुपमा ॥स्कंदपुराणीं वर्णिली सीमा ॥प्रख्यात असे परियेसा ॥१९०॥ ऐकोनि सिद्धाचें वचन॥नामधारक संतोषोन ॥ पुनरपि चरणा लागे जाण ॥ ह्मणे सरस्वती गंगाधरू॥९१॥इतिश्रीगुरुचरित्रेगोकर्णमहिमावर्णनं नाम षष्ठोऽध्यायः ॥ओंव्यासंख्या१९१॥

॥ श्रीगणेशाय नमः ॥ नामधारक ह्मणे सिद्धासी ॥ गोकर्णमहिमा आह्मासी ॥ निरोपिजे स्वामी कृपेसी ॥ पूर्वी कवणा साक्ष झाली ॥ १ ॥ समस्त तीर्थें सांडूनी ॥ श्रीपाद गेले किं कारणीं ॥ पूर्वी आदर केला कवणीं ॥ पुराण कथा सांगा मज ॥ २ ॥ ज्यावरी असेल गुरूची प्रीती ॥ तीर्थमहिमा ऐकणें चित्तीं ॥ वांछा होतसे ज्ञानज्योती ॥ कृपासिंधू गुरुराया ॥ ३ ॥ सिद्ध ह्मणे नामधारकासी ॥ गोकर्णमहिमा मज पुससी ॥ सांगेन तुज विस्तारेंसी ॥ एकचित्तें परियेसी ॥ ४ ॥ पूर्वयुगीं इक्ष्वाकुवंशीं ॥ मित्रसह राजा परियेसी ॥ प्रतापवंत क्षत्रियवंशी ॥ सर्वधर्मरत देखा ॥५॥ राजा सकळ शास्त्रज्ञ ॥ विवेकी असे श्रुतिनिपुण ॥ बलाढ्य शूर महाभिज्ञ ॥ नित्योद्योगी दयानिधी ॥ ६ ॥ असतां राजा एके दिवशीं ॥ विनोदें निघाला पारधीसी ॥ प्रवेशला महावनासी ॥ वसती शार्दूल सिंह जेथें ॥ ७ ॥ निर्मनुष्य अरण्यांत ॥ राजा पारधी खेळत ॥ भेटला तेथें अद्भुत दैत्य ॥ ज्वाळाकार भयानक ॥ ८ ॥ राजा देखोनि तयासी ॥ वर्षे शरजाळ कोपेसी ॥ मूर्छना येऊनि धरणीसीं ॥ पडला दैत्य तया वेळीं ॥ ९ ॥ होता तयाचा बंधु जवळी ॥ आक्रंदतसे प्रबळी ॥ पाषाण हाणी कपाळीं ॥ बंधुशोकें करोनिया ॥ १० ॥ प्राण त्यजितां निशाचर॥बंधूसी ह्मणतसे येर ॥ ज्या तूं होसी माझा सहोदर ॥ सूड घेईं माझा तूं ॥ ११ ॥ ऐसें बोलोनि बंधूसी ॥ दैत्य पावला पंचत्वासी ॥ अनेक माया त्यापाशीं ॥ नररूप धरिलें तया वेळीं ॥ १२ ॥ रूप धरोनि मानवाचें ॥ सौम्यवाणी बोले साचें ॥ सेवकत्व करी राजयाचें ॥ अतिनम्रत्वें बोलोनियां ॥१३॥ सेवा करी नानापरी ॥ तया राजाची अतिकुसरीं ॥ कितीएक दिवसावरी ॥ वनांतरीं राजा होता देखा ॥ १४ ॥ समस्त मृग जिंकोनी ॥ दुष्ट जीवांतें वधोनी ॥

राजा आला परतोनी ॥ आपुल्या नगरा परियेसी ॥ १५ ॥ ऐसें असतां एके दिवशीं ॥ पितृश्राद्ध आलें परियेसी ॥ आमंत्रण सांगे ऋषींसी ॥ वसिष्ठादिकां परियेसा ॥१६॥ ते दिवसीं राजा स्वयंपाक ॥ करवीतसे अति विवेक ॥ कापट्यें होता तो सेवक ॥ तया स्थाना ठेवला ॥ १७ ॥ राजा ह्मणे तयासी ॥ पाकस्थानीं तूं वससी ॥ जें जें मागेल भाणवसी ॥ सर्व आणूनि त्वां द्यावें ॥१८॥ अंगिकारोनी तो सेवक ॥ नरमांस आणोनि देख ॥ कापट्यभावें करवी पाक ॥ केली शाख तया वेळीं ॥ १९ ॥ ठाय घालितां ऋषेश्वरासी ॥ पहिलेंच वाढिलें नरमांसासी ॥ पहातां कोप आला वसिष्ठासी ॥ दिधला शाप तया वेळीं ॥२०॥ वसिष्ठ म्हणे रायासी ॥ नरमांस वाढिलें आह्मासी ॥ त्वरित ब्रह्मराक्षस होसी ॥ ह्मणोनि शाप दीधला ॥२१॥ शाप देतां तये काळीं ॥ राजा कोपला तात्काळीं ॥अपराध नसतां प्रबळी ॥ वायां मज कां शापिलें ॥ २२ ॥ नेणें मांसपाक कोणीं केला ॥ माझा निरोप नाहीं झाला ॥ वृथा आमुतें शाप दिधला ॥ आपण शापीन ह्मणतसे ॥२३॥ उदक घेऊनि अंजुळीं ॥ शापावया सिद्ध झाला तये काळीं ॥ तंव राजपत्नी येऊनि जवळी ॥ वर्जी आपुले पतीतें ॥२४॥ पतीसी म्हणे ते नारी ॥ गुरूसी शापितां दोष भारी ॥ वंदुनि तयाचे चरण धरी ॥ तेणें भवसागर तरशील ॥ २५ ॥ मदयंती सतीचें वचन ॥ मानिता झाला राजा आपण ॥ अंजुळीं होतें उदक जाण ॥ पडिलें तयाचे चरणावरी ॥ २६ ॥ शाप देतां कल्मष पाणी ॥ पडलें राजयाचे चरणीं ॥ कल्मषपाद नाम ह्मणोनी ॥ ब्रह्मराक्षस झाला तो राव ॥ २७ ॥ राजपत्नी येवोनि परियेसी ॥ लागली वसिष्ठचरणासी ॥ उद्धरी स्वामी बाळकासी ॥ येवढा कोप काय काज ॥ २८ ॥ करुणा वचन ऐकोनी ॥

शांत झाला वसिष्ठमुनी ॥ वर्षें बारा क्रमुनीं ॥ पुनरपी राजा होसील ॥ २९ ॥ उःशाप देऊनि वसिष्ठऋषी ॥ गेला आपुले स्थानासी ॥ ब्रह्मराक्षस राजा परियेसी ॥ होऊनि गेला वनांतरा॥३०॥निर्मनुष्य अरण्यांत ॥ राजा राहिला प्रख्यात ॥ भक्षितसे अनेक जंत ॥ पशु मनुष्य आदिकरुनी ॥ ३१ ॥ ऐसें क्रमितां तये वनीं ॥ मार्गस्थ दंपत्यें दोनी ॥ ब्राह्मण जातां मार्ग क्रमुनीं ॥ देखिला राक्षस भयासुर ॥ ३२ ॥ येऊनि धरी ब्राह्मणासी ॥ व्याघ्र जैसा पशूसी ॥ घेऊनि गेला भक्षावयासी ॥ विप्रस्त्री समागमें ॥ ३३ ॥ अति शोक करी ब्राह्मणी ॥ जाऊनि लागे राक्षसचरणीं ॥ राखे मजला अहेवपणीं ॥ प्राणेश्वरातें सोडीं पितया ॥३४॥ न भक्षी गा माझा पती ॥ माझी तयावरी अति प्रीती ॥ मज भक्षी गा म्हणे सुमती ॥ वल्लभातें सोडूनियां ॥३५॥ पतीविण राहतां नारी ॥ जन्म वृथाचि दगडापरी ॥ पहिलें मातें स्वीकारी ॥ प्राण राखें पतीचे ॥ ३६ ॥ पति लावण्य पूर्व वयेसी ॥ वेदशास्त्रपारंगेंसी ॥ याचा प्राण जरी तूं रक्षिसी ॥ जगत्त्रय रक्षिलें तुज पुण्य ॥३७॥ कृपा करी गा आह्मांवरी ॥ होईन तुझी कन्याकुमारी ॥ मज पुत्र होतील जरी ॥ नाम वाढवीन तुझें मी ॥३८॥ ऐसें नानापरी देखा ॥ विप्रस्त्री करी महादुःखा ॥ बोल न मानोनि राक्षसें ऐका ॥ त्या ब्राह्मणातें भक्षिलें ॥ ३९ ॥ पतीतें भक्षिलें देखोनी ॥ शाप वदली ते ब्राह्मणी ॥ ह्मणे राक्षसा ऐक कानीं ॥ शाप माझा निर्धारें ॥ ४० ॥ तूं राजा सूर्यवंशी ॥ शापास्तव राक्षस झालासी ॥ पुढें मागुती राजा होसी ॥ द्वादश वर्षें क्रमोनी ॥ ४१ ॥ परी रमतां स्त्रियेसवें ॥ प्राण जाईल स्वभावें ॥ अनाथा भक्षिलें दुष्टभावें ॥ दुरात्म्या तूं राक्षसा ॥ ४२ ॥ शाप देऊनी तया वेळीं ॥ पतीच्या अस्थी मिळवूनि सकळी ॥ काष्ठें घालूनियां

प्रबळीं ॥ अग्निप्रवेश केला तिणें ॥४३॥ ऐसें असतां राव देखा ॥ क्रमी बारा वर्षे निका ॥ पुनरपि राजा होऊनि ऐका ॥ आला आपुले नगरासी ॥ ४४ ॥ विप्रस्त्रियेचें शापवचन ॥ स्त्रियेसी सांगितली खूण ॥ ह्मणे संग करितां तत्क्षण ॥ मृत्यु असे आपणासी ॥ ४५ ॥ ऐकोनि पतीचें वचन ॥ मदयंती दुःख करी आपण ॥ मन करूनि निर्वाण ॥ त्यजावया प्राण पहातसे ॥ ४६ ॥ मदयंती ह्मणे रायासी ॥ संतान नाहीं तुमचे वंशासी ॥ वनीं कष्टलां बारा वर्षीं ॥ आपुलें कर्म न चुकेची ॥ ४७ ॥ ऐकोनी सतीचें वचन ॥ शोकें दाटला अतिगहन ॥ अश्रु आले नेत्रांतून ॥ काय करूं ह्मणतसे ॥ ४८ ॥ मंत्री वृद्ध पुरोहितासी ॥ बोलाविलें परियेसीं ॥ ब्रह्महत्या घडली आह्मासी ॥ विमोचन होय कवणेपरी ॥ ४९ ॥ मंत्री वृद्ध पुरोहित ॥ तयासी ह्मणती ऐका मात ॥ तीर्थें आचरावीं समस्त ॥ तेणें पुनीत व्हाल तुह्मी ॥ ५० ॥ करोनि ऐसा विचार ॥ राजा निघे तीर्था साचार ॥ सर्व तीर्थें परिकर ॥ विधिपूर्वक करीतसे ॥ ५१ ॥ ज्या ज्या तीर्था जाय आपण ॥ अनेक पुण्य करी जाण ॥ यज्ञादिक कर्मान्नदान ॥ ब्राह्मणादिकां देतसे ॥ ५२ ॥ ऐसीं नानातीर्थें करित ॥ परी ब्रह्महत्या सवेंचि येत ॥ अघोररूपी असे दिसत ॥ कवणेपरी न जायची ॥५३॥ कष्टोनी राजा बहुतांपरी ॥ निर्वाण होउनी मनाभीतरीं ॥ हिंडत पावला मिथिलापुरीं ॥ चिंताग्रस्त होऊनियां ॥ ५४ ॥ नगरा बाह्यप्रदेशीं ॥ श्रमोनि राजा परियेसी ॥ चिंता करी मानसीं ॥ वृक्षछाये बैसलासे ॥ ५५ ॥ ऋषेश्वरासमवेत ॥ जैसा रुद्र प्रकाशित ॥ गौतमऋषी अवचित ॥ तया स्थानासी पातला ॥ ५६ ॥ राजा देखोनि गौतमासी ॥ चरणीं लोळे संतोषीं ॥ नमन करी साष्टांगेंसी ॥ भक्तिभावें करोनियां ॥ ५७ ॥ आश्वासूनि तये

वेळीं ॥ गौतम पुसे करुणा बाहळी ॥ क्षेमसमाधान सकळी ॥ पुसता जाहला वृत्तांत ॥ ५८ ॥ काय झालें तुझें राज्य ॥ अरण्यवास काय काज ॥ चिंताकुलित मुखांबुज ॥ कवण कार्य घडलें असे ॥ ५९ ॥ ऐकोनि ऋषीचें वचन ॥ राजा सांगे विस्तारोन ॥ शाप जाहला ब्रह्मवचन ॥ ब्रह्महत्या घडली मज ॥ ६० ॥ प्रायश्चित्तें सकळिक ॥ यज्ञादि कर्में धर्मादिक ॥ सुक्षेत्रें अपार तीर्थें देख ॥ आपण सकळ आचरलीं ॥ ६१ ॥ शमन न होय महादोष ॥ सवेंचि येत अघोरवेष ॥ व्रतें आचरलों कोटिश ॥ न जाय दोष सर्वथा ॥ ६२ ॥ आजिचेंनि माझें सफल जनन ॥ दर्शन झालें जी तुमचे चरण ॥ होतील माझे कष्ट निवारण ॥ म्हणोनि चरणा लागला ॥ ६३ ॥ ऐकोनि रायाचें वचन ॥ करुणासागर गौतम आपण ॥ म्हणे भय सांडीं गा निर्वाण वचन ॥ तारील शंकर मृत्युंजय ॥ ६४ ॥ तुझें पापनिवारणासी ॥ सांगेन तीर्थविशेषीं ॥ महापातक संहारावयासी ॥ गोकर्णक्षेत्र असे भलें ॥ ६५ ॥ स्मरण करितां गोकर्णासी ॥ ब्रह्महत्यादि पाप नाशी ॥ तेथें ईश्वर सदा वासी ॥ मृत्युंजय सदाशिव ॥ ६६ ॥ जैसें कैलासाचें शिखर ॥ अथवा स्वर्धुनी मंदिर ॥ निश्चय वास कर्पुरगौर ॥ गोकर्णक्षेत्रीं परियेसा ॥ ६७ ॥ जैसी अंधकार रजनी ॥ प्रकाशावया जेविं अग्नी ॥ चंद्रोदय जरी होय निर्वाणीं ॥ तरी सूर्यप्रकाशावीण गति नव्हे ॥ ६८ ॥ तैसे समस्त तीर्थानें ॥ पाप नच जाय याचि कारणें ॥ सूर्योदयीं तम हरणें ॥ तैसें गोकर्णदर्शन होय ॥ ६९ ॥ सहस्र ब्रह्महत्या जरी ॥ घडल्या असती या शरीरीं ॥ प्रवेश होतां गोकर्णक्षेत्रीं ॥ शुद्धात्मा होय परियेसा ॥ ७० ॥ रुद्रोपेंद्र विरिंची देखा ॥ जाऊनि तया स्थानीं ऐका ॥ तप केलें हो सकळिका ॥ कार्यसिद्धि होय त्यांप्रती ॥ ७१ ॥ भक्तिपूर्वक तया स्थानीं ॥

जप व्रत करिती जाणोनी ॥ फळ होय त्यां लक्षगुणीं ॥ असे पुण्यक्षेत्र ऐसें ॥ ७२ ॥
जेथें ब्रह्मा विष्णु देखा ॥ इंद्रादि देवां सकळिकां ॥ साध्य झालें तप ऐका ॥ याचेगळें
काय सांगूं ॥ ७३ ॥ जाणा तो साक्षात् ईश्वर ॥ गोकर्णक्षेत्र कैलासपुर ॥ प्रतिष्ठा करी
विघ्नेश्वर ॥ विष्णु निरोपें विनयार्थ ॥ ७४ ॥ समस्त देव तेथें येती ॥ पुण्यक्षेत्रीं वास करि-
ती ॥ ब्रह्मा विष्णु इंद्रासहिती ॥ विश्वे देव मरुद्गण ॥ ७५ ॥ चंद्र सूर्य वस्वादिक ॥ पूर्व-
द्वारीं राहिले ऐक ॥ प्रीति करी भक्तिपूर्वक ॥ बैसले असती तये स्थानीं ॥ ७६ ॥ अग्नि
यम चित्रगुप्त ॥ एकादश रुद्र पितृदैवत ॥ दक्षिणद्वारीं वास करित ॥ संतोषें राहिले अस-
ती ॥७७॥ वरुणासहित गंगासकळी ॥ राहती पश्चिमद्वारस्थळीं ॥ प्रीती करी चंद्रमौळी ॥
तयां सकळां परियेसा ॥ ७८ ॥ कुबेर वायु भद्रकाळी ॥ मातृदेवता चंडी सकळी ॥ उत्त-
रवास त्रिकाळीं ॥ पूजा करिती महाबळेश्वराची ॥७९॥ चित्ररथादि विश्वावसु परियेसीं ॥
चित्रसेन गंधर्व सुरसी ॥ पूजा करिती सदाशिवासी ॥ सदा वसोनि तया ठायीं ॥ ८० ॥
घृताची रंभा मेनका ॥ तिलोत्तमा उर्वशी ऐका ॥ नित्य नृत्य करिती देखा ॥ महाबळे-
श्वराचे सन्मुख ॥ ८१ ॥ वसिष्ठ कश्यप कण्वऋषी ॥ विश्वामित्र महातापसी ॥ भारद्वाज
जैमिनी जाबालऋषी ॥ पूजा करिती सदा तेथें ॥ ८२ ॥ कृतयुगीं ब्रह्मऋषी ॥ आचार
करिती महातापसी ॥ महाबळेश्वराचे भक्तीसी ॥ राहिले गोकर्ण क्षेत्रांत ॥ ८३ ॥ मरीची
नारद अत्रिऋषी ॥ दक्षादि ब्रह्मऋषी परियेसी ॥ सनकादि महातापसी ॥ उपनिषदार्थ
उपासिती ॥ ८४ ॥ अनेक सिद्ध साध्य जाण ॥ मुनीश्वर अजिनधारण ॥ दंडधारी
संन्यासी निर्गुण ॥ ब्रह्मचारी तेथें वसती ॥ ८५ ॥ त्वगस्थिमात्र शरीरेंसी ॥ अनुष्ठिती

महातापसी ॥ पूजा करिती भक्तीसी ॥ चंद्रमौळीची परियेसा ॥ ८६ ॥ गंधर्वादि समस्त देव ॥ पितर सिद्ध अष्टवसव ॥ विद्याधर किंपुरुष सर्व ॥ सेवेसि जाती निरंतर ॥ ८७ ॥ गुह्यक किन्नर स्वर्ग लोक ॥ शेषादि नाग तक्षक ॥ पिशाच वेताळ सकळिक ॥ जाती पूजेसी तया स्थानीं ॥ ८८ ॥ नानाशृंगार करूनी ॥ अनेक भूषणें विराजमानी ॥ सूर्य शशी विमानीं ॥ वहनीं येती वळंघोनियां ॥ ८९ ॥ स्तोत्रें गायन करिती देखा ॥ नमिती नृत्य करिती अनेका ॥ पूजेकारणें येती सकळिका ॥ महाबळेश्वर लिंगासी ॥ ९० ॥ जे जे इच्छिती मनकामना ॥ पावती त्वरित निर्धारें जाणा ॥ समान नाहीं क्षेत्र गोकर्णा ॥ या ब्रह्मांड गोलकांत ॥ ९१ ॥ अगस्त्यादि सनत्कुमार ॥ प्रियव्रतादि राजकुमर ॥ अग्नि देव दानवादि येर ॥ वर लाधले तया ठायीं ॥ ९२ ॥ शिशुमारी भद्रकाळी ॥ पूजा करिती त्रि-काळीं ॥ नागातें गरुड न गिळी ॥ महाबळेश्वर दर्शनें ॥ ९३ ॥ रावणादि राक्षस कुळीं ॥ कुंभकर्ण येर सकळी ॥ वर लाधले ये स्थळीं ॥ बिभीषण पूजितसे ॥ ९४ ॥ ऐसें समस्त देवकुळ ॥ सिद्ध दानवादि सकळ ॥ गोकर्णक्षेत्रा जाऊनि प्रबळ ॥ आराधिति नानापरी ॥ ९५ ॥ लिंग स्थापिती आपुलें नामीं ॥ असे ख्याती तया नामीं ॥ वर लाधले अनेक कामीं ॥ चतुर्विध पुरुषार्थ ॥ ९६ ॥ ब्रह्मा विष्णु आपण देखा ॥ कार्तवीर्य विनायका ॥ आपुले नामीं लिंग देखा ॥ प्रतिष्ठा केली तये ठायीं ॥ ९७ ॥ धर्मक्षेत्रपाळादी ॥ दुर्गादेवी-शक्ति वृंदी ॥ लिंग स्थापिलें आपुले नामीं ॥ तया गोकर्ण क्षेत्रांत ॥ ९८ ॥ गोकर्ण क्षेत्र असे गहन ॥ लिंगतीर्थें असंख्य जाण ॥ पदोपदीं असें निर्गुण ॥ ऐसें क्षेत्र अनुपम्य असे ॥ ९९ ॥ सांगों किती विस्तारोन ॥ असंख्यात तीर्थें जाण ॥ पाषाण समस्त लिंग खुण ॥ समस्त उ-

दर्कें जाणावीं तीर्थें ॥१००॥ कृतयुगीं महाबळेश्वरश्वेत ॥ त्रेतायुगीं लोहित ॥ द्वापारीं सुवर्णपीत॥कलियुगीं कृष्णवर्ण जाहला ॥१॥ सप्त पाताळ खोलावोन॥ उभें असे लिंग आपण॥ कलियुगीं मृदु होऊन ॥ दिसे सूक्ष्म रूपानें ॥ २ ॥ पश्चिम समुद्रतीरासी ॥ गोकर्ण क्षेत्र विशेषी ॥ ब्रह्महत्यादि पातकें नाशी॥ काय आश्चर्य परियेसा ॥३॥ ब्रह्महत्यादि महापापें ॥ परदारादि षट्पापें ॥ दुःशील दुराचारी पापें ॥ जातीं गोकर्णदर्शनें ॥४॥ दर्शनमात्रें पुनीत होती ॥ समस्त काम्यार्थ साधती ॥ अंतीं होय तयांसी गती ॥ गोकर्ण लिंगदर्शनें ॥ ५ ॥ तये स्थानीं पुण्य दिवशीं ॥ जे जे अर्चिति भक्तीसी ॥ तेचि जाणा रुद्रअंशी ॥ रायासि ह्मणे गौतम ॥ ६ ॥ एखादे समयीं गोकर्णासीं ॥ जाय भक्तीनें मानुषी ॥ पूजा करितां सदाशिवासी ॥ शिवपद निश्चयें पावे जाणा ॥ ७ ॥ आदित्य सोम बुधवारीं ॥ अमावास्यादि पर्वाभीतरीं ॥ स्नान करूनि समुद्रतीरीं ॥ दान धर्म करावा ॥ ८ ॥ शिवपूजा व्रत हवन ॥ जप ब्राह्मणसंतर्पण ॥ किंचित् करितां अनंत पुण्य ॥ गौतम ह्मणे रायासी ॥ ९ ॥ व्यतीपातादि पर्वणीसी ॥ सूर्य संक्रांतिचे दिवशीं ॥ महाप्रदोष त्रयोदशी ॥ पूजितां पुण्य अगण्य ॥ १० ॥ काय सांगों त्यांचा महिमा ॥ निवाडा होय अखिल कर्मा ॥ ईश्वर भोळा अनंत महिमा ॥ पूजनमात्रें तुष्टतसे ॥ ११ ॥ असितपक्ष माघमासीं ॥ शिवरात्रीं चतुर्दशीसी ॥ बिल्वपत्र वाहिलें यासी ॥ दुर्लभ असे त्रिभुवनांत ॥१२॥ ऐसें अनुपम्य स्थान असतां ॥ न जाती मूर्ख लोक ऐकतां ॥ शिवतीर्थ असे दुर्लभतां ॥ नेणती मूढ बधिर जाणा ॥१३॥ उपोषणादि जागरण ॥ लिंग सन्निध गोकर्ण ॥ स्वर्गासी जावया सोपान ॥ पद्धती असे परियेसा ॥१४॥ ऐसें या गोकर्ण स्थानासी ॥ जे जाती जन यात्रेसी ॥ च-

तुर्विध पुरुषार्थासी ॥ लाधती लोक अवधारा ॥ १५ ॥ स्नान करूनी समस्त तीर्थीं ॥ महाबळेश्वर लिंगार्थी ॥ पूजा करिती भावार्थी ॥ पातका व्यतिरिक्त होय जाणा ॥ १६ ॥ ऐशापरि गोकर्णमहिमा ॥ प्रकाश केला ऋषि गौतमा ॥ राजा ऐकोनि अति प्रेमा ॥ पुसता झाला ते वेळीं ॥ १७ ॥ राजा म्हणे गौतमासी ॥ गोकर्णस्थान निरोपिलेंसी ॥ पूर्वी पावला कोण यापासीं ॥ साक्ष जाहली असेल ॥ १८ ॥ विस्तारोनी तें आह्मासी ॥ सांगावें स्वामी करुणेसी ॥ ह्मणोनि लागला चरणासी ॥ अति भक्तीकरोनिया ॥ १९ ॥ ह्मणे गौतम तये वेळीं ॥ गोकर्ण क्षेत्र महाबळी ॥ जाणों आह्मीं बहुकाळीं ॥ अपार साक्षी देखिली असे ॥ २० ॥ गेलों होतों आम्ही यात्रे ॥ देखिला दृष्टांत विचित्र ॥ आले होते जन समस्त ॥ यात्रारूपें करोनिया ॥ २१ ॥ माध्यान्हकाळीं आह्मी तेथें ॥ बैसलों होतों वृक्षछायेतें ॥ दुरोनि देखिलें चांडाळीतें ॥ वृद्ध अंध महारोगी ॥ २२ ॥ शुष्कमुखी निराहारी ॥ कुष्ट सर्वांग शरीरीं ॥ कृमी पडले अघोरी ॥ पूय शोणित दुर्गंधी ॥ २३ ॥ कुक्षिरोगी गंडमाला ॥ कफें दाटला असे गळा ॥ दंतहीन अति विव्हळा ॥ वस्त्र नाहीं परिधाना ॥ २४ ॥ चंद्र सूर्य किरण पडतां ॥ प्राण जाय कंठगता ॥ शौचव्याधी असे बहुता ॥ सर्वांगशूळ महादुःखी ॥ २५ ॥ विधवा आपण केशवपनीं ॥ दिसतसे जैसी मुखरणी ॥ क्षणक्षणा पडे धरणी ॥ प्राणत्याग करूं पाहे ॥ २६ ॥ ऐशी अवस्था चांडाळीसी ॥ आली वृक्षछायेसी ॥ देह टाकिला धरणीसी ॥ त्यजूं पाहे प्राण आपुला ॥२७॥ प्राण त्यजितां तये वेळीं ॥ विमान उतरे तत्काळीं ॥ शिवदूत अतिबळी ॥ त्रिशूळ खट्वांग धरूनियां ॥ २८ ॥ टंकायुध चंद्रभाळीं ॥ दिव्यकांती चंद्रासारखी केवळी ॥

किरीट कुंडलें मिरवलीं ॥ चतुर्वर्ग येणेंपरी ॥ २९ ॥ विमानीं सूर्यासारखें तेज ॥ अति-
विचित्र दिसे विराज ॥ आलें चांडाळीये काज ॥ अपूर्व वर्तलें तये वेळीं ॥ ३० ॥
आह्मीं पुशिलें शिवदूतांसी ॥ आलेति कवण्या कार्यासी ॥ दूत ह्मणती आम्हांसी ॥
न्यावया आलों चांडाळीतें ॥ ३१ ॥ ऐकोनि दूतांचें वचन ॥ विस्मित झालें आमुचें
मन ॥ पुनरपि केला त्यांसी प्रश्न ॥ ऐक राया तूं एकचित्तें ॥ ३२ ॥ ऐशिया चांडाळी
पापिणीसी ॥ कैसी योग्य विमानेसी ॥ नेऊनियां स्थानासी ॥ सिंहासना कैसें योग्य
॥ ३३ ॥ इचे जन्मदारभ्य इसी ॥ पापें पापसंग्रहासी ॥ ऐसी पापीण दुर्वृत्त इशी ॥
केवीं न्याल कैलासा ॥ ३४ ॥ नाहीं इशी शिवज्ञान ॥ न करीच हे तपसाधन ॥ दया
सत्य कदा नेणें ॥ इशीं कैसें न्याल तुह्मीं ॥ ३५ ॥ पशुमांस आहार इशीं ॥ सदा करी
जीवहिंसी ॥ ऐशिया दुष्ट पापिणीसी ॥ केवीं नेतां स्वर्गभुवना ॥ ३६ ॥ अथवा कधीं
शिवपूजन ॥ न करी पंचाक्षरी जपन ॥ नाहीं केलें शिवस्मरण ॥ इसी कैसें न्याल तुह्मी
॥ ३७ ॥ शिवरात्री उपोषण ॥ नाहीं केलें पुण्यदान ॥ यज्ञयागादिक साधन ॥ नाहीं केलें
इणें कधीं ॥ ३८ ॥ न करी स्नान पर्वकाळीं ॥ नेणें तीर्थ कवणे वेळीं ॥ अथवा व्रतादि
सकळी ॥ केलें नाहीं इणें कधीं ॥ ३९ ॥ सर्वांगीं पूय शोणित ॥ दुर्गंधी असे बहुत ॥
ऐसी चांडाळी दुर्वृत्त ॥ कैसी विमानीं बैसवाल ॥४० ॥ अर्जन जन्मांतरींचें ह्मणा ॥ कुष्ट
सर्वांग तेंचि खुणा ॥ कृमि निघती मुखांतून ॥ पूर्वार्जित काय केलें ॥४१॥ ऐसी पापिणी
दुराचारी ॥ केंवी नेतां कैलासपुरी ॥ योग्य नव्हे चराचरीं ॥ तुह्मीं केवीं न्याल इसी
॥ ४२ ॥ गौतम ह्मणे रायासी ॥ ऐसें पुसिलें दूतांसी ॥ त्यांनीं सांगितला आह्मासी ॥

आद्यंत तिये चांडाळीचा ॥ ४३ ॥ ह्मणे गौतम ऋषेश्वर ॥ चांडाळीचें पूर्वापार ॥ सांगेन तुह्मां सविस्तर ॥ असे आश्चर्य परियेसा ॥ ४४ ॥ पूर्वी इचें जन्मस्थान ॥ ब्राह्मण-कन्या असे जाण ॥ सौदामिनी नाम असे पूर्ण ॥ सोमबिंबासारिखें मुख ॥ ४५ ॥ अति-सुंदर रूप इसी ॥ उपवर जाहली पितृगृहासी ॥ न मिळे वर तियेसी ॥ चिंता करिती मातापिता ॥ ४६ ॥ न मिळे वर सुंदर तिसी ॥ उपवर जाहली दहा वरुषी ॥ मिळवूनि एक द्विजासी ॥ गृह्योक्तेसीं लग्न केलें ॥ ४७॥ विवाह झालियावरी ॥ होती तया पतीचे घरीं ॥ क्वचित्काळ येणेंपरी ॥ होती नारी परियेसा ॥ ४८ ॥ वर्ततां असें पुढें देख ॥ तिचे पतीस झालें दुःख ॥ पंचत्व पावला तात्काळिक ॥ विधिलेखें करूनियां ॥ ४९ ॥ ऐको-नि तिचे मातापिता ॥ कन्या आपुले घरा आणिता ॥ पतीचे दुःखें दुःखिता ॥ खेद करी ते नानापरी ॥ ५० ॥ अति सुंदर पूर्ववयासी ॥ मदें व्याप्त प्रतिदिवशीं ॥ चंचळ होय मान-सीं ॥ परपुरुषातें देखोनियां ॥ ५१ ॥ गुप्तरूपें क्वचित्काळीं ॥ जारकर्म करी ते बाळी ॥ प्रगट जाहलें तात्काळीं ॥ गौप्य नोहे पातक ॥ ५२ ॥ आपण विधवा असे नारी ॥ पूर्वव-यासी अतिसुंदरी ॥ विषयीं प्रीति असे भारी ॥ स्थिर नोहे तिचें मन ॥ ५३ ॥ ऐसें तिचि-या पातकासी ॥ विदित जाहलें सर्वांसी ॥ वाळीत केलें तयासी ॥ माता पिता बंधुवर्ग ॥ ५४ ॥ माता पिता बंधुजन ॥ तीतें त्यजिती निर्भर्त्सोन ॥ आपण प्रायश्चित्त घेऊन ॥ शुद्ध झाले परियेसा ॥ ५५ ॥ शंका होती पहिली तिसी ॥ निःशंक जाहली व्यभिचारासी ॥ प्रग-टरूप अहर्निशीं ॥ रमों लागली नगरांत ॥ ५६ ॥ तिये नगरीं एक वाणी ॥ रूपें होता अ-तिलावण्यगुणी ॥ त्यासी तिणें पूर्ववयास देखोनी ॥ झाली त्याची कुलस्त्री ॥ ५७ तया

शूद्राचिया घरीं ॥ वर्तत असे ते नारी ॥ ऐशी पापिणी दुराचारी ॥ कुळवैरीण वेचा-
ळीस ॥ ५८ ॥ श्लोक ॥ स्त्रियः कामेन नश्यंति ॥ ब्राह्मणो हीनसेवया ॥ राजानो ब्रह्म-
दंडेन ॥ यतयो भोगसंग्रहात् ॥ ५९ ॥ टीका ॥ स्त्रिया नासती कामत्वें ॥ ब्राह्मण नासे
हीनसेवें ॥ राज्य जाय द्विजक्षोभें ॥ यति विषयसेवनें ॥६०॥ शूद्रासवें अहर्निशीं ॥ रमत
होती अति हर्षी ॥ पुत्र जाहला तियेसी ॥ शूद्रगृहीं असतां ॥ ६१॥ नित्य मांसाहार ति-
सी ॥ मद्यपान उन्मत्तेंसी ॥ होऊनि तया शूद्रमहिषी ॥ होती पापिणी दुराचारी ॥६२॥ ऐसें
वर्ततां एके दिवसीं ॥ उन्मत्त होऊनि परियेसी ॥ छेदिलें वासरूं आहारासी ॥ मेष ह्मणोनि
पापिणीनें ॥६३॥ छेदूनि वत्स परियेसी ॥ पाक केला विनयेसी ॥ शीर ठेविलें शिंकियासी॥
दुसरे दिवशीं भक्षावया ॥ ६४ ॥ आपण भ्रमित मद्यपानीं ॥ जागृत झाली अस्तमानीं ॥ वा-
सरूं पाहे जावोनी ॥ धेनू दोहावयालागी ॥ ६५ वत्सस्थानीं असे मेष ॥ भ्रमित झाली अ-
तिक्लेश ॥ घरीं पाहतसे शिरास ॥ स्पष्ट दिसे वासराचें ॥ ६६॥ अनुतप्त होवोनी तयेवेळीं ॥
शिव शिव ह्मणे चंद्रमौळी ॥ अज्ञानें ऐशीं पापें घडलीं ॥ म्हणोनि चिंती दुरात्मिणि ॥ ६७॥
तया वत्सशिरासी ॥ निक्षेप केला भूमीसी ॥ पति कोपेल ह्मणोनि परियेसी ॥ अस्थिचर्म
निक्षेपिलें ॥ ६८॥ जाऊनि सांगे शेजार लोकां ॥ व्याघ्रें वत्स नेलें ऐका॥ भक्षिलें म्हणोनि रडे दे-
खा ॥ पतीपुढें येणेंपरी ॥६९॥ ऐसी कितीएक दिवसांवरी ॥ नांदत होती शूद्राघरीं ॥ पंचत्व पा-
वली ते नारी ॥ नेली दूतीं यमपुरा ॥७०॥ घातली तियेसी नरकांत ॥भोग भोगी अति दुःखित॥
पुनरपि जन्मा चांडाळी जात॥उपजली नारी परियेसा ॥७१॥उपजतांचि जाहली आंधळी ॥
विद्रूप वर्ण जैसी काजळी ॥ मातापिता कवणे काळीं ॥ प्रतिपाळिती मायामोहें॥ ७२ ॥

उच्छिष्ट अन्न घालिती तोंडा ॥

उच्छिष्ट अन्न घालिती तोंडा ॥ स्वजन तियेचे अखंडा ॥ बाळपणीं तियेसीं विघडा॥ पोशिताती येणेंपरी ॥ ७३ ॥ ऐसें असतां वर्तमानीं ॥ सर्वांग झालें कुष्टवर्णी ॥ पंचत्व पावलीं पिता जननी ॥ दरिद्री झाली निराश्रय ॥७४॥ सर्वांग कुष्टवर्णपीडित ॥ त्यजिती तियेसी स्वजन भ्रात ॥ भिक्षा मागोनी उदर भरित ॥ रक्षण करी शरीर आपुलें ॥७५॥ येणेंपरी चांडाळी ॥ वर्तत असे बहुकाळी ॥ क्षुधेनें पीडित सर्वकाळीं ॥ आपण अंध कुष्ट देही ॥७६॥ न मिळे तिसी वस्त्र अन्न ॥ दुःख करीत अति गहन ॥ ऐसें तिचें पूर्वकर्म ॥ झाली वृद्ध अतिकष्टें ॥७७॥ भिक्षा मागे जनासी ॥ मार्गीं पडोनि अहर्निशीं ॥ कधीं न भरे उदर तिसी ॥ दुःखें विलापे अपार ॥७८॥ व्याधि असे शरीरासी ॥ शोणित पूय परियेसी ॥ दुर्गंधी येतसे महादोषी ॥ सर्वांग कुष्टें गळतसे॥७९॥ ऐसें वर्ततां माघमासीं ॥ लोक निघाले यात्रेसीं ॥ महास्थान गोकर्णासी ॥ कलत्रपुत्र सहित देखा ॥८०॥ शिवरात्रीचे यात्रेसी ॥ येती लोक देशोदेसी ॥ चतुर्वर्ण आसपासीं ॥ हर्षें येती परियेसा ॥ ८१॥ देशोदेशींचे राजे देखा ॥ हस्ती रथादिसहित ऐका ॥ येती समस्त भूमंडलिका ॥ महाबळेश्वरदर्शनासी ॥८२॥ ब्राह्मण क्षत्री वैश्य शूद्र ॥ येती यात्रेसी विनोद ॥ समारंभ वाद्य नाद ॥ अमित लोक परियेसा ॥८३॥ किती हांसती गायन करिती ॥ धांवती नृत्य करीत येती ॥ शिवस्मरणें गर्जना करिती ॥ यात्रा प्रसंगीं जन देखा ॥ ८४ ॥ ऐसी महाजनासमवेत ॥ चांडाळी गेली तेथें त्वरित ॥ सवें भिक्षुक असे बहुत ॥ तयासवें जातसे ॥८५॥ येणेंपरी गोकर्णासी ॥ चांडाळी पातली सायासीं ॥ करावलंबें महाजनांसी ॥ भिक्षा मागे करुणावचनें ॥८६॥ लोक जाती मार्गांत ॥ शयन करी आक्रंदत ॥ कर ओढोनि मागत ॥ महाजन लोकांसी ॥ ८७ ॥

पूर्वींची पापी आपण ॥ पीडत असे याचि कारणें ॥ भिक्षा घाला क्षुधानिवारण ॥ ह्मणोनि मागे सकळिका ॥८८॥ नेणें कधींच वस्त्रप्रावरण ॥ धुळींत लोळे आपण ॥ क्षुधाक्रांत होतसे मरण ॥ धर्म करा सकळिक ॥८९॥ सर्वांगीं रोगग्रस्त ॥ वस्त्रावीण बाधे शीत ॥ अक्ष न हा क्षुधाक्रांत ॥ धर्म करा सकळिक ॥९०॥ पूर्वीं जन्म शतांतरीं ॥ नाहीं केलें पुण्य येरी ॥ याची कारणें पीडित भारी ॥ धर्म करा सकळिक ॥ ९१ ॥ येणेंपरि मार्गांत ॥ चांडाळी असे याचित ॥ ते दिवशीं असे शिवरात्रीव्रत ॥ कोणी न घाली भिक्षा तिसी ॥ ९२॥ येरी विव्हळे क्षुधाक्रांत ॥ जठराग्नि प्रदीप्त असे बहुत ॥ धर्म करा ऐसें ह्मणत ॥ पडली मार्गांत तेधवां ॥ ९३ ॥ पूजेसी जाती सकळ जन ॥ त्यांतें मागे आक्रंदोन ॥ एक ह्मणती हांसोन ॥ उपवास आजि अन्न कैचें ॥ ९४ ॥ हातीं होतीं बिल्वमंजरी ॥ घालितां तियेच्या करीं ॥ आघ्राणोनि पाहे येरी ॥ भक्षणवस्तु नव्हे ह्मणे ॥९५॥ कोपोनि टाकी ते अवसरीं ॥ जाऊनि पडली लिंगावरी ॥ रात्रीं असतां अंधारी ॥ अलभ्य पूजा घडली देखा ॥ ९६ ॥ कोणी न घालिती भिक्षा तिसी ॥ उपवास घडला ते दिवशीं ॥ पूजा पावली त्या शिवासी ॥ बिल्वमंजरी शिवमस्तकीं ॥ ९७ ॥ इतुकें पुण्य घडलें तिशीं ॥ प्रयत्न न करितां परियेसी ॥ तुष्टला ईश्वर हर्षीं ॥ भवार्णवा कडे केलें ॥ ९८ ॥ येणेंपरी चांडाळीसी ॥ उपवास घडला अनायासीं॥ तेथून उठली दुसरे दिवशीं ॥ भिक्षा मागावयाकारणें ॥९९॥ पहिलीच कुष्टरोगी असे ॥ अशक्त झाली उपवासें ॥ चक्षुहीन मार्ग न दिसे ॥ जात असे मंदमंद ॥ २०० ॥ सूर्यरश्मी करूनि तिसी ॥ दुःख होय असंसाहसी ॥ पूर्वार्जित कर्म ऐसीं ॥ ह्मणती दूत गौतमातें ॥१॥ ऐशीं चांडाळी कुष्टत ॥ आली वृक्षछाये समीपत ॥ त्यजूं पाहे प्राण त्वरित ॥ ह्मणोनि आ-

ली धांवोनि ॥२॥ पुण्य घडलें इशी आजी ॥ उपवास शिवतिथि काजीं॥ बिल्वपत्रें ईश्वर पुजीं॥ घडलें रात्रीं जागरण ॥ ३॥ तया पुण्यें करोनि इचें ॥ पाप गेलें शतजन्मींचें ॥ हें प्रीतिपात्र ईश्वराचें ॥ ह्मणोनि पाठविलें आम्हांसी ॥४॥ ऐसें म्हणति शिवदूत ॥ तियेवरी शिंपूनियां अमृत ॥ दिव्य देह पावूनि त्वरित ॥ गेली ऐका शिवलोका ॥ ५ ॥ ऐसें गोकर्ण असे स्थान ॥ गोतम सांगे विस्तारोन ॥ रायासी ह्मणे तूं निरोन ॥ त्वरित जाईं गोकर्णासी ॥६ ॥ जातांचि तुझीं पापें जाती ॥ इहसौख्य परत्र उत्तम गति ॥ संशय न धरी गा चित्तीं ॥ ह्मणोनि निरोपी रायासी ॥ ७ ॥ परिसोनि गौतमाचें वचन ॥ राजा मनीं दृढ संतोषोन ॥ त्वरित पावला क्षेत्र गोकर्ण ॥ पापावेगळा जाहला तो ॥ ८ ॥ ऐसें पुण्यपावन स्थान ॥ ह्मणोनि राहिले श्रीपाद आपण ॥ सिद्ध म्हणे ऐक कथन ॥ नामधारका एकचित्तें ॥ ९ ॥ ह्मणोनि सरस्वती गंगाधरू ॥ सांगे गुरुचरित्र विस्तारू ॥ श्रोते करुनि निर्धारू ॥ एकचित्तें परियेसा ॥ २१० ॥ इति श्रीगुरुचरित्रे सप्तमोऽध्यायः ॥ ओव्या २१० ॥



॥ श्रीगणेशाय नमः ॥ नामधारक ह्मणे सिद्धासी गोकर्णमहिमा निरोपिलासी ॥ श्री-
गुरू राहिले किती दिवशीं ॥ वर्तलें पुढें काय सांगा ॥ १ ॥ श्रीगुरुमूर्तिकृपासिंधु ॥ मा-
झें मनीं लागला वेधू ॥ चरित्र ऐकतां महानंदू ॥ अति उल्हास होतसे ॥२॥ परिसोनि
शिष्याचें वचन ॥ संतोषें सिद्ध अति गहन ॥ सांगता झाला विस्तारोन ॥ श्रोते तुह्मी
अवधारा ॥ ३ ॥ गोकर्ण क्षेत्रीं श्रीपाद यती ॥ राहिले वर्षें तीन गुप्ती ॥ तेथोनि श्रीगिरि-
पर्वता येती ॥ लोकानुग्रहाकारणें ॥ ४ ॥ जयाचें करितां चरणदर्शन ॥ समस्त तीर्था-
स्नान जाण ॥ चरणं पवित्रं विततं पुराणं ॥ वेदश्रुती ऐसें बोलतसे ॥ ५ ॥ समस्त तीर्थें
गुरुचरणीं ॥ तो कां हिंडे तीर्थभुवनीं ॥ लोकानुग्रहालागूनी ॥ जात असे परियेसा ॥ ६ ॥
मास चारी क्रमोनि तेथें ॥ आले निवृत्ति संगमातें ॥ दर्शन देती साधूजनांतें ॥ पातले
तया कुरवपुरा ॥ ७ ॥ कुरवपुर महाक्षेत्र ॥ कृष्णा गंगा वाहे निर ॥ महिमा तेथील सां-
गतां अपार ॥ भूमंडळांत दुर्लभ ॥ ८ ॥ तेथील महिमा सांगतां ॥ विस्तार होईल बहु
कथा ॥ पुढें असे चरित्र अमृता ॥ सांगेन ऐका एकचित्तें ॥ ९ ॥ श्रीपाद राहिले कुरव-
पुरीं ॥ ख्याती राहिली भूमीवरी ॥ प्रकटे महिमा अपरंपारी ॥ सांगतां विस्तार असे देखा
॥ १० ॥ जे जन भजती भक्तीसी ॥ सौख्य पावती अप्रयासीं ॥ कन्या पुत्र लक्ष्मीसी ॥
चिंतिलें फळ पावती ॥ ११ ॥ समस्त महिमा सांगावयासी ॥ विस्तार होईल बहुवसीं ॥
नामधारका स्वस्थ परियेसी ॥ सांगेन किंचित् तुज आतां ॥ १२ ॥ पुढें अवतार व्हाव-
या गती ॥ सांगेन ऐका एकचित्तीं ॥ श्रीपाद कुरवपुरा असती ॥ कार्याकारण मनुष्य-
देहीं ॥ १३ ॥ अवतार व्हावयाचें कारण ॥ सांगेन त्याचें पूर्व कथन ॥ वेदशास्त्र संपन्न ॥

ब्राह्मण होता तया ग्रामीं ॥ १४ ॥ त्याची भार्या होती देखा ॥ नाम तियेचें अंबिका ॥
सुशील आचार पतिसेवका ॥ महा पुण्यसती देखा ॥ १५ ॥ तियेसी पुत्र होऊनि मरती ॥
पूर्व कर्मफळ अर्जिती ॥ अनेक तीर्थें आचरती ॥ तिणें केलीं परियेसा ॥१६॥ ऐसें असतां
होणार गती ॥ पुत्र जाहला मंदमती ॥ माता स्नेही करी भक्ती ॥ अपूर्व आपणासी
ह्मणोनी ॥ १७ ॥ वर्धतां मातापित्याघरीं ॥ विप्रात्मज वाढला प्रीतीकरीं ॥ व्रतबंध क-
रिती कुळाचारी ॥ वेदाभ्यास करावया ॥१८॥ विद्या नये तया कुमरा ॥ मंदमती अज्ञान
बधिरा ॥ चिंता वर्ते त्या द्विजवरा ॥ म्हणे पुत्र मंदमती ॥ १९ ॥ अनेक देव आराधोनी ॥
पुत्र लाधलों कष्टोनि ॥ प्राचीन कर्म न सुटे ह्मणोनि ॥ चिंता करी अहोरात्र ॥ २० ॥
अनेक प्रकारें शिकवी त्यासी ॥ ताडन करी बहुवसीं ॥ होतसे दुःख जननीसी ॥ वर्जी
आपुले पतीतें ॥ २१ ॥ पतीसी ह्मणे ते नारी ॥ पुत्र नाहीं आज्ञा चारी ॥ कष्ट करोनि
नानापरी ॥ पोसिलें एका बाळकासी ॥ २२ ॥ विद्या नयेचि वेद त्यासी ॥ वायां मारून
कां कष्टसी ॥ प्राचीन कर्म असे त्यासी ॥ कीं मूढ होऊनि उपजावें ॥ २३ ॥ आतां जरी
तुम्ही यासी ॥ ताडन कराल अहर्निशीं ॥ प्राण त्यजिन मी भरवसीं ॥ ह्मणोनि विनवी
पतीतें ॥२४॥ स्त्रियेचें वचन ऐकोनि ॥ विप्र राहिला निश्चिंत मनीं ॥ऐसा कांहीं काळ क्रमोनी ॥
होता तया ग्रामांत ॥ २५ ॥ वर्ततां ऐसें तया स्थानीं ॥ विप्र पडला असमाधानीं ॥ दैव-
वशें करूनी ॥ पंचत्व पावला परियेसा ॥ २६ ॥ मग पुत्रासहित ते नारी ॥ होती तेथें
कुरवपुरीं ॥ याचुनी आपुलें उदर भरी ॥ येणेंपरी जीव रक्षी ॥ २७ ॥ विप्रस्त्रियेचा
पुत्र देखा ॥ विवाहा योग्य झाला निका ॥ निंदा करिती सकळिका ॥ मतिहीन

ह्मणोनियां ॥ २८ ॥ कन्या न देती तयासी कोणी ॥ ह्मणती काष्ठ वाहेगा पाणी ॥ समस्त ह्मणती असे दूषणी ॥ उदर भरी येणें विधें ॥ २९ ॥ समस्त लोक ह्मणती त्यासी ॥ तूं वगडापरी व्यर्थ जन्मलासी ॥ लांछन लाविलें वंशासी ॥ अरे मूर्खा कुलनाशका ॥ ३० ॥ तुझ्या पितयाचा आचार ॥ ख्याती असे चारी राष्ट्र ॥ जाणे धर्म वेद शास्त्र ॥ त्याचे पोटीं अवतरलासि तूं ॥ ३१ ॥ बोल आणिलासी तुवां पितरांसी ॥ घातलें तयां अधोगतीसी ॥ भिक्षा मागोनि उदर भरिसी ॥ लाज कैसी तुज न वाटे ॥ ३२ ॥ जन्मोनियां संसारीं ॥ काय व्यर्थ पशूचिये परी ॥ अथवा गंगेंत प्रवेश करी ॥ काय जन्मोनि सार्थक ॥ ३३ ॥ ऐसें ऐकोनी ब्रह्मचारी ॥ दुःख करीत नानाप्रकारीं ॥ मातेसि ह्मणे ते अवसरीं ॥ प्राण त्यजीन मी आतां ॥ ३४ ॥ निंदा करिती सर्वही मज ॥ असोनि देह कवणे काज ॥ पोसूं न शकें माते तुज ॥ जाईन अरण्यवासासी ॥ ३५ ॥ ऐकोनि पुत्राचें वचन ॥ माता करी चिंता गहन ॥ दुःखें दाटलें अंतःकरण ॥ विलाप करी ते नारी ॥ ३६ ॥ माता सुत दुःख करित ॥ गेलीं गंगाप्रवाहांत ॥ तेथें देखिले जगद्गुरु-द्धरित ॥ श्रीपाद योगी स्नान करितां ॥ ३७ ॥ जाऊनि दोघें लागती चरणीं ॥ विनविती कर जोडूनी ॥ वासना असे आमुचे मनीं ॥ प्राण त्यजावा गंगेंत ॥ ३८ ॥ निरोप द्यावा जी आम्हांसी ॥ सद्गती व्हावयाकारणासी ॥ आत्महत्या महादोषी ॥ म्हणोनि विनवितों कृपासिंधू ॥ ३९॥ ऐकोनि विप्रसतीचें वचन ॥ पुसती श्रीपाद कृपायमान ॥ काय संकटीं तुमचें मन ॥ त्यजितां प्राण काय निमित्त ॥ ४० ॥ विप्रस्त्री तया वेळा ॥ सांगतसे दुःख सकळा ॥ ह्मणे स्वामी भक्तवत्सला ॥ तारावें आह्मां बाळकांतें ॥ ४१ ॥ पुत्राविण कष्टलें भारी ॥

अनेक तीर्थें पादचारी ॥ केलें व्रत पूजा जरी ॥ सकळ देव आराधिले ॥ ४२ ॥ व्रतें उपवास सांगूं किती ॥ करितें झालें अपरमिती ॥ झाला पुत्र हा दुर्मती ॥ निंदा करिती सकळ जन ॥ ४३ ॥ वेदशास्त्रसंपन्न ॥ पति माझा होता ब्राह्मण ॥ त्याचिये पोटीं झाला हीन ॥ मंदमती दुरात्मा हा ॥ ४४ ॥ कृपा करी गा श्रीपादयती ॥ जन्मोजन्मीं दैवगती ॥ पुत्र न व्हावा मंदमती ॥ ऐसा प्रकार सांगावा ॥ ४५ ॥ कृपासागर दैन्यहरण ॥ ह्मणोनि धरिले तुझे चरण ॥ शरणांगताचें करावया रक्षण ॥ आलासि आजी कृपासिंधू ॥ ४६ ॥ जन्मोनियां संसारीं ॥ कष्ट केले नानापरी ॥ न देखेंचि सौख्यकुसरी ॥ परी जाहले पुत्र न राहाती ॥ ४७ ॥ वांचोनियां हा एक सुत ॥ शेळीचे गळां स्तन लोंबत ॥ वृथा जन्मला ह्मणत ॥ विनवीतसे श्रीगुरूसी ॥ ४८ ॥ देवा आतां ऐसें करणें ॥ पुढील जन्मीं मनुष्यपणें ॥ पूज्यमान पुत्र पावणें ॥ जैसा पूज्य तूं जगत्रयासी ॥ ४९ ॥ सकळ लोक त्यासि वंदिती ॥ ऐसा पुत्र व्हावा ह्मणे ती ॥ उपाय सांगा श्रीगुरू यती ॥ ह्मणोनि चरणा लागली ॥ ५० ॥ त्याचेनि मातें उद्धारगती ॥ मागुती न होय पुनरावृत्ती ॥ पितरां सकळां स्वर्गप्राप्ती ॥ लाधे ऐसें निरोपावें ॥ ५१ ॥ वासना असे माझे मनीं ॥ पुत्र व्हावा ब्रह्मज्ञानी ॥ बाळपणींच पाहे नयनीं ॥ पूज्यमान समस्तांसी ॥ ५२ ॥ ऐकोनि तियेचें वचन ॥ सांगती कृपावंत होऊन ॥ करीवो ईश्वर आराधन ॥ पुत्र होईल श्रीहरी ऐसा ॥ ५३ ॥ गौळियांचे घरीं देखा ॥ कृष्ण उपजला कारणिका ॥ व्रत केलें गौळी ऐका ॥ ईश्वराची आराधना ॥ ५४ ॥ तैसा तूं आराधी ईश्वर ॥ पुत्र पावसील हा निर्धार ॥ तुझा मनोरथ साचार ॥ पावेल सिद्धी श्रीपाद ह्मणती ॥ ५५ ॥ विप्रस्त्री ह्मणे ते वेळीं ॥ कैसें

व्रत आचरले गौळी ॥ कैसा पूजिला चंद्रमौळी ॥ विस्तारावें मजप्रती ॥ ५६ ॥ तैसेंच व्रत करीन आपण ॥ ह्मणोन धरी सद्गुरुचरण ॥ कृपामूर्ती सद्गुरू जाण ॥ सांगता झाला ते वेळीं ॥ ५७ ॥ ह्मणती श्रीपादयती तियेसी ॥ ईश्वर पूजी हो प्रदोषीं ॥ मंदवारीं त्रयोदशिसीं ॥ पूजा करीं भक्तींनें ॥ ५८ ॥ पूजा करी जे गौळणी ॥ विस्तार असे स्कंदपुराणीं ॥ कथा सांगेन ऐक कानीं ॥ ह्मणती श्रीगुरु तियेसी ॥ ५९ ॥ ऐकोन श्रीगुरूचे वचना ॥ संतोषली विप्रांगना ॥ पुढती घाली लोटांगणा ॥ तया श्रीपाद श्रीगुरुप्रती ॥ ६० ॥ विप्रस्त्री ह्मणे स्वामींसी ॥ अभिनव मातें निरोपिलेंसी ॥ देखतां पूजा प्रदोषीं ॥ पुत्र झाला कृष्ण ऐसा ॥ ६१ ॥ आपण केलिया पूजा जरी ॥ फळ पावेन निर्धारीं ॥ पूर्वीं झालें कवणें परी ॥ विस्तारावें दातारा ॥ ६२ ॥ श्रीगुरू सांगती तियेसी ॥ सांगेन ऐक एकचित्तेंसीं ॥ उज्जनी नाम नगरीसी ॥ जाहलें विचित्र परियेसा ॥ ६३ ॥ तया नगरीं चंद्रसेन ॥ राजा होता धर्मपरायण ॥ त्याचा सखा असे प्राण ॥ मणिभद्र नामें परियेसा ॥ ६४ ॥ सदा ईश्वरभक्ती करी ॥ नानाप्रकारें अपरंपारी ॥ भोळादेव प्रसन्न करी ॥ दिधला चिंतामणी एक ॥ ६५ ॥ कोटी सूर्यांचा प्रकाश ॥ माणिक शोभे महाढुरस ॥ कंठीं घालितां महाहर्ष ॥ तया मणिभद्र रायासी ॥ ६६ ॥ तया मण्याचें लक्षण ॥ सुवर्ण होय लोह जाण ॥ तेज फांकलें ज्यावरी जाण ॥ तें कनक होय परियेसा ॥६७॥ जें जें चिंतीत मानसीं ॥ तें पावत त्वरितेंसी ॥ ऐशी ख्याती माणिकासी ॥ समस्त राजे कांक्षा करिती ॥६८॥ इष्टत्वें मागती कितीएक ॥ मागों पाठविती तें माणिक ॥ बलात्कारें इच्छिती एक ॥ राजे वांछिती परियेसा ॥६९॥ ह्मणती विक्रय करूनि देखा ॥ आपण द्यावें ते माणिका ॥

जरी न देशी स्वभाविका ॥ तरी युद्धालागीं येऊं म्हणती ॥ ७०॥ राजे समस्त मिळोनी ॥ पातले नगरातें उज्जनी ॥ अपार सैन्य मिळवूनी ॥ वेढिलें तया नगरासी ॥७१॥ ते दिवशीं शनिवार त्रयोदशी ॥ राजा बैसला पूजनासी ॥ शंका न धरितां मानसीं ॥ एकचित्तें पूजी तसे ॥७२॥ महाबळेश्वर लिंगासी ॥ पूजा करितो राजा हर्षी ॥ गौळियाचा कुमर पहा-यासी ॥ आला तया शिवालया॥७३॥पूजा पाहोनि शिवाची॥ मुलें ह्मणतां गौळियांची ॥ खेळूं चला आह्मी असेंचि ॥ लिंग करूनि पुजूं आतां ॥७४॥ ह्मणोनी विनोदें करुनी ॥ आपुले घरास-न्निधानी ॥ एकवटोनि पाषाणीं ॥ कल्पिलें तेथें शिवालय॥७५॥पाषाणाचें करूनि लिंग॥पूजा करीत बाळकें चांग ॥ नानापरीची पत्रीं सांग ॥ कल्पिली तेथ पूजेसी ॥ ७६॥ षोडशोप-चारें पूजा करिती ॥ उदक नैवेद्य समर्पिती ॥ ऐसें कौतुक खेळती ॥ गोपकुमार तये-वेळीं ॥ ७७ ॥ गोपिका स्त्रिया येउनी ॥ पुत्रांतें नेती बोलावुनी ॥ भोजनाकारणें ह्मणोनी॥ गेले सकळही बालक ॥ ७८ ॥ त्यांतील एक गोपीसुत ॥ लिंगभुवन न सोडित ॥ त्याची माता जवळी येत ॥ मारी आपुले पुत्रासी ॥ ७९ ॥ ह्मणे कुमारा भोजनासी ॥ चाल गृहासी झाली निशी ॥ कांहीं केल्या न जाय परियेसी ॥ तो गोपकुमारक ॥ ८० ॥ कोपें करूनि ते गौळिणी ॥ मोडी पूजाखेळ आंगणीं ॥ पाषाण दूर टाकुनी ॥ गेली आपुले सदनासी ॥ ८१ ॥ पूजा मोडितां तो बाळक ॥ प्रलाप करी अनेक ॥ मूर्च्छा येउनि क्षणैक ॥ पडिला भूमीं अवधारा ॥ ८२ ॥ लय लावून लिंगस्थानीं ॥ प्राण त्यजूं पाहे निर्वाणीं ॥ प्रसन्न झाला शूळपाणी ॥ तया गोपसुताकारणें ॥ ८३ ॥ शिवालय रत्न-खचित ॥ सूर्यासमान प्रभावंत ॥ लिंग दिसे रत्नखचित ॥ जागृत झाला तो बाळ ॥८४॥

निजरूप धरी गौरीरमण ॥ उठवी बाळ करीं धरून ॥ वर माग ह्मणे मी झालों प्रसन्न ॥
देईन जें वांछिसी तें ॥ ८५ ॥ बाळकें नमिलें ईश्वरासी ॥ कोप न धरावा मातेसी ॥ पूजा
बिघडली तव प्रदोषीं ॥ क्षमा करणें ह्मणतसे ॥ ८६॥ ईश्वर भोळा चक्रवर्ती ॥ वर दीधला
बहु प्रीतिं ॥ प्रदोषसमयीं पूजा देखती ॥ गौळणी होय देवजननी ॥ ८७ ॥ तिचे पोटीं
होईल सुत ॥ तोचि विष्णु अवतार ख्यात ॥ न करीं पूजा पाहिली ह्मणत ॥ पोशील
आपुले पुत्रापरी ॥ ८८ ॥ जें जें मानसीं तूं इच्छिसी ॥ पावेल तें तें धरी मानसीं ॥
अखिल सौख्य तुझिया वंशासी ॥ पुत्रपौत्रेंसी नांदसील ॥ ८९ ॥ प्रसन्न होवोनि गिरि-
जापती ॥ गेले लिंगालयीं गुप्ती ॥ लिंग राहिलें रत्नखचिती ॥ गौळिया घरीं याचि
परी ॥ ९० ॥ कोटि सूर्यप्रकाश ॥ शिवालय दिसे अतिसुरस ॥ लोक ह्मणती काय प्रकाश ॥
उदय झाला दिनकरा ॥ ९१ ॥ आले होते परराष्ट्रराजे ॥ विस्मयो करिती महा चोजें ॥
सांडूनि द्वेष बोलती सहजें ॥ भेटूं ह्मणती रायासी ॥ ९२ ॥ पाहें या पवित्र नगरांत ॥
सूर्य झाला असे उदित ॥ राजा असे हा बहु पुण्यवंत ॥ ऐशियासी विरोध काय ॥ ९३॥
ह्मणोनि पाठविती सेवकासी ॥ भेटूं ह्मणती रायासी ॥ राजा बोलवी तयांसी ॥ आपुले
गृहासी नगरांत ॥ ९४ ॥ इतुकें होतां ते अवसरीं ॥ राजा पुसतसे प्रीतीकरी ॥ रात्री
असतां अंधकारी ॥ उदय पावला केवीं सूर्य ॥ ९५ ॥ राजा चंद्रसेन सहित ॥ पहावया
येती कौतुकार्थ ॥ दिसे विचित्र रत्नखचित ॥ शिवालय अनुपम्य ॥ ९६ ॥ येणेंचिपरी
गौळियाचें सदन ॥ अति रम्य विराजमान ॥ पुसता झाला आपण ॥ तया गौळीकुमर-
कांतें ॥ ९७ ॥ सांगितला सकळ वृत्तांत ॥ संतोष करिती राजे समस्त ॥ गौळियां

राजा तूं होय ह्मणत ॥ देती नानाइश संपदा ॥ ९८ ॥ निघोन गेले राजे सकळ ॥ राहिला चंद्रसेन निर्मळ ॥ शनिप्रदोष पूजा सफळ ॥ भय कैचें तया राया ॥९९॥ गौळीकुमर येउनि घरा ॥ सांगे माते सविस्तरा ॥ पुढें येईल तुझिये उदरा ॥ नारायण अवतरोनी॥१००॥ ऐसा ईश्वरें दिधला वर ॥ संशय न करीं तूं निर्धार ॥ संतोषला कर्पूरगौर ॥ पाहिली पूजा प्रदोषाची ॥१॥ मांडिली पूजा ह्मणोनी ॥ म्यां विनविला शूलपाणी ॥ क्षमा करूनि घेतलें ह्मणोनि ॥ सांगे वृत्तांत मातेसी ॥ २ ॥ ऐसा ईश्वर प्रसन्न झाला ॥ प्रदोषपूजनें तया फळला ॥ श्रीपाद सांगती तये वेळा ॥ विप्रस्त्रियेकारणें ॥ ३ ॥ तुझे मनीं असेल जरी ॥ होईल पुत्र मजसरी ॥ संशय सांडुनि निर्धारी ॥ शनिप्रदोषीं पूजीं शंभू ॥ ४ ॥ ऐसें म्हणोनि श्रीपाददेव ॥ चक्रवर्ती भोळा शिव ॥ विप्रस्त्रियेचा पाहोनि भाव ॥ प्रसन्न होत तया वेळीं ॥ ५ ॥ बोलावुनी तिचे कुमरासी ॥ हस्त ठेविती मस्तकेंसी ॥ ज्ञान जाहलें तात्काळेंसी ॥ त्रिवेदि झाला तो ब्राह्मण ॥ ६ ॥ वेदशास्त्रादि तर्क भाषा ॥ म्हणता झाला अति प्रकाशा ॥ विस्मय झाला असे सहसा ॥ विप्र म्हणती आश्चर्य ॥ ७ ॥ विस्मय करोनि विप्रवनिता ॥ ह्मणें ईश्वर हाचि निश्चिता ॥ कार्याकारणें अवतार होता ॥ आला नरदेह धरोनी ॥ ८ ॥ पूर्वजन्मीचें पुण्यार्जित ॥ जोडला आह्मा हा निश्चित ॥ भेटला असे श्रीगुरुनाथ ॥ म्हणोनि नमिती क्षणक्षणा ॥ ९ ॥ ह्मणे ईश्वर तूंचि होसि ॥ पूजा करीन मी प्रदोषीं ॥ मिथ्या नोहे तुझे वाक्यासी ॥ पुत्र व्हावा तुजऐसा ॥ १० ॥ ऐसा निश्चय करोनी ॥ पूजा करिती नित्य येउनी ॥ प्रदोषपूजा अति गहनी ॥ करी श्रीपादरायासी ॥ ११ ॥ पुत्र तिचा झाला ज्ञानी ॥ वेदशास्त्रार्थ संपन्नी ॥ पूज्य जाहला सर्वांहुनी ॥ ब्रह्मवृंद मानित ॥ १२ ॥ विवाह

झाला मग त्यासी ॥ पुत्रपौत्रीं नांदे हर्षी ॥ श्रीगुरुकृपा होय जयासी ॥ ऐसें होय अवधारा ॥ १३ ॥ ऐसा श्रीगुरु कृपावंत ॥ भक्तजना असे संरक्षित ॥ ऐक ऐक शिष्या एकचित्त ॥ नामधारका श्रीमंता ॥१४॥ नामधारक भक्तासी ॥ सांगे सिद्ध विस्तारेंसी ॥ परियेसा समस्त अहर्निशीं ॥ ह्मणें सरस्वती गंगाधरू ॥ १५ ॥ इति श्रीगुरुचरित्रपरमकथाकल्पतरौ श्रीनृसिंहसरस्वत्युपाख्याने सिद्धनामधारकसंवादे प्रदोषव्रतमाहात्म्यकथनं नाम अष्टमोऽध्यायः ॥ ओंव्या ११५ ॥

॥ श्रीगणेशाय नमः ॥ ऐकोनि सिद्धाचें वचन ॥ नामधारक करी गमन ॥ विनवीतसे कर
जोडून ॥ भक्तिभावें करूनियां ॥ १ ॥ श्रीपाद कुरवपुरीं असतां ॥ पुढें वर्तली कैसी कथा ॥
विस्तारूनि सांग आतां ॥ कृपामूर्ती दातारा ॥ २ ॥ सिद्ध ह्मणे नामधारका ॥ पुढें कथा अ-
पूर्व देखा ॥ तया ग्रामीं रजक एका ॥ सेवक झाला श्रीगुरुचा ॥ ३ ॥ भक्तवत्सल श्रीगुरु-
राव ॥ जाणोनि शिष्याचा भाव ॥ विस्तार करोनि भक्तीस्तव ॥ निरोपित गुरुचरित्र
॥ ४ ॥ नित्य श्रीपाद गंगेसि येती ॥ विधिपूर्वक स्नान करिती ॥ लोक वेव्हार संपादिती ॥
त्रयमूर्ती आपण ॥ ५ ॥ ज्याचें दर्शन गंगास्नान ॥ त्यासी कायसें आचरण ॥ लोकानु-
ग्रहाकारण ॥ स्नान करीत परियेसा ॥ ६ ॥ वर्ततां ऐसें एके दिवशीं ॥ श्रीपाद येती स्नानासी ॥ गं-
गा वाहत असे दशदिशीं ॥ मध्यें असती आपण ॥ ७ ॥ तया गंगातटाकांत ॥ रजक असे वस्त्रें धूत ॥
नित्य येऊनि असे नमित ॥ श्रीपाद गुरुमूर्तीसी ॥ ८ ॥ नित्य त्रिकाळ येवोनिया ॥ दंडप्र-
णाम करोनियां ॥ नमन करी अतिविनया ॥ मनोवाक्कायकर्में ॥ ९ ॥ वर्ततां ऐसें एके दिवशीं ॥
आला रजक नमस्कारासी ॥ श्रीपाद ह्मणती तयासी ॥ एकचित्तें परियेसा ॥ १० ॥ श्री-
पाद ह्मणती रजकासी ॥ कां रे नित्य कष्टतोसी ॥ तुष्टलों मी तुझ्या भक्तीसी ॥ सुखें राज्य
करी आतां ॥ ११ ॥ ऐकतां श्रीगुरुचें वचन ॥ गांठी बांधी पल्लवीं शकुन ॥ विनवीतसे कर
जोडून ॥ सत्यसंकल्प गुरुमूर्ती ॥ १२ ॥ रजक सांडी संसारचिंता ॥ सेवक जाहला एकचि-
त्ता ॥ दुरोनि करी दंडवता ॥ मठा गेलिया येणेंचि परी ॥ १३ ॥ ऐसें बहुत दिवसांवरी ॥ रजक
तो सेवा करी ॥ आंगण झाडी प्रोक्षी वारी ॥ नित्य नेमें येणें विधि ॥ १४ ॥ असतां एके
दिवशीं देखा ॥ वसंतऋतु वैशाखा ॥ क्रीडा करीत नदीतटाका ॥ आला राजा म्लेंछ एक

॥ १५ ॥ स्त्रियांसहित राजा आपण ॥ अलंकृत आभरण ॥ क्रीडा करीत स्त्रिया आपण ॥ गंगेमधून येतसे ॥१६॥ सर्व दळ येत दोनी थडी ॥ अमित असती हस्ती घोडीं ॥ मिरवताति रत्नकोडी ॥ अलंकृत सेवकजन ॥ १७ ॥ ऐसा गंगेच्या प्रवाहांत ॥ राजा आला खेळत ॥ अनेक वाद्यनाद असे गर्जत॥ कृष्णा वेणी थडियेसी ॥१८॥ रजक होता वस्त्रें धूत॥ शब्द झाला अवचित ॥ असे गंगेंत अवलोकित ॥ समारंभ राजयाचा ॥१९॥विस्मय करी बहु मानसीं ॥ जन्मोनियां संसारासी ॥ जरी न देखिजे सौख्यासी ॥ पशुसमान देह आपुला॥२०॥ धन्य राजियाचें जिणें॥ ऐसें सौख्य भोगणें॥स्त्रिया वस्त्रें अनेक भूषणें ॥ कैसा भक्त ईश्वराचा ॥ २१॥ कैसें याचें आर्जव फळलें ॥ कवणे देवा आराधिलें ॥ कैसे श्रीगुरु असती भेटले ॥ मग पावला ऐसी दशा ॥ २२ ॥ ऐसें मनीं चिंतित ॥ करीतसे दंडवत ॥ श्रीपादराव कृपावंत॥ वळखिली वासना तयाची॥२३॥ भक्तवत्सल श्रीगुरुमूर्ती ॥ जाणोनि अंतरीं त्याची स्थिती ॥ बोलावूनियां पुसती ॥ काय चिंतिसी मनांत ॥ २४ ॥ रजक ह्मणे स्वामीसी ॥ देखिलें दृष्टीं रायासी ॥ संतोष झाला मानसीं ॥ केवळ दास श्रीगुरुचा ॥ २५ ॥ पूर्वीं आराधोनी देवासी ॥ पावला आतां या पदासी॥ह्मणोनि चिंतितों मानसीं॥ कृपासिंधु दातारा ॥ २६ ॥ ऐसें अविद्यासंबंधेंसी ॥ नानावासना इंद्रियासीं ॥ चाड नाहीं या भोगासी ॥ चरणीं तुझे मज सौख्य ॥ २७ ॥ श्रीपाद ह्मणती रजकासी ॥ जन्मादारभ्य कष्टलासी ॥ वांछा असे भोगावयासी ॥ राज्यभोग तमोवृत्ती ॥ २८ ॥ निववावीं इंद्रियें सकळ ॥ ना तरी मोक्ष नव्हे निर्मळ ॥ बाधा करिती पुढें केवळ ॥ जन्मांतरीं परियेसी ॥ २९ ॥ दुष्टवावया इंद्रियांसी ॥ तुवां जन्मावें म्लेंछवंशासी ॥ आवडी

जाहली तुझे मानसीं ॥ राज्य भोगी जाय त्वरित ॥ ३० ॥ ऐकोनि स्वामीचें वचन ॥ वि-
नवी रजक कर जोडून ॥ कृपासागरू तूं गुरुराज पूर्ण ॥ कां उपेक्षिसी मजलागी ॥ ३१ ॥
अंतरतील तुझे चरण ॥ द्यावें मातें पुनर्दर्शन ॥ तुझा अनुग्रह असे कारण ॥ ज्ञान द्यावें
दातारा ॥ ३२ ॥ श्रीगुरू ह्मणती तयासी ॥ वैदुरानगरीं जन्म घेसी ॥ भेटी देऊं अंतकाळा-
सी ॥ कारण असे येणें आह्मां ॥ ३३ ॥ भेटी होतांचि आह्मांसी ॥ ज्ञान होईल तुझें मान-
सीं ॥ न करी चिंता भरंवसीं ॥ आह्मा येणें घडेल ॥ ३४ ॥ आणीक कार्यकारणासीं ॥
अवतार घेऊं परियेसी ॥ वेष धरोनी संन्यासी ॥ नाम नृसिंहसरस्वती ॥ ३५ ॥ ऐसें तया
संबोधूनी ॥ निरोप देती जाय ह्मणोनी ॥ रजक लागला तये चरणीं ॥ नमस्कारीत तये
वेळीं ॥ ३६ ॥ ऐकोनि श्रीगुरू कृपामूर्ती ॥ रजकासी जवळी पाचारिती ॥ इह भोगिसी
कीं पुढती ॥ राज्यभोग सांग मज ॥ ३७ ॥ रजक विनवीत श्रीपादासी ॥ झालों आपण
वृद्धवयेसी ॥ भोग भोगीन बाळाभ्यासी ॥ यौवनीं गोड राज्यभोग ॥ ३८ ॥ ऐकोनि
रजकाचें वचन ॥ निरोप देती श्रीगुरू आपण ॥ त्वरित जाई रे ह्मणोन ॥ जन्मांतरीं
भोगी ह्मणती ॥ ३९ ॥ निरोप देतां तया वेळीं ॥ त्यजिला प्राण तत्काळीं ॥ जन्मता
झाला म्लेंछकुळीं ॥ वैदुरानगरीं विख्यात ॥ ४० ॥ ऐसी रजकाची कथा ॥ पुढें सांगेन
विस्तारता ॥ सिद्ध ह्मणे नामधारका ॥ आतां चरित्र पुढती अवधारी ॥४१॥ ऐसें झालिया
अवसरीं ॥ श्रीपादराव कुरवपुरीं ॥ असतां महिमा अपरंपारी ॥ प्रख्यात असे परियेसा
॥ ४२ ॥ महिमा सकळ सांगतां ॥ विस्तार होईल बहुकथा ॥ पुढील अवतार असंख्याता ॥
सांगेन ऐक नामधारका ॥ ४३ ॥ महत्व वर्णावया श्रीगुरूचें ॥ शक्ति कैंची या वाचे ॥

नवल हें अमृतदृष्टीचें ॥ स्थानमहिमा ऐसा ॥ ४४ ॥ श्रीगुरू राहती जे स्थानीं ॥ अपार महिमा त्या भुवनीं ॥ विचित्र जयाची करणी ॥ दृष्टांतें तुज सांगेन ॥ ४५ ॥ स्थानमहिमा प्रकार ॥ सांगेन ऐक एकाग्र ॥ प्रख्यात असे कुरवपूर ॥ मनकामना पुरती तेथें ॥४६॥ ऐसें कित्येक दिवसांवरी ॥ श्रीपाद होते कुरवपुरीं ॥ कारण असे पुढें अवतारीं ॥ ह्मणोनि अदृश्य होते तेथें ॥४७॥ आश्विन वद्य द्वादशीसी ॥ नक्षत्र मृगराज परियेसीं ॥ श्रीगुरू बैसले निजानंदेंसी ॥ अदृश्य झाले गंगेंत ॥४८॥ लौकिकीं दिसती अदृश्य जाण ॥ कुरवपुरीं असती आपण ॥ श्रीपादराव निर्धार जाण ॥ त्रयमूर्तीचा अवतार ॥४९॥ अदृश्य होऊनी तया स्थानीं ॥ श्रीपाद झाले निर्गुणी ॥ दृष्टांत सांगेन विस्तारोनी ॥ ह्मणे सरस्वती गंगाधरु ॥५०॥ जे जन असती भक्त केवळ ॥ त्यांसी दिसती श्रीगुरू निर्मळ ॥ कुरवपुर क्षेत्र अपूर्व स्थळ ॥ असे प्रख्यात भूमंडळीं ॥५१॥ सिद्ध सांगे नामधारकासी ॥ तेंचि कथा विस्तारेंसीं ॥ सांगतसे सकळिकांसी ॥ गंगाधराचा आत्मज ॥ ५२ ॥ इति श्रीगुरुचरित्रपरमकथाकल्पतरौ श्रीनृसिं० सिद्ध० रजकवरप्रदानं नाम नवमोऽध्यायः ॥ ओंव्या ५२ ॥

॥ श्रीगणेशाय नमः ॥ ऐकोनि सिद्धाचें वचन ॥ नामधारक विनवी जाण ॥ कुरवपुरीचें म-
हिमान ॥ केवीं जाहलें परियेसा ॥१॥ ह्मणती श्रीपाद नाहीं गेले ॥ आणिक ह्मणसी अवतार
झाले ॥ विस्तार करूनियां सगळें ॥ निरोपावें ह्मणतसे ॥ २ ॥ सिद्ध सांगे नामधारकासी ॥
श्रीगुरुमहिमा काय पुससी ॥ अनंतरूपें होती परियेसीं ॥ विश्वव्यापक परमात्मा ॥ ३ ॥
पुढें कार्यकारणासी ॥ अवतार झाले परियेसी ॥ राहिले आपण गुप्तवेषीं ॥ तया कुरव-
क्षेत्रांत॥४॥पाहेपां भार्गवराम देखा ॥ अद्यापि आहे चिरंजीविका ॥ अवतार जाहले अने-
का ॥ त्याचेच एकीं अनेक ॥५॥ सर्वांठायीं वास आपण ॥ मूर्ती एक नारायण ॥ त्रिमूर्ती-
चे तीन गुण ॥ उत्पत्ति स्थिति आणि प्रलय ॥६॥ भक्तजना तारावयासी ॥ अवतरती हृ-
षीकेशी ॥ शाप देत दुर्वासऋषी ॥ कारण असे तयाचें ॥ ७॥ त्रयमूर्तीचा अवतार ॥ या-
चा कवणा न कळे पार ॥ निधानतीर्थ कुरवपूर ॥ वसे तेथें गुरुमूर्ती ॥ ८॥ जें जें चिंतावें
भक्तीनें ॥ तें तें पावे गुरुदर्शनें ॥ श्रीगुरु वसावयाचीं स्थानें ॥ कामधेनु असे जाणा ॥ ९॥
श्रीपादवल्लभ स्थानमहिमा ॥ वर्णावया अनुपमा ॥ अपार असे सांगतों तुह्मां ॥ दृष्टांतेसी
अवधारा ॥१०॥ तुज सांगावया कारण ॥ गुरुभक्ति वृथा नव्हे जाण ॥ सर्वथा न करी तो
निर्वाण ॥ पाहे वाट भक्तांची ॥ ११ ॥ भक्ति करावी दृढतर ॥ गंभीरपणें असावें धीर ॥
तरीच उतरिजे पैलपार ॥ इहपरत्रीं सौख्य पावे ॥ १२॥ याचि कारणें दृष्टांतें तुज ॥ सां-
गेन ऐक वर्तलें सहज ॥ काश्यप गोत्रीं होता द्विज ॥ नाम तया वल्लभेश ॥ १३ ॥ सुशील
द्विज आचारवंत ॥ उदीम करोनी उदर भरित ॥ प्रतिसंवत्सरीं यात्रेस येत ॥ तया श्री-
पादक्षेत्रासी ॥१४॥ असतां पुढें वर्तमानीं ॥ उदिमा निघाला तो धनी ॥ नवस केला अति

गहनीं ॥ संतपावें ब्राह्मणांसी ॥१५॥ उदीम आलिया फळासी ॥ यात्रेसि येईन विशेषीं ॥ सहस्रसंख्या ब्राह्मणांसी ॥ इच्छा भोजन देईन ह्मणे ॥ १६ ॥ निश्चय करोनी मानसीं ॥ निघाला द्विजवर उदीमासी ॥ चरण ध्यात असे मानसीं ॥ सदा श्रीपादवल्लभांचे ॥ १७॥ जे जे ठायीं जाय देखा ॥ अनंत संतोष पावे निका ॥ शतगुणें लाभ झाला एका ॥ परमानंद प्रवर्तला ॥ १८ ॥ लय लावूनि श्रीपादचरणीं ॥ यात्रेसीं निघाला ते क्षणीं ॥ वेंचावया ब्रह्मसंतर्पणीं ॥ द्रव्य घेतलें समागमें ॥ १९ ॥ द्रव्य घेऊनि द्विजवर ॥ निघतां देखती तस्कर ॥ कापट्यवेषें सत्वर ॥ तेही सांगाते निघाले ॥२०॥ दोन तीन दिवसांवरी ॥ तस्कर असती संगिकारी ॥ एके दिवशीं मार्गीं रात्रीं ॥ जात असतां मार्गस्थ ॥ २१॥ तस्कर ह्मणती द्विजवरासी ॥ आह्मीं जाऊं कुरवपुरासीं ॥ श्रीपादवल्लभदर्शनासी ॥ प्रतिवर्षीं नेम असे ॥ २२ ॥ ऐसें बोलत मार्गासीं ॥ तस्करीं मारिलें द्विजासी ॥ शिर छेदूनियां परियेसी ॥ द्रव्य घेतलें सकळिक ॥२३॥ भक्तजनाचा कैवारी ॥ श्रीपादराव कुरवपुरीं ॥ पातला त्वरित वेषधारी ॥ जटामंडित भस्मांकित ॥ २४ ॥ त्रिशूळ खट्वांग घेऊनी हातीं ॥ उभा ठेला तस्करांपुढती ॥ वधिता झाला तयांप्रती ॥ त्रिशूळें करूनी तात्काळ ॥ २५ ॥ समस्त तस्करांसीं मारितां ॥ एक तस्कर येउनी विनविता ॥ कृपाळुवा जगन्नाथा ॥ निरपराधी आपण असें ॥ २६ ॥ नेणें यातें वधितील म्हणोनी ॥ आलों आपण संगी होऊनी ॥ तूं सर्वोत्तमा जाणसी मनीं ॥ विश्वाची मनवासना ॥ २७ ॥ ऐकूनी तस्कराची विनंती ॥ श्रीपाद तयातें बोलाविती ॥ हातीं देऊनियां विभूती ॥ विप्रावरी प्रोक्षी ह्मणे ॥ २८ ॥ मान लावूनी तया वेळां ॥ मंत्रोनि लाविती विभूती गळां ॥ सजीव झाला ता-

त्काळ ॥ ऐक वत्सा एकचित्तें ॥२९॥ इतुकें वर्ततां परियेसी ॥ उदय जाहला दिनकरासी॥ श्रीपाद जाहले गुप्तेसी ॥ राहिला तस्कर द्विजाजवळी ॥ ३० ॥ विप्र पुसतसे तस्करांसी ॥ ह्मणे तूं मातें धरिलेंसी। कवणें वधिलें तस्करांसी॥ म्हणोनि पुसे तया वेळीं ३१ तस्कर सांगे द्विजासी ॥ आला होता एक तापसी ॥ जाहलें अभिनव परियेसी ॥ वधिले तस्कर त्रिशूळें॥३२॥ मज रक्षिलें तुजनिमित्तें ॥ धरोनी बैसविलें स्वहस्तें॥ विभूती लावूनी मग तूतें॥ सजीव केला तवे देह ॥३३॥ उभा होता आतां जवळी ॥ अदृश्य जाहला तात्काळीं ॥ न कळे कवण मुनी बळी ॥ तुझा प्राण रक्षिला ॥३४॥ होईल ईश्वर त्रिपुरारी ॥ भस्मांगी होय जटाधारी ॥ तुझी भक्ती निर्धारी ॥ म्हणोनि आला ठाकोनियां ॥ ३५ ॥ ऐकोनी तस्कराचें वचन ॥ विश्वासला तो ब्राह्मण ॥ तस्कराजवळील द्रव्य घेऊन ॥ गेला यात्रेसी कुरवपुरा ॥ ३६ ॥ नानापरी पूजा करी ॥ ब्राह्मणभोजन सहस्र चारी ॥ अनंतभक्ति प्रीती करी ॥ पूजा करी श्रीपादुकांची ॥ ३७ ॥ ऐसे अनंत भक्तजन ॥ मिळूनि सेविती श्रीपादचरण ॥ कुरवपूर प्रख्यात जाण ॥ अपार महिमा परियेसा ॥ ३८ ॥ सिद्ध ह्मणे नामधारकासी ॥ संशय न धरी तूं मानसीं ॥ श्रीपाद आहेत कुरवपुरासीं ॥ अदृश्य रूप होऊनियां ॥ ३९ ॥ पुढें अवतार असे होणें ॥ गुप्त असती याचि गुणें ॥ अनंतरूप नारायण ॥ परिपूर्ण वसे सर्वांठायीं ॥ ४० ॥ ऐसी श्रीपादवल्लभमूर्ती ॥ लौकिकीं प्रकटली ख्याती ॥ झाला अवतार पुढती ॥ नृसिंहसरस्वती विख्यात ॥ ४१ ॥ म्हणोनि सरस्वती गंगाधरू ॥ सांगत कथेचा विस्तारू ॥ ऐकतां होय मनोहरू ॥ सकळाभीष्टें साधती ॥ ४२ ॥ इति श्रीनृसिंहसरस्वत्युपाख्याने सिद्धनामधारकसंवादे भक्तसंकटहरणं नाम दशमोऽध्यायः ॥ ओंव्या ४२ ॥

॥ श्रीगणेशाय नमः ॥ नामधारक ह्मणे शिष्यासी ॥ पुढें अवतारपरंपरा कैसी ॥ विस्तारोनियां आह्मांसी ॥ सांगा स्वामी कृपासिंधू ॥ १ ॥ सिद्ध ह्मणें ऐक वत्सा ॥ अवतार झाला श्रीपाद कैसा ॥ पूर्वीं वृत्तांत ऐसा ॥ कथा सांगितली विप्रस्त्रियेची ॥ २ ॥ शनिप्रदोषीं सर्वेश्वरासी ॥ पूजीत होती गुरूपदेशीं ॥ देहवासना असतां तियेसी ॥ पंचत्व पावली तत्काळ ॥ ३ ॥ जन्म झाला पुढें तिसी ॥ करंजनगर उत्तरदेशीं ॥ वाजसनीय शाखेसीं ॥ विप्रकुळीं जन्मली ॥ ४ ॥ जातक वर्तलें तियेसी ॥ नामें अंबा भवानी ऐसी ॥ आरोपिती स्नेहासी ॥ माता पिता परियेसी ॥ ५ ॥ वर्धतां मातापितया गृहीं ॥ वाढली कन्या अति स्नेहीं ॥ विवाह करिती महोत्साहीं ॥ देती विप्रासि त्याचि ग्रामीं ॥ ६ ॥ शिवव्रती असे तो ब्राह्मण ॥ नाम तया माधव जाण ॥ तयासि दिधली कन्या दान ॥ अति प्रीती करोनियां ॥ ७ ॥ तया माधव विप्राघरीं ॥ शुभाचारें होति नारी ॥ वासना तिची पूर्वापरी ॥ ईश्वरपूजा करीतसे ॥ ८ ॥ पूजा करी ईश्वरासी ॥ दंपत्य उभय मनोमानसीं ॥ प्रदोषपूजा अति हर्षी ॥ करिती भक्तीपुरस्सर ॥ ९ ॥ मंदवारीं त्रयोदशीसीं ॥ पूजा करिती अतिविशेषीं ॥ संवत्सरें झालीं षोडसी ॥ अंतरवत्नी झाली ऐका ॥ १० ॥ तृतीय पांचवे मासीं ॥ उत्साह करिती बहु हर्षी ॥ उत्तम डोहळे होती तिसी ॥ ब्रह्मज्ञान बोलतसे ॥ ११ ॥ उत्साह करिती मास साती ॥ द्वीजवर करी सीमंता ॥ अक्षयवाणें ओंवाळिती आरती ॥ सुवासिनी मिळूनियां ॥ १२ ॥ ऐसें क्रमितां नवमासीं ॥ प्रसूत झाली शुभ दिवशीं ॥ पुत्र जाहला ह्मणून हर्षी ॥ निर्भर झाली मातापिता ॥ १३ ॥ जन्मतांच तो बाळक ॥ ओंकार शब्द ह्मणतसे ऐक ॥ पाहूनि झाले तटस्थ लोक ॥ अभिनव ह्मणती ते वेळीं ॥ १४ ॥ जातकर्म

करी ब्राह्मण ॥ विप्रासी दक्षिणा देत आपण ॥ ज्योतिषी सांगती तयाचें लक्षण ॥ लग्न सत्वर पाहोनियां ॥ १५ ॥ सांगती ज्योतिषी त्या द्विजासी ॥ मुहूर्त बरवा असे विशेषीं ॥ कुमर होईल कारुण्य ऋषी ॥ गुरु सकळांचा निश्चयें ॥ १६ ॥ याचा अनुग्रह होईल ज्यासी ॥ तो वंद्य होईल विश्वासी ॥ याचें वाक्य प्रमाणेसी ॥ चिंतामणी याचे चरण ॥ १७ ॥ अष्टसिद्धी याचे द्वारीं ॥ वोळंगत राहतील निरंतरीं ॥ नवनिधि याचे घरीं ॥ राहतील ऐक द्विजोत्तमा ॥ १८ ॥ न होती यासी गृहिणी सूत ॥ पूज्य होईल त्रिभुवनांत ॥ याचे दर्शनमात्रें पतित ॥ पुनीत होती परियेसी ॥ १९ ॥ होईल अवतारी पुरुष ॥ माना निश्चयें विश्वास ॥ संदेह न धरावा यास ॥ ह्मणोनि करिती नमस्कार ॥ २० ॥ ऐसें ह्मणती द्विजवर ॥ सांगती जनकासी विचार ॥ याचेनि महा दैन्य हरे ॥ भेणें नलगे कळिकाळा ॥ २१ ॥ जे जे वासना तुमचे मनीं ॥ सर्व साधेल याचेनी ॥ याचिया पालनपोषणीं ॥ निधान आलें तुमचे घरा ॥ २२ ॥ ऐसें जातक वर्तवोन ॥ सांगता झाला ब्राह्मण स्तोम ॥ जनकजननी संतोषोन ॥ देती वस्त्रें आभरणें तयां ॥ २३ ॥ सांगोनि गेले ब्राह्मण ॥ माता पिता आनंदोन ॥ दृष्टी लागेल ह्मणून ॥ निंबलोण ओंवाळिती ॥ २४ ॥ वार्ता गेली नगरांत ॥ अभिनव अजि देखिलें ह्मणत ॥ उपजत बाळ ओंकार जपत ॥ आश्चर्य करिती सकळ जन ॥ २५ ॥ नगरलोक इष्टमित्र ॥ पहावया येती विचित्र ॥ दृष्टि लागेल ह्मणोनि वक्त्र ॥ न दाविती कवणापुढें ॥ २६ ॥ मायामोहें जनकजननी ॥ बाळासी दृष्टि लागेल ह्मणोनी ॥ अंगारा लाविती मंत्रोनी ॥ रक्षा बांधिती कृष्णसुत ॥ २७ ॥ परमात्मा अवतरे ॥ दृष्टि कैंवी संचरे ॥ लौकिकधर्म चमत्कारें ॥ मातापिता संरक्षिती ॥ २८ ॥ वर्ततां

बाळ येणेंपरी ॥ दिवस दहा झालिया वरी ॥ नामकरण प्रीतिकरी ॥ करी जनक द्विजो-
त्तम ॥ २९ ॥ शाळिग्राम देव म्हणत ॥ जन्मनाम विख्यात ॥ नाम नरहरी ऐसें म्हणत ॥
उच्चार केला धर्मकर्मे ॥ ३० ॥ ममत्व थोर बाळकावरी ॥ प्रतिपाळिती प्रीतिकरी ॥ माता
ह्मणतसे अवसरीं ॥ न पुरे क्षीर बाळकासी ॥ ३१ ॥ पतिसी ह्मणे ते वेळां ॥ स्तनीं दुग्ध
थोडें बाळा ॥ मेळवा एखादी अबला ॥ स्तनपान द्यावया ॥ ३२ ॥ अथवा आणा महिष
एक ॥ आपल स्तनें न शमे भूक ॥ ऐकोनि हांसे बाळक ॥ स्पर्शी स्तना सव्यकरें ॥ ३३ ॥
स्तनासीं स्पर्शतां कर ॥ बत्तीस धारा वाहे क्षीर ॥ वस्त्रें भिजोनि विचित्र ॥ वाहों लागलें
भूमींवरी ॥ ३४ ॥ विस्मय करिती जनकजननी ॥ प्रकट न करिती गौप्यगुणीं ॥ नमन
करिती बाळकाचरणीं ॥ मायामोहें खेळविती ॥ ३५ ॥ पाळण्या घालोनि बाळकासी ॥
पर्यंक गायन अतीहर्षी ॥ न राहे कुमर पाळणेसी ॥ सदां खेळे भूमींवरी ॥ ३६ ॥ वर्धतां
बाळ येणेंपरी ॥ माता पिता ममत्कारी ॥ बाळ झाला संवत्सरी ॥ न बोले आतां काय
करूं ॥ ३७ ॥ माता बोलवी कुमारासीं ॥ बोले शब्द ओंकारेसीं ॥ चिंता करितसे मानसीं ॥
मुका झाला दैवयोगें ॥ ३८ ॥ पुसती जाणीव जोशियासीं ॥ या बाळका बोलावयासी ॥
काय उपाय विशेषीं ॥ ह्मणोनि पुसती वेळोंवेळां ॥ ३९ ॥ जोशी सांगती तयांसीं ॥ आ-
राधावें कुलदेवतेसीं ॥ अर्कवारीं अश्वत्थपर्णेसी ॥ अन्न घालीं हो तीन वेळां ॥ ४० ॥ एक
ह्मणती होईल मुकें ॥ त्यासि शिकवा विवेकें ॥ बाळा बोलविती निकें ॥ परि तो बाळ न
बोलेची ॥ ४१ ॥ हांसोनि ओंकार उच्चारी बाळ ॥ आणीक नेणें बोल केवळ ॥ विस्मय
करिती लोक सकळ ॥ ओंकार शब्द ऐकोनियां ॥ ४२ ॥ एक ह्मणती नवल झालें ॥ सर्व

ज्ञान असे भलें ॥ श्रवणीं ऐकतो बोल सगळे ॥ जाणूनी न बोले काय गुणें ॥ ४३ ॥ कांहीं केल्या न बोले सुत ॥ चिंता करिती मातापिता ॥ वर्षे सात झालीं तत्वता ॥ मुका झाला दैवयोगें ॥ ४४ ॥ सात वर्षे कुमरासी ॥ योग्य झाला मुंजीसी ॥ पुसते झाले ब्राह्मणांसी ॥ केवीं करावें ह्मणोनियां ॥४५॥ विप्र ह्मणती तया वेळां ॥ संस्कारावे ब्राह्मणकुळा ॥ उपनयनाविण केवळा ॥ अष्ट वरुषें होऊं नये ॥ ४६ ॥ माता पिता चिंता करिती ॥ उपदेशावें कवणे रीती ॥ मुका असे हा निश्चिती ॥ कैसें अदृष्ट झालें आह्मां ॥ ४७ ॥ कैसें अदृष्ट आपुलें ॥ ईश्वर गौरी आराधिलें ॥ त्रयोदशीस शिवा पूजिलें ॥ वायां झालें ह्मणतसे ॥ ४८ ॥ ईश्वरें तरी दिधला वरू ॥ सुलक्षण झाला कुमरू ॥ न बोले आतां काय करूं ॥ ह्मणोनि चिंती शिवासी ॥४९॥ एकचि बाळ आमुचे कुशीं ॥ आणीक न देखो स्वप्नेसी ॥ वेष्टिलों होतों आह्मी आशेसी ॥ आमुतें रक्षील ह्मणोनियां ॥ ५० ॥ नव्हेचि माझे मनींची आस ॥ पुत्र झाला निर्वाण वेष ॥ काय वर देत महेश ॥ शनिप्रदोषें पूजितां म्यां ॥५१ ॥ ऐसें नानारीति देख ॥ जननी करी महा दुःख ॥ जवळी येऊनी बाळक ॥ संबोखित मातेसी ॥५२॥ घरांत जाऊनि तये वेळां ॥ घेऊनि आला लोहार्गळा ॥ हातीं धरितांचि निर्मळा ॥ झालें सुवर्ण बावनकशी ॥५३॥ आणोनि देत असे मातेसी ॥ विस्मय करी बहुवसी ॥ बोलावुनियां पतीसी ॥ दाविती झाली ते वेळां ॥५४॥ गौप्य करूनि तया वेळां ॥ गृहांत नेलें तया बाळा ॥ पाहती तयाचीं बाललीळा ॥ आणीक लोह देती हातीं ॥ ५५ ॥ अमृतदृष्टी पाहतां ॥ लोह सुवर्ण होय तत्वता ॥ विश्वासोनी ह्मणती हा सर्वथा ॥ होईल पुरुष कारणिक ॥५६॥ मग पुत्रातें आलिंगोनी ॥ विनविताती जनकजननी ॥ तूं तारक बा शिरोम-

गु. च.

णी ॥ कारणिक पुरुष कुळदीपक ॥५७॥ तुझेनि सर्व सौख्य लाधलों ॥ मुका ह्मणोनि नि-र्बुजलों ॥ अज्ञान आवरणें वेष्टलों ॥ जनीं मुका ह्मणती तुज ॥५८॥ आमुचे मनींची वा-सना ॥ तुवां पुरवावी नंदना ॥ तुझे बोबडे-बोल आपणा ॥ ऐकावे वाटे पुत्रराया ॥५९॥ संज्ञा करोनि मातेसी ॥ बाळ दाखवी संतोषीं ॥ मौंजी बांधितां आपणासी ॥ येतील ह्मणे बोल सकळ ॥ ६० ॥ माता पिता संतोषती ॥ विद्वान ज्योतिषी पाचारिती ॥ व्रतबंधमुहूर्त पा-हती ॥ सर्व आइती करिते झाले ॥ ६१ ॥ केली सामग्री बहुतांपरी ॥ रत्नखचित अळं-कारी ॥ मायामोहें प्रीति करी ॥ समारंभ करिताती ॥ ६२ ॥ चतुर्वेदी ब्राह्मण येती ॥ शा-खापरत्वें वेद पढता ॥ इष्ट सोयरे दाईज गोती ॥ समस्त आले तया भवना ॥६३ ॥ नाना-परीचे शृंगार ॥ उभारिले मंडप अपार ॥ आनंद करीतसे द्विजवर ॥ अपार द्रव्य वेंचिता होय ॥ ६४ ॥ नगरलोक विस्मय करिती ॥ मुक्या पुत्रासी येवढी आइती ॥ द्विजा ला-गली असे भ्रांती ॥ द्रव्य वेंची वृथा आपुलें ॥ ६५ ॥ इतुकें वेंचूनी पुत्रासी ॥ व्रतबंध करील परियेसी ॥ गायत्री केवी उपदेशी ॥ करील आचार कवणेपरी ॥६६॥ एक ह्मण-ती होका भलतें ॥ मिष्टान्न स्वेच्छा आह्मां मिळतें ॥ देकार देईल हिरण्यवस्त्रें ॥ चाड नाहीं त्याच्या मंत्रा ॥ ६७ ॥ ऐसे नानापरी लोक ॥ विचार करिती अनेक ॥ मातापिता अत्यंत सुख ॥ देवदेवक करिताती ॥ ६८ ॥ चौलकर्म येरे दिवशीं ॥ भोजन चौलमणी-सी ॥ पुनरपि अभ्यंग करूनि हर्षी ॥ यज्ञोपवीत धारण केलें ॥ ६९ ॥ मंत्रपूर्वक यज्ञोप-वीत ॥ धारण करविती समस्त ॥ सहभोजन करावया गृहांत ॥ घेऊनियां गेली माता ॥ ७० ॥ भोजन करी मातेसवें ॥ निरोप घेत एका भावें ॥ मौंजीबंधन असें करावें ॥ ह्म-

णोनि आला पित्याजवळी ॥ ७१ ॥ विधियुक्त मार्ग मौंजी देखा ॥ बंधन केलें त्या बा-
लका ॥ सुमुहूर्त आला तत्काळिका ॥ मंत्रोपदेश करिता झाला ॥७२॥ गायत्रीमंत्र अनु-
क्रमेसी ॥ उपदेश देतां परियेसीं ॥ बाळ उच्चारी मनोमानसीं ॥ व्यक्त न बोले कवणा-
पुढें ॥ ७३ ॥ गायत्रीमंत्र कुमरासी होतां ॥ भिक्षा घेऊन आली माता ॥ वस्त्रें आभरण
रत्नखचिता ॥ देती झाली तया वेळीं ॥ ७४ ॥ पहिली भिक्षा घेऊनि करीं ॥ आ-
शीर्वचन देती नारी ॥ बाळा ऋग्वेद ह्मणोनि उच्चारी ॥ आचारधर्मं वर्ततसे ॥७५॥ पहिली
भिक्षा येणेंपरी ॥ देती जाहली प्रीतीकरीं ॥ अग्निमीळे ह्मणोनि उच्चारी ॥ ब्रह्मचारी तये
वेळीं ॥ ७६ ॥ दुसरी भिक्षा देत माता ॥ उच्चार केला यजुर्वेद इषेत्वा ॥ लोक समस्त तट-
स्था ॥ माथा तुकिती तये वेळीं ॥७७॥ तिसरी भिक्षा देत माता ॥ होय सामवेद पढता ॥
आग्नआयाहि गायन करितां ॥ वेद तीन ह्मणतसे ॥७८॥ सभा समस्त विस्मय करी ॥ पिता हर्ष
निर्भरी ॥ मुका बोले वेद चारी ॥ ह्मणती होईल कारणिक ॥७९॥ यातें ह्मणों नये नर ॥ होई-
ल देवांचा अवतार ॥ ह्मणोनि करिती नमस्कार ॥ जगद्गुरु समजोनी ॥ ८० ॥ इतुक्यावरी
तो बाळक ॥ मातेसि ह्मणतसे ऐक ॥ तुवां उपदेश केला एक ॥ भिक्षा माग ह्मणोनि ॥८१॥
नव्हेचि बोल तुझा मिथ्या ॥ निरोप द्यावा आह्मां त्वरिता ॥ निर्धार झाला माझिया
चित्ता ॥ जाऊं तीर्थें आचरावया ॥ ८२ ॥ आह्मा आचार ब्रह्मचारी ॥ भिक्षा करावी घ-
रोघरीं ॥ वेदाभ्यास मनोहरी ॥ करणें असे परियेसा ॥ ८३ ॥ ऐकोनि पुत्राचें वचन ॥
दुःखें दाटली अतिगहन ॥ उदकें भरले असती नयन ॥ आली मूर्च्छना तया वेळीं ॥ ८४ ॥
निर्जीव होऊनि क्षणैक ॥ करिती झाली महाशोक ॥ पुत्रा माझा तूं रक्षक ॥ केली आशा

बहु मनीं ॥ ८५ ॥ आमुतें रक्षिसी ह्मणोनी ॥ होती आशा बहु मनीं ॥ न बोलसी आतां काय गुणीं ॥ मुकें ह्मणविसी आपणासी ॥ ८६ ॥ नायकों कधीं तुझिया बोला ॥ आतां ऐकतां संतोष झाला ॥ पूजनें ईश्वर फळला ॥ ह्मणोनि विश्वास केला आह्मीं ॥ ८७ ॥ ऐसें नानापरी देखा ॥ पुत्रासि ह्मणतसे बाळिका ॥ आलिंगोनियां कुमारका ॥ कृपा भाकी तये वेळीं ॥ ८८ ॥ ऐकोनि मातेचें वचन ॥ बाळक सांगे ब्रह्मज्ञान ॥ नको दुखवूं अंतःकरण ॥ आह्मां करणें तेंचि असे ॥ ८९ ॥ तूतें आणीक पुत्र चारी ॥ होतील माते निर्धारीं ॥ तुझी सेवा परोपरी ॥ करिती मनोभावेंसी ॥ ९० ॥ तुवां आराधिला शंकर ॥ जन्मांतरीं पूर्वापार ॥ ह्मणोनि ठेविला मस्तकीं कर ॥ मग जाहली जातिस्मृती ॥ ९१ ॥ पूर्वजन्मींचा वृत्तांत ॥ स्मरती जाहली समस्त ॥ मग जाहली विस्मित ॥ श्रीपादवल्लभ जाणोनी ॥ ९२ ॥ देखोनि माता तया वेळा ॥ नमन केलें चरणकमळा ॥ श्रीपादें उठवूनि अवलीळा ॥ सांगती गौप्य अवधारा ॥ ९३ ॥ ऐक माते ज्ञानवंती ॥ हा बोल करीहो गुप्ती ॥ संन्यासी आह्मी यती ॥ अलिप्त असों संसारीं ॥ ९४ ॥ याचि कारणें आह्मी आतां ॥ हिंडूं समस्त तीर्थयात्रा ॥ कारण असे पुढें तत्वतां ॥ ह्मणोनि निरोप मागती ॥ ९५ ॥ येणेपरी जननीसी ॥ गुरुमूर्ती सांगती विनयेंसीं ॥ माता बोलत पुत्रासी ॥ श्रोते सावध परियेसा ॥ ९६ ॥ पुत्रासी विनवी तये वेळ ॥ आह्मां सांडूनि जाशील ॥ आणीक डोळां न देखों बाळ ॥ केविं वांचों पुत्रराया ॥ ९७ ॥ धाकुटपणीं तुह्मी तापस ॥ कोण धर्म असे हर्ष ॥ धर्मशास्त्र ख्याती सुरस ॥ आश्रम चारी आचरावे ॥ ९८ ॥ ब्रह्मचर्य वर्षें बारा ॥ गृहस्थाश्रम तदनंतरा ॥ घडती पुण्यें अपरंपारा ॥ गृहस्थाश्रमीं सुख असे ॥ ९९ ॥ मुख्य

आश्रम असे गृहस्थ ॥ आचरतां होय अतिसमर्थ ॥ संन्यास घ्यावा मग मुख्यार्थ ॥ धर्म-
शास्त्र येणेंपरी ॥ १०० ॥ ब्रह्मचर्य मार्ग ऐका ॥ पठण करावें वेदादिकां ॥ विवाह होतां
गृहस्थें निका ॥ पुत्रादिक लाधावे ॥ १ ॥ यज्ञादि कर्म साधोनियां ॥ तदनंतर संन्यास
न्याया ॥ येणेंविधी आचरोनियां ॥ अग्राह्य संन्यास बाळपणीं ॥ २ ॥ समस्त इंद्रियें सं-
तोषवावीं ॥ मनींची वासना पुरवावी ॥ नंतर तपाची वाट धरावी ॥ संन्यास घेतां मुख्य
असे ॥ ३ ॥ ऐकोनि मातेचें वचन ॥ गुरु सांगती तत्त्वज्ञान ॥ नामधारका सुमन ॥ करू-
नि ऐका ह्मणे सिद्ध ॥ ४ ॥ गंगाधराचा नंदन ॥ श्रोतयां सांगे नमून ॥ परिसा तुह्मी स-
मस्त जन ॥ गुरुचरित्र विस्तार ॥ ५ ॥ पुढें वर्तलें अपूर्व ऐका ॥ सिद्ध सांगे नामधारका ॥
महाराष्ट्र भाषा करूनि टीका ॥ सांगे सरस्वती गंगाधर ॥ ६ ॥ इति श्रीगुरुचरित्रपरमक-
थाकल्पतरौ श्रीनृसिंहसरस्वत्युपाख्याने सिद्धनामधारकसंवादे श्रीपादावतारबालचरित्रं
नाम एकादशोऽध्यायः ॥ ओंव्या १०६ ॥



॥ श्रीगणेशाय नमः ॥ श्रीगुरु म्हणती मातेसी ॥ आह्मां ऐसा निरोप देसी ॥ अनित्य शरीर तूं जाणसी ॥ काय भरंवसा जीवित्वाचा ॥ १ ॥ श्लोक ॥ अनित्यानि शरीराणि वैभवं नैव शाश्वतम् ॥ नित्यः सन्निहितो मृत्युः कर्तव्यो धर्मसंग्रहः ॥ २ ॥ टीका ॥ एखादा असेल चिरंजीवी ॥ त्यासी तुझी बुद्धि बरवी ॥ अनित्य देह वैभव भावीं ॥ पुढें कोणा भरंवसा ॥ ३ ॥ देह असे क्षणभंगुर ॥ नाहीं राहिले कवण स्थिर ॥ जोंवरी दृढ शरीर ॥ पुण्य मार्ग रहाटावे ॥ ४ ॥ जो मृत्यूसी जिंकित ॥ त्याणें निश्चयावें शरीर नित्य ॥ त्यासि तवोपदेश सत्य ॥ ह्मणे धर्म करीन पुढें ॥ ५ ॥ अहोरात्र आयुष्य उणें ॥ होतसे क्षणक्षणें ॥ करावा धर्म याचि कारणें ॥ पूर्ववयासी परियेसा ॥ ६ ॥ जैसा सूर्यरथ चाले ॥ निमिष होतां शीघ्रकाळें ॥ बावीस सहस्र गांव पळे ॥ तैसें आयुष्य क्षीण होय ॥ ७ ॥ अल्पोदकीं जैसे मत्स्य ॥ तैसा मनुष्य अल्पायुष्य ॥ जोंवरी प्राण सुरस ॥ धर्म करावा परियेसी ॥ ८ ॥ पर्जन्य पडतां वृक्षावरी ॥ उदक राहे पर्णाग्रीं ॥ स्थिर नव्हे निर्धारीं ॥ सवेंचि पडे भूवरी ॥ ९ ॥ तेवीं शरीर नव्हे स्थिर ॥ जीवित्व यौवन साचार ॥ जरामरण निर्धार ॥ केधवां पडे न कळेची ॥ १० ॥ याचि कारणें देहासी ॥ विश्वास नये परियेसी ॥ मृत्यु असे देहासी ॥ धर्म करावा तात्काळीं ॥ ११ ॥ पिकलें पान वृक्षा जैसें ॥ लागलें असे सूक्ष्मदशें ॥ तैसेंचि शरीर भरंवसें ॥ केधवां पडेल न कळेची ॥ १२ ॥ एखादा नर कलत्रासी ॥ द्रव्य देतां परियेसी ॥ दिवस गणना करी कैसी ॥ तैसा यम रात्रंदिवस ॥ १३ ॥ जैशा समस्त नद्या देखा ॥ समुद्रासी घेऊनी जाती उदका ॥ परतोनि न येती जन्मभूमिका ॥ तैसें आयुष्य न परते ॥ १४ ॥ अहोरात्री जाती पळोन ॥ ऐसें निश्चयें जाणोन ॥

पुण्य न करिती जे जन ॥ पशुसमान परियेसी ॥ १५ ॥ जया दिवशीं पुण्य नाहीं ॥ वृथा गेला दिवस पाही ॥ तया यमा करुणा नाहीं ॥ करावें पुण्य तात्काळीं ॥ १६ ॥ पुत्र दारा धन गोधन ॥ आयुष्य गृह येणें गुण ॥ जे जन मानिती निश्चय ह्मणोन ॥ ते पशुसम परियेसी ॥ १७ ॥ जैशी सुसरी मनुष्यासी ॥ भक्षिती होय परियेसी ॥ तैसें या शरीरासी ॥ वार्धक्य भक्षी परियेसा ॥ १८ ॥ याकारणें तारुण्यपणीं ॥ करावें पुण्य विद्वज्जनीं ॥ आह्मां कां वर्जिसी जननी ॥ काय बुद्धि बरवी असे ॥ १९ ॥ जो यमाचा असेल इष्ट ॥ त्याणें करावा हा हट्ट ॥ अमर असेल जो सुभट ॥ त्याणें पुढें धर्म करणें ॥ २० ॥ संसार ह्मणजे स्वप्नापरी ॥ जैसें पुष्प असे मोगरी ॥ सर्वेंचि होय शुष्कवारी ॥ तयापरी देह जाणा ॥ २१ ॥ जैशी वीज असे लवत ॥ सर्वेंचि होय गुप्त ॥ त्याचिपरी देह होत ॥ स्थिर नव्हे परियेसा ॥ २२ ॥ ऐसा नानापरी देखा ॥ बोधिता झाला जनका ॥ विस्मय वाटे सभालोकां ॥ बाळ तत्त्व केवीं सांगे ॥ २३ ॥ ऐकोनि पुत्राचें वचन ॥ माता करीतसे नमन ॥ देवा निरोपिलें ज्ञान ॥ विनंती माझी परियेसी ॥ २४ ॥ त्वां निरोपिले आह्मांसी ॥ पुत्र चौघे होती कुशीं ॥ विश्वास नव्हे गा मानसीं ॥ कुळदेवता पुत्रराया ॥ २५ ॥ जोंवरी होय एक सुत ॥ त्वां रहावें समीपत ॥ निरोप नेदीं तोंवरी सत्य ॥ ह्मणोनि विनवी ते वेळीं ॥ २६ ॥ माझें वचन लंघूनी ॥ जरी जाशील निघोनी ॥ मी प्राण देईन तत्क्षणीं ॥ हा निश्चय अवधारा ॥ २७ ॥ पुत्र नव्हे तूं आम्हांसी ॥ आमुचा कुळदैवत होसी ॥ सत्य करी गा वचनासी ॥ बोल आपुले दातारा ॥ २८ ॥ ऐकोनि मातेचें वचन ॥ श्रीगुरु बोलती हांसोन ॥ आमुचा बोल सत्य जाण ॥ तुझें वाक्य निर्धारीं पां ॥ २९ ॥ तूतें होतांचि पुत्र

दोनी ॥ निरोप द्यावा संतोषोनी ॥ मग न राहे ऐक जननी ॥ बोल आपुले सत्य करी ॥ ३० ॥ संवत्सर एक तव घरीं ॥ राहीन माते निर्धारीं ॥ वासना पुरविलियावरी ॥ मग मज आज्ञा देणें ॥ ३१ ॥ ऐसें बोलूनि निगुती ॥ राहिले श्रीगुरु अति प्रीतीं ॥ वेदाभ्यासें ख्याती ॥ केली शिष्यवर्गेसीं ॥ ३२ ॥ नगरलोक विस्मय करिती ॥ नवल झालें ऐसें बोलती ॥ बाळ पहा वर्ष साती ॥ वेद चारी सांगतसे ॥ ३३ ॥ विद्वज्जन विद्यार्थी ॥ तीन वेळां पढों येती ॥ सकळ शास्त्री जे ह्मणविती ॥ तेही येती शिकावया ॥ ३४ ॥ येणेंपरी त्या घरीं ॥ राहिले श्रीगुरु प्रीतिकरी ॥ माता झाली गरोदरी ॥ महानंद करीतसे ॥ ३५ ॥ नित्य पूजिती पुत्रासी ॥ देव मानोनी मातेसीं ॥ निधान लाधलें एखाद्यासी ॥ काय सांगूं संतोष त्यांचा ॥ ३६ ॥ नवमास होतांचि त्वरित ॥ माता झाली प्रसूत ॥ पुत्र झाले युग्म-ख्यात ॥ अति सुंदर परियेसा ॥ ३७ ॥ पुत्र जाहले उल्हास थोर ॥ मातापित्यां संतोष फार ॥ आशीर्वचन निर्धार ॥ असत्य नव्हे देवाचें ॥ ३८ ॥ याकारणें गुरुवचन ॥ सत्य माना हो विद्वज्जन ॥ जैसें असेल अंतःकरण ॥ तैसें होईल परियेसा ॥ ३९ ॥ ऐशापरी वर्ष एक ॥ त्रिमासी झाले ते बाळक ॥ खेळवीतसे माता ऐक ॥ आले श्रीगुरु त्यांजवळी ॥ ४० ॥ जननी ऐकावें माझे वचना ॥ झाली तव मनकामना ॥ दोघे पुत्र निधाना ॥ पूर्णायुषी जन्मले ॥ ४१ ॥ आणिक होती दोघे कुमरक ॥ त्यानंतर कन्या एक ॥ असाल नांदत अत्यंत सुख ॥ वासना पुरेल तुमची जाणा ॥ ४२ ॥ आतां आम्हातें निरोप द्यावे ॥ जातों आम्ही स्वभावें ॥ संतोषरूपी असावें ॥ म्हणोनि निरोप घेती ॥ ४३ ॥ संतोषोनी मातापिता ॥ चरणावरी ठेविती माथा ॥ स्वामी आमुची कुलदेवता ॥ अशक्य आह्मी

बोलाया ॥ ४४ ॥ नकळे आह्मां स्वरूपज्ञान ॥ काय ओळखों तुझी खूण ॥ मायामोहें वें-
ष्टोन ॥ आम्ही नेणों महिमान ॥ ४५ ॥ मायाप्रपंचें वेष्टोनी ॥ तूतें आह्मीं सुत ह्मणोनी ॥
निष्ठुर बोलों एके क्षणीं ॥ क्षमा करणें स्वामिया ॥ ४६ ॥ सहभोजन शयनासनीं ॥ तूतें
गांजों कोंडोनी ॥ कडे न घेचि उचलोनी ॥ क्षमा करी स्वामिया ॥ ४७ ॥ तारक आमु-
चे वंशासी ॥ बापा तूं अवतरलासी ॥ प्रदोषपूजा फळासी ॥ आली मातें स्वामिया ॥४८॥
आतां आम्हां काय गती ॥ सांगा स्वामी श्रीगुरुमूर्ती ॥ यातायात न पावे वृत्ती ॥ कृपा
करी देवराया ॥४९॥ सगरावरी जैसी गंगा ॥ घेवोनि आली उदक चांगा ॥ पावन केलें
आमुच्या अंगा ॥ उभय कुळ बेचाळीस ॥ ५० ॥ आम्हां देविसी कवणेपरी ॥ महाधुरंधर
संसारीं ॥ तव दर्शन होय जरी ॥ तरीच वांचों आत्मजा ॥ ५१ ॥ ऐकोनि मातापित्याचें
वचन ॥ श्रीगुरु बोलती आपण ॥ जे जे समयीं तुमचें मन ॥ स्मरण करील आमुचें ॥५२॥
स्मरण करितां तुम्हांजवळी ॥ येईन मी तात्काळीं ॥ न करी चिंता वेळोंवेळीं ॥ म्हणोन
भाक देतसे ॥ ५३ ॥ आणिक कन्या पुत्र तीनी ॥ होतील ऐक भवानी ॥ दैन्य नाहीं तव
भवनीं ॥ सदा श्रीमन्त नांदाल ॥ ५४॥ जन्मांतरीं ईश्वरासी ॥ पूजा केली प्रदोषीं ॥ याची
महिमा आहे ऐसी ॥ जन्मोजन्मीं श्रीयुक्त ॥ ५५ ॥ इहजन्मीं सौख्य ऐका ॥ देहांतीं परम
लोका ॥ पूजा करितां पिनाका ॥ पूनर्जन्म नसे कीं ॥५६॥ त्वां आराधिला शंकर ॥ आह्मां
करविला अवतार ॥ वासना पुरविली तुझी जर ॥ आम्हांसी निरोप दे आतां ॥५७॥ पुन्हा
दर्शन तुम्हांसी ॥ होईल एकवीस वर्षांसी ॥ जावोनी बदरीवनासी ॥ सिद्धदर्शन मी घेतों
॥५८॥ निरोप घेवोनी तये वेळां ॥ श्रीगुरु निघाले अवलीळा ॥ नगरलोक येती सकळा ॥

मातापिता बोळविती ॥५९॥ म्हणती समस्त नरनारी ॥ तपासी निघाला ब्रह्मचारी ॥ होईल पुरुष अवतारी ॥ मनुष्यदेहीं दिसताहे ॥ ६० ॥ एक ह्मणती पहाहो नवल ॥ तपासी निघाला बाळ ॥ पिता माता सकळ ॥ निरोप देती कौतुकें ॥ ६१ ॥ कसें यांचें अंतःकरण ॥ जैसा हो का पाषाण ॥ मन करोनि निर्वाण ॥ बोळविती पुत्रासी ॥ ६२ ॥ एक ह्मणती नव्हे बाळ ॥ वंद्य जैसा जाश्वनीळ ॥ अनुमान नसे निश्चळ ॥ वेद केवीं ह्मणतसे ॥६३॥ सात वर्षांचें बाळ देखा ॥ वेद ह्मणतो अखिल शाखा ॥ मनुष्यमात्र नव्हे निका ॥ ऐसें बोलती साधुजन ॥ ६४ ॥ ऐसें बोलोनि वचन ॥ करिती साष्टांग नमन ॥ नानापरी स्तोत्रवचन ॥ करिते झाले अवधारा ॥६५॥ नमन करोनि सकळिक ॥ आले आपुले गृहांतिक ॥ पुढें जाती जननीजनक ॥ पुत्रासवें बोळवीत ॥ ६६ ॥ निजरूप जननीसी ॥ दाविता झाला मातेसी ॥ श्रीपादवल्लभ दत्तात्रेयासी ॥ देखते झाले जनकजननी ॥ ६७ ॥ त्रिमूर्तीचा अवतार ॥ झाला नरहरी नर ॥ निजरूपी कर्पूरगौर ॥ पहातां नमीं चरणासी ॥६८॥ जय जय जगद्गुरू ॥ त्रिमूर्तीचा अवतारू ॥ आमचें पुण्य होतें थोरू ॥ ह्मणोनि देखिले तुझे चरण ॥६९॥ तूं तारक विश्वासी ॥ आम्हां उद्धरिलें विशेषीं ॥ पुनर्दर्शन आह्मांसी ॥ द्यावें ह्मणोनी नमस्कारिती ॥७०॥ ऐसें ह्मणोनि मातापिता ॥ चरणावरी ठेविला माथा ॥ आलिंगिती श्रीगुरुनाथा ॥ स्नेहभावें करूनियां ॥७१॥ संतोष मानी श्रीगुरुमूर्ती ॥ आश्वासन केलें अतिप्रीती ॥ पुनर्दर्शन हो निश्चिती ॥ देईन ह्मणती तये वेळां ॥ ७२ ॥ ऐसें तयां संबोखोनी ॥ निरोप घेतला तये क्षणीं ॥ परतोनि गेली जनकजननी ॥ येती संतोषें मंदिरा ॥७३॥ वरदमूर्ती गुरुराणा ॥ निघाले जावया बदरीवना ॥ पातले आनंदकानना ॥ वारा-

णसी क्षेत्रासी ॥ ७४ ॥ अविमुक्त वाराणसी पुरी ॥ क्षेत्र थोर चराचरी ॥ विश्वेश्वर अवधारीं ॥ अनुपम्य असे त्रिभुवनीं ॥७५॥ राहोनियां त्या स्थानीं ॥ अनुष्ठान करिती श्रीगुरुशिरोमणी ॥ विश्वेश्वराचे दर्शनीं ॥ करिती आत्माराम ॥७६॥ येणेंपरीं त्या स्थानीं ॥ क्वचित्काळ क्रमोनी ॥ अष्टांग योगेंकरूनी ॥ तप करिती परियेसा ॥७७॥ तया काशीनगरांत ॥ तपस्वी असती अणिक बहुत ॥ संन्यासी यती अवधूत ॥ तप करिती अनुष्ठानें ॥७८॥ त्यामाजी श्रीगुरु ब्रह्मचारी ॥ योगाभ्यास धुरंधरी ॥ देखोनियां तापसी येरी ॥ नवल करिती मनांत ॥७९॥ ह्मणती पहाहो ब्रह्मचारी ॥ तप करितो नानापरी ॥ कैसें वैराग्य याचे उदरीं ॥ ठसावलें असे निर्लिप्त ॥ ८० ॥ शरीरस्वार्थ नाहीं यासी ॥ योगी होय हा संन्यासी ॥ स्नान करितो त्रिकाळेंसी ॥ मनकर्णिकेमाझारीं ॥ ८१ ॥ ऐसें अमित स्तोत्र करिती ॥ सकळ संन्यासी दर्शन घेती ॥ वृद्ध होता एक यती ॥ नांव तया कृष्णसरस्वती ॥८२॥ तो केवळ ब्रह्मज्ञानी ॥ तपस्वी असे महामुनी ॥ तो देखोनियां नयनीं ॥ स्नेहभावें भावितसे ॥८३ ॥ ह्मणे सकळ यतीश्वरांसी ॥ न म्हणा नरू ब्रह्मचारी यासी ॥ अवतारपुरुष अतितापसी ॥ विश्ववंद्य दिसतसे ॥८४॥ वार्धक्यपणें आह्मासी ॥ वंदितां भूषण सकळांसी ॥ विशेष आह्मी संन्यासी ॥ मूर्खजन निंदिती ॥८५॥ वय धाकुटें ह्मणोनी ॥ नमन करा हो तुह्मी मुनी ॥ प्रख्यात मूर्ति त्रिभुवनीं ॥ आम्हां वंद्य असे देखा ॥ ८६ ॥ याकारणें आह्मी यासी ॥ विनवूं परोपकारासी ॥ संन्यास देतां समस्तांसी ॥ मति स्थिर होईल ॥८७॥ लोकानुग्रहानिमित्त ॥ हा होय गुरु समर्थ ॥ याचें दर्शनमात्रें पतित ॥ पुनीत होती परियेसा ॥८८॥ याकारणें बाळकासी ॥ विनवूं आह्मी निश्चयेंसी ॥ आश्रम द्यावा

संन्यासी ॥ पूजा करूं एकभावें ॥८९॥ ह्मणोनि आले त्याजवळी॥ विनविताती मुनि सकळीं ॥ ऐक तापसी सोममौळी ॥ विनंती असे परियेसा ॥९०॥ लोकानुग्रहाकारणें ॥ तुह्मी आतां संन्यास घेणें ॥ आह्मांलागी उद्धरणें ॥ पूजा घ्यावी आह्मांकरीं ॥९१॥ कलियुगीं संन्यासी ह्मणोन ॥ निंदा करिती सकळ जन ॥ स्थापना करणार कवण ॥ भूमीवरी न दिसताती ॥९२॥ श्लोक ॥ अग्निहोत्रं गवालंबं संन्यासं पलपैतृकम् ॥ देवराच सुतोत्पत्तिः कलौ पंच विवर्जयेत् ॥ ९३ ॥ टीका ॥ यज्ञदान गवालंभन ॥ संन्यास घेतां अतिदूषण ॥ पलपैतृक भ्रातरंगना जाण ॥ करूं नये ह्मणताती ॥ ९४ ॥ करितां या कलियुगांत ॥ निषिद्ध बोलती जन समस्त ॥ संन्यासमार्ग सिद्धांत ॥ वेदसंमत विख्यात ॥ ९५॥ पूर्वीं ऐसें वर्तमानीं ॥ निषिद्ध केलें सकळ जनीं ॥ शंकराचार्य अवतरोनी ॥ स्थापना केली परियेसा ॥ ९६ ॥ त्यावरी इतुके दिवस ॥ चालत आला मार्ग संन्यास ॥ कलि प्रबल होतां नाश ॥ पुनरपि निंदा करिताती ॥९७॥ आश्रमाचा उद्धार ॥ सकळ जना उपकार ॥ करावया कृपासागर ॥ म्हणती सकळ मुनिवर ॥ ९८ ॥ ऐकोनि त्यांची विनंती ॥ गुरुमुनि आश्रम घेती ॥ वृद्ध कृष्ण सरस्वती ॥ तयापासोनी परियेसा ॥९९॥ ऐसें ह्मणती सिद्धमुनी ॥ विनवीतसे नामकरणी ॥ संदेह होतो माझे मनीं ॥ कृपामूर्ति गुरुराया ॥१००॥ ह्मणती श्रीजगद्गुरू ॥ यातें झाला आणीक गुरू ॥ त्रिमूर्तीचा अवतारू ॥ कोणेपरी दिसत असे ॥१॥ सिद्ध म्हणे शिष्यासी ॥ सांगेन त्यांची स्थिति कैसी ॥ पूर्वीं श्रीरघुनाथासी ॥ झाला वसिष्ठ केविं गुरू ॥२॥ आठवा अवतार कृष्णासी ॥ संदीपन गुरु परियेसी ॥ अवतार होतांचि मानुषी ॥ तयापरी रहाटावें ॥३॥ याकारणें गुरुमूर्ती ॥ गुरु केला कृष्णसर-

स्वती ॥ बहुकाळींचा होता यती ॥ ह्मणोनि त्यांतें मानिलें ॥ ४ ॥ शिष्य ह्मणे सिद्धासी ॥ स्वामी कथा निरोपिलीसी ॥ वृद्ध कृष्णसरस्वतीसी ॥ गुरु केलें ह्मणोनियां ॥ ५ ॥ समस्त यतीश्वराहून ॥ तया दिधला बहुमान ॥ कृष्णसरस्वती पूर्वीं कोण ॥ कोण गुरूचें मूळपीठ ॥६॥ विस्तारोनि आह्मांसी ॥ निरोपावें कृपेसीं ॥ येणें माझे मानसीं ॥ संतोष होय स्वामियां ॥७॥ ऐसें शिष्य विनवितां ॥ सांगे सिद्ध विस्तारता ॥ मूळपीठ आद्यंता ॥ गुरुसंतति परियेसा ॥८॥ पूर्वपीठ शंकरू ॥ त्यानंतर विष्णुगुरू ॥ त्यावरी चतुर्वक्त्रु ॥ गुरुपीठ अवधारीं ॥९॥ तदनंतर वसिष्ठगुरू ॥ तेथोनि शक्ति पराशरू ॥ त्याचा शिष्य व्यास थोरू ॥ जो का अवतार विष्णूचा ॥ १० ॥ तयापासोन शुक जाण ॥ गोडपाद आचार्य सगुण ॥ आचार्य गोविंद तयाहून ॥ पुढें आचार्य शंकर झाले ॥११॥ तेथोनि विश्वरूपवर्या ॥ पुढें ज्ञानबोधगिरिया ॥ त्याचा शिष्य सिद्धगिरिया ॥ ईश्वरतीर्थ पुढें झाले ॥ १२ ॥ तदनंतर नृसिंहतीर्थ ॥ पुढें शिष्य विद्यातीर्थ ॥ शिवतीर्थ भारतीतीर्थ ॥ गुरुसंतती अवधारा ॥१३॥ मग त्यापासोनी ॥ विद्यारण्य श्रीपादमुनी ॥ विद्यातीर्थ ह्मणोनी ॥ पुढें झाला परियेसी ॥१४॥ त्याचा शिष्य मलयानंद ॥ देवतीर्थ सरस्वतीवृंद ॥ तेथोनि सरस्वती यादवेंद्र ॥ गुरूपीठ येणेंपरी ॥ १५ ॥ यादवेंद्र मुनीचा शिष्य ॥ कृष्णसरस्वती विशेष ॥ बहुकाळींचा होता संन्यास ॥ तेणें विशेष मानिती ॥ १६ ॥ येणेंपरी श्रीगुरुनाथ ॥ आश्रम घेती चतुर्थ ॥ संन्यासमार्गस्थापनार्थ ॥ नृसिंहसरस्वती ॥१७॥ समस्त वेदांचा अर्थ ॥ सांगते झाले श्रीगुरुनाथ ॥ म्हणोनि वंदिती समस्त ॥ तया काशीपुरीं ॥१८॥ ख्याती झाली अति गहनी ॥ त्या वाराणसीभुवनीं ॥ येती समस्त देखोनी ॥ सेवा करिती श्रीगुरूची ॥१९॥ मग

निघाले तेथोनी ॥ बहु शिष्य सर्वे घेवोनी ॥ उत्तरपथ बदरीवनीं ॥ अनंत तीर्थें पहावया
॥२०॥ सव्य घालूनि मेरूसी ॥ तीर्थें नवखंड क्षितीसी ॥ सांगतां विस्तार बहुवसी ॥ ऐक
शिष्या नामकरणी ॥२१॥ समस्त तीर्थें अवलोकित ॥ सर्वे शिष्य येती बहुत ॥ भूमीप्रद-
क्षिणा करित ॥ आले गंगासागरासी ॥२२॥ सिद्ध ह्मणे नामांकिता ॥ समस्त तीर्थें सांग-
तां ॥ विस्तार होईल बहुकथा ॥ तावन्मात्र सांगतों ॥२३॥ सकळ महिमा सांगावयासी ॥
शक्ति कैंचि आम्हांसी ॥ अनंत महिमा त्रिमूर्तीसी ॥ गुरुचरित्र परियेसा ॥२४॥ गंगासा-
गरापासाव ॥ तटाकयात्रा करिती देव ॥ प्रयागस्थानीं गुरुराव ॥ येते झाले परियेसा
॥२५॥ तया स्थानीं असतां गुरू ॥ आला एक द्विजवरू ॥ माधव नामा विप्र थोरू ॥ श्री-
गुरूसी भेटला ॥२६॥ ब्रह्मज्ञान तयासी ॥ उपदेश केला परियेसी ॥ चतुर्थाश्रम त्यासी ॥
देते झाले परियेसा ॥ २७ ॥ नाम माधव सरस्वती ॥ तया शिष्या ठेविती ॥ त्यावरी बहु
प्रीती ॥ शिष्यांमध्यें परियेसा ॥२८॥ सिद्ध ह्मणे नामकरणी ॥ शिष्य झाले बहुत गुणी ॥
अखिल यती नामकरणी ॥ पुढें विचारणी होईल ॥ २९ ॥ गंगाधराचा नंदनू ॥ सांगे गुरु-
चरित्र कामधेनू ॥ ऐकतां होय महाज्ञानू ॥ लाधती चारी पुरुषार्थ ॥ ३० ॥ इति श्रीगुरुच-
रित्रामृत ॥ गुरुपरंपरा विख्यात ॥ सांगितला निश्चितार्थ ॥ द्वादश प्रश्नीं श्रोतयांसी ॥३१॥
इति श्रीगुरुचरित्रपरमकथाकल्पतरौ श्रीनृसिंहसरस्वत्युपाख्याने सिद्धनामधारकसंवादे
गुरुपरंपराकथनद्वादशप्रश्नं नाम द्वादशोऽध्यायः ॥ ओंव्या १३१ ॥

॥ श्रीगणेशाय नमः ॥ नामधारक शिष्यराणा ॥ लागे सिद्धाचिया चरणा ॥ करसंपुट जोडोनि जाणा ॥ विनवीतसे परियेसा ॥१॥ जयजयाजी सिद्धमुनी ॥ तूं तारक भवार्णी॥ सांगितलें ज्ञान प्रकाशोनी ॥ परिसोनि मना सुख झालें ॥२॥ गुरुचरित्र कथामृत ॥ सेवितां तृष्णा अधिक होत ॥ शमन करणार समर्थ ॥ तूंचि एक कृपानिधी ॥ ३ ॥ गुरुचरित्र कामधेनू ॥ सांगितलें तुम्हीं विस्तारोनू ॥ तृप्त नव्हे माझें मनू ॥ आणिक अपेक्षा होतसे ॥४॥ क्षुधेनें पीडिलें ढोर ॥ जैसें पावे तृणबिढार ॥ त्यातें होय मनोहर ॥ नवचे तेथोनी परियेसा ॥५॥ येखादा न देखे तक्र स्वप्नीं ॥ त्यासी मिळे क्षीरभरणी ॥ नव्हे त्याचें मन धनी ॥ केवीं सांडी तो ठावो ॥ ६ ॥ तैसा आपण स्वल्पज्ञानी ॥ नेणत होतों गुरुनिर्वाणीं ॥ अविद्या माया वेष्टोनी ॥ कष्टत होतों स्वामियां ॥७॥ अज्ञानतिमिर रजनीसी ॥ ज्योतिस्वरूप तूंचि होसी ॥ प्रकाश केला गा आह्मासी ॥ निजस्वरूप श्रीगुरूचें ॥८॥ तुवां केलें उपकारासी ॥ उत्तीर्ण काय होऊं सरसी ॥ कल्पवृक्ष दिलीयासी ॥ प्रत्युपकार काय द्यावा ॥९॥ एखादा देतां चिंतामणी ॥ त्यासि उपकार काय धरणी ॥ नाहीं दिलें न ऐकों कानीं॥ कृपामूर्ती सिद्धराया ॥ १० ॥ ऐशा तवोपकारासी ॥ उत्तीर्ण न व्हावें वंशोवंशीं ॥ ह्मणोनि लागतसे चरणासी ॥ एकभावें करोनियां ॥११॥ स्वामी निरोपिले धर्मार्थ ॥ अधिक झालें मज स्वार्थ ॥ उपजला मज परमार्थ ॥ गुरुभजनीं निरंतर ॥१२॥ प्रयागीं असतां गुरुमूर्ती ॥ माधवसरस्वतीस दीक्षा देती ॥ पुढें काय वर्तली स्थिती ॥ तें आह्मांप्रती विस्तारिजे ॥१३॥ ऐकोनि शिष्याचें वचन ॥ सिद्धमुनी संतोषोन ॥ मस्तकीं हस्त ठेवोन ॥ आश्वासित ते वेळीं ॥१४॥ धन्य शिष्या सगुण ॥ तुज लाधले गुरुचरण॥ संसारतारक भवार्ण ॥ तूंचि एक

परियेसा ॥१५॥ त्वां ओळखिली गुरुसोय ॥ ह्मणोनि बोलती गुरुराय ॥ संतोष होतो आनं-
दमय ॥ तव प्रश्न ऐकोनियां ॥१६॥ सांगेन ऐक एकचित्तें ॥ चरित्र गुरूचें विख्यातें ॥ उ-
पदेशोनि माधवातें ॥ होते तेथें क्वचित्काळ ॥१७॥ असतां तेथें वर्तमानीं ॥ प्रख्यात झाली
महिमा सगुणी ॥ शिष्य झाले अपार मुनी ॥ मुख्य माधवसरस्वती ॥१८॥ त्या शिष्यांचीं
नामें सांगतां ॥ विस्तारेल बहुत कथा ॥ प्रख्यात नामें असती सात ॥ सांगतों ऐक एकचित्तें
॥१९॥ बाळसरस्वती कृष्णसरस्वती ॥ उपेंद्रमाधवसरस्वती ॥ चवथा असे आणिक यती ॥
सदानंदसरस्वती देखा ॥२०॥ ज्ञानज्योतिसरस्वती एक ॥ सातवा सिद्ध आपण एक ॥ अ-
पार होते शिष्य अणिक ॥ एकाहोनी एक श्रेष्ठ पैं ॥२१॥ त्या शिष्यांसमवेत ॥ गुरु लंघित
दक्षिणपथ ॥ समस्त क्षेत्रें पावन करित ॥ आले करंज नगरासी ॥२२॥ भेटी झाली जनक-
जननी ॥ येवोनि लागती चरणीं ॥ चतुर्वर्ग भ्राता भगिनी ॥ समस्त भेटती स्वामिया ॥२३॥
देखोनि गुरुमूर्तीसी ॥ नगरलोक अत्यंत हर्षी ॥ आले सकळ भेटीसी ॥ पूजा करिती प-
रोपरी ॥२४॥ घरोघरीं श्रीगुरूसी ॥ पाचारिती भिक्षेसी ॥ जाले स्वरूपी बहुवर्सी ॥ घरो-
घरीं घेती पूजा ॥२५॥ समस्त विस्मय करिती ॥ अवतार विष्णु हा निश्चिती ॥ वेषधारी
दिसे यती ॥ परमपुरुष होय जाणा ॥२६॥ यातें नर जे बोलती ॥ ते जाती नरकाप्रती ॥
कार्याकारण अवतार होती ॥ ब्रह्मा विष्णु महेश ॥ २७ ॥ जननीजनक येणेंरीती ॥ पूजा
करिती भावभक्ती ॥ श्रीगुरु झाले श्रीपादयती ॥ झाली स्मृती जननीसी ॥ २८ ॥ जननी
देखोनि तये वेळीं ॥ माथा ठेवी चरणकमळीं ॥ सत्यें संकल्प चंद्रमौळी ॥ प्रदोषपूजा फ-
ळा आली ॥२९॥ पतीस सांगे तये वेळीं ॥ पूर्वजन्म चरित्र सकळीं ॥ विश्ववंद्य पुत्र प्रब-

ळी ॥ व्हावा ह्मणोनि आराधिलें ॥ ३० ॥ त्या श्रीपाद ईश्वराची ॥ पूजा केली मनोवाचीं ॥ प्रसिद्ध झालीं जन्में आमुचीं ॥ सफळ केलें परियेसा ॥ ३१ ॥ ह्मणोनि नमिती दोघे चरणीं ॥ विनविताती करुणावचनीं ॥ उद्धरावें या भवार्णी ॥ जगन्नाथा यतिराया ॥ ३२ ॥ श्रीगुरु ह्मणती त्यांसी ॥ एखाद्या काळीं परियेसी ॥ पुत्र होईल संन्यासी ॥ उद्धरील कुळें बेचाळीस ॥ ३३ ॥ त्यासी शाश्वत ब्रह्मलोक ॥ अचळपद असे एक ॥ त्याचे कुळीं ऊपजतां देख ॥ ब्रह्मपद शाश्वत त्यासी ॥३४॥ यमाचे दुःखें भयाभीत ॥ नव्हे त्याचे संततींत ॥ पूर्वज जरी नरकीं असत ॥ त्यांस शाश्वत ब्रह्मलोक ॥३५॥ त्याकारणें आह्मी देखा ॥ घेतला आश्रम विशेषा ॥ तुह्मां नाहीं यमाची शंका ॥ ब्रह्मपद असे सत्य ॥३६॥ ऐसें सांगोनि त्यांसी ॥ आश्वासिती बहुवशी ॥ तुमचे पुत्र शतायुषी ॥ अष्टैश्वर्यें नांदती ॥३७॥ त्या पुत्रा पूर्णपणीं ॥ पहाल सुखें नयनीं ॥ पावाल क्षेत्र काशीभुवनीं ॥ अंतकाळीं परियेसा ॥३८॥ मुक्तिस्थान काशीपूर ॥ प्रख्यात असे वेदशास्त्र ॥ न करी चिंता अणुमात्र ॥ ह्मणोनि सांगती तये वेळीं ॥३९॥ त्यांची कन्या असे एक ॥ नाम रत्नाई विशेष ॥ श्रीगुरुतें नमोनि ऐक ॥ विनवीतसे परियेसा ॥ ४० ॥ विनवीतसे परोपरी ॥ स्वामी मातें तारीं तारीं ॥ बुडतें मी भवसागरीं ॥ संसारमाया वेष्टोनियां ॥४१॥ निर्लेप करी मजशीं ॥ मग मी जाईन तपासी ॥ ऐकोनियां वचनासी ॥ तीतें गुरु निरोपिती ॥४२॥ पतिसेवा करावी ॥ तेणेंच बरवी मोक्षपदवी ॥ पावेल त्यांत न धरावी ॥ अन्य वृत्ती ॥४३॥ येणें या भवार्णवासी ॥ कडे पडती परियेसी ॥ जैसे जैसे भाव ज्यासी ॥ तैसें होय परियेसा ॥४४॥ उतरावया पैलपार ॥ स्त्रियांशीं असे वो भ्रतार ॥ मनीं ठेवी निर्धार ॥ भजावा पुरुष शि-

वसम ॥४९॥ त्यासीं होय उद्धारगती ॥ वेद पुराणें वानिती ॥ अंतरीं न करी खंती ॥ तुज
गती होईल ॥ ४६ ॥ ऐकोनि गुरूचें वचन ॥ विनवीतसे कर जोडून ॥ स्वामि निरोपिलें
मज ज्ञान ॥ विनंति एक अवधारा ॥४७॥ तूं जाणसी भविष्यभूत ॥ कैसें मातें उपदेशित॥
माझें प्रारब्ध कवणागत ॥ विस्तारावें मजपुढें ॥४८॥ श्रीगुरु म्हणती तियेसी ॥ तव वास-
ना असे तपासी ॥ संचित आपुलें असे भोगिसी ॥ भोगणें असे परियेसा ॥४९ ॥ पूर्वज-
न्मीं तूं परियेसी ॥ चरणीं लाथिलें धेनूसी ॥ शेजारी स्त्रीपुरुषांसी ॥ विरोध लाविला क-
लह पैं ॥५०॥ त्या दोषास्तव देखा ॥ तुज बाधा असे अनेका ॥ गाय लाथिली तेणें ऐका ॥
सर्वांगीं कुष्टी होसी ॥ ५१ ॥ विरोध केला स्त्रीपुरुषांसी ॥ तव पुरुष होईल तापसी ॥ तूतें
त्यजील भरंवसीं ॥ अर्जित तव ऐसें असे ॥ ५२ ॥ ऐकोनि दुःख करी बहुत ॥ श्रीगुरुच-
रणावरी लोळत ॥ उद्धरी गुरुनाथा त्वरित ॥ म्हणोनि चरणीं लागली ॥५३॥ श्रीगुरु म्ह-
णती ऐक बाळे ॥ क्वचित्काळें असाल भले ॥ अपरवया होतां काळें ॥ पति तुझा यती
होईल ॥५४॥ तदनंतर तुझा देह ॥ कुष्टी होईल निःसंदेह ॥ भोग भोगुनी शुद्ध देह ॥ मग
होईल तुज गती ॥५५॥ नासतां तुझा देह जाण ॥ भेटी होईल माझी पूर्ण ॥ तव पाप हो-
ईल दहन ॥ सांगेन क्षेत्र ऐक पां ॥ ५६ ॥ भीमातीर दक्षिण देश ॥ तेथें तीर्थ पापविनाश ॥
जाय तेथें भरंवसें ॥ अवस्था तुज घडलियावरी ॥ ५७ ॥ या भूमंडळीं विख्यात ॥ असे
तीर्थ अतिसमर्थ ॥ गंधर्वपूर प्रख्यात ॥ अमरजा संगम प्रसिद्ध ॥ ५८॥ ऐसें सांगोनि ती-
सी ॥ गुरु निघाले दक्षिणदिशीं ॥ त्र्यंबक नाम क्षेत्रासी ॥ आले गौतमी उद्भव जेथें ॥५९॥
शिष्यांसह गुरुमूर्ती ॥ आले नासिक क्षेत्राप्रति ॥ तीर्थमहिमा असे ख्याती ॥ पुराणांत प-

रियेसा ॥६०॥ तीर्थमहिमा सांगतां ॥ विस्तार होईल बहुकथा ॥ संक्षेपें सांगेन आतां ॥
तें परियेसी ॥६१॥ त्या गौतमाचा महिमा ॥ सांगतां अपार आम्हां ॥ बहिरार्णव उदकना-
मा ॥ ब्रह्मांडाव्यतिरिक्त ॥६२॥ जटामुकुटीं सर्वेश्वर ॥ धरितसे निरंतर ॥ मिळोनि सकळ
ऋषीश्वर ॥ उपाय केला परियेसा ॥६३॥ ब्रह्मऋषि गौतम देखा ॥ तपस्वी असे विशेषा ॥
व्रीहि पेरिलें वृत्ती ऐका ॥ अनुष्ठानस्थानाजवळी ॥६४॥ पूर्वीं ऋषी मुनी सकळी ॥ नित्य
पेरूनी पिकविती साळी ॥ ऐसे त्यांचे मंत्र प्रबळी ॥ महातपस्वी पुण्यपुरुष ॥६५॥ सम-
स्त ऋषी मिळोनी ॥ विचार करिती आपुले मनीं ॥ गौतमऋषी महाज्ञानी ॥ मुख्य दास
ईश्वराचा ॥६६॥ त्यासी घालितां सांकडें ॥ गंगा आणील आमुचे चाडें ॥ समस्तां आ-
म्हां पुण्य घडे ॥ गंगा आणितां भूमंडळीं ॥ ६७ ॥ श्लोक ॥ या गतिर्योगयुक्तानां मुनीना-
मूर्ध्वरेतसाम् ॥ सा गतिः सर्व जंतूनां गौतमीतीरवासिनाम् ॥६८॥ टीका ॥ ऊर्ध्वरेतमुनी-
श्वरांसी ॥ कोटी वर्षें तपस्व्यांसी ॥ जे गति होय परियेसी ॥ तें गति गौतमीतीरस्थां
॥६९॥ याकारणें गौतमीसी ॥ आणावें यत्नें भूमंडळासी ॥ सांकडें घालावें गौतमासी ॥
गंगा आणितां आम्हां लाभ ॥७०॥ म्हणोनि रचिली माव एक ॥ दुर्वेची गाय सवत्सक ॥
करोनि पाठविली ऐक ॥ गौतमव्रीहिभक्षणार्थ ॥७१॥ ऋषि होता अनुष्ठानीं ॥ देखतां धेनु
नयनीं ॥ निवाराया तत्क्षणीं ॥ दर्भपवित्र सोडिलें ॥७२॥ तेंचि दुर्धर जाहलें शस्त्र ॥ धेनूसी
लागलें जैसें वज्रास्त्र ॥ पंचत्व पावली त्वरित ॥ घडली हत्या गौतमासी ॥७३॥ मिळोनि
सर्व ऋषिजन ॥ प्रायश्चित्त देती जाण ॥ गंगा भूमंडळीं आण ॥ यावीण तुज नाहीं शुद्धी
॥७४॥ त्याकारणें गौतम ऋषी ॥ तप केलें सहस्र वर्षीं ॥ प्रसन्न झाला व्योमकेशी ॥ वर

माग ह्मणतसे ॥७५॥ गौतम म्हणे सर्वेश्वरा ॥ मज प्रसन्न झालां दातारा ॥ उद्धरावया चराचरा ॥ गंगा द्यावी भूमंडळीं ॥ ७६ ॥ गौतमाचे विनंतीसी ॥ निरोप दिधला गंगेसी ॥ घेवोनि आले भूमंडळासी ॥ पापक्षालनार्थ मनुष्यांचें ॥ ७७ ॥ ऐशी गंगा भागीरथी ॥ कोणा वर्णवे सामर्थी ॥ याचि कारणें गुरुमूर्ती ॥ आले ऐक नामधारका ॥७८॥ ऐशी गौतमीतटाकयात्रा ॥ श्रीगुरु आचरी पवित्रा ॥ पुढें लोकानुग्रहार्था ॥ आपण हिंडे महीवरी ॥७९॥ तटाकयात्रा करितां देखा ॥ आले श्रीगुरु मंजरिका ॥ तेथें होता मुनि एका ॥ एका विख्यात माधवारण्य ॥८०॥ सदा मानसपूजा त्यासी ॥ नृसिंहमूर्ती परियेसी ॥ देखता झाला श्रीगुरूसी ॥ मानसमूर्ति जैशी देखे ॥८१॥ नमिता झाला श्रीगुरूसी ॥ स्तोत्र करी बहुवसी ॥ विस्मित होवोनि मानसीं ॥ अति भक्ती करूनियां ॥८२॥ श्लोक ॥ यद्दिव्यपादद्वयमेव लक्षितं देवैर्नदृष्टंतदिदं समीपे ॥ यदुत्तरे तीरनिवासमानं लक्ष्मीसमीपे निवसाद्विनीतम् ॥१॥ टीका ॥ येणेंपरी श्रीगुरूसी ॥ विनवी माधवारण्य हर्षी ॥ श्रीगुरु ह्मणती संतोषी ॥ तया माधवारण्यासि देखा ॥८३॥ श्लोक ॥ अत्यंतमार्गस्थितिमार्गरूपमत्यंतयोगैरधिगम्यतत्त्वम् ॥ मार्गप्रदं मार्गविचिन्वतो मे मार्गोदयो माधवदर्शनं च ॥८४॥ टीका ॥ ऐसें गुरूचें स्वरूप ॥ देखोनि तयासी सुख अमुप ॥ आश्वासोनि निजरूप ॥ दावितेझाले परियेसा ॥८५॥ श्रीगुरुस्वरूप देखोनी ॥ संतुष्ट झाला तो मनीं ॥ विनवीतसे कर जोडोनी ॥ नानापरी स्तुति करी ॥८६॥ जय जय जगद्गुरू ॥ त्रिमूर्तीचा अवतारू ॥ लोकां दिसतोसि नरू ॥ परमपुरुषा जगन्नाथा ॥ ८७ ॥ तूं तारक विश्वासी ॥ ह्मणोनि भूमी अवतरलासी ॥ कृतार्थ केलें आह्मासी ॥ दर्शन देवोनि चरणांचें ॥८८॥ ऐसेपरी श्रीगुरूसी ॥

स्तुति करितो तापसी ॥ संतोषोनि अतिहर्षीं ॥ आश्वासिलें त्या वेळीं ॥८९॥ ह्मणती श्रीगु-
रु त्यासी ॥ सिद्धि झाली तव मंत्रासी ॥ तव सद्गति भरंवसी ॥ ब्रह्मलोकीं होय ॥ ९० ॥
नित्य पूजा तूं मानसीं ॥ करिसी नृसिंहमूर्तीसी ॥ प्रत्यक्ष होईल परियेसी ॥ न करीं संशय
मनांत ॥९१॥ ऐसें सांगोनि त्यासी ॥ श्रीगुरु निघाले परियेसी ॥ आले वासर ब्रह्मेश्वरा-
सी ॥ गंगातीर महाक्षेत्र ॥९२॥ त्या गंगातटाकांत ॥ श्रीगुरु समस्त शिष्यांसहित ॥ स्नान
करितां गंगेंत ॥ आला विप्र एक त्या स्थळीं ॥ ९३ ॥ कुक्षिव्यथा असे बहूत ॥ तटाकीं
असे लोळत ॥ उदरव्यथा अत्यंत ॥ त्यजूं पाहे प्राण देखा ॥९४॥ पोटव्यथा बहू त्यासी ॥
नित्य करितो उपवासासी ॥ भोजन केलिया दुःखे ऐसीं ॥ प्राणांतिक होतसे ॥९५॥ या-
कारणें द्विजवर ॥ सदा करि फलाहार ॥ अन्नासी त्यासी असे वैर ॥ जेवितां प्राण त्य-
जूं पाहे ॥९६॥ पक्ष मासा भोजन करी ॥ परम व्यथा असे त्याचे उदरीं ॥ ऐसें किती दि-
वसांवरी ॥ कष्टत होता तो द्विज ॥ ९७ ॥ पूर्वदिनीं त्या ग्रामीं ॥ असे सण महा नवमी ॥
जेविला मिष्टान्नें मनोभावीं ॥ मासें एक पारणें केलें ॥९८॥ भोजन केलें अन्न बहूत ॥ त्यानें
पोट असे दुखत ॥ गंगातीरीं असे लोळत ॥ प्राण त्वरीत त्यजूं पाहे ॥ ९९ ॥ दुःख करी
द्विज अपार ॥ ह्मणे गंगेंत त्यजीन शरीर ॥ नको आतां संसार ॥ पापरूपें वर्ततों ॥१००॥
अन्न प्राण अन्न जीवन ॥ कोण असेल अन्नावीण ॥ अन्न वैरी झालें जाण ॥ मरण बरवें
आतां मज ॥ १ ॥ मनीं निर्धार करोनी ॥ गंगाप्रवेश करितो ह्मणोनी ॥ पोटीं पाषाण बां-
धोनी ॥ गंगेमध्यें निघाला ॥ २॥ मनीं स्मरे कर्पूरगौर ॥ उपजुनी आपण भूमिभार ॥ केले
नाहीं परोपकार ॥ अन्नदानादिक देखा ॥३॥ न करी पुण्य इहजन्मांत ॥ जन्मांतरीं पूर्व-

शत ॥ पुण्यफळ नसे दिसत ॥ मग हे कष्ट भोगितसे ॥४॥ ग्रास हरिले ब्राह्मणाचे ॥ किंवा धेनु कपिलेचे ॥ घात केलिया विश्वासियाचे ॥ मग हे कष्ट भोगितसे ॥ ५ ॥ अपूर्ती पूजा ईश्वराची ॥ केली असे निंदा गुरूची ॥ अवज्ञा केली मातापित्यांची ॥ मग हे कष्ट भोगितों ॥६॥ अथवा मारिलें पशूंसी ॥ अग्नि घातिला रानासी ॥ वेगळें सांडूनि जनकजननींसी ॥ स्त्रियेसहित वेगळा होतों ॥ ७ ॥ अथवा पूर्वजन्मीं आपण ॥ केलें असे द्विजांधिःकरण ॥ अतिथि आलिया न घाली अन्न ॥ वैश्वदेवसमयासी ॥८॥ मातापिता त्यजोनियां ॥ होतों सुखें जेवोनियां ॥ पूर्वार्जितपापासोनियां ॥ मग हे कष्ट भोगितों ॥९॥ ऐशीं पापें आठवित ॥ विप्र जातो गंगेंत ॥ तंव देखती गुरुनाथ ॥ म्हणती बोलवा ब्राह्मणासी ॥१०॥ आणा आणा हो तयासी ॥ आत्महत्त्या महा दोषी ॥ प्राण त्यजितो कां सुखेसी ॥ पुसों कोण कवणाचा ॥ ११ ॥ श्रीगुरुवचन ऐकोनी ॥ गेले शिष्य धांवोनी ॥ द्विजवरातें काढोनी ॥ आणिती गुरुसन्मुख ॥ १२ ॥ अनाथासी कल्पतरू ॥ दुःखितासी कृपासागरू ॥ पुसतसे श्रीगुरू ॥ तया विप्रनरासी ॥१३॥ श्रीगुरु ह्मणती तयासी ॥ प्राण कां त्यजूं पहासी ॥ आत्महत्या महा दोषी ॥ काय वृत्तांत सांग आह्मां ॥१४॥ विप्र ह्मणे गा यतिराया ॥ काय कराल पुसोनियां ॥ उपजोनि जन्म वायां ॥ भूमिभार झालों ॥१५॥ मास पक्षा भोजन करितों ॥ उदरव्यथेनें कष्टतों ॥ साहों न शके प्राण देतों ॥ काय सांगावें स्वामियां ॥१६॥ आपणासी अन्न वैरी असतां ॥ केवीं वांचावें गुरुनाथा ॥ शरीर अन्नमय तत्वतां ॥ केवीं वांचूं जगद्गुरू ॥१७॥ श्रीगुरु ह्मणती ब्राह्मणासी ॥ तुझी व्यथा गेली परियेसी ॥ औषध असे आह्मापाशीं ॥ क्षण एकें सांगों तुज ॥१८॥ संशय न धरी आपले

मनीं ॥ भिऊं नको अंतःकरणीं ॥ व्याधी गेली पळोनी ॥ भोजन करी पोटभरी ॥१९॥ श्री-
गुरुवचन ऐकोनी ॥ स्थिर झाला अंतःकरणीं ॥ माथा ठेवोनी श्रीगुरुचरणीं ॥ नमन केलें
त्या वेळीं ॥२०॥ इतुकिया अवसरीं ॥ त्या ग्रामाचा अधिकारी ॥ विप्र एक अवधारी ॥
आला स्नाना गंगेसी ॥२१॥ तंव देखिलें गुरूसी ॥ येवोनी लागला चरणासी ॥ नमन केलें
भक्तीसी ॥ मनोवाक्कायकर्मे ॥२२॥ आश्वासोनी तये वेळीं ॥ पुसती श्रीगुरु स्तोममौळी ॥
कवण नाम कवणे स्थळीं ॥ वास ह्मणती तयासी ॥२३॥ ऐकोनि श्रीगुरूचें वचन ॥ सां-
गतसे तो ब्राह्मण ॥ गोत्र आपुलें कौंडिण्य ॥ आपस्तंब शाखा असे ॥२४॥ नाम सायंदेव
ऐसें ॥ वास असे कांचीसि ॥ आलों उदरपूर्तीस ॥ सेवा करितों यवनाची ॥२५॥ अधि-
कारपणें या ग्रामीं ॥ असों संवत्सर एक स्वामी ॥ धन्य धन्य झालों आह्मी ॥ तव दर्श-
नमात्रेंसी ॥२६॥ तूं तारक विश्वासी ॥ दर्शन दिधलें आह्मासी ॥ कृतार्थ झालों भरंवसी ॥
जन्मांतरींचे दोष गेले ॥२७॥ तवानुग्रह होय ज्यासी ॥ तरतील या भवार्णवासी ॥ अप्र-
यत्नें आह्मांसी ॥ दर्शन दिधलें स्वामियां ॥२८॥ श्लोक ॥ गंगापापं शशीतापं दैन्यं कल्प-
तरुस्तथा ॥ पापं तापं च दैन्यं च सद्यः साधुसमागमः ॥ २९ ॥ टीका ॥ गंगा देखतां पापें
जाती ॥ चंद्रदर्शनें ताप जाती ॥ कल्पतरूची ऐशी गती ॥ दैन्यावेगळें करी जाण ॥३०॥
तैसे नव्हे तुमचे गुण ॥ पाप ताप दैन्य हरण ॥ देखिले आजि तुमचे चरण ॥ चतुर्वर्ग फळ
पावलों ॥३१॥ ऐशी स्तुती करोनी ॥ पुनरपि लागे श्रीगुरुचरणीं ॥ जगद्गुरु आश्वासोनी ॥
निरोप देती तये वेळीं ॥३२॥ श्रीगुरु ह्मणती त्यासी ॥ आम्हुचें वाक्य परियेसी ॥ जठर-
व्यथा या विप्रासी ॥ प्राणत्याग करितसे ॥३३॥ उपशम त्या व्याधीसी ॥ सांगों औषध

तुह्मासी ॥ नेवोनि आपुले मंदिरासी ॥ भोजन करवी मिष्टान्न ॥३४॥ अन्न जेवितां याची व्यथा ॥ व्याधी न राहे सर्वथा ॥ धेवोनि जावें त्वरिता ॥ क्षुधाक्रांत विप्र असे ॥३५॥ ऐकोनि श्रीगुरूचें वचन ॥ विनवीतसे कर जोडून ॥ प्राणत्याग करितां भोजन ॥ ऐशी व्यथा होतसे ॥३६॥ जेविला काल मासें एक ॥ त्याणें प्राण त्यजीतसे ऐक ॥ अन्न देतां आह्मांसि देख ॥ घडेल हत्या त्वरित पैं ॥३७॥ श्रीगुरु ह्मणती सायंदेवासी ॥ आह्मी औषध देतों त्यासी ॥ अपूपादि माषान्नासी ॥ क्षीरामिश्रित परमान्न ॥३८॥ अन्न जेवितां त्वरेंसी ॥ व्याधी जाईल परियेसी ॥ संशय न धरितां मानसीं ॥ त्वरित गृहासीं नेईं वेगें ॥३९॥ अंगिकारोनि तये वेळीं ॥ माथा ठेवी चरणकमळीं ॥ विनवीतसे करुणा बाहळी ॥ यावें स्वामी भिक्षेसी ॥४०॥ अंगिकारोनि श्रीगुरुनाथ ॥ निरोप देती होका त्वरित ॥ सिद्ध ह्मणे ऐका मात ॥ नामधारका शिष्योत्तमा ॥४१॥ आह्मी होतों तये वेळीं ॥ समवेत शिष्य सकळी ॥ जठरव्यथेच्या विप्राजवळी ॥ श्रीगुरु गेले भिक्षेसी ॥४२॥ विचित्र झालें त्याचे घरीं ॥ पूजा करिती परोपरी ॥ पतिव्रता त्याची नारी ॥ जाखाई ह्मणिजे परियेसा ॥४३॥ तेणेंचि रीतींये आह्मासी ॥ शिष्यां सकतें पूजिती गुरूसी ॥ षोडशोपचारें परियेसी ॥ तेणेंचि रीतींये आह्मासी ॥ शिष्यां सकळां वंदिलें ॥४४॥ गुरुपूजेचें विधान ॥ विचित्र केलें अतिगहन ॥ मंडळ केलें रक्तवर्ण ॥ पंचवर्ण एक एकासी पृथक देखा ॥४५॥ पद्म रचोनी अष्टदळीं ॥ नानापरी रंगमाळीं ॥ विचित्र काळीं ॥ रचिली तिये परियेसा ॥४६॥ संकल्पोनी विधीसी ॥ नमन केलें साष्टांगेंसी ॥ माथा ठेवी चरणासीं ॥ पाद सर्वही अष्टांगीं ॥४७॥ चित्रासन गुरूसी ॥ येणेंचि परी सकळिकांसी ॥ मंडळार्चन विधीसी ॥ करिती गंध पुष्पाक्षता ॥४८॥ षोडशोपचारें

विधीसी ॥ पंचामृतादि परियेसीं ॥ रुद्रसूक्त मंत्रेंसी ॥ चरण स्नापिले तयेवेळीं ॥४९॥ श्री-
गुरुचरणीं अतिहर्षीं ॥ पूजा करिती षोडशी ॥ तया विप्रा प्रज्ञा कैसी ॥ चरणतीर्थ धरि-
ता झाला ॥५०॥ तया चरणतीर्थासी पूजा करितो भक्तीसी ॥ गीतवाद्य आनंदेंसीं ॥ क-
रिती आरती निरांजन ॥५१॥ अनुक्रमें श्रीगुरुपूजा ॥ करिता झाला तो द्विजा ॥ पुनरपि
षोडशोपचार वोजा ॥ पूजा करी भक्तीनें ॥५२॥ अक्षय वाणें आरती ॥ श्रीगुरूसी ओं-
वाळिती ॥ मंत्रघोष अतिभक्तीं ॥ पुष्पांजळी करिता झाला ॥ ५३ ॥ अनेकपरी गायन
करी ॥ नमस्कारी प्रीतीकरी ॥ पतिव्रता असे नारी ॥ पूजा करिती उभयवर्गें ॥ ५४ ॥ ऐ-
शापरी श्रीगुरूसी ॥ पूजा केली परियेसी ॥ येणें विधी शिष्यांसी ॥ समस्तांसी वंदिलें
॥५५॥ संतोषोनि श्रीगुरुमूर्ती ॥ अतिहर्षी वर देती ॥ तव संतती होईल ख्याती ॥ गुरुभक्ती
वंशोवंशीं ॥५६॥ तूं जाणसी गुरूस ॥ अभिवृद्धी वंशास ॥ पुत्रपौत्रां हर्ष ॥ गुरुभक्तीनें घडे
॥५७॥ ऐसें बोलोनि द्विजासी ॥ आश्वासिती अतिहर्षी ॥ नमन करोनि श्रीगुरूसी ॥ ठाय
घातले द्विजें त्या वेळीं ॥५८॥ नानापरीचीं पक्वान्नें ॥ अपूपादि माषान्नें ॥ अष्टविध परमान्नें ॥
शर्करासहित निवेदिलीं ॥५९॥ शाकपाक नानापरी ॥ वाढताती सोपस्कारीं ॥ भोजन क-
रिती सविस्तरीं ॥ श्रीगुरु परियेसा ॥६०॥ उदरव्यथेच्या ब्राह्मणें ॥ भोजन केलें परिपूर्णें ॥
व्याधि गेली तत्क्षणें ॥ श्रीगुरूचे कृपादृष्टीं ॥ ६१ ॥ परिस लागतां लोहासीं ॥ सुवर्ण होय
परियेसी ॥ दर्शन होतां श्री गुरूसी ॥ व्याधि कैंची सांग मज ॥६२॥ उदय होतां दिनकरा-
सी ॥ संहार होय अंधकारासी ॥ श्रीगुरुकृपा होय ज्यासी ॥ दैन्य कैंचें तयाघरीं ॥६३॥
ऐसेपरी श्रीगुरुनाथें ॥ भोजन केलें शिष्यांसहित ॥ आनंद झाला तेथें बहुत ॥ विस्मय

करिती सकळ जन ॥ ६४ ॥ अभिनव करिती सकळ जन ॥ द्विजासि होतें वैरी अन्न ॥ औषध झालें तेंचि जाण ॥ व्याधि गेली निवोनी ॥६५॥ सिद्ध ह्मणे नामधारकास ॥ गुरु-कृपा होय ज्यास ॥ जन्मांतरींचे जाती दोष ॥ व्याधी कैंची त्याचे देहीं ॥ ६६॥ गंगा-धराचा नंदनू ॥ सरस्वती सांगे विस्तारोनू ॥ गुरुचरित्र कामधेनू ॥ ऐका श्रोते एकचित्तें ॥६७॥ जे ऐकती भक्ती धरोनी ॥ व्याधीं नसती तया स्थानीं ॥ अखिल सौख्य होय त्या जनीं ॥ सत्य सत्य त्रिवाचा ॥ ६८ ॥ इति श्रीगुरुचरितामृत ॥ गुरुचरित्र वर्णन येथ ॥ ब्राह्मणव्याधि निरसोनि त्वरित ॥ सुखी केला श्रीगुरूनें ॥ ६९ ॥ इति श्रीगुरुचरित्रपरम-कथाकल्पतरौ श्रीनृसिंहसरस्वत्युपाख्याने सिद्धनामधारकसंवादे विप्रोदरव्यथानिरसनं नाम त्रयोदशोऽध्यायः ॥ ओंव्या १६९ ॥

॥ श्रीगणेशाय नमः ॥ नामधारक शिष्य देखा ॥ विनवी सिद्धासी कौतुका ॥ प्रश्न करी अति विशेषा ॥ एकचित्तें परियेसा ॥१॥ जय जया योगेश्वरा ॥ सिद्धमूर्ती ज्ञानसागरा ॥ पुढील कथा विस्तारा ॥ ज्ञान होय आह्मांसी ॥ २ ॥ उदरव्यथेच्या ब्राह्मणासी ॥ प्रसन्न झाले श्रीगुरु कृपेसी ॥ पुढें कथा वर्तली कैसी ॥ विस्तारावें आह्माप्रती ॥३॥ ऐकोनि शिष्याचें वचन ॥ संतोषे सिद्ध आपण ॥ गुरुचरित्र कामधेनु जाण ॥ सांगता झाला विस्तारोनी ॥ ४ ॥ ऐक शिष्या शिखामणी ॥ भिक्षा केली त्याचे भवनीं ॥ तयावरी संतोषोनी ॥ प्रसन्न झाले परियेसा ॥५॥ गुरुभक्तीचा प्रकार ॥ पूर्ण जाणे द्विजवर ॥ पूजा केली विचित्र ॥ ह्मणोनि आनंदें परियेसा ॥६॥ तया सायंदेव द्विजासी ॥ श्रीगुरु बोलती संतोषी ॥ भक्त व्हावें वंशोवंशीं ॥ माझी प्रीति तुह्मांवरी ॥ ७ ॥ ऐकोनि श्री गुरूचें वचन ॥ सायंदेव नमन करून ॥ माथा चरणीं ठेवून ॥ नमिता झाला पुनः पुनः ॥८॥ जय जयाजी सद्गुरू ॥ त्रिमूर्तीचा अवतारू ॥ अविद्यामायें दिससी नरू ॥ वेदां अगोचर तुझा महिमा ॥९॥ विश्वव्यापक तूंचि होसी ॥ ब्रह्मा विष्णु व्योमकेशी ॥ धरिलें स्वरूप तूं मानुषी ॥ भक्तजन तारावया ॥१०॥ तव महिमा वर्णावयासी ॥ शक्ति कैची आह्मांसी ॥ मागतों एक तुह्मांसी ॥ कृपा करणें गुरुमूर्ती ॥११॥ माझे वंशपरंपरी ॥ भक्ती द्यावी निर्धारीं ॥ इह सौख्य पुत्रपौत्रीं ॥ अंतीं द्यावी सद्गती ॥१२॥ ऐशी विनंती करून ॥ पुनरपि विनवी करुणावचन ॥ सेवा करितों द्वारीं यवन ॥ महाक्रूर असे तो ॥१३॥ प्रतिसंवत्सरीं ब्राह्मणांसी ॥ घात करितो जी बहुवसी ॥ याचि कारणें आह्मांसी ॥ बोलावितसे परियेसा ॥१४॥ जातां तयाजवळी आपण ॥ निश्चयें घेईल माझा प्राण ॥ भेटी झाली तुमची ह्मणोन ॥ मरण कैचें

आज्ञासी ॥१५॥ संतोषोनी श्रीगुरुमूर्ती ॥ अभय देती तयाप्रती ॥ विप्रमस्तकीं हस्त ठेविती ॥ चिंता न करी ह्मणोनियां ॥१६॥ भय सांडुनि त्वां जावें ॥ क्रूर यवनातें भेटावें ॥ संतोषोनी प्रियभावें ॥ पुनरपि पाठवील आज्ञाप्रती ॥१७॥ जोंवरी परतोनि तूं येसी ॥ असों आह्मी भरंवसी ॥ तूं आलिया संतोषी ॥ जाऊं मग येथोनियां ॥१८॥ निजभक्त आमुचा तूंचि होसी ॥ पारंपरीं वंशोवंशीं ॥ अखिलाभिष्ट तूं पावसी ॥ वाढे संतती तुझी बहुत ॥१९॥ तुझे वंशपरंपरीं ॥ सुखें नांदती पुत्रपौत्री ॥ अखंड लक्ष्मी तुझे घरीं ॥ निरोगी शतायु नांदाल ॥ २० ॥ ऐसा वर लाधोन ॥ निघे सायंदेव ब्राह्मण ॥ जेथें होता तो यवन ॥ गेला त्वरित त्याजवळी ॥ २१ ॥ कालांतक यम ऐसा ॥ यवन दुष्ट परियेसा ॥ ब्राह्मणातें पाहतां कैसा ॥ ज्वालारूप होता झाला ॥२२॥ विमुख होवोनि गृहांत ॥ गेला यवन कोपत ॥ विप्र झाला भयचकित ॥ मनीं श्रीगुरू ध्यातसे ॥२३॥ कोप आलिया ओळंबयासी ॥ केवीं स्पर्शे अग्नीसी ॥ श्रीगुरुकृपा असे जयासी ॥ काय करील यवन दुष्ट ॥ २४ ॥ गरुडाचिया पिलियासी ॥ सर्प कैसा डंशी ॥ तैसी त्या ब्राह्मणासी ॥ असे कृपा श्रीगुरूची ॥२५॥ कां एखादे सिंहासी ॥ ऐरावत केवीं ग्रासी ॥ श्रीगुरुकृपा ज्यासी ॥ कळिकाळाचें भय नाहीं ॥२६॥ ज्याचे हृदयीं गुरुस्मरण ॥ भय कैचें तया दारूण ॥ काळमृत्यु न बाधे जाण ॥ अपमृत्यु काय करील ॥२७॥ ज्यासि नाहीं मृत्यूचें भय ॥ त्यासी यवन करील काय ॥ श्रीगुरुकृपा ज्यासी होय ॥ यमाचें मुख्य भय नाहीं ॥ २८ ॥ ऐशियापरी तो यवन ॥ गृहीं निघाला भ्रमेंकरून ॥ दृढ निद्रा लागतां जाण ॥ शरीरस्मरण नाहीं त्यासी ॥२९॥ हृदय ज्वाळा होवोनि त्यासी ॥ जागृत होवोनि परियेसी ॥ प्राणांतिक

व्यथेसी ॥ कष्टतसे तये वेळीं ॥३०॥ स्मरण असे नसे कांहीं ॥ ह्मणे शस्त्र मारितो घाई ॥ छेदन करितो अवयव पाहीं ॥ विप्र एक आपणासी ॥३१॥ स्मरण झालें तये वेळीं ॥ धांवत गेला ब्राह्मणाजवळी ॥ लोळतसे चरणकमळीं ॥ ह्मणे स्वामी तूंचि माझा ॥३२॥ तूतें पाचारिलें येथें कवणीं ॥ जावें त्वरित परतोनी ॥ वस्त्रें भूषणें देवोनी ॥ निरोप देत तये वेळीं ॥३३॥ संतोषोनी द्विजवर ॥ आला ग्रामीं सत्वर ॥ गंगातीरीं जाय लवकर ॥ श्रीगुरुचे दर्शनासी ॥ ३४ ॥ देखोनियां श्रीगुरूसी ॥ नमन करी भावेंसी ॥ स्तोत्र करी बहुवसी ॥ सांगे वृत्तांत आद्यंत ॥ ३५ ॥ संतोषोनी श्रीगुरुमूर्ती ॥ तया द्विजा आश्वासिती ॥ दक्षिण दिशे जाऊं ह्मणती ॥ स्नानतीर्थयात्रेसी ॥३६॥ ऐकोनि श्रीगुरूचें वचन ॥ विनवीतसे कर जोडून ॥ न विसंबें आतां तुमचे चरण ॥ आपण येईन समागमें ॥ ३७ ॥ तुमचे चरणाविणें देखा ॥ राहूं न शके क्षण एका ॥ संसारसागरतारका ॥ तूंचि देवा कृपासिंधू ॥ ३८ ॥ उद्धारावया सगरासी ॥ गंगा आली भूमीसी ॥ तैसें स्वामी आह्मांसी ॥ दर्शनें उद्धार आपुल्या ॥३९॥ भक्तवत्सल तुझी ख्याती ॥ आह्मां सांडणें हे काय नीती ॥ सवेंचि येऊं हें निश्चितीं ॥ ह्मणोनि चरणीं लागला ॥४०॥ येणेंपरी श्रीगुरूसी ॥ विनवी विप्र भावेंसी ॥ संतोषोनी विनयेंसी ॥ श्रीगुरु ह्मणती तये वेळीं ॥ ४१ ॥ कारण असे आह्मां जाणें ॥ तीर्थें असती दक्षिणे ॥ पुनरपि तुह्मां दर्शन देणें ॥ संवत्सरीं पंचदशीं ॥४२॥ आह्मी तुमचे ग्रामासमीपत ॥ वास करूं हें निश्चित ॥ कलत्र पुत्र इष्ट भ्रात ॥ तुह्मीं आह्मां भेटावें ॥४३॥ न करी चिंता असा सुखें ॥ सकळ अरिष्टें गेलीं दुःखें ॥ ह्मणोनि हस्त ठेवी मस्तकीं ॥ भाक देती तये वेळीं ॥ ४४ ॥ ऐसेपरी सांगोनी ॥ श्रीगुरु निघाले तेथोनी ॥ जेथें

असे आरोग्य भवानी ॥ वैजनाथ महाक्षेत्र ॥४५॥ समस्त शिष्यांसमवेत ॥ श्रीगुरु आले तीर्थें पहात ॥ प्रख्यात असे वैजनाथ ॥ तेथें राहिले गुप्तरूपें ॥ ४६ ॥ नामधारक विनवी सिद्धासी ॥ कारण काय गुप्त व्हावयासी ॥ होते शिष्य बहुवसी ॥ त्यांसी कोठें ठेविलें ॥४७॥ गंगाधराचा नंदन ॥ सांगे गुरुचरित्र वर्णन ॥ सिद्धमुनी विस्तारोन ॥ सांगे नामधारकासी ॥४८॥ पुढील कथेचा विस्तार ॥ सांगत असे अपरंपार ॥ मन करूनी एकाग्र ॥ ऐका श्रोते सकळिक ॥ ४९ ॥ वास सरस्वतीचे तीरीं ॥ सायंदेव साचारी ॥ तया गुरूतें निर्धारीं ॥ वस्त्रें भूषणें दिधलीं ॥५०॥ गुरुचरित्र अमृत ॥ सायंदेव आख्यान येथ ॥ यवनभयरक्षित ॥ थोर भाग्य तयाचें ॥ ५१ ॥ इति श्रीनृसिंहसरस्वत्युपाख्याने दुष्टयवनशासनं नाम चतुर्दशोऽध्यायः ॥ ओंव्या ५१ ॥

॥ श्रीगणेशाय नमः ॥ ऐक शिष्या शिरोमणी ॥ धन्य धन्य तुझी वाणी ॥ भक्ती तुझी गुरुचरणीं ॥ लीन झाली परियेसा ॥१॥ तूं मातें पुसतोसी ॥ होतो संतोष मानसीं ॥ गौप्य झाले कवण कार्यासी ॥ सांगेन ऐका एकचित्तें ॥ २ ॥ महिमा प्रकट झाला बहूत ॥ तेणें भजती लोक समस्त ॥ काम्यार्थी ते अमित ॥ येती गुरुदर्शनासी ॥३॥ साधु असाधु धूर्त सकळी ॥ समस्त येती गुरुजवळी ॥ वर्तमान खोटा कलीं ॥ अवघे शिष्य होऊं ह्मणती ॥४॥ भार्गवराम अवतरोनी ॥ निःक्षत्र केली मेदिनी ॥ राज्य विप्रासी देऊनी ॥ गेला पश्चिम समुद्रासी ॥५॥ पुनरपि जाती तयापासी ॥ तोहि ठाव मागावयासी ॥ याकारणें विप्रांसी ॥ कांक्षा न सुटे सर्वथा ॥६॥ उठोनी भार्गव देखा ॥ गेला सागरमध्योदका ॥ गौप्यरूपें असे ऐका ॥ आणीक मागती ह्मणोनियां ॥ ७ ॥ तैसे श्रीगुरुमूर्ती ऐका ॥ गुप्त राहिले कारणिका ॥ वर मागती सकळ लोक ॥ नानायाती येवोनियां ॥ ८ ॥ विश्वव्यापक जगदीश्वर ॥ तो काय देऊं न शके वर ॥ पाहोनि पात्रानुसार ॥ प्रसन्न होय परियेसीं ॥९॥ याकारणें तये स्थानीं ॥ श्रीगुरु राहिले गौप्यगुणीं ॥ शिष्य सकळ बोलावूनी ॥ निरोप देती यात्रेसी ॥१०॥ सकळ शिष्य बोलावूनी ॥ निरोप देती नृसिंहमुनी ॥ समस्त तीर्थें आचरोनी ॥ यावें भेटी श्रीशैल्या ॥११॥ ऐकोनि गुरूचे वचना ॥ समस्त शिष्य धरिती चरणा ॥ कृपामूर्ती गुरुराणा ॥ कां उपेक्षा आह्मांसी ॥ १२ ॥ तुमच्या दर्शनमात्रेसी ॥ समस्त तीर्थें आह्मांसी ॥ आह्मीं जावें कवण्या ठायासी ॥ सांडोनी चरण श्रीगुरूचे ॥१३॥ समस्त तीर्थें श्रीगुरुचरण ॥ ऐसें बोलती श्रुतिपुराण ॥ शास्त्रीं हेंचि विवरण ॥ असे प्रख्यात परियेसा ॥१४॥ जवळी असतां निधान ॥ कां हिंडावें रानोरान ॥ कल्पवृक्ष सोडोन ॥

केविं जावें देवराया ॥१५॥ श्रीगुरू ह्मणती शिष्यांसी ॥ आह्मी आश्रमीं संन्यासी ॥ राहूं नये पांच दिवशीं ॥ एके ठायीं वास करूनी ॥१६॥ चतुर्थाश्रम घेवोनी ॥ हिंडावें तीर्थभुवनीं ॥ तेथें मन स्थिर करोनी ॥ मग रहावें एक स्थानीं ॥ १७ ॥ विशेष आमुचें वाक्य ॥ अंगिकारणें अधिक ॥ तीर्थें हिंडोनि सकळिक ॥ मग यावें आह्मांपाशीं ॥१८॥ बहुधान्य नाम संवत्सरासी ॥ आह्मी येऊं श्रीशैल्यासी ॥ तेथें आमचे भेटीसी ॥ यावें तुह्मी सकळिक ॥१९॥ ऐसेपरी शिष्यांसी ॥ सांगती श्रीगुरु परियेसी ॥ समस्त लागती चरणासी ॥ ऐका शिष्य नामकरणी ॥२०॥ शिष्य विनविती श्रीगुरूसी ॥ तुमचें वाक्य प्रमाण आह्मांसी ॥ जातों आह्मीं भरंवसी ॥ करूं तीर्थें भूमीवरी ॥२१॥ श्रीगुरुवाक्य न करी ॥ तो पडे रौरव घोरीं ॥ त्याचें घर यमपुरीं ॥ अखंड नरक भोगिजे ॥ २२ ॥ जावें आह्मीं कवण तीर्था ॥ निरोपावें जी समर्था ॥ तुझें वाक्य दृढ चित्ता ॥ धरुनी जाऊं स्वामिया ॥ २३ ॥ जे जे स्थानीं निरोप देसी ॥ जाऊं तेथें भरंवसी ॥ तुझें वाक्य आह्मांसी ॥ सिद्ध होय स्वामियां ॥२४॥ ऐकोनि शिष्यांचें वचन ॥ श्रीगुरुमूर्ती प्रसन्नवदन ॥ निरोप देती साधारण ॥ तीर्थयात्रा करावया ॥२५॥ या ब्रह्मांड गोलांत ॥ तीर्थराज काशी विख्यात ॥ तेथें जावें तुह्मी त्वरित ॥ गंगाभागीरथी सेवावया ॥२६॥ भागीरथी तटाकयात्रा ॥ साठ योजनें पवित्रा ॥ साठ कृच्छ्रफळ पवित्रा ॥ प्रयाग गंगाद्वारीं द्विगुण ॥२७॥ यमुना नदी तटाकेसी ॥ पंचवीस गांवें परियेसी ॥ कृच्छ्रफळ तेथें विशेषीं ॥ एकचित्तें अवधारा ॥२८॥ सरस्वती ह्मणजे गंगा ॥ भूमीवरी श्रेष्ठ आपगा ॥ चतुर्विंशति गांवें जागा ॥ स्नान करावें तटाकीं ॥ २९ ॥ इतुकेनी फळ त्यासी ॥ यज्ञाचें फळ परियेसी ॥ ब्रह्मलोक शाश्वतेसी ॥

राहे नर पितरांसहित ॥३०॥ वरुणानदी कुशावर्ती ॥ श्रुतकृष्णा वेणी ख्याती ॥ वितस्ता नदी शरावती ॥ असती नदी मनोहर ॥३१॥ मरुद्विधा नदी थोर ॥ असिवनी मधुमती येर ॥ पयस्विनी घृतवतीतीर ॥ तटाकयात्रा तुह्मी करा ॥३२॥ देवनदी मुख्य एक ॥ असे ख्याती भूमंडलिक ॥ पंधरा गांवें तटाक ॥ यात्रा तुह्मीं करावीं ॥३३॥ जितुके गांव तितुके कृच्छ्र ॥ स्नानमात्रें पवित्र ॥ जाती ब्रह्महत्या तत्र ॥ मनोभावें आचरावें ॥३४॥ चंद्रभागा रेवतीसी ॥ शरयू नदी गौतमीसी ॥ वेदिका नदी कौशिकीसी ॥ नित्य जळ मंदाकिनी ॥३५॥ सहस्रवक्त्रनदी घोर ॥ पूर्णायुष्य नदी थोर ॥ बहुधा नदी वरुणा प्रखर ॥ षोडश गांवें तटाकयात्रा ॥३६॥ जेथें नदीसंगम असती ॥ तेथील स्नानें पुण्य अमिती ॥ त्रिवेणीस्नान फळें असती ॥ संगमनदीं स्नान करा ॥३७॥ श्वेतबंध भीमेश्वरी ॥ श्रीरंग पद्मनाभेश्वरी ॥ पुरुषोत्तम मनोहरी ॥ नैमिषारण्य तीर्थ असे ॥३८॥ पुष्करतीर्थ वैरोचनी ॥ सन्निहित असे ज्ञानी ॥ नदीतीर्थ असे गुणी ॥ गंगातीर्थीं स्नान करा ॥३९॥ बदरीतीर्थ नारायण ॥ नंदीतीर्थ पुण्यपावन ॥ कुरुक्षेत्रीं करा स्नान ॥ श्रीशैल्ययात्रेसी ॥ ४० ॥ महालय तीर्थ देखा ॥ पितृतृप्ति तर्पणें ऐका ॥ द्विचत्वारी कुळें निका ॥ स्वर्गा जाती भरंवसी ॥४१॥ केदारतीर्थ पुष्करतीर्थ ॥ कोटितीर्थ नर्मदातीर्थ ॥ मातृकेश्वर कुब्जतीर्थ ॥ कोकामुखी विशेष असे ॥ ४२ ॥ प्रसादतीर्थ विजयीतीर्थ ॥ पुरींद्रचंद्रनदीतीर्थ ॥ गोकर्ण शंखकर्णख्यात ॥ स्नाना बरवें मनोहर ॥४३॥ अयोध्या मथुरा कांचीसी ॥ द्वारावती गयेसी ॥ शालिग्राम तीर्थासी ॥ शंभलग्राम मुक्तिक्षेत्र ॥४४॥ गोदावरी तटाकेसी ॥ योजनें सहा परियेसी ॥ तेथील महिमा आहे ऐसी ॥ वाजपेययज्ञसम पुण्य ॥४५॥ सव्यापसव्य वेळां तीनी ॥ तटाकयात्रा एका

म्हणणीं ॥ स्नान करितां होय ज्ञानी ॥ महापातकी शुद्ध होय ॥ ४६ ॥ आणीक तीन तीर्थें असती ॥ प्रयागसमान असे ख्याती ॥ भीमेश्वरतीर्थ ह्मणती ॥ वंजरासंगम प्रख्यात ॥४७॥ कुशतीर्थ तर्पण बरवें ॥ तटाकयात्रा द्वादश गांवें ॥ गोदावरीसंगमा जावें ॥ षट्त्रिगुणेंशीं कृच्छ्रफळ ॥४८॥ पूर्णानदी तटाकेसी ॥ चारी गांवें आचरा हर्षी ॥ कृष्णा वेणी तीरासी ॥ पंधरा गांवें तटाकयात्रा ॥४९॥ तुंगभद्रातीर बरवें ॥ तटाकयात्रा वीस गांवें ॥ पंपा सरोवर स्वभावें ॥ अनंत फळ परियेसा ॥५०॥ हरीहरक्षेत्र महाख्याती ॥ समस्त दोष परिहरती ॥ तैसीच असे भीमरथी ॥ दहा गांव तटाकयात्रा ॥५१॥ पांडुरंग मातुलिंग ॥ क्षेत्र बरवें पुरी गाणग ॥ तीर्थें असती तेथें चांग ॥ अष्टतीर्थें मनोहर ॥५२॥ अमरजा संगमांत ॥ कोटितीर्थ असे तेथ ॥ वृक्ष तेथें असे अश्वत्थ ॥ कल्पवृक्ष तोचि जाणा ॥५३॥ तया अश्वत्थासंमुखेसी ॥ नृसिंह तीर्थ परियेसी ॥ तया उत्तर भागेसी ॥ वाराणसी तीर्थ असे ॥ ५४ ॥ तया पूर्वभागेसी ॥ तीर्थ पापविनाशी ॥ तदनंतर परियेसी ॥ रुद्रपाद तीर्थ असे ॥५५॥ चक्रतीर्थ असे एक ॥ केशव देव विनायक ॥ कोटितीर्थ विशेष ॥ मन्मथ तीर्थ पुढें असे ॥५६॥ कल्लेश्वर देवस्थान ॥ असे तेथें गांधारभुवन ॥ ठाव असे अनुपम जाण ॥ सिद्धभूमि गाणगपूर ॥५७॥ तेथें जे जन अनुष्ठान करिती ॥ त्वरित कामना सर्व पावती ॥ कल्पवृक्ष असे यती ॥ काय नोहे मनकामना ॥५८॥ कांकिणीसंगम असे बरवें ॥ भीमातीर क्षेत्र नांवें ॥ अनंततीर्थ पुण्यस्वभावें ॥ प्रयागसमान असे देखा ॥५९॥ तुंगभद्रा वरदा नदी ॥ संगमस्नान तपोनिधी ॥ मलप्रभा संगमीं आधीं ॥ पापें जाती शतजन्माचीं ॥६०॥ निवृत्तिसंगमीं असे ख्याती ॥ ब्रह्महत्या नाश होती ॥ जावें तुह्मीं तेथें त्वरिती ॥ श्रीगुरु ह्मणती शिष्यांसी ॥६१॥

सिंहराशी बृहस्पती ॥ येतां तीर्थें संतोषती ॥ समस्तांठायीं भागीरथी ॥ येऊनि ऐक्य होतसे ॥६२॥ कन्यागतीं कृष्णेसी ॥ त्वरित येती भागीरथी ॥ तुंगभद्रा तुळागतीं ॥ सुरनदी प्रवेशा ॥६३॥ कर्कराशीं सूर्य येतां ॥ मलप्रभा कृष्णासंयुता ॥ सर्वजन स्नान करितां ॥ ब्रह्महत्या पापें जाती ॥ ६४ ॥ भीमाकृष्णा संगमेसी ॥ स्नान करितां परियेसी ॥ सात जन्म विप्रवंशीं ॥ उपजे नर परियेसा ॥६५॥ तुंगभद्रा संगम देख ॥ त्याहुनी फळ त्रिगुण अधिक ॥ निवृत्तिसंगम ऐक ॥ चतुर्गुण तयाहुनी ॥६६॥ पाताळगंगेचिये स्नानीं ॥ मल्लिकार्जुन दर्शनीं ॥ पुण्य षड्गुण तयाहुनी ॥ पुनरावृत्ति तयासी नाहीं ॥६७॥ लिंगालयीं पुण्य द्विगुण ॥ समुद्रकृष्णासंगमीं अगण्य ॥ कावेरीसंगमीं पंधरा गुण ॥ स्नान करा मनोभावें ॥६८॥ ताम्रपर्णी येणेंपरी ॥ पुण्य असे स्नानमात्रीं ॥ कृतमाला नदीतीरीं ॥ सर्व पाप परिहर ॥ ६९ ॥ पयस्विनी आणिक ॥ भवनाशनी अतिविशेष ॥ सर्व पापें हरती ऐक ॥ समुद्रस्कंददर्शनें ॥७०॥ शेषाद्रिक्षेत्र श्रीरंगनाथ ॥ पद्मनाभ श्रीमदनंत ॥ पूजा करोनि जावें त्वरित ॥ तूर्णामल क्षेत्रासी ॥७१॥ समस्त तीर्थें समान ॥ असे आणिक कुंभकोण ॥ कन्याकुमारीदर्शन ॥ मच्छतीर्थीं स्नान करा ॥७२॥ पक्षतीर्थ असे बरवें ॥ रामेश्वर धनुष्यकोटिनामें ॥ कावेरीतीर्थ बरवें ॥ रंगनाथ सन्निध ॥७३॥ पुरुषोत्तमचंद्रकुंडेसी ॥ कोटितीर्थ परियेसी ॥ महालक्ष्मी कोल्हापुरासी ॥ दक्षिणकाशी करवीर ॥७४॥ तयासन्निध असे बरवा ॥ कोल्हग्रामीं नरसिंह देव ॥ परमात्मा सदाशिव ॥ तोचि असे प्रत्यक्ष ॥ ७५ ॥ भिल्लवडी कृष्णातीरीं ॥ शक्ति असे भुवनेश्वरी ॥ तेथें तप करिती जरी ॥ तोचि ईश्वरीं ऐक्य होय ॥७६॥ वरुणासंगम असे बरवें ॥ तेथें तुह्मी मनोभावें ॥ स्नान करा मार्कंडेय नांवें ॥ संगमेश्वर पूजावा

॥७७॥ ऋषेश्वरांचे आश्रम ॥ कृष्णातीरीं असती उत्तम ॥ स्नानें लाभे ज्ञानोत्तम ॥ तया सान्निध कृष्णेच्या ॥७८॥ पुढें कृष्णाप्रवाहांत ॥ अमरापूर प्रख्यात ॥ पंचगंगासंगमीं स्नात ॥ प्रयागाहूनी अधिक पुण्य ॥७९॥ अखिल तीर्थें तया स्थानीं ॥ तप करिती सकळ मुनी ॥ सिद्ध होती त्वरित ज्ञानी ॥ अनुपम्य क्षेत्र परियेसा ॥ ८० ॥ ऐसे प्रख्यात तये स्थानीं ॥ अनुष्ठितां दिवस तीनी ॥ अखिलाभिष्ट पावोनी ॥ पावती त्वरित परमार्थ ॥८१॥ शुगालय तीर्थ बरवें ॥ दृष्टी पडतां मुक्त व्हावें ॥ शूर्पालय तीर्थ नांवें ॥ पुढें असे परियेसा ॥ ८२ ॥ विश्वामित्र ऋषी ख्याती ॥ तपस्थान भगवती ॥ तेथें समस्त दोष जाती ॥ मलप्रभा संगमा ॥८३॥ कपिल ऋषी विष्णुमूर्ती ॥ प्रसन्न तयासी गायत्री ॥ श्वेतशृंगी प्रख्याती ॥ उत्तरवाहिनी कृष्णा असे ॥८४॥ तया स्थानीं स्नान करितां ॥ काशीहुनी अधिकता ॥ एक मंत्र तेथें जपतां ॥ कोटिगुणें फळ असे ॥८५॥ आणिक असे तीर्थ बरवें ॥ केदारेश्वर पहावें ॥ पीठापुरीं दत्तात्रेय देवें ॥ वास केला सनातनें ॥८६॥ काय सांगूं तीर्थ थोरी ॥ प्रख्यात असे मणिगिरी ॥ सप्तऋषी प्रीती करी ॥ तप केलें बहुत दिवस ॥ ८७ ॥ वृषभाद्रि कल्याण नगर ॥ तीर्थें असती अपरंपार ॥ न होय संसार येरझार ॥ तया क्षेत्रा आचरावें ॥ ८८ ॥ अहोबळाचें दर्शन ॥ साठ यज्ञ पुण्य जाण ॥ श्रीगिरीचे पाहतां चरण ॥ नाहीं जन्म मागुता ॥ ८९ ॥ समस्त तीर्थें भूमीवरी ॥ आचरावीं परिवारीं ॥ रजस्वला सरिता होतां जरी ॥ स्नान करितां दोष होय ॥ ९० ॥ संक्रांति कर्काटक धरूनी ॥ त्यजावे तुह्मीं मास दोनी ॥ नदीतीरीं वास करोनी ॥ रहातां त्यासी दोष नाहीं ॥९१॥ तयामध्यें विशेष ॥ त्यजावे तीन दिवस ॥ नदी रजस्वला खास ॥ महानदी येणेंपरी ॥ ९२ ॥ भागीरथी

गौतमीसी ॥ चंद्रभागा सिंधुनदीसी ॥ नर्मदा शरयू परियेसी ॥ वर्जावे तुह्मीं दिवस ति-
न्ही ॥९३॥ ग्रीष्मकाळीं सर्व नदींस ॥ रजस्वला दोष दहा दिवस ॥ वापी कूप तडागास ॥
एक रात्र वर्जावें ॥९४॥ नवें उदक ज्या दिवशीं ॥ तदा ओळखा रजस्वला ऐसी ॥ स्नान
करितां महादोषी ॥ येणेंपरी वर्जावें ॥९५॥ साधारण तुह्मांसी ॥ सांगितलीं तीर्थें परिये-
सी ॥ जें जें पहाल दृष्टीसी ॥ विधिपूर्वक आचरावें ॥ ९६ ॥ ऐकोनि श्रीगुरूचें वचन ॥
शिष्य सकळ करिती नमन ॥ गुरुनिरोप घेऊन ॥ निघती शिष्य सकळिक ॥९७॥ सिद्ध
ह्मणे नामधारकासी ॥ निरोप घेऊनि श्रीगुरुपाशीं ॥ शिष्य गेले यात्रेसी ॥ राहिले श्री-
गुरु गौप्यरूपें ॥९८॥ ह्मणे सरस्वती गंगाधर ॥ पुढील कथेचा विस्तार ॥ ऐकतां होय म-
नोहर ॥ सकळाभिष्टें लाधती ॥९९॥ ब्रह्मरसाची गोडी ॥ सेविती जे घडोघडीं ॥ त्यांसि
होई आवडी ॥ साधे त्वरित परमार्थ ॥ १०० ॥ गुरुचरित्र कामधेनु ॥ श्रोते होवोनि साव-
धानु ॥ जे ऐकती भक्तजनु ॥ लाधती चारी पुरुषार्थ ॥१०१॥ इति श्रीगुरुतीर्थयात्रानिरू-
पणं नाम पंचदशोऽध्यायः ॥ ओंव्या १०१ ॥



॥ श्रीगणेशाय नमः ॥ विनवी शिष्य नामांकित ॥ सिद्ध योग्यातें पुसत ॥ सांगा स्वामी
वृत्तांत ॥ गुरुचरित्र विस्तारोनी ॥१॥ श्रीगुरू गेले यात्रेसी ॥ राहिले कोण गुरूपाशीं ॥
पुढील कथा वर्तली कैसी ॥ विस्तारोनी सांगपां ॥२॥ ऐकोनि शिष्याची वाणी ॥ संतोषी
झाले सिद्धमुनी ॥ धन्य शिष्य शिरोमणी ॥ गुरुभक्ता नामधारका ॥३॥ अविद्यामाया सु-
षुप्तींत ॥ निजलें होतें माझें चित्त ॥ तुजलागीं झालें जागृत ॥ ज्ञानज्योति उदय मज॥४॥
तूंचि माझा प्राणसखा ॥ ऐक शिष्या नामधारका ॥ तुजकरितां जोडलें सुखा ॥ गुरुच-
रित्र आठवलें ॥५॥ अज्ञानतिमिर उष्णांत ॥ पिडोनि आलों कष्टत ॥ सुधामृतसागरांत ॥
त्वां मातें लोटिलें ॥६॥ त्वां केलें उपकारासी ॥ संतुष्ट झालें मानसीं ॥ पुत्रपौत्रीं तूं नांदसी ॥
दैन्य नाहीं तुझे घरीं ॥ ७ ॥ गुरुकृपेचा तूं बालक ॥ तुज मानिती सकळ लोक ॥ संदेह न
धरितां घेतां भाक ॥ अष्टैश्वर्यें नांदसी ॥८॥ गुरुचरित्र कामधेनू ॥ सांगेन तुज विस्तारोन ॥
श्रीगुरु राहिले गौप्यगुण ॥ वैजेश्वरसन्निधानीं ॥९॥ समस्त तीर्थें शिष्यांसी ॥ स्वामि नि-
रोपिलें परियेसी ॥ होतों आपण गुरुमूर्तिपाशीं ॥ सेवा करून अनुक्रमें ॥१०॥ संवत्सर एक
तया स्थानीं ॥ अंबा आरोग्य भवानी ॥ होते श्रीगुरु गौप्य होवोनी ॥ स्थान बरवें मनोहर
॥११॥ असतां तेथें वर्तमानीं ॥ आला ब्राह्मण एक मुनी ॥ श्रीगुरूतें देखोनी ॥ नमन केलें
भक्तिभावें ॥ १२ ॥ माथा ठेवोनि चरणावरी ॥ स्तोत्रें करी परोपरी ॥ स्वामी मातें तारी
तारी ॥ अज्ञानसागरीं बुडालों ॥ १३ ॥ तप करितों बहु दिवस ॥ स्थीर नव्हेचि मानस ॥
याचि कारणें ज्ञानास ॥ न दिसे मार्ग आम्हांसी ॥ १४ ॥ ज्ञानाविणें तपास ॥ वृथा होती
सायास ॥ तुम्हां देखतां मानस ॥ संतोषलें स्वामियां ॥ १५ ॥ गुरुसेवा बहु दिवस ॥ केली

नाहीं सावकाश ॥ याचि कारणें मानस ॥ स्थीर नोहे स्वामियां ॥ १६ ॥ तूं तारक विश्वासी ॥ ह्मणून मातें भेटलासी ॥ उपदेश करावा आह्मासी ॥ ज्ञान होईल त्वरित मज ॥१७॥ ऐकोनि मुनीचें वचन ॥ श्रीगुरु पुसती हांसोन ॥ पातलें केवीं मुनिपण ॥ गुरुविणें सांग मज ॥१८॥ ऐसें पुसतां श्रीगुरुमूर्ती ॥ मुनीच्या डोळां अश्रु येती ॥ दुःखें दाटला अमित चित्तीं ॥ ह्मणे स्वामी गुरुराया ॥ १९ ॥ गुरु होता आपणासि एक ॥ अति निष्ठुर त्याचें वाक्य ॥ मातें गांजिलें अनेक ॥ अकृत सेवा सांगे मज ॥२०॥ न सांगे वेदशास्त्राध्ययन ॥ तर्कभाष्यादि व्याकरण ॥ ह्मणे तुझें अंतःकरण ॥ स्थीर नोहे अद्यापि ॥ २१ ॥ ह्मणोनि सांगे आणीक कांहीं ॥ आपुलें मन स्थिर नाहीं ॥ न ऐकें त्याचें वाक्य कांहीं ॥ आणिक कोपे मजवरी ॥२२॥ याकारणें बहु दिवशीं ॥ होतों तया गुरुपाशीं ॥ बोले मातें निष्ठुरेसी ॥ कोपोनि आलों तयावरी ॥२३॥ ऐकोनी त्याचें वचन ॥ श्रीगुरुमूर्ति हास्यवदन ॥ ह्मणती कैसा ब्राह्मण ॥ आत्मघातकी तूं होसी ॥ २४ ॥ एकादा मूर्ख आपुले घरीं ॥ मळ विसर्जी देव्हारीं ॥ आपुलें अदृष्ट ऐसेपरी ॥ ह्मणोनि सांगे सकळिकां ॥२५॥ तैसें तुझें अंतःकरण ॥ आपुलें नासिक छेदून ॥ पुढिल्यातें अपशकुन ॥ करणार होसी तूंचि एक ॥ २६ ॥ न विचारिसी आपुले गुण ॥ तूंतें होय कैचें ज्ञान ॥ गुरुद्रोही तूंचि जाण ॥ अल्पबुद्धि परियेसा ॥२७॥ आपुले गुरूचे गुणदोष ॥ सदां उच्चार करिसी हर्ष ॥ ज्ञान कैचें होय मानस ॥ स्थीर केवीं होय आतां ॥२८॥ जवळी असतां निधानू ॥ कां हिंडावें रानोरानू ॥ गुरु असतां कामधेनू ॥ त्यजोनि आलासि आह्मापाशीं ॥२९॥ गुरुद्रोही जो कवण नर ॥ त्यासी नाहीं इहपर ॥ ज्ञान कैचें होय तो नर ॥ दिवाभीतासारिखाची ॥३०॥ जो जाणे गुरूची

सोय ॥ वेदशास्त्रादि त्वरित होय ॥ तो सर्वज्ञ शीघ्र होय ॥ गुरु संतुष्ट होतांचि ॥ ३१ ॥ संतोष होतां श्रीगुरूसी ॥ अष्टसिद्धि त्याच्या दासी ॥ क्षण न लागतां परियेसी ॥ वेदशास्त्रें त्यासी साध्य ॥ ३२ ॥ ऐसी ऐकोनि गुरुवाणी ॥ माथा ठेवी त्यांचे चरणीं ॥ विनवीतसे कर जोडूनी ॥ करुणावचनें करूनियां ॥ ३३ ॥ जय जयाजी जगद्गुरू ॥ निर्गुण तूंचि निर्विकारी ॥ ज्ञानसागरा अपरंपारू ॥ उद्धरावें आपणातें ॥३४॥ अज्ञानमाया वेष्टोन ॥ नेणो गुरु असे कवण ॥ सांगा स्वामी प्रकाशोन ॥ ज्ञान होय आपणासी ॥३५॥ कैसा गुरु ओळखावा ॥ कोणेपरी आहे सेवा ॥ प्रकाश करोनि सांग देवा ॥ विश्ववंद्या गुरुमूर्ती ॥३६॥ जेणें माझें मन स्थिरू ॥ होवोनि ओळखे श्रीगुरू ॥ ऐसा करणें उपकारू ॥ ह्मणोनि चरणीं लागला ॥३७॥ करुणावचन ऐकोनी ॥ श्रीगुरु ह्मणती ऐक मुनी ॥ तूतें सांगेन विस्तारोनी ॥ गुरुसेवा विधान ॥ ३८ ॥ श्रीगुरु ह्मणती ऐक मुनी ॥ गुरू म्हणजे जनकजननी ॥ उपदेशकर्ता आहे कोणी ॥ तोचि जाणा परमगुरू ॥ ३९ ॥ गुरू हरिहरविरंची जाण ॥ स्वरूपें तोचि नारायण ॥ मन करूनी निर्वाण ॥ सेवा करावी भक्तीनें ॥४०॥ एतदर्थ कथा एक ॥ सांगेन ते तत्पर ऐक ॥ आदिपर्वीं असे देख ॥ गुरुसेवा विधान ॥४१॥ द्वारावती तीर्थ परियेसी ॥ विप्र एक धौम्यऋषी ॥ तिथे शिष्य होते त्यासी ॥ वेदाभ्यास करावया ॥ ४२ ॥ एक अरुणपांचाळ ॥ दुसरा बैद केवळ ॥ तिसरा उपमन्यु बाळ ॥ सेवा करिती विद्येलागीं ॥४३॥ पूर्वीं गुरूंची ऐशी रीती ॥ शिष्याकरवीं सेवा घेती ॥ अंतःकरण त्याचें पहाती ॥ निर्वाण वरी शिष्याचें ॥ ४४ ॥ पाहोनियां अंतःकरण ॥ असे भक्ती निर्वाण ॥ कृपा करिती तत्क्षण ॥ मनकामना पुरविती ॥ ४५ ॥ ऐसा धौम्यऋषी

भला ॥ तया अरुणपांचाळा ॥ एके दिवशीं निरोप दिधला ॥ ऐक द्विजा एकचित्तें ॥४६॥
शिष्यासि ह्मणे धौम्यमुनी ॥ आजि त्वां जावोनि रानीं ॥ वृत्तीस द्यावें तडाग पाणी ॥
जोंवर भूमि तृप्त होय ॥ ४७ ॥ असे वृत्ती तळे खालीं ॥ तेथें पेरिली असे साळी ॥ उदक
नेवोनि तेथें घाली ॥ शीघ्र ह्मणे शिष्यासी ॥ ४८ ॥ ऐसा गुरुनिरोप होतां ॥ गेला शिष्य
धांवता ॥ झाला तडागातें पहातां ॥ कालवा थोर वहातसे ॥४९॥ जेथें उदक वहात ॥ अति
दरारा गर्जत ॥ वृत्ती भूमि उन्नत ॥ उदक केवीं चढों पाहे ॥५०॥ ह्मणे आतां काय करूं ॥
कोपती आतां मातें गुरू ॥ उदक जातसे दरारू ॥ केवीं बांधूं ह्मणतसे ॥५१॥ आणोनिय
शिला दगड ॥ बांधिता होय उदकाआड ॥ पाणी जातसे धडाड ॥ जाती पाषाण वाहोनियां
॥५२॥ प्रयत्न करी नानापरी ॥ कांहीं केल्या न चढे वारी ॥ ह्मणे देवा श्रीगुरू हरी ॥ काय
करूं ह्मणतसे ॥ ५३ ॥ मग आपण मनीं विचारी ॥ गुरूचे शेतीं न चढे वारी ॥ प्राण त्य-
जीन निर्धारीं ॥ गुरूचे वृत्तीनिमित्य ॥५४॥ निश्चय करूनी मानसीं ॥ मनीं ध्यात श्रीगु-
रूसी ॥ ह्मणे काय आतां उपाय यासी ॥ योजूनी प्रयत्न करावा ॥ ५५॥ उदकाचे प्रवा-
हांत ॥ घालितां पाषाण जाती वाहत ॥ आपण आड पडों ह्मणत ॥ निर्धारिलें तये वेळीं
॥५६॥ हातीं दरडी धरी दृढें ॥ पाय ठेवी दुसरीकडे ॥ झाला आपण उदकाआड ॥ मनीं
श्रीगुरू ध्यातसे ॥५७॥ ऐसा शिष्य शिरोमणी ॥ निर्वाण करितां तत्क्षणीं ॥ वृत्तीकडे गेलें
पाणी ॥ प्रवाहाचें अर्ध देखा ॥५८॥ अर्धें पाणी जैसें तैसें ॥ वाहतसे नित्य सरिसे ॥ तया-
मध्यें शिष्यें कैसें ॥ बुडविलें अंग आपुलें ॥५९॥ ऐसा शिष्य तया स्थानीं ॥ बुडाला असे
प्रवाहपाणीं ॥ गुरूची वृत्ति झाली धनी ॥ उदकें पूर्ण परियेसा ॥६०॥ त्याचा गुरु धौम्य-

मुनी ॥ विचार करी अंतःकरणीं ॥ दिवस गेला अस्तमानीं ॥ अद्यापि शिष्य नयेची ॥६१॥ ऐसें मनीं विचारित ॥ गेला आपण वृत्तींत ॥ झालें असे उदक बहुत ॥ संतोषला बहु मुनी ॥६२॥ न देखे शिष्य तये वेळीं ॥ ह्मणोनि मारितसे आरोळी ॥ किंवा भक्षिलें व्याघ्रव्याळीं ॥ कोठें आहेसी ह्मणतसे ॥६३॥ ऐसें मनीं विचारित ॥ उंच स्वरें बोभाटत ॥ अरे शिष्या ऐसें ह्मणत ॥ प्रेमभावें बोलावी ॥ ६४ ॥ येणेंपरी करुणावचनीं ॥ पाचारीतसे धौम्यमुनी ॥ शब्द पडे शिष्यकानीं ॥ मग तेथोनी निघाला ॥ ६५ ॥ येवोनियां श्रीगुरूसी ॥ नमन केलें भावेंसी ॥ धौम्यमुनी महाहर्षी ॥ आलिंगोनियां आश्वासिला ॥ ६६ ॥ वर दीधला तये वेळीं ॥ ऐक शिष्या स्तोममौळी ॥ तूतें सकळ विद्या आली ॥ वेदशास्त्रादि व्याकरण ॥ ६७ ॥ ऐसें ह्मणतां तत्क्षणीं ॥ झाला विद्यावंत ज्ञानी ॥ लागतसे गुरुचरणीं ॥ भक्तिभावें करोनियां ॥ ६८ ॥ कृपानिधि धौम्यमुनी ॥ अपुल्या आश्रमांत नेवोनी ॥ निरोप दिधला संतोषोनी ॥ विवाह आतां करी ह्मणे ॥ ६९ ॥ निरोप घेवोनी शिष्यराणा ॥ गेला आपुल्या स्वस्थाना ॥ आणिक शिष्य दोघे जाणा ॥ होते तया गुरुजवळी ॥७०॥ दुसरा शिष्य बैद जाणा ॥ गुरूची करी शुश्रूषणा ॥ त्याच्या पहावया अंतःकरणा ॥ धौम्य गुरु ह्मणतसे ॥७१॥ धौम्य ह्मणे शिष्यासी ॥ सांगेन एक तुजशी ॥ तुवां जावोन अहर्निशीं ॥ वृत्ति आमुची रक्षावी ॥७२॥ रक्षूनियां वृत्तीसी ॥ आणावें धान्य घरासीं ॥ ह्मणतां शिष्य अतिहर्षी ॥ गेला तया वृत्तीकडे ॥७३॥ वृत्ती पिके जोंवरी ॥ अहोरात्रीं कष्ट करी ॥ रास होतां अवसरीं ॥ आला आपुल्या गुरूपाशीं ॥ ७४ ॥ सांगता झाला श्रीगुरूपाशीं ॥ ह्मणे वृत्ती भरली राशी ॥ आतां आणावया घरासी ॥ काय निरोप ह्मणतसे ॥ ७५ ॥ मग ह्मणे

धौम्य मुनी ॥ बारे शिष्या शिरोमणी ॥ कष्ट केले बहु रानीं ॥ आतां धान्य आणावें ॥७६॥ ह्मणोनि देती एक गाडा ॥ तया जुंपोनि एक रेडा ॥ येणेंपरी घेवोनि गाडा ॥ आला शेताजवळीक ॥ ७७ ॥ दोन खंडी साळीसी ॥ भरली शिष्यें गाडियासी ॥ एकीकडे रेडियाशीं ॥ जुंपोनि ओढी आपण देखा ॥७८॥ रेडा चाले शीघ्रेंसी ॥ न ओढवे तयासरसी ॥ मग आपुले कंठासी ॥ बांधिता झाला जूं देखा ॥७९॥ सत्राणें तयासरसी ॥ चालता झाला मार्गासी ॥ रेडा रुतला चिखलासीं ॥ आपुले बळें ओढितसे ॥८०॥ चिखलीं रुतला रेडा ह्मणोनी ॥ चिंता करी बहु मनीं ॥ आपण ओढी सत्राणीं ॥ गळां फांस पडतसे ॥ ८१ ॥ सोडोनियां रेडियासी ॥ काढिला गाडा बाह्यप्रदेशीं ॥ ओढितां आपण गळां फांसीं ॥ पाडूनि प्राण त्यजूं पाहे ॥ ८२॥ इतुकें होतां निर्वाणीं ॥ संमुख पातला धौम्य मुनी ॥ त्या शिष्यातें पाहोनी ॥ कृपा अधिक उपजली ॥ ८३ ॥ सोडोनियां शिष्यातें ॥ आलिंगोनि करुणा बहूतें ॥ वर दिधला तयातें ॥ संपन्न तूंचि वेदशास्त्रीं ॥८४॥ वर देतां तत्क्षणासीं ॥ सर्व विद्या आली तयासी ॥ निरोप घेवोनि गेला घरासी ॥ शिष्य वैद परियेसा ॥ ८५ ॥ तिसरा शिष्य उपमन्यु जाण ॥ सेवेविषयीं निपुण ॥ गुरुसेवा शुश्रूषण ॥ बहू करी परियेसा ॥८६॥ त्यासी व्हावा बहुत आहार ॥ ह्मणोनि विद्या नाहीं स्थीर ॥ त्यासी विचारी गुरुवर ॥ काय उपाय करावा ॥८७॥ त्यासी ह्मणे धौम्य मुनी ॥ तूतें सांगेन ऐके कानीं ॥ नित्य गोधनें नेवोनी ॥ रक्षण करी वनामध्यें ॥ ८८ ॥ ऐसें ह्मणतां तत्क्षणीं ॥ नमन केलें त्याचे चरणीं ॥ गुरें नेवोनियां रानीं ॥ तीं चारिलीं बहूत दिवस ॥ ८९ ॥ क्षुधा लागली आपणासी ॥ शीघ्र आणिलीं घरासीं ॥ कोपे गुरू तयासी ॥ ह्मणे शीघ्र येतोसि कां ॥९०॥

सविता जाय अस्तमानीं ॥ तंववरी गुरें असों दे रानीं ॥ येणेंपरी प्रतिदिनीं ॥ वर्तावें त्वां ह्मणतसे ॥९१॥ अंगिकारोनि शिष्यराणा ॥ गुरें घेवोनि गेला वना ॥ क्षुधाक्रांत होवोनियां जाणा ॥ चिंतित असे श्रीगुरूसी ॥ ९२ ॥ चरती गुरें नदीतीरीं ॥ आपण तेथें स्नान करी ॥ तया जवळी घरें चारी ॥ असती विप्र आश्रम तेथें ॥ ९३ ॥ जाऊनियां तया स्थानासी ॥ भिक्षा मागून करी भोजनासी ॥ मग रक्षी गोधनासी ॥ प्रति दिवशीं यापरी ॥९४॥ नित्य करी येणेंपरी ॥ रक्षूनी आणी गुरें घरीं ॥ वर्तत असतां निरंतरीं ॥ धौम्यमुनी पुसतसे ॥९५॥ गुरू ह्मणे शिष्यासी ॥ तूं नित्य गा उपवासी ॥ तुझा देह दिसे पुष्टीशी ॥ कवण्या गुणें होतसे ॥९६॥ ऐकोनि गुरूचें वचन ॥ सांगे शिष्य उपमन्य ॥ भिक्षा करूनि भोजन ॥ विप्राघरीं तेथें देखा ॥९७॥ भोजन करूनी प्रतिदिवशीं ॥ गुरें चारोनि येतों निशीं ॥ श्रीगुरू ह्मणती तयासी ॥ आह्मां सांडोनि केविं भुक्ती ॥ ९८ ॥ भिक्षा मागोनि प्रतिदिवशीं ॥ आणोनि द्यावी घरासी ॥ मागुती जावें गुरांपाशीं ॥ घेवोनि यावें निशिकाळीं ॥ ९९ ॥ गुरुनिरोपें येरे दिवशीं ॥ नेलीं गुरें रानासीं ॥ मागे भिक्षा नित्य जैसी ॥ दिधली ठेवोनी घरांत ॥ १०० ॥ घरीं तयातें भोजन ॥ कधीं न होय परिपूर्ण ॥ पुनः जावोनि आपण ॥ भिक्षा करूनि जेवितसे ॥ १ ॥ नित्य भिक्षा वेळ दोनी ॥ पहिली देवोनि सदनीं ॥ दुसरी आपण भक्षोनी ॥ काळ ऐसा कंठितसे ॥२॥ येणेंपरी क्वचित्काळ ॥ वर्तता झाला महा स्थूळ ॥ एके दिवशीं गुरु कृपाळ ॥ पुसतसे शिष्यातें ॥३॥ शिष्य सांगे वृत्तांत ॥ जेणें आपुली क्षुधा शमत ॥ नित्य भिक्षा मागत ॥ वेळ दोनी ह्मणतसे ॥ ४ ॥ एक वेळ घरासी ॥ आणोनि देतों प्रतिदिवशीं ॥ दुसरी भिक्षा स्वयेंसी ॥ करितों भोजन

आपण ॥५॥ ऐसें ह्मणतां धौम्यमुनी ॥ त्या शिष्यावरी कोपोनी ॥ ह्मणे भिक्षा वेळ दोनी ॥
आणोनि घरीं देईं कां ॥६॥ गुरुनिरोपें येणेंपरी ॥ दोनी भिक्षा देवोनि घरीं ॥ कैसा शिष्य
निर्धारी ॥ मनीं क्लेश न करीच ॥७॥ गुरें सहित रानांत ॥ असे शिष्य क्षुधाक्रांत ॥ गोव-
त्स असे स्तन पीत ॥ देखतसें तयासी ॥८॥ स्तन पीत वासरासी ॥ उच्छिष्ट गळे संधीं-
सी ॥ वाया जातसे भूमीसी ॥ ह्मणोनि जवळ पैं गेला ॥ ९ ॥ आपण असे क्षुधाक्रांत ॥
ह्मणोनि गेला धांवत ॥ पसरोनियां दोनी हात ॥ धरी उच्छिष्ट क्षीर देखा ॥११०॥ ऐसें क्षी-
रपान करी ॥ तेणें आपण उदर भरी ॥ दोन वेळ भिक्षा घरीं ॥ देतसे भावभक्तीनें ॥११॥
अधिक पुष्ट झाला आपण ॥ ह्मणे गुरु अवलोकून ॥ पाहों याचें शरीररक्षण ॥ कैसा
स्थूळ होतसे ॥१२॥ मागुती पुसे तयासी ॥ कवणे रीती पुष्ट परियेसी ॥ सांगे आपुले वृ-
त्तांतासी ॥ उच्छिष्ट क्षीरपान करितों ॥ १३ ॥ ऐकोनि ह्मणे शिष्यासी ॥ मतिहानि होय
उच्छिष्टेंसी ॥ दोष असे बहुवसीं ॥ भक्षूं नको ह्मणतसे ॥१४॥ भक्षूं नको ह्मणे गुरू ॥ नित्य
नाहीं तया आहारू ॥ दुसरे दिवशीं क्षुधित येरू ॥ काय करूं ह्मणतसे ॥ १५ ॥ येणेंपरी
गुरेंसहित ॥ जात होता रानांत ॥ गळत होतें क्षीर बहुत ॥ एक रुईच्या झाडासी ॥ १६ ॥
ह्मणे बरवें असे क्षीर ॥ उच्छिष्ट नव्हे निर्धार ॥ पान करूं धणिवर॥ ह्मणोनि तेथें बैसला
॥१७॥ पानें तोडोनि द्रोण करी ॥ तयामध्यें क्षीर भरी ॥ घेत होता धणीवरी ॥ तंव भरि-
लें डोळयांत ॥१८॥ तेणें गेल्या दृष्टी दोनी ॥ हिंडतसे रानोरानीं ॥ गुरें न दिसती नयनीं ॥
ह्मणोनि चिंता करीतसे ॥ १९ ॥ काष्ठ नाहीं अक्षहीन ॥ चिंता करीतसे गोधना ॥ गुरें
पाहों जातां राना ॥ पडला एका आडांत ॥१२०॥ पडोनियां आडांत ॥ चिंता करी अत्यंत ॥

गुरें गेलीं आतां सत्य ॥ गुरू बोलिले भजेलागीं ॥२१॥ पडला शिष्य तये स्थानीं ॥ दिवस गेला अस्तमानीं ॥ चिंता करी धौम्यमुनी ॥ अजुनी शिष्य न येची ॥२२॥ ह्मणोनि गेला रानासी ॥ देखे तेथें गोधनासी ॥ शिष्य नाहीं ह्मणोनि क्लेशीं ॥ दीर्घस्वरें पाचारी ॥२३॥ पाचारितां धौम्यमुनी ॥ ध्वनी पडली शिष्यकानीं ॥ प्रत्युत्तर देतां तत्क्षणीं ॥ जवळी गेला कृपाळू ॥२४॥ ऐकोनियां वृत्तांत ॥ उपजे कृपा अत्यंत ॥ अश्विनौ देव स्तवी ह्मणत ॥ निरोप दिधला तये वेळीं ॥२५॥ गुरुनिरोपें तयेवेळीं ॥ अश्विनौ देवां ध्याय मनीं ॥ दृष्टी आली दोनी नयनीं ॥ आला गुरूसंमुख ॥२६॥ येवोनियां श्रीगुरूसी ॥ नमन करी भक्तीसी ॥ स्तुती करी बहुवसीं ॥ शिष्योत्तम तयेवेळीं ॥ २७ ॥ संतोषोनी धौम्यमुनी ॥ तया शिष्या आलिंगोनी ॥ ह्मणे शिष्या शिरोमणी ॥ तुष्टलों तुझिया भक्तीसी ॥२८॥ प्रसन्न होवोनि शिष्यासी ॥ हस्तस्पर्श मस्तकासी ॥ वेदशास्त्रें तत्क्षणेंसी ॥ आलीं तया शिष्यासी ॥२९॥ गुरु ह्मणे शिष्यासी ॥ जावें आपुल्या घरासी ॥ विवाह करूनी सुखेंसी ॥ नांदत असे ह्मणतसे ॥१३०॥ होईल तुझी बहू कीर्ती ॥ शिष्य होती बहु जगतीं ॥ उत्तंक नाम विख्याती ॥ शिष्य तुझा परियेसी ॥३१॥ तोचि तुझिये दक्षिणेसी ॥ आणील कुंडलें परियेसीं ॥ जिंकोनियां शेषासी ॥ कीर्तिवंत होईल ॥३२॥ जनमेजय राजासी ॥ तोच करील उपदेशासी ॥ मारवील सर्पासी ॥ याग करूनी परियेसा ॥३३॥ तो उत्तंक जाऊन ॥ पुढें केला सर्पयज्ञ ॥ जनमेजयातें प्रेरून ॥ समस्त सर्प मारविले ॥३४॥ ख्याती झाली त्रिभुवनांत ॥ तक्षक आणिला इंद्रासहित ॥ गुरुकृपेचें सामर्थ्य ॥ ऐसें असे परियेसा ॥३५॥ जो असे गुरुद्वेषक ॥ त्यासी कैंचा परलोक ॥ अंतीं होय कुंभीपाक ॥ गुरुद्रोही पातक्यासी ॥३६॥ संतुष्ट करितां गुरूसी ॥ काय न साधे तयासी ॥ वेदशास्त्र ज्ञा-

नराशी ॥ लाधे क्षण न लागतां ॥३७॥ ऐसें जाणोनि मानसीं ॥ वृथा हिंडे अविद्येसीं ॥ जाई
आपुल्या गुरूपासीं ॥ तोचि तुज तारील॥३८॥त्याचें मन संतुष्ट होत ॥ तुज मंत्र साध्य त्व-
रित ॥ मन करूनी निश्चित ॥ त्वरित जाय ह्मणती देखा ॥३९॥ ऐसा श्रीगुरू निरोप देतां ॥
विप्र झाला अति ज्ञाता॥चरणावरी ठेविला माथा ॥ विनवीतसे तये वेळीं॥४०॥जयजयाजी
गुरुमूर्ती ॥ तूंचि साधन परमार्थी मातें ॥ निरोपिलें प्रीती ॥ तत्त्वबोध कृपेनें ॥४१॥ गुरुद्रोही
आपण सत्य॥अपराध घडले मज अमित॥गुरूचें दुखविलें चित्त ॥ आतां केवीं संतुष्टे॥४२॥
सुवर्णादि लोह सकळ ॥ भिन्न होतां सांधवेल ॥ होतां भिन्न मुक्ताफळ ॥ केवीं पुन्हा ऐक्य
होय ॥४३॥ अंतःकरण भिन्न झालें असतां ॥ प्रयास असे ऐक्य करितां ॥ ऐसें माझें मन अ-
सतां ॥ काय उपयोग वांचूनी॥४४॥ऐसें शरीर माझें द्रोही ॥ काय उपयोग वांचूनही ॥जी-
वित्वाची आशा नाहीं ॥ प्राण त्यजीन गुरूपासीं॥४५॥ऐसेपरी श्रीगुरूसी ॥ विनवी ब्राह्मण
अतिहर्षी॥नमूनी निघे वैराग्येसी॥निश्चय केला प्राण त्यजूं॥४६॥अनुतप्त झाला तो ब्राह्मण ॥
निर्मळ झालें अंतःकरण ॥ अग्नि लागतां जसें तृण ॥ भस्म होय तत्क्षणीं ॥४७॥ जैसी कार्पा-
सराशी ॥ वन्हि लागतां परियेसी ॥ जळोनि जाय त्वरितेसी ॥ तैसें तयासी झालें॥४८॥या-
कारणें पापासी॥अनुतप्त होतां परियेसी॥क्षालन होईल त्वरितेसी॥ शतजन्मींचें पाप जाय
॥४९॥निर्वाणरूप द्विजवर॥निघाला त्यजूं कलेवर ॥ ओळखिले गुरुवर॥पाचारिलें तयासी
॥५०॥ बोलावूनियां विप्रासी ॥ निरोप देती कृपेसी ॥ न करी चिंता तूं मानसीं ॥ गेले तुझे
दुरितदोष ॥५१॥ वैराग्य उपजलें तुझे मनीं ॥ दुष्कृत गेलें जळोनी ॥ एकचित्तें करूनी ॥
स्मर आपुले गुरुचरण ॥५२॥ तये वेळीं श्रीगुरूसी ॥ नमन केलें चरणासी ॥ जगद्गुरू तूंचि

होसी ॥ त्रयमूर्ती अवतार॥५३॥तव कृपा होय कैंचीं शरीरीं॥जरी पापें उदय होतां तमारी॥ अंधकार कोवि राहे ॥५४॥ ऐशियापरी श्रीगुरूसी ॥ स्तुति करी भक्तीसी ॥ रोमांच उठले अंगासी ॥ सद्गदित कंठ झाला ॥५५॥ निर्मळ मनेंसी तये वेळीं ॥ माथा ठेवी चरणकमळीं ॥ विनवीतसे करुणाबहाळी ॥ तारि तारि श्रीगुरुराया ॥५६॥ निर्वाण देखोनि अंतःकरणीं ॥ मस्तकीं ठेवी दक्षिण पाणी ॥ ज्ञान झालें तत्क्षणीं ॥ तया ब्राह्मणासी परियेसा॥५७॥वेदशास्त्र तात्काळ ॥ मंत्रास्त्रें आलीं सकळ ॥ प्रसन्न झाले गुरुदयाळ॥काय न्यून त्या विप्रासी॥५८॥ परीस लागतां लोहासी ॥ होय सुवर्ण बावन्न कसी ॥ तैसें तया ब्राह्मणासी ॥ ज्ञान झालें परियेसा ॥५९॥ आनंद झाला ब्राह्मणासी ॥ श्रीगुरु निरोपिती तयासी ॥ अमुचें वाक्य परियेसी ॥ जाय त्वरित गुरुजवळी ॥६०॥ जावोनियां गुरूपाशीं ॥नमन करी भावेंसीं ॥ संतोष होईल भरंवसी॥तोचि आपण सत्य मानी॥६१॥ऐसेपरी गुरुमूर्ती ॥ तया ब्राह्मणास बोधिती ॥ निरोप घेऊनियां त्वरिती ॥ गेला आपुल्या गुरूपाशीं॥६२॥निरोप देऊनि ब्राह्मणासी ॥श्रीगुरु निघाले परियेसी ॥ आले भिल्लवडी ग्रामासी ॥ भुवनेश्वरी सन्निध ॥६३॥ कृष्णा पश्चिम तटाकेसी ॥ औदुंबर वृक्ष परियेसी ॥श्रीगुरु राहिले गुप्तेसी ॥ एकाचित्तें परियेसा॥६४॥सिद्ध ह्मणे नामधारकासी ॥राहिले श्रीगुरु भिल्लवडीसी ॥ महिमा वाढली बहुवसीं ॥ प्रख्यात असे सांगेन॥६५॥ह्मणोनि सरस्वती गंगाधर ॥ सांगे गुरुचरित्रविस्तार ॥ ऐकतां होय मनोहर ॥ सकळाभिष्टें साधती ॥६६॥ इति श्रीगुरुचरित्र ॥ विवेकबोधें शिष्य पवित्र ॥ गुरुभजनें पवित्र ॥ सर्व विद्या पावले ॥९६७॥ इति श्रीगुरुचरित्रपरमकथाकल्पतरौ श्रीनृसिंहसरस्वत्युपाख्याने सिद्धनामधारकसंवादे गुरुशुश्रुषणं नाम षोडशोऽध्यायः ॥ ओंव्या १६७ ॥

॥ श्रीगणेशाय नमः ॥ ऐक शिष्या नामकरणी ॥ तूं गुरुभक्तशिखामणी ॥ तुझी भक्ती गुरुचरणीं ॥ लीन होय निर्धारें ॥१॥ पर्जन्य येतां पुढारा ॥ जैसा येतो शीतळ वारा ॥ सद्गुरुकृपा दैन्यहरा ॥ ऐक श्रीगुरुचरित्र ॥२॥ असें चरित्र कामधेनु जाण ॥ सांगतों तुज विस्तारोन ॥ एकचित्तें करूनी मन ॥ ऐक शिष्या नामधारका ॥ ३ ॥ कृष्णावेणी तटाकासी ॥ भुवनेश्वरी पश्चिमेसी ॥ औदुंबर वृक्षापासीं ॥ राहिले गुरू परियेसा ॥४॥ गौप्यरूपें असती गुरू ॥ ठाव असे अगोचरू ॥ अनुष्ठान धुरंधरू ॥ चातुर्मास्य येणेंपरी ॥५॥ सिद्धस्थान असे गहन ॥ भुवनेश्वरी सन्निधान ॥ विशेष गुरु राहिले ह्मणोन ॥ उत्कृष्ट महिमा वाढला असे ॥६॥ ऐकोनि सिद्धांच्या वचना ॥ नामधारक करी नमना ॥ श्रीगुरु परमात्मा जाणा ॥ कां राहिले गौप्यरूपें ॥७॥ काय त्यांसी तपोद्देश ॥ भिक्षा मागणें काय हर्ष ॥ हा संदेह माझ्या मानसास ॥ यातें निवारी दातारा ॥८॥ ऐक शिष्या नामधारका ॥ भिक्षा मागणें पिनाका ॥ आणिक सांगेन ऐका ॥ दत्तात्रेय गुरुमूर्तीसी ॥ ९ ॥ कृपासागर दत्तात्रेय मूर्ती ॥ भिक्षुकरूपी असे दिसती ॥ भक्तजन अनुग्रहार्थी ॥ तीर्थयात्रेसी हिंडती ॥१०॥ अनुपम तीर्थे महीवर ॥ असती गौप्य अपार ॥ श्रीगुरुमूर्ती परोपकार ॥ प्रकट करी भक्तांलागीं ॥११॥ भक्तजन उद्धारार्थ ॥ तीर्थें हिंडे श्रीगुरुनाथ ॥ गौप्य व्हावया कारणार्थ ॥ समस्त येवोनी मागती ॥ १२ ॥ लपवितां दिनकरासी ॥ केवीं लपे तेजोराशी ॥ कस्तूरी ठेवितां गौप्येसी ॥ सुगंध केवीं गौप्य होय ॥ १३ ॥ आणीक सांगेन तुजप्रती ॥ कल्पवृक्ष जेवीं जगतीं ॥ जेथें राहे तयां क्षिती ॥ कल्पिलें फळ देतसे ॥१४॥ याकारणें तया स्थानीं ॥ सांगेन तुज विस्तारोनी ॥ प्रकट झाले गुरुमुनी ॥ एकचित्तें परियेसा ॥१५॥ करवीर क्षेत्र

नगरांत ॥ ब्राह्मण एक वेदरत ॥ शास्त्रपुराणें विख्यात ॥ सांगे सकळ विद्वज्जनां ॥१६॥ आद्यवेदी असे आपण ॥ जाणे तर्क व्याकरण ॥ आन्हिकाप्रमाणें आचरण ॥ कर्ममार्गीं रत असे ॥ १७ ॥ त्यासी झाला एक सुत ॥ मतिमंद असे उपजत ॥ मातापिता समस्त ॥ गेलीं मरोनी तयाचीं ॥१८॥ दिवस मास वर्धतां बाळ ॥ वर्षें सात झालीं केवळ ॥ व्रतबंध करिती निश्चळ ॥ तया द्विजकुमराचा ॥ १९ ॥ न ये स्नानसंध्या तयासी ॥ गायत्रीमंत्र परियेसी ॥ वेद कैंचा मूर्खासी ॥ पशुसमान झालासे ॥२०॥ जेथें सांगती अध्ययन ॥ जाऊनि आपण शिकों ह्मणे ॥ तावन्मात्र शिकतां क्षणें ॥ विस्मृति होय तयासी ॥ २१ ॥ तया ग्रामींचे विद्वज्जन ॥ निंदा करिती आपण ॥ विप्रकुळीं जन्मून ॥ विद्या न ये तुजलागीं ॥२२॥ तुझा पिता ज्ञानवंत ॥ वेदशास्त्र अभिज्ञात ॥ त्याच्या पोटीं कैसा सुत ॥ उपजलासी दगडापरी ॥ २३ ॥ जळो जळो तुझें जिणें ॥ पित्याच्या नांवा आणिलें उणें ॥ पोटीं बांधोनि पाषाण ॥ बावीतळीं रिघेनासि कां ॥२४॥ जन्मोनियां संसारीं ॥ वृथा झालासि पशुपरी ॥ तुज गती यमपुरीं ॥ आचारहीन वर्तसी ॥ २५ ॥ ज्यासी असे विद्या एक ॥ तोचि मनुष्यांमाजि अधिक ॥ जैसा चिंतामणी देख ॥ तैसी विद्या परियेसा ॥ २६ ॥ ज्याचे हृदयीं असे विद्या ॥ त्यासी सकळ भोग सद्या ॥ यशस्वी होय सुखसंपदा ॥ समस्तांमध्यें पूज्य तोचि॥२७॥एखाद्या समयीं विदेशासी ॥ जाई नर विद्याभ्यासी ॥ पूजा करिती त्यासी ॥ विदेश होय स्वदेश ॥२८॥ श्रेष्ठ असेल वय थोर ॥ विद्या नाहीं अपूज्य नर ॥ अश्रेष्ठ असेल एखादा जर ॥ विद्या असतां पूज्य होय ॥२९॥ ज्यासी नाहीं सहोदर ॥ तयासी विद्या भ्रातर ॥ सकळिकां वंद्य होय नर ॥ विद्यागुण ऐसा असे ॥ ३० ॥

जयासि असे विद्या बहूत ॥ तोचि होय ज्ञानवंत ॥ त्याचिया देहीं दैवत ॥ पूजा घेई सकळांपाशीं॥३१॥एखादा असे अधिपती ॥ तयासी समस्त वंदिती ॥ तोही आपण अति हर्षी ॥ विद्यावंता पूजीतसे॥३२॥ज्याचे घरीं नाहीं धन ॥ त्यासी विद्या असे धन ॥ विद्या शिकावयाचें कारण॥तेंचि असे जाणपां॥३३॥ऐकूनि तयाचें वचन ॥ ब्रह्मचारी करी नमन ॥स्वामी निरोपिलें ज्ञान॥विद्याभ्यास करावया॥३४॥जन्मांतरीं पूर्वी आपण ॥केलें नाहीं विद्यादान॥ न ये विद्या याचि कारण ॥ काय करूं ह्मणतसे ॥३५॥ऐसा आपण महादोषी ॥ जरी असेल उपाय यासी ॥ उद्धरावें जी कृपेसी ॥ निरोपावें दातारा ॥३६॥ परिसोनी सकळ ब्राह्मण ॥ सांगती तयासी हांसोन ॥ होईल पुढें तुझें जनन ॥ तधीं येईल विद्या तूतें ॥३७॥ तुज कैंचा विद्याभ्यास ॥ पशु केवळ नरविशेष ॥ भिक्षा मागूनि उदर पोष ॥ अरे मूर्खा कुळनाशका ॥३८॥ ऐसें नीच उत्तरेंसी ॥ बोलती द्विजलोक त्यासी ॥ वैराग्य धरोनी मानसीं ॥ निघाला असे अरण्यांत ॥३९॥ मनीं झाला खेदें खिन्न ॥ ह्मणे आतां त्यजीन प्राण ॥ समस्त ठेविती दूषण ॥ काय उपयोग वांचोनिया ॥४०॥ जळो जळो आपुलें जिणें ॥ पशु झालों मतिहीन ॥ आतां वांचोनी काय करणें ॥ ह्मणोनि निघाला वैराग्यें॥४१॥भिल्लवडी ग्रामासी ॥ आला तो नर परियेसीं ॥ अन्न न घे उपवासी ॥ पातला निशीं दैववशें॥४२॥जेथें असे जगन्माता ॥भुवनेश्वरी विख्याता ॥ तेथें पावला त्वरिता॥करी दर्शन देवीचें ॥४३॥ न करी स्नानसंध्यादिक ॥ अपार करीतसे दुःख ॥ देवद्वारासंमुख॥धरणें घेतलें तयानें॥४४॥ येणेंपरी दिवस तिन्ही ॥निर्वाण मन करूनी॥अन्नोदक त्यजूनी॥बैसला होता तो द्विज ॥४५॥ नोहे स्वप्न त्यालागोनी ॥ ह्मणोनी कोपे बहु मनीं ॥ ह्मणे अंबा भवानी ॥ कां उपेक्षिसी मजलागीं॥४६॥ आक्रंदोनी तये

वेळीं ॥ शस्त्र घेऊनि प्रबळी ॥ आपुली जिव्हा तात्काळी ॥ छेदोनि वाहे देवीचरणीं ॥ ४७ ॥
जिव्हा वाहोनि अंबेसी ॥ मागुती ह्मणे परियेसी ॥ जरी तूं मज उपेक्षिसी ॥ वाहीन शीर तुझे
चरणीं ॥४८॥ ऐसें निर्वाण मानसीं ॥ क्रमिता झाला तो निशी ॥ स्वप्न झालें तयासी ॥ ऐका
समस्त श्रोतेहो ॥४९॥ऐक बाळा ब्रह्मचारी ॥ कां आक्रोशसी आह्मावरीं ॥ असे कृष्णा पश्चि-
मतीरीं ॥ त्वरित जाय तये स्थानीं ॥५०॥ औदुंबराचे वृक्षातळीं ॥ असे तापसी महाबळी ॥
अवतार पूरुष चंद्रमौळी ॥ तुझी वांछा पुरवील ॥५१॥ ऐसें स्वप्न तयासी ॥ झालें अभिनव
परियेसी ॥ जागृत होतां तत्क्षणेसी ॥ निघाला तेथोनी ब्राह्मण ॥५२॥निघाला विप्र त्वरित ॥
पळत गेला प्रवाहांत ॥ सादर लक्षितांचि तेथ ॥ देखता झाला श्रीगुरूसी ॥ ५३ ॥ चरणावरी
ठेवोनियां माथा ॥ अत्यंत स्तोत्र झाला करिता ॥ श्रीगुरुमूर्ती संतोषतां ॥ आश्वासीत तये-
वेळीं॥५४॥श्रीगुरुमूर्ती संतोषती ॥ माथां हस्त ठेविती ॥ ज्ञान झालें तयाप्रती ॥ जिव्हा आली
तात्काळिक॥५५॥जैसा मानससरोवरास॥ वायस जातां परियेस ॥ तो होय राजहंस ॥तैसें
झालें विप्रातें ॥५६॥ चिंतामणि संपर्कैसी ॥ सुवर्णत्व येई लोहासी ॥ मृत्तिका पडतां जांबून-
दासी ॥ सुवर्ण जेवीं होय ऐका॥५७॥तैसें तया ब्राह्मणासी॥स्पर्श होतां गुरुचरणासी ॥ आली
सकळ विद्या त्यासी ॥वेदशास्त्र तर्कभाष्य॥५८॥सिद्ध ह्मणे नामधारका ॥ श्रीगुरुमहिमा ऐक
नेका ॥ जे जे स्थानीं वास देखा ॥ तेथें महिमा ऐसी असे ॥५९॥ह्मणोनी सरस्वती गंगाधर॥
सांगे गुरुचरित्र विस्तार ॥ ऐकतां होय मनोहर ॥ सकळाभीष्टें साधती ॥६०॥इति श्रीगुरुच-
रित्र ॥ मूर्खासि झालें ज्ञान प्राप्त ॥ तेंचि कथा वर्णिली येथ ॥ श्रीगुरुप्रसादें ॥ ६१ ॥ इति
श्रीगुरुचरित्रे सिद्धनामधारकसंवादे द्विजोद्धरणं नाम सप्तदशोऽध्यायः ॥ ओंव्या ६१ ॥

॥ श्रीगणेशाय नमः ॥ जयजयाजी सिद्धमुनी ॥ तूं तारक भवार्णीं ॥ सुधारस आमुचे श्र-
वणीं ॥ पूर्ण केला दातारा ॥ १ ॥ गुरुचरित्र कल्पतरूवन ॥ ऐकतां न धाय माझें मन ॥
कांक्षा पावे अंतःकरण ॥ कथामृत ऐकावया ॥ २ ॥ ध्यान लागलें श्रीगुरुचरणीं ॥ तृप्ति
नोहे अंतःकरणीं ॥ कथामृत संजीवनी ॥ आणीक निरोपीं दातारा॥ ३॥येणेंपरी सिद्धासी॥
विनवी शिष्य भक्तीसी ॥ मस्तक ठेवी चरणासी ॥ कृपा भाकी तयेवेळीं ॥४॥ शिष्यवच-
न ऐकोनी ॥ संतोषले सिद्धमुनी ॥ सांगतात विस्तारोनी ॥ ऐका श्रोते एकचित्तें ॥५॥ ऐक
शिष्य शिखामणी ॥ धन्य धन्य तुझी वाणी ॥ तुझी भक्ती श्रीगुरुचरणीं ॥ तल्लीन झाली
निश्चयें ॥६॥ तुजकरितां आह्मासी ॥ ज्ञान झालें परियेसी ॥ गुरुचरित्र आद्यंतेसी ॥ स्मरण
झालें अवधारा ॥७॥ भिल्लवडी स्थानमहिमा ॥ निरोपिलें अनुपमा ॥ पुढील चरित्र उत्तमा॥
सांगेन ऐका एकचित्तें ॥८॥ क्वचित्काळ तये स्थानीं ॥ गुरु होते गौप्य होवोनी ॥ प्रकट
झाले ह्मणोनी ॥ पुढें निघाले परियेसा ॥९॥ वरुणासंगम असे विख्यात ॥ दक्षिण वाराण-
सी ह्मणत ॥ श्रीगुरु आले अवलोकित ॥ भक्तां अनुग्रह करावया ॥१०॥ पुढें कृष्णातटा-
कांत ॥ श्रीगुरु तीर्थें पावन करित ॥ पंचगंगा संगम ख्यात ॥ तेथें राहिले द्वादशाब्दें॥११॥
अनुपम तीर्थ मनोहर ॥ जैसें अविमुक्त काशीपुर ॥ प्रयागसमान तीर्थ मनोहर ॥ ह्मणोनी
राहिले परियेसा ॥१२॥ कुरवपूर महा गहन ॥ कुरुक्षेत्र तेची जाण ॥ पंचगंगाकृष्णासं-
गम ॥ अति उत्तम परियेसा ॥ १३ ॥ कुरुक्षेत्रीं जितकें पुण्य ॥ तयाहूनी अधिक गुण ॥
तीर्थ असे अगम्य ॥ ह्मणोनि राहिले श्रीगुरू ॥१४॥ पंचगंगा नदीतीर ॥ प्रख्यात ॥ असे
पुराणांतर ॥ पांच नांवें आहेत थोर ॥ सांगेन ऐक एकचित्तें ॥१५॥ शिवा भद्रा भोगाव-

तीं ॥ कुंभीनदी सरस्वती ॥ पंचगंगा नाम ख्याती ॥ महापापें संहारक ॥ १६ ॥ ऐशा प्रख्यात पंचगंगा ॥ आल्या कृष्णेचिया संगा ॥ प्रयागाहूनी असे चांगा ॥ संगमस्थान मनोहर ॥ १७ ॥ अमरपूर ह्मणोनि ग्राम ॥ स्थान असे अनुपम ॥ जैसा प्रयागसंगम ॥ तैसें स्थान मनोहर ॥१८॥ वृक्ष असे औदुंबरू ॥ प्रख्यात जाणा कल्पतरू ॥ देव जसे अमरेश्वरू ॥ तया संगमीं जाणपां ॥१९॥जैसी वाराणसीपुरी ॥ गंगाभागीरथीतीरीं ॥ पंचनदी संगम थोरी ॥ तत्समान परियेसा ॥ २० ॥ अमरेश्वर सन्निधानीं ॥ आहेत चौसष्ट योगिनी ॥ शक्तितीर्थ निर्गुणी ॥ प्रख्यात असे परियेसा ॥ २१ ॥ अमरेश्वर लिंग बरवें ॥ तयासी वंदोनि स्वभावें ॥ पूजितां नरें अमर व्हावें ॥ विश्वनाथ तोचि जाणा ॥२२॥ प्रयागीं करितां माघस्नान ॥ जें पुण्य होय साधन ॥ शतगुण होय त्याहून ॥ एक स्नानें परियेसा ॥ २३ ॥ सहज नदीसंगमांत ॥ प्रयागासमान विख्यात ॥ अमरेश्वर परब्रह्मवस्त ॥ तया स्थानीं वसतसे ॥२४॥ याकारणें तया स्थानीं ॥ कोटि तीर्थें असती निर्गुणी ॥ कृष्णावेण्या दक्षिणवाहिनी ॥ त्यांसहित निरंतर ॥२५॥ अमित तीर्थें तया स्थानीं ॥ सांगतां होय विस्तार पुराणीं ॥ अष्टतीर्थें असती गुणी ॥ तया कृष्णाप्रवाहांत ॥२६॥ उत्तरदिशे असे देखा ॥ वाहे कृष्णा पश्चिमाभिमुखा ॥ शुक्रतीर्थ नाम ऐका ॥ ब्रह्महत्या पापें जाती ॥२७॥ औदुंबर सन्निधेसी ॥ तीन तीर्थें परियेसी ॥ एकाहुनी एक अधिकेसी ॥ तीर्थें असती मनोहर ॥२८॥ पापविनाशी काम्यतीर्थ ॥ तिसरें सिद्ध वरदतीर्थ ॥ अमरेश्वर सन्निधार्थ ॥ अनुपम तीर्थें असती पैं ॥२९॥ पुढें संगम षट्कुळांत ॥ प्रयागतीर्थ असे ख्यात॥ शक्तितीर्थ अमरतीर्थ॥ कोटितीर्थ परियेसा ॥ ३० ॥ तीर्थें असती अपारी ॥ सांगतां ग्रंथ विस्तारी ॥ याकारणें

श्रीगुरु त्या पुरीं ॥ राहिले तेथें द्वादशाब्दें ॥ ३१ ॥ कृष्णावेणी नदी दोनी ॥ पंचगंगा मिळोनी ॥ सप्तनदी समागम गुणी ॥ काय सांगों महिमा त्याचा ॥३२॥ ब्रह्महत्यादि पातकें ॥ जळोनि जाती स्नानें एकें ॥ ऐसें सिद्धस्थान निकें ॥ सकळाभीष्टें होती तेथें ॥ ३३ ॥ काय सांगों त्याचा महिमा ॥ आणीक द्यावया नाहीं उपमा ॥ दर्शनमात्रें पुण्यकामा ॥ स्नानफळ काय वर्णूं ॥३४॥ भक्तजनतारणार्थ ॥ असे तीर्थ प्रख्यात ॥ राहिले तेथें श्रीगुरुनाथ ॥ ह्मणोनि प्रकट जाहले ॥३५॥ साक्षात् असे कल्पतरू ॥ स्वयंभू वृक्ष असे औदुंबरू ॥ गौप्य होतां अगोचरू ॥ राहिले श्रीगुरु तये स्थानीं ॥३६॥ भक्तजन तारावे हा हेत ॥ ह्मणोनि तीर्थें प्रख्यात करित ॥ राहिले तेथें श्रीगुरुनाथ ॥ ह्मणोनि प्रकट झाले जाणा ॥ ३७ ॥ असतां पुढें वर्तमानीं ॥ भिक्षा करावया प्रतिदिनीं ॥ झाली असतां माध्यान्हीं ॥ जाती श्रीगुरु परियेसा ॥३८॥ तया ग्रामीं द्विज एक ॥ असे वेदाभ्यासक ॥ भार्या त्याची पतिसेवक ॥ पतिव्रता शिरोमणी ॥ ३९ ॥ सुशील असे ब्राह्मण ॥ शुष्क भिक्षा करी आपण ॥ कर्ममार्गें आचरण ॥ असे सात्विक वृत्तीनें ॥ ॥४०॥ तया विप्रमंदिरांत ॥ घेवडा वेल उन्नत ॥ शेंगा निघती अमित ॥ त्याणें उदरपूर्ती करीतसे ॥४१॥ एखादे दिवशीं ब्राह्मणासी ॥ वरून मिळे परियेसी ॥ तयीं शेंगा रांधोनि हर्षीं ॥ दिवस क्रमी येणेंपरी ॥४२॥ ऐसा ब्राह्मण दरिद्री ॥ याचकवृत्ती उदर भरी ॥ पंचमहायज्ञ कुसरी ॥ अतिथि पूजी भक्तीनें ॥ ४३ ॥ भक्तिपूर्वक श्रीगुरूसी ॥ पूजा करी नेमेंसी ॥ घेवड्याच्या शेंगा परियेसी ॥ करी शाख नैवेद्या ॥४४॥ वर्ततां श्रीगुरु एके दिवशीं ॥ तया विप्रमंदिरासी ॥ गेले आपण भिक्षेसी ॥ नेलें विप्रें भक्तीनें ॥ ४५ ॥ भिक्षा करून ब्राह्मणास ॥ आश्वासिती अतिसंतोष ॥ गेले तुझे

दरिद्रदोष ॥ ह्मणोनि निघती तये वेळीं ॥ ४६ ॥ तया विप्रगृहांत ॥ जो होता वेल उन्नत ॥ घेवडा नामें विख्यात ॥ आंगण सर्व वेष्टिलें ॥४७॥ तया वेलाचें जें का मूळ ॥ श्रीगुरु छेदिती तात्काळ ॥ टाकोनि देती सकळ ॥ गेले आपण संगमासी ॥ ४८ ॥ विप्रवनिता तये वेळीं ॥ दुःख करिती पुत्र सकळी ॥ ह्मणे पहाहो दैव बळी ॥ कैसें देवें केलें आह्मां ॥४९॥ आह्मीं तया यतीश्वरासी ॥ काय उपद्रव केला त्यासी ॥ छेदिलें आमुच्या ग्रासासी ॥ टाकोनि दिलें भूमीवरी ॥ ५० ॥ ऐशापरी ती नारी ॥ दुःख करी अनिवारी ॥ पति तिचा कोपें वारी ॥ ह्मणे प्रारब्ध प्रमाण ॥५१॥ भ्रतार ह्मणे तये वेळीं ॥ जें होणार जया काळीं॥ निर्माण करी चंद्रमौळी ॥ तया आधीन विश्व जाण ॥५२॥ विश्वव्यापक नारायण ॥ उत्पत्तिस्थिति लया कारण ॥ पिपीलिकादि स्थूल जीवन ॥ समस्तां आहार करीतसे ॥५३॥ आयुरन्नं प्रयच्छति ॥ ऐसें बोले वेदश्रुति ॥ पंचानना आहार हस्ती ॥ केवीं करीतसे प्रत्यहीं ॥ ५४ ॥ चौऱ्यायशी लक्ष जीवांसी ॥ स्थूल सूक्ष्म समस्तांसी ॥ निर्माण केलें आहारासी ॥ उत्पत्ति केली तदनंतर ॥ ५५ ॥ रंका राया एकचि दृष्टी ॥ करूनी पोषितो हे सृष्टी ॥ आमुचें प्रारब्ध असे वोखटी ॥ तैसें फळ आपणासी ॥५६॥ पूर्वजन्मीं निक्षेपण ॥ सुकृत अथवा दुष्कृत जाण ॥ भोगणें आपुलें आपण ॥ पुढिलियावरी काय बोल ॥ ५७ ॥ आपुलें दैव असतां उणें ॥ पुढिल्या बोलती मूर्खपणें ॥ जें पेरिलें तें भक्षणें ॥ कवणा बोल सांगे मज ॥ ५८ ॥ बोल ठेविसी ईश्वरासी ॥ आपुलें अर्जित न विचारिशी ॥ ग्रास घेतला ह्मणसी ॥ अविद्या माया वेष्टोनी ॥५९॥ तो तारक आह्मासी ॥ ह्मणोनि आला भिक्षेसी ॥ नेलें आमुच्या दरिद्रासी ॥ तोचि तारिल अंतीं आह्मां ॥ ६० ॥ येणेंपरी स्त्रियेसी ॥ संबो-

गु. च.

धित परियेसी ॥ काढोनि वेलशाखेसी ॥ टाकिता झाला गंगेंत ॥ ६१ ॥ तया वेलाचें मूळ जें कां ॥ होतें आपुल्या द्वारीं ऐका ॥ काढों ह्मणे द्विज निका ॥ खणिता झाला त्या काळीं ॥६२॥ काढितां वेलमूळासी ॥ लागला कुंभनिधानेसी ॥ आनंद झाला बहुवसी ॥ घेवोनि गेला घरांत ॥ ६३ ॥ ह्मणे नवल प्रवर्तलें ॥ यतीश्वर प्रसन्न झाले ॥ ह्मणोनि वेलासि तोडिलें ॥ निधान लाधलें आह्मांसी ॥ ६४ ॥ नर नव्हे तो योगेश्वर ॥ होय ईश्वरी अवतार ॥ आह्मां भेटला दैन्यहर ॥ ह्मणे चला दर्शनासी ॥ ६५ ॥ जावोनि संगमीं गुरूपासीं ॥ पूजा करिती भावेसी ॥ वृत्तांत सांगीतला तयासी ॥ तये वेळीं हर्षयुक्त ॥ ६६ ॥ श्रीगुरु ह्मणती तयासी ॥ तुह्मीं हें न सांगावें कवणासी ॥ अखंड लक्ष्मी तुमचे वंशीं ॥ आह्मां प्रकटतां जाईल ॥ ६७ ॥ ऐशापरी द्विजासी ॥ सांगती श्रीगुरु परियेसी ॥ सुखी असावें आपुल्या गृहासी ॥ पुत्रपौत्रीं नांदावें ॥६८॥ ऐसा वर लाधोन ॥ गेला घरीं तो ब्राह्मण ॥ श्रीगुरुकृपा ऐसी जाण ॥ दर्शनमात्रें दैन्य हरे ॥६९॥ ज्यासि होईल गुरुकृपा ॥ त्यासी कैचें दैन्य बापा ॥ कल्पवृक्ष असतां तापा ॥ केवीं घडों शकेल ॥ ७० ॥ दैवें उणा असेल नरू ॥ तेणें भजावा श्रीगुरू ॥ तोचि पावेल पैलपारू ॥ पूज्य होय सकळ लोकां ॥७१॥ जो कां भजेल श्रीगुरूतें ॥ इहपर साधे तयातें ॥ अखंड लक्ष्मी सदनातें ॥ अष्टैश्वर्यें नांदती ॥७२॥ सिद्ध ह्मणे नामधारकासी ॥ श्रीगुरुमहिमा आहे ऐसी ॥ भजावें मनोभावेंसी ॥ कामधेनु तुझे घरीं ॥७३॥ गंगाधराचा नंदन ॥ सांगे गुरुचरित्र विस्तारोन ॥ पुढील कथामृतपान ॥ ऐका श्रोतेहो एकचित्तें ॥ ७४ ॥ इति श्रीगुरुचरित्रामृत ॥ विवेकसार आयाचित ॥ विप्रदैन्यहरण येथ ॥ कथा निरोपिली ॥७५॥ इति श्रीगु० अष्टादशोऽध्यायः ॥ ओंव्या ७५ ॥

॥ श्रीगणेशाय नमः ॥ नामधारक शिष्यराणा ॥ लागला सिद्धाचिया चरणा ॥ कर जोडू-
नियां जाणा ॥ विनवीतसे तयेवेळीं ॥१॥ जयजयाजी योगेश्वरा ॥ तूंच ज्योती अंधका-
रा ॥ भक्तजन मनोहरा ॥ भवसागर तारक तूं ॥ २ ॥ अज्ञानतिमिर रजनींत ॥ निजलों
होतों मदोन्मत्त ॥ गुरुचरित्र मज अमृत ॥ प्राशन करविलें दातारा ॥३॥ त्यानें झालें मज
चेतन ॥ ज्ञानसूर्य प्रकाशून ॥ तुझे कृपेनें जागृत होवोन ॥ झालों स्वामी सिद्धमुनी ॥४॥
पुढील कथाविस्तारा ॥ आज्ञा द्यावी जी योगेश्वरा ॥ कृपा करी गा दातारा ॥ ह्मणोनि
लागला चरणासी ॥५॥ ऐकोनियां शिष्यवचन ॥ संतोषला सिद्ध आपण ॥ सांगतसे वि-
स्तारोन ॥ गुरुमहिमा अनुपम्य ॥६॥ शिष्योत्तमा नामांकिता ॥ सांगेन ऐक गुरूची कथा ॥
औदुंबर वृक्षाखालता ॥ होते गुरु परियेसा ॥ ७ ॥ ऐकोनि सिद्धाचें वचन ॥ नामधारक
करी प्रश्न ॥ अनेक पुण्यवृक्ष त्यजून ॥ कां प्रीती औदुंबरीं ॥८॥ अश्वत्थ वृक्ष असे थोर ॥
ह्मणोनि सांगती वेद चार ॥ श्रीगुरूसी आवडे औदुंबर ॥ कवण कारण निरोपावें ॥ ९ ॥
सिद्ध ह्मणे नामांकिता ॥ सांगेन त्याचिया वृत्तांता ॥ कथीं नृसिंह अवतार होता ॥ हिर-
ण्यकश्यपवधार्थ ॥१०॥ नखेंकरूनि दैत्यासी ॥ विदारियेलें कोपेसी ॥ आंतडीं काढोनि-
यां हर्षी ॥ घालीतसे माळ गळां ॥११॥ तया दैत्याचे पोटीं ॥ विष होतें काळकूटी ॥ जै-
शी वडवाग्नीची मोटी ॥ तैसें विष परियेसा ॥ १२ ॥ विदारण करितां दैत्यासी ॥ वेधलें
विष त्या नखांसी ॥ तापलीं नखें परियेसी ॥ ऐक शिष्या एकचित्तें ॥ १३ ॥ तयेसमयीं
महालक्ष्मी ॥ घेऊनि आली अतिप्रेमी ॥ औदुंबरफळें नामी ॥ शांती करणें नखांसी ॥१४॥
तयेवेळीं शीतलार्थ ॥ नखें रोंविलीं औदुंबरांत ॥ विषाग्नी झाला शांत ॥ उग्र नरसिंह

शांत झाला ॥१५॥ शांत झाला नरसिंह देव ॥ देता जाहला लक्ष्मीस खेव ॥ संतोषोनी उभय देव ॥ वर देती तयेवेळीं ॥ १६ ॥ तयेवेळीं औदुंबरासी ॥ देतो वर हृषीकेशी ॥ सदा सफळ तूंचि होसी ॥ कल्पवृक्ष तुझें नाम ॥ १७ ॥ जे जन भजती भक्तीसी ॥ काम्य होय त्वरितेसी ॥ तुज देखतांचि परियेसी ॥ उग्र विष शांत होय ॥१८॥ जे सेविती मनुष्यलोक ॥ कामना करूनि अनेक ॥ फलप्राप्ति होय निक ॥ पापावेगळा होय नर ॥१९॥ वांझ नारी सेवा करितां ॥ पुत्र होती सत्वरता ॥ जे जन असती दैन्य पीडिता ॥ सेवितां होती श्रियायुक्त ॥२०॥ तुझे छायेसी जळांत ॥ स्नान करितां पुण्य बहुत ॥ भागीरथीचें स्नान करित ॥ तितुकें पुण्य परियेसा ॥ २१ ॥ तुझे छाये बैसोन ॥ जे जन करिती अनुष्ठान ॥ अनंत फळ होय ज्ञान ॥ कल्पिलें फळ होय तयांसी ॥ २२ ॥ तुज सेवी त्या नरासी ॥ व्याधि न होय कवणे दिवशीं ॥ ब्रह्महत्यादि महादोषी ॥ पुनीत होय परियेसा ॥२३॥ जें जें कल्पोनि मानसीं ॥ तुज सेविती भावेंसी ॥ कल्पवृक्ष समानेंसी ॥ सिद्धी पावती अवधारा ॥ २४ ॥ मी सदा वसे तुजपाशीं ॥ लक्ष्मीसहित संतोषीं ॥ ह्मणोनि वर देती हर्षी ॥ नरसिंहमूर्ति तयेवेळीं ॥२५॥ ऐसा वृक्ष औदुंबरू ॥ कलियुगीं तोचि कल्पतरू ॥ नरसिंहमूर्ती होतां क्रूरू ॥ शांत झाला तयापाशीं ॥२६॥ याकारणें श्रीगुरुमूर्ती ॥ नरसिंहमंत्रें उपासना करिती ॥ उग्र करावया शांती ॥ औदुंबरीं वास करिती ॥ २७ ॥ अवतार आपण तयाचे ॥ स्थान आपुलें असे साचें ॥ शमन करावया उग्रतेचें ॥ ह्मणोन वास औदुंबरीं ॥२८॥ सहज वृक्ष औदुंबरू॥कल्पवृक्षसमान तरू॥विशेष वास करी गुरू ॥ कल्पिलीं फळें तेथें होतीं ॥२९॥ तया कल्पद्रुमातळीं ॥ होते श्रीगुरु चंद्रमौळी ॥ ब्रह्माविष्ण नेत्रभाळी ॥

मनुष्यदेह धरोनियां ॥३०॥ भक्तजनतारणार्थ ॥ पावन करी सर्व तीर्थ ॥ अवतार त्रिमूर्ती श्रीगुरुनाथ ॥ भूमीवरी वर्ततसे ॥ ३१ ॥ वृक्षातळीं अहर्निशीं ॥ श्रीगुरु असती गोप्येसी ॥ माध्यान्हकाळ समयासी ॥ समारंभ होय तेथें ॥३२॥ अमरेश्वर सन्निधानीं ॥ वसती चौसष्ट योगिनी ॥ पूजा करावया माध्यान्हीं ॥ श्रीगुरुजवळी येती नित्य ॥३३॥ नमन करून भक्तीसी ॥ नेती आपुल्या मंदिरासी ॥ पूजा करिती विधानेसी ॥ गंध परिमळ सुगंधयुक्त ॥३४॥ आरोगोनी तया घरीं ॥ पुनरपि येती औदुंबरीं ॥ एकाद्या समयीं द्विजवरीं ॥ विस्मय करिती देखोनियां॥३५॥ह्मणती अभिनव यती कैसा॥न करी भिक्षा ग्रामांत ऐसा॥ असे सदा अरण्यवासा ॥ कवणेपरी काळ कंठी ॥३६॥ पाहूं याचें वर्तमान ॥ एकादा नर ठेवून ॥ ऐसें बोलती नगरजन ॥ पाहूं अंत यतीश्वराचा ॥ ३७॥ ऐसें विचारुनी मानसीं ॥ गेले संगमस्थानासी ॥ माध्यान्हसमयासी ॥ उपजे भय अंतःकरणीं ॥३८॥ जे पाहों ह्मणती गुरूचा अंत ॥ तेचि देखती यमाचा पंथ ॥ ऐसे विप्र मदोन्मत्त ॥ अधोगती तेचि जाती ॥३९॥ उपजतां भय ब्राह्मणांसी ॥ गेले आपुल्या स्थानासी ॥ तंव गंगानुज थडियेसी ॥ होता वृत्ती राखित ॥४०॥ त्यानें देखिलें श्रीगुरूसी ॥ योगिनी आल्या पूजेसी ॥ गंगेमध्यें येतां कैसी ॥ वाट झाली जळांत ॥४१॥ विस्मय करी तो नर ॥ ह्मणे कैसा यतीश्वर ॥ द्विभाग झालें गंगानीर ॥ केवीं गेला गंगेंत ॥४२॥ श्रीगुरुनाथा नमूनी ॥ पूजा करिती योगिनी ॥ भिक्षा तेथें करूनी ॥ आले मागुती बाहेर ॥४३ ॥ पहात होता गंगानुज ॥ ह्मणे कैसें झालें चोज ॥ अवतार होईल ईश्वरकाज ॥ ह्मणोनि पूजिती देवकन्या ॥४४॥ येरे दिवशीं मागुती ॥ हातीं घेऊन आरती ॥ देवकन्या ओंवाळिती ॥ श्रीगुरूतें नमोनी ॥ ४५ ॥

पुन्हा गंगाप्रवाहांत ॥ श्रीगुरू निघाले योगिनीसहित ॥ जो का नर होता पहात ॥ तोही गेला सवेंचि ॥ ४६ ॥ नदींत जातां श्रीगुरू ॥ द्विभाग जहालें गंगेचें वारू ॥ भीतरीं दिसे अनुपम नगरू ॥ रत्नखचित गोपुरेंसी ॥ ४७ ॥ अमरावतीसमान नगर ॥ जैसें तेज दिनकर ॥ श्रीगुरू जातां समस्त नर ॥ घेऊनि आले आरती ॥४८॥ ओंवाळून आरती ॥ नेलें आपुल्या मंदिराप्रती ॥ सिंहासन रत्नखचिती ॥ बैसों घातलें तयेवेळीं ॥४९॥ पूजा करिती विधीसी ॥ उपचारें हो षोडशीं ॥ अनेकापरी षड्रसेंसी ॥ आरोगण केलें तयेवेळीं ॥ ५० ॥ देखोंनियां नरासी ॥ ह्मणती तूं कां आलासी ॥ विनवी नर स्वामीसी ॥ सहज आलों दर्शना॥५१॥ऐसें बोलोनि अनन्य शरण ॥ तल्लीन होवोनि अंतःकरण ॥ ह्मणे गिरिजारमण ॥ होसी त्रिमूर्ती तूंचि एक ॥ ५२ ॥ नकळे तुझें स्वरूपज्ञान ॥ संसारमाया वेष्टोन ॥ तूं तारक भवार्ण ॥ उद्धरावें स्वामियां ॥५३॥ तूं तारक विश्वासी ॥ ह्मणोनि भूमीं अवतरलासी ॥ अज्ञान ह्मणजे रजनीसी ॥ ज्योतिस्वरूप तूंचि एक ॥५४॥ तुझें दर्शन होय ज्यासी ॥ सर्वाभीष्टें होतीं त्यासी ॥ इहपर अप्रयासीं ॥ जोडे क्षण न लागतां ॥ ५५ ॥ ऐसें नानापरी देखा ॥ स्तोत्र करी तो नर ऐका ॥ संतोषोनि गुरुनायका ॥ आश्वासिलें तयेवेळीं ॥ ५६ ॥ श्रीगुरु ह्मणती तयासी ॥ तुझें दैन्य गेलें परियेसी ॥ जी जी इच्छा मानसीं ॥ सकळाभीष्ट पावसी ॥ ५७ ॥ तुवां पाहिलें वर्तमानासी ॥ न सांगावें कवणापासीं ॥ ज्या दिवशीं प्रकट करिसी ॥ मुक्ति पावसी तात्काळ ॥५८॥ येणेंपरी तयासी ॥ सांगती श्रीगुरू परियेसी ॥ आले औदुंबरासी ॥ गंगानुज समागमें ॥५९॥ श्रीगुरुनिरोप घेऊन ॥ गेला गंगानुज आपण ॥ वृत्तिस्थानीं जातां जाण ॥ निधान त्यासी लाधलें ॥६०॥ जाणवंत झाला नर ॥ गु-

रूचा नित्य अनुचर ॥ धनधान्य पुत्रपौत्र ॥ अखिलानंदें वर्ततसे ॥६१॥ भक्तिभावें श्रीगु-
रूसी ॥ नमन करी प्रति दिवशीं ॥ सेवा करी कलत्रेंसी ॥ एकभावेंकरूनियां ॥६२॥ वर्त-
तां ऐसा एके दिवशीं ॥ आली पौर्णिमा माघमासीं ॥ नमन करूनि श्रीगुरूसी ॥ विनवी-
तसे तो भक्त ॥६३॥ ह्मणे स्वामी जगद्गुरू ॥ माघस्नान प्रयाग थोरू ॥ ह्मणोनि सांगती द्वि-
जवरू ॥ क्षेत्र थोर काशीपुर ॥ ६४ ॥ कैसें प्रयाग काशीस्थान ॥ कैसें वाराणसी भुवन ॥
नेणों आपण ज्ञातीहीन ॥ कृपा करणें स्वामियां ॥६५॥ श्रीगुरु ह्मणती तयासी ॥ पंचगंगा
संगमेसी ॥ प्रयाग जाणावे भरंवसीं ॥ काशीपुर तें जुगुळ॥६६॥दक्षिण प्रयाग कोल्हापुर ॥
त्रिस्थळी असे मनोहर ॥ जरी पाहसी प्रत्यक्षाकार ॥ दावीन तुज चाल आतां ॥ ६७ ॥
बैसले होते व्याघ्राजिनीं ॥ मागें धरी रे दृढ ह्मणोनी ॥ मनोवेगें तत्क्षणीं ॥ गेले प्रयागा
प्रातःकाळीं ॥६८॥ तेथें स्नान करोनी ॥ गेले काशीस माध्यान्हीं ॥ विश्वनाथासी दाखवू-
नीं ॥ सवेंच गेले गयेसी ॥६९॥ ऐसें त्रिस्थळ आचरोनी ॥ आले परतोनी अस्तमानीं ॥
येणेंपरी तये स्थानीं ॥ देखता झाला तो नर ॥७०॥ विश्वनाटक श्रीगुरुमूर्ती ॥ प्रकट झाली
असे कीर्ती ॥ श्रीगुरु मनीं विचारिती ॥ आतां येथें गौप्य व्हावें ॥७१॥ ऐसेपरी तये स्था-
नीं ॥ गुप्त झाले गुरुमुनी ॥ अमरेश्वरातें पुसोनी ॥ निघते झाले तयेवेळीं ॥ ७२ ॥ श्रीगुरु
निघतां तेथोनी ॥ आल्या चौसष्ट योगिनी ॥ विनविती करुणावचनीं ॥ आह्मां ठेवोनी
केविं जासी ॥७३॥ नित्य तुझ्या दर्शनासी ॥ तापत्रय हरती क्षणेंशी ॥ अन्नपूर्णा तुह्मांपा-
शीं ॥ केवीं राहूं स्वामियां ॥ ७४ ॥ येणेंपरी श्रीगुरूसी ॥ योगिनी विनविती भक्तीसी ॥
भक्तवत्सलें संतोषी ॥ दिधला वर तयेवेळीं॥७५॥श्रीगुरु ह्मणती तयासी॥ सदा असों औ-

डुंबरापाशीं ॥ प्रगट जाणें पूर्वेसी ॥ स्थान आमुचें एथेंचि असे ॥ ७६ ॥ तुह्मीं रहावें औ- दुंबरीं ॥ अमरपूर पश्चिमतीरीं ॥ अन्नपूर्णा निर्धारीं ॥ औदुंबरीं ठेवितों ॥ ७७ ॥ कल्पवृक्ष औदुंबर ॥ तेथें असा तुह्मी स्थिर ॥ अमरपूर पश्चिमतीर ॥ आह्मां स्थान हेंचि जाणा ॥७८॥ प्रख्यात होईल स्थान बहुत ॥ समस्त नर पूजा करीत ॥ मनकामना होय त्वरित ॥ तुह्मी त्यासी साह्य व्हावें ॥७९॥ तुह्मांसहित औदुंबर ॥ आमुच्या पादुका मनोहर ॥ पूजा क- रिती जे तत्पर ॥ मनकामना पुरती जाणा ॥८०॥ जेथें असे अन्नपूर्णा ॥ नित्य असे आ- राधना ॥ तेणें होय मनकामना ॥ चतुर्विध पुरुषार्थ ॥८१॥ पापविनाश काम्यतीर्थीं ॥ सिद्ध तीर्थीं स्नान करिती ॥ सात वेळां स्नपन करिती ॥ तुह्मांसहित औदुंबरीं ॥८२॥ साठ वर्षें वांझेसी ॥ पुत्र होती शतायुषी ॥ ब्रह्महत्यादि पापें नाशी ॥ स्नानमात्रें त्या तीर्थीं ॥ ८३ ॥ सोमसूर्यग्रहणेसी ॥ अमावास्या संक्रमणेसी ॥ स्नान करितां भक्तीसी ॥ अनंतपुण्य असे देखा ॥८४॥ सोमवारीं अमावास्येसी ॥ व्यतीपातादि पर्वणीसी ॥ स्नान करितां फळें कैसीं ॥ ऐका श्रोते एकचित्तें ॥८५॥ सुवर्णशृंग रौप्यखुरेसी ॥ अलंकारूनि धेनूसी ॥ सहस्र कपिला ब्राह्मणांसी ॥ सुरनदीतीरीं दिलें फळ असे ॥८६॥ भक्तिभावें करोनि देखा ॥ अन्न घालितां ब्राह्मणा एका ॥ कोटिभोजन ब्राह्मण ऐका ॥ पुण्य असे परियेसा ॥८७॥ औदुं- बर वृक्षातळीं ॥ जप करितां मन निर्मळीं ॥ कोटिगुण फळें आगळी ॥ होम केल्या ऐ- सेंची ॥८८॥ रुद्र जपोनि एकादश ॥ करिती पूजा मानस ॥ अतिरुद्र केलें फळ सदृश ॥ एकचि पुण्य परियेसा ॥८९॥ मंदगती प्रदक्षिणा ॥ करितां पावे अनंत पुण्या ॥ पदोपदीं वाजपेय यज्ञा ॥ फळ असे परियेसा ॥९०॥ नमन करितां येणेंपरी ॥ पुण्य असे अपरंपारी ॥

प्रदक्षिणा दोन चारी ॥ करूनि करणें नमस्कार ॥९१॥ कुष्टी असे अंगहीन ॥ त्याणें करणें प्रदक्षिणा ॥ लक्ष वेळ करितां जाण ॥ देवासमान होय देह ॥९२॥ ऐसें स्थान मनोहरू ॥ सहज असे कल्पतरू ॥ ह्मणोनी सांगताती गुरू ॥ चतुःषष्ठि योगिनींसी ॥९३॥ ऐसा निरोप घेऊन॥श्रीगुरू निघाले तेथोन॥जेथें होतें गाणगापुरभुवन॥ भीमातीरीं अनुपम ॥९४॥ विश्वरूप जगन्नाथ ॥ अखिलाठायीं असे वसत ॥ औदुंबरीं प्रीती बहुत ॥ नित्य तेथें वसतसे ॥ ९५ ॥ गौप्य राहोनि औदुंबरीं ॥ प्रगटरूपें गाणगापुरीं ॥ राहिले श्रीगुरू प्रीतीकरीं ॥ प्रख्यात झाले परियेसा ॥९६॥ सिद्ध ह्मणे नामधारकासी॥गुरुमहिमा आहे ऐसी ॥ प्रकट झाले बहुवसीं ॥ गाणगापुरीं परियेसा ॥ ९७ ॥ ह्मणोनि सरस्वती गंगाधर ॥ सांगे गुरुचरित्रविस्तार ॥ भक्तिपूर्वक ऐकतां नर ॥ लाभे चतुर्विध पुरुषार्थ ॥ ९८ ॥ गुरुचरित्र कामधेनू ॥ जे ऐकती भक्तजनूं ॥ त्यांचे घरीं निधानू ॥ सकळाभीष्टें पावतीं ॥ ९९ ॥ इति श्रीगुरुचरित्रामृत ॥ कल्पवृक्ष औदुंबर तेथ ॥ यक्षिणी योगिनी स्थापित ॥ आपण राहिले गुप्तत्वें ॥ १०० ॥ इति श्रीगुरुचरित्रे सिद्धनामधारकसंवादे द्विजोद्धरणं नाम नवदशमोऽध्यायः ॥ ओंव्या १०० ॥

॥ श्रीगणेशाय नमः ॥ नामधारक शिष्यराणा ॥ लागला सिद्धाचिया चरणा ॥ हात जो-
डून विनवी जाणा ॥ भावभक्ति करूनियां ॥ १ ॥ पुसतसे तये वेळीं ॥ माथा ठेवोनि चर-
णकमळीं ॥ जयजयाजी सिद्धमौळी ॥ विनवीतसे अवधारा ॥ २ ॥ स्वामी निरोपिलें आ-
ह्मासी ॥ गुरु आले गाणगापुरासी ॥ महिमा वाढला बहुवसीं ॥ औदुंबरीं असती जाणा
॥ ३ ॥ वर देऊनि योगिनींसी ॥ आपण आले प्रकटतेसी ॥ पुढें तया स्थानीं कैशी ॥ कीर्ति
विस्तारें निरोपावी ॥ ४ ॥ वृक्ष सांगसी औदुंबरू ॥ निश्चयें ह्मणसी कल्पतरू ॥ पुढें कवणा
झाला वरू ॥ निरोपावें दातारा ॥ ५ ॥ शिष्यवचन ऐकोनी ॥ संतोषला सिद्धमुनी ॥ सांग-
तसे विस्तारोनी ॥ औदुंबरस्थानमहिमा ॥ ६ ॥ सिद्ध ह्मणे ऐक बाळा ॥ किती सांगूं गुरू-
ची लीळा ॥ औदुंबरीं सर्वकाळ ॥ वास आपणा असे जाण ॥ ७ ॥ जया नांव औदुंबरू ॥
काय पुससी त्याचा वरू ॥ तेथें अहोरात्र गुरू ॥ कल्पिलें फळ देतसे ॥ ८ ॥ अमित्त झाला
तेथें महिमा ॥ सांगावया अशक्य आह्मां ॥ एकादा सांगों दृष्टांत तुह्मां ॥ शिष्योत्तमा ना-
मधारका ॥ ९ ॥ शिरोळ नाम ग्रामासी ॥ विप्र एक परियेसी ॥ होता सदाचार मानसीं ॥
वेदीं रत जाण पां ॥ १० ॥ त्याची भार्या पतिव्रता ॥ शांत असे सुशीलता ॥ पुत्र होवोनि
सवेंच मरतां ॥ कष्टतसे बहुतपरी ॥ ११ ॥ पांच पुत्र तिसीं झाले ॥ सवेंचि पंचत्व पावले ॥
अनेक देव आराधिले ॥ न वांचती कवणेपरी ॥ १२ ॥ दुःख करीतसे नारी ॥ व्रत उपास
अपरंपारी ॥ पूर्वकर्म असे थोरी ॥ स्थिर न होती पुत्र तिचे ॥ १३ ॥ गृहिणीकर्मविपाकेसी ॥
विचार करिती या दोषीं ॥ पुत्रशोक व्हावयासी ॥ सांगती पातक तयेवेळीं ॥ १४ ॥ सां-
गताती विद्वज्जन ॥ पुत्र न वांचती काय कारण ॥ पूर्वजन्मींचा दोष गुण ॥ विस्तार क-

रिती तयेवेळीं ॥१५॥ गर्भपात स्त्रियांसी ॥ जे जन करिती तामसी ॥ पावती वांझ जन्मांतरासी ॥ झाले पुत्र मरती जाणा ॥१६॥ अश्वगोवध करी ॥ वांझ हो सदा जरीं ॥ एकादा परद्रव्य अपहारी ॥ अपुत्र होय तोचि जाणा ॥१७॥ विप्र ह्मणती तयासी ॥ तुझा पूर्वजन्म दोषी ॥ सांगों दिसेल तें आह्मांसी ॥ एकचित्तें अवधारा ॥१८॥ शौनकगोत्र द्विजापासी ॥ तुवां घेतलें ऋणासी ॥ मागतां तूं न देसी ॥ कष्टला तो ब्राह्मण ॥१९॥ लोभी होता तो ब्राह्मण ॥ द्रव्यास्तव दिधला प्राण ॥ आत्महत्या केली त्याणें ॥ तोचि पिशाच झालासे ॥२०॥ तो गर्भपात करितो तुज ॥ जन्मतां मृत्यु पाववी तो द्विज ॥ तुझें कर्म असे चोज ॥ आपली जोडी भोगावी ॥२१॥ ऐकोन ब्राह्मणाचें वचन ॥ विप्रवनिता खेदें खिन्न ॥ अनुतप्त होवोनि अंतःकरण ॥ द्विजचरणीं लागली ॥ २२ ॥ कर जोडोनि तयेवेळीं ॥ विप्रा विनवी करुणा बहाळी ॥ माथा ठेवोनि चरणकमळीं ॥ पुसतसे तयासी ॥२३॥ ऐसी मी पापी दुराचारी ॥ बुडाल्यें पापसागरीं ॥ स्वामी मातें तारी तारी ॥ उपाय सांगा ह्मणतसे ॥२४॥ ऐसें पापाचे हळाहळी ॥ भक्षिल्यें असे मी चांडाळी ॥ औषधी सांगा तुह्मी सकळी ॥ ह्मणोनियां विनवीतसे ॥२५॥ विप्र म्हणती तियेसी ॥ केलें तुवां ब्रह्महत्येसी ॥ अपहारिलें द्रव्यासी ॥ ब्राह्मण पिशाच झाला असे ॥२६॥ जधीं मेला तो द्विजवर ॥ केली नाहीं क्रिया साचार ॥ त्याच्या द्रव्याचा अपहार ॥ केला असे जन्मांतरीं ॥२७॥ त्याची करा उद्धारगती ॥ सोळावें कर्म करावें रीतीं ॥ द्रव्य द्यावें एक शती ॥ तया गोत्र द्विजासी ॥२८॥ तेणें होईल तुज बरवें ॥ एकभावें आचरावें ॥ कृष्णातीरीं असावें ॥ उपवास करावे एक मास ॥२९॥ पंचगंगासंगमासीं ॥ तीर्थें असती बहुवसीं ॥ औदुंबर वृक्षासी ॥ आराधावें

परियेसा ॥३०॥ पापविनाशीं करूनि स्नान ॥ अभिषेकोनि गुरुचरण ॥ घालावें ब्राह्मणभोजन ॥ पुनः स्नान काम्यतीर्थीं ॥३१॥ विधिपूर्वक श्रीगुरुचरणीं ॥ पूजा करावी एक मनीं ॥ येणेंपरी भक्तिनिर्वाणीं ॥ मास एक आचरावें ॥३२॥ स्थान असे गुरुचरणाचें ॥ श्रीनृसिंहसरस्वतीचें ॥ तुझे दोष जातील साचे ॥ होतील पुत्र शतायुषी ॥ ३३ ॥ मास आचरोनि येणेंपरी ॥ मग विप्रांतें पाचारी ॥ द्रव्य द्यावें शौनकगोत्रीं ॥ द्विजवरांसी एक शत ॥३४॥ त्याचें नांव कर्म सकळ ॥ आचरोनी मन निर्मळ ॥ होतील तुझे कष्ट सफळ ॥ श्रीगुरुनाथ तारील पैं ॥३५॥ गुरुस्मरण करोनी मनीं ॥ तूं जप करी श्रीगुरुचरणीं ॥ तुझें पाप होईल धुणी ॥ ब्रह्मसंबंध परिहरेल ॥३६॥ ऐसें सांगतां द्विजवरीं ॥ ऐकोन सती चिंता करी ॥ शत द्रव्य आमुचे घरीं ॥ कधीं न मिळे परियेसा ॥ ३७ ॥ कष्ट करूनि आपुल्या देहीं ॥ उपवासादि पूजा पाही ॥ मासोपवास एक भावीं ॥ करीन आपण गुरुसेवा ॥ ३८ ॥ येणेंपरी ती नारी ॥ सांगे आपण निर्धारीं ॥ ऐकोनियां द्विजवरीं ॥ निरोप दिधला तये वेळीं ॥३९॥ विप्र ह्मणती ऐक बाळे ॥ तूतें द्रव्य इतुकें न मिळे ॥ सेवा करी मन निर्मळें ॥ श्रीगुरुचरणीं आतांचि ॥४०॥ निष्कृति तुझिये पापासी ॥ श्रीगुरु करील परियेसी ॥ औदुंबर संनिधानेसी ॥ वास असे निरंतर ॥४१॥ तो कृपाळू भक्तांसी ॥ निवारील ब्रह्महत्येसी ॥ शक्ति असेल तुझी जैशी ॥ द्रव्य वेंची गुरुनिरोपें ॥४२॥ ऐकोनि द्विजाचें वचन ॥ विप्रवनिता संतोषोन ॥ गेली त्वरित धांवोन ॥ जेथें स्थान श्रीगुरूचें ॥ ४३॥ स्नान करोनि संगमासी ॥ विधिपूर्वक पापविनाशीं ॥ सात वेळ स्नानासी ॥ करी औदुंबरप्रदक्षिणा ॥४४॥ काम्यतीर्थीं करोनि स्नान ॥ पूजीतसे श्रीगुरुचरण ॥ करूनि प्रदक्षिणा नमन ॥ करीतसे

उपवास ॥४५॥ ऐशापरी दिवस तिनी ॥ सेवा करी ती भामिनी ॥ तोंचि विप्र आला स्वप्नीं ॥ द्रव्य मागे एक शत ॥४६॥ अद्यापि तूं द्रव्य न देसी ॥ घेईन तुझ्या प्राणासी ॥ पुढें तुझ्या वंशासी ॥ वाढों नेदी सर्वथा ॥४७॥ वायां सायास करिसी ॥ पुत्र कैंचा तुझे वंशासी ॥ ह्मणोनि कोपें मारावयासी ॥ आला विप्र स्वप्नांत ॥४८॥ भयचकित विप्रवनिता ॥ औदुंबराआड रिघतां ॥ तंव देखिलें श्रीगुरुनाथा ॥ तयापाठीं रिघाली ॥४९॥ अभय देवोनि नारीसी ॥ निवारिलें ब्राह्मणासी ॥ पुसती श्रीगुरु तयासी ॥ कां मारिसी स्त्रियेतें ॥५०॥ विप्र सांगे श्रीगुरूसी ॥ जन्मांतरीं इणें आपणासी ॥ अपहारिलें द्रव्यासी ॥ प्राण त्यजिला यास्तव ॥ ५१ ॥ स्वामी कृपाळू सर्वांसी ॥ आमचे शत्रूचा पक्षपात करिशी ॥ तुह्मी यतीश्वर तापसी ॥ पक्षपात करूं नये ॥५२॥ ऐकोनि तयाचें वचन ॥ श्रीगुरु ह्मणती कोपोन ॥ उपद्रविसी कां भक्तजन ॥ तूंतें शिक्षा करीन मी ॥५३॥ आह्मी सांगों जेणें रीतीं ॥ जरी ऐकसी हिताचे अर्थीं ॥ तुज होईल सद्गती ॥ पिशाचत्व परिहरेल ॥ ५४ ॥ जें कां देईल विप्रवनिता ॥ तुवां अंगिकारावें सर्वथा ॥ जरी नये तुझिया चित्ता ॥ तरी जाई एथोन ॥५५॥ रक्षीन आपुल्या भक्तासी ॥ अभीष्ट चिंती वंशोवंशीं ॥ पुनरपि जरी पाहों येसी ॥ तरी शिक्षा करूं जाणपां ॥५६॥ ऐकोनि श्रीगुरूचें वचन ॥ पिशाचें करून नमन ॥ स्वामी देखिले तुझे चरण ॥ उद्धरावें आपणासी ॥५७॥ जेणेंपरी आपणासी ॥ उद्धार होय सद्गतीसी ॥ कवणेपरी निरोप देसी ॥ अंगीकारूं स्वामियां ॥ ५८ ॥ श्रीगुरु ह्मणती तयासी ॥ विप्रवनिता भावेंसी ॥ कर्म केल्या दहावे दिवशीं ॥ गति होईल तुजला जाणा ॥५९॥ ऐसें सांगूनि तयासी ॥ गुरु सांगती स्त्रियेसी ॥ जें असेल तुझेपाशीं ॥ अर्पण करी तया नांवें

॥६०॥ अष्टतीर्थी स्नान करी ॥ त्या नांवें निर्धारी ॥ दश दिवस येणेंपरी ॥ स्नपन करी औदुंबरी ॥६१॥ ब्रह्महत्या तुझा दोष ॥ गेला त्वरित निःशेष ॥ कन्यापुत्र पूर्णायुष ॥ होतील ह्मणती श्रीगुरू ॥६२॥ ऐसें देखोनि जागृती ॥ विप्रवनिता भयचकिती ॥ ज्ञानें पाहे श्रीगुरुमूर्ती ॥ न विसंबे मनांत ॥६३॥ श्रीगुरुनिरोपें दहा दिवस ॥ केलें आचरण परियेस ॥ ब्रह्महत्या गेला दोष ॥ गती झाली ब्राह्मणासी ॥६४॥ येरे दिवशीं स्वप्नांत ॥ प्रत्यक्ष आला गुरुनाथ ॥ नारळफळें दोन देत ॥ भरली ओंटी तियेची ॥६५॥ ह्मणे पारणें करावें आतां ॥ पुत्र होती तुज तत्वता ॥ पुढें वाढे संतानता ॥ चिंता न करीं मानसीं ॥६६॥ श्रीगुरुनिरोपें आराधन ॥ केलें दंपत्यें मिळोन ॥ प्रकट झाला गुरु आपण ॥ संपर्क लोह परिसासी ॥६७॥ चिंतामणी स्पर्श होतां ॥ लोह पाषाण कांचनता ॥ तैसी ती विप्रवनिता ॥ पापावेगळी त्वरित झाली ॥६८॥ पुढें तये नारीसी ॥ पुत्र दोन सद्वंशी ॥ झाले श्रीगुरुकृपेसी ॥ एकचित्तें परियेसा ॥६९॥ व्रतबंध करी ज्येष्ठ पुत्रासी ॥ समारंभ आनंदेसी ॥ चौलकर्म मुंजीसी ॥ करूं पाहती मातापिता ॥७०॥ समारंभ करी जननी प्रीतीं ॥ करिती झाली आइती ॥ पूर्व दिवशीं मध्यान्हरातीं ॥ आली व्याधी कुमरासी ॥७१॥ सुखभरित आनंदें होतीं ॥ चौलमुंजी करूं पहाती ॥ पुत्राचीं वर्षें मोजिती ॥ तंव मन दुःखित झालें ॥७२॥ व्याधी असती अनेक ॥ एकाहूनी एक अधिक ॥ तयांमध्यें तीव्र झोंका ॥ धनुर्वात तो झाला ॥ ७३ ॥ अवयवें सर्व वांकोनी ॥ दिसे भयानक नयनीं ॥ येणेंपरी दिवस तिनी ॥ कष्टतसे तो बाळ ॥७४॥ चवथे दिवशीं अस्तमानीं ॥ पंचत्व पावला तत्क्षणीं ॥ शोक करीतसे जननी ॥ ऐका श्रोते एकचित्तें ॥७५॥ आक्रोशोनी भूमीसी ॥ आपटी शिर सत्राणेंसी ॥ पाषाण घेवोनी

हरयासीं ॥ घात करी ती नारी ॥७६॥ देह टाकी धरणीवरी ॥ निर्जीव होवोनी क्षणभरी ॥ आठवी दुःख अपारी ॥ नयनें वारीपूर्ण झालीं ॥७७॥ प्रेतपुत्रावरी लोळे ॥ आलिंगीतसे बळें ॥ वेष्टोनियां मायाजाळें ॥ आलापीतसे ते नारी ॥७८॥ ह्मणे ताता पुत्रराया ॥ प्राणरक्षका माझ्या प्रिया ॥ मातें केवीं सोडोनियां ॥ जासी कोठें सांगपां ॥७९॥ कोठें गेलासि खेळावया ॥ स्तनींचें क्षीर जातसे वायां ॥ शीघ्र येईबा टाकोनियां ॥ पुत्रा माझ्या प्राणप्रिया ॥८०॥ केवीं विसरूं तुझे गुण ॥ पुत्रा माझें तूं निधान ॥ तुझें गोजिरें बोलणें॥ केवीं विसरूं पुत्रराया ॥८१॥ तुझें रूप दिसे उन्नती ॥ केवीं देखों सुशीळ स्थिती ॥ निधान देखतां स्वप्नस्थिती ॥ तैसें मज चाळविलें ॥८२॥ पुत्र व्यालें पांचजण ॥ त्यांत एक हें निधान ॥ जेव्हां झालें गर्भधारण ॥ तेव्हांपासोनी संतोष ॥८३॥ डोहळे मज उत्तम होती ॥ कधीं नसे चिंता चित्तीं ॥ अति उल्हास मजप्रती ॥ पुत्र होईल ह्मणोनियां ॥८४॥ श्रीगुरूनें मातें दिधला वर ॥ पुत्र होईल निर्धार ॥ तेणें मज हर्ष थोर ॥ वरदपिंड होई हा ॥८५॥ जधीं तुज प्रसवलें ॥ अनंत सौख्य लाधलें ॥ प्राणप्रिया तुज पोषिलें ॥ मातें रक्षिसी ह्मणोनियां ॥ ८६ ॥ मज भरंवसा तुझा बहुत ॥ वृद्धापकाळीं पोषक ह्मणत ॥ आह्मां सोडोनि जाशी उचित ॥ धर्म नव्हे पुत्रराया ॥८७॥ दुःख झालें मज बहुत ॥ विसरलें बाळा तुज देखत ॥ तूंचि तारक आह्मां सत्य ॥ ह्मणोनि विश्वासिलों आह्मीं ॥ ८८ ॥ ऐसें नानापरी देख ॥ दुःख करी बहुत शोक ॥ निवारिती सकळ लोक ॥ वायां दुःख कायसें ॥८९॥ देवदानव ऋषीश्वरांसी ॥ होणार न चुके कवणासी ॥ ब्रह्मा लिही ललाटासी ॥ तेंचि अढळ जाणपां ॥९०॥ अवतार होती हरिहर ॥ तेही न रहाती स्थिर ॥ तुह्मी तरी मनुष्यनर ॥

काय अढळ तुह्मांतें ॥ ९१ ॥ येणेंपरी सांगती जन ॥ आणिक दुःख आठवी मन ॥ ह्मणे
मातें दिधलीं जाण ॥ स्थिर ह्मणोनी दोन्ही फळें ॥९२॥ श्रीनृसिंहसरस्वती ॥ भूमंडळीं महा
ख्याती ॥ औदुंबरीं सदा वसती ॥ तेणें दिधले पुत्र मज ॥९३॥ त्याचे बोल केवीं मिथ्या ॥
माझा असे वरदपिता ॥ त्यासी घडे माझी हत्या ॥ पुत्रासवें देईन प्राण ॥ ९४॥ ह्मणोनि
आठवी श्रीगुरूसी ॥ देवा मजला गांजिलेंसी ॥ विश्वासिलें तुह्मांसी ॥ सत्य वाक्य तुझें
ह्मणोनियां ॥९५॥ सत्यसंकल्प तूंचि होसी ॥ म्हणोनि होत्यें विश्वासीं ॥ घात केला बा-
ळासी ॥ विश्वासघातकी केवीं ह्मणों ॥९६॥ त्रयमूर्तीचा अवतार ॥ तूं नृसिंहसरस्वती नर ॥
ध्रुवा बिभीषणा दिधला वर ॥ केवीं सत्य ह्मणों आतां ॥९७॥ तुझिया बोला विश्वासिलें ॥
आतां मातें उपेक्षिलें ॥ मन निश्चयें निष्ठुर केलें ॥ प्राण देईन तुह्मांवरी ॥९८॥ लोक येती
तुझ्या स्थानीं ॥ सेवा करिती निवसोनी ॥ औदुंबरा प्रदक्षिणा करूनी ॥ पुरश्चरणें करि-
ताती ॥९९॥ आपण केलें पुरश्चरण ॥ फळा आलें मज साधन ॥ आतां तुजवरी देतें प्राण ॥
काय विश्वास तुझे स्थानीं ॥ १०० ॥ कीर्ती होईल सृष्टींत ॥ आमुचा तुवां केला घात ॥
पुढें तुज भजती भक्त ॥ काय भरंवसा तयांसी ॥१॥ ब्रह्मस्वदोषें पीडोन ॥ धरिले तुझे दृढ
चरण ॥ अंगीकारोनी मध्यें त्यजणें ॥ टाकितां कोण धर्म घडे ॥२॥ व्याघ्रातें धेनु भिवो-
न ॥ जाय आणिकापासीं टाकोन ॥ तो घेई तिचा प्राण ॥ तयापरी मज झालें ॥३॥ कीं
एकादा देवळासी ॥ जात असे पूजेसी ॥ तें देऊळ तयासी ॥ मृत्युरूपें वर पडे ॥४॥ तया-
परी आपणासी ॥ झालें स्वामी परियेसी ॥ माझ्या प्राणसुतासी ॥ न राखिलें देवराया ॥५॥
येणेंपरी अहोरात्रीं ॥ दुःख करी ती नारी ॥ रात्र गेली येणेंपरी ॥ ती न ऐके कोणाचें ॥६॥

द्विज मिळोनी सकळी ॥ येती तये स्त्रियेजवळी ॥ वायां दुःख सर्व काळीं ॥ करिसी तूं मूर्खपणें ॥७॥ जे जे समयीं होणार गती ॥ ब्रह्मादिकांसी न चुकती ॥ चला जाऊं गंगेप्रती ॥ संस्कार प्रेता करावया ॥ ८ ॥ ऐसें वचन ऐकोनी ॥ आक्रोश थोर करोनी ॥ प्रेत पोटासी धरोनी ॥ दीर्घस्वरें रडतसे ॥९॥ आपणासहित प्रेतासी ॥ करावें अग्निप्रवेशासी ॥ येऱ्हवीं नेदी प्रेतासीं ॥ ह्मणोनि उरीं बांधीतसे ॥ ११० ॥ लोक ह्मणती तियेसी ॥ नव्हेसि तूं स्त्री कर्कशी ॥ प्रेतासवें प्राण देशी ॥ कोण धर्म सांग आह्मां ॥ ११ ॥ न देखों न ऐकों कानीं ॥ पुत्रासवें कोणी गेले प्राणी ॥ वायां बोलसी मूर्खपणीं ॥ आत्महत्या महादोषी ॥१२॥ नानापरी तियेसी ॥ बोलती लोक परियेसी ॥ केला नियम निश्चयेंसी ॥ प्राण त्यजीन पुत्रासवें ॥ १३ ॥ दिवस आला दोन प्रहरीं ॥ प्रेतास करूं नेदी संस्कार ॥ अथवा न पाहे गंगातीर ॥ ग्रामीं आक्रांत प्रवर्तला ॥ १४ ॥ इतुकिया अवसरीं ॥ आला एक ब्रह्मचारी ॥ सांगे तीतें सविस्तारीं ॥ आत्मज्ञान तयेवेळीं ॥१५॥ सिद्ध ह्मणे नामधारका ॥ पुढें अपूर्व झालें ऐका ॥ ब्रह्मचारी आला एक ॥ बोधिता झाला ज्ञान तिशीं ॥१६॥ ब्रह्मचारी नव्हे तोचि गुरू ॥ आला वेषधारी नरू ॥ नृसिंहसरस्वती अवतारू ॥ भक्तवत्सल परियेसा ॥१७॥ ह्मणे सरस्वती गंगाधर ॥ सांगे गुरुचरित्र विस्तार ॥ ऐकतां होय मनोहर ॥ शतायुषी पुत्र होय ॥१८॥ भक्तिपूर्वक श्रवण करिती ॥ व्याधि न होय शरीराप्रती ॥ पूर्णायुषी ते होती ॥ सत्य माना माझे बोल ॥१९॥ इति श्रीगुरुचरित्रामृत ॥ विप्रस्त्रियेसी संतान देत ॥ ब्राह्मणसंबंध परिहारित ॥ नृसिंहसरस्वती परियेसा ॥१२०॥ इति श्रीनृसिंहसरस्वत्युपाख्याने सिद्धनामधारकसंवादे ब्रह्मसंबंधपरिहारो नाम विंशोऽध्यायः ॥ ओंव्या १२०॥

॥ श्रीगणेशाय नमः ॥ सिद्ध ह्मणे नामधारका ॥ ब्रह्मचारी कारणिका ॥ उपदेशी ज्ञान निका ॥
तये प्रेतजननीसी ॥ १ ॥ ब्रह्मचारी ह्मणे नारीसी ॥ मूढपणें दुःख करिसी ॥ कोण वांचला
धरणीसी ॥ या संसारीं सांग मज ॥ २ ॥ उपजला कोण मेला कोण ॥ उत्पत्ति झाली
कोठोन ॥ जळांत उपजे जैसा फेण ॥ बुद्बुद राहे कोठें स्थिर ॥ ३ ॥ ऐसा देह पंच-
भूतीं ॥ मिळोंनि होय आकृती ॥ वेगळा होतां पंचभूतीं ॥ अव्यक्त होय देह जाण ॥ ४ ॥
तया पंचभूतांचे गुण ॥ मायापाशीं वेष्टोन ॥ भ्रांती लाविली देह ह्मणोन ॥ पुत्रमित्र
कलत्रमिषें ॥ ५ ॥ सत्व रज तमो गुण ॥ तयापासोन वेगळालें लक्षण ॥ कर्मे त्यासी
प्रधान ॥ होत असे जाणपां ॥ ६ ॥ देवत्व होय सत्वगुण ॥ रजोगुण मनुष्य जाण ॥
दैत्यांसी तमोगुण ॥ गुणानुसारें कर्मै घडती ॥ ७ ॥ जेणें कर्मै आचरती ॥ सुकृत अथवा
दुष्कृती ॥ तैशीच होय फलप्राप्ती ॥ आपुलें आपण भोगावें ॥ ८ ॥ जैसी गुणाची वासना ॥
इंद्रियें तयाधीन जाणा ॥ मायापाशीं वेष्टोन ॥ सुखदुःखें लिप्त करिती ॥ ९ ॥ या
संसारवर्तमानीं ॥ उपजती नर कर्मानुगुणीं ॥ आपुल्या आर्जवापासोनी ॥ सुख-
दुःख भोगिताती ॥ १० ॥ कल्प कोटि वरुषें ज्यांसी ॥ असती आयुष्यें देव ऋषी ॥ न
सुटे कर्म तयांसी ॥ मनुष्याचा कवण पाड ॥ ११ ॥ एकादा नर दैवाधीन ॥ काळ क्रमी
आपुले गुण ॥ कर्मै न होतीं तयाधीन ॥ देहधारी येणेंपरी ॥ १२ ॥ जो असे देहधारी ॥
त्यासी विकार नानापरी ॥ स्थिर नव्हे तो निर्धारीं ॥ आपुलें पाप ह्मणावया ॥ १३ ॥
याकारणें ज्ञानवंत ॥ संतोष न करी उपजत ॥ अथवा नरा होय मृत्य ॥ दुःख आपण
करूं नये ॥ १४ ॥ जधीं गर्भसंभव होता ॥ काय दिसे आकारता ॥ अव्यक्त दिसे व्यक्तता ॥

सर्वेचि होय अव्यक्त पैं ॥ १५ ॥ बुद्बुद निघती जैसे जळीं ॥ सर्वेचि नासति तात्काळीं ॥
तैसा देह सर्व काळीं ॥ स्थीर नव्हे सर्वथा ॥ १६ ॥ जधीं गर्भ उद्भव झाले ॥
विनाशी ह्मणोनि जाणिले ॥ कर्मानुबंधें जैशीं फळें ॥ तैसें भोगणें देहासी ॥ १७ ॥ कोणी
मरती पूर्ववयेसी ॥ अथवा मरती वृद्धपणेंसी ॥ आपुलें आर्जित असे जैशी ॥ तेणेंपरी
घडे जाणा ॥ १८ ॥ मायापाशीं वेष्टोनी ॥ ह्मणती पिता सुत जननी ॥ कलत्र मित्र तेणे
गुणी ॥ आपुलें आपुलें ह्मणती मूढ ॥१९॥ निर्मळ देह ह्मणों जरी ॥ उत्पत्ती मांस रुधिरीं ॥
मळमूत्रांत अघोरीं ॥ उद्भव झाला परियेसा ॥ २० ॥ कर्मानुसार उपजतांची ॥ ललाटीं
लिहितो विरंची ॥ सुकृत अथवा दुष्कृतेंची ॥ भोग भोगणें ह्मणोनी ॥ २१ ॥ ऐसें कर्म
काळासी ॥ जिंकिलें नाहीं परियेसीं ॥ याकारणें देहासी ॥ नित्यत्व नाहीं परियेसा
॥ २२ ॥ स्वप्नीं निधान दिसे जैसें ॥ कोणीं धरावें भरंवसें ॥ इंद्रजाल गारूड जैसें ॥ स्थिर
केवीं मानिजे ॥ २३ ॥ तुझें तूंचि सांग पहिलें ॥ कोटि वेळां जन्म झालें ॥ मनुष्य किंवा
पशुत्व लाधलें ॥ पक्षी अथवा कृमिरूप ॥ २४ ॥ जरी होतीस मनुष्ययोनी ॥ कोण
कोणाची सांग जननी ॥ कोणकोणाची होतीस गृहिणी ॥ सांग तुझें तूं निश्चयें ॥ २५ ॥
कवण तुझीं मातापिता ॥ जन्मांतरींचीं सांग आतां ॥ वायां दुःख करिसी वृथा ॥ पुत्र
आपुला ह्मणोनी ॥ २६ ॥ पंचभूतात्मक देह ॥ चर्ममांस अस्थिमज्जासमूह ॥ वेष्टोनियां
नांवें देह ॥ मळबद्ध असे जाणा ॥ २७ ॥ कैंचा पुत्र कोठें मृत्य ॥ वायां भ्रमोनी कां रड-
त ॥ सांडोनि दे कैंचें प्रेत ॥ संस्कारिती लौकिकार्थ ॥ २८ ॥ येणेंपरी ब्रह्मचारी ॥ सांगे
तत्त्व विस्तारी ॥ परिसोनियां विप्रनारी ॥ विनवीतसे तयासी ॥ २९ ॥ विप्रवनिता तये-

वेळीं ॥ विनवीतसे करुणा बहाळी ॥ स्वामी निरोपिले धर्म सकळी ॥ परी स्थीर नव्हे अंतःकरण ॥ ३० ॥ प्रारब्ध प्रमाण ह्मणो जरी ॥ तरी कां भजावा श्रीहरी ॥ परीससंपर्कें लोह जरी ॥ सुवर्ण न होय कोणा बोल ॥ ३१ ॥ आह्मीं पहिलेच दैवहीन ॥ ह्मणोनी धरिले श्रीगुरुचरण ॥ अभय दिधलें नाहीं मरण ॥ ह्मणोनि विश्वासिलों आह्मीं ॥ ३२ ॥ एकाद्या नरा होतां ज्वर ॥ धुंडीत जाय वैद्यघर ॥ औषध देतां प्रतीकार ॥ सर्वेचि करिती आरोग्यता ॥ ३३ ॥ एके समर्थां मनुष्यासी ॥ आश्रय करिती करुणेसी ॥ साह्य होय भरंवसीं ॥ आली आपदा परिहारी ॥ ३४ ॥ त्रयमूर्तींचा अवतार ॥ नृसिंहसरस्वती असे नर ॥ तेणें दिधला असे वर ॥ केंवीं असत्य होय सांगे ॥ ३५ ॥ आराधिलें म्यां तयासी ॥ वर दिधला गा मजसी ॥ त्याचा भरंवसा मानसीं ॥ धरोनि होतें स्वस्थ चित्त॥३६॥ विश्वासुनी असतां आपण ॥ केंवीं केलेंति निर्वाण ॥ कैसें झालें माझें मूर्खपण ॥ ह्मणोनि स्वामी निरोपिती ॥ ३७ ॥ याकारणें आपण आतां ॥ प्राण त्यजीन सर्वथा ॥ समर्पीन गुरुनाथा ॥ वाढो कीर्ती तयाची ॥ ३८ ॥ ऐकोनि तियेचें वचन ॥ ओळखून भाव मन ॥ सांगे बुद्धी तीस ज्ञान ॥ उपाय यासी करी आतां ॥ ३९ ॥ विश्वास केला श्रीगुरूसी ॥ पुत्र लाधला पूर्णायुषी ॥ जरी आला मृत्यु यासी ॥ घेऊनि जाय गुरुस्थाना ॥ ४० ॥ जेथें लाधला तुज वर ॥ तेथें ठेवी कलेवर ॥ पंचगंगा कृष्णातीर ॥ असे औदुंबर वृक्षातळीं ॥ ४१ ॥ ऐसें वचन ऐकोनी ॥ विश्वास झाला तिचे मनीं ॥ पाठीशीं शव बांधोनी ॥ घेऊनि गेली औदुंबरा ॥ ४२ ॥ जेथें होत्या गुरुपादुका ॥ आफळी शिर ते बालिका ॥ रुधिरें भरल्या पादुका ॥ आक्रोश करी ती नारी ॥ ४३ ॥ समस्त शोकाहूनि अधिक ॥

सहावेना पुत्रशोक ॥ क्षयरोग तोचि एक ॥ मातापितया मृत्युमूळ ॥ ४४ ॥ ऐसें करितां
झाली निशी ॥ विप्र मागती प्रेतासी ॥ ह्मणती आक्रोश कांहो करिसी ॥ संस्कारोनि
जाऊं आतां ॥ ४५ ॥ मनुष्य नाहीं अरण्यांत ॥ केवीं राहूं जाऊं ह्मणत ॥ जाळूंच्या हो
आतां प्रेत ॥ विलंब येथें कासया ॥ ४६ ॥ कांहीं केल्या नेदी प्रेत ॥ आपणासवें जाळा
ह्मणत ॥ पोटीं बांधोनियां प्रेत ॥ लोळतसे पादुकांवरी ॥ ४७ ॥ ह्मणती विप्रज्ञाती लोक ॥
राहों नये रानीं निःशंक॥तस्करबाधा होईल देख॥जाऊं आतां घरासी ॥४८॥ जाऊं स्नान
करोनि ॥ उपवास होय आजच्या दिनीं॥ प्रातःकाळीं येऊनि॥दहन करूं ह्मणताती ॥४९॥
आजिचे रात्रीं प्रेतासी ॥ सुटेल दुर्गंधी भरवसीं॥देईल आपोआप दहनासी ॥ त्रासूनि जा-
णा कर्कशा ॥५०॥ ह्मणोनि निघती सकळ लोक ॥ राहिले तेथें जननीजनक ॥ प्रेत देखो-
नी करिती शोक ॥ झाली रात्रीं परियेसा ॥ ५१ ॥ निद्रा नाहीं दिवस दोन्ही ॥ शोक क-
रितां जनकजननी ॥ तीन याम होतां रजनी ॥ झोंप आली तियेसी ॥५२॥ देखतसे सुषु-
प्तिं ॥ जटाधारी भस्मांकित ॥ व्याघ्रचर्म परिधानित ॥ रुद्राक्षमाळा सर्वांगीं ॥ ५३ ॥
योगदंड त्रिशूळ हातीं ॥ आले औदुंबराप्रती ॥ कांहो शोक करिसी सती ॥ आक्रोशोनी
आह्मांवरी ॥ ५४ ॥ काय झालें तुझिया कुमरा ॥ करूं त्यासी प्रतीकारा ॥ ह्मणोनी देतो
अभय करा ॥ भक्तवत्सल श्रीगुरू ॥५५॥ भस्म काढोनी प्रेतासी ॥ लावीतसे सर्वांगासी॥
मुख पसरी ह्मणे तिसी ॥ वायुपूर्ण करूं ह्मणे ॥ ५६ ॥ प्राण ह्मणजे वायु जाण ॥ बाहेर
गेला विसरून ॥ घातला मागुती आणून ॥ पुत्र तुझा जिवंत होय ॥ ५७ ॥ इतुकें देखोनी
भयचकित ॥ झाली नारी जागृत॥ ह्मणे आपण कैसी भ्रांत ॥ पडली असे प्रेतावरी ॥५८॥

जें का वसे आपुले मनीं ॥ तैसेंचि दिसे निद्रा स्वप्नीं ॥ कैंचा देव नृसिंहमुनी ॥ भ्रांति आपणा लागली असे ॥ ५९ ॥ आमुचें प्रारब्ध असे उणें ॥ देवावरी बोल काय ठेवणें ॥ अज्ञान आह्मी मूर्खपणें ॥ श्रीगुरुवरी बोल काय ॥ ६० ॥ येणेंपरी चिंता करीत ॥ तंव प्रेतासी झालें चेत ॥ सर्वांगींही उष्ण होत ॥ सर्व संधीं जीव आला ॥ ६१ ॥ ह्मणे प्रेता काय झालें ॥ किंवा भूत संचरलें ॥ मनीं भय उपजलें ॥ ठेवी काढोनि दूर परतें ॥ ६२ ॥ सर्व संधींसी जीव आला ॥ बाळ उठोनि बैसला ॥ ह्मणे क्षुधा लागली मला ॥ अन्न दे कीं ह्मणे माते ॥ ६३ ॥ रुदन करीतसे तयेवेळीं ॥ आला कुमर मातेजवळी ॥ स्तन घालितां मुखकमळीं ॥ क्षीर निघे बत्तीस धारा ॥ ६४ ॥ संतोष भय होऊनि तिसी ॥ संदेह वाटे मानसीं ॥ कडे घेवोनी बाळकासी ॥ गेली आपुल्या पतीजवळी ॥ ६५॥ जागृत करूनि पतीसी ॥ सांगे वृत्तांत तयासी ॥ पति ह्मणे तियेसी ॥ असे चरित्र श्रीगुरूचें ॥६६॥ ह्मणोनि दंपत्य दोघे जणा ॥ करोनि औदुंबरीं प्रदक्षिणा ॥ साष्टांग नमुनी चरणा ॥ नानापरी स्तोत्रें करिती ॥ ६७ ॥ जयजयाजी वरदमूर्ती ॥ ब्रह्माविष्णुशिवयती ॥ भक्तवत्सला तुझी ख्याती ॥ वासना पाहसी भक्तांची ॥ ६८ ॥ तूं तारक विश्वासी ॥ ह्मणोनि भूमीं अवतरलासी ॥ अशक्य तूतें वर्णावयासी ॥ क्षमा करणें स्वामियां ॥ ६९ ॥ बाळक जैसें कोपेसी ॥ निष्ठुर बोले मातेसी ॥ तैसें अविद्यामायापाशीं ॥ तुह्मां निष्ठुर बोलिलों ॥ ७० ॥ सर्वस्वी आह्मां क्षमा करणें ॥ ह्मणोनि घालिती लोटांगणें ॥ विनवोनियां करुणावचनें ॥ गेलीं स्नानासी गंगेंत ॥ ७१ ॥ स्नान करोनी बाळकासहित ॥ धूतीं झालीं पादुकांचें रक्त ॥ औदुंबरा स्नपन करीत ॥ लाविती दीप तयेवेळीं ॥ ७२ ॥ पूजा करिती

भक्तीसी ॥ मंत्रपूर्वक विधीसी ॥ शमीपत्र कुसुमेंसी ॥ पूजा करिती परियेसा ॥ ७३ ॥ नीरांजन तयेवेळां ॥ करिती गायन परिकळा ॥ अतिसंतोषें ती अबला ॥ भक्तिभावें स्तुति करित ॥ ७४ ॥ इतुकें होतां गेली निशी ॥ उदय झाला दिनकरासी ॥ संस्कारूं ह्मणोनि प्रेतासी ॥ आले विप्रज्ञाती सकळ ॥ ७५ ॥ तंव देखती कुमरासी ॥ विस्मय झाला सकळिकांसी ॥ समाराधना करिती हर्षी ॥ महा आनंद वर्तला ॥ ७६ ॥ ऐसा श्रीगुरुस्थानमहिमा ॥ अखिल लोक लाधले कामा ॥ एकेकाची सांगतां महिमा ॥ विस्तार होईल बहु कथा ॥ ७७ ॥ पुत्रप्राप्ती वांझेसी ॥ श्रीप्राप्ती दरिद्र्यासी ॥ आरोग्य होईल रोगियासी ॥ अपमृत्यु नये जाणा ॥७८॥ सिद्ध ह्मणे नामधारका ॥ स्थानमहिमा ऐसा ऐका ॥ अपार असे सांगतां देखा ॥ साधारण निरोपिलें ॥ ७९ ॥ तया औदुंबरातळीं ॥ श्रीगुरु वसे सर्वकाळीं ॥ कार्य होत तात्काळीं ॥ आराधितां नरहरीसी ॥ ८० ॥ भाव असावा आपुले मनीं ॥ पूजा करावी श्रीगुरुचरणीं ॥ जी जी वासना ज्याचे मनीं ॥ त्वरित होय परियेसा ॥ ८१ ॥ हृदयशूळ गंडमाळ ॥ अपस्मार रोग सकळ ॥ परिहरती तात्काळ ॥ श्रीगुरुपादुका अर्चितां ॥८२॥ जो असेल मंदमती ॥ बधिर मूकांध चरण नसती ॥ औदुंबरीं सेवा करिती ॥ सुदेह होय सत्य माना ॥ ८३ ॥ चतुर्विध पुरुषार्थ ॥ तेथें होय निश्चित ॥ प्रत्यक्ष वसे श्रीगुरुनाथ ॥ औदुंबरीं सनातन ॥८४॥ तया नांव कल्पतरू ॥ प्रत्यक्ष जाणा औदुंबरू ॥ जें जें मनीं इच्छिती नरू ॥ साध्य होय परियेसा ॥८५॥ किती वर्णूं तेथील महिमा ॥ सांगतां अशक्य असे आह्मां ॥ श्रीगुरु सरस्वती नामा ॥ प्रख्यात असे परियेसा ॥८६॥ गंगाधराचा नंदन ॥ सांग गुरुचरित्र विस्तारोन ॥ भक्तिपूर्वक ऐक-

ती जे जन ॥ सकळाभीष्टें पावती ॥८७॥ म्हणोनि सरस्वती गंगाधर ॥ सदां श्रीगुरुचरणीं स्थीर ॥ उतरवील पैलपार ॥ इहसौख्य परगती ॥८८॥ इति श्रीगुरुचरित्रामृत ॥ गुरुमहात्म्य परमामृत ॥ विप्रपुत्रसंजीवनामृत ॥ निरोपिलें असे येथें ॥८९॥ इति श्रीनृसिंहसरस्वत्युपाख्याने सिद्धनामधारकसंवादे बालसंजीवनं नाम एकविंशोऽध्यायः ॥ ओंव्या ८९ ॥

॥ श्रीगणेशाय नमः ॥ नामधारक शिष्यराणा ॥ लागे सिद्धाचिया चरणा ॥ कर जोडो-
नियां जाणा ॥ विनवीतसे परियेसा ॥ १ ॥ जयजयाजी योगीश्वरा ॥ शिष्यजनमनो-
हरा ॥ तूंचि तारक भवसागरा ॥ अज्ञानतिमिरा ज्योती तूं ॥ २ ॥ तुझे चरण संपर्के
होतां ॥ झालें ज्ञान मज आतां ॥ परमार्थवासना तत्वतां ॥ झाली तुझे प्रसादें ॥ ३ ॥
दाखविली गुरूची सोय ॥ तेणें सकळ ज्ञान होय ॥ तूंचि तारक योगीराय ॥ परमपु-
रुषा सिद्धमुनी ॥ ४ ॥ गुरुचरित्र कामधेनू ॥ सांगितलें मज विस्तारोनू ॥ अद्यापि न धाये
माझें मनू ॥ आणीक आवडी होतसे ॥ ५ ॥ मागें तुम्हीं निरोपिलें ॥ श्रीगुरू गाणगापुरीं
आले ॥ पुढें कैसें वर्तलें ॥ विस्तारावें दातारा ॥६॥ ऐकोनि शिष्याचें वचन ॥ सांगे सिद्ध
संतोषोन ॥ ह्मणे शिष्या तूं सुगुण ॥ गुरुकृपेचा बाळक ॥ ७ ॥ धन्य धन्य तुझें जीवन ॥
धन्य धन्य तुझें मन ॥ होसी तूंचि पूज्यमान ॥ या समस्त लोकांत ॥८॥ तुवां प्रश्न केला-
सी ॥ संतोष माझ्या मानसीं ॥ उल्हास होतो हृदयासी ॥ गुरुचरित्र कामधेनू ॥ ९ ॥ पुढें
वाढला अनंत महिमा ॥ सांगतां असे अनुपमा ॥ श्रीगुरु आले गाणगाभुवना ॥ राहिले सं-
गमीं गुप्तरूपें ॥१०॥ भीमातीरीं उत्तरवाहिनी ॥ अमरजा संगम गुणी ॥ अश्वत्थ वृक्ष ना-
रायणी ॥ महावरद स्थान असे ॥११॥ अमरजा नदी तीर्थ थोरी ॥ संगम झाला भीमातीरीं ॥
प्रयागसमान असे बदरी ॥ अष्टतीर्थें असती तेथें ॥१२॥ तया तीर्थांचें महिमान ॥ अपार
अस आख्यान ॥ पुढें तुज विस्तारोन ॥ सांगेन ऐक शिष्योत्तमा ॥१३॥ तया स्थानीं श्री-
गुरुमूर्ती ॥ होते अति गौप्य स्थिती ॥ तीर्थमहिमा करणें ख्याती ॥ भक्तजन तारणार्थ ॥१४॥
समस्त तीर्थें श्रीगुरुचरणीं ॥ ऐसें बोलती वेदपुराणीं ॥ वास प्रत्यक्ष तेथें ह्मणोनी ॥ प्रकट

करी क्षेत्रासी ॥१५॥ भक्तजनतारणार्थ ॥ तीर्थे हिंडे श्रीगुरुनाथ ॥ गौप्य होती कलियुगांत ॥ प्रकट केली गुरुनाथें ॥ १६ ॥ तेथील महिमा अनुपमेसी ॥ सांगों पुसतां विस्तारेंसी ॥ प्रकट व्हावया श्रीगुरूसी ॥ ऐका कारण एकचित्तें ॥ १७ ॥ ऐसा संगम मनोहर ॥ तेथें वसती गुरुवर ॥ त्रिमूर्तीचा अवतार ॥ गौप्य होई कवणेंपरी ॥१८॥ सहस्रकिरण सूर्यासी ॥ केवीं रहावेल गौप्येसी ॥ आपोआप प्रकाशी ॥ सहज त्यासी गुण होय ॥ १९ ॥ वसती त्या संगमासी ॥ जाती नित्य भिक्षेसी ॥ तया गाणगापुरासी ॥ माध्यान्हकाळीं परियेसा ॥२०॥ तया ग्रामीं द्विजवर ॥ असती एक शत घर ॥ होते पूर्वी अग्रहार ॥ वेदपाठक ब्राह्मण ॥२१॥ तया स्थानीं विप्र एक ॥ दरिद्री असे सूक्ष्म देख ॥ भार्या त्याची पतिसेवक ॥ पतिव्रता तिये नाम ॥२२॥ वर्तत असतां दरिद्रासी ॥ असे एक वांझ महिषी ॥ वेसण घातली तियेसी ॥ दंतहीन अतिवृद्ध ॥२३॥ नदीतीरीं मळियासी ॥ क्षारमृत्तिका घालावयासी ॥ नित्य द्रव्य देऊनि तिसी ॥ लोक नेती व्यवसाया ॥२४॥ तें द्रव्य नित्य घेती ॥ येणेंपरी काळ क्रमिती ॥ श्रीगुरुनाथ अति प्रीतीं ॥ येती भिक्षेसी त्या घरीं ॥२५॥ विप्रलोक निंदा करिती ॥ कैंचा आला यती म्हणती ॥ आह्मी ब्राह्मण असों श्रौती ॥ न येती भिक्षे आमुचे घरीं ॥२६॥ येती आमुचे घरीं देखा ॥ विशेष अन्न अनेक शाखा ॥ असें त्यजुनी यती ऐका ॥ जातो दरिद्रियाचे घरीं ॥२७॥ ऐसें बोलती विप्र समस्त ॥ परि भक्तवत्सल गुरुनाथ ॥ सेवकजनातें कृतार्थ ॥ करणें आपुल्या मनीं ॥२८॥ पाहेपां विदुराच्या घरा ॥ प्रीती कशी शार्ङ्गधरा ॥ दुर्योधन राजद्वारा ॥ कधीं न येचि परियेसा ॥२९॥ सात्विक बुद्धि जे वर्तती ॥ त्यांवरी श्रीगुरूची प्रीती ॥ इहसौख्य परगती ॥ देती आपु-

ल्या भक्तांसी ॥ ३० ॥ ऐसा कृपाळू परमपुरुष ॥ भक्तावरी करी प्रेमहर्ष ॥ त्यासी दुर्बळ काय दोष ॥ रंका राज्य देऊं शके ॥ ३१ ॥ जरी कोंपे एकाद्यासी ॥ भस्म करील परियेसी ॥ वर देतां दरिद्रियासी ॥ राज्य होय क्षितीचें ॥३२॥ ब्रह्मदेवें आपुल्या करें ॥ लिहिलीं असतीं दुष्टाक्षरें ॥ श्रीगुरुचरणस्पर्शें सत्वरें ॥ दुष्टाक्षरें तीं शुभ होतीं ॥३३॥ ऐसें ब्रीद श्रीगुरूचें ॥ वर्णूं न शके माझे वाचें ॥ थोर पुण्य त्या ब्राह्मणाचें ॥ श्रीगुरू जाती तया घरा ॥३४॥ वर्तत असतां एके दिवशीं ॥ न मिळे वस्तु त्या ब्राह्मणासी ॥ घरीं असे वांझ महिषी ॥ नेली नाहीं कोणीच ॥३५॥ तया विप्रमंदिरासी ॥ श्रीगुरु आले भिक्षेसी ॥ महा उष्ण वैशाखमासीं ॥ माध्यान्हकाळीं परियेसा ॥३६॥ ऐसे श्रीगुरु कृपामूर्ती ॥ गेले द्विजगृहाप्रती ॥ विप्र गेला याचकवृत्ती ॥ वनिता त्याची घरीं असे ॥३७॥ भिक्षा ह्मणतां श्रीगुरुनाथ ॥ पतिव्रता आली धांवत ॥ साष्टांगीं करी दंडवत ॥ नमिती झाली तयेवेळीं ॥३८॥ नमन करूनी श्रीगुरूसी ॥ विनवीतसे करुणेंसी ॥ आपला पती याचकवृत्तीसी ॥ गला असे अवधारा ॥३९॥ उत्कृष्ट धान्य घरीं बहुत ॥ घेवोनि येतील पति त्वरित ॥ तंववरी स्वामी बैसा ह्मणत ॥ आसन घातलें बैसावया ॥४०॥ श्रीगुरुमूर्ती हास्यवदन ॥ बैसते झाले शुभासन ॥ तिये विप्रस्त्रियेसी वचन ॥ बोलती क्षीर कां न घालिसी? ॥ ४१ ॥ तुझे द्वारीं असे महिषी ॥ क्षीर कां न घालिसी भिक्षेसी ॥ आह्मांतें तूं कां चाळविसी ॥ नाहीं वस्तु ह्मणोनियां ॥४२॥ श्रीगुरुवचन ऐकोन ॥ विप्रवनिता करी नमन ॥ वांझ महिषी दंतहीन ॥ वृद्धत्व झालें तियेसी ॥४३॥ उपजतांचि आमचे घरीं ॥ वांझ झाली दगडापरी ॥ गाभा नव्हे कवणेपरी ॥ रेडा ह्मणोनि पोशितों ॥४४॥ याच्या कारणें तियेसी ॥ वेसण

घातली परियेसी ॥ वाहविताती मृत्तिकेसी ॥ तेणें आमुच्या योगक्षेम ॥४५॥ श्रीगुरु ह्मण-ती तियेसी ॥ मिथ्या बोलसी आम्हांसी ॥ त्वरित जावोनियां महिषीसी ॥ दोहोनि आणी क्षीर आह्मां ॥४६॥ ऐसें वचन ऐकोनी ॥ विश्वास झाला तिचे मनीं ॥ काष्ठपात्र घेवोनी ॥ गेली ऐका दोहावया ॥ ४७ ॥ कामधेनू श्रीगुरूचें वचन ॥ विप्रवनिता तत्क्षण ॥ दोहिलें क्षीर संतोषोन ॥ भरणें दोन तयेवेळीं ॥ ४८ ॥ विस्मय करी विप्रवनिता ॥ ह्मणे ईश्वर हा तत्वतां ॥ याचें वाक्य परिसतां ॥ काय नवल म्हणतसे ॥४९॥ क्षीर घेवोनी घरांत ॥ आली पतिव्रता धांवत ॥ तापविती झाली अमीत ॥ सर्वेचि विनवी परियेसा ॥५०॥ श्रीगुरु ह्मणती तियेसी ॥ घालीवो क्षीर भिक्षेसी ॥ जाणें आम्हां स्वस्थानासी ॥ ह्मणोनि निरोपिती तयेवेळीं ॥ ५१ ॥ परिसोनि स्वामीचें वचन ॥ घेवोनि आली क्षीरभाजन ॥ केलें गुरुनाथें प्राशन ॥ अति संतोषोनी त्या समयीं ॥५२॥ संतोषोनी श्रीगुरुमूर्ती ॥ वर देती अति प्रीती ॥ तुझे घरीं लक्ष्मी अमिती ॥ अखंडित राहील ॥५३॥ पुत्रपौत्रीं श्रीयुक्त ॥ तुह्मी नांदाल निश्चित ॥ ह्मणोनी निघाले त्वरित ॥ संगमस्थानासी आपुल्या ॥५४॥ श्रीगुरु गेले संगमासी ॥ आला विप्र निजगृहासी ॥ ऐकता झाला विस्तारेसी ॥ महिमा श्रीगुरुमूर्तीचा ॥५५॥ ह्मणे अभिनव झालें थोर ॥ होईल ईश्वरी अवतार ॥ आमुच्या दृष्टीं दिसे नर ॥ परमपुरुष तोचि सत्य ॥५६॥ विप्र ह्मणे स्त्रियेस ॥ आमुचे गेले दरिद्रदोष ॥ भेटला श्रीगुरु विशेष ॥ सकळाभीष्टें साधलीं ॥५७॥ ह्मणोनि मनीं निर्धार करिती ॥ भेटीस जाऊं कैंचा यती ॥ हातीं घेऊनि आरती ॥ गेले दंपति संगमासी ॥५८॥ भक्तिपूर्वक श्रीगुरूसी ॥ गंधाक्षता धूपदीपेंसी ॥ नैवेद्य तांबूल प्रदक्षिणेसी ॥ पूजा करिती सद्भावें ॥५९॥ येणेंपरी द्विजवर ॥ लाध-

ला तो अनंत वर ॥ कन्या पुत्र लक्ष्मी स्थीर ॥ पूर्ण आयुष्य झालें जाण ॥६०॥ सिद्ध ह्मणे शिष्यासी ॥ श्रीगुरुकृपा होय ज्यासी ॥ दैन्य कैंसें त्या नरासी ॥ अष्टैश्वर्य भोगीतसे ॥६१॥ ह्मणे सरस्वती गंगाधर ॥ सांगे गुरुचरित्र विस्तार ॥ ऐकतां होय मनोहर ॥ दैन्यावेगळा होय त्वरित ॥६२॥ इति श्रीगुरुचरित्रामृत ॥ वंध्या महिषी दुग्ध देत ॥ निश्चयाचे बळें सत्य ॥ भाग्य आलें विप्रासी ॥६३॥ इति श्रीगुरुचरित्रपरमकथाकल्पतरौ श्रीनृसिंहसरस्वत्युपाख्याने सिद्धनामधारकसंवादे वंध्यामहिषीदोहनंनाम द्वाविंशोऽध्यायः ॥ ओंव्या ६३ ॥

॥ श्रीगणेशाय नमः ॥ विनवी शिष्य नामांकित ॥ सिद्धासी असे पुसत ॥ पुढील कथा
विस्तारित ॥ निरोपावी दातारा ॥१॥ सिद्ध ह्मणे ऐक बाळा ॥ श्रीगुरूची अगाध लीला ॥
प्रकट करी विप्र भोळा ॥ जेणें वांझ महिषी दुभिली ॥२॥ तया ग्रामीं येरे दिवसीं ॥ क्षार-
मृत्तिका वाहावयासी ॥ मागों आले तया महिषीसी ॥ द्रव्य देऊं ह्मणताती ॥३ विप्र ह्मणे
तयांसी ॥ नेदूं दुभते महिषीसी ॥ दावीतसे सकळिकांसी ॥ क्षीरभरणें दोनी वेळीं ॥४॥ क-
रिती विस्मय सकळ जन ॥ म्हणती वांझ दंतहीन ॥ काल होती नाकीं खुण ॥ वेसणरज्जू
अभिनव ॥५॥ नव्हती गर्भिणी वांझ महिषी ॥ वत्स न होतां दुभे कैसी ॥ वार्ता फांकली
विस्तारेंसी ॥ कळली तया ग्रामाधिपतीस ॥६॥ विस्मय करूनि तयेवेळीं ॥ आला अधि-
पती तयाजवळीं ॥ नमोनियां चरणकमळीं ॥ पुसतसे वृत्तांत ॥७॥ विप्र म्हणे तयासीं ॥
असे संगमीं संन्यासी ॥ त्याची महिमा आहे ऐसी ॥ होईल ईश्वर अवतार ॥ ८ ॥ नित्य
आमुच्या मंदिरासी ॥ येती श्रीगुरु भिक्षेसी ॥ वरू नव्हती त्या दिवशीं ॥ क्षीर आपण मा-
गितलें ॥९॥ वांझ ह्मणतां राग येउनी ॥ खरें क्षीर दोहा ह्मणोनी ॥ वाक्य त्यांचें निघतां
तत्क्षणीं ॥ कामधेनूपरी जाहली ॥१०॥ विप्रवचन परिसोनी ॥ गेला राजा धांवोनी ॥ सर्व
दळ शृंगारोनी ॥ आपुले पुत्रकलत्रांसहित ॥११॥ लोटांगणें श्रीगुरूसी ॥ घाली राजा भ-
क्तीसीं ॥ नमन केलें साष्टांगेंसी ॥ एका भावें करोनियां ॥१२॥ जयजयाजी जगद्गुरू ॥
त्रयमूर्तींचा अवतारू ॥ तुझा महिमा अपरंपारू ॥ अशक्य आह्मां वर्णितां ॥ १३ ॥ नेणों
आह्मी मंदमती ॥ मायामोह अंधकवृत्ती ॥ तूं तारक जगज्योती ॥ उद्धरावें आम्हांसी ॥१४॥
अविद्यामाया सागरीं ॥ बुडालों असों घोरांधारीं ॥ विश्वकर्ता तूं तारी तारी ॥ ह्मणोनि

चरणीं लागला ॥ १५॥ विश्वकर्ता तूंचि होसी ॥ हेलामात्रें सृष्टि रचिसी ॥ आह्मां तूं दिसतोसी ॥ मनुष्यरूप धरोनी ॥१६॥ वर्णावया तुझा महिमा ॥ स्तोत्र करितां अशक्य आह्मां ॥ तूंचि रक्षिता केशव्योमा ॥ चिन्मयात्मा जगद्गुरू ॥१७॥ येणेंपरी श्रीगुरूसी ॥ स्तोत्र करितां बहुवसी ॥ श्रीगुरुमूर्ती संतोषी ॥ आश्वासिती तयेवेळीं ॥१८॥ संतोषोनि श्रीगुरुमूर्ती ॥ तया रायातें पुसती ॥ आह्मी तापसी असों यती ॥ अरण्यवास करीतसों ॥१९॥ याकारणें आम्हांपाशीं ॥ येणें तुम्हां संभ्रमेंसी ॥ पुत्रकलत्रसहितेंसी ॥ कवण कारण सांग म्हणती ॥२०॥ ऐकोनियां श्रीगुरूचें वचन ॥ राजा विनवी कर जोडून ॥ तूं तारक भक्तजन॥ उद्धरावया भक्तजनां ॥ अवतरलासी नारायणा ॥ वासना जैसी भक्तजना ॥ संतुष्टावें तेणेंपरी ॥२१॥ संतुष्टावें तेणेंपरी ॥२२॥ ऐसी तुझी श्रीदख्याती ॥ वेदपुराणीं वाखाणिती ॥ भक्तवत्सला श्रीगुरुमूर्ती ॥ विनंती माझी परिसावी ॥२३॥ गाणगापुर महास्थान ॥ स्वामी करावें पावन ॥ नित्य तेथें अनुष्ठान ॥ वास करणें ग्रामांत ॥२४॥ मठ करोनी तये स्थानीं ॥ असावें आह्मां उद्धरोनी ॥ म्हणोनि लागे श्रीगुरुचरणीं ॥ भक्तिपूर्वक नरेश्वर ॥२५॥ श्रीगुरु मनीं विचारिती ॥ प्रकट होणें आली गती ॥ क्वचित्काळ येणेंरीती ॥ वसणें घडे त्या स्थानीं ॥२६॥ भक्तजनतारणार्थ ॥ अवतार धरिती श्रीगुरुनाथ ॥ राजयाचे मनोरथ ॥ पुरवूं म्हणती तयेवेळीं ॥२७॥ ऐसें विचारोनि मानसीं ॥ निरोप देती नराधिपासी ॥ जैसी तुझ्या मानसीं ॥ भक्ती असे तैसें करी ॥ २८ ॥ गुरुवचन ऐकोनी ॥ संतोषोनी नृपमुनी ॥ बैसवोनियां सुखासनीं ॥ समारंभें निघाला ॥२९॥ नानापरीचीं वाजंतरें ॥ गीत वाद्य मंगळ तुरे ॥ मृदंग टाळ निर्भरें ॥ वाजताती मनोहर ॥३०॥ राव निघे छत्रपताकेसीं ॥ गज

तुरंग शृंगारेसी ॥ आपुले पुत्र कलत्रेंसी ॥ सर्वं यतिसी घेवोनी ॥३१॥ वेदघोष द्विजवरी ॥
करिताती नानापरी ॥ वाखाणिती बंदिकारीं ॥ ब्रीद तया मूर्तीचें ॥ ३२ ॥ येणेंपरी ग्रामा-
प्रती ॥ श्रीगुरु आले अति प्रीती ॥ अनेकपरी आरती ॥ घेऊनि आले नगरलोक ॥ ३३ ॥
ऐसा समारंभ थोर ॥ करिता झाला नरेश्वर ॥ संतोषोनी श्रीगुरुवर ॥ प्रवेशले नगरांत
॥३४॥ तया ग्रामपश्चिमदेशीं ॥ असे अश्वत्थ उन्नतेसी ॥ वोस गृह तयापासीं ॥ असे एक
भयंकर ॥३५॥ तया वृक्षावरी एक ॥ ब्रह्मराक्षस भयानक ॥ वास करीतसे ऐक ॥ समस्त
प्राण्या भयंकर ॥३६॥ ब्रह्मराक्षस महाक्रूर ॥ मनुष्यमात्रां करी आहार ॥ त्याचें भय असे
थोर ॥ ह्मणोनि गृह ओस तेथें ॥३७॥ श्रीगुरु म्हणती तयेवेळीं ॥ गृह बरवें वृक्षाजवळी ॥
तेथें जातां तात्काळीं ॥ ब्रह्मराक्षस प्रगटला ॥३८॥ कर जोडोनि श्रीगुरूसी ॥ विनवीतसे
भक्तीसी ॥ स्वामी मातें तारी दीनासी ॥ घोरांधकारीं बुडालों ॥३९॥ तुझ्या दर्शनमात्रेंसी ॥
नासलीं पापें पूर्वार्जितेसी ॥ तूं कृपाळू सर्वांसी ॥ उद्धरावें आपणातें ॥४०॥ कृपाळू हो-
ऊनि श्रीगुरू ॥ मस्तकीं ठेविती करू ॥ मनुष्यरूप होवोनि येरू ॥ लोळतसे चरणक-
मळीं ॥४१॥ श्रीगुरु सांगती तयासी ॥ त्वरित जावें संगमासी ॥ स्नान करितां मुक्त होसी ॥
पुनरावृत्ती नाहीं तुज ॥४२॥ गुरुवचन ऐकोन ॥ राक्षस करी संगमीं स्नान ॥ कलेवरा सो-
डूनि जाण ॥ मुक्त झाला तत्क्षणीं ॥४३॥ विस्मय करिती सकळ लोक ॥ ह्मणती हा त्रि-
गुणात्मक ॥ धन्य धन्य श्रीगुरुनायक ॥ हाचि सत्य मानिजे ॥४४॥ श्रीगुरु राहिले तया
स्थानीं ॥ मठ केला शृंगारोनी ॥ नराधिप शिरोमणी ॥ भक्तिभावें पूजितसे ॥४५॥ भक्ति-
भावें नरेश्वर ॥ पूजा अर्पी अपरंपार ॥ परोपरी वाद्य गजर ॥ गीत वैदिकमंत्रेंसी ॥४६॥

श्रीगुरु नित्य संगमासी ॥ जाती नित्य अनुष्ठानासी ॥ नराधीप भक्तीसी ॥ सैन्यासहित आपण जाय ॥४७॥ एकाद्या समयीं श्रीगुरूसी ॥ बैसविती आपुल्या आंदोलिकेसी ॥ सर्व दळ सैन्येसीं ॥ घेवोनि जाय वनांतरा ॥४८॥ माध्यान्हकाळीं परियेसी ॥ श्रीगुरु येती मठासी ॥ सैन्यासहित आनंदेसी ॥ नमन करी नराधिप ॥ ४९ ॥ भक्तवत्सल श्रीगुरुमूर्ती ॥ भक्ताधीन आपण असती ॥ जैसा संतोष त्यांच्या चित्तीं ॥ तेणंपरी रहाटती ॥५०॥ समारंभ होय नित्य ॥ ऐकती लोक समस्त ॥ प्रकट झाले लोकांत ॥ ग्रामांतरीं सकळजनीं ॥५१॥ कुमसी ह्मणिजे ग्रामासी ॥ होता एक तापसी ॥ त्रिविक्रमभारती नामेंसी ॥ तीन वेद जाणतसे ॥५२॥ मानसपूजा नित्य करी ॥ सदां ध्याय नरहरी ॥ त्याणें ऐकिलें गाणगापुरीं ॥ असे नृसिंहसरस्वती ॥५३॥ ऐकतां त्याची चरित्रलीला ॥ मनीं ह्मणे दांभिक कळा ॥ हा काय खेळ चतुर्थाश्रमाला ॥ ह्मणोनि निंदा आरंभिली ॥ ५४ ॥ ज्ञानविग्रह श्रीगुरुमूर्ती ॥ सर्वांच्या मनींचें जाणती ॥ यतीश्वर निंदा आपली करिती ॥ ह्मणोनि ओळखिल मनांत ॥५५॥ सिद्ध ह्मणे नामांकिता ॥ पुढें अपूर्व असे कथा ॥ मन करोनी निर्मळता ॥ एकचित्तें परीस तूं ॥५६॥ ह्मणे सरस्वती गंगाधर ॥ सांगे गुरुचरित्र विस्तार ॥ ऐकतां होय मनोहर ॥ सकळाभीष्ट पाविजे ॥५७॥ इति श्रीगुरुचरित्र ॥ गाणगापुरीं विचित्र ॥ ब्रह्मराक्षसा परत्र ॥ निजमोक्ष दिधला ॥ ५८ ॥ इति श्रीगुरुचरित्रे नृसिंहसरस्वत्युपाख्याने सिद्धनामधारकसंवादे राक्षसमुक्तकरणं नाम त्रयोविंशोऽध्यायः ॥ ओंव्या ५८ ॥

॥ श्रीगणेशाय नमः ॥ सिद्ध ह्मणे नामधारका ॥ पुढें अपूर्व वर्तलें देखा ॥ विस्तारें कथा कौतुका ॥ निरोपीन तुज आतां ॥१॥ नामधारक ह्मणे सिद्धासी ॥ पुढें कथा वर्तली कैसी ॥ विस्तारोनि आम्हासी ॥ निरोपावी दातारा ॥२॥ शिष्यवचन परिसोनी ॥ सांगता झाला सिद्ध मुनी ॥ ऐक तूं वत्सा नामकरणी ॥ गुरुचरित्र अभिनव ॥ ३ ॥ ऐसा त्रिविक्रम महामुनी ॥ जो होता कुमसिस्थानीं ॥ निंदा करी सर्व जनीं ॥ दांभिक संन्यासी ह्मणोनी ॥४॥ ज्ञानवंत श्रीगुरुमूर्ती ॥ विश्वाच्या मनींचें ओळखिती ॥ नराधिपासी सांगती ॥ निंदा करितो ह्मणोनी ॥ ५ ॥ श्रीगुरु म्हणती तयेवेळीं ॥ आजचि निघावें वनमाळी ॥ त्रिविक्रमभारतीजवळी ॥ जाणें असे कुमसीसीं ॥ ६ ॥ ऐकोनि राजा संतोषला ॥ नानालंकार करिता झाला ॥ हत्ती अश्व पायदळां ॥ शृंगार केला तयेवेळीं ॥७॥ समारंभ केला थोरू ॥ आंदोळीं बैसले श्रीगुरू ॥ नानापरी वाद्य गजरू ॥ करूनियां निघाले ॥ ८॥ मानसपूजा नरहरीसी ॥ नित्य करितां भावेंसी ॥ स्थिर न होय तया दिवशीं ॥ मानसमूर्ती नरकेसरी ॥ ९ ॥ मनीं चिंता करी यती ॥ कां पां नये मूर्ती चित्तीं ॥ वृथा झाली तपोवृत्ती ॥ काय कारण ह्मणतसे ॥ १० ॥ बहुतकाळ आराधिलें ॥ कां पां नृसिंहें उपेक्षिलें ॥ तपफळ वृथा गेलें ॥ ह्मणोनि चिंता करीतसे ॥११॥ इतुकें होतां त्या अवसरीं ॥ श्रीगुरूतें देखिलें दुरीं ॥ येत होते नदीतीरीं ॥ मानसपूजेच्या मूर्तिरूपें ॥१२॥ सर्व दिसती दंडधारी ॥ कवण लहान कवण थोरी ॥ भारती देखोनि विस्मय करी ॥ नमन करीत निघाला ॥१३॥ साष्टांग नमन करोनी ॥ जावोनि लोळे श्रीगुरुचरणीं ॥ सर्वचि रूपें झाला प्राणी ॥ दंडधारी यतिरूप ॥१४॥ समस्तरूप एकसरी ॥ दिसताती दंडधारी ॥ श्रेष्ठ लघु कवणेपरी ॥ न कळे तपा

त्रिविक्रमा ॥ १५ ॥ भ्रांत झाला तयेवेळीं ॥ पुनरपि लागे चरणकमळीं ॥ ब्रह्माविष्णू चंद्र-मौळी ॥ त्रिमूर्ति तूं जगद्गुरू ॥१६॥ तुझें न कळे स्वरूपज्ञान ॥ अविद्या माया वेष्टोन ॥ नि-जरूप होवोन ॥ कृपा करणें दातारा ॥ १७ ॥ तुझें स्वरूप अवलोकितां ॥ आह्मां अशक्य गुरुनाथा ॥ चर्मचक्षु करोनि आतां ॥ पाहूं न शके ह्मणतसे ॥१८॥ तूं व्यापक सर्वांभूतीं ॥ नरसिंहमूर्ती झालासि यती ॥ प्रगट नरसिंहसरस्वती ॥ समस्त दिसती यतिरूप ॥१९॥ नमूं आतां सांग कवणा ॥ कवणापुढें दाखवूं करुणा ॥ त्रिमूर्ती तूं ओळखसी खुणा ॥ निज-रूपें व्हावें स्वामिया ॥ २० ॥ तप केलें बहु दिवस ॥ पूजा केली तुझी मानस ॥ आजि आ-लींगा फळास ॥ मूर्ती साक्षात भेटली ॥२१॥ तूं तारक विश्वासी ॥ उद्धरावया आह्मांसी ॥ म्हणोनि भूमी अवतरलासी ॥ दावी स्वरूप चिन्मय ॥ २२ ॥ ऐसेपरी श्रीगुरूसी ॥ स्तुति केली भक्तीसी ॥ श्रीगुरुमूर्ती संतोषीं ॥ झाली निजमूर्ती एक ॥२३॥ व्यक्त पाहे तयेवेळीं ॥ दिसों लागलें सैन्य सकळीं ॥ तयामध्यें चंद्रमौळी ॥ दिसे श्रीगुरू भक्तवरद ॥२४॥ श्री-गुरु ह्मणती तयासी ॥ नित्य आमुची निंदा करिसी ॥ दांभिक नांवें आह्मांसी ॥ पाचारि-सी मंदमती ॥२५॥ याकारणें तुजपासीं ॥ आलों तुझ्या भक्तीसी ॥ पूजा करिसी तूं मा-नसीं ॥ श्रीनरसिंहमूर्तीची ॥२६॥ दांभिक ह्मणजे कवणेपरी ॥ सांग आतां विस्तारीं ॥ तुझे मनीं वसे हरी ॥ तोचि तुज निरोपी ॥२७॥ ऐकोनि श्रीगुरूचें वचन ॥ यतीश्वर करीतसे नमन ॥ सद्गुरु स्वामी कृपा करून ॥ अविद्यारूप नासावें ॥२८॥ तूं तारक विश्वासी ॥ त्रय-मूर्ती अवतार तूंचि होसी ॥ मी वेष्टोन मायापाशीं ॥ अज्ञानपणें वर्ततों ॥ २९ ॥ मायामोह अंधकारीं ॥ बुडालों अज्ञानसागरीं ॥ न ओळखें परमार्थ विचारी ॥ दिवांध झालों स्वा-

गु. च.

मिया ॥३०॥ ज्योतिस्वरूप तूं प्रकाशी ॥ स्वामी मातें भेटलासी ॥ क्षमा करावी बाळका-
सी ॥ उद्धरावें दातारा ॥३१॥ अविद्यारूपसमुद्रांत ॥ होतों आपण वहात ॥ न दिसे पैल
अंत ॥ बुडतसों स्वामिया ॥३२॥ ज्ञानतारवीं बैसवोनी ॥ करुणा वायु प्रेरूनी ॥ पैलथडी
निजस्थानीं ॥ पाववी स्वामी कृपासिंधू ॥३३॥ तुझी कृपा होय ज्यासी ॥ दुःख दैन्य कैंचें
त्यासी ॥ तोचि जिंकील काळासी ॥ परमार्थीं ऐक्य होय ॥३४॥ पूर्वीं कथा ऐकिली श्र-
वणीं ॥ महाभारतपुराणीं ॥ दाविलें रूप अर्जुना नयनीं ॥ प्रसन्न होवोनी तयासी ॥३५॥
तैसे तुह्मी मजला आज ॥ दाविलें स्वरूप निज ॥ अनंत महिमा तुझी चोज ॥ भक्तवत्सला
गुरुनाथा ॥३६॥ जयजयाजी जगद्गुरू ॥ तूं तारक भवसागरू ॥ त्रयमूर्तींचा अवतारू ॥
नरसिंह सरस्वती ॥३७॥ कृतार्थ झालों जी आपण ॥ देखिले आजि तुमचे चरण ॥ न
करितां प्रयत्न ॥ भेटला रत्नचिंतामणी ॥३८॥ जैसी गंगा सागरावरी ॥ कृपा करूनि उ-
द्धरी ॥ जैसा विष्णु विदुराघरीं ॥ झाला आपण कृपावंत ॥३९॥ भक्तवत्सला तुझी कीर्ती ॥
आह्मां दाविली प्रचीती ॥ वर्णावया नाहीं मती ॥ अनंत महिमा जगद्गुरू ॥४०॥ येणेंपरी
श्रीगुरूसी ॥ करीं स्तोत्र बहुवसी ॥ श्रीगुरुमूर्ती संतोषीं ॥ दिधला वर तयेवेळीं ॥४१॥ वर
देतों त्रिविक्रमासी ॥ तुष्टलों तुझ्या भक्तीसी ॥ सद्गती होय भरंवसी ॥ पुनरावृत्ती नाहीं
तुज ॥४२॥ तुज लाधला परमार्थ ॥ होईल ईश्वरीं ऐक्यार्थ ॥ ऐसें ह्मणोनि गुरुनाथ ॥ नि-
घाले आपुल्या निजस्थाना ॥४३॥ वर देवोनि भारतीसी ॥ राहविले तेथें कुमसीसी ॥ क्षण
न लागतां परियेसी ॥ आले गाणगापुरींत ॥४४॥ सिद्ध ह्मणे नामधारका ॥ श्रीगुरुमहिमा
ऐसा निका ॥ त्रिमूर्ती तोचि ऐका ॥ नररूपें वर्ततसे ॥४५॥ ऐसा परमपुरुष गुरू ॥ त्वातें

जे कोणी ह्मणती नरू ॥ तेचि पावती यमनगरू ॥ सप्तजन्मपर्यंत ॥४६॥ गुरू ब्रह्मा गुरू विष्णू ॥ गुरूचि होय गिरिजारमणू ॥ वेद शास्त्र आगमू ॥ बोलती हे प्रसिद्ध ॥४७॥ याकारणें श्रीगुरूसी ॥ शरण जावें निश्चयेंसीं ॥ विश्वासावें माझ्या बोलासी ॥ लीन व्हावें गुरुचरणीं ॥४८॥ अमृताची आरवंटी ॥ घातली असे वरवंटी ॥ ज्ञानी जन प्राशिती घोटीं ॥ गुरुचरित्र कामधेनुदुग्ध ॥ ४९ ॥ गंगाधराचा नंदन ॥ सांगे गुरुचरित्र विस्तारोन ॥ भक्तिपूर्वक ऐकती जन ॥ लाधती पुरुषार्थ चतुर्विध ॥५०॥ इति श्रीगुरुचरित्रपरमकथाकल्पतरौ श्रीनृसिंहसरस्वत्युपाख्याने सिद्धनामधारकसंवादे त्रिविक्रमभारतीविश्वरूपदर्शनं नाम चतुर्विंशोऽध्यायः ॥ ओंव्या ५० ॥

॥ श्रीगणेशाय नमः ॥ जयजयाजी सिद्धमुनी ॥ तूंचि गुरुशिरोमणी ॥ साक्षी येतसे अंतः-करणीं ॥ बोधिला मातें परमार्थ ॥ १ ॥ ऐसा कृपाळु परमेश्वर ॥ आपण झाला अवतार ॥ येरा दिसतसे नर ॥ तेंचि अज्ञानी प्रत्यक्ष ॥ २ ॥ तया त्रिविक्रम भारतीसी ॥ दाविलें रूप प्रत्यक्षेसीं ॥ पुढें कथा वर्तली कैसी ॥ निरोपावी दातारा ॥ ३ ॥ सिद्ध ह्मणे ऐक बाळा ॥ श्री-गुरूची अगम्य लीळा ॥ सांगतां न पुरे बहु काळा ॥ साधारण मी सांगतसें ॥ ४ ॥ समस्त महिमा सांगतां ॥ विस्तार होईल बहुता ॥ याकारणें तुज क्वचित्कथा ॥ निरोपितसे बाळ-का ॥ ५ ॥ पुढें अपूर्व वर्तलें ऐका ॥ ऐक शिष्या नामधारका ॥ विदुर नामें नगर एका ॥ होता राजा यवन तेथें ॥ ६ ॥ महाक्रूर ब्राह्मणद्वेषी ॥ सदां करी जीवहिंसी ॥ चर्चा करवी ब्राह्मणांसी ॥ वेद ह्मणवी आपणापुढें ॥ ७ ॥ विप्रांसी ह्मणे तो यवन ॥ जे कां असती विद्व-ज्जन ॥ आपुल्या सभेंत येऊन ॥ वेद सर्वही ह्मणावे ॥ ८ ॥ त्यांतें द्रव्य देईन बहूत ॥ स-र्वांमध्यें मान्यवंत ॥ जो का सांगेल वेदार्थ ॥ विशेष त्याची पूजा करूं ॥ ९ ॥ ऐसें ऐकूनि ज्ञानी जन ॥ नेणो ह्मणती मतिहीन ॥ जे का असती मूर्ख जन ॥ कांक्षा धरिती द्रव्या-ची ॥ १० ॥ जावोनी तया म्लेंच्छापुढें ॥ वेदशास्त्र वाचिती गाढें ॥ म्लेंच्छामनीं असे कुडें ॥ ऐकें अर्थ यज्ञकांडाचा ॥ ११ ॥ ह्मणे विप्र यज्ञ करिती ॥ पशूहत्या करणें रीती ॥ आह्मां म्लेंच्छांतें निंदिती ॥ पशू वधिती ह्मणोनियां ॥ १२ ॥ येणेंपरी ब्राह्मणांसी ॥ निंदा करीं तो बहुवर्सीं ॥ योग्यता पाहून द्विजवरांसीं ॥ अपार द्रव्य देतसे ॥ १३ ॥ येणेंपरी तो यवन ॥ देतो द्रव्य ह्मणोन ॥ ऐकते झाले सकळ जन ॥ देशोदेशीं विप्रवर्ग ॥ १४ ॥ वेदशास्त्रीं अति निपूण ॥ द्रव्यावरी ठेऊनि मन ॥ भेटीसी जाती ब्राह्मण ॥ वेद ह्मणती त्यापुढें ॥ १५ ॥ ऐसे

मंदमती जे विप्र ॥ त्यांची जोडी यमपुर ॥ मदोन्मत्त दुराचार ॥ तेच इष्ट कलीचे ॥१६॥ यापरी वर्तमानीं ॥ वर्तत असतां एके दिनीं ॥ मंदभाग्य विप्र दोनी ॥ येवोनि भेटले रायासीं ॥१७॥ वेद शास्त्र अभिज्ञाती ॥ तीन वेद जाणों ह्मणती ॥ तया यवनापुढें कीर्ती ॥ आपली आपण सांगती ॥१८॥ विप्र ह्मणती रायासी ॥ कोणी नाहीं आह्मांसरसीं ॥ वाद करावया वेदांसी ॥ नसती चारी राष्ट्रांत ॥१९॥ असती जरी तुमच्या नगरीं ॥ त्वरित येथें पाचारीं ॥ आह्मांसवें वेद चारी ॥ चर्चा करावी द्विजांनीं ॥२०॥ विप्रवचन ऐकोनी ॥ राजा पडला अभिमानीं ॥ आपुल्या नगरचे विप्र आणोनीं ॥ समस्तांतें पुसतसे ॥२१॥ राव ह्मणे समस्तांसी ॥ चर्चा करावी तुह्मीं यांसीं ॥ जे जिंकिती यांसीं ॥ त्यांसी अपार द्रव्य देऊं ह्मणे ॥२२॥ ऐकोनियां ज्ञानीजन ॥ ह्मणती तया म्लेंच्छालागून ॥ आह्मां योग्यता नाहीं ज्ञान ॥ या ब्राह्मणांतें केवीं जिंकूं ॥२३॥ आह्मांमध्यें हेचि श्रेष्ठ ॥ विप्र दोघे महासुभट ॥ यांतें करोनि प्रकट ॥ मान द्यावा महाराज ॥२४॥ ऐसें ह्मणती द्विज समस्त ॥ ऐकोनि राजा मान देत ॥ वस्त्रें भूषणें देई वित्त ॥ गजावरी आरूढविले ॥२५॥ आरूढवोनी हस्तीवरी ॥ मिरवा ह्मणे आपुल्या नगरीं ॥ नाहींत विप्र यांचेसरी ॥ हेचि राजे विप्रांचे ॥२६॥ आपण राजा यवनांसी ॥ हे दुजे द्विजांसी ॥ ऐसें बहुमानेंसी ॥ म्लेंच्छापुढें वेद म्हणती ॥२७॥ महा तामसी ते ब्राह्मण ॥ द्विजांतें करूनियां दूषण ॥ राजे ह्मणविती आपण ॥ तया यवनराज्यांत ॥२८॥ ऐसें असतां वर्तमानीं ॥ विप्र मदांधें व्यापूनी ॥ राजापुढें जावोनी ॥ विनविताती परियेसा ॥२९॥ विप्र ह्मणती रायासी ॥ आह्मां योग्यता बहुवसीं ॥ न मिळे एकादा वादासी ॥ वृथा झालें शिकोनियां ॥३०॥ आमुचे मनीं बहु

आसक्ती ॥ करणें वाद शास्त्रार्थी ॥ निरोप देई जाऊं ह्मणती ॥ विचारूं तुझ्या राष्ट्रांस ॥३१॥ जरी मिळेल एखादा नरू ॥ तयासवें चर्चा करूं ॥ न मिळे तैसा द्विजवरू ॥ जयपत्र घेऊं ब्राह्मणांचें ॥ ३२ ॥ राजा ह्मणे तयांसी ॥ जावें राष्ट्रीं त्वरितेसी ॥ पराभवावें ब्राह्मणांसीं ॥ ह्मणोनि निरोप देता झाला ॥३३॥ यवनाचे आज्ञेसी ॥ निघाले द्विजवर तामसी ॥ पर्यटन करितां राज्यासीं ॥ गांवोगांवीं विचारिती ॥३४॥ गांवोगांव हिंडती ॥ जयपत्रें लिहून घेती ॥ ऐसी कवण्या असे शक्ति ॥ तयां संमुख उभें रहावें ॥३५॥ समस्त नगरें हिंडत ॥ पुढें चालती दक्षिण पथ ॥ भीमातीरीं असे विख्यात ॥ कुमसी ग्राम उत्तम ॥३६॥ तेथें होता महामुनी ॥ त्रिविक्रमभारती म्हणूनी ॥ त्यासी येती वेद तिन्ही ॥ अनेक शास्त्रीं अभिज्ञ तो ॥३७॥ महामुनी कीर्तिवंत ॥ ह्मणोन सांगती जन समस्त ॥ ऐकती द्विज मदोन्मत्त ॥ गेले तया मुनीपाशीं ॥ ३८ ॥ जावोनि ह्मणती तयासी ॥ त्रिवेदी ऐसें ह्मणविसी ॥ चर्चा करावी आह्मांसीं ॥ अथवा द्यावें हारिपत्र ॥ ३९ ॥ विप्रवचन ऐकोनी ॥ म्हणतसे त्रिविक्रममुनी ॥ आह्मी नेणों वेद तिन्ही ॥ अथवा न ये वेद एक ॥ ४० ॥ जरी जाणों वेदशास्त्र ॥ तरी कां होतों अरण्यपात्र ॥ वंदन करिती राजे सर्वत्र ॥ तुह्मांसारिखा भोग भोगितों ॥४१॥ नेणों म्हणोनी अरण्यवासी ॥ वेष घेतला मीं संन्यासी ॥ आह्मी भिक्षुक तापसी ॥ तुम्हांसमान नव्हे जाण ॥ ४२ ॥ हारीं अथवा जिंकून ॥ नाहीं तयाचा अभिमान ॥ तुह्मी उत्कृष्ट विद्वज्जन ॥ आह्मांसवें काय वाद ॥ ४३ ॥ ऐकोनि मुनीचें वचन ॥ तंवक्रा आले ते ब्राह्मण ॥ आह्मांसवें वाद कवण ॥ घाली ऐसा त्रिभुवनीं ॥ ४४ ॥ हिंडत आलों अवघें राष्ट्र ॥ आम्हांसमान नाहीं नर ॥ म्हणोनि दाखविती जयपत्र ॥ असंख्यात परियेसा

॥४५॥ येणेंपरी आपणासी ॥ जयपत्र घावें विशेषीं ॥ अभिमान असल्या मानसीं ॥ करी
वाद म्हणताती ॥ ४६ ॥ अनेकपरी ब्राह्मणांसी ॥ सांगे मुनी विनयेंसी ॥ ऐकती ना द्विज
महादोषी ॥ मागती जयपत्र आपुलें ॥४७॥ त्रिविक्रम महामुनी ॥ आपुले विचारी अंतःक-
रणीं ॥ यांतें न्यावें गाणगाभुवनीं ॥ शिक्षा करणें द्विजांतें ॥ ४८ ॥ विप्र मदांधें व्यापिलें ॥
अनेक ब्राह्मण धिःकारिले ॥ त्यांतें करणें उपाय भले ॥ म्हणोनि योजिलें मनांत ॥ ४९ ॥
त्रिविक्रम म्हणे विप्रांसी ॥ चला गाणगापुरासी ॥तेथें देईन तुम्हांसी ॥ जयपत्र विस्तार॥५०॥
तेथें असती आपुले गुरू ॥ तयांपुढें पत्र देईन निर्धारू ॥ अथवा तुमच्या मनींचा भारू ॥
शमन करूं म्हणे देखा ॥५१॥ ऐसा निश्चय करूनी ॥ निघाला त्रिविक्रम महामुनी ॥ सवें
येती विप्र दोनी ॥ आंदोलिके बैसोनियां ॥५२॥ पुढें ब्राह्मण अज्ञानी ॥ यतीश्वरा चालवू-
नी ॥ आपण बैसले सुखासनीं ॥ म्हणोनि अल्पायुषी झाले ॥ ५३ ॥ पावले तया गाणगा-
पुरा ॥ जें कां स्थान गुरुवरा ॥ रम्य स्थान भीमातीरा ॥ वास नरसिंहसरस्वती ॥५४॥ न-
मन करूनी श्रीगुरूसी ॥ विनवी मुनी भक्तीसी ॥ कृपामूर्ती व्योमकेशी ॥ भक्तवत्सला
परमपुरुषा ॥ ५५ ॥ जयजयाजी जगद्गुरू ॥ निर्गुण तूंचि निर्विकारू ॥ त्रयमूर्तींचा अव-
तारू ॥ अनाथांचा रक्षक ॥५६॥ दर्शन होतां तुझ्या चरणा ॥ न उरे संसारयातना ॥ ने-
णती मूढ अज्ञान जना ॥ अधोगतीचे ते इष्ट ॥५७॥ सद्गदित कंठ झाला ॥ रोमांच आंगीं
उठला ॥ नेत्रीं बाष्प आनंद झाला ॥ माथा ठेविला चरणावरी ॥ ५८ ॥ नमन करितांचि
मुनीश्वरातें ॥ उठविलें श्रीगुरुनाथें ॥ आलिंगोनि करुणावक्त्रें ॥ पुसताती वृत्तांत॥५९॥ श्री-
गुरु पुसती विक्रमासी ॥ आलेत कवणे कार्यासी ॥ विस्तारोनी आम्हांसी ॥ निरोपावें मु-

गु. च.

निवरा ॥६०॥ श्रीगुरूचें वचन ऐकोनी॥ सांगतसे त्रिविक्रम मुनी ॥ मदोन्मत्त विप्र दोनी॥ आले असती चर्चेसी ॥६१॥ वेदशास्त्रादि मीमांसें ॥ म्हणती चर्चा करूं हर्षें ॥ वेद चारी जिव्हाग्रीं वसे ॥ म्हणती मूढ विप्र दोनी ॥६२॥ जरी न करा चर्चेसी ॥ पत्र मागती हारीसीं ॥ अनेकापरी तयांसीं ॥ सांगतां न ऐकती उन्मत्त ॥ ६३ ॥ म्हणोनि आलों तुह्मांजवळी ॥ तुम्ही श्रीगुरू चंद्रमौळी ॥ तुझें वाक्य असे बळी ॥ तेणेंपरी निरोपावें ॥६४॥ मुनिवचन ऐकोनी ॥ श्रीगुरु म्हणती हास्यवदनीं ॥ आले होते विप्र दोनी ॥ त्यांतें पुसती वृत्तांत ॥६५॥ श्रीगुरु म्हणती विप्रांसी ॥ कवणा आलेत कार्यासी॥ वाद कायसा तुह्मांसी॥ लाभ काय येणें गुणें ॥ ६६ ॥ आह्मी तापसी संन्यासी ॥ आह्मां हारी कायसी ॥ काय थोरवी तुह्मांसी ॥ जय होतां यतिसवें ॥ ६७ ॥ श्रीगुरुवचन ऐकोनी ॥ बोलताती विप्र दोनी ॥ आलों पृथ्वी हिंडोनी ॥ समस्त विप्र जिंकित ॥६८॥ नव्हे कोणी संमुख ॥ वेदचर्चा पराङ्मुख ॥ ह्मणोनि पत्रें अनेक ॥ काढोनियां दाखविलीं॥६९॥ येणेंपरी आह्मांसी ॥ पत्र मागतां यतीसी ॥ कोप आला त्रिविक्रमासी ॥ घेवोनि आलों तुह्माजवळी ॥ ७० ॥ जरी असाल साभिमान ॥ तुह्मांसहित दोघेजण ॥ वेदशास्त्रादि व्याकरण ॥ चर्चा करूं ह्मणती विप्र ॥ ७१ ॥ आह्मी जाणों वेद चारी ॥ न होती कोणी आह्मासरीं ॥ तुह्मी दोघे यतीश्वरी ॥ काय जाणाल वेदांत ॥७२॥ श्रीगुरु म्हणती विप्रांसी ॥ गर्वें नाश समस्तांसी ॥ देवदानवादिकांसी ॥ गर्वें मृत्यु लाधला जाणा ॥ ७३ ॥ गर्वें बळीसी काय झालें ॥ बाणासुरासी फळ आलें ॥ लंकानाथ कौरव गेले ॥ वैवस्वतक्षेत्रासी ॥ ७४॥ कवण जाणे वेदांत ॥ ब्रह्मादिकां नकळे अंत ॥ वेद असती अनंत ॥ गर्व वृथा तुम्ही करितां ॥७५॥ विप्रा-

अ. २५

राल आपुलें हित ॥ तरीच सांडा गर्वभ्रांत ॥ काय जाणतां वेदांत ॥ चतुर्वेदी ह्मणवितां ॥७६॥ गुरूचें वचन ऐकोनी ॥ जाणों आह्मी वेद तिन्ही ॥ भाष्य तर्क व्याकरणीं ॥ सांग संहिता परियेसा ॥७७॥ येणेंपरी श्रीगुरूसी ॥ बोलती ब्राह्मण परियेसी ॥ सिद्ध ह्मणे नामधारकासी ॥ अपूर्व पुढें वर्तलें ॥७८॥ वेद चारी आदि अंतीं ॥ श्रीगुरु ब्राह्मणां निरोपिती ॥ सावधान ऐका एकचित्तीं ॥ ह्मणे सरस्वती गंगाधर ॥७९॥ इति श्रीगुरुचरित्रामृत ॥ त्रिविक्रम मुनि विख्यात ॥ विप्र जयपत्र मागत ॥ तें चरित्र वर्णिलें ॥८०॥ इति श्रीगुरुचरित्रपरमकथाकल्पतरौ श्रीनृसिंहसरस्वत्युपाख्याने सिद्धनामधारकसंवादे द्विजप्रशंसानाम पंचविंशोऽध्यायः ॥ ओंव्या ८० ॥

॥ श्रीगणेशाय नमः ॥ श्रीगुरु ह्मणती ब्राह्मणासी ॥ नका भ्रमूं युक्तीसी ॥ वेदांत न कळे ब्रह्मयासी ॥ अनंत वेद असती ॥ १ ॥ वेदव्यासासारिखा मुनी ॥ नारायण अवतरोनी ॥ वेद व्यक्त करोनी ॥ व्यास नाम पावला ॥२॥ तेणेंही पूर्ण नाहीं केलें ॥ साधारण सांगितलें ॥ शिष्य होते चौघे भले ॥ प्रख्यात नामें अवधारा ॥३॥ शिष्यांचीं नामें देखा ॥ सांगेन विस्तारें ऐका ॥ प्रथम पैल दुजा वैशंपायन निका ॥ तिसरा नामें जैमिनी ॥४॥ चौथा सुमंतू शिष्य ॥ करीन ह्मणे वेदाभ्यास ॥ त्यासी ह्मणे वेदव्यास ॥ अशक्य तुह्मी शिकतां ॥५॥ एक वेद शिकतां व्यक्त ॥ पाहिजे दिन कल्पांत ॥ चारी वेद केवीं वाचित ॥ अनंत वेदांची महिमा ॥ ६ ॥ ब्रह्मकल्प तिन्ही फिरले ॥ वर्षोवर्षी वाचले ॥ ब्रह्मचर्य आचरले ॥ नव्हे पार वेदांसी ॥ ७ ॥ या वेदांचें आद्यंत ॥ सांगेन ऐका एकचित्त ॥ पूर्वी भारद्वाज विख्यात ॥ ऋषि अभ्यास करितां ॥८॥ लवलेश आलें त्यासी ॥ पुनरपि करी तपासी ॥ ब्रह्मा प्रसन्न झाला परियेसी ॥ माग वर म्हणतसे ॥९॥ भारद्वाज ह्मणे ब्रह्मयासी ॥ स्वामी मज प्रसन्न होसी ॥ वेद शिकेन आद्यंतेसी ॥ ब्रह्मचर्य आश्रमीं ॥१०॥ वेदांत मज दावावे ॥ सर्व मातें शिकवावे ॥ ऐसें वरदान द्यावें ॥ ह्मणोनि चरणीं लागला ॥११॥ ब्रह्मा ह्मणे भारद्वाजासी ॥ मीति नाहीं वेदांसी ॥ सर्व कैसा शिकों म्हणसी ॥ आम्हांसि वेद अगोचर ॥१२॥ तुज दावितों पहा सकळ ॥ करोनि मन निर्मळ ॥ शक्ति झालिया सर्व काळ ॥ अभ्यास करी भारद्वाजा ॥१३॥ ऐसें ह्मणोनि ऋषीसी ॥ ब्रह्मा दावी वेदांसी ॥ दिसताती तीन राशी ॥ गिरिरूप होवोनी ॥१४॥ ज्योतिर्मय कोटिसूर्य ॥ पाहतां ऋषीस वाटे भय ॥ वेदराशी गिरिमय ॥ केवीं शिकूं म्हणतसे ॥ १५ ॥ तिन्ही ब्रह्मकल्पावरी ॥ आचरले आ-

श्रम चारी ॥ वेद शिकलों तावन्मात्रीं ॥ एवढें गिरी केवीं शिकों ॥ १६ ॥ म्हणोनी भया-
भीत झाला ॥ ब्रह्मयाच्े चरणीं लागला ॥ म्हणे स्वामी अशक्य केवळा ॥ क्षमा करणें ह्म-
णतसे ॥१७॥ या वेदांचा अंत ॥ आपण पहावया अशक्त ॥ तूंचि जाणसी जगन्नाथ ॥ जें
देशी तें घेईन ॥ १८ ॥ तूंच शरणांगता आधार ॥ माझे मनीं वासना थोर ॥ वेद शिकावे
अपार ॥ म्हणोनि आलों तुजपाशीं ॥ १९ ॥ वेद देखोनि अमित ॥ भय पावलें चित्त ॥ जें
कराल तें उचित ॥ तेंचि घेऊं परियेसा ॥२०॥ ऐसें वचन ऐकोन ॥ ब्रह्मदेव संतोषोन ॥
देता झाला मुष्टी तीन ॥ अभ्यासावया ॥२१॥ तीन वेदांचे मंत्र झाले ॥ वेगळे केलें तात्का-
ळें ॥ ऐसे चारी वेद प्रबळें ॥ अभ्यासी भारद्वाज ॥२२॥ अजून पुरतें नाहीं त्यासी ॥ केवीं
शिकावें वेदांसी ॥ सांगा तुह्मी परियेसी ॥ चौवे वाचा चारी वेद ॥ २३ ॥ पूर्ण एक एक
वेदासी ॥ शिकतां प्रयत्न मोठा त्यासी ॥ सांगेन थोडें तुम्हांसी ॥ व्यक्त करावया अ-
भ्यास ॥२४॥ शिष्य म्हणती व्यासासी ॥ एक एक वेद आम्हांसी ॥ विस्तारावे आद्यंते-
सी ॥ शक्त्यनुसार अभ्यास करूं ॥२५॥ ऐसें विनविती चौघेजण ॥ नमूनियां व्यासचर-
ण ॥ कृपा करीगा नारायणा ॥ आम्हांलागीं व्यासमुनी ॥ २६ ॥ करुणावचन ऐकोनी ॥
व्यास सांगे संतोषोनी ॥ पहिला शिष्य बोलावोनी ॥ ऋग्वेद निरोपित ॥ २७ ॥ ऐक पैल
शिष्योत्तमा ॥ सांगेन ऋग्वेद महिमा ॥ पठण करीगा धर्मकर्मा ॥ ध्यान पूर्वीं करोनी ॥२८॥
पैल शिष्य ह्मणे व्यासासी ॥ बरवें विस्तारावें आम्हासी ॥ ध्यानपूर्वक लक्षणेंसी ॥ भेदा-
भेद निरोपावे ॥ २९ ॥ त्यांत जें शक्य आम्हांसी ॥ तेंची शिकों भक्तीसी ॥ तूं कामधेनू
आम्हांसी ॥ कृपा करीगा गुरुमूर्ति ॥३०॥ व्यास सांगे पैलशिष्यासी ॥ ऋग्वेदध्यान परि-

गु. च.

येसी ॥ वर्णरूप व्यक्ती कैसी ॥ भेदाभेद सांगेन ॥३१॥ ऋग्वेदाचा उपवेद ॥ असे प्रख्यात आयुर्वेद ॥ आत्रि गोत्र असे शुद्ध ॥ ब्रह्मा देवता जाणावी ॥३२॥ गायत्री छंदासी ॥ रक्त-वर्ण परियेसी ॥ नेत्र पद्मपत्रसदृशी ॥ विस्तीर्ण ग्रीवा कंबुकंठ ॥ ३३ ॥ कुंचकेशी श्मश्रुप्र-माण ॥ द्विररत्नी दीर्घ जाण ॥ ऋग्वेद असे रूपधारण ॥ मूर्ती ध्यावी येणेंपरी ॥ ३४ ॥ आतां भेद सांगेन ऐका ॥ प्रथम चर्चा श्रावका ॥ द्वितीय चर्चा श्रवण ऐका ॥ पराक्रमी दोनी शाखा ॥३५॥ षट्क्रम शाखा दोनी ॥ सातवा दंड म्हणोनी ॥ भेद सप्त निर्गुणी ॥ पांच भेद आणीक असती ॥ ३६ ॥ आश्वलायनी शांखायनी दोनी ॥ शाकला बाष्कला दोनी ॥ पांचवी मांडुक्य म्हणोनी ॥ ऐसे भेद द्वादश ॥ ३७ ॥ श्रीगुरु म्हणती ब्राह्मणांसी ॥ व्यासें सांगितलें शिष्यांसीं ॥ ऐशिया ऋग्वेदासी ॥ द्वादश भेद विस्तारें ॥ ३८ ॥ या कलियुगा-भीतरीं ॥ म्हणविती वेद चारी ॥ कीर्ति मिरवा लोकांतरीं ॥ अध्यापक म्हणोनी ॥ ३९ ॥ तया द्वादश भेदांत ॥ एक शाखा असे विख्यात ॥ सलक्षण रूप व्यक्त ॥ कोण जाणे सांग मज ॥४०॥ नारायण व्यासमुनी ॥ शाखा द्वादश विस्तारोनी ॥ सांगितल्या संतोषोनी ॥ पैलशिष्यासी ॥ ४१ ॥ ऋग्वेदाचे भेद ऐसे ॥ सांगितले वेदव्यासें ॥ श्रीगुरु म्हणती हर्षें ॥ मदोन्मत्त द्विजांसीं ॥ ४२ ॥ यजुर्वेद विस्तार ॥ सांगेन ऐका अपार ॥ वैशंपायन शिष्य थोर ॥ अभ्यास करी परियेसा ॥४३॥ व्यास म्हणे शिष्यासी ॥ ऐक एकचित्तेंसी ॥ सां-गतों यजुर्वेदासी ॥ उपवेद धनुर्वेद ॥४४॥ भारद्वाज गोत्र जाणा ॥ अधिदैवत रुद्र म्हणा ॥ त्रिष्टुपछंदासी तुह्मी म्हणा ॥ आतां ध्यान सांगेन ॥ ४५ ॥ किंचित स्थूलदेह निर्धार ॥ क-पाळ धरिलें असे करीं ॥ कांचनवर्ण मनोहरी ॥ नेत्र असती पिंगट ॥४६॥ शरीर ताम्र श्वेत

वर्ण ॥ पांच अरत्नी स्थूळ जाण ॥ यजुर्वेदा ऐसें जाण ॥ वैशंपायन निर्धारी ॥४७॥ ऐशि-
या यजुर्वेदासी ॥ असती भेद शायशी ॥ म्हणे व्यास शिष्यासी ॥ सांगेन ऐका याचि-
परी ॥ ४८ ॥ प्रथम चरका अव्हेरिका ॥ तिसरा नामकठ ऐका ॥ प्राच्याकठा चतुर्थिका॥
कपिष्टला पांचवी पै ॥ ४९ ॥ सहावी असे चारायण ॥ वारतंतवीया सातवी खूण ॥ श्वेत
म्हणिजे आठवी जाण ॥ श्वेततर नवमी ॥५०॥ मैत्रायणी असे नाम ॥ शाखा असे हो द-
शम ॥ तिसी भेद उत्तम ॥ असती सात परियेसा ॥ ५१ ॥ मानवा दुंदुभी दोनी ॥ तिसरा
ऐकेय म्हणोनी ॥ वराह नाम चतुर्थगुणी ॥ भेद असे परियेसा ॥५२॥ हरिद्रव्य जाण पांच-
वा ॥ शाम म्हणिजे साहवा ॥ सातवा शामायणी जाणावा ॥ दशम शाखा परियेसा॥५३॥
वाजसनीय शाखेसी ॥ भेद असती अष्टादशी ॥ नामें सांगेन परियेसी ॥ श्रीगुरु म्हणती
तयांसी ॥५४॥ वाजसनीय नाम एक ॥ द्वितीय नाम जाबालीक ॥ बौध्य नामें तृतीयक॥
चतुर्थ कण्व परियेसा ॥५५॥ मध्यंदिन पांचवेसी ॥ शाबीयनाम षष्ठेसी ॥ स्थापायनी स-
प्तमेसी ॥ कापाला अष्टम विख्यात ॥५६॥ पौंड्रवत्स विख्यात ॥ कोटीनामें उन्नत ॥ एका-
दश भेद विख्यात ॥ परमवाटिका परमप्रीत ॥५७॥ पाराशर द्वादशी ॥ वर्धेयनामें त्रयोद-
शी ॥ चतुर्दश भेद पुससी ॥ वैनतेय म्हणती तयातें ॥५८॥ औख्या नाम विशेषीं ॥ जाण
शाखा पंचदशी ॥ गालव म्हणिजे षोडशी ॥ वैजरा नाम सप्तदशी ॥५९॥ बैजनाम विशे-
षीं ॥ जाण शाखा अष्टादशी ॥ वाजसनीय शाखेसी ॥ भेद असती अष्टादश ॥६०॥ तैत्ति-
रीयशाखा भेद दोनी ॥ व्यास सांगे विस्तारोनी ॥ औख्य कांडीं म्हणोनी ॥ यांसी भेद
पांच असती ॥६१॥ आपस्तंबी असे थोर ॥ शाखा असे मनोहर ॥ यज्ञादि कर्मं आचार ॥

विज्ञान असे तयांत ॥६२॥ दुसरा जाण बौधायनी ॥ सत्याषाढी अघनाशनी ॥ हिरण्य-
केशी म्हणोनी ॥ चौथा भेद परियेसा ॥६३॥ औखेय म्हणोनि नांवा ॥ भेद असे पांचवा ॥
अनुक्रमें पढावा ॥ म्हणे व्यास शिष्यांसी ॥ ६४ ॥ षडंगें असती विशेषें ॥ नामें तयांचीं
सांगेन ऐके ॥ शिक्षा व्याकरण कल्पें ॥ निरुक्त छंद ज्योतिष ॥६५॥ यातें उपांगें असती
आणिक ॥ सांगेन नामें तूं ऐक ॥ प्रतिपद अनुपम देख ॥ छंदस तिसरा परियेसा ॥६६॥
भाषा धर्म पंचम ॥ मीमांसान्याय सप्तम ॥ कर्मसंहिता अष्टम ॥ उपांगें हीं जाणावीं ॥६७॥
परिशिष्टें अष्टाविंश ॥ असती ऐका विशेष ॥ विस्तार करूनी परियेसा ॥ व्यास सांगे
शिष्यांसी ॥६८॥ पूर्वी होत्या वेदराशी ॥ शिकतां अशक्य मानवांसी ॥ म्हणोनि लोकोप-
कारासी ॥ ऐसा केला विस्तार ॥६९॥ शाखाभेद येणेंपरी ॥ विस्तार केला प्रकारीं ॥ जि-
तुकें मती उच्चारी ॥ तितुकें शिका म्हणोनी ॥७०॥ येणेंपरी विस्तारीं ॥ सांगे व्यास परि-
करी ॥ वैशंपायन अवधारी ॥ विनवीतसे त्याजवळी ॥७१॥ यजुर्वेद विस्तारेसी ॥ निरो-
पिला आम्हांसी ॥ शाखाभेद क्रमेसी ॥ वेगळाले करोनी ॥७२॥ संदेह होतो आम्हांसी ॥
मूळ शाखा कोण कैसी ॥ विस्तारोनी प्रीतीसी ॥ निरोपावें स्वामियां ॥ ७३ ॥ व्यास ह्मणे
शिष्यांसी ॥ बरवें पुसिलें आह्मांसी ॥ या यजुर्वेदासी मूळ तुह्मां सांगेन ॥७४॥ मंत्र ब्राह्म-
ण संहिता ॥ मिळोनि पढतां मिश्रिता ॥ तेंचि मूळ प्रख्याता ॥ यजुर्वेदा जाणिजे ॥ ७५ ॥
आणिक असे एक खूण ॥ संहिता मिळोनि ब्राह्मण ॥ तोचि यजुर्वेद मूळ जाण ॥ वरक-
ड शाखा पल्लव ॥ ७६ ॥ यज्ञादि कर्मक्रियेसी ॥ हें मूळ गा परियेसी ॥ अभ्यास करीगा
निश्चयेंसी ॥ ह्मणे व्यास शिष्यांतें ॥ ७७ ॥ ऐकोनियां व्यासवचन ॥ वैशंपायन ह्मणे कर

जोडून ॥ यजुर्वेद मूळ विस्तारोन ॥ निरोपावें स्वामियां ॥ ७८ ॥ व्यास ह्मणे शिष्यांसी ॥
सांगेन ऐक विस्तारेंसी ॥ ग्रंथत्रय असती ज्यासी ॥ अभ्यास करी म्हणतसे ॥७९॥ सप्त
अष्टक संहितेसी ॥ एका एका विस्तारेसी ॥ सांगेन तुज भरंवसी ॥ म्हणे व्यास शिष्यातें
॥८०॥ प्रथम इषेत्वा पन्नासी ॥ अनुवाक असती चतुर्दशी ॥ आठ अधिक विसांसी ॥ प-
न्नास असती ॥८१॥ अपऊर्ध्वपन्नासी ॥ अनुवाक असती चतुर्दशी ॥ चारी अधिक ति-
सांसी ॥ पन्नासा तुह्मी जाणाव्या ॥ ८२ ॥ देवस्यत्वा पन्नासी ॥ अनुवाक असती एकाद-
शी ॥ एक अधिक तिसांशी ॥ पन्नासा असती ॥८३॥ आददेनाम पन्न चतुर्थे ॥ षट्चत्वा-
रिंशत् अनुवाक विख्यात ॥ पन्नासा जाणा तयांत ॥ वेदाधिक पन्नास ॥ ८४ ॥ देवासुरना-
मक पन्नासी ॥ अनुवाक असती एकादशी ॥ असती एकावन्न पन्नासी ॥ पंचम पन्न अ-
वधारा ॥८५॥ संत्वासिंचामिति पन्न ॥ द्वादश अनुवाक असती पूर्ण ॥ पन्नासा असती ए-
कावन्न ॥ असती सहावे पन्नासी ॥ ८६ ॥ पाकयज्ञनामक पन्न ॥ त्रयोदशी अनुवाकीं सं-
पन्न ॥ पन्नासा असती एकावन्न ॥ सप्तम पन्न विस्तार ॥ ८७ ॥ अनुमत्य इति पन्नासी ॥
अनुवाक जाणा द्वाविंशती ॥ द्विचत्वारिंशत् पन्नासा असती ॥ प्रथम अष्टक येणेंपरी
॥८८॥ प्रथम अष्टक परियेसी ॥ संख्या सांगेन संहितेसी ॥ अनुवाक असती ख्यातीसी ॥
एकचित्तें परियेसा ॥८९॥ एक शत आणि चत्वारिंशत वरी ॥ अधिक त्यावरी तीन नि-
र्धारी ॥ अनुवाक असती परिकरी ॥ अंतःकरणीं धरावे ॥९०॥ पन्नासा असती त्यासी ॥
त्रिंशत अधिक बेचाळिशी ॥ प्रथम अष्टकीं परियेसी ॥ म्हणोनि सांगे व्यासमुनी ॥९१॥
द्वितीय अष्टकाचा विचार ॥ सांगेन तो परिकर ॥ प्रथम पन्नाचें नाम थोर ॥ वायव्य

असें म्हणावें ॥९२॥ प्रथम पन्न विशेष ॥ अनुवाक जाण एकादश ॥ पंचषष्ठी असती प-
न्नास ॥ एकचित्तें परियेसा ॥ ९३ ॥ पुढें असे द्वितीय पन्न ॥ नाम असे प्रजापती गहन ॥
द्वादश अनुवाक असती जाण ॥ एक असती पन्नासा ॥ ९४ ॥ आदित्यानामक पन्नास ॥
अनुवाक जाणा चतुर्दश ॥ षट् अधिक पंचाशत ॥ पन्नासा तुह्मी पढाव्या ॥ ९५ ॥ पुढील
पन्न देवा मनुष्या ॥ अनुवाक जाणा चतुर्दशा ॥ अष्ट अधिक चत्वारिंशा ॥ पन्नासा तुवां
जाणिजे ॥९६॥ ह्मणतां जाय महा पाप ॥ पन्न असे विश्वरूप ॥ द्वादश अनुवाक स्वरूप ॥
चारी अधिक सप्तती पन्नास ॥९७॥ समिधा नाम पन्नास ॥ निरुते अनुवाक द्वादश ॥ स-
प्तती पन्नासा असती त्यास ॥ एकचित्तें परियेसा ॥ ९८ ॥ ऐसें द्वितीय अष्टकासी ॥ षष्ठ
पन्न परियेसी ॥ पांच अधिक सप्ततीसी ॥ अनुवाक तुम्हीं जाणावे ॥ ९९ ॥ पन्नासांची
गणना ॥ सांगेन तुज विस्तारोन ॥ तीन शतांवरी अशीति जाणा ॥ अष्ट अधिक परि-
येसा ॥१००॥ तिसरा अष्टक सविस्तर ॥ सांगेन तुह्मां परिकर ॥ वैशंपायन शिष्य थोर ॥
गुरुमुखें ऐकतसे ॥१॥ तिसऱ्या अष्टकाचा पन्न प्रथम ॥ नाम प्रजापतिरकाम ॥ अनुवाक
त्या एकादशोत्तम ॥ द्विचत्वारिंशत् पन्नासा त्यासी ॥ २ ॥ दुसरें पन्न असे जाण ॥ नाम
योवैपवमान ॥ एकादश अनुवाक जाण ॥ षट्चत्वारिंशत् पन्नासा त्यासी ॥ ३ ॥ तृतीय
पन्न बरवीयासी ॥ नाम असे अग्नेतेजस्वी ॥ अनुवाकांची एकादशी ॥ षट्चत्वारिंशत्
पन्नासा त्यासी ॥४॥ चौथा पन्न विवात्यांत ॥ एकादश अनुवाक ख्यात ॥ षट्चत्वारिं-
शत् पन्नासा त्यांत ॥ एकचित्तें परियेसा ॥ ५ ॥ पुढें असे पन्न पंचम ॥ ह्मणावें नाम पूर्णा
प्रथम ॥ अनुवाक अकरा उत्तम ॥ षट्त्रिंशत् पन्नासा त्यासी ॥६॥ ऐसें तृतीयाष्टकासी ॥

अनुवाक पंचपंचशत त्यासी ॥ द्विशत सहा अधिक त्यासी ॥ पन्नासा असती अवधारा ॥७॥ चौथ्या अष्टकाचा प्रथम पन्न ॥ नामें असे युजान ॥ एकादश अनुवाक खूण ॥ षट्चत्वारिंशत् पन्नासा ॥ ८ ॥ पन्न संज्ञा विष्णोक्रम ऐशी ॥ एकादश अनुवाक परियेसी ॥ अष्ट अधिक चत्वारिंशतीसी ॥ पन्नासा त्यांत विस्तार ॥ ९ ॥ तिसरें पन्न उत्तम ॥ जाणा तुह्मी आपांत्वा नाम ॥ त्रयोदश अनुवाक उत्तम ॥ षट्त्रिंशत् पन्नासा त्यासी ॥१०॥ चौथा पन्न रश्मिरसी ॥ अनुवाक असती द्वादशी ॥ सप्ताधिक त्रिंशत् त्यासी ॥ पन्नासा असती तुह्मी जाणा ॥११॥ नमस्ते रुद्र उत्तम ॥ पन्न होय जाण पंचम ॥ एकादश अनुवाक जाण ॥ सप्ताधिक वीस पन्नासा ॥१२॥ अश्मन्नूर्ज पन्नास ॥ नव अनुवाक परियेस ॥ षट्चत्वारिंशत् पन्नासा त्यास ॥ एकचित्तें परियेसा ॥१३॥ पन्न अग्नाविष्णूसी ॥ अनुवाकांची जाण पंचदशी ॥ एक न्यून चाळिसांशी ॥ पन्नासा त्यासी विस्तारें ॥ १४ ॥ ऐसे चतुर्थ अष्टकासी ॥ सप्त पन्न परियेसी ॥ अनुवाक असती त्र्यायशी ॥ द्विशतांवर एक उण्या अशीति पन्नासा ॥१५॥ पंचमाष्टका प्रथम पन्न ॥ नामें सावित्राणी जाण ॥ पन्नासा षष्ठी एका उण ॥ एकादश अनुवाक ख्याती ॥१६॥ विष्णुमुखा पन्नासी ॥ अनुवाक असती द्वादशी ॥ चतुःषष्ठी पन्नासा त्यासी ॥ श्रीगुरु ह्मणती द्विजांतें ॥१७॥ तिसरा पन्न उत्सन्नयज्ञ ॥ अनुवाक द्वादश धरा खूण ॥ पन्नासांसी द्वय न्यून ॥ पन्नासा असती परियेसा ॥१८॥ चौथा पन्न देवासुरा ॥ अनुवाक असती त्यासी बारा ॥ षष्ठींत दोन उण्या करा ॥ पन्नासा असती परियेसा ॥ १९॥ यदेके नामें पन्न ॥ चतुर्विंशति अनुवाक खूण ॥ दोन अधिक षष्ठी जाण ॥ पन्नासा असती परियेसा ॥ २० ॥ हिरण्यवर्णा षष्ठ पन्न ॥ त्रयोविंशति अनुवाक

जाण ॥ षष्टिमध्यें सहा न्यून ॥ पन्नासा असती परियेसा ॥२१॥ योंवाआयथा नामें पन्न ॥ षड्विंशति अनुवाक जाण ॥ षष्टीमध्यें द्वय न्यून ॥ पन्नासा असती परियेसा ॥ २२ ॥ पंचमाष्टक संहितेसी ॥ सप्त पन्न परियेसी ॥ अनुवाक एक शत त्यासी ॥ वीस अधिक विस्तारें ॥२३॥ त्रीणी अधिक चतुःशत ॥ पन्नासा असती जाण विख्यात ॥ मन करूनी सावचित्त ॥ ऐका ह्मणे तयेवेळीं ॥२४॥ षष्ठाष्टक संहितेसी ॥ प्रथम पन्न परियेसी ॥ प्राचीनवंश नाम त्यासी ॥ एकादश अनुवाक जाण ॥२५॥ अधिक सहा सप्ततीसी ॥ पन्नासा त्याची परियेसी ॥ विस्तार करूनी शिष्यासी ॥ सांगतसे व्यासदेव ॥ २६ ॥ यदुभव नाम पन्नासी ॥ अनुवाक जाणा एकादशी ॥ एक उणा षष्ठीसी ॥ पन्नासा असती परियेसी ॥ २७ ॥ तिसरा पन्न चात्वाल ॥ एकादशी अनुवाका माळ ॥ पन्नासा षष्ठीवरी द्वय स्थूळ ॥ तिसरा पन्न परियेसी ॥२८॥ चवथा पन्न यज्ञेन ॥ एकादश अनुवाक जाण ॥ पन्नासा एक अधिक पंचाशत् पूर्ण ॥ एकचित्तें परियेसा ॥२९॥ इंद्रोवृत्र नाम पन्न ॥ एकादश अनुवाक जाण ॥ द्विचत्वारिंशत् पन्नासा खूण ॥ पंचम पन्नीं परियेसा ॥ ३० ॥ सुवर्गाय नाम पन्नासीं ॥ अनुवाक असती एकादशी ॥ त्रीणी अधिक चत्वारिंशती ॥ पन्नासा असती परियेसा ॥३१॥ सहावे अष्टकीं परिपूर्ण ॥ त्यासी सहा अधिक असती पूर्ण ॥ षष्ठी अनुवाक असती जाण ॥ त्रयस्त्रिंशदधिक ॥ त्रिशत पन्नासा ॥३२॥ सप्तमाष्टकाच्या पन्न ॥ नाम असे प्रजनन ॥ अनुवाक वीस असती खूण ॥ द्विपंचशत् पन्नासा त्यास ॥३३॥ साध्या ह्मणती जो द्वितीय पन्न ॥ विंशती अनुवाक जाण ॥ पन्नास पन्नासा परिपूर्ण ॥ एकचित्तें परियेसा ॥३४॥ प्रजवेवानाम पन्नासी ॥ अनुवाक वीस परियेसी ॥ द्विचत्वारिं-

शत् पन्नासा त्यासी ॥ श्रीगुरु म्हणती तयासी ॥ ३५ ॥ बृहस्पती नामक पन्न ॥ द्वाविंशती अनुवाक जाण ॥ त्रीणी अधिक पन्नासा न्यून ॥ पन्नासा असती अवधारा ॥ ३६ ॥ पन्न असे पांचवा जाण ॥ गावोवा नामें उत्तम ॥ पंचविंशती अनुवाक पूर्ण ॥ चतुःपंचाशत पन्नासा त्यासी ॥३७॥ सप्तमाष्टक संहितेसी ॥ अनुवाक असती परियेसी ॥ एक शत सप्त त्यासी ॥ अनुवाक असती विस्तार ॥३८॥ द्विशतांवरी अधिकेसी ॥ एकावन्न असती प-न्नाशी ॥ सप्तमाष्टक असे सुरसी ॥ एकचित्तें परियेसा ॥३९॥ अष्टमाष्टक संहितेसी ॥ षट्-शताधिक अष्टचत्वारिंशतीसी ॥ मुख्य पन्न चतुश्चत्वारिंशत् भरंवशीं ॥ अनुवाक असती विस्तारें ॥४०॥ द्वि उणें शतद्वय सहस्र दोनी ॥ पन्नासा तूं जाण मनीं ॥ पठण करा म्हणो-नी ॥ व्यास सांगे शिष्यासी ॥४१॥ तीन अष्टक ब्राह्मणांत ॥ असती जे जाण विख्यात ॥ सांगेन ऐक एकचित्त ॥ म्हणे व्यास शिष्यासी ॥ ४२ ॥ प्रथमाष्टकांत ब्राह्मणांसी ॥ पन्न आठ परियेसी ॥ नामें त्यांचीं ऐका ऐशीं ॥ एकचित्तें परियेसा ॥४३॥ प्रथम पन्न ब्रह्मसं-धत्त ॥ नाम असे विख्यात ॥ अनुवाक दहा विस्तृत ॥ अशीति दशक दश मनोहर ॥४४॥ उद्धन्य नाम दुसरा पन्न ॥ सहा अनुवाक दशक पन्नास जाण ॥ वाजपेय अनुसंधान ॥ देवासुरा पन्न तिसरा ॥ ४५ ॥ त्यासी दश अनुवाक जाण ॥ पांच अधिक षष्ठि दशक जाण ॥ चौथा उभयेनाम प्रश्न ॥ दश अनुवाक मनोहर ॥ ४६ ॥ संवत्सर गणित सहा अ-धिका ॥ त्यासी जाणा तुह्मी दशका ॥ पांचवा नामें अग्नेकृत्तिका ॥ पन्न असे अवधारा ॥४७॥ त्यासी अनुवाक द्वादश ॥ सांगेन ऐका दशक ॥ दोन अधिक षष्ठी विशेष ॥ एक-चित्तें परियेसा ॥ ४८ ॥ सहावा पन्न अनुमत्य ॥ अनुवाक दहा प्रख्यात ॥ पांच अधिक

गु.
च.

सप्ततिक ॥ दशक त्यासी अवधारा ॥४९॥ सप्तम पन्न धरी खूण ॥ नाम त्या ऐक ब्राह्मण ॥ दश अनुवाक जाण ॥ चतुःषष्ठी दशक त्यासी ॥ ५० ॥ आठवा वरुणस्यनाम पन्न ॥ अनुवाक त्यासी दहा जाण ॥ सप्ताधिक तीस खूण ॥ दशक त्यासी मनोहर ॥५१॥ प्रथम अष्टक ब्राह्मणासी ॥ पन्न आठ परियेसी ॥ अष्टसप्तती अनुवाक त्यासी ॥ एकचित्तें परियेसा ॥५२॥ एक उणें पांच शत ॥ दशक आहेत विख्यात ॥ वैशंपायन ऐकत ॥ गुरुमुखें करोनी ॥ ५३ ॥ दुसरा अष्टक ब्राह्मणास ॥ प्रथम पन्न अंगिरस ॥ अनुवाक जाणा एकादश ॥ साठी दशक मनोहर ॥५४॥ प्रजापतिरकांड ॥ पन्न दुसरा हा गोड ॥ एकादश अनुवाक दृढ ॥ त्रिःसप्तति दशक त्यासी ॥ ५५ ॥ कांड ब्रह्मवादिन ॥ एकादश अनुवाक जाण ॥ दशक आहेती पन्नास पूर्ण ॥ एकचित्तें परियेसा ॥ ५६ ॥ जुष्टो नाम पन्न ऐक ॥ त्यासी अनुवाक अष्टादशक ॥ वैशंपायन एक निष्ठक ॥ गुरुमुखें ऐकतसे ॥५७॥ पन्न प्राणोरक्षिती ॥ अष्ट अनुवाक त्यासी ख्याती ॥ पंच अधिक चत्वारिंशती ॥ दशक तुह्मी ओळखिजे ॥५८॥ स्वादिष्वा नामें षष्ठम ॥ पन्न असे उत्तम ॥ अनुवाक असती वीस खूण॥ षट् अधिक अशीति दशक त्यासी ॥ ५९ ॥ सप्तम प्रश्न त्रिवृतास ॥ अनुवाक असती अष्टादश ॥ सहा अधिक षष्ठीस ॥ दशक त्यासी मनोहर ॥ ६० ॥ अष्टम पन्न पीवोना ॥ अनुवाक असती नऊ जाणा ॥ अशीतीशीं एक उणा ॥ दशक त्यासी मनोहर ॥ ६१ ॥ द्वितीय अष्टक ब्राह्मणासी ॥ आठ पन्न परियेसी ॥ वेद उणे शतक त्यासी ॥ अनुवाक असती मनोहर ॥ ६२ ॥ चार शतां उपरी ॥ तीन उणें सप्तति निर्धारी ॥ दशक आहेती विस्तारी ॥ एकचित्तें परियेसा ॥ ६३ ॥ तृतीयाष्टक ब्राह्मणासीं ॥ पन्न असती द्वादशी ॥

नामें त्यांचीं परियेसी ॥ एकचित्तें अवधारा ॥ ६४ ॥ प्रथम प्रश्न विख्यातु ॥ नाम अग्नि-र्नः पातु ॥ सहा अनुवाक विख्यातु ॥ एक अधिक षष्ठि दशक ॥६५॥ तृतीयस्या द्वितीय पन्न ॥ अनुवाक असती दहा जाण ॥ पंचाशीतिक दशक खूण ॥ एकचित्तें परियेसा ॥६६॥ तिसरा पन्न प्रत्युष्ठ ॥ अनुवाक असती एकादश ॥ एक उणें ऐंशी दशक ॥ एकचित्तें अवधारा ॥ ६७ ॥ चौथा पन्न ब्राह्मणेसीं ॥ अनुवाक एक परियेसी ॥ एका उणें विसांसी ॥ दशक त्यासी मनोहर ॥ ६८ ॥ पंचम पन्न नाम सत्य ॥ चतुर्दश अनुवाक विख्यात ॥ एक उणे तीस दशक ॥ एकचित्तें परियेसा ॥ ६९ ॥ सहावा प्रश्न अंजंती ॥ पंचदश अनुवाक ख्याती ॥ सात अधिक विंशती ॥ दशक त्यासी जाणावे ॥ ७०॥ अछिद्र सर्वान्वानाम पन्न ॥ चतुर्दश अनुवाक जाण ॥ तीस अधिक शत खूण ॥ दशक त्यासी मनोहर ॥ ७१ ॥ पन्न अश्वमेधासी ॥ सांग्रहण्य ख्यातीसी ॥ अनुवाक असती त्रयोदशी ॥ एक्याण्णव दशक ॥ ७२ ॥ प्रजापतीरकाम ॥ अश्वमेध उत्तम ॥ त्रयोविंशती अनुवाक नेम ॥ चारी अधिक अशीति दशक त्यासी ॥ ७३ ॥ संज्ञान ह्मणती काठक ॥ अनुवाक दहाशीं एक अधिक ॥ एका उणे पन्नास दशक ॥ एकचित्तें परियेसा ॥ ७४ ॥ दुसरा लोकोसिकाठक ॥ दश अनुवाक असती ऐक ॥ तयामध्यें दोनी अधिक षष्ठी दशक ॥ व्यास ह्मणे शिष्यासी ॥ ७५ ॥ द्वादश पन्न तुह्मासी ॥ अनुवाक नव परि-येसी ॥ सहा अधिक पन्नासासी ॥ दशक त्यासी मनोहर ॥ ७६ ॥ तिसरे अष्टक ब्राह्म-णासी ॥ सप्तचत्वारिंशत् एक शत अनुवाकासी ॥ सात शतद्वयाशीति दशकासीं ॥ विस्तार असे परियेसा ॥ ७७ ॥ तीनि अष्टक ब्राह्मणासीं ॥ पन्न सांगेन परियेसी ॥ अष्ट

शु. च.

अधिक विसांसी ॥ एकचित्तें अवधारा ॥ ७८ ॥ त्रीणी शत विसांसी ॥ एक अधिक परि-
येसी ॥ अनुवाक आहेती विस्तारेंसी ॥ परत ब्राह्मणासी परियेसा ॥ ७९ ॥ दशकसंख्या
विस्तार ॥ सप्तशत अधिक सहस्र ॥ अष्टचत्वारिंशती उत्तर ॥ अधिक असती परिये-
सा ॥ ८० ॥ आतां सांगेन अरण ॥ त्यासी असती दहा पन्न ॥ विस्तारोनियां सांगेन ॥
एकचित्तें अवधारा ॥ ८१ ॥ अरणाचा भद्रनाम प्रथम पन्न ॥ द्वात्रिंशत् अनुवाक असे
खूण ॥ एक शतक तीस जाण ॥ दशक त्यासी मनोहर ॥ ८२ ॥ स्वाध्या ब्राह्मणासी ॥
अनुवाक वीस परियेसी ॥ चतुर्विंशति दशक त्यासी ॥ एकचित्तें परियेसा ॥८३॥ चित्ती
ह्मणिजे पन्नासी ॥ अनुवाक जाण एकविंशतीसी ॥ तीन अधिक पन्नासासी ॥ दशक
त्यांसी विस्तार ॥ ८४ ॥ ऐसा थोर चवथा पन्न ॥ नाम तया मंत्रब्राह्मण ॥ द्विचत्वारिंशत्
अनुवाक जाण ॥ द्विषष्टी दशक त्यासी ॥ ८५ ॥ श्रेष्ठ ब्राह्मण पन्नासी ॥ अनुवाक जाणा
द्वादशी ॥ आठ अधिक शतासी ॥ शतक तुह्मी जाणावें ॥ ८६ ॥ पित्रमेध असे पन्न ॥द्वा-
दश अनुवाक परिपूर्ण ॥ सप्तविंशती दशक जाण ॥ एकचित्तें परियेसा ॥ ८७ ॥ शिक्षा
नाम पन्नासी ॥ अनुवाक असती द्वादशी ॥ तीन अधिक विसांसी ॥ दशक त्यांसी मनो-
हर ॥ ८८ ॥ ब्रह्मविद्या असे पन्न ॥ अनुवाक त्यासी नऊ जाण ॥ दशक चतुर्दश असे
खूण ॥ व्यास ह्मणे शिष्यासी॥८९॥भृगुर्वै असे पन्न ॥ अनुवाक त्यासी दहा जाण ॥ पंच-
दशदशक जाण ॥ एकचित्तें परियेसा ॥ ९० ॥ दशम पन्न नारायण ॥ अनुवाक तीस अ-
सती खूण ॥ एकशत वेद जाण ॥ दशक त्यासी परियेसा ॥ ९१ ॥ दहा पन्न अरणासी ॥
अनुवाक जाण परियेसी ॥ दोनी पूर्ण द्विशतासी ॥ संख्या असे परियेसा ॥९२॥ पंचश-

अ. २६

ताउपरी ॥ नव पंचाशत विस्तारी ॥ दशक जाण मनोहरी ॥ ह्मणे व्यास शिष्यातें ॥ ९३ ॥
ऐसे ग्रंथत्रयासी ॥ पत्र असती व्यायसी ॥नव पष्ठी अधिक एक शतसहस्रासी ॥ अनुवाक
जाण मनोहर ॥ ९४ ॥ पन्नासीं दशक विस्तार ॥ सांगेन तुह्मां प्रकार ॥ द्वयशत दोनी
सहस्र ॥ द्वय उणे पन्नास जाणा ॥ ९५ ॥ द्वयसहस्र त्रयशत ॥ सप्त अधिक उन्नत ॥ द-
शकीं जाण विख्यात ॥ ग्रंथत्रय परिपूर्ण ॥ ९६ ॥ ऐशिया यजुर्वेदासी ॥ भेद असती शा
यशी ॥ त्यांत एक भेदासी ॥ एवढा असे विस्तार ॥ ९७ ॥ येणेंपरी व्यास मुनी ॥ वैशंपा-
यना विस्तारोनी ॥ सांगता झाला ह्मणोनी ॥ श्रीगुरु ह्मणती द्विजांसी ॥ ९८ ॥ तिसरा
शिष्य जैमिनी ॥ त्यास सांगे व्यासमुनी ॥ सामवेद विस्तारोनी ॥ निरोपितों अवधारा
॥ ९९ ॥ उपवेद गांधर्व अत्र ॥ कश्यपाचें असे गोत्र ॥ विष्णुदेवता परम पवित्र ॥ जगती
छंद ह्मणावा ॥ २०० ॥ नित्यस्रग्वी छंद जाणा ॥ शुचि वस्त्रप्रावर्णा ॥ क्षौमदंती चर्मधार-
णा ॥ दंडधारी रूप असे ॥ १ ॥ आकर्ण नयन वर्ण कांचन ॥ सूर्यासारखे किरण ॥
षड्रत्नी दीर्घ जाण ॥ सामवेद रूप असे ॥ २ ॥ याच्या भेदा नाहीं मिती ॥ अखिल सह
स्र बोलती ॥ ऐशी कोणा असे शक्ती॥ सकळांसी शिकूं ह्मणावया ॥३॥ एका नारायणा-
वांचोनि ॥ समस्त भेद नेणे कोणी ॥ एक शिष्या जैमिनी ॥ सांगेन तुज किंचित ॥ ४ ॥
प्रथम असुरायणीया ॥ दुसरें वासुरायणीया ॥ वार्तातेयावा ह्मणोनियां ॥ तिसरा भेद
परियेसा ॥ ५ ॥ प्रांजली असे भेद एक ॥ ऋग्विधाप्रातरेय एक ॥ आणि प्राचीन योग-
शाखा ॥ असे सहावा परियेसा ॥ ६ ॥ ज्ञानयोग सप्तम ॥ आरायणीया असे ज्या नाम ॥
यासी भेद दश जाण ॥ आहेत ऐका एकचित्तें ॥ ७ ॥ नारायणी संख्यायनी ॥ तिसरा

शाठधा ह्मणोनी ॥ मुद्गल नाम जाणोनी ॥ चौथा भेद परियेसा ॥ ८ ॥ खल्वला महा ख-ल्वला ॥ सप्तम नामें लांगुला ॥ अष्टभेद कौमुथा ॥ गौतमा ह्मणे परियेसा ॥ ९ ॥ दशम शाखा जैमिनी ॥ ऐसे भेद विस्तारोनी ॥ सांगितले व्यासमुनी ॥ श्रीगुरु ह्मणती द्विजांसी ॥ १० ॥ पूर्ण सांगवेदासी ॥ कोण जाणे क्षितीसीं ॥ तीन वेदी ह्मणविसी ॥ मदोन्मत्त होवोनियां ॥ ११ ॥ सूत ह्मणे शिष्यासी ॥ सांगे व्यास अतिहर्षी ॥ अथर्वण वेदासी ॥ निरोपिलें परियेसा ॥ १२ ॥ अथर्वण वेदासी ॥ उपवेद असे परियेसी ॥ मंत्रशास्त्र निश्चयेसी ॥ वैजान असे गोत्र ॥ १३ ॥ आदिदैवत इंद्र त्यासी ॥ अनुष्टुप छंदेसी ॥ तीक्ष्ण चंड क्रूरेसी ॥ कृष्णवर्ण असे जाण ॥ १४ ॥ कामरूपी क्षुद्रकर्म ॥ सदार असे त्यासी नाम॥ विस्वसृजक साध्यकर्म ॥ फलमूर्ध्नी गालवर ॥ १५ ॥ ऐसें रूप तयासीं ॥ भेद नव परियेसी ॥ सुमंतु नाम शिष्यासीं ॥ सांगतसे श्रीव्यास ॥ १६ ॥ पैपल भेद प्रथम ॥ दुसरा भेद दांतनाम ॥ प्रदांत भेद सूक्ष्म ॥ चौथा स्तोता जाण ॥ १७ ॥ औतानाम असे ऐका ॥ ब्रह्मदालव शाखा ॥ सातवी शाखा ऐका ॥ सौनळी ह्मणती ॥ १८ ॥ अष्टम शौनकदेवल शाखेसी ॥ चरणविद्या नवमेसी ॥ पांच कल्प परियेसी ॥ सांगेन ऐका एकचित्तें ॥ १९ ॥ ऐसें चौघां शिष्यांस ॥ सांगत असे वेदव्यास ॥ प्रकाश केला क्षितीस ॥ भरतखंडीं परियेसा ॥ २० ॥ या भरतखंडांत ॥ पूर्वी होतें पुण्य बहुत ॥ वर्णाश्रमधर्म आचरत ॥ होते लोक परियेसा ॥२१॥ या कलियुगाभीतरीं ॥ कर्म सांडिलें द्विजवरीं ॥ लोपले वेद निर्धारी ॥ गुप्त जाहले क्षितीसी ॥ २२ ॥ कर्मभ्रष्ट झाले द्विज ॥ म्लेंछा सांगती वेदबीज ॥ सत्व गेलें सहज ॥ मंदमती झाले जाणा ॥ २३ ॥ पूर्वी होतें महत्त्व ॥ ब्राह्मणासीं देवत्व ॥ वेदबळें नित्यत्व ॥

गु. च.

भुसुर ह्मणती त्या काजां ॥ २४ ॥ पूर्वीं राजे याच कारणीं ॥ पूजा करिती विप्रचरणीं ॥ सर्व देतां दक्षिणा दानीं ॥ ते अंगिकार न करिती ॥ २५ ॥ वेदबळें विप्रांसी ॥ त्रिमूर्ती वश होते त्यांसी ॥ इंद्रादि सुरवरांसी ॥ भय होतें विप्रांचें ॥ २६ ॥ कामधेनु कल्पतरू ॥ विप्र-वाक्यें होत थोरू ॥ पर्वत करिती तृणाकारू ॥ तृणा पर्वत वेदसत्वें ॥ २७ ॥ विष्णु आपण परियेसीं ॥ पूजा करी विप्रांसी ॥ आपुलें दैवत ह्मणे त्यांसी ॥ वेदसत्वें करूनियां ॥ २८ ॥ ॥ श्लोक ॥ देवाधीनं जगत्सर्वं मंत्राधीनंच दैवतं ॥ ते मंत्रा ब्राह्मणाधीना ब्राह्मणो मम दैवतं ॥ २९ ॥ ऐसें महत्व द्विजांसी ॥ पूर्वीं होतें परियेसी ॥ वेदमार्ग त्यजोनी सुरसी ॥ अज्ञान-मार्गें रहाटती ॥ ३० ॥ हीन यातीपुढें ऐका ॥ वेद ह्मणती मूर्ख देखा ॥ त्यांच्या पाहूं नये मुखा ॥ ब्रह्मराक्षस होताती ॥ ३१ ॥ तेणें सत्व भंगलें ॥ हीन यातींतें सेविलें ॥ अद्यापि विक्रय करिती मोलें ॥ वेद भ्रष्ट करिताती ॥ ३२ ॥ ऐशा चारी वेदांसीं ॥ शाखा असती परियेसी ॥ कोणें जाणावें क्षितिसी ॥ सकळ गौण्य होऊनि गेलें ॥ ३३ ॥ चतु-र्वेदी ह्मणविसी ॥ लोकांसवें चर्चा करिसी ॥ काय जाणसी वेदांसी ॥ अखिल भेद आ-हेत जाण ॥ ३४ ॥ ऐशामध्यें काय लाभ ॥ घेऊं नये द्विजक्षोभ ॥ कोणी केला तूतें बोध ॥ जाई ह्मणती येथून ॥३५॥ आपली आपण स्तुती करिसी ॥ जयपत्रें दाखविसी ॥ त्रिविक्रम यतीपासीं ॥ पत्र मागसी लिहूनी ॥३६॥ आमुचे बोल ऐकोनी ॥ जावें तुह्मी प-रतोनी ॥ वायां गर्वें भ्रमोनी ॥ प्राण आपुला देऊं नका ॥३७॥ ऐसें श्रीगुरु विप्रांसी ॥ सां-गती बुद्धि हितासी ॥ न ऐकती विप्र तामसी ॥ ह्मणती चर्चा करूं ॥३८॥ चर्चा जरी न करूं येथें ॥ हारी दिसेल आह्मांतें ॥ सांगती लोक राजयातें ॥ महत्व आमुचें उरे केवीं

अ. २६

पा. २१०

॥३९॥ सिद्ध ह्मणे नामांकिता ॥ ऐसे विप्र मदोन्मत्ता ॥ नेणती आपुले हिता ॥ त्यांसी मृत्यु जवळी आला ॥४०॥ गंगाधराचा नंदनू ॥ सांगे गुरुचरित्र कामधेनू ॥ वेदविवरण ऐकतां साधनू ॥ होय समाधान श्रोतजनां ॥ ४१ ॥ इति श्रीगुरुचरित्रामृत ॥ चारी वेदांचा मथितार्थ ॥ उकलोनि दाविला यथार्थ ॥ ह्मणे सरस्वती गंगाधर ॥ ४२ ॥ इति श्रीनृसिंहसरस्वत्युपाख्याने सिद्धनामधारकसंवादे वेदविवरणभेदनिरूपणं नाम षड्विंशोऽध्यायः ॥ ओंव्या २४२ ॥

॥ श्रीगणेशाय नमः ॥ नामधारक शिष्यराणा ॥ लागे सिद्धाचिया चरणा ॥ विनवीतसे वचना ॥ ऐका श्रोते एकचित्तें ॥१॥ जयजयाजी सिद्धयोगी ॥ तूं तारक आह्मां जगीं ॥ ज्ञानप्रकाश करणेंलागीं ॥ दिलें दर्शन चरणांचें ॥२॥ चतुर्वेद विस्तारेंसी ॥ श्रीगुरु निरोपिती विप्रांसी ॥ पुढें कथा वर्तली कैसी ॥ विस्तारावी दातारा ॥ ३ ॥ शिष्यवचन ऐकोनी ॥ सांगता झाला विप्रमुनी ॥ ऐक शिष्या नामकरणी ॥ अनुपम गुणमहिमा ॥४॥ किती प्रकारें विप्रांसी ॥ श्रीगुरु सांगती हितासी ॥ न ऐकती द्विज तामसी ॥ ह्मणती वाद कीं पत्र देणें ॥५॥ ऐसें उत्तर ऐकोनि कानीं ॥ कोप करिती श्रीगुरुमुनी ॥ ज्याचे जैसें अंतःर्णी ॥ तैसें सिद्धी पावबूं ह्मणती ॥ ६ ॥ सर्पाचे पेटाऱ्यासी ॥ कोरूं जातां मूषकासी ॥ जैसा पतंग दीपासी ॥ करी आपुला घात ॥७॥ तैसे विप्र मंदमती ॥ श्रीगुरुमूर्ती नोळखती ॥ बळें आपुले प्राण देती ॥ दिवांधवत् द्विज देखा ॥ ८ ॥ इतुकें वर्ततां ते अवसरीं ॥ श्रीगुरु देखती नरासी दूरी ॥ शिष्यासि ह्मणती पाचारीं ॥ कवण जातो मार्गस्थ ॥ ९ ॥ श्रीगुरुवचन ऐकोनी ॥ गेले सेवक धांवोनी ॥ त्या नरातें पाचारोनी ॥ आणिला गुरुसंमुख ॥१०॥ गुरू पुसती त्यासी ॥ जन्म कवण जातीसी ॥ तो वृत्तांत सांग मजसी ॥ ह्मणोनि पुसती तयेवेळीं ॥११॥ श्रीगुरुवचन ऐकोन ॥ सांगे आपण जातिहीन ॥ मातंग वर्ण जाण ॥ सांगे स्थान बहिर्ग्रामीं ॥ १२ ॥ तूं कृपाळू गुरुमूर्ती ॥ ह्मणोनि पाचारिलें प्रीति ॥ आपण झालों उद्धारगती ॥ ह्मणोनि दंडवत नमन करी ॥ १३ ॥ ऐसे कृपाळू परमपुरुष ॥ दृष्टीनें केलें सुधारस ॥ लोखंडासी लागला परीस ॥ सुवर्ण होतां काय वेळ ॥१४॥ तैसे तया पतितावरी ॥ कृपा करिती नरहरी ॥ दंड देवोनि शिष्याकरीं ॥ रेषा सप्त काढिल्या

॥१५॥ श्रीगुरु म्हणती त्यासी ॥ एक रेषा लंघीरे ऐसी ॥ आला नर वाक्यासरसी ॥ झालें ज्ञान अधिक त्यातें ॥ १६ ॥ श्रीगुरु ह्मणती तयासी ॥ कवणे कुळीं जन्मलासी ॥ पतित ह्मणे किरातवंशीं ॥ नाम आपुलें वनराखा ॥१७॥ दुसरी रेषा लंघितां ॥ त्यासी ज्ञान झालें तत्वतां ॥ बोलूं लागला अनेक वार्ता ॥ विस्मय करिती तयेवेळीं ॥ १८ ॥ तिसरी रेषा लंघीरे म्हणती ॥ त्यासि झाली ज्ञातिस्मृती ॥ ह्मणे गंगापुत्र निश्चितीं ॥ वास तटीं गंगेच्या ॥१९॥ लंघितां रेषा चवथी ॥ ह्मणे आपण शूद्रजाती ॥ जात होतों आपुले वृत्ती ॥ स्वामी मातें पाचारिलें ॥२०॥ लंघितां रेषा पांचवेसी ॥ झालें ज्ञान तयासी ॥ जन्म झाला वैश्य वंशीं ॥ नाम आपुलें सोमदत्त ॥२१॥ सहावी रेषा लंघितां ॥ म्हणे आपण क्षत्रिय ख्याता ॥ नाम आपुलें विख्याता ॥ गोदावरी ह्मणोनी ॥२२॥ सातवी रेषा लंघितां क्षण ॥ अग्रजातों विप्र आपण ॥ वेदशास्त्रादि व्याकरण ॥ अध्यापक नाम आपुलें ॥ २३ ॥ श्रीगुरु म्हणती तयासी ॥ वेदशास्त्रीं अभ्यास ह्मणसी ॥ आले विप्र चर्चेसी ॥ वाद करी त्यांसवें ॥ २४ ॥ अभिमंत्रोनि विभूती ॥ त्याचे सर्वांगीं प्रोक्षिती ॥ प्रकाशली ज्ञानज्योती ॥ त्या नरासी परियेसा ॥२५॥ जैसे मानससरोवरास ॥ वायस जातां होती हंस ॥ तैसा गुरुहस्तस्पर्श ॥ पतित झाला ज्ञानराशी॥२६॥नरसिंह सरस्वती जगद्गुरू ॥ त्रयमूर्तीचा अवतारू ॥ अज्ञानी लोक ह्मणती नरू ॥ तेचि जाती अधःपाता ॥२७॥ येणेंपरी पतितासी ॥ ज्ञान झालें परियेसी ॥ वेदशास्त्र सांगेसी ॥ म्हणो लागला तयेवेळीं ॥२८॥ जे आले चर्चेस विप्र ॥ भयभीत झाले फार ॥ जिव्हा तुटोनि झाले बधिर ॥ हृदयशूळ तात्काळ ॥२९॥ विप्र थरथरां कापती ॥ श्रीगुरुचरणीं लोळती ॥ आमुची आतां काय गती ॥ जगज्जोती स्वामिया

॥३०॥ श्रीगुरुद्रोही झालों जाण ॥ धिःकारिले ब्राह्मण ॥ तूं अवतार गौरीरमण ॥ क्षमा करणें स्वामिया ॥३१॥ वेष्टोनियां मायापाशीं ॥ झालों महातामसी ॥ निरवावें कृपेसी ॥ क्षमा करणें स्वामियां ॥३२॥ तूं कृपाळू सर्वांभूतीं ॥ आमुचे दोष नाणीं चित्तीं ॥ आह्मां द्यावी उद्धारगती ॥ म्हणोनि चरणीं लागती ॥३३॥ एकादे समयीं लीलेसी ॥ पर्वत करिसी तृणासरसी ॥ पर्वत पहातां कोपेंसी ॥ भस्म करिसी निर्धार हा ॥ ३४ ॥ तूंचि सृष्टि स्थापिसी ॥ तूंचि सर्वांचें पोषण करिसी ॥ तूंचि कर्ता प्रळयासी ॥ त्रिमूर्ती जगद्गुरू ॥ ३५ ॥ तव महिमा वर्णावयासी ॥ मती नाहीं आह्मांसी ॥ उद्धरावें दीनासी ॥ शरणागता वरप्रदान ॥३६॥ ऐसें विप्र विनविती ॥ श्रीगुरु त्यांसी निरोप देती ॥ तुह्मीं क्षोभविला भारती ॥ त्रिविक्रम महामुनी ॥३७॥ आणीक केले बहुत दोष ॥ निंदिलें सर्व विप्रांस ॥ पावाल जन्म राक्षस ॥ आपली जोडी भोगावी ॥३८॥ आपुलें अर्जित आपणाशीं ॥ भोगिजे पुण्यपापासी ॥ निष्कृति न होतां क्रियमाणासी ॥ गती नाहीं परियेसा ॥ ३९ ॥ श्रीगुरुवचनें ऐकोनी ॥ लागती विप्र दोघे चरणीं ॥ केवीं उद्धरों भवार्णवीं ॥ ह्मणोनियां विनविती॥४०॥ श्रीगुरुनाथ कृपामूर्ती ॥ त्या विप्रातें निरोप देती ॥ ब्रह्मराक्षस होवोनि ख्याती ॥ कर्म भोगा द्वादशाब्द ॥४१॥ अनुतप्त झालिया कारण ॥ शांतिरूप असाल जाण॥ जो का शुक नारायण ॥ प्रथम वाक्य ह्मणतसे ॥४२॥ तुमचें पाप शुद्ध होतां ॥ द्विज येईल अवचिता ॥ पुढील वाक्य तुह्मां सांगतां ॥ उद्धारगती होईल ॥४३॥ आतां जावें गंगेसी ॥ स्थान बरवें बैसावयासी ॥ ह्मणोनि निरोपिती त्यांसी ॥ गेले विप्र त्या वेळीं ॥ ४४ ॥ निघतां ग्रामाबाहेरी ॥ हृदयशूळ अपरंपारी ॥ जातां क्षण न लागतां नदीतीरीं ॥ विप्र पंचत्व पावले॥४५॥

आपण केल्या कर्मासी ॥ यत्न नाहीं आणिकासी ॥ ऐसे विप्र तामसी ॥ आत्मघातकी
तेचि जाणा ॥४६ श्रीगुरुवचन येणेंपरी ॥ अन्यथा नव्हे निर्धारी ॥ झाले राक्षस द्विजवरी॥
बारा वर्षीं गति पावले ॥४७॥ विप्र पाठविले गंगेसी ॥ मागें कथा वर्तली कैसी ॥ नामधा-
रक शिष्यासी ॥ सिद्ध सांगे अवधारा ॥४८ ॥ पतित झाला महाज्ञानी ॥ जातिस्मरण स-
मजन्मीं ॥ पूर्वापार विप्र ह्मणोनी ॥ निर्धार केला मनांत ॥४९॥ नमन करूनी श्रीगुरूसी ॥
विनवी पतित भक्तीसी ॥ अज्ञानमाया तिमिरासी ॥ ज्योतिःरूप जगद्गुरू ॥५०॥ विप्र होतों
पूर्वीं आपण ॥ केवीं झालों जातिहीन ॥ सांगावें जी विस्तारोन ॥ त्रिकाळज्ञान अंतरसा-
क्षी ॥५१॥ जन्मांतरींचे अशेष ॥ काय केले असती महादोष ॥ कीं द्वेषिला आपण महे-
श ॥ नृसिंहसरस्वती सांगणें ॥५२॥ ऐसें वचन ऐकोनी ॥ सांगती गुरू प्रकाशूनी ॥ ह्मणो-
सांगती सिद्धमुनी ॥ नामधारक शिष्यासी ॥५३॥ ह्मणोनि सरस्वती गंगाधर ॥ सांगे गु-
रुचरित्र विस्तार ॥ पुढील कथा ऐकतां नर ॥ पतित होय ब्रह्मज्ञानी ॥५४॥ ऐसी पुण्यपा-
वन कथा ॥ ऐकतां उद्धार अनाथा ॥ पावे चतुर्विध पुरुषार्था ॥ निश्चयेंसी जाणणें॥५५॥
इति श्रीगुरुचरित्रपरमकथाकल्पतरौ सिद्ध० सप्तविंशोऽध्यायः ॥ ओंव्या ५५ ॥

॥ श्रीगणेशाय नमः ॥ नामधारक ह्मणे सिद्धासी ॥ पुढील कथा सांगा आह्मांसी ॥ उल्हास माझे मानसीं ॥ गुरुचरित्र अति गोड ॥ १ ॥ सिद्ध ह्मणे नामधारका ॥ कथा असे अलौकिका ॥ दोष जातील देखा ॥ ज्ञानज्योतिप्रकाशें ॥ २ ॥ श्रीगुरु ह्मणती पतितासी ॥ आपुलें पूर्वजन्म पुससी ॥ सांगेन ऐक परियेसी ॥ चांडाळ जन्म होणार गती ॥ ३ ॥ पुण्यपापाची गती ॥ आपुलें अर्जित भोगिती ॥ कर्मविपाकीं असे ख्याती ॥ नीच श्रेष्ठ कर्मानुसारी ॥ ४ ॥ विप्र क्षत्रिय वैश्य शूद्रवर्ण ॥ यांचेपासोनि चांडाळ वर्ण ॥ उपजला असतां ज्ञातिहीन ॥ जातीविभाग कर्मापरी ॥ ५ ॥ विप्रस्त्रियेपासीं ऐका ॥ शूद्र जाय व्यभिचारिका ॥ पिंड उपजे तो चांडाळिका ॥ सोळावी जाती चांडाळ ॥ ६ ॥ हें मूळ उत्पत्तीचें लक्षण ॥ नाना दोषांचें आचरण ॥ तेणें हीन जन्म घेणें ॥ विप्रादि चारि वर्णांसी ॥ ७ ॥ त्या दोषांचा विस्तार ॥ सांगतों कीं सविस्तर ॥ विप्र करितां अनाचार ॥ जन्म हीनजातीं पावे ॥ ८ ॥ गुरु अथवा मातापिता ॥ सांडोनि जाय तत्वता ॥ चांडाळ जन्म होय निरुता ॥ सोडितां कुलस्त्रियेसी ॥ ९ ॥ कुलदेवता सोडोनि निका ॥ पूजा करी आणिका ॥ तो चांडाळ देखा ॥ सदां अनृत वदतां ॥ १० ॥ सदां जीव हिंसा करी ॥ कन्याविक्रय मनोहरी ॥ लटिकें आपण प्रमाण करी ॥ चांडाळ तोही जाणावा ॥ ११ ॥ शूद्रहस्तें करी भोजन ॥ अश्वविक्रय करी ब्राह्मण ॥ तोचि चांडाळ होय जाण ॥ सदा शूद्रसंपर्कें ॥ १२ ॥ शूद्रस्त्रियेचा करी संग ॥ नित्य असतां दासभोग ॥ गृहभांडीं विकूनि त्याग ॥ वेद पितृकर्मत्यागी ॥ १३ ॥ तो पावे हीन जाती ॥ कोणी अग्नी रानीं घालिती ॥ गाय वासरासी बिघड करिती ॥ वेगळीं करिती

स्वअंगें ॥ १४ ॥ सोडी आपुल्या जननीतें ॥ आणि पिता लेंकरातें ॥ वेगळीं करिती आपुल्या हस्तें ॥ तोही जन्मे चांडाळ ॥ १५ ॥ बैलावरी विप्र बैसे ॥ शूद्रान्न जेवी हर्षें ॥ चांडाळ होय भरंवसे ॥ ऐसें ह्मणती श्रीगुरू ॥ १६ ॥ विप्र तीर्थास जावोन ॥ श्राद्ध तो न करीच जाण ॥ परान्न प्रतिग्रह दारुण ॥ करी तो होय चांडाळ ॥ १७ ॥ षट्कर्मेंरहित विप्र देखा ॥ कपिला गाईचें दूध ऐका ॥ न करितां अभिषेका ॥ क्षीरपान जो करी ॥ १८ ॥ तोही पावे चांडाळयोनी ॥ तुळसीपत्रें वर्जूनि ॥ पूजा करी देवालागोनी ॥ शालग्राम शूद्रें भजलिया ॥ १९ ॥ न सेवीत मातापिता ॥ त्यजी त्यांसी न प्रतिपाळितां ॥ चांडाळ होवोनी जन्मतां ॥ सप्तजन्मीं कृमि होय ॥ २० ॥ पहिली एक स्त्री असतां ॥ दुजी करोनी तीसी त्यजितां ॥ होय जन्म त्यासी पतिता ॥ आणीक सांगेन एक नवल ॥ २१ ॥ श्रमोनी अतिथी आला असतां ॥ वेद ह्मणवोनी अन्न घालितां ॥ जन्म पावे तत्वतां ॥ चांडाळयोनी परियेसा ॥ २२ ॥ योग्य विप्रासी निंदिती ॥ आणीक जाती पूजिती ॥ चांडाळयोनीं जाती ॥ वृत्तिलोप केलिया ॥ २३ ॥ तळीं विहीरी फोडी मोडी ॥ शिवालयीं पूजा तोडी ॥ ब्राह्मणांचीं घरें मोडी ॥ तोही जन्मे पतितकुळीं ॥ २४ ॥ स्वामी गुरू स्त्रियेसी ॥ जो करी व्यभिचारासी ॥ घात करी विश्वासलियासी ॥ तोही जन्मे पतितागर्ही ॥ २५ ॥ दोघी स्त्रिया जयासी ॥ त्यांत ठेवी प्रपंचेसी ॥ अतिथी आलिया अस्तमानासी ॥ ग्रास नेदी तो पतित ॥ २६ ॥ संध्यासमयीं देखा ॥ जो विप्र जेवी अविवेका ॥ भाक देऊनि फिरे निका ॥ तो जन्मे पतित ॥ २७ ॥ राजे देती भूमिदान ॥ आपण घेती हिरोन ॥ संध्याकाळीं करी शयन ॥ तोही होय पतित ॥ २८ ॥ वैश्वदेवकाळीं अतिथीसी ॥ जो करी दुष्टोत्तरेसी ॥

गु. च

अन्न न देतां त्यासी ॥ जन्म दुष्ट तो पावे ॥ २९ ॥ गंगातीर्थाची निंदा करी ॥ एकादशीस भोजन करी॥ स्वामीस सोडी समरीं ॥ चांडाळयोनीं तया जन्म ॥ ३० ॥ स्त्री संभोगी पर्वणीसी ॥ अथवा श्रीहरि दिवसीं ॥ वेद शिकवी शूद्रासी ॥ चांडाळयोनीं जन्म पावे ॥ ३१ ॥ मृत्युदिवसीं न करी श्राद्ध ॥ केलें पुण्य करी प्रसिद्ध ॥ वांटेकरासी करी भेद ॥ चांडाळयोनीं जन्म पावे ॥ ३२ ॥ ग्रीष्मकाळीं उन्हाळयांत ॥ पोई घाली अरण्यांत ॥ तेथें विघ्न जो करीत ॥ तो जन्मे चांडाळयोनीं ॥ ३३ ॥ नाडी न कळतां वैद्यकी ॥ जाणोनि औषधी आणिकीं ॥ देतां होय महापातकी ॥ चांडाळयोनींत संभवे ॥ ३४ ॥ जारण-मारण मोहनादि ॥ मंत्र जपती कुबुद्धी ॥ जन्म चांडाळ होय त्रिशुद्धी ॥ वेदमार्ग त्यजितां विप्र ॥ ३५ ॥ श्रीगुरूसी नर ह्मणे कोण ॥ हरिहरातें निंदितां जाण ॥ अन्य देवतांचें करी पूजन ॥ तो नर पतित होय ॥ ३६ ॥ ब्राह्मण क्षत्रिय वैश्य शूद्र ॥ आपुलें कर्म त्यजूनि वक्र ॥ आणीक कर्म आचरी दरिद्र ॥ तोही होय चांडाळ ॥ ३७ ॥ शूद्रापासूनी मंत्र शिके ॥ त्यासी घडती सर्व पातकें ॥ गंगोदक क्षीरोदकें ॥ श्वानचर्मीं घातले परी ॥ ३८ ॥ विधवा स्त्रीशीं संग करी ॥ शिव्या देऊनी अतिथी जेऊं घाली ॥ श्राद्धदिनीं पिंड न घाली ॥ चांडाळयोनीं तो जन्मे ॥ ३९ ॥ मातापिता गुरुद्वेषी ॥ तो जन्मे चांडाळयोनीसी ॥ आणीक जन्म पावे वेश्योदरासी ॥ उपजे हीन परियेसा ॥४०॥ गुरूची निंदा करी हर्षीं ॥ करी विप्र द्वेषासी ॥ वेद चर्चा गर्वेसी ॥ तो होय ब्रह्मराक्षस ॥ ४१ ॥ भजन करी गुरुदेवता ॥ दुजे देवें निंदितां ॥ होय अपस्मारी तत्वतां ॥ दरिद्ररूपें पीडा भोगी ॥ ४२ ॥ माता पिता गुरु वर्जणें ॥ वेगळा होय घेऊन स्त्री आपण ॥ बेरडाचे पोटीं उप-

जोन ॥ रोगी होऊन राहतसे ॥ ४३॥ सदां वेदद्वेषी आपण ॥ अवमानीत ब्राह्मण ॥ कर्मभ्रष्ट होय आपण ॥ मूत्र कृच्छ्र रोगी होय ॥ ४४ ॥ लोकांचें वर्म काढी आपण ॥ सदां करी उपमर्दन ॥ हृदयरोगी होय जाण ॥ महाकष्ट भोगीतसे ॥४५॥ गर्भपात करी स्त्रियेसीं ॥ वांझ होवोनि उपजे परियेसी ॥ पुत्र झालिया मरती त्वरेसी ॥ गर्भपात करूं नये ॥ ४६ ॥ धर्मशास्त्रादि पुराण ॥ सांगतां नायके जाण ॥ अधिक जेवितां द्वेषी आपण ॥ बहिरा होवोन उपजे ॥ ४७ ॥ पतितासी करी तंटा ॥ गर्दभ जन्मे तत्वता ॥ यवनापाशीं औषध घेतां ॥ मृगयोनीं जन्मे तो ॥ ४८ ॥ ब्रह्महत्या केल्या जरी ॥ क्षयरोगी निर्धारी ॥ सुरापानी ओळखा परी ॥ श्यामदंत उपजेल ॥ ४९ ॥ सुवर्ण चोरी केल्यासी ॥ विरूपी तो निश्चयेसी ॥ दृष्टी करी गुरुस्त्रीशीं ॥ कुष्टी होय तो नर ॥ ५० ॥ अश्ववध गोवध करितां ॥ वांझ होईल निश्चिता ॥ सर्वेंच पावेल अनुतप्तता ॥ दोष कांहीं नाहीं त्यासी ॥ ५१॥ विश्वासघातकी परियेसी ॥ जन्म होय ऐसा त्यासी ॥ अन्न न देतां आणिकांसी ॥ पडे तयासी अरुचि ॥ ५२ ॥ सेवक एकाचा चाळवोन ॥ घेवोनि जाती जे जन ॥ त्यांसी होय जाण बंधन ॥ कारागृह भोगितसे ॥ ५३ ॥ सर्प मारितो जो नर ॥ तो सर्प होवोन पडे निर्धार ॥ ऐसे दोष अपार ॥ आतां चोरी सांगेन ॥ ५४ ॥ स्त्रियांतें चोरून जाय ॥ मतिहीन जन्म होय ॥ सदां क्लेशी आपण होय ॥ अंतीं जाय नरकासी ॥ ५५ ॥ सुवर्ण चोरी नर ॥ परम व्याधिष्ट निर्धार ॥ पुस्तक चोरितां निर्धार ॥ नेत्र जातील तयाचे ॥ ५६ ॥ वस्त्रचोरी करी जरी ॥ रोगी होय निर्धारी ॥ गण द्रव्य चोरी करी ॥ गंडमाळा होती तया ॥ ५७ ॥ श्वासोश्वासी असे नर ॥ त्याची वस्तु आणी चोर ॥ सदां

सेवी बंधनचर ॥ ब्रह्मांडपुराणीं लिहिलें असे ॥ ५८ ॥ परद्रव्य अपहार देखा ॥ परदत्ता-
पहार विशेषा ॥ परद्वेषी नर ऐका ॥ अपुत्री होवोनी उपजे ॥ ५९ ॥ अन्नचोरी केलिया
देखा ॥ गुल्मव्याधी होय ऐका ॥ धान्य नेईल तस्करिका ॥ दुर्गंधी रक्तशरीर ॥ ६० ॥
करी एकादा तैलचोरी ॥ तो दुर्गंधी पावे शरीरीं ॥ परस्त्री ब्रह्मस्व अपहारी ॥ ब्रह्म-
राक्षस जन्म पावे ॥ ६१ ॥ मोतीं माणिक रत्नें देखा ॥ चोरी करी नर ऐका ॥ हीन
जातीशीं जन्म निका ॥ पावे नर अवधारा ॥ ६२ ॥ पत्र शाखादि फळें चोरी ॥ खरूज
होय अपरंपारी ॥ रक्तपानीं निर्धारी ॥ गोचीड होय तो नर ॥ ६३ ॥ कांस्य लोह कापू-
स लवण ॥ तस्करितां नरा जाण ॥ श्वेतकुष्ट होय पूर्ण ॥ विचारावें धर्मशास्त्रीं ॥ ६४ ॥
देवद्रव्यापहारी देखा ॥ देवकार्या नाशी अभक्षभक्षिका ॥ पंडुरोगी तो निका ॥ फळ
चोरी विरूपापरी ॥ ६५ ॥ निक्षेप चोरी करी देखा ॥ करितां होय सदा शोका ॥
धनतस्कर उष्ट्र ऐका ॥ जन्म पावे तो अवधारा ॥ ६६ ॥ फळचोर होय वनचर ॥
जळचोर होय लांडगा थोर ॥ गृहोपकरणें तस्कर ॥ काकजन्म तो पावे ॥ ६७ ॥ मधु-
तस्कर अवधारीं ॥ जन्म पावे तो घारी ॥ रंगरस करी चोरी ॥ कुष्टी होय परियेसा
॥ ६८ ॥ गुरु ह्मणती पतितासी ॥ जन्म पावे ऐसा या दोषी ॥ आतां सांगेन व्यभिचारा-
सी ॥ शांतिपर्वीं बोलिलें ॥ ६९ ॥ परस्त्री आलिंगिलिया देखा ॥ शतजन्म श्वान निका ॥
पुढें सर्पजन्म निःशंका ॥ पापें भोगी अवधारा ॥ ७० ॥ परस्त्रीयोनी पाहे दृष्टीनें ॥
जन्मे तो अंधत्वपणें ॥ बंधुभार्यासंपर्क करणें ॥ गर्दभजन्म तो पावे ॥ ७१ ॥ तोही
जन्म सोडोनी ॥ निघोन जाय सर्पयोनीं ॥ पुनः नरका जावोनी ॥ नानाकष्ट भोगि-

तसे ॥ ७२ ॥ मित्रभार्यासवें ऐका ॥ मातुळस्त्री असे विशेषा ॥ येकादा करी संपर्का ॥ श्वानयोनीं जन्म पावे ॥ ७३ ॥ परस्त्रियांचें वदन ॥ न करावें कदा अवलोकन ॥ कुबुद्धि करितां निरीक्षण ॥ चक्षुरोगी इहजन्मीं ॥ ७४ ॥ आपण असे शूद्र जाती ॥ विप्रस्त्री संभोगी रतीं ॥ तीं दोघेंहीं कृमी होती ॥ विष्टेमाजी अवधारा ॥ ७५ ॥ सदां शूद्रसंपर्क करी ॥ तेचि स्त्री व्यभिचारी ॥ जन्म पावेल होय कुतरी ॥ महादोष बोलिला असे ॥ ७६ ॥ ऐसें तया पतिताप्रति ॥ श्रीगुरु आपण निरोपिती ॥ ऐकत होता त्रिविक्रम-भारती ॥ प्रश्न करी श्रीगुरूसी ॥ ७७ ॥ स्वामी निरोपिलें धर्म सकळ ॥ ऐकतां होय मन निर्मळ ॥ जरी घडलें एक वेळ ॥ पाप जाय कवणेपरी ॥७८॥ श्रीगुरु ह्मणती त्रिवि-क्रमासी ॥ प्रायश्चित्त असे पापासी ॥ पश्चात्ताप होय ज्यासी ॥ पाप नाहीं सर्वथा ॥७९॥ पाप असे थोर केलें ॥ अंतःकरणीं असे खोंचलें ॥ त्यासी प्रायश्चित्त भलें ॥ कर्मवि-पाकीं बोलिले ॥ ८० ॥ प्रायश्चित्ताचीं विधानें ॥ सांगेन ऐका स्थीरमनें ॥ अनेक ऋषींचीं वचनें ॥ तीं सांगेन ऐका तुह्मी ॥ ८१ ॥ प्रथम द्यावा ब्रह्मदंड ॥ ह्मणजे होय पापखंड ॥ गोदानें सालंकृत अखंड ॥ अशक्त तरी द्रव्य द्यावें ॥ ८२ ॥ निष्क अथवा अर्धनिष्क ॥ सूक्ष्म पापा पावनिष्क ॥ सूक्ष्म स्थूळ पापशुद्धिक ॥ तेणें विधी द्रव्य द्यावें ॥ ८३ ॥ अ-ज्ञानकृत पापासी ॥ पश्चात्तापें शुद्धि परियेसी ॥ गुरुसेवा तत्परेसी ॥ केलिया गुरु नि-वारी ॥ ८४ ॥ नेणतां पाप केलियासी ॥ प्रायश्चित्त परियेसी ॥ प्राणायाम द्विशतेंसी ॥ पुण्यतीर्थी दहा स्नानें ॥ ८५ ॥ तीन गुंजा सुवर्ण द्यावें ॥ नदीतीर दोन गांवें ॥ सौम्य पा-तक यापरि भावें ॥ जाती पापें परियेसी ॥ ८६ ॥ स्त्रीपुरुष दोघांत ॥ एक पाप करितां

निश्चित ॥ दोघेही पडती दोषांत ॥ दोघांनीं प्रायश्चित्त आचरावें ॥ ८७ ॥ आणीक एक
असे प्रकार ॥ जेणें पाप होय दूर ॥ गायत्री जप दहा सहस्र ॥ करावा तेणें वेदमंत्रें ॥८८॥
याचें नांव गायत्रीकृच्छ्र ॥ महादोषी करी पवित्र ॥ सकळ कामना सिद्धी होत ॥ श्रीगुरु
सांगती त्रिविक्रमासी ॥ ८९ ॥ प्राजापत्य कृच्छ्र देखा ॥ ऐसे असती विशेषा ॥ भोजन
करावें भुक्त एका ॥ अथवा अयाचित भिक्षा ॥ ९० ॥ उपवास तीन दिवस ॥ स्मरावें
गुरुचरणास ॥ येणें जाती सौम्य दोष ॥ जे आपणा सामान्य ॥ ९१ ॥ अतिकृच्छ्र असे
एक ॥ एकचित्तें मुनी ऐक ॥ दोष असती सामान्यक ॥ अज्ञानेंसी केलिया ॥ ९२ ॥
अन्न द्यावें ग्रास सप्तविंशती ॥ बारा रात्रीं निश्चिती ॥ दोनी ग्रास तयाप्रती ॥ अयाचित
अन्न द्यावें ॥ ९३ ॥ ऐसे सौम्य पातकांसी ॥ जे विधी असती परियेसी ॥ ग्रास एक ने-
मेंसी ॥ अंजुळी एक जेवावें ॥९४॥ उपवास तीन करावे देखा ॥ प्रकार सांगेन आणिका॥
तीन दीन उपोषका ॥ घृतपारणें करावें ॥ ९५ ॥ तीन दिवस घृत घेवोनी ॥ क्षीर द्यावें
दिवस तीनी ॥ तीन दिवस वायु भक्षोनी ॥ पुनः क्षीर एकवीस दिवस ॥९६॥ एकादा जो
अशक्त ॥ तयासी हेंचि व्रत ॥ तिळगूळ लाह्या पीठ ॥ उपवास करावा ॥ ९७ ॥ पर्ण-
कृच्छ्र करा ऐसा ॥ पर्णोदक द्यावें प्रति दिवसा ॥ करावे तितुके उपवासा ॥ पश्चात्तापें
प्राशन कीजे ॥९८॥ जांबुळ बिल्व अश्वत्थ ॥ कुशोदक बिंदु नित्य ॥ पान करावें सत्य ॥
पर्णकृच्छ्र परियेसा ॥ ९९॥ आणीक एक प्रकार ॥ करी चांद्रायण आचार ॥ कुक्कुटांड-
प्रमाण आहार ॥ ग्रास द्यावा क्षयवृद्धी ॥ १०० ॥ अमावास्येसी एक ग्रास ॥ पौर्णिमेसी
पंचदश ॥ कृष्णपक्षीं उतरता निःशेष ॥ दुजे दिनीं हविष्यान्न ॥१॥ आपुलें पाप प्रकटून ॥

उच्चारावें भाव धरून ॥ पश्चात्तापें जळून ॥ पाप जाय अवधारा ॥ २ ॥ आतां सांगेन तीर्थकृच्छ्र ॥ यात्रा करावी पवित्र ॥ वाराणशी श्वेतपर्वत ॥ स्नानमात्रें पापें जाती ॥ ३ ॥ वरकड तीर्थी गेलियासी ॥ गायत्रीजप सहस्रेसी ॥ पाप जाय त्वरेसी ॥ कृतघ्नादि पातकें ॥४॥ समुद्रसेतुबंधेसी ॥ जप करणें गायत्रीसी ॥ भ्रूणहत्या पाप नाशी ॥ अगस्तीच्या वचनें ॥ ५ ॥ विधिपूर्वक शुचीसी ॥ जप कोटी गायत्रीसी ॥ ब्रह्महत्या पापें नासी ॥ ऐक त्रिविक्रमा निश्चित पैं ॥ ६ ॥ लक्ष गायत्री जप केलिया ॥ सुरापान जाय लया ॥ सुवर्णचोरी केलिया ॥ सात लक्ष जपावें ॥ ७ ॥ अष्ट लक्ष जपासी ॥ सर्व पापातें नाशी ॥ आतां सांगेन परियेसी ॥ वेदाक्षरें पाप दूर ॥ ८ ॥ पवमानसूक्तें चत्वारी ॥ पठण करितां ब्रह्महत्या दूरी ॥ इंद्रमित्र निर्धारीं ॥ एक मास जपावें ॥ ९ ॥ सुरापानादि पातकें ॥ जातील येणें विशेखें ॥ पठण केलिया पातकें ॥ गुरुतल्पादिक हरती ॥ १० ॥ पवमानशन्नसूक्तें ॥ शुनःशेप नांवातें ॥ मास एक पठनातें ॥ सुवर्णचोरीपाप जाय ॥ ११ ॥ पंचमास कीं सहा मास ॥ मिताहार करूनी पुरुष ॥ पुरुषसूक्तें कर्मनाश ॥ पंचमहापापें नासती ॥ १२ ॥ त्रिमधु ह्मणिजे मंत्रसूक्तें ॥ सुपर्णत्रीणि मंत्रें ॥ समस्त पापा प्रायश्चित्तें ॥ नाचिकेता जपावें ॥ १३ ॥ नारायणपन्न देखा ॥ जपावें भक्तिपूर्वका ॥ नाशी पंचमहापातका ॥ प्रीतिपूर्वक जपावें ॥ १४ ॥ त्रिपदा नाम गायत्रीसी ॥ जपती जे भक्तीसीं ॥ तद्विष्णोअघमर्षण त्रिवारेसीं ॥ सप्तजन्मपाप जाय ॥ १५ ॥ अपामेध्यपन्नासी ॥ तद्विष्णोनाम सूक्तेसी ॥ जपती जन भक्तीसी ॥ सप्तजन्मपाप जाय ॥ १६ ॥ आणीक असे विधान देखा ॥ अज्ञानकृत दोषादिकां ॥ अनुतप्त होवोनि विशेषा ॥ पंचगव्य प्राशन

कीजे ॥ १७ ॥ गोमूत्र गोमय क्षीर ॥ दधि घृत कुशसार ॥ विधिमंत्रें द्यावें निर्धार ॥
पहिले दिनीं उपवास ॥१८॥ नीलवर्णींचें गोमुत्र ॥ कृष्ण गोमय पवित्र ॥ ताम्र गायत्रीचें
क्षीर ॥ श्वेतधेनूचें दधि द्यावें ॥ १९ ॥ कपिला गाईचें तूप बरवें ॥ ऐसें पंचगव्य बरवें
द्यावें ॥ एकेकाचें क्लृप्त भावें ॥ सांगेन सर्व अवधारा ॥ २० ॥ गोमूत्र द्यावें पावशेर ॥
अंगुष्ठपर्व गोमय पवित्र ॥ क्षीर पावणे दोन शेर ॥ दधि तीन पाव द्यावें ॥ २१ ॥ घृत
द्यावें पावशेर ॥ तितुकेंचि मिळवावें कुशनीर ॥ घेतां मंत्र उच्चार ॥ विस्तारोन सांगेन
॥२२॥ कुशासहित सहा रसें ॥ एकेकास मंत्र पृथक असे ॥ प्रथम मंत्र इरावती असे ॥इदं-
विष्णु दुजा देखा ॥ २३ ॥ मानस्तोक मंत्र तिसरा ॥ प्रजापती चतुर्थ अवधारा ॥ पंचम
गायत्री उच्चारा ॥ सहावी व्याहृतीप्रणवपूर्वका ॥ २४ ॥ ऐसें मंत्रोंनी पंचगव्य ॥ द्यावें
अनुतप्त एकभाव ॥ अस्थिगत चर्मगत पूर्व ॥ पापें जाती अवधारा ॥२५॥ गाई न मिळतां
इतुके जिन्नसीं ॥ कपिला मुख्य पर्येसी ॥ दर्शनेंच दोष जाती ॥ कपिला गाई उत्तम
॥ २६ ॥ पंच महापातक नांवें ॥ ब्रह्महत्या सुरापान जाणावें ॥ स्वर्णस्तेय गुरुतल्पक
जाणावें ॥ पांचवा त्यांसवें मिळालेला ॥२७॥ चौघे पातकी देखा ॥ पांचवा तया मिळतां
देखा ॥ त्यांसहित पंच महापातका ॥ आहेती पापें पर्येसा ॥२८॥ सुरापानी ब्रह्मघातकी ॥
सुवर्णस्तेय गुरुतल्पकी ॥ पांचवा महापातकी ॥ जो सानुकूळ मिळे तो ॥२९॥ ऐसें पातक
घडे त्यासी ॥ प्रायश्चित्त परियेसी ॥ श्रीगुरु संतोषीं ॥ अनुग्रहें पुनीत ॥ ३० ॥ ऐसें श्रीगुरु
त्रिविक्रमासी ॥ प्रायश्चित्त सांगती परियेसी ॥ सकल विप्र संतोषी ॥ ज्ञानप्रकाशें होती
॥३१॥ एकादा मिळेल शास्त्रज्ञ ॥ स्वधर्माचार अभिज्ञ ॥ त्याच्या अनुग्रहें पतित ॥ पुनीत

होय अवधारा ॥३२॥ श्रीगुरु ह्मणती पतितासी ॥ पूर्वी तूं विप्र होतासी ॥ मातापिता गुरु-द्वेषी ॥ तेणें दोषें चांडाळजन्म ॥ ३३ ॥ आतां सांगतों ऐक ॥ स्नानसंगमीं मास एक ॥ केलिया दोष जाती निःशंक ॥ पुनः विप्रजन्म होसी ॥ ३४ ॥ पतित ह्मणे स्वामीसी ॥ तव दर्शनें आह्मासी ॥ कावळा जातां मानसीं ॥ राजहंस तो होतसे ॥३५॥ तैसे तव दर्शनमात्रें ॥ पवित्र झालीं सकळ गात्रें ॥ तारावें आतां त्वां कृपापात्रें ॥ शरणागतासी ॥ ३६ ॥ परिस लागतां लोखंडासी ॥ सुवर्ण होय तत्क्षणेसीं ॥ सुवर्ण मागुती लोहासी ॥ केवीं मिळे स्वामिया ॥३७॥ तव दर्शन सुधारसीं ॥ आपण झालों ज्ञानराशी ॥ अभिमंत्रोनी आह्मासी ॥ विप्रांमध्यें मिळवावें ॥ ३८ ॥ ऐकोनी तयाचें वचन ॥ गुरु बोलती हांसोन ॥ तव देह जातिहीन ॥ विप्र केवीं ह्मणतील ॥ ३९ ॥ पतिताच्या गृहासी ॥ उपजोनि तूं वाढलासी ॥ ब्रह्मत्व केवीं पावसी ॥ विप्र निंदा करतील ॥ ४० ॥ पूर्वी ऐसा विश्वामित्र ॥ क्षत्रियवंशीं गाधिजपुत्र ॥ तपोबळें ह्मणवी पवित्र ॥ ह्मणे तो विप्र आपणा ॥ ४१ ॥ ब्रह्मयाचीं शत वर्षें ॥ तप केलें महाक्लेशें ॥ त्या बळें ह्मणवीतसे ॥ ब्रह्मऋषी आपणा ॥ ४२ ॥ इंद्रादि सुरवरांसी ॥ विनविता झाला परियेसी ॥ आपणातें ब्रह्मऋषी ॥ ह्मणा ऐसें बोलतसे ॥ ४३ ॥ देव ह्मणती तयासी ॥ आह्मा गुरु वसिष्ठऋषी ॥ जरी तो बोले ब्रह्मर्षी ॥ तरी आह्मी अंगिकारूं ॥४४॥ मग त्या वसिष्ठासी ॥ विनवी विश्वामित्र ऋषी ॥ विप्र ह्मणा आपणासी ॥ केलें तप बहु-काळ ॥ ४५ ॥ वसिष्ठ ह्मणे विश्वामित्र ॥ क्षत्रिय तपास अपात्र ॥ देह टाकोनी मग पवित्र ॥ विप्रकुळीं जन्मावें ॥४६॥ मग तुझा होईल व्रतबंध ॥ होईल गायत्री प्रबोध ॥ तधीं तुवां होसी शुद्ध ॥ ब्रह्मऋषी नाम तुझें ॥ ४७ ॥ कांहीं केल्या न ह्मणे विप्र ॥ मग कोपला विश्वामित्र ॥

वसिष्ठाचे शत पुत्र ॥ मारिता झाला तयेवेळीं ॥ ४८ ॥ ब्रह्मज्ञानी वसिष्ठऋषी ॥ नव्हे कदां तामसी ॥ अथवा न ह्मणे ब्रह्मऋषी ॥ तया विश्वामित्रासी ॥ ४९ ॥ तंव तो एके दिवसीं ॥ विश्वामित्र कोपेंसी ॥ हातीं घेऊनी पर्वतासी ॥ घालूं आला वसिष्ठावरी ॥ ५० ॥ विचार करीत मागुती मनीं ॥ जरी वधीन वसिष्ठमुनी ॥ आपणातें न ह्मणे कोणी ॥ ब्रह्मऋषी ह्मणोनियां ॥ ५१ ॥ इंद्रादि देव सनकऋषी ॥ ह्मणती वसिष्ठवाक्यासरसी ॥ आपण ह्मणों ब्रह्मऋषी ॥ अन्यथा नाहीं ह्मणोनियां ॥ ५२ ॥ ऐसा वसिष्ठमुनीस ॥ मारितो यासी फार दोष ॥ ह्मणोनि टाकी गिरिवरास ॥ भूमीवरी परियेसा ॥ ५३ ॥ अनुतप्त झाला अंतःकरणीं ॥ वसिष्ठें तें ओळखुनी ॥ ब्रह्मऋषी ह्मणोनी ॥ पाचारिलें तयेवेळीं ॥ ५४ ॥ संतोषोनी विश्वामित्र ॥ ह्मणे बोल बोलिला पवित्र ॥ ह्मणे माझे घरीं अन्न मात्र ॥ तुह्मीं घ्यावें स्वामियां ॥ ५५ ॥ संतोषोनी वसिष्ठ ॥ तयालागीं बोलत ॥ ह्मणे शरीर हें निभ्रांत ॥ सूर्यकिरणीं पचवावें ॥ ५६ ॥ विश्वामित्रें अंगिकारिलें ॥ सूर्यकिरणें देह जाळिलें ॥ सहस्रकिरणीं तापलें ॥ देह सर्व भस्म झाला ॥ ५७ ॥ विश्वामित्र महामुनी ॥ अतिसामर्थ्य अनुष्ठानीं ॥ पहिला देह जाळोनी ॥ नूतन देह धरियेला ॥ ५८ ॥ ब्रह्मर्षी तेथोन ॥ विश्वामित्र झाला जाण ॥ सकळांसी मान्य ॥ महाराज ॥ ५९ ॥ मग ह्मणती सकळ मुनी ॥ विश्वामित्र ब्रह्मज्ञानी ॥ ब्रह्मऋषी ह्मणोनी ॥ झाला त्रिभुवनीं प्रख्यात ॥ ६० ॥ याकारणें तव देह ॥ विसर्जावा जन्म इह ॥ अनुतप्त तव भाव ॥ ब्रह्मकुळ भाविसी ॥ ६१ ॥ ऐसें त्या पतितासी ॥ बोधितां गुरु परियेसी ॥ लाधलें सुख त्यासी ॥ त्याच्या मानसीं नये कांहीं ॥ ६२ ॥ निधान सांपडे दारिद्र्यासी ॥ तो कां सांडील संतोषीं ॥ अमृत सांपडतां रोग्यासी ॥

कां सांडील जिवित्व ॥ ६३ ॥ येकादें ढोर उपवासी ॥ पावे तृण बिढारासी ॥ तेथोनि जावया त्यासी ॥ मन नव्हे सर्वथा ॥ ६४ ॥ तैसें त्या पतितासी ॥ लागलें ध्यान श्रीगुरूसी ॥ न जाय आपुल्या मंदिरासी ॥ विप्र आपण ह्मणतसे ॥ ६५ ॥ इतुकें होतां ते अवसरीं ॥ आली त्याची पुत्र नारी ॥ ह्मणों लागली अपस्मारीं ॥ याकारणें झाली कीं ॥ ६६ ॥ जवळ येतां स्त्रियेसी ॥ स्पर्शों नको ह्मणे तियेसी ॥ कोपें करोनि मारावयासी ॥ जात असे तो पतित ॥ ६७ ॥ दुःख करीत ती भार्या ॥ दुरूनि नमे गुरुपायां ॥ पति मातें सोडोनियां ॥ जातो आतां काय करूं ॥ ६८ ॥ कन्या पुत्र मज बहुत ॥ तया कोण पाळित ॥ आह्मां सांडोनि जातो किमर्थ ॥ सांगा तयासी स्वामियां ॥ ६९ जरी न सांगाल स्वामी त्यासी ॥ त्यजीन प्राण पुत्रासरसी ॥ येरवी आपणातें कोण पोषी ॥ अनाथ मी स्वामियां ॥ ७० ॥ ऐकोनी तिचें वचन ॥ गुरु बोलती हांसोन ॥ त्या नरातें बोलावून ॥ सांगताती परियेसा ॥ ७१ ॥ गुरु ह्मणती पतितासी ॥ जावें आपुल्या घरासी ॥ पुत्रकलत्र क्षोभतां दोषी ॥ तूंत केवीं गति होय ॥ ७२ ॥ या संसारीं जन्मोनियां ॥ संतोषवावें इंद्रियां ॥ मग पावे धर्मकाया ॥ नाहीं तरी गति नसे ॥ ७३ ॥ याकारणें पूर्वीच जाणा ॥ न करावी आपण अंगना ॥ करोनि त्यागितां पतना ॥ होय निभ्रांत परियेसा ॥ ७४ ॥ सूर्य भूमि साक्षीसीं ॥ तुवां वरिलें स्त्रियेसीं ॥ तीस त्यागितां महादोषी ॥ तूंतें नव्हे गति जाण ॥ ७५ ॥ श्रीगुरुवचन ऐकोन ॥ विनवीतसे कर जोडून ॥ केवीं होऊं जातिहीन ॥ ज्ञान होवोनि मागुती ॥ ७६ ॥ गुरु मनीं विचारिती ॥ याचे अंगीं असे विभूति ॥ प्रक्षाळितां तुळशीकाष्ठातीं ॥ अज्ञानत्व पावेल ॥ ७७ ॥ ऐसें मनीं विचारूनि ॥ सांगती

शिष्यालागोनी ॥ एका लुब्धका पाचारोनी ॥ आण अति त्वरेसी ॥७८॥ तया ग्रामीं द्विज
एक ॥ करी उदीम व्यवसायक ॥ तयातें पाचारिती एक ॥ त्या पतितासन्निध ॥ ७९ ॥
श्रीगुरु ह्मणती त्यासी ॥ उदक घेवोनी हस्तेसीं ॥ स्नपन करींगा पतितासी ॥ होय आस-
क्त संसारीं ॥ ॥ ८० ॥ आज्ञा होतां ब्राह्मण ॥ आला उदक घेवोन ॥ त्यावरी घालितां त-
त्क्षण ॥ गेली विभूती धुवोनी ॥ ८१ ॥ शरीर धुतां पतिताचें ॥ झालें अज्ञ मन त्याचें ॥
सुख पाहतां स्त्रीपुत्रांचें ॥ धांवत गेला त्यांजवळी ॥ ८२ ॥ आलिंगितां पुत्रासी ॥ भ्रांत
झाला ह्मणे त्यांसी ॥ कां आलों या स्थळासी ॥ तुह्मी आलां कवण कार्या ॥ ८३ ॥ ऐसें
मनीं विस्मय करित ॥ निघोनी घरा गेला पतित ॥ सांगितला वृत्तांत ॥ विस्मय सर्व क-
रिताती ॥८४॥ इतुकें झालें कौतुक ॥ पहाताती नगरलोक ॥ विस्मय करिती सकळिक ॥
ह्मणती अभिनव काय झालें ॥ ८५ ॥ त्रिविक्रम भारतीमुनी ॥ जो कां गुरुसन्निधानीं ॥
पुसतसे विनवोनी ॥ ऐका श्रोते एकचित्तें ॥ ८६ ॥ त्रिविक्रम ह्मणे गुरूसी ॥ होतो सं-
देह मानसीं ॥ निरोप द्यावा कृपेसीं ॥ विनंती करी अवधारा ॥८७॥ महापतित जातिहीन
जाण ॥ तयातें दिधलें दिव्य ज्ञान ॥ अंग धुतां तत्क्षण ॥ गेलें ज्ञान केवीं तें ॥ ८८ ॥
विस्तारोनी आह्मासी ॥ निरोपावें कृपेसी ॥ ह्मणोनि लागला चरणासी ॥ भावभक्ती करो-
नियां ॥ ८९ ॥ ऐसें पुसे त्रिविक्रम यती ॥ गुरु तया निरोपिती ॥ त्याचे अंगाची विभूती ॥
धुतां गेलें ज्ञान त्याचें ॥ ९० ॥ ऐसें विभूतीचें महिमान ॥ माहात्म्य असे पावन ॥ तोच
होय ब्रह्मपूर्ण ॥ भस्ममहिमा अपार ॥ ९१ ॥ गुरुवचन ऐकोनी ॥ विनवीतसे त्रिविक्रममुनी ॥
देव गुरु शिरोमणी ॥ भस्ममहिमा निरोपावा ॥ ९२ ॥ सिद्ध ह्मणे शिष्यासी ॥ भस्ममहिमा

परियेसी ॥ गुरु सांगती विस्तारेंसी ॥ एकचित्तें अवधारा ॥९३॥ म्हणोनि सरस्वती गंगाधर॥ गुरुचरित्र विस्तार ॥ ऐकतां होय मनोहर ॥ सकळाभीष्टें साधती ॥ ९४ ॥ पुढील कथा पावन ॥ सांगे सिद्ध विस्तारोन ॥ महाराष्ट्र भाषें करून ॥ सांगे सरस्वती गुरुदास ॥९५॥ इति श्रीगुरुचरित्रामृत ॥ कर्मविपाकभावार्थ ॥ अत्यंत ज्ञान प्रशंसित ॥ विमोचित पुनः केलें ॥ ९६ ॥ इति श्रीगुरुचरित्रपरमकथाकल्पतरौ श्रीनृसिंहसरस्वत्युपाख्याने सिद्धनामधारकसंवादे कर्मविपाककथनं नाम अष्टाविंशोऽध्यायः ॥ ओंव्या १९६ ॥



॥ श्रीगणेशाय नमः ॥ नामधारक ह्मणे सिद्धासी ॥ मागील कथा निरोपिलीसी ॥ भस्म-
महात्म्य श्रीगुरूसी ॥ पुसिलें त्रिविक्रमभारतीनें ॥१॥ पुढें कथा कवणेपरी ॥ झाली असे
गुरुचरित्रीं ॥ निरोपावी सविस्तारीं ॥ सिद्धमुनी कृपासिंधू ॥२॥ ऐसें विनवी शिष्यराणा ॥
ऐकोनि सिद्ध प्रसन्नवदना ॥ सांगतसे तये क्षणा ॥ भस्ममाहात्म्य परियेसा ॥ ३ ॥ गुरु
ह्मणे शिष्यासी ॥ भस्ममहात्म्य पुससी ॥ एकचित्त करूनी मानसीं ॥ सावध होऊनी
ऐकपां ॥४॥ पूर्वापार कृतयुगीं ॥ वामदेवनामा योगी ॥ प्रसिद्ध गुरू तोचि जगीं ॥ वर्तत
होता भूमिवरी ॥ ५ ॥ शुद्धबुद्ध ब्रह्मज्ञानी ॥ गृहदारा विवर्जूनी ॥ कामक्रोधादि त्यजूनी ॥
हिंडतसे महीवरी ॥ ६ ॥ संतुष्ट निःस्पृह मौनी ॥ भस्म सर्वांगीं लावोनी ॥ जटाधारी असे
मुनी ॥ वल्कलवस्त्र परिधान ॥ ७ ॥ वर्ततसे भूमंडळांत ॥ नानाक्षेत्रीं हिंडत ॥ पावला
क्रौंचारण्यांत ॥ जेथें संचार राक्षसांचा ॥ ८ ॥ तया स्थानीं असे एक ॥ ब्रह्मराक्षस भ-
यानक ॥ मनुष्यादि जीव अनेक ॥ भक्षीतसे परियेसा ॥९॥ ऐशा घोर वनांत ॥ वामदेव
गेला हिंडत ॥ ब्रह्मराक्षस अवचित ॥ गेला धांवोन भक्षावया ॥ १० ॥ ब्रह्मराक्षस क्षुधा-
क्रांत ॥ भक्षूं ह्मणुनि धांवत ॥ करकरां दांत खात ॥ मुख पसरोनी जवळी आला ॥११॥
राक्षस येतां देखोनी ॥ वामदेव निःशंक मनीं ॥ उभा असे महाज्ञानी ॥ पातला राक्षस
तयाजवळी ॥१२॥ राक्षस मनीं संतोषित ॥ ग्रास बरवा लाधला ह्मणत ॥ भक्षावया कांक्षा
बहुत ॥ येवोनि धरी आलिंगोनी ॥ १३ ॥ आलिंगितां तयासी ॥ भस्म लागलें राक्षसा-
सी ॥ झालें ज्ञान तयासी ॥ जातिस्मरण जन्मांतरींचें ॥ १४ ॥ पातक गेलें जळोनी ॥
राक्षस झाला ब्रह्मज्ञानी ॥ जैसें लागतां चिंतामणी ॥ लोह सुवर्ण होतसे ॥१५॥ मानस स-

शेवरी निःशेष ॥ काक होय राजहंस ॥ अमृत पाजितां मनुष्यास ॥ देवत्व होय ज्या
परी ॥ १६ ॥ जैसी का जांबुनदांत ॥ मृत्तिका घालितां कनक होत ॥ तैसा पापी जाहला
पुनीत ॥ योगियाचे अंगस्पर्शे ॥ १७ ॥ समस्त मिळती कामना ॥ दुर्लभ सत्पुरुषदर्शना ॥
स्पर्श होतां गुरुचरणा ॥ पापावेगळा होय नर ॥ १८ ॥ ब्रह्मराक्षस भयानक ॥ काय सांगों
त्याची भूक ॥ गज तुरंग मनुष्य देख ॥ सकळ आहार करीतसे ॥ १९ ॥ इतुकें भक्षितां
त्यासी ॥ न जाय भूक परियेसी ॥ तृषाक्रांत समुद्रासी ॥ प्राशितां तृषा न जाय ॥ २० ॥
ऐसा पापी राक्षस ॥ होतां मुनीचा अंगस्पर्श ॥ क्षुधा तृषा आलस्य ॥ जावोनि ज्ञाला
महाज्ञानी ॥ २१ ॥ राक्षस ज्ञानी होवोनी ॥ लागला मुनीश्वराचे चरणीं ॥ त्राहि त्राहि
गुरुशिरोमणी ॥ तूं साक्षात् ईश्वर ॥ २२ ॥ तारी तारी जी मुनीश्वरा ॥ बुडालों मी घोर
सागरा ॥ उद्धरी मज दातारा ॥ जगदीश्वरा कृपासिंधू ॥ २३ ॥ तव दर्शनमात्रेंसी ॥ जळो-
नि गेल्या पापराशी ॥ तूं कृपाळू भक्तांसी ॥ तारी तारी गुरुराया ॥ २४ ॥ येणेंपरी मु-
नीश्वरास ॥ विनवीतसे ब्रह्मराक्षस ॥ वामदेव कृपापुरुष ॥ पुसों लागला तयेवेळीं ॥ २५ ॥
वामदेव ह्मणे तयासी ॥ तूं कोण कोणच्या वंशीं ॥ ऐशिया घोर वनासीं ॥ राहिलासि कां
या ठायां ॥ २६ ॥ ऐकोनि ऐसें वचन ॥ ब्रह्मराक्षस करी नमन ॥ विनवीतसे कर जोडोन ॥
ऐक त्रिविक्रम मुनिराया ॥ २७ ॥ राक्षस ह्मणे तयेवेळीं ॥ मज ज्ञान झालें सकळी ॥ जाति-
स्मरण अंतकाळीं ॥ पूर्वापरीचें स्वामियां ॥ २८ ॥ तयामध्यें सदोष ॥ उत्कृष्ट जन्म पंच-
वीस ॥ त्यांचा दिसतसे प्रकाश ॥ ऐका स्वामी वामदेवा ॥ २९ ॥ पूर्वजन्म पंचविसीं ॥
होतो राजा यवनदेशीं ॥ दुर्जय नाम आपणासी ॥ दुराचारें मी वर्तलों ॥ ३० ॥ मीं मारिले

बहुत लोक ॥ प्रजेसी दिधलें बहु दुःख ॥ स्त्रिया वरिल्या अनेक ॥ राज्यमदें करोनियां ॥ ३१ ॥ वरिल्या स्त्रिया व्यतिरिक्त ॥ अन्य भोगिल्या नाहीं गणित ॥ एक दिवशीं होवोनी रत ॥ पुनरपि न भोगी तिसी ॥ ३२ ॥ एके दिवशीं एकीसी ॥ रति देवोनी त्यजी तिसी ॥ ठेवीं अंतर्गृहासी ॥ पुनः तोंड न पाहें ॥३३॥ ऐसें अनेक स्त्रियांसी ॥ ठेवीं अंतर्गृहासीं ॥ मातें शापिती अहर्निशीं ॥ दर्शन नाहीं ह्मणोनी ॥ ३४ ॥ सकळ राव जिंकोनी ॥ आणिल्या स्त्रिया धरोनी ॥ एक दिन भोगोनी ॥ ठेविल्या अंतर्गृहासीं ॥३५॥ सेवक ठेविले असती ॥ बळें स्त्रिया आणोन देती ॥ संतोषें ज्या न येती ॥ तयां द्रव्य देवोनी आणवी ॥ ३६ ॥ विप्र होते जे माझे देशीं ॥ ते पळाले अन्य देशीं ॥ मी भोगी त्यांच्या स्त्रियांशीं ॥ उन्मत्तपणें परियेसा ॥ ३७ ॥ पतिव्रता सुवासिनी ॥ विधवा मुख्य धरोनि आणी ॥ त्यांसी भोगी उन्मत्तपणीं ॥ रजस्वला स्त्रियांसही ॥ ३८ ॥ विवाह न होतां कन्येसी ॥ बलात्कारें भोगी तिसी ॥ येणेंपरी समस्त देशीं ॥ उपद्रविलें मदांधपणें ॥ ३९ ॥ ब्राह्मणस्त्रिया तीन शत ॥ चार शत क्षत्रिया विख्यात ॥ वैश्यस्त्रिया षट्शत ॥ शूद्रांच्या सहस्र जाणा ॥ ४० ॥ एक शत चांडाळिणी ॥ सहस्र वरिल्या पुरंध्रिणी ॥ पंचशत स्त्रिया न्हाविणी ॥ रजकिणी वरिल्या शत चारी ॥ ४१ ॥ असंख्यात वारवनिता ॥ भोगिल्या म्यां उन्मत्तता ॥ तथापि माझे मनीं तृप्तता ॥ नाहीं झाली स्वामियां ॥ ४२ ॥ इतुक्यांतें भोगून ॥ तृप्त नव्हे कदां मन ॥ विषयासक्त मद्यपान ॥ करीं नित्य उन्मत्त मीं ॥ ४३ ॥ वर्ततां ऐसें देखा ॥ व्याधिष्ट झालों यक्ष्मादिका ॥ परराजे येऊनि ऐका ॥ राज्य सर्व हारिलें ॥ ४४ ॥ मग जाणा आपणासी ॥ मरण झालें तात्काळेंसी ॥ मज नेलें यमा-

पासी ॥ नरकामध्यें घातलें ॥ ४५ ॥ देवांचीं सहस्र वर्षें देखा ॥ दहा वेळ फिरलों ऐका ॥
पितरांसहित नरका ॥ भोगिले नरक येणेंपरी ॥ ४६ ॥ पुढें जन्मलों प्रेतवंशीं ॥ विरूपदेह
आह्मासी ॥ सहस्र शिश्नें अंगासी ॥ लागलीं असती परियेसा ॥४७॥ येणेंपरी दिव्य शत ॥
वर्षें हिंडलों क्षुधाक्रांत ॥ पुनः पावलों यमपंथ ॥ नानाकष्ट भोगित ॥ ४८ ॥ दुजा जन्म
आपणासी ॥ व्याघ्र झालों जीवहिंसी ॥ अजगर जन्म तृतीयेसी ॥ चवथा झालों लांडगा
॥ ४९ ॥ पांचवा जन्म आपणासी ॥ ग्रामसूकर परियेसी ॥ सहावा जन्म निर्धारेसी ॥
सरडा होवोनी जन्मलों ॥५०॥ सातव्या जन्मीं झालों श्वान ॥ आठवा जंबुक मतिहीन ॥
नववा जन्म रोहिहरण ॥ दहावा झालों उष्ट्र देखा ॥ ५१ ॥ मर्कट जन्म एकादश ॥ सांबर
झालों मी द्वादश ॥ मुंगुस झालों मी त्रयोदश ॥ चतुर्दश वायस पैं ॥५२॥ ग्रामसूकर पंच-
दशीं ॥ दुःख भोगिलें अहर्निशीं ॥ रानकुक्कुट षोडसी ॥ जन्म पावलों परियेसा ॥५३॥ सप्त-
दश जन्मीं आपण ॥ गर्दभ झालों चक्षुहीन ॥ मार्जारयोनी भोगून ॥ आलों अष्टादशेसी
॥५४॥ एकुणिसाव्या जन्मासी ॥ मंडुक झालों परियेसी ॥ कांसवजन्म विंशतीसी ॥ एक-
विसावा मत्स्य झालों ॥ ५५ ॥ बाविसावा जन्म थोर ॥ झालों तस्कर उंदीर ॥ दिवांध
झालों बधिर ॥ उलूक झालों तेविसावा ॥ ५६ ॥ जन्म चतुर्विंशतीसी ॥ झालों कुंजर
तामसी ॥ पंचविसाव्या जन्मासी ॥ ब्रह्मराक्षस आपण देखा ॥५७॥ क्षुधाक्रांत अहर्निशीं ॥
कष्टलों मी परियेसी ॥ निराहार अरण्यवासी ॥ वर्ततसें स्वामियां ॥ ५८ ॥ तुह्मां देखतां
अंतःकरणीं ॥ वासना झाली भक्षीन ह्मणोनी ॥ यालागीं आलों धांवोनी ॥ पापरूपी
आपण देखा ॥ ५९ ॥ तुमचा अंगस्पर्श होतां ॥ जातिस्मरण झालें आतां ॥ सहस्र जन्म

स्मरण तत्वतां ॥ मजला सर्व आठवलें ॥ ६० ॥ मातें आतां जन्म नव्हे ऐसें करी ॥ तव अनुग्रहाभीतरीं ॥ या संसार अंधारीं ॥ यातायातीविरहीत ॥ ६१ ॥ तूं तारक विश्वासी ॥ ह्मणोनी मातें भेटलासी ॥ तव चरणमहिमा ऐशी ॥ स्पर्श होतां ज्ञान झालें ॥ ६२ ॥ भूमीवर नर असती ॥ तैसा नव्हेस तूं यती ॥ तव महिमा वर्णूं किती ॥ पतिता गती द्यावी पैं ॥ ६३ ॥ महापापी दुराचारी ॥ आपण असे वनांतरीं ॥ तव अंगस्पर्शमात्रीं ॥ ज्ञान अखील झालें मज ॥ ६४ ॥ ऐसी महिमा तव अंगीं ॥ आह्मा उद्धरावया जगीं ॥ ईश्वर तूंचि निःसंगीं ॥ आलासी स्वामी वामदेवा ॥६५॥ ऐसें ह्मणतां राक्षसासी ॥ वामदेव सांगे संतोषी ॥ भस्ममहिमा आहे ऐसी ॥ तुजलागीं सांगतों ॥ ६६ ॥ सर्वांग माझें भस्मांकित ॥ तव अंगातें लागलें किंचित ॥ त्याणें झालें तुज चेत ॥ ज्ञानप्रकाश जन्मांतरींचा ॥६७॥ भस्ममहिमा अपरंपार ॥ ब्रह्मादिकां अगोचर ॥ याचि कारणें ईश्वर ॥ भूषण करी सर्वांगीं ॥ ६८ ॥ ईश्वरें वंदिलें ज्या वस्तूसी ॥ वर्णितां अशक्य आह्मांसी ॥ तोचि शंकर व्योमकेसी ॥ जाणे भस्ममहिमान ॥ ६९ ॥ तूं जरी पुससी आह्मांसी ॥ सांगेन दृष्टांत परियेसी ॥ आह्मीं देखिला दृष्टीसी ॥ अपार महिमा भस्माचा ॥ ७० ॥ विप्र एक द्राविड देशीं ॥ आचारहीन परियेसी ॥ सदां रत शुद्रिणीसी ॥ कर्मभ्रष्ट वर्तत होता ॥ ७१ ॥ समस्त मिळोनी विप्रजाती ॥ त्या द्विजासी बहिष्कारिती ॥ माता पिता दायाद गोत्री ॥ त्यागिती त्यासी बंधुवर्ग ॥ ७२ ॥ येणेंपरी तो ब्राह्मण ॥ प्रख्यात झाला आचारहीन ॥ शुद्रिणीतें वरून ॥ होता काळ क्रमोनियां ॥७३॥ ऐसा पापी दुराचारी ॥ तस्करविद्येनें उदर भरी ॥ आणिक स्त्रियांसी व्यभिचार करी ॥ उन्मत्तपणें परियेसा ॥ ७४ ॥ वर्ततां ऐसा एके

दिवसीं ॥ गेला होता व्यभिचारार्थी ॥ तस्करविद्या करितां निशीं ॥ शूद्रें त्यासी बांधिलें ॥ ७५ ॥ मग वधून त्या विप्रासी ॥ ओढोन नेला तेच दिवसीं ॥ टाकिलें बहिर्ग्राम-प्रदेशीं ॥ घोर स्थळीं परियेसा ॥७६॥ श्वान होता तया नगरीं ॥ बैसला होता भस्मावरी ॥ क्षुधाक्रांत ते अवसरीं ॥ हिंडत गेला प्रेतघाणी ॥७७॥ देखोनी तया प्रेतासी ॥ श्वान गेला भक्षावयासी ॥ प्रेतावरी बैसला हर्षी ॥ क्षुधा निवारण करीत होता ॥७८॥ भस्म होतें श्वान पोटीं ॥ तें लागलें प्रेताचे ललाटीं ॥ वक्षस्थळीं बाहुवटीं ॥ लागलें भस्म परियेसा ॥ ७९ ॥ प्राण त्यागितां द्विजवर ॥ नेत होते यमकिंकर ॥ नानापरी करीत मार ॥ यमपुरा नेताती ॥ ८० ॥ कैलासपुरींचे शिवदूत ॥ देखोनी आले तें प्रेत ॥ भस्म अंगीं उद्धूलित ॥ ह्मणती यातें कोणीं नेलें ॥ ८१ ॥ यातें योग्य शिवपूर ॥ केवीं नेताती यमकिंकर ॥ ह्मणोनी धांवती सत्वर ॥ यमकिंकरां मारावया ॥ ८२ ॥ शिवदूत येतां देखोनी ॥ यमदूत पळती टाकोनी ॥ त्या द्विजातें सोडोनी ॥ गेले आपण यमपुरा ॥ ८३ ॥ जावोनि सांगती यमा-सी ॥ गेलों होतों पृथ्वीतळासी ॥ आणितां येथें पापियासी ॥ घोररूपें करूनियां ॥८४॥ तें देखोनि शिवदूत ॥ धांवत आले मारूं ह्मणत ॥ हिरोनी घेतलें प्रेत ॥ बांधिल होते आ-ह्मासी ॥ ८५ ॥ आतां आह्मां काय गति ॥ कधीं जावों ना या क्षितीं ॥ आह्मां शिवदूत ह्मणिती ॥ ती गती काय सांगों ॥ ८६ ॥ ऐकोनी दूताचें वचन ॥ यम निघाला कोपायमान ॥ गेला त्वरें करून ॥ शिवदूतांजवळी तो ॥ ८७ ॥ यम ह्मणे शिवदूतांसी ॥ कां मारिलें मम किंकरांसी ॥ हिरोनि घेतलें पापियासी ॥ शिवपुरा केवीं नेतां ॥८८॥ याचें पाप असे प्रबळ ॥ सरित्सिकता गणवेल ॥ त्याहुनी अधिक केवळ ॥ घोररूप असे देखा ॥ ८९ ॥

नव्हे योग्य शिवपुरासी ॥ न्यावया हा विमानेसी ॥ केवीं नेतां मूढपणेंसी ॥ ह्मणोनि यम कोपला ॥ ९० ॥ ऐकोनी यमाचें वचन ॥ शिवदूत सांगती विस्तारोन ॥ प्रेतकपाळीं लांछन ॥ होतें भस्म परियेसा ॥ ९१ ॥ वक्षस्थळीं भाळासी ॥ बाहुमुळीं करकंकणेसी ॥ भस्म लागतां प्रेतासी ॥ केवीं स्पर्शती दूत तुझे ॥ ९२ ॥ आह्मां आज्ञा ईश्वराची ॥ भस्मांकित तनू ज्याची ॥ नित्य वस्ती असे त्याची ॥ कैलासपदीं शाश्वत ॥ ९३ ॥ भस्म कपाळीं लागत ॥ केवीं आंतळती तव दूत ॥ तात्काळीं होतों वधित ॥ परी धर्में सोडिलें ॥९४ ॥ पुढें आपुल्या दूतांसी ॥ बुद्धि सांगा तुह्मी ऐसी ॥ ज्यावरी भस्म परियेसी ॥ त्यातें तुह्मी नाणावें ॥ ९५॥ भस्मांकित नरासी ॥ दोष न लागती परियेसी ॥ तो योग्य स्वर्गासी ॥ ह्मणोनि सांगती शिवदूत ॥ ९६ ॥ शिवदूतांचें वचन ऐकोन ॥ यमधर्म गेला परतोन ॥ आपल्या दूतां पाचारोन ॥ सांगतसे परियेसा ॥ ९७ ॥ यम सांगे आपुल्या दूतां ॥ भूमिवरी जावोनी आतां ॥ जे कां असती भस्मांकिता ॥ त्यातें तुह्मी नाणावें ॥ ९८ ॥ अनेकपरी दोष जरी ॥ केले असती अपरंपारी ॥ त्यांतें नाणिजे अमुच्या पुरीं ॥ त्रिपुंड्रक नरांसी ॥ ९९ ॥ रुद्राक्षमाळा ज्याच्या गळां ॥ असेल तिलक त्रिपुंड्रटिळा॥ त्यातें तुह्मी नातळा ॥ आज्ञा असे श्रीशिवाची ॥ १०० ॥ वामदेव ह्मणे राक्षसासी ॥ या विभूतीची महिमा ऐसी ॥ आह्मी लावितों भक्तीसी ॥ देवादिकां दुर्लभ ॥ १ ॥ पाहें पां ईश्वर प्रीतिसी ॥ सदां लावितो भस्मासी ॥ ईश्वरें वंदिल्या वस्तूसी ॥ त्यासी कोण वर्णूं शके ॥२॥ ऐकोनी वामदेवाचें वचन ॥ ब्रह्मराक्षस करी नमन ॥ उद्धरीं गा जगज्जीवन ॥ ईश्वर तूंचि वामदेवा ॥३॥तव चरण मज भेटले ॥ सहस्र जन्मींचें ज्ञान झालें ॥ कांहीं पुण्य होतें केलें ॥ त्यागुणें

भेटलासी ॥ ४ ॥ आपण पूर्वीं राज्य करितां ॥ केलें पुण्य स्मरलें आतां ॥ तळें बांधिलें एक तत्वतां ॥ दिल्ही वृत्ती विप्रांसी ॥ ५ ॥ इतुकें पुण्य आपणासी ॥ घडलें होतें परियेसी ॥ वरकड केले दोषरासी ॥ राज्य करितां स्वामियां ॥ ६ ॥ जधीं नेलें यमपुरासी ॥ यमें पुसिलें चित्रगुप्तासी ॥ माझें पुण्य त्या यमासी ॥ सांगितलें चित्रगुप्तें ॥ ७ ॥ तेव्हां मातें यमधर्में ॥ सांगितलें हेंचि वर्म ॥ पंचविंशती जन्मीं परम ॥ फल येईल ह्मणोनी ॥ ८ ॥ त्या पुण्यापासून ॥ जोडले हे तव चरण ॥ करणें स्वामी उद्धारण ॥ जगद्गुरू स्वामियां ॥ ९ ॥ या भस्माचें महिमान ॥ लावावयाचें विधान ॥ कवण मंत्रें आवरण ॥ विस्तारोनी सांगपां ॥ ११० ॥ वामदेव ह्मणे राक्षसासी ॥ विभूतीधारण मज पुससी ॥ सांगेन तें विस्तारेंसी ॥ एकचित्तें ऐकपां ॥ ११ ॥ पूर्वीं मंदराचल पर्वतीं ॥ क्रीडेसी गेले उमापती ॥ कोटिगण सहिती ॥ बैसले होते वोळगीत ॥ १२ ॥ तेतीस कोटी देवांसहित ॥ देवेंद्र दर्शनासी येत ॥ अग्निवरुण देवांसहित ॥ कुबेर वायू आले तेथें ॥ १३ ॥ गंधर्व यक्ष चित्रसेन ॥ खेचर पन्नग विद्याधारण ॥ किंपुरुष सिद्ध साध्य जाण ॥ आले गुह्यक सभेसी ॥ १४ ॥ देवाचार्य बृहस्पती ॥ वसिष्ठ नारद तेथें येती ॥ आर्यमादि पितर येती ॥ आले ईश्वर वोळगेसी ॥ १५ ॥ दक्षादि ब्रह्मा येर सकळ ॥ आले समस्त ऋषिकुळ ॥ उर्वश्यादि अप्सरामेळ ॥ आले ईश्वरसभेसी ॥ १६ ॥ चंडिकासह शक्ति देखा ॥ आल्या द्वादश वार्षिका ॥ अष्ट वसू मिळोनी ऐका ॥ आले ईश्वरसभेसीं ॥ १७ ॥ अश्विनौ देव परियेसी ॥ विश्वदेव सहपरिवारेसीं ॥ आले ईश्वरसभेसी ॥ ऐक ब्रह्मराक्षसा ॥ १८ ॥ भूपति महाकाळ ॥ नंदिकेश्वर महानीळ ॥ काठीकर दोघे प्रबळ ॥ पार्षद उभे असती ॥ १९ ॥ वीरभद्र

शंखकर्ण ॥ माणिभद्र षट्कर्ण ॥ वृकोदर देवमान्य ॥ कुंडोदर आला तेथें ॥१२०॥ कुंभोदर मंडोदर ॥ विकटकर्ण कर्णधार ॥ धारकेत महावीर ॥ भूतनाथ तेथें आला ॥ २१ ॥ भृंगरीट भूतनाथ ॥ नानाऋषिगण समस्त ॥ नानावर्ण मुख्य ख्यात ॥ नाना अवयवी शिवदूत ॥ २२ ॥ रुद्रगण रूपें कैसीं ॥ सांगेन ऐक विस्तारेंसी ॥ कित्येक कृष्णवर्ण ऐसीं ॥ श्वेतपीत धूम्रवर्ण ॥२३॥ हिरवें ताम्र सुवर्ण ॥ लोहित चित्रविचित्र जाण ॥ मंडूकासारिखें वदन ॥ रुद्रगण आले तेथें ॥२४॥ नाना आयुध शस्त्रेंसी ॥ नाना वाहनें भूषणेंसीं ॥ व्याघ्रमुखें कित्येकांसी ॥ किती सूकर गजमुखी ॥ २५ ॥ कित्येक नरमुख ॥ कित्येक श्वानशृगालमुख ॥ उष्ट्रवदन कित्येक ॥ किती शरभ भेरुंडवदन ॥ २६ ॥ सिंहमुख कित्येक ॥ किती घारी बकमुख ॥ कित्येकांसी मुख एक ॥ दोन मुख गण देखा ॥ २७ ॥ चतुर्मुख कितीएक ॥ चतुर्भुज कित्येक ॥ कित्येक हीनमुख ॥ ऐसे तेथें गण येती ॥२८॥ एक हस्त द्विहस्तेंसी ॥ पांच सहा हस्तकेंसी ॥ पाद नाहीं कितीएकांसी ॥ बहु पाद किती जाणा ॥ २९ ॥ कर्ण नाहीं कित्येकांसी ॥ एक कर्ण अभिनवेंसी ॥ बहूकर्ण परियेसी ॥ ऐसे गण येती तेथें ॥१३०॥ कित्येक चारनेत्रक ॥ किती स्थूळ कुब्जक ॥ कित्येकांसीं नेत्र एक ॥ ऐसे गण ईश्वराचे ॥ ३१ ॥ ऐशा गणांसहित ॥ बैसला शिव मूर्तीमंत ॥ सिंहासन रत्नखचित ॥ सप्त प्रभावळी रत्नमंडित देखा ॥ ३२ ॥ आरक्त पहिली प्रभावळी ॥ तियेसी रत्नें जडलीं ॥ अनुपम दिसे निर्मळी ॥ सिंहासनीं परियेसा ॥ ३३ ॥ दुसरी देखा प्रभावळी ॥ हेमवर्णें पिंवळी ॥ मिरवी रत्नबाहाळी ॥ सिंहासनीं शंकराचे ॥ ३४ ॥ तिसरी एक प्रभावळी ॥ नीलवर्ण रत्नें जडलीं ॥ तीं असती कुसरिलीं ॥ सिंहासनीं शंकराचे ॥३५॥ चवथी

शुद्ध प्रभावळी ॥ रत्नखचित असे कमळी ॥ आरक्तवर्ण असे जडली ॥ सिंहासनीं ईश्वराचे ॥ ३६ ॥ वैडूर्य रत्नखचित ॥ मुक्तें जडलीं बहुत ॥ पांचवी प्रभावळी विख्यात ॥ सिंहासनीं ईश्वराचे ॥३७॥ सहावी तेथें प्रभावळी ॥ पुष्परागाचिया वेली ॥ मुक्ताफळांच्या जाळी ॥ सिंहासनीं ईश्वराचे ॥ ३८ ॥ सातवी जी का प्रभावळी ॥ अनेक रत्नें तिये जडलीं ॥ विश्वकर्म्यानें निर्मिलीं ॥ अपूर्व देखा त्रिभुवनांत ॥३९॥ ऐशिया सिंहासनावरी ॥ बैसला असे त्रिपुरारी ॥ कोटिसूर्य तेजासरी ॥ भासतसे परियेसा ॥ १४० ॥ महा प्रळयसमयासी ॥ सप्तार्णव मिळणी जैसी ॥ तैसा या श्वासोच्छ्वासीं ॥ ईश्वर बैसला असे ॥४१॥ भाळनेत्र ज्वाळमाळा ॥ संवर्त्ताग्नी जटामंडळा ॥ कपाळीं चंद्र षोडशकळा ॥ शोभतसे सदाशिव ॥४२॥ तक्षक देखा वामकर्णीं ॥ वासुकी दक्षिण कर्णीं ॥ दोवांचिया नयनीं ॥ रत्नतेज फांकलें ॥ ४३ ॥ नीलकंठ आपण ॥ नागहार आभरण ॥ सर्पाचे करीं कंकण ॥ मुद्रिकाही त्यांचिया ॥ ४४ ॥ मेखला सूत्र सर्पाचें ॥ चर्म परिधान व्याघ्राचें ॥ शोभा देत दर्पणाचे ॥ ऐशियापरी दिसतसे ॥ ४५ ॥ कर्कोटक सर्पाचीं ॥ केलीं नूपुरें पायाचीं ॥ पौर्णिमे प्रभा चंद्राची ॥ तैसें तेज दिसतसे ॥ ४६ ॥ ह्मणोनि कर्पूरगौर ह्मणती ॥ ध्यानीं ध्यायि जे पशुपती ॥ ऐसा भोळा चक्रवर्ती ॥ बैसलासे सभेंत ॥४७॥ रत्नमुकुट शिखरीं ॥ नागेंद्र तो केयुरीं ॥ कुंडलांची दीप्ती थोरी ॥ दिसतसे ईश्वर ॥ ४८ ॥ कंठीं सर्पाचे हार ॥ नीळकंठ मनोहर ॥ सर्वांगीं सर्पालंकार ॥ शोभतसे ईश्वर ॥ ४९ ॥ शुभ्रकमळीं अर्चिला ॥ कीं चंदनें असे लेपिला ॥ कर्पूर केळीं निपजला ॥ तैसा दिसे ईश्वर ॥५०॥ दश भुजा विस्तारेंसी ॥ एक एक आयुधेसी ॥ बैसलासे सभेसी ॥ सर्वेश्वर शंकर ॥ ५१ ॥ एके

हातीं त्रिशूळरेखा ॥ दुसरे हातीं डमरुरेखा ॥ येरे हातीं खड्गनिका ॥ शोभतसे ईश्वर ॥५२॥ पाणिपात्र एका हातीं ॥ धनुष्यबाणें कर शोभती ॥ खट्वांग परशु निश्चिती ॥ त्रिशूळादिकें मिरवीतसे ॥५३॥ शृंगासन कमळ देखा ॥ धरिलेंसे पिनाका ॥ दशभुजीं दिसे निका ॥ बैसलासे सभेसी ॥ ५४ ॥ पंचवक्त्र सर्वेश्वर ॥ एकेक मुखाचा विस्तार ॥ दिसतसे सालंकार ॥ सांगेन ऐका श्रोतेजन ॥५५॥ कलंकावीण चंद्र जैसा ॥ किंवा क्षीरफेन परियेसा ॥ भस्मभूषित रूपें तैसा ॥ दिसे मन्मथदाहक ॥ ५६ ॥ चंद्र सूर्याग्नी नेत्र ॥ नागहार कंठीं सूत्र ॥ दिसे मूर्ती पवित्र ॥ सर्वेश्वर परियेसा ॥ ५७ ॥ शुभ्र टिळा कपाळीं ॥ बरवा शोभे चंद्रमौळी ॥ हास्यवदन ओष्ठ पोवळी ॥ बैसलासे श्रीशंकर ॥ ५८ ॥ दुजें मुख उत्तरेसी ॥ शोभतसे विस्तारेसी ॥ ताम्रवर्ण करकमळेसीं ॥ अपूर्व दिसतसे ॥ ५९ ॥ जेवीं डाळिंबीचें फूल ॥ किंवा प्रभात रविमंडळ ॥ तैसें शोभे मुखकमळ ॥ शंकराचें परियेसा ॥ ६० ॥ तिसरें मुख पूर्वदिशेसी ॥ गंगार्धचंद्र शिरसी ॥ जटाबंधन परियेसी ॥ केलें सर्प वेष्टोनियां ॥ ६१ ॥ एक मुख दक्षिणेसी ॥ विक्राळ दाढा दारुणेसी ॥ मिरवे नीळवर्णेसी ॥ दिसतसे सदाशिव ॥६२॥ मुखांतूनी ज्वाळा निघती ॥ जैशा कां वेदश्रुती ॥ रुंडमाळा शोभती ॥ गळां सर्प वेष्टित ॥ ६३ ॥ पांचवें असे जें वदन ॥ व्यक्ताव्यक्त दिसे जाण ॥ साकार निराकार गुण ॥ सगुण निर्गुण ईश्वर ॥ ६४ ॥ सलक्षण निर्लक्षण ॥ ऐसें शोभतसे वदन ॥ परब्रह्म वस्तु जाण ॥ सर्वेश्वर पंचमुख ॥ ६५ ॥ काळ व्याल सर्प बहुत ॥ कंठीं माळा मिरवीत ॥ चरण मिरविती आरक्त ॥ कनळापरी ईश्वराचे ॥ ६६ ॥ चंद्रासारखीं नखें देखा ॥ मिरविती चरणीं पादुका ॥ अलंकार सर्प ऐका ॥ शोभतसे ईश्वर ॥ ६७ ॥ व्याघ्रांबर

प्रावरण ॥ सर्वांगीं सर्पवेष्टन ॥ गांठी बांधिली असे जाण ॥ नागबंधें करोनियां ॥ ६८ ॥
नाभीं चंद्रावळी शोभा ॥ उदरीं तटस्थ रोम उभा ॥ परमार्थी जोडे लाभा ॥ भक्तजना मनो-
हर ॥ ६९ ॥ ऐसा रुद्र महा भोळा ॥ सिंहासनीं आरूढला ॥ पार्वतीसहित शोभला ॥ बैस-
लासे परमेश्वर ॥ ७० ॥ पार्वतीचा शृंगार ॥ नानापरीचे अलंकार ॥ मिरवीतसे मनोहर ॥
सर्वेश्वरी परियेसा ॥ ७१ ॥ कनकचंपक गोरटी ॥ मोतियांचा हार कंठीं ॥ रत्नखचित
मुकुटीं ॥ नागबंदीं दिसतसे ॥७२॥ नानापरिच्या पुष्पजाती ॥ मुकुटावरी शोभती॥ तेथें भ्रमर
आलापिती ॥ परिमळालागीं परियेसा ॥ ७३ ॥ मोतियांची थोर जाळी ॥ शोभतसे मुकु-
टाजवळी ॥ रत्नें जडलीं सोज्वळीं ॥ शोभायमान दिसतसे ॥ ७४ ॥ नासिक बरवें सरळ ॥
तेथें मिरवे मुक्ताफळ ॥ त्यावरी रत्नें सोज्वळ ॥ शोभायमान दिसतसे ॥ ७५ ॥ अधरोष्ठ
प्रवाळ सरसीं ॥ दंतपंक्ति रत्नें जैसीं ॥ ऐसि माता मिरवे कैसी ॥ महामाया परियेसा
॥ ७६ ॥ कानीं तानवडीं भोंवया ॥ रत्नखचित मिरविलिया ॥ अलंकार महामाया ॥
ल्याइलीसे जगन्माता ॥ ७७ ॥ पीतवर्ण चोळी देखा ॥ कुचतटीं शोभे निका ॥ एकाव-
ळीं रत्नें अनेका ॥ कंठीं हार शोभतसे ॥ ७८ ॥ काल व्याल सर्प थोर ॥ स्तन पिती मनो-
हर ॥ कैसें भाग्य त्यांचें थोर ॥ त्या सर्पांचें परियेसा ॥ ७९ ॥ आरक्त वस्त्र नेसली ॥ जैसें
डाळिंब पुष्पवेली ॥ किंवा कुंकुमें डवरिली ॥ गिरिजा माता परियेसा ॥ ८० ॥ बाहुबंद
सुरेखा ॥ करीं कंकणें मुद्रिका ॥ मुक्ताकंचुकी देखा ॥ ल्याइलीसे अपूर्व ॥ ८१ ॥ चरण
शोभती बरवे ॥ नूपुरयुक्त स्वभावें ॥ असें पार्वतीचें ध्यान बरवें ॥ ध्याती गण समस्त ॥८२॥
अष्टमीच्या चंद्रसारिखा ॥ मिरवे टिळक कपाळीं तैसा ॥ त्रिपुंड्र टिळा शुभ्र जैसा ॥

मोतियांचा परियेसा ॥ ८३ ॥ नानापरीचे अलंकार ॥ अनेकापरिचे शृंगार ॥ कोण
वर्णूं शके पार ॥ जगन्माता देवीचा ॥ ८४ ॥ ऐसा शंभू उमेसहित ॥ बैसलासे सभेंत ॥ ते-
तीस कोटी परिवारीत ॥ इंद्र आला वोळंगेसी ॥ ८५ ॥ ऐसें समस्त सुरवर ॥ देवऋषी
सनत्कुमार ॥ आले तेथें सत्वर ॥ त्या ईश्वरसभेसी ॥८६॥ सनत्कुमार त्या वेळीं ॥ लागतसे
चरणकमळीं ॥ साष्टांग नमन वहाळी ॥ विनवीतसे शिवासी ॥८७॥ जयजयाजी उमाकां-
ता ॥ जयजयाजी विश्वकर्ता ॥ त्रिभुवनीं तूंचि दाता ॥ चतुर्विध पुरुषार्थातें ॥ ८८ ॥ स-
मस्त धर्म आपणासी॥निरोपिले परियेसी॥भवार्णवीं तरावयासी ॥ पापक्षया कारणें ॥८९ ॥
आणीक एक आह्मां सांगणें ॥ बुद्धि वाढेल अल्पगुणे ॥ चारी पुरुषार्थ जेणें गुणें ॥ अना-
यासें साधिजे ॥ ९० ॥ एरवीं सकळ पुण्यासी ॥ करणें कष्ट सायासी ॥ हितार्थ सर्व मान-
वांसी ॥ निरोपावें स्वामियां ॥९१॥ ऐसें विनवी सनत्कुमार॥मनीं संतोषोनी ईश्वर ॥ सांग-
ता झाला कर्पूरगौर ॥ सनत्कुमार मुनीसी ॥ ९२॥ ईश्वर ह्मणे तयेवेळीं ॥ ऐकाहो ऋषिमं-
डळी ॥ धर्म घडे तात्काळीं ॥ ऐसें पुण्य सांगेन ॥९३॥ वेदशास्त्र संमतेसी॥ असे धर्म परि-
येसी ॥ अनंत पुण्य त्रिपुंड्रेसी॥भस्मांकित परियेसा ॥९४॥ ऐकोनियां सनत्कुमार॥कवणे
विधीं लाविजे नर ॥ कवण द्रव्यमार्ग परिकर ॥ कवण देव देवता ॥ ९५ ॥ कवण
कर्तृत्व किं प्रमाण ॥ कैसें लाविजे आपण ॥ सांगा स्वामी विस्तारोन ॥ ह्मणोनी चरणीं
लागला ॥ ९६ ॥ ऐसी विनंती ऐकूनी ॥ सांगे शंभू विस्तारोनी ॥ गोमय द्रव्य देवताग्नी ॥
भस्म करणें परियेसी ॥ ९७ ॥ पुरातन यज्ञस्थानीं ॥ जी असेल मेदिनी ॥ पुण्य बहुत ला-
वितांक्षणीं ॥ तेथील भस्म परियेसा ॥९८॥ सद्योजातादि मंत्रेंसी ॥ घ्यावें भस्म तळहातां-

सी ॥ अभिमंत्रावें भस्मासी ॥ अग्निरीती करोनियां ॥९९॥ मानस्तोकेति मंत्रेंसी ॥ संमर्दावें अंगुष्ठेंसी ॥ त्र्यंबकादि मंत्रेंसी ॥ शिरीं लाविजे परियेसा ॥ २०० ॥ त्र्यायुषेति मंत्रेंसी ॥ लाविजे ललाटभूजांसी ॥ त्याचि मंत्रें परियेसी ॥ स्थानीं स्थानीं लाविजे ॥१॥ तीन रेषा स्थानीं स्थानीं ॥ लावाव्या मंत्रेंकरूनी ॥ अधिक लावूं नये सर्वांनीं ॥ समसमान लाविजे ॥२॥ मध्यांगुष्ठ अनामिकांगुळीसी ॥ लाविजे प्रथम ललाटेसी ॥ प्रथम अंगुष्ठेंसी ॥ मध्यरेषा काढिजे ॥३॥ त्रिपुंड्र येणेंपरी ॥ लाविजे तुह्मी परिकरी ॥ एक एक रेषा विस्तारीं ॥ सांगेन ऐका एकचित्तें ॥४॥ तीन रेषा स्थानीं स्थानीं ॥ लावावें त्याच मंत्रांनीं ॥ अधिक न लाविजे भ्रूवांहूनी ॥ भ्रूसमान लाविजे ॥५॥ नव देवता निश्चयेंसी ॥ आहेत एकेक रेषेसी ॥ भकार गार्हपत्यासी ॥ भूरात्मा रजोगुणें ॥६॥ ऋग्वेद आणि क्रियाशक्ती ॥ प्रातःसवन असे ख्याती ॥ महादेव देव ह्मणती ॥ प्रथम रेषेचा येणेंपरी ॥ ७ ॥ दुसऱ्या रेषेच्या देवता ॥ सांगेन ऐका विस्तारता ॥ उकार दक्षिणाग्नी देवता ॥ नभःसत्व जाणिजे ॥ ८ ॥ यजुर्वेद ह्मणती त्यासी ॥ मध्यंदिन सवन परियेसी ॥ इच्छा शक्ती अंतरात्म्यासी ॥ महेश्वर देव जाणा ॥ ९ ॥ तिजी रेषा मधिलेसी ॥ मकार आहवनीय परियेसी ॥ परमात्मा प्रकृतीसी ॥ ज्ञानशक्ती सामवेद ॥२१०॥ तृतीय सवन त्यासी ॥ अधिदेवता तमोगुणेसी ॥ शिवशक्ती निर्धारेंसी ॥ तीन रेषा येणेंविधी ॥ ११ ॥ ऐसें नमस्कारोनी ॥ त्रिपुंड्र लाविजे भस्मेंकरूनी ॥ महेश्वराची प्रीति ह्मणोनी ॥ वेदशास्त्रें वाखाणिती ॥ १२ ॥ ब्रह्मचारी गृहस्थासी ॥ वानप्रस्थ यतीश्वरांसी ॥ समस्त लाविजे हर्षीं ॥ भस्मांकित त्रिपुंड्र ॥ १३ ॥ मुक्तिकामें जे लाविती ॥ त्यांसी नाहीं पुनरावृत्ती ॥ जें जें मनीं संकल्पिती ॥ लाभती

चारी पुरुषार्थ ॥ १४ ॥ क्षत्रिय वैश्य शूद्र त्रिविधांसी ॥ गोहत्यादि पापनाशी ॥ वीरहत्या आत्महत्येसी ॥ पवित्र करी भस्मातें ॥ १५ ॥ महापातकी आपण ॥ उपपातकी जाण ॥ भस्म लावितां तत्क्षण ॥ पुण्यात्मा तोची होय ॥ १६ ॥ विधिपूर्वक मंत्रेंसी ॥ जे लाविती भस्मासी ॥ त्यांची महिमा अपारेंसी ॥ वंद्य होय देवलोकीं ॥ १७ ॥ नेणें जरी मंत्रविधी ॥ तेणें लाविजे भावबुद्धी ॥ त्याची महिमा अपारविधी ॥ त्रिभुवनीं परियेसा ॥ १८ ॥ परद्रव्यापहार देखा ॥ परस्त्रीगमन निका ॥ असे पापी परनिंदका ॥ तरी पावन होय जाणा ॥ १९ ॥ परक्षेत्र हरण देखा ॥ परपीडन करी जो कां ॥ आरामादि तोडी पातका ॥ तोही होय पुनीत ॥ २२० ॥ दहन केलें गृहासी ॥ असत्यवादी परियेसी ॥ पैशून्यपण पापियासी ॥ वेदविक्रय पापी जाणा ॥ २१ ॥ कूटसाक्षि वृत्ती त्यागी ॥ कौटिल्य करी पोटालागीं ॥ ऐसें पाप सदां भोगी ॥ तोही होय पुनीत ॥ २२ ॥ गो पृथ्वी हिरण्य ॥ महिषी तिळ कंबळ दान ॥ घेतलें लवण वस्त्रान्न ॥ तोही पुनीत परियेसा ॥ २३ ॥ धान्य जळादि दान ॥ जो घेई नीचापासून ॥ त्यानें करणें भस्मधारण ॥ तोही पुनीत होय जाणा ॥ २४ ॥ कन्या विधवा अन्य स्त्रियेसी ॥ घडला संग जयासी ॥ अनुतप्त होवोनी परियेसी ॥ भस्म लावितां पुनीत ॥ २५ ॥ दासी वेश्या भुजंगेसीं ॥ वृषलस्त्री रजस्वलेसीं ॥ केलें असेल व्यभिचारासी ॥ तोही पुनीत होय जाणा ॥ २६ ॥ रसमांस लवणादिका ॥ केला असेल विक्रय देखा ॥ पुनीत होय भस्मसंपर्का ॥ त्रिपुंड्र लावितां परियेसा ॥२७॥ जाणोनी अथवा अज्ञानता ॥ पापें घडलीं असंख्याता ॥ नाशील सर्व पापासी ॥ भस्मपवित्रत्व भस्म लावितां ॥ पुण्यात्मा होय जाणा ॥ २८ ॥

महिमा आहे ऐसी ॥ शिवनिंदक पापीयासी ॥ नरकभोग परियेसा ॥ २९ ॥ शिवद्रव्या-
पहारिल्यासी ॥ निंदा करी शिवभक्तांसी ॥ नव्हे निष्कृती त्यासी ॥ पापावेगळा नोहे
जाणा ॥ २३० ॥ रुद्राक्षमाळा ज्याच्या गळां ॥ लाविला त्रिपुंड्र भाळा ॥ अन्यजाती
जरी झाला ॥ तोहि पूज्य तिहीं लोकीं ॥ ३१ ॥ जितुकीं तीर्थे भूमीवरी ॥ असती क्षेत्रें
नानापरी ॥ स्नान केलें पुण्यसरीं ॥ भस्म लावितां परियेसा ॥ ३२ ॥ मंत्र असती कोटी-
शत ॥ पंचाक्षरादि विख्यात ॥ आगमीं मंत्र अनंत ॥ जपिलें फळ भस्मांकिता ॥ ३३ ॥
इहलोकीं अखिल सुख ॥ होतील पुत्र शतायुष ॥ व्याधी न होय शरीरास ॥ नित्य भस्म
लावितां ॥ ३४ ॥ पूर्वजन्म सहस्रांतीं ॥ आणीकही बहूती ॥ भस्मधारणें पापें जाती ॥
बेचाळीस वंशादि ॥ ३५ ॥ अष्टैश्वर्यें त्यासी ॥ दिव्य शरीर तेजोरासी ॥ ज्ञान होय भरं-
वसीं ॥ देहांतीं मुक्त होईल ॥३६॥ बैसोनियां विमानीं ॥ दिव्य स्त्रिया नवयौवनी ॥ सेवा
करीत येणें गुणी ॥ नेती स्वर्गभुवना ॥ ३७ ॥ विद्याधर सिद्धजना ॥ गंधर्व देवांगना ॥
इंद्रादि लोकपाल जाणा ॥ वंदिती सर्व तयासी ॥ ३८ ॥ अनंतकाळ तया स्थानीं ॥ सुखें
असती संतोषोनी ॥ मग जाय तेथोनी ॥ ब्रह्मलोकीं शाश्वत ॥३९॥ एकशत कल्पवरी ॥
रहाती ब्रह्मलोकीं स्थिरीं ॥ तेथोनी जाती वैकुंठपुरीं ॥ विष्णुलोकीं परीयेसा ॥२४०॥ तीन
ब्रह्मकल्पवरी ॥ रहाती नर वैकुंठपुरीं ॥ मग पावतील कैलासशिखरीं ॥ अक्षय काळ
तेथें रहाती ॥ ४१ ॥ शिवसायुज्य तयासी ॥ संदेह सोडावा मानसीं ॥ लावावें त्रिपुंड्र
भस्मासी ॥ सनत्कुमारादिकीं ॥ ४२ ॥ वेदशास्त्र उपनिषदांत ॥ सार पाहिलें पुराणांत ॥
ह्मणोनि चतुर्विध पुरुषार्थ ॥ भस्मधारणें होती जाणा ॥४३॥ ऐसें त्रिपुंड्रमहिमान ॥ सांगि-

तलें शिवें कथून ॥ ह्मणोनि सकळ जन ॥ सनत्कुमारादि ऋषीश्वर ॥ ४४ ॥ सांगोनियां ऋषींसी ॥ ईश्वर गेले कैलासासी ॥ सनत्कुमार ऋषी ॥ ब्रह्मलोकीं पावला ॥ ४५ ॥ वामदेव महामुनी ॥ सांगती ऐसें विस्तारोनी ॥ मग ब्रह्मराक्षसें चरणीं ॥ मस्तक ठेविलें सत्वर ॥ ४६ ॥ वामदेव ह्मणे राक्षसासी ॥ भस्ममहिमा आहे ऐसी ॥ माझिया अंगस्पर्शी ॥ ज्ञान तुज प्रकाशिलें ॥४७॥ ऐसें ह्मणोनि संतोषीं ॥ अभिमंत्रोनियां भस्मासी ॥ देता झाला राक्षसासी ॥ वामदेव तयेवेळीं ॥ ४८ ॥ ब्रह्मराक्षस त्यावेळीं ॥ लावितां त्रिपुंड्र कपाळीं ॥ दिव्य देह झाला बळी ॥ तेजोमूर्ति परियेसा ॥ ४९ ॥ दिव्य देह झाला त्यासी ॥ जैसा सूर्य प्रकाशी ॥ आनंदरूप झाला परियेसी ॥ ब्रह्मराक्षस तयेवेळीं ॥ २५० ॥ नमन करोनि योगियासी ॥ केली प्रदक्षिणा भक्तीसी ॥ विमान आलें त्यासी ॥ सूर्यसंकाश परियेसा ॥ ५१ ॥ दिव्य विमानीं बैसवोनी ॥ स्वर्गी नेला तेच क्षणीं ॥ वामदेव महामुनी ॥ परमलोक तया दिधला ॥ ५२ ॥ वामदेव महादेव ॥ मनुष्य दिसतसे स्वभाव ॥ प्रत्यक्ष तो शांभव ॥ भक्तां तारू हिंडतसे ॥५३॥ त्रैमूर्तीचा अवतार ॥ वामदेव सर्वेश्वर ॥ करावया जगदुद्धार ॥ हिंडतसे भूमीवरी ॥५४॥ भस्ममहात्म्य असे थोर ॥ लागतां गुरूचा कर ॥ ब्रह्मराक्षस पावला पार ॥ उद्धार झाला तयाचा ॥५५॥ समस्त मंत्र जपती ॥ गुरुविण साध्य न होती ॥ वेदशास्त्रें वाखाणिती ॥ नास्ति तत्वं गुरोः परं ॥ ५६ ॥ सूत ह्मणे ऋषेश्वरांसी ॥ भस्ममहिमा आहे ऐसी ॥ गुरुहस्तें आहे विशेषीं ॥ तस्माद्गुरू तारक ॥ ५७ ॥ येणेंपरी विक्रमासी ॥ सांगती गुरु विस्तारेंसी ॥ त्रिविक्रमभारती हर्षी ॥ चरणावरी माथा ठेवी ॥ ५८ ॥ नमन करूनी श्रीगुरूसी ॥ निघाले आपुल्या स्थानासी ॥ झालें ज्ञान तयासी ॥ गुरूचेनि

उपदेशें ॥५९॥ येणेंपरी सिद्धमुनी ॥ सांगता झाला विस्तारोनी ॥ ऐक शिष्या नामकरणी ॥ भक्तिभावें करोनियां ॥२६०॥ ह्मणोनी सरस्वती गंगाधर ॥ सांगे गुरुचरित्र विस्तार ॥ भक्तिभावें ऐकती नर ॥ च्यारी पुरुषार्थ पावती ॥६१॥ इति श्रीगुरुचरित्रामृत ॥ भस्ममहिमा विख्यात ॥ वामदेव कृपावंत ॥ होऊनि राक्षस उद्धरिला ॥ ६२ ॥ इति श्रीगुरुचरित्रपरमकथाकल्पतरौ श्रीनृसिंहसरस्वत्युपाख्याने सिद्धनामधारकसंवादे भस्ममहिमानिरूपणं नाम एकोनत्रिंशोऽध्यायः ॥ ओंव्या २६२ ॥

॥ श्रीगणेशाय नमः ॥ नामधारक शिष्यराणा ॥ लागतसे श्रीगुरुचरणा ॥ विनवीतसे
कर जोडूनि जाणा ॥ भक्तिभावें करूनी ॥ १ ॥ जयजयाजी सिद्धमुनी ॥ तूंची तारक
भवार्णीं ॥ अज्ञानतिमिर नासोनी ॥ ज्योतिस्वरूप तूंचि होसी ॥ २ ॥ अविद्यामाया
सागरीं ॥ बुडालों होतों महापुरीं ॥ तव कृपा झालियावरी ॥ तारिलें मातें स्वामियां ॥३॥
तुवां दाविला निजपंथ ॥ तेणें जोडे परमार्थ ॥ विश्वपालक गुरुनाथ ॥ तूंचि होसी
स्वामियां ॥ ४ ॥ गुरुचरित्र सुधारस ॥ त्वांचि पाजिला आह्मांस ॥ तृप्त नव्हे गा मानस ॥
तृषा आणिक राहिली ॥ ५ ॥ त्वां केलें उपकारासी ॥ उत्तीर्ण नव्हे वंशोवंशीं ॥ निजरूप
आह्मांसी ॥ दाविलें कीं सिद्धमुनी ॥ ६ ॥ मागें कथा निरोपिलीशी ॥ अभिनव लीला
दाविसी ॥ पतिताकरी विख्यातीसी ॥ वेद चारी बोलविले ॥७॥ त्रिविक्रम मुनीश्वरासी ॥
बोधिलें ज्ञानप्रकाशीं ॥ पुढें कथा वर्तली कैशी ॥ विस्तारावी दातारा ॥ ८ ॥ ऐकोनी
शिष्याचें वचन ॥ संतोषला मुनी जाण ॥ मनोभावें आलिंगोन ॥ आश्वासिलें तयेवेळीं ॥९॥
धन्य धन्य शिष्यमौळी ॥ तुज लाधलें अभीष्ट सकळी ॥ गुरुची कृपा तात्काळीं ॥
झालीसे परियेसा ॥१०॥ धन्य धन्य तव वाणी ॥ वेध लागला गुरुचरणीं ॥ तूं तरलासी
भवार्णीं ॥ सकळाभीष्टें साधती ॥११॥ तुवां पुसिला वृत्तांत ॥ संतोष झाला बहुत ॥ सद्गुरुम-
हिमा विख्यात ॥ अगम्य असे सांगतां ॥ १२ ॥ एकेक महिमा सांगतां ॥ विस्तारेल
बहु कथा ॥ संक्षेपमार्गें तुज आतां ॥ निरोपितों परियेसी ॥१३॥ पुढें असतां वर्तमानीं ॥
तया गाणगाभुवनीं ॥ महिमा होतसे नित्यांनीं ॥ प्रख्यातरूपें जाणपां ॥ १४ ॥ त्रिमूर्तीचा
अवतार ॥ झाला नरसिंहसरस्वती नर ॥ महिमा त्याचा अपरंपार ॥ सांगतां अगम्य

परियेसा ॥ १५ ॥ तया स्थानीं असतां गुरू ॥ ख्याती झाली अपरंपारू ॥ प्रसिद्ध चहूं
राष्ट्रीं थोरू ॥ समस्त येती दर्शना ॥ १६ ॥ महिमा त्या मूर्तीची ॥ सांगतां आह्मां शक्ति
कैंची ॥ काया धरुनी मनुष्याची ॥ चरित्र केलें पृथ्वीवरी ॥ १७ ॥ भक्त येती यात्रेसी ॥
एकभावें भक्तीसी ॥ गुरुदर्शनमात्रेंसी ॥ सकळाभीष्टें साधती ॥ १८ ॥ दीन होती
श्रीयुक्त ॥ वांझेसी होय पुत्र त्वरित ॥ कुष्टें असती जे पीडित ॥ सुवर्ण होय देह त्यांचा
॥१९॥ अक्षिहीना अक्षि येती ॥ बधिर कर्णीं ऐकती ॥ अपस्मारादि रोग जाती ॥ श्रीगु-
रुचरणदर्शनें ॥ २० ॥ परिस लागतां लोहासी ॥ सुवर्ण होय तात्काळेंसी ॥ श्रीगुरुकृपा
होय ज्यासी ॥ सकळाभीष्टें पावती ॥ २१ ॥ ऐसें असतां वर्तमानीं ॥ उत्तरदेशीं माहुर-
स्थानीं ॥ होता एक विप्र धनी ॥ नांव तया गोपीनाथ ॥ २२ ॥ त्यासी पुत्र होती मरती ॥
बाळकें कदा न वांचती ॥ मग दत्तात्रेयासी आराधिती ॥ स्त्रीपुरुष दोघेजण ॥ २३ ॥
पुढें झाला तयांसी सुत ॥ तयाचें नांव ठेविलें दत्त ॥ असती आपण धनवंत ॥ अति-
प्रीती पुत्रावरी ॥ २४ ॥ एक पुत्र त्यांचे घरीं ॥ अति प्रीती तयावरी ॥ झाला पांच
संवत्सरी ॥ व्रतबंध केला त्यासी ॥ २५ ॥ वर्षें बारा होतां त्यासी ॥ विवाह करिती
प्रीतीसी ॥ अति सुंदर नोवरीसी ॥ विचारूनी प्रीतिकरें ॥ २६ ॥ मदनाचे रतिसरसी ॥
रूप दिसे नोवरीसी ॥ मातापिता अति हर्षीं ॥ पाहोनियां आल्हादती ॥ २७ ॥
दंपत्यें एकचि वयासी ॥ अतिप्रेमें महाहर्षीं ॥ वर्धतां झालीं षोडशी ॥ वर्षें त्या विप्रासी
॥ २८ ॥ दोघें सुंदर सुलक्षण ॥ एकावर एकाचा प्राण ॥ न विसंबती एक क्षण ॥
अतिप्रीति परियेसा ॥ २९ ॥ ऐसा प्रेमा असतां देखा ॥ व्याधि झाला त्या बाळका ॥

अनेक औषधें देतां देखा ॥ आरोग्य त्यासी न होय ॥ ३० ॥ न रुचे अन्न त्यासी ॥ सदां
राहे उपवासी ॥ त्याची भार्या प्रीतीसी ॥ आपण न घेई अन्न कदां ॥ ३१ ॥ पुरुषावरी
आपुला प्राण ॥ करी नित्य उपोषण ॥ पतीस देतां औषध आपण ॥ प्राशन करी परि-
येसा ॥ ३२ ॥ येणेंपरी तीन वर्षैंसी ॥ झाला व्याधि तयासी ॥ पतिव्रता स्त्री कैसी ॥
पुरुषासवें कष्टत ॥ ३३ ॥ पुरुषदेह क्षीण झाला ॥ आपण त्यासारखी अबला ॥ तीर्थ
घेवोनी चरणकमळा ॥ काळ क्रमी त्याजवळी ॥३४॥ दुर्गंधी झाला देह त्याचा ॥ जवळी
नये वैद्य साचा ॥ तुमनोभाव पतिव्रतेचा ॥ न विसंबे क्षणभरीं ॥ ३५ ॥ जितुकें अन्न
पतीसी ॥ तितुकें ग्रास आपणासी ॥ जैसें औषध त्यासी ॥ आपण तैसें घेतसे ॥ ३६ ॥
माता पिता दायाद गोत्री ॥ सकळ तिसी निवारिती ॥ पतिव्रता ज्ञानवंती ॥ नायके बोल
कवणाचे ॥ ३७ ॥ दिव्य वस्त्रें आभरणें ॥ सकळ त्यजूनि भूषणें ॥ पुरुषावरी आपुला
प्राण ॥ काय सुख ह्मणतसे ॥ ३८ ॥ उभयतांचीं मातापिता ॥ महाधनीक तत्वतां ॥ पुत्र
कन्येसी पहातां ॥ अति दुःख मानिती ॥ ३९ ॥ अनेक जप अनुष्ठान ॥ मंत्रविद्या महा-
हवन ॥ अपरमित ब्राह्मण ॥ भोजन करिती परियेसा ॥ ४० ॥ अनेकपरीचे वैद्य येती ॥
नाना रस औषधें देती ॥ शमन न होय कवणे रीती ॥ महाव्याधीनें व्यापिलें ॥ ४१ ॥
पुसताती जोशियासी ॥ पूजिती कुळदेवतेसी ॥ कांहीं केल्या पुत्रासी ॥ आरोग्य कदां
न होय ॥४२॥ वैद्य ह्मणती तयेवेळीं ॥ नव्हे बरवें कदां काळीं ॥ राखील जरी चंद्रमौळी ॥
मनुष्य यत्न नव्हे आतां ॥४३॥ ऐसें ऐकोनि मातापिता ॥ दुःखें दाटोनी करिती चिंता ॥
जयस्वामी जगन्नाथा ॥ दत्तात्रेया गुरुमूर्ती ॥ ४४ ॥ आराधोनी तुह्मासी ॥ पुत्र पावलों

गु. च. | अ. ३०

संतोषीं ॥ पापरूप आपणासी ॥ निधान केवीं जिरेल ॥ ४५ ॥ एक पुत्र आमुचे वंशीं ॥ त्यासी जरी न राखिसी ॥ प्राण देवों त्यासरसी ॥ दत्तात्रेया स्वामिया ॥ ४६ ॥ ऐसें नानापरी देखा ॥ दुःख करिती जननीजनका ॥ वारितसे पुत्र ऐका ॥ मातापिता आलिंगोनी ॥ ४७ ॥ ह्मणे आपुले भोग सरले ॥ जितुकें ऋण तुह्मा दिधलें ॥ अधिक घेऊं केवीं भलें ॥ ऋणानुबंध न चुकेची ॥ ४८ ॥ ऐसें ह्मणतां मातापिता ॥ दोघें झालीं मूर्च्छा-गता ॥ पुत्रावरी लोळतां ॥ महादुःखें करोनियां ॥ ४९ ॥ ह्मणती ताता पुत्रराया ॥ आमुची आशा झाली वाया ॥ पोषिसी आह्मा ह्मणोनियां ॥ केला होता निश्चय ॥ ५० ॥ उल्लंघोनी आह्मासी ॥ केवीं तूं जाऊं पहासी ॥ वार्द्धक्यपणीं आपणासीं ॥ धर्म केवीं घडे तुज ॥ ५१ ॥ ऐकोनियां तयांचें वचन ॥ विनवीतसे आक्रंदोन ॥ करणें ईश्वरा आधीन ॥ मनुष्य यत्न न चाले ॥ ५२ ॥ मातापिता यांचें ऋण ॥ एक घडीचें स्तन-पान ॥ उत्तीर्ण कांहीं केल्या न जाण ॥ जन्मांतरीं येउनियां ॥ ५३ ॥ आपण जन्मलों तुमच्या उदरीं ॥ कष्ट दाविले अति भारी ॥ सौख्य न देखा निर्धारीं ॥ ऐसा पापी आपण जाणा ॥ ५४ ॥ आतां दुःख न करणें ॥ परमार्थी दृष्टी देणें ॥ जैसें कांहीं असे होणें ॥ ब्रह्मादिकां न चुकेची ॥ ५५ ॥ येणेंपरी जननीजनका ॥ सांगतसे पुत्र निका ॥ तेणें-परी स्त्रियेसी ऐका ॥ सांगतसे परियेसा ॥ ५६ ॥ ह्मणे ऐक प्राणेश्वरी ॥ झाले आमुचे दिवस पुरी ॥ मजनिमित्त कष्टलीस भारी ॥ वृथा गेले कष्ट तुझे ॥ ५७ ॥ पूर्वजन्मींचा वैरी आपण ॥ तुजसीं होतें माझें ऋण ॥ ह्मणोनि दिधले जाण ॥ जन्मांतरींचे कष्ट देखा ॥ ५८ ॥ जरी राहसी आमुचे घरीं ॥ तुज पोषितील पुत्रापरी ॥ जरी वाटतील कष्ट

भारी ॥ जाईं आपुल्या माहेरा ॥ ५९ ॥ ऐसें तुझें सुंदरपण ॥ न लाधे आपण दैवहीन ॥
न राहे तुझें अहेवपण ॥ माझें अंग स्पर्शतां ॥ ६० ॥ ऐकतां पतीचें वचन ॥ मूर्च्छा आली
तत्क्षण ॥ चरणीं मस्तक ठेवून ॥ ललना दुःख करी ते वेळीं ॥६१॥ ह्मणे स्वामी प्राणेश्वरा ॥
तुह्मीं माझा अव्हेर न करा ॥ तुह्मासारिखा दातारा ॥ आणीक नव्हे कधीं मज ॥ ६२ ॥
जेथें असेल तुमचा देह ॥ तेथेंचि असे माझा भाव ॥ मनीं न करावा संदेह ॥ समागमें
येईन मी ॥ ६३ ॥ ऐशी दोघांची वाणी ॥ ऐकोनियां जनकजननी ॥ देह टाकोनियां
धरणीं ॥ दुःख करिती आक्रोशें ॥ ६४॥ तेव्हां ती उठवोनियां श्वशुरासी ॥ संबोधोनि
सांगे सासूसी ॥ न करावी चिंता मानसीं ॥ पती वांचेल निर्धारें ॥ ६५ ॥ विनवीतसे
तयेवेळीं ॥ आह्मां राखील चंद्रमौळी ॥ पाठवा एखादिया स्थळीं ॥ पति माझा वांचेल
॥ ६६ ॥ सांगती लोक महिमा ख्याती ॥ नरसिंहसरस्वती गुरुमूर्ती ॥ गाणगापुरीं वास
करिती ॥ तयालागीं पाठवा ॥ ६७ ॥ त्यांचे दर्शनमात्रेंसी ॥ आरोग्य होईल पतीसी ॥
आह्मां पाठवा त्वरेंसी ॥ ह्मणोनि चरणीं लागली ॥ ६८ ॥ मानवलें समस्तांसी ॥ माता-
पिता श्वशुरांसी ॥ निरोप पुसूनि समस्तांसी ॥ निघती झाली तयेवेळीं ॥ ६९ ॥ त्या
रोगिया करोनि डोली ॥ घेवोनि निघाली बाळी ॥ विनवीतसे तयेवेळीं ॥ आपुलिया
श्वशुरासी ॥ ७० ॥ स्थिर करोनि अंतःकरण ॥ सुखें रहावें दोघेंजण ॥ पती असे माझा
प्राण ॥ राखील आमुची कुळदेवता ॥ ७१ ॥ ह्मणूनि सासूश्वशुरांसी ॥ नमन करी प्रीती-
सी ॥ आशीर्वाद देती हर्षी ॥ सौभाग्य असे अखंड ॥७२॥ तव दैवें तरी आतां ॥ आमुचा
पुत्र वांचो तत्वतां ॥ ह्मणोनि बोलती उभयतां ॥ आशीर्वाद देती क्षणोक्षणीं ॥ ७३ ॥

येणेंपरी पतीसहित ॥ होती झाली मार्गस्थ ॥ किंचित्काळ मार्ग क्रमित ॥ आली गाणगापुरासी ॥ ७४ ॥ मार्ग क्रमितां रोगियासी ॥ अधिक झाला त्रिदोषी ॥ उतरतां ग्रामप्रदेशीं ॥ अति संकट ओढवलें ॥ ७५ ॥ विचारिती श्रीगुरूसी ॥ गेले होते संगमासी ॥ जावें ह्मणोनि दर्शनासी ॥ निघती झाली तयेवेळीं ॥ ७६ ॥ पतिव्रता तयेवेळीं ॥ आली आपुले पतीजवळीं ॥ अंतकाळ पातला तात्काळीं ॥ प्राण गेला तत्क्षणीं ॥ ७७ ॥ आक्रोश करी ते नारी ॥ लोळतसे धरणीवरी ॥ भोंकूनि घ्यावया मागे सुरी ॥ वारिती मग जनलोक समस्त ॥ ७८ ॥ आपटी शिर भूमीसी ॥ हाणी पाषाण उरासी ॥ केश मोकळे आक्रोशी ॥ प्रलापीतसे परियेसा ॥ ७९ ॥ आहा देवा काय केलें ॥ कां मज गाईसी गांजिलें ॥ आशा करोनियां आलें ॥ राखिसी प्राण ह्मणूनियां ॥ ८० ॥ पूजेसी जातां देउळांत ॥ तेंव तेंचि पडूनि करी घात ॥ ऐशी कानीं ऐकूं मात ॥ आजि प्रत्यक्ष देखिलें ॥ ८१ ॥ उष्णकाळीं तापोनि नर ॥ वृक्ष पाहोनि बैसे स्थिर ॥ वृक्षचि पडे अंगावर ॥ त्यापरी झालें मज ॥ ८२ ॥ तृषें करूनी पीडित ॥ जाय मनुष्य गंगेंत ॥ संधि सुसरी करी घात ॥ त्याचिपरी झालें मज ॥ ८३ ॥ व्याघ्रभयें पळे धेनू ॥ प्राण जाईल ह्मणोनू ॥ तेथें वधितसे यवनू ॥ तयापरी झालें मज ॥ ८४ ॥ ऐशी मी पापीण दैवहीन ॥ आपुल्या पतीचा घेतला प्राण ॥ मातापितयांसि त्यजून ॥ घेवोनि आल्यें विदेशीं ॥ ८५ ॥ येणेंपरी करितां दुःख ॥ पाहों आले ग्रामलोक ॥ संबोखिती सकळिक ॥ अनेकापरी करोनियां ॥ ८६ ॥ नानाप्रकारें समजावोनी ॥ कां दुःख करिसी ह्मणी ॥ विचार करी अंतःकरणीं ॥ होणार न चुके सकळिकां ॥ ८७ ॥ ऐसें म्हणती नरनारी ॥ तिजला दुःख

झालें भारी ॥ आठवीतसे परोपरी ॥ आपुलें जन्मकर्म सकळ ॥ ८८ ॥ ऐकाहो तुह्मी मायबहिणी ॥ पतीस आल्यें घेवोनी ॥ आतां कैसी वांचूं साजणी ॥ याची आस करोनियां ॥ ८९ ॥ आतां कवणा शरण जावें ॥ राखेल कोण माझा जीवें ॥ प्राणेश्वर त्यजूनि दैवें ॥ केवीं वांचूं म्हणतसे ॥ ९० ॥ बाळपणीं गौरीसी ॥ पूजा केली शंकरासी ॥ विवाह होतां परियेसी ॥ मंगलागौरी पूजिली ॥ ९१ ॥ चुडे कंकणाचे आवोनी ॥ पूजिली म्यां भवानी ॥ सांगतसे सुवासिनी ॥ अनेक केलीं व्रतादिकें ॥ ९२ ॥ जें जें सांगती मातें व्रत ॥ तें तें केलें अखंडित ॥ सर्व झालें आतां व्यर्थ ॥ रुसली गौरी आपणावरी ॥ ९३ ॥ आतां माझे हळदीसी ॥ चोर पडले गळसरिसी ॥ समस्त दिधलें वरासी ॥ कंकणादि कंचुकी ॥ ९४ ॥ कोठें गेलें माझें पुण्य ॥ वृथा पूजिला गौरीरमण ॥ कैसें केलें मज निर्वाण ॥ ऐका मायबहिणी हो ॥ ९५ ॥ केवीं राहूं आतां आपण ॥ पति होता माझा प्राण ॥ लोकांसारिखा नव्हे जाण ॥ प्राणेश्वर माझा हो ॥ ९६ ॥ पूर्वजन्मींचा वैरी आपण ॥ तुजसीं होतें माझें ऋण ॥ ह्मणोनि दिधले जाण ॥ जन्मांतरींचे कष्ट देखा ॥ ९७ ॥ ऐसें नानापरी देखा ॥ पतिव्रता करी दुःखा ॥ पतीचे पाहतसे मुखा ॥ आणिक दुःख अधिक करी ॥ ९८ ॥ आलिंगोनि प्रेतासी ॥ रुदन करी बहुत [illegible] ॥ आठवी आपुल्या दशेसी ॥ पूर्वस्नेहें तयेवेळीं ॥ ९९ ॥ ह्मणे पुरुषा प्राणेश्वरा ॥ कै[illegible] त्यजिलें निर्धारा ॥ कीं उबगला-सी सुंदरा ॥ ह्मणोनि मातें त्यजिलें ॥ १०० ॥ कैसी आपण दैवहीन ॥ घटा खापर लागतां भिन्न ॥ होतासि तूं निधान ॥ आयुष्य कैसें सरलें पैं ॥ १ ॥ तुमच्या मातापित्यासी ॥ सोडोनि आणिलें परदेशीं ॥ जेणेंपरी श्रावणासी ॥ वधिलें राजा दशरथें ॥ २ ॥ तैसी

तुमची जनकजननी ॥ तुह्मां आणिलें त्यजूनी ॥ तुमची वार्ता ऐकोनी ॥ दोघें प्राण
त्यागितील ॥ ३ ॥ तिन्ही हत्या भरंवसीं ॥ घडल्या मज पापिणीसी ॥ वैरिणी मी तु-
ह्मासी ॥ पतिघातकी सत्य जाणा ॥ ४ ॥ ऐसी पापिणी चांडाळी ॥ निंदितील लोक
सकळी ॥ प्राण घेतले कीं मी बळी ॥ पतिघातकी ह्मणती मज ॥ ५ ॥ स्त्री नव्हे मी तुम-
ची वैरी ॥ जैसी तीव्र शस्त्रधारी ॥ वेधलें तुमच्या शरीरीं ॥ घेतला प्राण आपण ॥ ६ ॥
मातापिता बंधु सकळी ॥ जरी असती तुह्माजवळी ॥ सुख पहाती अंतकाळीं ॥ तयांसि
विघ्न म्यां केलें ॥ ७ ॥ वृद्ध सासुसासऱ्यांस ॥ पोसाल ह्मणोनि होती आस ॥ पुरला नाहीं
त्यांचा सोस ॥ त्यांतें सांडोनि केवीं जाल ॥ ८ ॥ एकुलतें एक तुह्मी त्यांसी ॥ कां उब-
गलातीं पोसावयासी ॥ आह्मां कोठें ठेवूनिं जासी ॥ प्राणेश्वरा दातारा ॥ ९ ॥ आतां मीं
कोठें जावें ॥ कोणीं मातें पोसावें ॥ कैसें काय करावें ॥ निघोनि जासी प्राणेश्वरा ॥१०॥
तूं माझा प्राणेश्वर ॥ तुझा न पडे विसर ॥ लोकांसारिखा नव्हेसि नर ॥ प्रतिपाळिलें प्रि-
यभावें ॥ ११ ॥ कधीं नेणें पृथक् शयन ॥ वामहस्त उशीवीण ॥ फुटतसे अंतःकरण ॥
केवीं वांचूं प्राणेश्वरा ॥ १२ ॥ किती आठवूं तुझे गुण ॥ पति नव्हेसि केवळ प्राण ॥ सो-
डोनि जातोसि निर्वाण ॥ कोणीं आह्मां पोसावें ॥ १३ ॥ आतां कोणाचे घरीं जाणें ॥
कोण घेतील मम पोसणें ॥ बाळविधवा ह्मणोनि भेणें ॥ जन अपवाद ठेविती ॥ १४ ॥ ए-
खादी बुद्धि न सांगतां ॥ आह्मां त्यजिलें प्राणनाथा ॥ कोठें जावें आपण आतां ॥ केश-
वपन करूनी ॥ १५ ॥ तव प्रेमें होतें भरल्यें ॥ मातापितयांतें विसरल्यें ॥ त्यांच्या गृहीं
नाहीं गेलें ॥ बोलावणीं नित्य येती ॥ १६ ॥ केवीं जावों त्यांचे घरीं ॥ उपेक्षिलें प्राणे-

श्वरीं ॥ दैन्यवृत्ति आतां घरीं ॥ चित्त त्यांचें केवीं धरूं ॥ १७ ॥ जोंवरि होतासि तूं छत्र ॥ तों सर्वांगाचीं मी पवित्र ॥ मानिती सकळ इष्टमित्र ॥ आतां निंदा करतील ॥ १८ ॥ सासूश्वशुरांपासीं जाणें ॥ माझें मुख पाहतां मरणें ॥ गृह तें अरण्य जाणे ॥ तुझ्यांविण प्राणपती ॥ १९ ॥ घेवोनि आलें आरोग्यासी ॥ येथें ठेवोनि तुह्मांसी ॥ केवीं जावें घरासी ॥ राक्षसी मी पापीण ॥ १२० ॥ ऐसें आठवोनि अनेकपरी ॥ दुःख करीतसे नारी ॥ इतुकें होतां ते अवसरीं ॥ आला तेथें सिद्ध एक ॥ २१ ॥ भस्मांकित जटाधारी ॥ रुद्राक्ष भूषणें निर्धारी ॥ त्रिशूळ धरिला असे करीं ॥ येवोनि जवळी उभा ठेला ॥ २२ ॥ संबोधित असे ते अवसरीं ॥ कांवो प्रलय करिसी नारी ॥ जैसें लिहिलें असे कपाळीं ॥ त्याचपरी होतसे ॥ २३ ॥ पूर्वजन्मींचें फळ ॥ लागलें देहासि सकळ ॥ वायां रडसी निष्फळ ॥ शोक आतां करूं नको ॥ २४ ॥ आठ दिवस जरी रडसी ॥ न येती प्राण प्रेतासी ॥ जसें लिहिलें ललाटासी ॥ त्यापरी घडेल जाण ॥ २५ ॥ मूढपणें दुःख करिसी ॥ समस्त मरणार तूं जाणसी ॥ कोण वांचले धरित्रीसी ॥ सांग आपणा ह्मणतसे ॥ २६ ॥ आपुला ह्मणसी प्राणेश्वर ॥ कोठें उपजला निर्धार ॥ तुझा जन्म झाला येर ॥ कोण आपुला मातापिता ॥ २७ ॥ पूर येतां गंगेप्रती ॥ नानापरींचीं काष्ठें वाहती ॥ येऊनि एके ठायीं मिळतीं ॥ फांकती आणीक चहूंकडे ॥ २८ ॥ तैसा संसार जाण नारी ॥ कोण जन्मला आहे स्थिरी ॥ मायामोहें कलत्रपुत्रीं ॥ पती ह्मणसी आपुला ॥ २९ ॥ गंगेमध्यें जैसा फेण ॥ तैसाचि हा देह जाण ॥ स्थिर नव्हेगे याकारण ॥ शोक वृथा करूं नको ॥ १३० ॥ पंचभूतात्मक देह ॥ तत्संबंधीं गुण पाहे ॥ आपुलें कर्म जैसें आहे ॥ तैसे गुण उद्भवती ॥ ३१ ॥

गुणानुबंधें कर्मे घडती ॥ तयासारिखी फलप्राप्ती ॥ मायामोहाची रीती ॥ मायामय कर्मसंबंधें ॥३२॥ मायासंबंध मायागुण ॥ उपजे सत्वरजस्तमोगुण ॥ तेणेंचि रीती होय जाण ॥ त्रिगुणात्मक अवधारा ॥ ३३ ॥ याचि संसार वर्तमानीं ॥ समस्त कर्मांचे आधीन प्राणी ॥ सुखदुःख आपुल्या गुणीं ॥ भोगिजे आपुल्या अर्जितें ॥ ३४ ॥ कल्पकोटी दिवसांवरी ॥ देवांसि आयुष्य आहे जरी ॥ त्यांसी काळ न चुके परी ॥ तेथें मनुष्याचा पाड काय ॥ ३५ ॥ काळ सकळां कारण ॥ कर्माधीन देह जाण ॥ ह्मणोनि कल्पावें अस्थिरपण ॥ पांच भौतिक देहासी ॥ ३६ ॥ काळ कर्माधीन गुण ॥ पंचमहाभूतात्मक देह जाण ॥ उपजतां संतोषे मन ॥ मेलिया दुःख न करावें ॥ ३७ ॥ गर्भीं जधीं येतांचि नर ॥ नाश असे त्याचे बरोबर ॥ जैसें कर्म गुण येर ॥ मरण जनन परियेसा ॥ ३८ ॥ कोणासी मृत्यु पूर्ववयासी ॥ कोणा मृत्यु वार्धक्येसी ॥ जैसें अर्जित ज्यासी ॥ त्याचिपरी घडतसे ॥३९॥ पूर्वजन्मार्जितासरसी ॥ भोगणें असे सुखदुःखासी ॥ कलत्र पुत्र अतिहर्षी ॥ पापपुण्यवश जाणा ॥४०॥ आयुष्य सुखदुःख ॥ पापपुण्यानुसार लेख ॥ ललाटीं लिहिलें सुखदुःख ॥ अढळ असे सर्वांसी ॥४१॥ एकादिया कर्मासी ॥ लंघिजेल पुण्यबळेंसी ॥ देवदानव मनुष्यांसी ॥ काळ न चुके सर्वथा ॥ ४२ ॥ संसार म्हणजे स्वप्नापरी ॥ इंद्रजाल अवधारीं ॥ मिथ्या जाण तयापरी ॥ दुःख आपण करूं नये ॥ ४३ ॥ शतसहस्र कोटी जन्मीं ॥ तूं कोणाची होतीस भामिनी ॥ वायां दुःख करिसी साजणी ॥ मूर्खपणें करोनियां ॥ ४४ ॥ पंचभूतात्मक शरीर ॥ त्वचा शिरा मांस रुधिर ॥ मेदोमज्जा अस्थि नर ॥ विष्ठामूत्र श्लेष्मसंधी ॥ ४५ ॥ ऐशा शरीरघोरांत ॥ पाहातां काय स्वार्थ ॥ मळमूत्र भरलें रक्त ॥ तया-

गु. च.

अ. ३०

कारणें शोक करिसी ॥ ४६ ॥ विचार पाहे पुढें आपुला ॥ कोणेंपरी मार्ग भला ॥ संसार-
सागर पाहिजे तरला ॥ तैसा मार्ग पाहे तूं ॥ ४७ ॥ येणेंपरी तियेसी ॥ बोधिता झाला
तापसी ॥ ज्ञान झालें तियेसी ॥ सांडिला शोक तयेवेळीं ॥४८॥ कर जोडोनि तयेवेळीं ॥
माथा ठेविला चरणकमळीं ॥ विनवीतसे करुणाबाहळी ॥ उद्धरावें स्वामी ह्मणोनी ॥ ४९ ॥
कवण मार्ग आपणासी ॥ कैसा स्वामी निरोप देसी ॥ जनकजननी तूं आह्मासी ॥ तारीं
तारी ह्मणतसे ॥ ५० ॥ कोणत्या प्रकारें आपण ॥ तरेन मी भवार्णवापासून ॥ तूं निरोपि
सी तैसें करीन ॥ ह्मणोनि चरणीं लागली ॥ ५१ ॥ ऐकोनि तियेचें वचन ॥ सांगे चरित्र
विस्तारोन ॥ प्रसन्न झाला योगी आपण ॥ सांगे आचार तियेसी ॥ ५२ ॥ ह्मणे सरस्वती
गंगाधर ॥ त्याचे वचनीं विस्तार ॥ ऐकतां होय पाप दूर ॥ सकळाभीष्टें साधती ॥ ५३ ॥
इति श्रीगुरुचरित्रपरमकथाकल्पतरौ श्रीनृसिंहसरस्वत्युपाख्याने सिद्धनामधारकसंवादे
प्रेतांगनाशोकोनाम त्रिंशत्तमोऽध्यायः ॥ ओंव्या १५३ ॥

॥ श्रीगणेशाय नमः॥ सिद्ध ह्मणे नामधारका ॥ पुढें अपूर्व झालें ऐका ॥ योगेश्वर कारणिका ॥ सांगे स्त्रियांचे धर्म सकळ ॥ १ ॥ योगेश्वर ह्मणती तियेसीं ॥ आचार स्त्रियांचे पुससी ॥ सांगेन तुज विस्तारेंसी ॥ भवसागर तरावया ॥ २ ॥ पति असतां कोण धर्म ॥ अथवा मेलिया काय कर्म ॥ उभय विस्तारें नेम ॥ सांगेन ऐका एकचित्तें ॥ ३ ॥ कथा स्कंदपुराणांत ॥ काशीखंड विस्तारांत ॥ स्त्रियांचे धर्म बहूत ॥ एकचित्तें ऐकावे ॥ ४ ॥ अगस्तिऋषी महाज्ञानी ॥ वसत होता काशीभुवनीं ॥ लोपामुद्रा ज्ञानी ॥ त्याची भार्या परियेसा ॥ ५ ॥ पतिव्रता शिरोमणी ॥ दुजी नव्हती आणीक कोणी ॥ असतां तेथें वर्तमानीं ॥ झालें अपूर्व परियेसा ॥ ६ ॥ त्या अगस्तीचा शिष्य विख्यात ॥ विंध्याचळ नामें परमख्यात ॥ पर्वतरूपें असे वसत ॥ श्रेष्ठ होत पृथ्वीवरी ॥ ७ ॥ विंध्याचळ ह्मणोनि गिरी ॥ अपूर्व वनें त्यावरी ॥ शोभायमान परोपरी ॥ बहुरम्य परियेसा ॥ ८ ॥ ब्रह्मर्षी नारदमुनी ॥ हिंडत गेला तये स्थानीं ॥ संतोष पावला पाहोनीं ॥ स्तुती केली तयेवेळीं ॥ ९ ॥ नारद ह्मणे तयासी ॥ सर्वांत श्रेष्ठ तूं होसी ॥ सकळ वृक्ष तुजपासीं ॥ महा उच्च थोर तूं ॥ १० ॥ परी एक असे उणें ॥ मेरूसमान नव्हे जाणें ॥ स्थळ स्वल्प याकारणें ॥ महत्व नाहीं परियेसा ॥ ११ ॥ ऐसें ह्मणतां नारदमुनी ॥ विंध्याचळ कोपोनी ॥ वाढता झाला तेक्षणीं ॥ मेरूपरी होईन ह्मणे ॥ १२ ॥ वाढे विंध्याचळ देखा ॥ सूर्यमंडळासंमुखा ॥ क्रमांतरें वाढतां ऐका ॥ लागे स्वर्गभुवनासी ॥ १३ ॥ विंध्याद्रीच्या दक्षिण भागासीं ॥ अंधकार अहर्निशीं ॥ सूर्यरश्मी न दिसे कैसी ॥ यज्ञादि कर्में राहिलीं ॥ १४ ॥ ऋषी समस्त मिळोनी ॥ शरण आले इंद्रभुवनीं ॥ विंध्याद्रीची करणी ॥ सांगते झाले

विस्तारें ॥ १५ ॥ इंद्र कोपे तयेवेळीं ॥ गेला विधात्याजवळी ॥ सांगितला वृत्तांत सकळी ॥ तया विंध्यपर्वताचा ॥ १६ ॥ ब्रह्मा ह्मणे इंद्रासी ॥ आहे कारण आह्मासी ॥ अगस्ती असे पुरीं काशी ॥ त्यासी दक्षिण दिशे पाठवावें ॥ १७ ॥ दक्षिण दिशा भूमीसी ॥ अंधार पडियेला परियेसी ॥ याकारणें अगस्तीसी ॥ दक्षिण दिशे पाठवावें ॥ १८ ॥ अगस्तीचा शिष्य देखा ॥ विंध्याचळ असे निका ॥ गुरु येतांचि संमुखा ॥ नमितां होईल दंडवत ॥ १९ ॥ सांगेल अगस्ति शिष्यासी ॥ वाढों नको ह्मणे त्यासी ॥ नमन करितां शिखरेसी ॥ भूमीसमान करील ॥ २० ॥ याकारणें तुह्मी आतां ॥ काशीपुरा जावें त्वरितां ॥ अगस्तीतें नमतां ॥ दक्षिणेसी पाठवावें ॥ २१ ॥ येणेंपरी इंद्रासी ॥ सांगे ब्रह्मा ते क्षणेसीं ॥ निरोप घेऊन वेगेंसीं ॥ निघता झाला अमरनाथ ॥ २२ ॥ देवांसहित इंद्र निका ॥ सवें बृहस्पती सखा ॥ सकळ ऋषी मिळोनि देखा ॥ आले काशिभुवनासी ॥ २३ ॥ अगस्तीच्या आश्रमासी ॥ पातले समस्त देव ऋषी ॥ सांगते झाले त्यापासीं ॥ बृहस्पतीसहित ॥ २४ ॥ देखोनियां अगस्तिमुनी ॥ सकळांतें अभिवंदोनी ॥ अर्घ्यपाद्य देऊनी ॥ पूजा केली भक्तीनें ॥ २५ ॥ देव आणि बृहस्पती ॥ अगस्तीची करिती स्तुती ॥ आणिक तैसें विनवीती ॥ लोपामुद्रा सतीतें ॥ २६ ॥ देवगुरु बृहस्पती ॥ सांगे पतिव्रता धर्मख्याती ॥ पूर्वीं पतिव्रता बहुती ॥ परी इचे समान नाहीं ॥ २७ ॥ अरुंधती सावित्री सती ॥ अनसूया महासती ॥ शांडिल्याची पत्नी होती ॥ पतिव्रता विख्यात ॥ २८ ॥ लक्ष्मी पार्वती स्वयंभूपत्नी ॥ मेनका नामें गुणवती ॥ हिमाचलाची पत्नी ॥ पतिव्रता ते ॥ २९ ॥ सुनीती ध्रुवाची माता ॥ संज्ञा देवी सूर्यकांता ॥ स्वाहा देवी विख्याता ॥

गु.
च.

यज्ञपुरुष प्राणेश्वरी ॥ ३० ॥ याहूनि मुख्य ख्याती ॥ लोपामुद्रा महासती ॥ ऐका तुह्मी समस्त प्रीतीं ॥ बृहस्पती सांगतसे ॥३१॥ पतिव्रतेचें आचरण ॥ सांगे गुरु विस्तारोन ॥ पुरुष जेवितां प्रसाद जाण ॥ मुख्य भोजन प्रियेसी ॥ ३२ ॥ आणीक सेवा करणें ॥ पुरुष देखोनि उभें राहणें ॥ आज्ञेविण बैसों नेणें ॥ अवज्ञा न करणें पतीची ॥ ३३ ॥ दिवस अखंड सेवा करणें ॥ अतिथिपूजनीं साह्य होणें ॥ पतिनिरोपाविण कोठें न जाणें ॥ दानधर्म न करावा ॥ ३४ ॥ पतीची सेवा निरंतरीं ॥ मनीं भाविजे हाचि हरी ॥ शयनकाळीं प्रेमें रात्रीं ॥ सेवा करी भक्तीसी ॥ ३५ ॥ पति निद्रित झाल्यावरी ॥ आपण शयन कीजे नारी ॥ चोळी तानवडे ठेवोनि दुरी ॥ पुरुषासीं स्पर्शावें ॥ ३६ ॥ स्पर्शें चोळी पुरुषासी ॥ हानि होत आयुष्यासी ॥ घेऊं नये नांव पुरुषासी ॥ आयुष्य उणें होतसे ॥ ३७ ॥ जागृत न होतां पति ऐका ॥ पूर्वीं उठावें सतीनें देखा ॥ करणें संमार्जन ऐका ॥ गृहकृत्य मंगळ ॥ ३८ ॥ स्नान करूनि त्वरित ॥ पूजुनि घ्यावें पतितीर्थ ॥ चरणीं मस्तक ठेवोनि यथार्थ ॥ शिवसमान भावावें ॥३९॥ असतां गहीं पुरुष ॥ शृंगार करणें सर्व हर्ष ॥ ग्रामा गेलिया पुरुष ॥ शृंगार आपण करूं नये ॥ ४० ॥ पति निष्ठुर बोले जरी ॥ आपण कोप कदां न करी ॥ क्षमा ह्मणोनि चरण धरी ॥ मनीं प्रीति मानुनि ॥ ४१ ॥ पति येतां बाहेरूनी ॥ सामोरी जाय तेक्षणीं ॥ सकळ कामें त्यजूनी ॥ संमुख जाय पतिव्रता ॥ ४२ ॥ काय निरोप ह्मणूनि ॥ पुसावें सती वंदोनी ॥ जें वसे पतीच्या मनीं ॥ त्याचपरी रहाटावें ॥ ४३ ॥ पतिव्रतेचें ऐसें लक्षण ॥ सांगेन ऐका देवगण ॥ बहिर्द्वारीं जातां जाण ॥ अनेक दोष परियेसा ॥ ४४ ॥ बहिर्द्वारीं जाणें जरी ॥ पाहूं नये नरनारी ॥ सर्वे-

न्चि परतावें लवकरी ॥ आपुले गृहीं असावें ॥४५॥ जरी पाहे बहिर्द्वारीं ॥ उलूकयोनीं ज-
न्मे नारी ॥ याच प्रकारें निर्धारीं ॥ पातिव्रत्य लोपामुद्रेचें ॥ ४६ ॥ लोपामुद्रा पतिव्रता ॥
बाहेर नयेचि सर्वथा ॥ प्रातःकाळ जों होतां ॥ संमार्जन करीतसे ॥ ४७ ॥ देव उपकरणें
उजळोनी ॥ गंधाक्षतादि करूनी ॥ पुष्प वाती पंचवर्णी ॥ रंगमाळा देवांसी॥ ४८ ॥ अनु-
ष्ठानास घरांत येतां ॥ साहित्य सर्व करी त्वरितां ॥ धरोनि पतीच्या चित्ता ॥ पतीसवें
रहाटे ती ॥ ४९ ॥ पुरुषाचें उच्छिष्ट भोजन ॥ मनोभावें करणें ॥ नसतां पुरुष घरीं जाण ॥
द्यावा अतिथिप्रसाद ॥ ५० ॥ अतिथीसी घालावें अन्न ॥ अथवा धेनूतें पूजोन ॥ करी स-
गुण भोजन ॥ ते सत्य पतिव्रता ॥ ५१ ॥ गृह निर्मळ निरंतर करी ॥ निरोपावेगळा धर्म
न करी ॥ व्रतोपवास येणेंपरी ॥ निरोपा वेगळें न करीच ॥ ५२ ॥ उत्साह होतां नगरांत ॥
कधीं न पाहे निश्चित ॥ तीर्थयात्रा विवाहार्थ ॥ कधींहीं न जाय ॥ ५३ ॥ पुरुष असतां
घरीं ॥ दुश्चित नसावी नारी ॥ पुरुष दुश्चित असला जरी ॥ आपण संतोषी नसावें ॥ ५४ ॥
रजस्वला झालिया देखा ॥ बोलों नये मौन निका ॥ नायकावे वेद निका ॥ मुख पुरुषा
दाखवूं नये ॥ ५५॥ ऐसें चारी दिवसांवरी ॥ आचरावें तिये नारी ॥ शुद्ध होतां ते अवसरीं ॥
पुरुषमुख विलोकिजे ॥५६॥ जरी नसे पुरुष भवनीं ॥ त्याचें स्मरण करावें मनीं ॥ सूर्यमंडळ
पाहोनि ॥ घरांत जावें पतिव्रतें ॥ ५७ ॥ पुरुष आयुष्यवर्धनार्थ ॥ कुंकुम लावावें मुख्यार्थ ॥
सेंदूर काजळ कंठसूत्र ॥ फणी माथा असावी ॥ ५८ ॥ तांबुल द्यावें सुवासिनी ॥
असावी तिचे माथां वेणी ॥ करीं कंकणें तोडर चरणीं ॥ पुरुषासमीप येणेंपरी ॥ ५९ ॥
न करी इष्टत्व शेजारणीशीं ॥ रजकस्त्री कुंटिणीसीं ॥ जैनस्त्री द्रव्यहीनेसीं ॥ इष्टत्व करितां

हानि होय ॥ ६० ॥ पुरुषनिंदक स्त्रियेसीं ॥ न बोलावें तियेसी ॥ बोलतां दोष घडे
तिसी ॥ पातिव्रत्य भंगे जाण ॥६१॥ सासू श्वशूर नणंद बहिणी ॥ दीर भावांतें त्यजूनी ॥
राहतां वेगळेपणीं ॥ श्वानजन्म पावेल ॥ ६२ ॥ आंग धुवों नये नग्नपणें ॥ उखळ मुसळीं
न बैसणें ॥ पायीं विरवल्यावीण जाणें ॥ फिरूं नये पतिव्रतें ॥ ६३ ॥ जातें उंबऱ्या-
वरी देखा ॥ बैसों नये वडिलासंमुखा ॥ पतिव्रता लक्षण ऐका ॥ येणेंपरी असावें ॥ ६४ ॥
पतिसवें विवाद ॥ करितां पावे महाखेद ॥ पति अंतःकरणीं उद्वेग ॥ आपण कदां करूं
नये ॥ ६५ ॥ जरी असे अभाग्य पुरुष ॥ नपुंसक जरी असे देख ॥ असे व्याधिष्ट अवि-
वेक ॥ तरी देवासमान मानावा ॥ ६६ ॥ तैसा पुरुष असेल जरी ॥ तोचि मानावा हरी ॥
त्याचे बोलणीं रहाटे तरी ॥ परमेश्वरा प्रिय होय ॥ ६७ ॥ पतीचे मनीं जी आवडी ॥
तैसींच ल्यावीं लेणीं लुगडीं ॥ पती दुश्चित असतां घडी ॥ आपण शृंगार करूं नये ॥६८॥
सोपस्कार पाहिजे जरी ॥ न सांगावें आपण नारी ॥ असतां कन्यापुत्र जरी ॥ तयां-
मुखीं सांगवावें ॥ ६९ ॥ जरी नसेल जवळी कोण ॥ वस्तूची दाखवावी खूण ॥ अमुक
पाहिजे ह्मणोन ॥ निर्धार करोनी न सांगिजे ॥ ७० ॥ जितुकें मिळालें पतीसी ॥ संतुष्ट
असावें मानसीं ॥ समर्थ पाहोनी कांक्षेसी ॥ पतिनिंदा करूं नये ॥ ७१ ॥ तीर्थयात्रे जाती
लोक ॥ न मानावें तें कौतुक ॥ पुरुषाचें पादोदक ॥ तेंचि तीर्थ मानावें ॥ ७२ ॥ भागीर-
थीसमान ॥ पतीचरणाचें तीर्थ जाण ॥ पतिपूजा करून ॥ त्रयमूर्ती मानावा ॥ ७३ ॥
व्रत करणें असेल मनीं ॥ तें पुरुषा करावें पुसोनी ॥ आत्मबुद्धी करितां कोणी ॥ पति-
आयुष्य उणें होय ॥ ७४ ॥ आणीक जाय नरकाप्रती ॥ पतीस घेवोनी सांगाती ॥ ऐसें

बोलती वेदश्रुती ॥ बृहस्पती सांगतसे ॥ ७५ ॥ पतीस क्रोधें उत्तर देती ॥ श्वानयोनीं
जन्म होती ॥ जंबुक होवोनी भुंकती ॥ ग्रामासंनिध येऊन ॥७६॥ नित्य नेम करूनि नारी ॥
पुरुष उच्छिष्ट भोजन करी ॥ पाद प्रक्षालोनि निर्धारीं ॥ घेवोनि तीर्थ जेवावें ॥७७॥ पति
प्रत्यक्ष शंकर ॥ ऐसें मानावें निरंतर ॥ पावे तीच वैकुंठनगर ॥ पूर्ण होती मनोरथ ॥७८॥
जावों नये वनभोजनासी ॥ अथवा शेजारीच्या गृहासी ॥ इष्ट सोयरे ह्मणोनि हर्षी ॥
प्रतिदिनीं न जावें ॥७९॥ आपुला पुरुष जरी दुर्बळ किती ॥ समर्थांची न करावी संगती ॥
पती असतां अनाचार रीती ॥ आपण निंदा करूं नये ॥ ८० ॥ कैसा तरी असो पती ॥
आपण करावी त्याची स्तुती ॥ तोचि ह्मणावा लक्ष्मीपती ॥ एकभावें करोनियां ॥ ८१ ॥
सासू श्वशूर पुरुषांपुढें ॥ नेटें बोलों नये गाढें ॥ हांसों नये त्यापुढें ॥ पति आयुष्य उणें
होय ॥८२॥ सासू श्वशुरां त्यजून ॥ वेगळें असूं ह्मणेल जी कोण ॥ ऋक्षयोनींत जन्मोन ॥ अर-
ण्यांत हिंडेल ॥ ८३ ॥ पुरुष कोपें मारी जरी ॥ मनीं ह्मणे हा मरो नारी ॥ जन्म पावेल
योनिव्याघ्री ॥ महाघोर अरण्यांत ॥ ८४ ॥ परपुरुषांतें नयनीं पाहे ॥ उपजतां वरडोळी
होय ॥ पुरुषा वंचुनि विशेष खाय ॥ ग्रामसूकर होय ती ॥८५॥ तोही जन्म सोडोनि ॥ उपजे
वागुळाचे योनीं ॥ आपुली विष्ठा भक्षूनी ॥ वृक्षावरी लोंबते ॥ ८६ ॥ पतिसंमुख निष्ठुर
वचनीं ॥ उत्तर देती कोपोनी ॥ उपजे मुकी होऊनी ॥ सप्तजन्म दरिद्री ॥ ८७ ॥ पुरुष
दुजी पत्नी करी ॥ तिसीं आपण वैर धरी ॥ सप्तजन्म शरीरीं ॥ दुर्भाग्यता होतसे ॥८८॥
पुरुषावरी दुसरिया ॥ दृष्टी ज्या करिती आवडिया ॥ पतिता घरीं जन्म पावोनियां ॥
दुःखें सदा दरिद्र भोगिती ॥ ८९ ॥ पुरुष येतां बाहेरुनि ॥ संमुख जाय भामिनी ॥ उदकें

पाय प्रक्षालुनि ॥ विंझणा वारी श्रमहर ॥ ९० ॥ पादसेवन भक्तीसी ॥ मृदु वाक्य बोलिजे
पतीसी ॥ पुरुष होतां संतोषी ॥ त्रिमूर्तीही संतोषती ॥ ९१ ॥ काय देती मातापिता ॥ ने-
दी इष्टवर्ग दुहिता ॥ इहपराची जोडी देता ॥ पुरुष नारीचा देव जाणा ॥ ९२ ॥ गुरुदेव
तीर्थें समस्तीं ॥ गुरु जाणावा आपुला पती ॥ ऐसा निश्चय ज्यांच्या चित्तीं ॥ पतिव्रता
त्याची जाणा ॥ ९३ ॥ जीव असतां शरीरासी ॥ पवित्र होय समस्तांसी ॥ जीव जातां
क्षण एकेसीं ॥ कदां प्रेतां नातळावें ॥ ९४ ॥ पति नसतां अशुचि अबला ॥ याकारणें प-
तीची सेवा तिला ॥ पतीच धर्म सकळ तिला ॥ प्राण आपुला जाणावा ॥ ९५ ॥ पती न-
सतां स्त्रियेसी ॥ सर्व अमंगळ ती ऐसी ॥ विधवा ह्मणजे प्रेतासरसी ॥ अपत्य नसतां
अधिक ॥ ९६ ॥ ग्रामास जातां परियेसीं ॥ विधवा भेटतां संमुखेसी ॥ मरण सांगे सत्य
त्यासी ॥ पुत्राची अशुभ नव्हे ॥ ९७ ॥ माता विधवा ते जरी ॥ पुत्रासी मंगळ शकुन
करी ॥ पुत्राविण विधवा नारी ॥ नमन तिसी करूं नये ॥ ९८ ॥ तिच्या आशिर्वादें आ-
पण ॥ जरी मंगळत्व होय जाण ॥ तिच्या शापें होय मरण ॥ यास्तव तिसीं बोलूं नये
॥ ९९ ॥ याकारणें पतिव्रता ॥ बरवें पुरुषासवें जातां ॥ प्राणासवें देह तत्वतां ॥ जेवीं
जाई परियेसा ॥१००॥ चंद्रासवें जैसें चांदणें ॥ मेघासवें जैसें जीवन ॥ मावळतां सवेंचि
जाण ॥ पतीसवें तैसें जावें ॥ १ ॥ सहगमन मुख्य जाण ॥ थोर धर्म श्रुतीचें लक्षण ॥ पू-
र्वज बेचाळीस उद्धरण ॥ पतिव्रता धर्मानें ॥ २ ॥ पुरुष प्रेत झालियावरी ॥ सहगमना
जातां ते नारी ॥ एकेक पाउलीं निर्धारीं ॥ अश्वमेध सहस्र पुण्य ॥ ३ ॥ पापी पुरुष असे
जाण ॥ त्यासीं आलें जरी मरण ॥ यमदूत नेती बांधून ॥ नरकाप्रती परियेसा ॥४॥ पति-

व्रता त्याची नारी ॥ जरी सहगमन करी ॥ जैसी सर्पासी नेत घारी ॥ तैसी पतीतें स्वर्गा नेई ॥ ५ ॥ सहगमन केलियावरी॥ पाहूनि यमदूत दळती दुरी॥ पतीसीं सोडोनी सत्वरीं ॥ जाती यमपुरासी ॥६॥ पतिव्रता शिरोमणी ॥ बैसविती ते विमानीं ॥ पाववितो स्वर्गभुवनीं॥ देवांगना ओंवाळिती ॥ ७ ॥ यमदूत त्वरें पळती ॥ काळाची न चाले ख्याती ॥ पतिव्रता देखतां चित्तीं ॥ भय वाटे ह्मणताती ॥ ८ ॥ सूर्य भीतो देखोनि तियेसी ॥ आपुलें स्थान घे-ईल ऐसी ॥ तापतो तेजें मंदमंदेसी ॥ शीत होय उष्ण अग्नी ॥ ९ ॥ नक्षत्रें भिती पाहतां तियेसी ॥ जाती स्वर्गभुवनासी ॥ चंद्र झाला सीतळांशीं ॥ पतिसंगें जातां पतिव्रता ॥ १०॥ येणेंपरी स्वर्गभुवनीं ॥ जाय नारी संतोषोनी ॥ आपुले पतीस घेउनी ॥ राहे स्वर्गीं निरंतर ॥ ११ ॥ तीन कोटी रोम तिसी ॥ स्वदेह देतां अग्नीसी ॥ त्याचें फळ आहे तिसी॥ एकचित्तें ऐकावें ॥ १२ ॥ एकेक रोमासीं ॥ स्वर्गीं राहे कोटी वर्षीं ॥ पुरुषासवें स्वानंदेंसी ॥ पतिव्रता राहे तैसी ॥१३॥ ऐसें पुण्य सहगमनासी ॥ कन्या व्हावी यासाठीं वंशीं ॥ बेचाळीस कुळें कैशीं ॥ घेऊनि जाय स्वर्गातें ॥ १४ ॥ धन्य तिची माता-पिता ॥ एकवीस कुळें उद्धरितां ॥ धन्य पुरुषवंशीं विख्याता ॥ बेचाळीस उद्धरिले ॥ १५ ॥ ऐसें पुण्य सहगमनासी ॥ पतिव्रतेच्या संगतीसी ॥ आणीक सांगेन विस्तारेंसी ॥ देवगुरु म्हणतसे ॥ १६ ॥ असे नारी दुराचारी ॥ अथवा व्यभिचारकर्म करी ॥ त्याचें फळ आहे अतिं घोरी ॥ एकचित्तें परियेसा ॥ १७ ॥ उभय कुळें बेचाळिस ॥ जरी असती स्वर्गवासास ॥ त्यांसी घेऊनी नरकास ॥ प्रेमें जाय परियेसा ॥१८ ॥अंगावरी रोम किती ॥ तितुकीं कोटी वर्षे ख्याती ॥ नरकामध्यें पचे निगुति ॥ तिचें फळ

ऐसें असें ॥१९॥ भूमिदेवी ऐसें ह्मणे ॥ पतिव्रतेच्या पवित्र चरणें ॥ आपणावरी चालतां क्षणें॥ पुनीत मी ह्मणतसे ॥१२०॥ सूर्यचंद्र ऐसें ह्मणती ॥ आपुलीं किरणें ज्योति ॥ जरी पतिव्रते-वरी पडती ॥ तरी आपण पावन होऊं ॥२१॥ वायु आणि वरुण ॥ पतिव्रतेचिया स्पर्शें जाण ॥ पावन होऊं ह्मणोन ॥ स्पर्शें पुनीत होती ते ॥२२॥ घरोघरीं स्त्रिया असती ॥ काय करावी ला-वण्यसंपत्ती ॥ जिचेनि वंश उद्धरती ॥ तैशी स्त्री असावी कीं ॥२३॥ ज्याचे घरीं पतिव्रता ॥ दैवें आगळा तो तत्वता ॥ करावें सुकृत जन्मशता ॥ तरीच लाभे तैसी सती ॥२४॥ चतुर्विध पुरुषार्थ देखा ॥ स्त्रियेच्या संगती लाधे लोकां ॥ पतिव्रता सती अधिका ॥ पुण्यानुसार लाभे जनां ॥ २५ ॥ ज्याचे घरीं नाहीं सती ॥ पुण्यें त्यासी न घडती ॥ यज्ञादि कर्मे ख्याती ॥ सती असतां होती जाण ॥ २६ ॥ सती नसे ज्याचे घरीं ॥ तें गृह अरण्य निर्धारीं ॥ वृथा जन्मोनी संसारीं ॥ कर्मबद्ध तोचि जाहला ॥ २७ ॥ ऐशी सती मिळे ज्यासी ॥ तया जोडल्या पुण्य-राशी ॥ पुत्रसंतान परलोकांसी ॥ साधन होय सतीचेनी ॥२८॥ स्त्रियेविणें जो नर ॥ तयासी न साधे कर्माचार ॥ कर्महीन देवपितर ॥ कर्मार्ह नव्हे कदां ॥२९॥ पुण्यें जोडे गंगास्नान ॥ त्या-हूनि पतिव्रतादर्शन ॥ महापापांचें उद्धारण ॥ सप्त जन्म पुनीत ॥१३०॥ पतिव्रतेचा आचार ॥ सांगे पतिव्रतेसी योगेश्वर ॥ म्हणे सरस्वती गंगाधर ॥ सांगे बृहस्पती देवगुरु ॥ ३१ ॥ सिद्ध ह्मणे नामधारकासी ॥ गुरुचरित्र पुण्यराशी ॥ ऐकतां पावती सद्गतीशीं ॥ ह्मणे सरस्वती गंगाधर ॥३२॥ इति श्रीगुरुचरित्रामृत ॥ पतिव्रतानिरूपण विख्यात ॥ ऐकतां होय पुनीत ॥ जें जें चिंतिलें पाविजे ॥३३॥ इति श्रीगुरुचरित्रपरमकथाकल्पतरौ श्रीनृसिंहसरस्वत्युपा-ख्याने सिद्धनामधारकसंवादे पतिव्रताऽऽख्यानं नाम एकत्रिंशोऽध्यायः ॥ ओंव्या १३३ ॥

॥ श्रीगणेशाय नमः ॥ पतिव्रतेचि आचार रीती ॥ सांगे देवा बृहस्पती ॥ सहगमनीं
फलश्रुती ॥ येणेंपरी निरोपिली ॥१॥ विधवापणाचा आचारू ॥ सांगता झाला देवगुरू ॥
पुसताती ऋषेश्वरू ॥ ऐका श्रोते एकचित्तें ॥ २ ॥ जवळी नसतां पती ॥ त्यातें मरण
झालिया प्राप्ती ॥ काय करावी नीति ॥ सहगमन कैसें करावें ॥३॥ अथवा असेल गरोदरी ॥
असे तान्हा कुमार कुमारी ॥ काय करावें तिये नारी ॥ म्हणून विनविती गुरूसी ॥ ४ ॥
ऐकोनि ऐसें वचन ॥ सांगता झाला विस्तारोन ॥ एकचित्तें करून ॥ ऐका श्रोते सकळ
॥ ५ ॥ पती जवळ नसे जरी ॥ सहगमन न करावें तिये नारी ॥ असतां आपण गरोदरी ॥
करूं नये सहगमन ॥ ६ ॥ स्तनपानी असतां कुमार ॥ तिणें करितां पाप थोर ॥ पुरुष
मेला असेल दूर ॥ सहगमन वर्ज असे ॥ ७ ॥ तिणें असावें विधवापणें ॥ विधिपूर्वक धर्म
आचरणें ॥ सहगमनासमानें ॥ असे पुण्य परियेसा ॥ ८ ॥ विधवापणाचा आचारू ॥
करितां असे पुण्य थोरू ॥ निवर्ततां आपुला भ्रतारू ॥ केशवपन करावें ॥ ९ ॥ ज्या कां
विधवा केश राखिती ॥ त्यांची ऐका फलश्रुती ॥ केशें पुरुषा बांधिती ॥ नरकाप्रती ते
जाती ॥ १० ॥ यास्तव करणें केशवपन ॥ करावें नित्य प्रातःस्नान ॥ एक वेळा भोजन ॥
करावें तिणें परियेसा ॥ ११ ॥ एक धान्याचें अन्न ॥ करावें तिणें भोजन ॥ तीन
दिवस उपोषण ॥ करावें तिणें भक्तीनें ॥ १२ ॥ पांच दिवस पक्ष मासास ॥ करावा तिणें
उपवास ॥ अथवा चांद्रायण ग्रास ॥ भोजन करणें परियेसा ॥ १३ ॥ चंद्रोदय बीजेसीं ॥
एक ग्रास द्यावा त्या दिवसीं ॥ चढते द्यावे पंधरा दिवशीं ॥ पौर्णिमेसीं भोजन ॥ १४ ॥
कृष्णपक्षीं येणेंपरी ॥ ग्रास द्यावे उतरते नारी ॥ अमावास्या येतां जरी ॥ एक ग्रास

जेवावा ॥ १५ ॥ शक्ति नाहीं जियेसी ॥ एकान्न जेवावें परियेसीं ॥ अथवा फल आहा-
रेसी ॥ अथवा शाखा आहार देखा ॥ १६ ॥ अथवा करावें क्षीरपान ॥ कधीं न द्यावें
अधिक न्यून ॥ जेणें राहे आपुला प्राण ॥ श्वासोच्छ्वास चाले ऐसें ॥ १७ ॥ एक धान्याचें
अन्न ॥ करावें तिणें भोजन ॥ तीन दिवस उपोषण ॥ करणें नारी परियेसा ॥ १८ ॥ शयन
करितां मंचकावरी ॥ पुरुष जाय रौरव घोरीं ॥ आपण भोगी नरक निरंतरीं ॥ पतीस-
हित परियेसा ॥ १९ ॥ करूं नये मंगल स्नान ॥ अथवा देहमर्दन ॥ गंध परिमल तांबूल
जाण ॥ पुष्पादि तिणें वर्जावें ॥ २० ॥ पुत्राविण असे नारी ॥ करणें तर्पण पुत्रापरी ॥
तिळ दर्भ कुशा धरी ॥ गोत्रनाम उच्चारावें ॥ २१ ॥ विष्णुपूजा करावी नित्य ॥ आपुला
पुरुष हा निश्चित ॥ पुरुष आठवोनि चित्त ॥ विष्णुस्थानीं मानिजे ॥ २२ ॥ पुरुष असतां
जेणेंपरी ॥ पतिनिरोपें आचार करी ॥ तेणेंचि रीतीं विष्णु अवधारीं ॥ त्याचे निरोपें
आचरावें ॥ २३ ॥ तीर्थयात्रा उपवासव्रत ॥ विष्णुनिरोपें करावे निश्चित ॥ अथवा
गुरुद्विज विख्यात ॥ त्याचे निरोपें आचरावें ॥ २४ ॥ आपण असतां सुवासिनी ॥ ज्या
वस्तूची प्रीति अंतःकरणीं ॥ तैशी वस्तू द्यावी ह्मणी ॥ विद्वज्जन विप्रासी ॥ २५ ॥ वैशाख
माघ कार्तिकमास ॥ अनेक असे स्नानीं आचार विशेष ॥ माघस्नान तीर्थास ॥ विष्णुस्मरणें
करावें ॥ २६ ॥ वैशाखीं जलकुंभदान ॥ कार्तिकीं दीपदान ॥ ब्राह्मणा द्यावें घृतदान ॥ यथाश-
क्त्या दक्षिणेंसी ॥ २७ ॥ माघमासीं तिळव्रतेंसी ॥ द्यावें दान विप्रांसी ॥ अरण्यांत वैशाख-
मासीं ॥ पोई घालिजे निर्मलोदकें ॥ २८ ॥ शिवालयीं निरंतरीं ॥ गळती ठेविजे निर्मळ
वारी ॥ गंध परिमळ पूजा करी ॥ तेणें पुण्य अगाध ॥ २९ ॥ विप्राचिया घरोघरीं ॥ उद-

क घालिजे शक्त्यनुसारी ॥ अन्न द्यावें अवधारीं ॥ शक्त्यनुसार विप्रांसी ॥ ३० ॥ तीर्थ-
यात्रे जात्या लोकां ॥ त्यांतें द्याव्या छत्रपादुका ॥ येतां आपुल्या गृहांतिका ॥ पादप्रक्षा-
लन करावें ॥ ३१ ॥ वारा घालावा विंझणेशीं ॥ वस्त्र द्यावें परिधानासी ॥ गंध तांबूल परि-
मळांशीं ॥ कर्पूर येळादि परियेसा ॥ ३२ ॥ जलपात्र द्यावें शक्तीसी ॥ गुडपान आम्रपाने-
सी ॥ द्राक्षें कर्दळी फळेंसी ॥ ब्राह्मणा द्यावें मनोहर ॥ ३३ ॥ जें जें दान द्यावें द्विजां ॥
पतीच्या नांवें अर्पिजे वोजा ॥ संकल्पून पुरुषकाजा ॥ धर्म करणें येणेंपरी ॥३४॥ कार्ति-
कमासीं जवांचें अन्न ॥ अथवा जेविजे एकान्न ॥ वृंताकादि निषेधून ॥ तैलादि मधू वर्जा-
वें ॥ ३५ ॥ वर्जावें कांस्यपात्र ॥ आणीक वर्जावें द्विदलमात्र ॥ मनीं असावें पवित्र ॥ एका-
ऐसी परियेसा ॥ ३६ ॥ पलाशपत्रीं भोजन करावें ॥ शुची उद्यापन करावें ॥ जें जें व्रत
धरावें ॥ त्यांतें उजवावें तत्वतां ॥३७॥ घृतभरित कांस्यपात्र ॥ विप्रां द्यावें पवित्र ॥ भूमि-
शयनीं तत्पर ॥ मंचक द्यावा विप्रासी ॥ ३८ ॥ जे जे वस्तु त्यजिली आपण ॥ ते ते द्यावी
ब्राह्मणालागून ॥ परद्रव्या एक मास जाण ॥ त्याग करावा सर्वथा ॥ ३९ ॥ त्यजूनियां दधि-
क्षीर ॥ उद्यापन आचरा मनोहर ॥ असलिया शक्त्यनुसार ॥ धेनु द्यावी सालंकृत ॥ ४० ॥
विशेषें असे आणीक व्रत ॥ दीपदान असे ख्यात ॥ वर्णितां महिमा अनंत ॥ देवांसि ह्मणे
बृहस्पती ॥ ४१ ॥ दीपदान थोर सोहळा ॥ वरकड नव्हती धर्म सकळा ॥ याकारणें अनंत
फळा ॥ दीपदान करावें ॥ ४२ ॥ माघस्नान माघमासीं ॥ करणें सूर्योदयासी ॥ येणेंपरी
एक मासीं ॥ आचरावें भक्तीनें ॥ ४३ ॥ लाडू तिळ खर्जूरेसी ॥ करूनि पक्वान्नें ब्राह्मणां-
सी ॥ द्यावीं तिणें भक्तीसी ॥ दक्षिणेसहित जाणा ॥ ४४ ॥ शर्करा मिरे येळेसी ॥ तळून

अपूप घृतेंसी ॥ दान द्यावें प्रीतीसी ॥ भोजन द्यावें तापसियां ॥ ४५ ॥ हेमंतऋतु येतां जाण ॥ व्हावया शीत निवारण ॥ काष्टें द्यावीं विप्रांकारणें ॥ वस्त्रें द्यावीं द्विजांसी ॥ ४६ ॥ पर्यंक द्यावा सुप्तीसी ॥ उत्तम विप्र पुण्यराशीसी ॥ धाबळया कांबळीं शीतनिवारणासी ॥ वस्त्रें देइजे विप्रवर्गा ॥ ४७ ॥ व्हावया शीतनिवारण ॥ औषध द्यावें ऊष्ण जाण ॥ तांबूलपान परिपूर्ण ॥ द्यावें येळा कर्पूरेंसी ॥ ४८ ॥ गृहदान विप्रांसी ॥ द्यावें संवत्सर एक ग्रासेंसीं ॥ जातां तीर्थयात्रेसी ॥ पादरक्षा देइजे ॥ ४९ ॥ गंध परिमळ सुगंधेंसी ॥ पूजा करावी शंकरासी ॥ रुद्राभिषेक विधींसी ॥ अभिषेकावा गौरीहर ॥ ५० ॥ धूप दीप नैवेद्येंसी ॥ पूजा करावी षोडशी ॥ प्रीती बहु शंकरासी ॥ दीपमाळ उजळिसां ॥ ५१ ॥ आणीक सुगंध गंधेंसी ॥ तांबूलदान विधीसी ॥ कर्पूर लवंगादि विविधेंसीं ॥ भक्तिभावें अर्पिजे ॥ ५२ ॥ आपुला पुरुष मनीं ॥ नारायण कल्पोनी ॥ पूजा करावी एके मनीं ॥ भक्तिभावें परियेसा ॥ ५३ ॥ नेमें असावें तिये नारी ॥ न बैसावें बैलावरी ॥ लेऊं नये कंकणचोळी करीं ॥ श्वेतवस्त्र नेसावें ॥ ५४ ॥ रक्त, कृष्ण वस्त्रांत ॥ दोष घडती अद्भुत ॥ आणीक असे एक व्रत ॥ पुत्राचे बोलें वर्तावें ॥ ५५ ॥ आत्मा वै पुत्र नाम ॥ ह्मणून बोलती वेदागम ॥ पतीपासून पुत्रजन्म ॥ पुत्राज्ञेंत असावें ॥ ५६ ॥ ऐसा आचार विधवेसी ॥ असे शास्त्र पुराणेंसी ॥ जरी आचरती भक्तीसी ॥ सहगमनाचें फळ असे ॥ ५७ ॥ पापी जरी पति आपुला ॥ पूर्वीं मरण पावला ॥ नरकांत वास केला ॥ कीटक होवोनी ॥ ५८ ॥ विधवापणें येणेंपरी ॥ आचरण करितां नारी ॥ मरण होतां सत्वरीं ॥ घेऊन पति स्वर्गीं जाय ॥ ५९ ॥ येणेंपरी बृहस्पती ॥ सांगे समस्त देवांप्रती ॥ लोपामुद्रेची

केली स्तुती ॥ पतिव्रता शिरोमणी ॥ ६० ॥ जितक्या पतिव्रता नारी ॥ समस्त भागीरथी-
सरी ॥ त्यांचे पुरुष शंकरापरी ॥ पूजा करावी दोघांची ॥ ६१ ॥ ऐसें बृहस्पतीचें वचन ॥
सांगितलें संपूर्ण ॥ ऐक बाळे तव मना ॥ ज्यावरी प्रीती तेंचि करी ॥ ६२ ॥ दुःख सर्व
त्यजोनी ॥ मम बोल ठेवी मनीं ॥ सांगितलें तुजलागोनी ॥ परलोक साधन ॥ ६३ ॥ धैर्य जरी
तुजसी ॥ सहगमन करी पतीसी ॥ विधवापणें आचार करिसी ॥ तेंहि पुण्य तितुकेंचि
॥ ६४ ॥ जी आवडी तव मनीं ॥ तें सांगें विस्तारोनी ॥ हस्त मस्तकीं ठेवूनी ॥ पुसतसे
भक्तिभावें ॥ ६५ ॥ ऐकोनी तया अवसरीं ॥ केलें नमन तिये नारी ॥ विनवीतसे करु-
णोत्तरीं ॥ भक्तिभावें करूनियां ॥ ६६ ॥ जयजयाजी योगेश्वरा ॥ तूंचि पिता सहोदरा ॥
माझा प्राण मनोहरा ॥ जनक जननी तूंचि होसी ॥ ६७ ॥ आल्यें आपण परदेशांत ॥
जवळी नाहीं बंधु तात ॥ भेटलासी तूं दैवत ॥ परलोक सोइरा ॥ ६८ ॥ सांगितला तुह्मी
आचार ॥ कष्ट विधवापणीं थोर ॥ अशक्य आह्मां नाहीं धीर ॥ अपार असे दातारा ॥ ६९ ॥
तारुण्यपण मजसी ॥ लावण्य बहुत देहासी ॥ निंदापवाद शरीरासी ॥ घडेल केवीं
वर्तमानीं ॥ ७० ॥ संतोष होतो माझे मनीं ॥ पुण्य अपार सहगमनीं ॥ पतिसवें संतोषोनी ॥
जाईन स्वामी निर्धारें ॥ ७१ ॥ ह्मणूनि मागुती नमस्कारी ॥ माथा ठेवी चरणावरी ॥
स्वामी मातें तारी तारी ॥ भवसागरीं बुडतसें ॥ ७२ ॥ मग करुणेचा सागर ॥ उठवीतसे
योगेश्वर ॥ देता झाला तिये वर ॥ म्हणे पतिसवें असे ॥ ७३ ॥ तीरीं ठेवीं पुरुषासी ॥ जाय
माते संगमासी ॥ सांगेन तुज विशेषीं ॥ ऐक माते एकचित्तें ॥ ७४ ॥ आलींत तुम्हीं दर्शनीं ॥
श्रीगुरु भेटीलागोनि ॥ आरोग्य होईल म्हणोनी ॥ पती घेऊनि आलीस ॥ ७५ ॥ होणार

झाली ब्रह्मकरणी ॥ काळासीं जिंकिलें नाहीं कोणीं ॥ जैसी ईश्वराची मांडणी ॥ तैसें तैसें परी होतसे ॥ ७६ ॥ ब्रह्मलिखित न चुके जाण ॥ जें जें भोगणें असेल आपण ॥ तैसें घडे श्रुतिवचन ॥ दुःख कोणीं करूं नये ॥ ७७ ॥ हरिश्चंद्र राजा देखा ॥ डोंबाघरीं वाहे उदका ॥ बळी अजिंक्य लोकां ॥ तोही पाताळीं घातला ॥ ७८ ॥ सहस्र वर्षें ज्यासी ॥ आयुष्य असे रावणासी ॥ काळ तयाप्रती आसी ॥ दुर्योधना काय झालें ॥ ७९ ॥ भीष्म द्रोण इच्छामरणी ॥ तेही पडले रणांगणीं ॥ परिक्षिती सर्पाभेणी ॥ परी मरण पावला ॥ ८० ॥ अनंत अवतार येणेंपरी ॥ होऊनि गेले संसारीं ॥ देवदानव येणेंपरी ॥ सकळ काळा-आधीन ॥ ८१ ॥ याकारणें काळासी ॥ जिंकिलें नाहीं क्षितीसीं ॥ सकळ देव दानवांसी ॥ काळ जिंकी निर्धारें ॥ ८२ ॥ काळा जिंकिता नाहीं कोणी ॥ एका श्रीगुरुवांचोनी ॥ भाव असे ज्या-चे मनीं ॥ त्यासी प्रत्यक्ष असे जाणा ॥ ८३ ॥ आतां तुह्मीं ऐसें करणें ॥ गुरुचरण पाहणें ॥ तेथून येवोनि जाणें ॥ पतीसवें परियेसा ॥ ८४ ॥ भस्म मंत्रोनि त्या वेळीं ॥ लाविता झाला कपाळीं ॥ रुद्राक्ष चारी तात्काळीं ॥ देतसे तीतें जाणपा ॥ ८५ ॥ योगी बोले तियेसी ॥ रुद्राक्ष बांधी कंठासी ॥ दोनी प्रेतकर्णासी ॥ बांधोनि दहन करावें ॥ ८६ ॥ आणीक एक सांगेन तुज ॥ गुरुदर्शना जाई सहज ॥ रुद्रसूक्तें ह्मणती द्विज ॥ गुरुचरण प्रक्षाळितां ॥ ८७ ॥ तेंचि तीर्थ घेवोनी ॥ आपुला देह प्रोक्षोनी ॥ प्रेतावरी आणोनी ॥ सिंचन करावें भक्तीनें ॥ ८८ ॥ मग जावें सहगमनीं ॥ वायन द्यावें सुवासिनी ॥ अनेक द्रव्यें करूनी ॥ विप्रां तोषवावें बहुत ॥ ८९ ॥ ऐशापरी तियेसी ॥ सांगोनी गेला तापसी ॥ पतिव्रता भा-वेंसी ॥ करी आयती त्या वेळीं ॥ ९० ॥ भले विप्र बोलावोनी ॥ षोडश कर्मे आचरोनी ॥

प्रेता प्रायश्चित्त देवोनी ॥ उपवासी राहे आपण ॥ ९१ ॥ सुस्नात होवोनि आपण ॥ पीतांबर नेसोन ॥ सर्वाभरणें लेवोन ॥ हळदीकुंकुम लेइतसे ॥ ९२ ॥ औपासन प्रेतासीं ॥ करिताती विधीसीं ॥ प्रेत बांधोनि काष्ठेसी ॥ घेवोनि गेले गंगेसी ॥ ९३ ॥ अग्नि घेवोनि तळहातेसी ॥ निघाली पतिव्रता कैसी ॥ आनंद बहु मानसीं ॥ प्रेतापुढें जातसे ॥ ९४ ॥ सोळा वरुषांचें तारुण्य ॥ दिव्य तेज लावण्य ॥ ल्याइलीसे आभरणें ॥ लक्ष्मीसारिखी दिसतसे ॥ ९५ ॥ निरोपोनियां नरनारी ॥ पाहों आल्या सहस्र च्यारी ॥ माथा तुकाविती सकळी ॥ पतिव्रता पाहोनियां ॥ ९६ ॥ एक ह्मणती काय नवल ॥ पूर्ववयासी हे बाळा ॥ काय दैवीं पूर्वफळ ॥ पतिसवें जातसे ॥ ९७ ॥ देखिलें नाहीं पतीचें सुख ॥ पोटीं नाहीं झालें बालक ॥ कैसा जीव झाला एक ॥ आनंदरूपें जातसे ॥ ९८ ॥ एक ह्मणती शिकवा इसी ॥ वायां कांहो जीव देसी ॥ परतूनि जाईं माहेरासी ॥ पितृगृहीं राहेपां ॥ ९९ ॥ एक ह्मणती ज्ञानवंता ॥ खरी जाण पतिव्रता ॥ बुद्धि देगा जगन्नाथा ॥ सकळ स्त्रियां ऐशीच ॥ १०० ॥ धन्य इची मातापिता ॥ सकळ उद्धरती आतां ॥ प्रेतापुढें चालतां ॥ एकेक पाउला अश्वमेधफळ ॥ १ ॥ येणेंपरी नदीतीरांत ॥ गेली प्रेतासहित ॥ कुंड केलें अद्भुत ॥ काष्ठें वह्नि पेटविला ॥ २ ॥ अग्निकुंड सन्निधेसी ॥ ठेवोनियां प्रेतासी ॥ बोलावोनी सुवासिनींसी ॥ देती झाली वायनें ॥ ३ ॥ सुपें वस्त्रें कुंकुमेसी ॥ हळदी काजळ परियेसी ॥ कंठसूत्र उपचारेंसी ॥ सुवासिनीयां देतसे ॥ ४ ॥ गंध पुष्पादि परिमळ ॥ सुवासिनींसी तांबूल ॥ द्रव्य दिधलें अपार ॥ विप्रांलागीं तोषविलें ॥ ५ ॥ नमन करी हर्षी ॥ निरोप मागे सकळांसी ॥ मी जातें माहेरासी ॥ ममता असों देइजे ॥ ६ ॥ माझा पिता शूलपाणी ॥ उमा

माता अंतःकरणीं ॥ आह्मां बोलाविलें सगुणीं ॥ प्रेमभावें करूनियां ॥ ७ ॥ आली श्रावणी दिपवाळी ॥ जातें मातेचिया जवळी ॥ पतिसहित आनंदमेळीं ॥ जातें लोभ असों द्यावा ॥ ८ ॥ समागमें लोक आपुले ॥ होते जे कां सर्वे आले ॥ त्यांसी सांगतसे बोले ॥ परतोनी जावें ग्रामासी ॥ ९ ॥ पुसतां श्वशुर मामीसी ॥ त्यांतें न सांगावें परियेसी ॥ प्राण देतील आह्मांसी ॥ हत्या तुह्मां घडेल ॥ ॥ १० ॥ त्यांसी सांगावें ऐसें ॥ क्षेम आहेत तीर्थवासें ॥ भीमातीर स्थान ऐसें ॥ श्रीगुरूचे सन्निधानीं ॥ ११ ॥ आलों गुरुदर्शनासी ॥ आरोग्य झालें तात्काळेसीं ॥ राहिलों सुस्थळेसी ॥ सत्वर घरीं सांगिजे ॥ १२ ॥ ऐसें सांगा श्वशुरा मामीसी ॥ माता पितयादिकांसी ॥ इष्टजन सोयरियांसी ॥ सांगा येणेंपरी तुह्मी ॥ १३ ॥ ऐसें वचन ऐकोन ॥ दुःख पावले सकळ जन ॥ आपण असे हास्यवदन ॥ तया प्रेताजवळिक ॥ १४ ॥ अग्निकुंडांत नेवोनी ॥ घातलीं काष्ठें त्याच क्षणीं ॥ तों आठवण झाली मनीं ॥ योगेश्वराचा उपदेश ॥ १५ ॥ मग रुद्राक्ष काढोनियां दोनी ॥ बांधिले प्रेताचिया कर्णी ॥ कंठसूत्रीं दोन ठेवोनी ॥ पुसतसे ब्राह्मणांसी ॥ १६ ॥ विनवीतसे द्विजांसी ॥ संकल्प केला मानसीं ॥ श्रीगुरुमूर्ती आहे कैशी ॥ आपल्या दृष्टीं पाहीन ॥ १७ ॥ दृष्टीं देखोनि त्यासी ॥ देह अर्पीन अग्नीसी ॥ आज्ञा झालिया आह्मांसी ॥ त्वरित येईन ह्मणतसे ॥ १८ ॥ ऐकोनि तियेचें वचन ॥ बोलताती विद्वज्जन ॥ दहना होत अस्तमान ॥ त्वरितची येईंजे ॥ १९ ॥ पुसोनियां विप्रांसी ॥ निघाली नारी संगमासी ॥ जेथें होता हृषीकेशी ॥ नरसिंहसरस्वती स्वामी ॥ २० ॥ सर्व येती नरनारी ॥ विप्रमेळा नानापरी ॥ कौतुक पाहती मनोहरी ॥ पतिव्रता स्त्रियेचें ॥ २१ ॥ जातां मार्गी स्तोत्र करी ॥ ह्मणे

स्वामी नरकेसरी ॥ अभाग्य आपुलें पूर्वापरी ॥ ह्मणोनियां आव्हेरिलें ॥ २२ ॥ तूंचि दाता सर्वेश्वर ॥ शरणागता आधार ॥ ऐसें तव ब्रीद थोर ॥ कां न आपणा लाधेचि ॥ २३ ॥ हेळामात्रें त्रिभुवनासी ॥ रची स्वामी रजोगुणेंसीं ॥ सत्वगुणें सृष्टीसी ॥ प्रतिपाळिसी तूंचि स्वामी ॥२४॥ तमोगुणें निश्चयेसी ॥ प्रळय समस्त जीवांसी ॥ त्रिगुण तूंचि होसी ॥ त्रिमूर्ती तूंचि देवा ॥ २५ ॥ तुजपासी सर्व सिद्धी ॥ ओळंगिती नव विधी ॥ देखिली आमुची कुडी बुद्धी ॥ ह्मणोनि मातें आव्हेरिलें ॥ २६ ॥ एक नगरीं वाद करी ॥ जावोनि सांगती राजद्वारीं ॥ क्षण न लागतां करी ॥ राजा साह्य तयांचें ॥ २७ ॥ रोग होतां मनुष्यासी ॥ जाऊनियां वैद्यापासी ॥ औषध करी तात्काळेंसीं ॥ आरोग्य तया होतसे ॥ २८ ॥ तूं त्रिमूर्तीचा अवतार ॥ ख्याती झाली अपरंपार ॥ सर्व भक्तजनां आधार ॥ ह्मणोनि सेविती सकळजन ॥२९॥ अपराध म्यां काय केले ॥ भेटीसी वीस गांव आले ॥ मातापिता विसरलें ॥ तुझ्या ध्यानें स्वामियां ॥ ३० ॥ होसील तूंचि मातापिता ॥ ह्मणून आल्यें असें आता ॥ भेटी होतां आरोग्यता ॥ पतीस व्हावी ह्मणोनियां ॥ ३१ ॥ आमुचे समान नारी ॥ त्या नांदती पुत्रपौत्री ॥ मी झाल्यें दगडापरी ॥ पुत्र नाहीं आपणा ॥ ३२ ॥ पती आपुला सदा रोगी ॥ कैंचा पुत्र आपणालागी ॥ तरी याचि कामालागीं ॥ निघोनि आल्यें स्वामियां ॥३३॥ आरोग्य होईल पतीसी ॥ पुत्र होईल आपणासी ॥ आशा धरून मानसीं ॥ आल्यें स्वामी कृपासिंधु ॥ ३४ ॥ पुरला माझा मनोरथ ॥ आरोग्य झाला प्राणनाथ ॥ पुत्र झाले बहुत ॥ नवल झालें स्वामियां ॥ ३५ ॥ मनोरथ पावला सिद्धीसी ॥ ह्मणोनि आल्यें पुसावयासी ॥ जातें आतां परलोकासी ॥ कीर्ती तुझी घेवोनी ॥ ३६ ॥

ऐशापरी ध्यान करीत ॥ आली अमरजासंगमीं त्वरित ॥ वृक्ष असे अश्वत्थ ॥ देखती झाली स्वामिशी ॥ ३७ ॥ उभी ठाकोनियां दुरी ॥ तया साष्टांग नमन करी ॥ श्रीगुरु ह्मणे त्या अवसरीं ॥ सुवासिनी होय ध्रुव ॥ ३८ ॥ ऐसें ऐकतां मागुती ॥ नमन करी एक भक्तीं ॥ पुनः स्वामी तेणेंच रीती ॥ अष्टपुत्री होय ह्मणतसे ॥३९॥ ऐसें ऐकोनियां वचन ॥ हास्य करिती सकळ जन ॥ सांगताती विस्तारोन ॥ गुरुलागीं सत्वर ॥ ४० ॥ विप्र ह्मणति स्वामींसी ॥ इचा पति पंचत्वासी ॥ पावला परधामासी ॥ सुवासिनी केवीं होय ॥ ४१ ॥ प्रेत नेलें स्मशानासी ॥ ही आली सहगमनासी ॥ निरोप घ्यावया तुह्मां-पासीं ॥ आली असे स्वामियां ॥ ४२ ॥ तुमचा निरोप घेवोनी ॥ अग्निकुंडा जावोनी ॥ समागमें पतिशयनीं ॥ दहन करणें तियेसी ॥ ४३ ॥ ऐकोनी त्यांचें वचन ॥ श्रीगुरू ह्मणती हांसोन ॥ इचें स्थिर अहेवपण ॥ मरण केवीं घडे त्यासी ॥ ४४ ॥ गुरू ह्मणती त्या वेळीं ॥ आणा प्रेत आह्माजवळीं ॥ प्राण गेला कवणें काळीं ॥ पाहूं ह्मणती अवधारा ॥४५॥ गुरु ह्मणती द्विजांसी ॥ सत्य मानावें वचनासी ॥ अहेवपण स्थिर इसी ॥ संदेह न धरावा मनांत ॥ ४६ ॥ या बोलाचा निर्धारू ॥ करील आतां कर्पूरगौरू ॥ नका प्रेत संस्कारूं ॥ आणा ह्मणती आपणाजवळी ॥ ४७ ॥ श्रीगुरूचा निरोप होतां ॥ आणो गेले तया प्रेता ॥ पहाती लोक कौतुक आतां ॥ अभिनव ह्मणताती ॥ ४८ ॥ इतुकें होतां ते अवसरीं ॥ आले विप्र तेथें चारी ॥ पूजा करिती मनोहारी ॥ श्रीगुरूची भक्तीनें ॥ ४९ ॥ रुद्रसूक्त ह्मणोनी ॥ अभिषेक करिती गुरुचरणीं ॥ षोडशोपचारीं विस्तारोनी ॥ पूजा करिती भक्तीसी ॥ १५० ॥ तीर्थपूजा नानापरी ॥ पूजा करिती उपचारी ॥ इतुकिया

अवसरीं ॥ आणिलें प्रेत अवधारा ॥५१॥ प्रेत आणोनियां देखा ॥ ठेविलें श्रीगुरूसन्मुखा ॥
गुरु ह्मणती लोकां ॥ सोडा वस्त्र दोर त्याचे ॥ ५२ ॥ चरणतीर्थ त्यावेळीं ॥ देती तयां
विप्रांजवळी ॥ प्रोक्षा ह्मणती तात्काळीं ॥ प्रेत सर्वांगीं स्नपन करा ॥ ५३ ॥ गुरुनिरोपें
ब्राह्मण ॥ प्रेतासी करिती स्नपन ॥ अमृतदृष्टीसीं आपण ॥ पहाती प्रेत अवधारा ॥ ५४ ॥
पहातां कृपादृष्टी करून ॥ तें तव झालें संजीवन ॥ उठोन बैसे तत्क्षण ॥ अंग मुरडीत
परियेसा ॥ ५५ ॥ नग्न ह्मणूनी लाजत ॥ प्रेत झालें सावचित्त ॥ नवें वस्त्र नेसत ॥ येवोनि
जवळी बैसला ॥ ५६ ॥ बोलावोनि स्त्रियेसी ॥ पुसतसे विस्तारेंसी ॥ कोठें आणिलें
मजसी ॥ यतीश्वर कोण सांगें ॥ ५७ ॥ इतुके लोक असतां ॥ न केलें मज चेता ॥ निद्रा
आली मदोन्मत्ता ॥ ह्मणोनी न उठविसी ॥ ५८ ॥ ऐकूनि पतीचें वचन ॥ सांगती झाली
विस्तारून ॥ मग दोघें उभीं राहून ॥ नमन करिती श्रीगुरूसी ॥५९॥ चरणीं माथा ठेवून ॥
नमन करिताती जाण ॥ पहाती लोक सर्व जन ॥ महा आनंद प्रवर्तला ॥ ६० ॥ ह्मणे
पापरूपी आपण ॥ पाप केलें दारुण ॥ पापापासूनि जन्म ॥ आह्मां झालें स्वामिया ॥६१॥
दुर्बुद्धीनें वर्तलों ॥ पापसागरीं बुडालों ॥ तुझे चरण विसरलों ॥ त्रयमूर्ती जगद्गुरु ॥ ६२ ॥
सकळ जीवमात्रांसी ॥ रक्षिता शंकर तूं होसी ॥ विख्याती तव त्रिभुवनासी ॥ शरणा-
गता रक्षिसी ॥ ६३ ॥ त्राहि त्राहि जगद्गुरू ॥ विश्वमूर्ती परात्परू ॥ ब्रह्मा विष्णु शंकरू ॥
सच्चिदानंद स्वरूप तूं ॥ ६४ ॥ त्राहि त्राहि विश्वकर्ता ॥ त्राहि त्राहि जगद्धर्ता ॥ कृपासा-
गरा जगन्नाथा ॥ भक्तजन विश्रामा ॥ ६५ ॥ जयजयाजी गुरुमूर्ती ॥ जटाजूटा पशुपती ॥
अवतरलासी तूं क्षितीं ॥ मनुष्यदेह धरूनियां ॥ ६६ ॥ त्राहि त्राहि पिनाकपाणी ॥ त्राहि

देवा तूं शिरोमणी ॥ भक्तजनां लागोनी ॥ रक्षितोसी निरंतर ॥६७॥ सर्वांभूतीं तूंचि वससी ॥ भक्तजनां प्रतिपाळिसी ॥ मज ऐसा गमलासी ॥ मायारूपी वर्तत ॥६८॥ त्रिभुवनीं तव क-रणी ॥ माथा ठेविलें तव चरणीं ॥ निश्चय केला माझे मनीं ॥ पुनर्जन्म नको आतां ॥ ६९ ॥ विश्वकारण करिसी ॥ हेळामात्रें सृष्टी रचिसी ॥ मज ऐसा गमलासी ॥ ज्ञानरूप स्वामिया ॥७०॥ तुझें न ऐके एकदां जरी ॥ कोपशील त्वरित त्यावरी ॥ माझे मनीं येणेंपरी ॥ नि-ष्कलंक तूं दिसतोसी ॥७१॥ क्रोध नाहीं तव मनीं ॥ आनंदमूर्ती तूं शिरोमणी ॥ भक्तजनां संरक्षणीं ॥ दाता तूंची कृपासागरा ॥ ७२ ॥ जीवमात्रा कृपा करिसी ॥ शरणागतांतें रक्षि-सी ॥ इहपर सौख्यातें देसी ॥ चतुर्विध पुरुषार्थ ॥७३॥ तूंचि करुणेचा सागरू ॥ चिन्मात्रीं अगोचरू ॥ श्रीनृसिंहसरस्वती नरू ॥ क्षमा करणें स्वामिया ॥ ७४ ॥ ऐसीं नानापरीसीं ॥ स्तोत्रें केलीं श्रीगुरूसीं ॥ श्रीगुरुमूर्ती संतोषीं ॥ आश्वासिती तयेवेळीं ॥७५॥ अष्ट पुत्र पूर्णा-युषी ॥ होतील सत्य तुजसी ॥ हों कां श्रीमंत अतिहर्षी ॥ गेले तुमचे पूर्वदोष ॥७६॥ चतुर्विध पुरुषार्थ ॥ लभ्य झालें तुह्मांसी यथार्थ ॥ सांडोनी संदेह त्वरित ॥ सुखें असा ह्मणती गुरू ॥७७॥ इतुकें होतां ते अवसरीं ॥ मिळाल्या होत्या नरनारी ॥ जयजय करिती तयेवेळीं ॥ अपरंपार गर्जना करिती ॥७८॥ नमन करिती सकल जन ॥ स्तोत्र भजन गायन ॥ करिताती निर्मळ जन ॥ जयजयकार प्रवर्तला ॥७९॥ तयांमध्यें विप्र एक ॥ होता धूर्त कुबुद्धिक ॥ आपु-ले मनीं होय साशंक ॥ ह्मणोनि पुसे गुरूसी ॥१८०॥ विप्र म्हणे श्रीगुरूसी ॥ विनंति स्वामी परियेसी ॥ संशय असा मम मानसीं ॥ होत आहे स्वामिया ॥८१॥ वेदशास्त्रें पुराणें ॥ बोलताती सनातनें ॥ ब्रह्मलिखित सत्य जाणें ॥ न ढळेचि हें वाक्य निरंतर ॥ ८२ ॥ घडला नाहीं

अपमृत्यु त्यासी ॥ दिवामरण परियेसी ॥ मागुती चेतना झाली कैसी ॥ ब्रह्मलिखित सत्य मिथ्या ॥ ८३ ॥ याचा काय अभिप्राय ॥ निरोपावें गुरुराया ॥ गुरु ह्मणती हांसोनियां ॥ तया ब्राह्मणालागीं ॥ ८४ ॥ गुरु ह्मणती त्यासी ॥ सांगेन तुज कीं विस्तारेंसी ॥ पुढील जन्माच्या आयुष्यासी ॥ उसनें घेतलें परियेसा ॥ ८५ ॥ आह्मीं तया ब्रह्मयासी ॥ मागून घेतले सायासीं ॥ पुढले जन्मीं परियेसीं ॥ वर्षें तीस उणीं जाणा ॥ ८६ ॥ भक्तजन रक्षावयासी ॥ मागून घेतलें विधिसीं ॥ ह्मणून सांगती विस्तारेंसी ॥ तया विप्रवर्गातें ॥८७॥ तटस्थ झाले सकळ जन ॥ साष्टांगें करिती नमन ॥ गेले आपुलिया भवना ॥ ख्याती झाली बहुत ॥ ८८ ॥ पतिव्रतेनें पतीसहित ॥ स्नान केलें संगमांत ॥ अंतःकरणीं संतोष बहुत ॥पुजा करिती उभयतां ॥८९॥ अपार द्रव्यें वेंचोनी ॥ विप्र तोषवोनी आराधनीं ॥सूर्य जातां अस्तमानीं ॥ येती गुरूच्या मठांत ॥१९०॥ स्त्रीपुरुष नमस्कार ॥ करिताती वारंवार ॥ पूजासामग्री उपचार ॥ आरती करिती श्रीगुरूसी ॥ ९१ ॥ सिद्ध ह्मणे नामधारका ॥ पुढें अपूर्व वर्तलें तें ऐका ॥ कथा असे अपूर्व देखा ॥ सांगेन ऐका एकचित्तें ॥९२॥ म्हणे सरस्वती गंगाधर ॥ सांगे गुरुचरित्रविस्तार ॥ ऐकतां होय मनोहर ॥ सकळाभीष्टें पावती ॥ ९३ ॥ इति श्रीगुरुचरित्रामृत ॥ उठविलें विप्राचें प्रेत ॥ सौभाग्य देवोनि अद्भुत ॥ परम तयासी तोषविलें ॥ ९४ ॥ इति श्रीगुरुचरित्र० प्रेतसंजीवनं नाम द्वात्रिंशोऽध्यायः ॥ ओंव्या १९४ ॥

॥ श्रीगणेशाय नमः ॥ नामधारक शिष्यराणा ॥ लागे सिद्धाचिया चरणा ॥ विनवीतसे भाकूनि करुणा ॥ भक्तिभावें करोनी ॥ १ ॥ ह्मणे स्वामी सिद्धमुनी ॥ पूर्वकथानुसंधानी ॥ पतिसह सुवासिनी ॥ आली गुरुसमागमें ॥ २ ॥ गुरु आले मठासी ॥ पुढें कथा वर्तली कैसी ॥ विस्तारोनि आह्मासी ॥ निरोपावी स्वामिया ॥ ३ ॥ सिद्ध ह्मणे ऐक बोली ॥ दुजे दिनीं प्रातःकाळीं ॥ दंपत्यें दोघें गुरुजवळीं ॥ येवोन बैसती वंदून ॥ ४ ॥ विनविताती कर जोडोनी ॥ आह्मां शोक पडल्या दिनीं ॥ एके यतीनें येवोनी ॥ बुद्धिवाद सांगितला ॥ ५ ॥ रुद्राक्ष चारी आह्मासी ॥ देतां बोलिला परियेसी ॥ कानीं बांधोनि प्रेतासी ॥ दहन करा ह्मणितलें ॥ ६ ॥ आणीक एक बोलिलें ॥ रुद्रसूक्त असे भलें ॥ अभिषेकिती विप्रकुळें ॥ तें तीर्थ आणावें ॥ ७ ॥ तीर्थ आणोनि प्रेतावरी ॥ सिंचावें कीं सत्वरीं ॥ दर्शना जावें सत्वरीं ॥ नरसिंहसरस्वती स्वामीचे ॥ ८ ॥ ऐसें सांगोनि आह्मांसी ॥ आपण गेला परियेसीं ॥ रुद्राक्ष राहिले मजपासीं ॥ दोन पतिकर्णीं असती ॥ ९ ॥ ऐकोनि तियेचें वचन ॥ श्रीगुरु ह्मणती हांसोन ॥ रुद्राक्ष दिधले आपण जाण ॥ तव भक्ति देखोनियां ॥ १० ॥ रुद्राक्षाचें महिमान ॥ सांगतां अगम्य जाण ॥ आणीक देव नाहीं जाण ॥ ऐका एकचित्तें जगीं ॥ ११ ॥ भक्ती अथवा अभक्तीसीं ॥ रुद्राक्ष धारण करणारासी ॥ पापें न लागती परियेसीं ॥ उंच अथवा नीचातें ॥ १२ ॥ रुद्राक्षांचा महिमा ॥ सांगितला अनुपमा ॥ सांगेन ऐका विस्तारून तुह्मां ॥ एकचित्तें भक्तिभावें ॥ १३ ॥ रुद्राक्षधारणें पुण्य ॥ मिती नाहीं अगण्य ॥ आणीक नाहीं देव साम्य ॥ श्रुतिसंमत परियेसा ॥ १४ ॥ सहस्र संख्या जो नर ॥ रुद्राक्षमाला करी हार ॥ स्वरूपें होय तोचि रुद्र ॥ सकळ देव वंदिती

॥ १५ ॥ सहस्र जरी न साधती ॥ दोहीं बाहीं षोडश गणती ॥ शिखेसीं एक निगुती ॥
चतुर्विंशती दोहीं करीं ॥१६॥ कंठाभरणीं बत्तीस ॥ मस्तकीं बांधावे द्वात्रिंश ॥ श्रवणद्वयीं
द्वादश ॥ येणेंविधी धारण करावे ॥ १७ ॥ अष्टोत्तर शत एक ॥ कंठीं माळा करा सुरेख ॥
रुद्रपुत्र समान ऐक ॥ येणेंविधी धारण केलिया ॥१८॥ मोतीं पोवळीं स्फटिकेसीं ॥ रौप्य
वैडूर्य सुवर्णेसी ॥ मिळोनि रुद्राक्षमाळेसी ॥ करावें धारण परियेसा ॥ १९ ॥ यांचें फळ
असे अपार ॥ रुद्राक्षमाळा अतिथोर ॥ जे मिळती समयानुसार ॥ ते धारण करावे
॥ २० ॥ ज्याचे गळां रुद्राक्ष असती ॥ त्याचीं पापें दुरावती ॥ त्यासी होय सद्गती ॥
रुद्रलोकीं अखंडित ॥ २१ ॥ रुद्राक्षमाळा धरोनी ॥ जप करिती अनुदिनीं ॥ अनंत फळ
पावे ज्ञानी ॥ सांगतों ऐका एकचित्तें ॥ २२ ॥ रुद्राक्षाविणें जो नर ॥ वृथा जन्म जाणा
घोर ॥ ज्याचे कपाळीं नसे त्रिपुंड्र ॥ जन्म वायां परियेसा ॥ २३ ॥ रुद्राक्ष बांधोनी मस्त-
केसीं ॥ अथवा दोन्हीं श्रवणासीं ॥ स्नान करितां नरासी ॥ गंगास्नान फळ असे ॥ २४ ॥
रुद्राक्ष ठेवोनी पूजेसी ॥ अभिषेकावें रुद्रसूक्तेसीं ॥ रुद्रपूजा समानेसीं ॥ फळ असे
निर्धारा ॥ २५ ॥ एकमुख पंचमुख ॥ एकादश असती मुख ॥ चतुर्दशादि कौतुक ॥ मुखें
असती परियेसा ॥ २६ ॥ हे उत्तम मिळतां जरी ॥ अथवा असती नानापरी ॥ धारण
करावे प्रीतीकरीं ॥ पावे चतुर्विध पुरुषार्थ ॥ २७ ॥ यांचें पूर्वील आख्यान ॥ विशेष
असे अतिगहन ॥ ऐकतां पापें पळोन ॥ जाती त्वरित परियेसा ॥ २८ ॥ राजा काश्मीर
देशासी ॥ भद्रसेन नामें परियेसी ॥ त्याचा पुत्र सुधर्म नामेसी ॥ प्रख्यात असे अवधारा
॥ २९ ॥ त्या राजाचा मंत्रीसुत ॥ नाम तारक विख्यात ॥ दोघे कुमार ज्ञानवंत ॥

परम सखे असती देखा ॥ ३० ॥ उभयतां एके वयासी ॥ एके स्थानीं विद्याभ्यासी ॥ क्रीडा विनोद अति प्रीतीसी ॥ देखा वर्तती संतोषें ॥ ३१ ॥ क्रीडास्थानीं सहभोजनीं ॥ असती दोघे संतोषोनी ॥ ऐसे कुमार महाज्ञानी ॥ शिवभजक परियेसा ॥ ३२ ॥ सर्व देहीं अलंकार ॥ रुद्राक्षमाळा सुंदर ॥ भस्मधारण त्रिपुंड्र ॥ टिळा असे परियेसा ॥ ३३ ॥ रत्नाभरणें सुवर्ण ॥ लेखिती लोहासमान ॥ रुद्राक्षमाळांवांचून ॥ धारण करिती नालंकार ॥ ३४ ॥ मातापिता करिती यत्न ॥ रत्नें ल्यावया कारण ॥ देती विप्रालागोन ॥ दोघे कुमार ते क्षणीं ॥ ३५ ॥ वर्ततां ऐसें एके दिवसीं ॥ तया राजमंदिरासी ॥ आला पराशरऋषी ॥ जो कां त्रिकाळज्ञ ॥३६॥ ऋषी आला देखोन ॥राव करी अभ्युत्थान ॥ बैसों घातलें सिंहासन ॥ अति सन्मान करोनी ॥३७॥ बैसवोनी सिंहासनीं ॥ षोडशोपचारें करोनी॥ पूजा केली विधीनीं ॥ महानंदें बैसले ॥ ३८ ॥ कर जोडोनी मुनिवरासी ॥ विनवी राव भक्तीसीं ॥ पिसें लागलें पुत्रांसी ॥ काय कारण ह्मणतसे ॥ ३९ ॥ रत्नाभरणें अलंकार ॥ न घेती भूषण परिकर ॥ रुद्राक्षमाळा कंठीं हार॥ सर्वाभरणें तींच करिती ॥ ४० ॥ शिकविल्या नायकती ॥ कैंचें ज्ञान यांचे मतीं ॥ स्वामी त्यांतें बोधिती ॥ तरीच ऐकती कुमार ॥ ४१ ॥ भूत भविष्य वर्तमानीं ॥ त्रिकाळज्ञ तुह्मी मुनी ॥ याचा अभिप्राय विस्तारोनी ॥ स्वामी आह्मां निरोपावा ॥ ४२ ॥ ऐकोनि रायाचें वचन ॥ पराशर ह्मणे ऐका कारण ॥ विचित्र जन्मकथन ॥ सांगों तुह्मां विस्तारें ॥४३॥ तव आणि मंत्रीसुताचा ॥ वृत्तांत या दोघांचा ॥ सांगेन ऐक विचित्र साचा ॥ ह्मणोनी निरोपी तया वेळीं ॥ ४४ ॥ पूर्वी नंदिग्राम नगरीं ॥ अति लावण्य सुंदरी ॥ होती एक वेश्या नारी ॥ सरी चंद्रमा न

पावे ॥ ४५ ॥ जैसा चंद्र पौर्णिमेसी ॥ त्यापरी छत्र शिरसीं ॥ सुखासन सुवर्णेसीं ॥ शोभायमान असे देखा ॥ ४६ ॥ हिरण्यमय तिचें भवन ॥ पादुका सुवर्णाच्या जाण ॥ नानापरी आभरणें ॥ विचित्र असती परियेसा ॥ ४७ ॥ पर्यंक रत्नखचित देखा ॥ रत्नवस्त्राभरणें अनेका ॥ गो महिषी दास्यादिका ॥ बहुत असती तियेसीं ॥ ४८ ॥ सर्वाभरणें तीस असती ॥ जैसी दिसे मन्मथ रती ॥ नवयौवना सोमकांती ॥ रति सुंदर लावण्य ॥ ४९ ॥ गंध कुंकुम कस्तुरी ॥ पुष्पें असती नानापरी ॥ अखिल भोग तिच्या घरीं ॥ त्रिभुवनीं ख्याती असे ॥ ५० ॥ धनधान्यादि संपत्ती ॥ कोटि संख्या नाहीं मिती ॥ ऐशियापरी नांदती ॥ वनिता तिये नगरीं ॥ ५१ ॥ ऐशी गणिका तत्वतां ॥ परी असे पतिव्रता ॥ धर्म करी असंख्याता ॥ अन्नवस्त्रें ब्राह्मणांसी ॥ ५२ ॥ नाट्यमंडप तिचे द्वारीं ॥ रत्नखचित नानापरी ॥ उभारिला अतिकुसरीं ॥ सदा नृत्य करी तेथें ॥५३॥ सखिया वर्गांसह तेथें ॥ नृत्य करी मनोरथें ॥ कुक्कुट मर्कट विनोदार्थ ॥ बांधिले असती मंडपीं ॥ ५४ ॥ त्या मर्कटकुक्कुटांसी ॥ नृत्य शिकवी विनोदेंसी ॥ रुद्राक्षमाळा भूषणेसीं ॥ गळां रुद्राक्ष बांधिले ॥५५॥ त्या मर्कटकुक्कुटांसीं ॥ नावें ठेविलीं सदाशिव ऐसीं ॥ वर्ततां एके दिवशीं॥ अभिनव झालें परियेसा ॥ ५६ ॥ शिववृत्ती ह्मणोनी एक ॥ वैश्य आला महाधनिक ॥ रुद्राक्षमाळा भस्म टिळक ॥ ऐसा पातला तियेच्या घरीं ॥ ५७ ॥ त्याचे सव्य करीं देखा ॥ रत्नखचित लिंग निका ॥ तेज फांके चंद्रार्का ॥ विराजमान दिसतसे ॥ ५८ ॥ तया वैश्यासी देखोनी ॥ गणिका नेत स्वसदनीं ॥ नाट्यमंडपीं बैसवोनी ॥ करी नाट्य नानाविध ॥ ५९ ॥ तया वैश्याचे करीं ॥ जें कां होतें लिंग भारी ॥ रत्नखचित सूर्यापरी ॥

दिसतसे तेज त्याचें ॥ ६० ॥ देखोनि लिंग रत्नखचित ॥ वारांगना विस्मय मानित ॥ आपुल्या सखीसी म्हणत ॥ ऐसी वस्तु पाहिजे आह्मां ॥ ६१ ॥ पुसावें तया वैश्यासी ॥ जरी देईल मोलेंसी ॥ अथवा देईल रतिसुखासी ॥ होईन कुलस्त्री तीन दिवस ॥ ६२ ॥ मीहीं असें पव्हिण ॥ रतिसुखें तोषवीन ॥ लिंग द्यावें मजकारण ॥ ऐसें विनवा तयासी ॥६३॥ ऐकोन तियेचें वचन ॥ पुसती वैश्यासी सखी जाण ॥ जरी द्याल लिंगरत्न ॥ देईल रति दिवस तीनी ॥ ६४ ॥ अथवा द्याल मोलासी ॥ लक्षसंख्या देऊं द्रव्यासी ॥ जें कां वसे तुमचे मानसीं ॥ निरोपावें वैश्येप्रती ॥ ६५ ॥ ऐकोनि सखियांचें वचन ॥ ह्मणे वैश्य हांसोन ॥ देईन लिंग मनमोहन ॥ रतिकांक्षा करूनी ॥ ६६ ॥ तुमची मुख्य वारवनिता ॥ जरी होईल माझी कांता ॥ दिवस तीन पतिव्रता ॥ होवोनी असणें मनोभावें ॥६७॥ ह्मणोनियां मुख्य वनितेसी ॥ पुसतसे वैश्य तिसी ॥ व्यभिचारिणी नाम तुह्मांसी ॥ काय सत्य तुमचे बोल ॥ ६८ ॥ तुम्हां कैचें धर्मकर्म ॥ बहु पुरुषांचा संगम ॥ पतिव्रता कैचें नाम ॥ तुह्मां असे सांग मज ॥६९॥ प्रख्यात तुमचा कुळाचार ॥ सदा करणें व्यभिचार ॥ नव्हे तुमचें मन स्थिर ॥ एका पुरुषासवें ॥७०॥ ऐकोनि वैश्याचें वचन ॥ वारवनिता बोले आपण ॥ दिनत्रय सत्य जाण ॥ होईन तुमची कुलस्त्री ॥ ७१ ॥ द्यावें मातें लिंगरत्न ॥ रति संगतीं तुमचें मन ॥ संतोषवीन मी पूर्ण ॥ तन मन धनेंसी ॥ ७२ ॥ वैश्य ह्मणे तियेसी ॥ प्रमाण द्यावें आह्मासी ॥ दिनत्रय दिवानिशीं ॥ वागावें पत्नीधर्मकर्मे ॥७३॥ मग ती वारवनिता ॥ लिंगावरी ठेवी हाता ॥ चंद्र सूर्य साक्षि करिता ॥ झाली पत्नी तयाची ॥ ७४ ॥ इतुक्रिया अवसरीं ॥ लिंग दिलें तियेचे करीं ॥ संतोषोनी तिये

नारी ॥ करीं कंकण बांधिलें ॥७५॥ लिंग देवोनी वेश्येसी ॥ बोले वैश्य तियेसी ॥ माझ्या प्राणासमानेसी ॥ लिंग असे जाण तूं ॥ ७६ ॥ याकारणें लिंगासी ॥ जतन करणें परियेसीं ॥ हानि होतां यासी ॥ प्राण आपुला देईन ॥ ७७ ॥ ऐसें वेश्याचें वचन ॥ अंगिकारिलें आपण ॥ ह्मणे लिंग करीन जतन ॥ प्राणापरी परियेसा ॥७८॥ ऐसीं दोघें संतोषित ॥ बैसलीं नृत्यशाळेंत ॥ दिवस जातां अस्तंगत ॥ ह्मणती जाऊं मंदिरा ॥७९॥ संभोगसमयीं लिंगासीं ॥ न ठेवावें जवळिकेसीं ॥ ह्मणे वैश्य तियेसी ॥ दूर ठेवी ह्मणतसे ॥ ८० ॥ ऐकोनि वेश्याचें वचन ॥ मंडपीं ठेविलें लिंगरत्न ॥ मध्य स्तंभीं बैसवोन ॥ गेली अंतर्गृहांत ॥८१॥ क्रीडा करिती दोघेंजण ॥ होते ऐका एकक्षण ॥ उठिला अग्नि दारुण ॥ तया नाट्यमंडपीं ॥८२॥ अग्नि लागतां मंडप ॥ भस्म झाला जसा धूप ॥ वैश्य करी प्रलाप ॥ देखोनि तयेवेळीं ॥८३॥ ह्मणे हा हा काय झालें ॥ माझें प्राणलिंग गेलें ॥ विझविताती अति प्रबळें ॥ नगरलोक मिळोनी ॥८४॥ विझवूनियां पाहती लिंगासी ॥ दग्ध झालें परियेसीं ॥ त्यांत कुक्कुट मर्कटांसी ॥ जाळिलें पावकें ॥ ८५ ॥ वैश्य शोक करी भारी ॥ शरीर घाली भूमीवरी ॥ प्राणत्यागा सत्वरीं ॥ उद्युक्त झाला परियेसा ॥ ८६ ॥ ह्मणोनियां ते वेळीं ॥ अग्नि चेतविला तात्काळीं ॥ काष्ठभार प्रज्वाळी ॥ ज्वाळमाळी अगाध ॥ ८७ ॥ लिंग दहन झालें ह्मणत ॥ अग्नि प्रदीप्त तैसाचि तेथ ॥ उडी टाकिली अकस्मात ॥ सकळ आश्चर्य करिताती ॥ ८८ ॥ वेश्या ह्मणे काय झालें ॥ मज तों पाप घडलें ॥ कैसें कर्म उदेलें ॥ विपरीत देखा ॥ ८९ ॥ वैश्य माझा प्राणेश्वर ॥ त्यासि हानी निर्धार ॥ आतां कासयाचा धीर ॥ प्राण त्यागूं म्हणतसे ॥ ९० ॥ बोलाविलें विप्रांसी ॥ संकल्पिलें संपदेसी ॥ सहगमन करा-

वयासी ॥ दानधर्म करीतसे ॥ ९१ ॥ वस्त्रें भूषणें भांडारा ॥ देती झाली विप्रवरां ॥ चंदन
काष्ठ भारा ॥ चेतविलें अग्नीसी ॥ ९२ ॥ आपुल्या बंधुवर्गासी ॥ नमोनि पुसे तयांसी ॥
निरोप द्यावा आपणांसी ॥ पतीसवें जावया ॥ ९३ ॥ ऐकोनि स्त्रियेचें वचन ॥ दुःख पा-
वले सकळ जन ॥ ह्मणती हा कोण धर्म ॥ आचरिसी कां प्राणांतिकीं ॥ ९४ ॥ वेश्येच्या
मंदिरासी ॥ येती पुरुष रतीसी ॥ कासयाचा पती तुजसी ॥ ओळखावा कोणेपरी ॥ ९५ ॥
कैंचा वैश्य कैंचें लिंग ॥ वायां जाळिसी आपुलें अंग ॥ वारवनिता धर्म चांग ॥ नित्य
नूतन पुरुष ॥ ९६ ॥ कैंचा वैश्य काय रती ॥ कोणेपरीची तूं सती ॥ नगरलोक उपहा-
सती ॥ काय तव बुद्धि सांगे ॥ ९७ ॥ येणेंपरी सकळ जन ॥ वारिताती बंधूजन ॥
परी ती नायके जाण ॥ कवणाचेंही ते काळीं ॥ ९८ ॥ येरी ह्मणे तये वेळीं ॥ आपुला
पती वैश्य निर्धारीं ॥ प्राण दिधला त्याचे करीं ॥ चंद्र सूर्य साक्षी असे ॥ ९९ ॥ पती
पावला मृत्य ॥ कासया रहावें जित ॥ पतिव्रता आपण ख्यात ॥ बोलिलें पुराणीं ॥ १०० ॥
पतीसवें निर्धारीं ॥ सहगमन प्रीति करी ॥ एकेक पाउलीं निर्धारीं ॥ अश्वमेधाचें फळ
असे ॥ १ ॥ मातापिता उद्धरती ॥ एकवीस कुळें पवित्र होती ॥ त्रिनयन प्रसन्नमूर्ती ॥
होय तेणें अवधारा ॥ २ ॥ इतुकें जरी न करितां ॥ पातिव्रत्य होय वृथा ॥ कैंचि पाविजे
पंथा ॥ स्वर्गाचिया निश्चयें ॥ ३ ॥ ऐसें पुण्य जोडिती ॥ काय वांचूनि राहणें क्षितीं ॥
दुःख संसारसागर ख्याती ॥ मरणें सत्य कधीं तरी ॥ ४ ॥ ह्मणोनि विनवी सकळांसी ॥
निघाली बाहेर संतोषी ॥ आली अग्निकुंडापाशीं ॥ नमन करी तये वेळीं ॥ ५ ॥ स्मरोनि-
यां सर्वेश्वर ॥ केला सूर्यासि नमस्कार ॥ प्रदक्षिणें उल्हास थोर ॥ करिती झाली तये

वेळीं ॥ ६ ॥ नमोनियां द्विजांसी ॥ उभी ठेली अग्निपाशीं ॥ उडी घातली परियेसीं ॥ अभि-
नव झालें तये वेळीं ॥ ७ ॥ सदाशिव पंचवक्त्र ॥ दशभुज पवित्र ॥ हातीं आयुधें विचित्र ॥
त्रिशूळादि जाणपां ॥ ८ ॥ भस्मांकित जटाधारी ॥ बैसलासे नंदीवरी ॥ धरिता झाला
वरचेवरी ॥ वेश्येसी तये वेळीं ॥ ९ ॥ त्या अग्निकुंडांत ॥ जातवेद शीतळ होत ॥
भक्तवत्सल जगन्नाथ ॥ प्रसन्न झाला तये वेळीं ॥ १० ॥ हातीं धरूनि तियेसी ॥ उपरी
आणिलें त्वरेंसी ॥ प्रसन्न होवोनि व्योमकेशी ॥ वर माग ह्मणतसे ॥ ११ ॥ ईश्वर ह्मणे
तियेसी ॥ आलों तव परीक्षेसी ॥ धर्मधैर्य पहावयासी ॥ येणें घडलें परियेसा ॥ १२ ॥
झालों वैश्य आपणची ॥ रत्नलिंग स्वयंभूची ॥ माया अग्नि केला म्यांचि ॥ नाट्यमंडप
दग्ध केला ॥ १३ ॥ तव मन पहावयास ॥ केला आपण अग्निप्रवेश ॥ तूं पतिव्रता विशेष ॥
सत्य केलें व्रत आपुलें ॥ १४ ॥ संतोषलों तुझे भक्तीसी ॥ देईन वर जो मागसी ॥
आयुरारोग्य श्रियेसी ॥ जें इच्छिसी माग आतां ॥ १५ ॥ ह्मणे वेश्या तयेवेळीं ॥ नलगे
वर चंद्रमौळी ॥ स्वर्ग भूमि पाताळीं ॥ नवें भोग ऐश्वर्य ॥ १६ ॥ तव चरणकमळीं भृंग ॥
होवोनि राहीन अभ्यंग ॥ माझे इष्ट बंधुवर्ग ॥ सकळ तुझे सन्निधेसीं ॥ १७ ॥ दासदासी
माझे असती ॥ सकळां न्यावें स्वर्गाप्रती ॥ तव सन्निध पशुपती ॥ सर्वदा राहों सर्वेश्वरा
॥ १८ ॥ आह्मां न व्हावी पुनरावृत्ती ॥ संसारयातना मागुती ॥ विनोचावें स्वामी निश्चिती ॥
ह्मणोनि चरणीं लागली ॥ १९ ॥ ऐकोनि तियेचें वचन ॥ प्रसन्न झाला गौरीरमण ॥
सकळां विमानीं बैसवोन ॥ स्वर्गाप्रती पावला ॥ १२० ॥ तिचे नाट्यमंडपांत ॥ जो कां
झाला मर्कटघात ॥ कुक्कुट समवेत ॥ दग्ध जाहले परियेसा ॥ २१ ॥ ह्मणोनि पराशरऋषी ॥

सांगतसे रायासी ॥ मर्कटजन्म त्यजूनी हर्षीं ॥ तुझे उदरीं जन्मला ॥ २२ ॥ तुझे मंत्रियाचे कुशीं ॥ कुक्कुट जन्मला परियेसीं ॥ रुद्राक्षधारण फळें ऐसीं ॥ राजकुमार होऊनी आले ॥२३॥ पूर्व संस्काराकरितां ॥ रुद्राक्षधारण असे करित ॥ दोघे पुत्र ज्ञानवंत ॥ केवळ भक्त ईश्वराचे ॥ २४ ॥ पूर्वजन्मीं अज्ञान असतां ॥ रुद्राक्षधारण केलें नित्या ॥ इतुकें पुण्य घडलें असतां ॥ जाहले तुझे कुमार हे ॥ २५ ॥ आतां तरी ज्ञानवंती ॥ रुद्राक्ष धारण करिताती ॥ त्यांच्या पुण्या नाहीं मिती ॥ ह्मणोनि सांगे पराशरऋषी ॥ २६ ॥ श्रीगुरु ह्मणती दंपतीसी ॥ येणेंपरी रायासी ॥ सांगता झाला महाऋषी ॥ पराशर विस्तारें ॥ २७ ॥ ऐकोनी ऋषीचें वचन ॥ राजा विनवी कर जोडोन ॥ प्रश्न केला अतिगहन ॥ सांगेन ऐका एकचित्तें ॥ २८ ॥ ह्मणोनि सिद्ध विस्तारेंसीं ॥ सांगे नामधारकासी ॥ अपूर्व जाहलें परियेसीं ॥ पुढील कथा असे ऐका ॥ २९ ॥ गंगाधराचा नंदनू ॥ सांगे गुरुचरित्र कामधेनू ॥ ऐका श्रोते सावधानू ॥ लाधे चारी पुरुषार्थ ॥ ३० ॥ इति श्रीगुरुचरित्रामृत ॥ रुद्राक्षमाहात्म्य येथ ॥ सांगितलें निभ्रांत ॥ पुण्यात्मक पावन जें ॥ ३१ ॥ इति श्रीगुरुचरित्रामृते नृसिंहसरस्वत्युपाख्याने सिद्धनामधारकसंवादे रुद्राक्षमाहात्म्यवर्णनं नाम त्रयस्त्रिंशोऽध्यायः ॥ ओंव्या १३१ ॥

॥ श्रीगणेशाय नमः ॥ श्रीगुरु ह्मणती दंपतीसी ॥ ऐसा पराशरऋषी ॥ त्या काश्मीर राजासी ॥ रुद्राक्षमहिमा निरोपी ॥ १ ॥ तया राजकुमाराचें ॥ आणि त्या मंत्रिसुताचें ॥ सांगितलें पूर्वजन्माचें ॥ चरित्र सर्व ॥ २ ॥ संतोषोनि तो राजा ॥ लागला ऋषीच्या चरणांबुजा ॥ कर जोडोनियां वोजा ॥ विनवितसे परियेसा ॥ ३ ॥ राजा ह्मणे ऋषीश्वरासी ॥ स्वामी निरोपिलें आह्मांसी ॥ पुण्य घडलें आत्मजांसी ॥ रुद्राक्षधारणें करोनिया ॥४॥ पूर्वजन्मीं तयांसी ॥ रुद्राक्ष बांधिले अहर्निशीं ॥ त्या पुण्यें गति ऐसी ॥ प्राप्त झाली स्वामिया ॥ ५ ॥ ज्ञानवंत आतां जाण ॥ करिती रुद्राक्षधारण ॥ पुढें त्यांचें लक्षण ॥ कवणेपरी वर्ततील ॥ ६ ॥ भूत भविष्य वर्तमानीं ॥ त्रिकाळज्ञ तूंचि ज्ञानी ॥ सांगा स्वामी विस्तारोनी ॥ माझेनि मंत्रिकुमराचें ॥ ७ ॥ ऐकोनि रायाचें वचन ॥ सांगे ऋषी विस्तारोन ॥ दोघां पुत्रांचें लक्षण ॥ ऐकतां अपूर्व असे ॥ ८ ॥ ऋषी ह्मणे राजासी ॥ पुत्रभविष्य पुससी ॥ ऐकोनि दुःख पावसी ॥ कवणेपरी सांगावें ॥ ९ ॥ राव विनवी तयेवेळीं ॥ निरोपावें सकळीं ॥ उपाय करिसी तात्काळीं ॥ दुःखा वेगळा तूंचि करिसी ॥ १० ॥ ऐकोनियां ऋषेश्वर ॥ सांगता झाला विस्तार ॥ ऐक राजा तुझ्या कुमारा ॥ बारा वर्षें आयुष्य असे ॥११॥ तया बारा वर्षांत ॥ राहिले असती दिवस सात ॥ आठवे दिवशीं येईल मृत्य ॥ तुझ्या पुत्रासी परियेसी ॥ १२ ॥ ऐकोनि ऋषीचें वचन ॥ राजा पडला मूर्च्छायमान ॥ करिता झाला रुदन ॥ अनेक दुःख करितसे ॥ १३ ॥ राखें राखें तपोबळी ॥ ह्मणोनि लोळे चरणावरी ॥ करुणा भाकी नानापरी ॥ शरणागत मी तुझा ॥ १४ ॥ नानापरी गहिंवरत ॥ मुनीचे चरण धरित ॥ विनवीतसे स्त्रियांसहित ॥ कैसें करावें ह्मणोनियां

॥ १५ ॥ कृपानिधी ऋषीश्वरू ॥ सांगता झाला विचारू ॥ शरण रिघावें जगद्गुरु ॥ उमाकांत शिवासी ॥१६॥ मनींचें भय सोडूनी ॥ असावें आतां शिवस्मरणीं ॥ तो राखील शूलपाणी ॥ आराधावें तयातें ॥ १७ ॥ जिंकावया काळासी ॥ उपाय असे परियेसी ॥ सांगेन तुह्मां विस्तारेंसी ॥ एकचित्तें अवधारा ॥ १८ ॥ स्वर्ग मृत्यु पाताळासी ॥ देव एक व्योमकेशी ॥ निष्कलंक परियेसी ॥ नित्यानंद स्वरूप देखा ॥ १९ ॥ ऐसा देव मूर्तिमंत ॥ रजोरूपें ब्रह्मा सृजत ॥ सृष्टिक्रमणकारणार्थ ॥ वेद चारी निर्मिले ॥ २० ॥ तया चतुर्वदांसी ॥ दिधले कीं ब्रह्मयासी ॥ आत्म तत्त्व संग्रहासी ॥ ठेविलें होतें उपनिषद ॥२१॥ भक्तवत्सल सर्वेश्वर ॥ तेही दिधले वेदसार ॥ रुद्राध्याय सुंदर ॥ दिधला तया विरिंचीसी ॥२२॥ रुद्राध्यायमहिमान ॥ सांगेन ऐका तुह्मी पूर्ण ॥ मन इच्छित कामना पूर्ण ॥ करी सकळिकांची ॥ २३ ॥ परतत्त्व शिवात्मक ॥ रुद्राध्याय असे विशेख ॥ ब्रह्मयानें चतुर्मुखें ॥ विश्व सृजिलें वेदमतें ॥ २४ ॥ त्या चतुर्मुखीं देखा ॥ वेद चारी सांगे निका ॥ दक्षिणमुखें ऐका ॥ यजुर्वेद निरोपिला ॥२५॥ त्या यजुर्वेदांत ॥ उपनिषदसार ख्यात ॥ रुद्राध्याय निश्चितार्थ ॥ सांगे ब्रह्मा मुनिवरांसी ॥ २६ ॥ सकळ देव ऋषींसी ॥ मरीची अत्री परियेसी ॥ आणीक सकळ देवांसी ॥ सांगे ब्रह्मा तयेवेळीं ॥२७॥ तेंचि ऋषी पुढें देखा ॥ शिकविती पुत्रादिकां ॥ त्यांचे शिष्य परंपरीं देखा ॥ आपुल्या शिष्यां शिकविती ॥ २८ ॥ पुढें त्यांचे पुत्रपौत्रीं ॥ शिकविलें ऐका पवित्रीं ॥ विस्तार झाला जगत्रीं ॥ रुद्राध्याय भूमीवरी ॥ २९ ॥ त्याहूनि नाहीं आणीक मंत्र ॥ त्वरित तप साध्य होत ॥ चतुर्विध पुरुषार्थ ॥ लाधे त्वरित परियेसा ॥ ३० ॥ नानापरीचीं पातकें ॥ केलीं असता अनेकें ॥ रुद्रजाप्यें सान्द्-

कें ॥ भस्म होतीं परियेसा ॥३१॥ आणीक एक नवल केलें ॥ ब्रह्मदेवें रचिलें ॥ वेदतीर्थ जें भलें ॥ स्नान पान करावें ॥ ३२ ॥ सुकृत अथवा दुष्कृत ॥ जें केलें कांहीं हित ॥ जैसें पेरिलें असे शेत ॥ तेंचि उगवे परियेसा ॥ ३३ ॥ त्याणें कर्मै परिहरती ॥ संसार होय निष्कृती ॥ जे जन गुरूसी भजती ॥ ते तरती भवसागरा ॥ ३४ ॥ सृष्टिधर्म प्रवृत्तीसी ॥ ब्रह्में रचिलें परियेसीं ॥ आपुलें वक्षपृष्ठेंसीं ॥ धर्माधर्म उपजवी ॥ ॥ ३५ ॥ जे धर्मकर्म करिती ॥ इहपर सौख्य पावती ॥ जे अधर्मै रहाटती ॥ पापरूपी ते जाणिजे ॥ ३६ ॥ काम क्रोध लोभ जाणा ॥ मदमत्सर असे पूर्ण ॥ अधर्माचे सुत जाण ॥ इतुके नरकदायक ॥३७॥ गुरुतल्पक सुरापानी ॥ कामुक जे परिपूर्णी ॥ पुष्कलस्वरूप अंतःकरणीं ॥ तेचि प्रधान नरकाचे ॥३८ ॥ क्रोधी पुत्रवधी देखा ॥ मातृवधी असती जे कां ॥ ब्रह्महत्यादि पातका ॥ कन्याविक्रयी जे जन ॥ ३९ ॥ इतुके क्रोधापासुनी ॥ निष्पन्न झाले दुःखतरणी ॥ उद्भवले ह्मणोनि ॥ क्रोधसुत तयां ह्मणती ॥ ४० ॥ देव द्विज सुवर्ण देखा ॥ ब्रह्मस्व घेउनि नेदी जो कां ॥ सुवर्णतस्करी ऐका ॥ लोभपुत्र तया नांव ॥ ४१ ॥ ऐशा पातकांसी ॥ यमें निरोपिलें परियेसी ॥ तुह्मी जावोनि मृत्युलोकासी ॥ रहाटी करणें आपुले गुणें ॥ ४२ ॥ तुह्मांसवें मृत्य देखा ॥ देईन उपपातकां ॥ सकळ पाठवावे नरका ॥ जे जन असती भूमीवरी ॥ ४३ ॥ यमाची आज्ञा घेवोनी ॥ आलीं पातकें मेदिनी ॥ रुद्रजाप्य देखोनी ॥ पळोनि गेलीं परियेसा ॥ ४४ ॥ जावोनियां यमाप्रती ॥ महापापें विनविती ॥ गेलों होतों आह्मी क्षिती ॥ भयचकित होउनी आलों ॥४५॥ जयजयाजी यमराया ॥ आह्मीं पावलों महाभया ॥ किंकर तुमचे ह्मणोनियां ॥ प्रख्यात असे त्रिभुवनीं ॥४६॥ आह्मी तव आज्ञा-

धारी ॥ निरोपें गेलों धरित्री ॥ परी पळालों सत्वरीं ॥ रुद्रजाप्य ऐकोनी ॥ ४७ ॥ तेथें उभें रहावयासी ॥ शक्ती नाहीं आह्मांसी ॥ पाहतां रुद्रजाप्यासी ॥ पोळलों आह्मी स्वामिया ॥ ४८ ॥ ग्रामीं खेटीं नदीतीरीं ॥ वसताती द्विज निर्धारी ॥ देवालयीं पुण्यक्षेत्रीं ॥ रुद्रजाप्य करिताती ॥ ४९ ॥ कवणेपरी आह्मां गती ॥ जाऊं न शकूं आह्मी क्षितीं ॥ ब्राह्मण रुद्रजाप्य करिती ॥ तया ग्रामा जाऊं न शकों ॥ ५० ॥ आह्मीं जातों नरापासीं ॥ वर्तवितों महा पातकासी ॥ होती नर महादोषी ॥ तया मिती नसे कीं ॥ ५१ ॥ प्रायश्चित्त सहस्रेसी ॥ जो कां न मिळे पुण्यपुरुषीं ॥ परी पुरुषसूक्तेंसी ॥ पुण्यवंत होतसे ॥ ५२ ॥ एकादे समयीं भक्तीसी ॥ ह्मणती रुद्राध्यायासी ॥ तो होतो पुण्याचा राशी ॥ पाहतां त्यासी भय वाटे ॥ ५३ ॥ जो पापी महाघोर ॥ पुण्यवंत होतो नर ॥ भूमिवरी कैसा संचार ॥ आह्मां कष्ट होतसे ॥ ५४ ॥ काळकूट महाविष ॥ रुद्रजाप्य आह्मां दिसे ॥ शक्ति न होय आह्मांस ॥ भूमिवरी जावया ॥ ५५ ॥ रुद्रजाप्य जाणत्यासी ॥ कोण करील दंडासी ॥ आतां सांगा आह्मासी ॥ कवण ठाव निश्चयें ॥ ५६ ॥ इतकें बोलती पातकें ॥ ऐकोनि यम माथा तुके ॥ कोपोनि निघाला तवकें ॥ ब्रह्मलोका तये वेळीं ॥ ५७ ॥ जाऊनियां ब्रह्मयापाशीं ॥ विनवी यम तयासी ॥ जयजयाजी कमळवासी ॥ सृष्टिकारी चतुर्मुखा ॥ ५८ ॥ आह्मी तव शरणागत ॥ तव आज्ञें कार्य करित ॥ पापी नरातें आणित ॥ नरकालयाकारणें ॥ ५९ ॥ महापातकी नरांसी ॥ आणूं पाठवितों भृत्यांसी ॥ पातकी होय पुण्यराशी ॥ रुद्रजाप्यें करूनियां ॥ ६० ॥ समस्त जाती स्वर्गासी ॥ रुद्रजाप्यें लक्षमात्रेंसी ॥ व्यर्थ केलें आह्मांसी ॥ यमलोक ओस पडला ॥ ६१ ॥ नरक शून्य झाले स-

कळ ॥ यमराज्य निष्फळ ॥ सकळां सुख अपार ॥ उत्पत्ति राहिली स्वामियां ॥ ६२ ॥ यातें उपाय करावयासी ॥ देवा तूं समर्थ होसी ॥ राखे राखे आह्मांसी ॥ राज्य गेलें स्वामिया ॥ ६३ ॥ तुह्मीं जावोनि मनुष्यांसी ॥ स्वामित्व दिधलें भरंवसी ॥ रुद्राध्याय निधानेंसी ॥ कासया साधन दिधलेंत ॥ ६४ ॥ याकारणें मनुष्य ॥ लोकीं नाहीं पापलेश ॥ रुद्रजाप्यें विशेष ॥ पातकातें जाळिती अनेक ॥ ६५ ॥ येणेंपरी यम देखा ॥ विनविता झाला चतुर्मुखा ॥ प्रत्युत्तर देतसे ऐका ॥ ब्रह्मदेव यमासी ॥ ६६ ॥ अभक्तीनें दुर्मदेंसीं ॥ रुद्रजाप्य करणारासी ॥ अज्ञानी लोक तामसी ॥ उभ्यानीं निजोनी पढती नर ॥ ६७ ॥ त्यांतें अधिक पापें घडती ॥ ते दंडावे तुवां त्वरिती ॥ जे कां भावार्थें पढती ॥ ते त्वां सर्वदा वर्जावे ॥ ६८ ॥ बांधूं नका तुह्मी ऐका ॥ सांगावें ऐसें पातका ॥ रुद्रजाप्यें पुण्य विशेखा ॥ जे जन पढती भक्तीसी ॥ ६९ ॥ पूर्वजन्मीं पापें करिती ॥ अल्पायुषी होऊनि उपजती ॥ त्या पापांची होय निष्कृती ॥ रुद्रजाप्यें करूनियां ॥ ७० ॥ तैसें अल्पायुषी नरें ॥ रुद्रजाप्य करितां बरें ॥ पापें जाती निर्धारें ॥ दीर्घायु होय तो देखा ॥ ७१ ॥ तेज वर्चस्व संपत्ती ॥ बुद्धि आणीक सुधृती ॥ आयुरारोग्य ज्ञानसंपत्ती ॥ रुद्र-जाप्यें वर्धतसे ॥ ७२ ॥ रुद्रजाप्य मंत्रेंसी ॥ स्नान करवी ईश्वरासी ॥ तें उदक भक्तीसीं ॥ जे जन करिती स्नानपान ॥ ७३ ॥ त्यांतें मृत्युभय नाहीं ॥ आणीक एक नवल पाही ॥ रुद्रजाप्यें पुण्य देहीं ॥ चिरंजीव फळ असे ॥ ॥ ७४ ॥ अतिरुद्र जपोनि उदकासी ॥ स्नान घालितां नरासी ॥ भीतसे मृत्यु त्यांसी ॥ तेही तरती भवार्णवीं ॥ ७५ ॥ शतरुद्रअभिषे-कासी ॥ पूजा करिती रुद्रासी ॥ ते जन होती शतायुषी ॥ पापनिर्मुक्त परियेसा ॥ ७६ ॥

ऐसें जाणुनी मानसीं ॥ सांगे आपुले दूतांसी ॥ रुद्रनतां विप्रांसी ॥ बांधूं नको ह्मणे ब्रह्मा ॥ ७७ ॥ ऐकूनि ब्रह्मयाचें वचन ॥ यम पावला स्वस्थान ॥ ह्मणोनि पराशरें जाण ॥ निरोपिलें रायासी ॥ ७८ ॥ तरी तुझ्या कुमारासी ॥ उपाय सांगेन परियेसी ॥ दहा सहस्र रुद्रेंसीं ॥ स्नपन करी शिवातें ॥ ७९ ॥ दहा सहस्र वर्षांवरी ॥ तव पुत्र राज्य करी ॥ इंद्रासमान धुरंधरी ॥ कीर्तिवंत अपार ॥ ८० ॥ त्याचे राज्यश्रियेसी ॥ अपाय नसे निश्चयेंसी ॥ अकंटक निर्दोषी ॥ राज्य करील तुझा सुत ॥ ८१ ॥ बोलवावें शत विप्रांसी ॥ जे कां विद्वज्जन परियेसी ॥ लावावें ज्ञानी अनुष्ठानासी ॥ तात्काळ तुवां रुद्राध्याया ॥ ८२ ॥ ऐशा विप्रांकरीं देखा ॥ शिवासी करी अभिषेका ॥ आयुष्य वर्धेल कुमारका ॥ सद्यःश्रेय होईल ॥ ८३ ॥ येणेंपरी रायासी ॥ सांगे पराशरऋषी ॥ रायें महा आनंदेंसीं ॥ आयुष्यवर्धना आरंभ केला ॥८४॥ ऐसा ऋषी पराशर ॥ उपदेशितांचि द्विजवर ॥ बोलावोनियां सर्व संभार ॥ पुरवीतसे ब्राह्मणांसी ॥ ८५ ॥ शतसंख्याक कलशांसी ॥ विधिपूर्वक शिवासी ॥ पुण्य वृक्षतळेंसीं ॥ अभिषेक करवीतसे ॥ ८६ ॥ त्याचिया पूर्ण जळेंसीं ॥ स्नान करवीं पुत्रासी ॥ सप्त दिन येणें विधीसीं ॥ आराधिला ईश्वर ॥ ८७ ॥ अवघे झाले दिन सात ॥ बाळ पडिला निश्चेष्टित ॥ पराशरें येऊनि त्वरित ॥ उदकेंसीं सिंचिलें ॥ ८८ ॥ तयेवेळीं अवचिता ॥ शिव झाला रक्षिता ॥ सर्वांचि दिसे प्रत्यक्षता ॥ दंडहस्त महापुरुष ॥ ८९ ॥ ऐसे परम अद्भुत ॥ आले जे कां यमदूत ॥ रुद्रतेजें कांपत ॥ विप्रांपुढें ठाकले ॥ ९० ॥ वज्रदंष्ट्र भयचकित ॥ आले होते यमदूत ॥ समस्त द्विजवर रुद्र पढत ॥ मंत्रघोष पढताती ॥ ९१ ॥ मंत्राक्षता ते अवसरीं ॥ घातलिया कुमारावरी ॥ दूत

पाहती राहूनि दुरी ॥ जवळ येऊं न शकती ॥ ९२ ॥ हातीं महापाश धरिती ॥ कुमारा-
वरी टाकूं येती ॥ शिवदूत दंडहस्तीं ॥ मारूं आले यमदूतां ॥ ९३ ॥ भयें चकित यम-
दूत ॥ पळोनि गेले त्वरित ॥ पाठीं लागले शिवदूत ॥ मारीत नेले परियेसा ॥ ९४ ॥
येणेंपरी द्विजवर ॥ तेणें रक्षिला राजकुमार ॥ आशिर्वादबळ थोर ॥ देती तेव्हां वेदेंसीं
॥ ९५ ॥ तों तात्काळ राजपुत्र ॥ सावध झाला सत्वर ॥ राजयासी आनंद थोर ॥
समारंभ करीतसे ॥ ९६ ॥ पूजा करोनी द्विजांसी ॥ देता झाला भोजनासी ॥ देवोनियां
तांबुलासी ॥ संतोषविले द्विजवर ॥ ९७ ॥ संतोषोनी महाराजा ॥ सभा रचितसे
महावोजा ॥ बैसवोनी समस्तां द्विजा ॥ महाऋषीतें सिंहासनीं ॥ ९८ ॥ राजा
आपुले स्त्रियेसहित ॥ घालिता झाला दंडवत ॥ येवोनियां बैसला सभेंत ॥ आनंदित
मानसीं ॥ ९९ ॥ त्यासमयीं ब्रह्मसुत ॥ नारद आला अकस्मात ॥ राजा धांवोनि चरण
धरीत ॥ सिंहासनीं बैसवी ॥ १०० ॥ पूजा करोनी उपचारीं ॥ तयासी राजा विनंती
करी ॥ ह्मणे स्वामिया निर्धारी ॥ कोठोनी येणें झालें पैं ॥ १ ॥ राजा ह्मणे देवऋषी ॥ हिंडतां
तुह्मी त्रिभुवनासी ॥ काय वर्तलें विशेषीं ॥ आम्हालागीं निरोपिजे ॥ २ ॥ नारद ह्मणे
रायासी ॥ गेलों होतों कैलासासी ॥ येतां देखिलें मार्गासीं ॥ अपूर्व झालें परियेसा ॥ ३ ॥
महामृत्यू दूतांसहित ॥ न्यावया आला तव सुत ॥ सर्वेंचि येऊनी शिवदूत ॥ तयालागीं
पराभविलें ॥ ४ ॥ यमदूत पळोनि जाती ॥ यमापुढें सर्व सांगती ॥ आह्मां मारिलें
शिवदूतीं ॥ कैसें जावें त्या क्षितीं ॥ ५ ॥ यम कोपोनि निघाला ॥ वीरभद्रापासीं गेला ॥
ह्मणे दूतां कां मार दिला ॥ निरपराधें स्वामिया ॥ ६ ॥ निजकर्मानुबंधेसी ॥ राजपुत्र

गु. च.

गतायुषी ॥ त्यातें आणितां दूतांसी ॥ कासया शिवदूतीं मारिलें ॥७॥ वीरभद्र कोपेंसी ॥ ह्मणे तया यमासी ॥ दहा सहस्र वर्षांसी ॥ आयुष्य असे राजपुत्रा ॥८॥ न विचारितां चित्रगुप्ता ॥ वायां पाठविलें दूतां ॥ वोखटें केलें शिवदूतां ॥ जिवें सोडिलें ह्मणोनी ॥९॥ बोलावोनि चित्रगुप्ता ॥ आयुष्य विचारीन त्वरित ॥ ह्मणोनि पाठवी दूता ॥ चित्रगुप्त पाचारिला ॥१०॥ पुसताती चित्रगुप्तासी ॥ काढोनि पाहे पत्रासी ॥ बारा वर्षें आयुष्याशीं ॥ लिहिलें असे परियेसा ॥११॥ तेथेंचि लिहिलें होतें आणिक ॥ दहा सहस्र वर्षें लेख ॥ पाहोनि यम साशंकित ॥ ह्मणे अपराध आमुचा ॥१२॥ वीरभद्रातें वंदून ॥ यम गेला तेथोन ॥ आह्मीं आलों पाहून ॥ ह्मणोनि नारद सांगत ॥१३॥ रुद्रजाप्यें पुण्य करितां ॥ आयुष्य वर्धलें तव सुता ॥ मृत्यु जिंकिला तत्वता ॥ पराशर गुरुकृपें ॥१४॥ ऐसें नारद सांगोन ॥ निघोनि गेला तेथोन ॥ पराशरें तेव्हां जाण ॥ निरोप घेतला रायाचा ॥१५॥ सकळ गेले द्विजवर ॥ राजा हर्षें निर्भर ॥ राज्य भोगिलें धुरंधर ॥ पुत्रपौत्रीं महीवरी ॥१६॥ ऐसा रुद्राध्यायमहिमा ॥ पूजा करावी गुरुब्रह्मा ॥ भिणें नलगे काळयमा ॥ श्रीगुरु ह्मणती दंपतीसी ॥१७॥ सिद्ध ह्मणे नामधारकासी ॥ ऐसी कथा विस्तारेंसी ॥ श्रीगुरु सांगे दंपतीसी ॥ प्रेमभावें करोनियां ॥१८॥ त्या श्रीगुरूसी ॥ प्रीति थोर रुद्राध्यायासी ॥ पूजा करावी भक्तीसी ॥ रुद्राध्यायें करोनियां ॥१९॥ ह्मणे सरस्वती गंगाधर ॥ सांगे गुरुचरित्र विस्तार ॥ ऐकतां तरे भवसागर ॥ लाधे चारी पुरुषार्थ ॥२०॥ इति श्रीगुरुचरित्रपरमकथाकल्पतरौ श्रीनृसिंहसरस्वत्युपाख्याने सिद्धनामधारकसंवादे रुद्राध्यायमहिमावर्णनं नाम चतुस्त्रिंशोऽध्यायः ॥ ओंव्या १२० ॥

॥ श्रीगणेशाय नमः ॥ नामधारक सिद्धासी ॥ विनवीतसे परियेसी ॥ रुद्राध्याय विस्तारेंसी ॥ दंपतीसी सांगितला ॥ १ ॥ पुढें काय वर्तलें ॥ विस्तारोनी सांग वहिलें ॥ मन माझें वेधलें ॥ गुरुचरित्र ऐकावया ॥ २ ॥ सिद्ध ह्मणे ऐक ताता ॥ अपूर्व असे पुढें कथा ॥ तेचि जाण पतिव्रता ॥ श्रीगुरूतें विनविलें ॥३॥ कर जोडोनि गुरूसी ॥ विनवीतसे परियेसीं ॥ आह्मां गती पुढें कैसी ॥ चरणस्मरणें सनातन ॥ ४ ॥ याकारणें आपणांसी ॥ एखादा मंत्र उपदेशीं ॥ जयाचेनि योगें जीवासी ॥ सुख होय निरंतर ॥ ५ ॥ श्रीगुरु म्हणती तियेसी ॥ स्त्रियांस काय उपदेशीं ॥ पतिभक्तिविणें काय त्यांसी ॥ उपदेशासी देऊं नये ॥ ६ ॥ देतां उपदेश स्त्रियांसी ॥ विघ्न असे मंत्रासी ॥ पूर्वीं शुक्राचार्यासी ॥ झालें असे परियेसा ॥७॥ ऐसें ऐकतां गुरुवचन ॥ विनवीतसे कर जोडून ॥ स्त्रिया केंवी मंत्रहीन ॥ शुक्राचार्या कैसें झालें ॥८॥ हें विस्तारोनी आह्मासी ॥ सांगा स्वामी कृपेसी ॥ ह्मणोनि लागली चरणासी ॥ करुणावचनें करूनियां ॥ ९ ॥ श्रीगुरु सांगती तियेसी ॥ पूर्वकथा आहे ऐसी ॥ युद्ध देवदैत्यांसीं ॥ सदैव होय निर्धारीं ॥ १० ॥ दैत्यसैन्य पडे रणीं ॥ शुक्र जपे संजीवनी ॥ सकळ सैन्य उठवोनी ॥ पुनरपि युद्धा पाठवीत ॥ ११ ॥ इंद्र वज्रें असुर मारी ॥ शुक्र तयां जिवंत करी ॥ सर्वेचि युद्ध तांतडी निर्धारीं ॥ करीत असती असुर ॥१२॥ ऐसें होतां एके दिवशीं ॥ इंद्र गेला कैलासासी ॥ सांगे तो स्थिति शिवासी ॥ शुक्राचार्याची मंत्रकरणी ॥ १३ ॥ कोपोनियां ईश्वर ॥ नंदीस सांगे उत्तर ॥ तुवां जावोनि सत्वर ॥ शुक्राचार्या धरोनि आणी ॥ १४ ॥ स्वामीचें वचन ऐकोनी ॥ नंदी गेला त्वरें करूनी ॥ होता शुक्र तपोध्यानीं ॥ मुखीं धरिला नंदीनें ॥ १५ ॥ नंदी नेत शिवापाशीं ॥ आकांत

वर्तला दैत्यांसीं ॥ ईश्वरें प्राशिलें शुक्रासी ॥ अगस्ती सिंधुचियापरी ॥१६॥ ऐसा कित्येक दिवसांवरी ॥ शुक्र होता शिवाचे उदरीं ॥ निघूनि गेला मूत्रद्वारीं ॥ विसर पडला शिवासी ॥ १७ ॥ पूर्वीं होतें शुक्र नांव ॥ ईश्वर उदरीं झाला उद्भव ॥ नांव पावला भार्गव ॥ पुनः संजीवनी जपे तो ॥ १८ ॥ इंद्र मनीं विचारी ॥ पुरोहितासी पाचारी ॥ कैसा शुक्र जिवंत करी ॥ पुनः दैत्य जनांसी ॥ १९ ॥ त्यासी विघ्न करावें एक ॥ तूं पुरोहित विवेक ॥ बुद्धि विचारी अणिक ॥ बृहस्पती गुरुराया ॥ २० ॥ पाहेपां दैत्यांचें दैव कैसें ॥ शुक्रासारिखा गुरु विशेषें ॥ देतो जीवांसि भरंवसें ॥ दैत्य येती युद्धासी ॥२१॥ तैसा तूं नव्हेस आह्मांसी ॥ तरी बुद्धि विचारी परियेसी ॥ देवगुरु तूं ह्मणविसी ॥ बुद्धि करी शीघ्र आतां ॥ २२ ॥ तूं पूज्य सकळ देवांसी ॥ आह्मांलागीं कृपा करिसी ॥ शुक्राचार्य काय विशेषीं ॥ तव-समान नसेची ॥ २३ ॥ ऐसें नानापरी देखा ॥ इंद्र अमरांचा नायक ॥ पूजा करी उप-चारिक ॥ बृहस्पती संतोषला ॥ २४ ॥ गुरु ह्मणे इंद्रासी ॥ ऐक तूं उपायासी ॥ षट्-कर्ण होतां शुक्रमंत्रासी ॥ सामर्थ्य राहील शुक्राचें ॥ २५ ॥ एक पाठवावा शुक्रापासीं ॥ विद्यार्थी करूनि त्वरेसी ॥ मंत्र शिकवील परियेसी ॥ तेणें कार्य साधेल ॥ २६ ॥ मम पुत्र कच असे ॥ त्यातें पाठवूं विद्याभ्यासें ॥ निर्धार केला परियेसें ॥ याचीपरी अवधारा ॥२७॥ कचातें आणूनि बुद्धियुक्ती ॥ सांगतसे बृहस्पती ॥ तुवां जावें शुक्राप्रती ॥ विद्यार्थी रूप धरोनि ॥ २८ ॥ आसुची निंदा तेथें करी ॥ मनोभावें सेवा करीं ॥ संजीवनी विद्या सत्वरीं ॥ मंत्र शिकें पुत्रराया ॥ २९ ॥ इंद्रादिक देवतांचा ॥ निरोप घेत पितयाचा ॥ शुक्राप्रती गेला कच ॥ विद्यार्थीरूप धरोनी ॥ ३० ॥ नमन केलें साष्टांगीं ॥ उभा राहिला

अग्रभागीं ॥ शुक्र पुसे तयालागीं ॥ कवण कोठोनि आलासी ॥ ३१ ॥ बोले आपण द्विज-
कुमार ॥ तव कीर्ती ऐकिली थोर ॥ विद्याभ्यासासी सत्त्वर ॥ तव सेवेसी पातलों ॥ ३२ ॥
सेवक होईन तुझे चरणीं ॥ आलों इच्छेसी धरूनी ॥ तूं भक्तवत्सल शिरोमणी ॥ अना-
थाचा प्रतिपालक ॥ ३३ ॥ बोलोनि ऐसें कच वचन ॥ विनवितसे कर जोडून ॥ शुक्र-
कन्या जवळी येऊन ॥ पितयालागीं विनवीत ॥ ३४ ॥ पित्यासी ह्मणे देवयानी ॥ विप्र
दिसे भला नयनीं ॥ यातें तुह्मी शिष्य करूनी ॥ विद्याभ्यासा योग्य असे ॥ ३५ ॥ कच
सुंदर सुलक्षण ॥ जैसा दिसे कीं मदन ॥ देवयानी करी चिंतन ॥ ऐसा पती मज व्हावा
॥३६॥ ऐसी वांच्छा धरूनी ॥ पितयातें विनवूनी ॥ त्यास घेतला ठेवूनी ॥ शुक्राचार्य विद्या
सांगे ॥ ३७ ॥ ऐसा विद्याभ्यास करीत ॥ दैत्यकुळीं राहिला निश्चित ॥ देवकरणी वळ-
खूनि दैत्य ॥ कापट्यवेष ह्मणती तया ॥ ३८ ॥ शिकूनिया विद्येसी ॥ मग जाऊन शिक-
वील देवांसी ॥ अपयश येईल आह्मांसी ॥ तेणें मनीं चिंतावले ॥ ३९ ॥ काळ क्रमितां
एके दिवशीं ॥ कच पाठविला समिधांसी ॥ दैत्य गेले साह्यासी ॥ तया कचाचे अवधारा
॥ ४० ॥ रानीं जातां कचासी ॥ दैत्य मारिती त्वरेसीं ॥ समिधा घेवोनी घरासी ॥ दैत्य
आपण येते झाले ॥ ४१ ॥ शुक्राचार्याची कन्या ॥ पितयासी परम मान्या ॥ पितयासी
विनवीं धन्या ॥ कच कैसा नाहीं आला ॥ ४२ ॥ कच आलियावांचोनी ॥ भोजन न करि
देवयानी ॥ ऐसें ऐकतां निर्वाणी ॥ शुक्राचार्य चिंतावला ॥ ४३ ॥ ज्ञानी पाहे मानसीं ॥
मृत्यु झाला तयासी ॥ मंत्र जपुनी संजीवनेसी ॥ त्वरित घरीं आणिला ॥ ४४ ॥ आणिक
भरतां दिवस ॥ दैत्य करिती अति द्वेष ॥ गेला होता वनास ॥ पुनः तयासी वधियेलें

॥ ४५ ॥ कापुनियां तयासी ॥ चूर्ण करिती वेगेंसीं ॥ दाही दिशा टाकूनि अस्थींसी ॥ गृहाप्रती येते झाले ॥ ४६ ॥ दिवस गेला अस्तमानीं ॥ पुसतसे देवयानी ॥ कच न दिसे नयनीं ॥ पितयासी विनवीत ॥ ४७॥ कच माझा प्राणसखा ॥ न आणितां खाईन विखा ॥ दावीं मज तयाचे मुखा ॥ ह्मणोनि प्रलाप करीतसे ॥ ४८ ॥ कन्येवरी ममत्व बहुत ॥ तेणें शुक्र ज्ञानें पहात ॥ छिन्नभिन्न केलें ह्मणत ॥ मंत्र जपला संजीवनी ॥ ४९ ॥ धन्य मंत्राचें सामर्थ्य ॥ कच आला धांवत ॥ देवयानी संतोषत ॥ पितयानें आलिंगिली ॥ ५० ॥ दैत्य मनीं विचार करिती ॥ कांहीं केल्या न मरे निश्चिती ॥ गुरुचि कन्येवरी प्रीति ॥ ह्मणूनि गुरु वांचवी ॥ ५१ ॥ आतां विचार करूं यासी ॥ उदईक येईल एकादशी ॥ मारुनी मिळवूं पानेसीं ॥ गुरुमुखीं पाजवूं ॥ ५२ ॥ ऐशी बुद्धि करोनी ॥ आली एकादशी दिनी ॥ कचातें बाहेरीं नेवोनी ॥ दैत्यें मारिला तेवेळीं ॥ ५३ ॥ प्राशन करविती गुरूसी ॥ मिळवूनियां मद्यरसासीं ॥ स्निग्ध मिळवूनि बहुवसीं ॥ दैत्य गुरुसी देते झाले ॥ ५४ ॥ मागुती पुसे देवयानी ॥ पितयातें विनवूनी ॥ कचासी आणी ह्मणोनि ॥ रुदन करी आक्रोशें ॥ ५५ ॥ शुक्र पाहतसे ज्ञानीं ॥ न दिसे कच त्रिभुवनीं ॥ खेद करितसे मनीं ॥ कन्यालोभें करोनियां ॥ ५६ ॥ विचार करितां प्रसंगीं ॥ दिसूं लागला आपुले अंगीं ॥ संदेह पडला शुक्रालागीं ॥ कैसें करावें ह्मणोनी ॥ ५७ ॥ कन्येसी ह्मणे शुक्र देखा ॥ कच नये आतां ऐका ॥ माझे उदरीं असे निका ॥ कैसा काढूं तयासी ॥ ५८ ॥ यासी काढितां आपणासी ॥ मृत्यु होईल परियेसीं ॥ काय अभिलाष असे त्यासी ॥ ह्मणोनि कन्येसी पुसतसे ॥५९॥ पितया विनवी देवयानी ॥ अभिलाष होता माझे

मनीं ॥ भार्या त्याची होऊनी ॥ दोघें राहूं तुजपासीं ॥ ६० ॥ हाच्चि व्हावा माझा पती ॥
ऐसें संकल्पिलें चित्तीं ॥ न उठे जरी पुढती ॥ तरी प्राण त्यागीन ॥ ६१ ॥ संदेह पडला
शुक्रासी ॥ बोधिता झाला कन्येसी ॥ त्यास उठवितां आपणासी ॥ मृत्यु होईल अव-
धारीं ॥ ६२ ॥ कन्या ह्मणे पितयासी ॥ सकळां तूं वांचविसी ॥ आपुला प्राण जाईल
ह्मणसी ॥ हें आश्चर्य वाटतसे ॥ ६३ ॥ शुक्र ह्मणे देवयानी ॥ मंत्र असे संजीवनी ॥ मजवां-
चोनि नेणें कोणी ॥ मातें कोण उठवील ॥ ६४ ॥ मंत्र सांगों नये कोणा ॥ षट्कर्णीं होतां
जाईल गुणा ॥ कचाकरितां माझा प्राण ॥ जाईल देखा अवधारीं ॥ ६५ ॥ न ऐके कन्या
देवयानी ॥ चरणीं पडली येऊनी ॥ विनवीतसे कर जोडोनी ॥ मंत्र आपणातें शिकवावा
॥ ६६ ॥ कचासी तूं सजीव करी ॥ तुज येईल मृत्यु जरी ॥ मी मंत्र जपोनी निर्धारीं ॥
सजीव करीन तुजलागीं ॥ ६७ ॥ शुक्र ह्मणे कन्येसी ॥ मंत्र सांगूं नये स्त्रियांसी ॥ दोष
असती परियेसी ॥ वेदशास्त्रीं असंख्य ॥ ६८ ॥ स्त्रियांसी मंत्र पतिभक्ती ॥ मंत्र कासया
पाहिजेती ॥ सांगतां दोष आह्मां घडती ॥ मंत्रसामर्थ्य जाईल ॥ ६९ ॥ पितयासी ह्मणे
देवयानी ॥ सुखें असा मंत्र जपोनी ॥ प्राण जातो ह्मणोनी ॥ मूर्च्छागत पडली ते ॥ ७० ॥
शुक्राची कन्येवरी प्रीति ॥ सावध केली त्वरित गतीं ॥ कच उठवितों ह्मणती ॥
सांगे मंत्र तिजलागीं ॥ ७१ ॥ त्याचिया पोटीं कच होता ॥ तेणें मंत्र ऐकिला तत्वतां ॥
संतोष झाला त्याच्या चित्ता ॥ कार्य साधलें ह्मणोनी ॥ ७२ ॥ तीन वेळां मंत्र जपतां ॥
कचें पाठ केला तत्वतां ॥ षट्कर्णीं मंत्र होतां ॥ जपिला कचाचे निमित्तें ॥ ७३ ॥ शुक्राचे
पोटांतुनी ॥ कच निघाला पोट फाडूनी ॥ मंत्र जपे ती देवयानी ॥ पितयातें उठविलें

॥ ७४ ॥ शुक्राचार्यातें नमुनी ॥ कच विनवी कर जोडूनी ॥ मातें दैत्य मारिती ह्मणोनी ॥ निरोप द्यावा मजलागीं ॥ ७५ ॥ स्वामीचेनी विद्या शिकलों ॥ सकल अर्थ लाधलों ॥ तव कृपेनें वांचलों ॥ ह्मणूनि चरणीं लागला ॥ ७६॥ शुक्राचार्य हर्षोनी ॥ निरोप दिधला त्यालागोनी ॥ पदर धरी देवयानी ॥ पति व्हावें ह्मणोनियां ॥७७॥ तूतें मारिलें तीन वेळीं ॥ मीं वांचविलें त्या काळीं ॥ विद्या शिकलासी पित्याजवळीं ॥ तरी मजला वरावें ॥ ७८ ॥ कच ह्मणे ऐक बाळे ॥ गुरुकन्या भगिनी बोले ॥ तुवां आह्मां वांचविलें ॥ माता होसी निर्धारीं ॥ ७९ ॥ वरितां दोष आपणासी ॥ दूषण ठेवितील सर्व ऋषी ॥ भगिनी तूं आमुची होसी ॥ कैसी वरूं ह्मणे तो ॥ ८० ॥ देवयानी कोपोनी ॥ शाप दिधला ते क्षणीं ॥ वृथा विद्या होईल मनीं ॥ जाण कपटी तूं खरा ॥ ८१ ॥ माझी अंतरींची आशा ॥ वृथा केली दुराशा ॥ विद्या निष्फळ परियेसा ॥ ह्मणूनि शाप दीधला ॥ ८२ ॥ कच ह्मणे तियेसी ॥ वृथा शापिलें आह्मांसी ॥ पुरुष वरील तुजशीं ॥ ब्रह्मकुळाव्यतिरिक्त ॥ ८३ ॥ तव पिता ब्रह्मज्ञानी ॥ जाणे मृतसंजीवनी ॥ तुज शिकविलें ह्मणोनी ॥ पुढें मंत्र न चाले ॥ ८४ ॥ ऐसा शाप देऊनी ॥ कच गेला निघूनी ॥ संतोष झाला इंद्रभुवनीं ॥ दैत्य नाश पावले कीं ॥ ८५ ॥ शुक्राचा संजीवनी मंत्र ॥ कामा नये झाला अपात्र ॥ स्त्रियांसी न सांगावा मंत्र ॥ याचि कारणें गुरु ह्मणती ॥ ८६ ॥ स्त्रियांलागीं पतिसेवा ॥ याचि कारणें मंत्र कदां न द्यावा ॥ व्रतोपवास करावा ॥ पुरुषनिरोपें परियेसा ॥८७॥ सावित्री विनवी श्रीगुरूसी ॥ व्रत आचरलें बहुवसीं ॥ तुझे वाक्यें आह्मांसी ॥ व्रत एखादें निरोपावें ॥ ८८ ॥ तूंचि देवा विश्वेश ॥ तुजवांचोनी नेणूं आणिकास ॥ व्रत तूंचि आह्मास ॥ व्रत

करूं चरणसेवा॥८९॥भक्ति राहे तवचरणीं ॥ ऐसें निरोपीं मजलागूनी ॥ ह्मणूनि लागली चरणीं ॥ कृपेलागीं सद्गुरूचे ॥९०॥ गुरु म्हणती तियेसी ॥ सांगेन व्रत परियेसीं ॥ स्थिर होवोनी मानसीं ॥ राज्य पावे तव पती ॥९१॥ दंपत्य विनवी श्रीगुरूसी ॥ वाक्य कारण आह्मांसी ॥ जैसा तूं निरोप देशी ॥ तेणें रीती राहूं ॥ ९२ ॥ जो गुरुवाक्य न करी ॥ तो पडे रौरव घोरीं ॥ तुझीं वाक्यें आह्मां शिरीं ॥ म्हणूनि चरणीं लागलीं ॥ ९३ ॥ भक्तवत्सल श्रीगुरुनाथ ॥ सांगता झाला निश्चयपंथ ॥ विस्तारोनी समर्थ ॥ व्रत तिसी सांगतसे ॥ ९४ ॥ सिद्ध ह्मणे नामधारका ॥ श्रीगुरु सांगती कौतुका ॥ ऐकताती दंपती निका ॥ अति प्रीति करोनियां ॥९५॥ श्रीगुरु म्हणती तयांसी ॥ सांगेन व्रत इतिहासासी ॥ ऋषी पुसती सूतासी ॥ व्रत बरवें निरोपावें॥९६॥सूत ह्मणे ऋषीश्वरांसी ॥ व्रत सांगेन ऐका हर्षी॥ स्त्री अथवा पुरुषासी ॥ व्रत असे अवधारा ॥ ९७ ॥ नित्यानंद असे शांत ॥ निर्विकल्प विख्यात ॥ ऐसा ईश्वर अर्चितां त्वरित ॥ सकळाभीष्टें पाविजे ॥९८॥ संसारसागरांत ॥ विषयातुर आचरत ॥ तेहि पूजितां पूर्णभक्त ॥ त्यांसी ईश्वर प्रसन्न होय ॥९९॥ विरक्त अथवा विषयासक्त ॥ भजताती जन समस्त ॥ एकादे समयीं गुरुभक्त ॥ शिवव्रत आचरावें ॥ १०० ॥ तेणें पाविजे पैलपार ॥ ऐसें बोलती वेद चार ॥ स्वर्गापवर्गा अधिकार ॥ त्यासीं होईल परियेसा ॥ १ ॥ विशेष व्रत असे एक ॥ सोमवार व्रतनायक ॥ ईश्वरार्चन करावें एक ॥ तेणें ईश्वर पाविजे ॥ २ ॥ नक्तभोजन उपवासीं ॥ जितेंद्रिय परियेसीं ॥ वैदिक तांत्रिक पूजेसी ॥ विधिपूर्वक सकळिक ॥३॥ गृहस्थ अथवा ब्रह्मचारी ॥ कन्या सुवासिनी निर्धारीं ॥ भर्तृविण विधवा नारी ॥ व्रत करावें तिणेंही ॥ ४ ॥ याचें पूर्वील

आख्यान ॥ सांगेन ऐका अतिगहन ॥ ऐकतां करी पावन ॥ सकळांसहि परियेसा ॥५॥ स्कंदपुराणींची कथा ॥ सर्व साद्यंत ऐका ॥ पूर्वयुगीं आर्यावर्तका ॥ राजा एक अव-धारा ॥६॥ चित्रवर्मा नाम त्यासी ॥ धर्मात्मा राजा परियेसीं ॥ कर्ममार्ग आचरे हर्षी ॥ अधर्मातें शिक्षा करी ॥ ७ ॥ अखिल पुण्यें त्याणें केलीं ॥ सकळ संपत्ति वांटिली ॥ सकळ पृथ्वी जिंकिली ॥ पराक्रमें करूनियां ॥ ८ ॥ सहपत्नी धर्म करिती ॥ पुत्र-काम्ये शिवाप्रती ॥ ऐसा किती काळ क्रमिती ॥ कन्या झाली तयातें ॥ ९ ॥ अति सुंदर सुलक्षण ॥ पार्वतीरूपा समान ॥ तेज फांके सूर्यकिरण ॥ अति लावण्य न वर्णवे ॥ १० ॥ वर्तावया जातकासी ॥ बोलाविले ज्योतिषी ॥ द्विज मिळाले बहु ऋषी ॥ वर्तविती जातक ॥ ११ ॥ ह्मणती कन्या सुलक्षण ॥ नामें सीमंतिनी पूर्ण ॥ उमे-सारिखी लावण्यें ॥ किंवा दयमंतीस्वरूप होय ॥ १२ ॥ भारती ऐशी रूपासी ॥ लक्ष्मी-सारिखी गुणराशी ॥ ज्ञानें देवमातासरसी ॥ जानकीसमान पतिव्रता ॥ १३ ॥ सूर्यासा-रिखी होईल कांती ॥ चंद्रासमान दिसे दीप्ती ॥ दहा सहस्र वरुषें ख्याती ॥ पतीसह राज्य करील ॥१४॥ जातक वर्तविलें तिसी ॥ राव पावला अतिहर्षी ॥ अखिल दानें विप्रांसी ॥ देतो आनंदें अवधारा ॥ १५ ॥ असतां राव सभेसी ॥ एक द्विज उठोनि परियेसी ॥ भय न धरितां वाक्यासी ॥ बोलतसे अवधारा ॥ १६ ॥ ऐक राया माझें वचन ॥ कन्या-लक्षण सांगेन ॥ चवदावे वर्षी विधवापण ॥ होईल इयेसी जाण पां ॥ १७ ॥ ऐसें वाक्य परिसोनी ॥ राव पडिला मूर्च्छा येवोनी ॥ चिंता वर्तली बहु मनीं ॥ विप्रवाक्य परिसतां ॥ १८ ॥ ऐसें सांगुनि ब्राह्मण ॥ गेला निघोनी तत्क्षण ॥ सर्व दुःखातें पावून ॥ तळमळत

तेधवां ॥ १९ ॥ ऐसें बाळपण क्रमितां ॥ सप्त वर्षें जाती त्वरितां ॥ चिंतीत होतीं माता-
पिता ॥ वऱ्हाड केवीं करावें ॥२०॥ चवदावे वर्षीं विधवापण ॥ ह्मणोनि बोलिला ब्राह्मण ॥
तेणें व्याकुळ अंतःकरण ॥ राजा राजपत्नीचें ॥ २१ ॥ कन्या खेळे राजांगणीं ॥ सवें
सखियांतें घेवोनी ॥ बोलतां ऐकिलें विप्रवचनीं ॥ चौदावे वर्षीं विधवत्व ॥२२॥ ऐसें ऐकोनी
वचन ॥ कन्या करीतसे चिंतन ॥ मग विचार करून ॥ काय करिती झाली ॥ २३ ॥
याज्ञवल्क्याची पत्नी ॥ नांव तियेचें मैत्रायणी ॥ तीतें घरीं पाचारोनी ॥ चरण
धरित तेधवां ॥ २४ ॥ भावें साष्टांगें नमूनी ॥ करसंपुट जोडोनी ॥ विनवी करुणावचनीं ॥
प्रतिपाळी आह्मांतें ॥ २५ ॥ सौभाग्य स्थिर होय जेणें ॥ उपाय सांगें मजकारणें ॥ चंचळ
जें अंतःकरण ॥ तें जाणोनि उद्धरावें ॥ २६ ॥ कन्या विनवी तियेसी ॥ ऐसें व्रत
सांगा आह्मांसी ॥ आह्मां जननी तूंचि होसी ॥ कैसें व्रत सांग मज ॥ २७ ॥ ऐकोनि
कन्येच्या वचना ॥ बोले मैत्रायणी जाणा ॥ शरण रिघावें उमारमणा ॥ अहेवपण स्थिर
होय ॥ २८ ॥ सोमवार परियेसीं ॥ व्रत आचरी नेमेसीं ॥ पूजा करावी शिवासी ॥ उप-
वास करूनि अवधारा ॥ २९ ॥ बरवें सुस्नात होवोनी ॥ दिव्यांबर नेसूनी ॥ स्थिरासन
करोनी ॥ पूजा करावी गौरीहरा ॥ ३० ॥ अभिषेकें पापक्षय ॥ पीठ पूजितां साम्राज्य
होय ॥ गंधाक्षता पुष्पमाल्य ॥ सौभाग्य सौख्य पाविजे ॥ ३१ ॥ सौगंध्य होय धूपदानें ॥
कीर्ति पाविजे दीपदानें ॥ सर्व भोग नैवेद्यार्पणें ॥ तांबूलदानें लक्ष्मी स्थिर ॥ ३२ ॥ चतु-
र्विध पुरुषार्थ ॥ नमस्कार करित ॥ अष्टैश्वर्यें नांदत ॥ ईश्वरजप केलिया ॥ ३३ ॥ होमें सर्व
कोश पूर्ण ॥ समृद्धि होतसे जाण ॥ करितां ब्राह्मणभोजन ॥ सर्व देव तृप्त होती ॥ ३४ ॥

ऐसें सोमवारव्रत ॥ कन्ये करीवो निश्चित ॥ भय आलिया त्वरित ॥ परिहारती महाक्लेश ॥३५॥ गौरीहरपूजा करितां ॥ समस्त दूरितें जाती तत्वतां ॥ ऐकोनि सीमंतिनी त्वरित ॥ अंगिकारी व्रत देखा ॥३६॥ सोमवाराचिया व्रता ॥ सकळ दुरितें झाली शांतता ॥ ऐसें व्रत आचरितां ॥ विवाहा योग्य जाहली ॥ ३७ ॥ राजा चिंता करी मानसीं ॥ विवाह करावा कन्येसी ॥ जैसें प्राक्तन असेल तिसीं ॥ तैसें घडों म्हणतसे ॥ ३८ ॥ वर पहावया क्षात्रियांसी ॥ पाठविता झाला पृथ्वीसी ॥ दमयंती नळाच्या वंशीं ॥ इंद्रसेनाचा कुमार ॥३९॥ चित्रांगद वर बरवा ॥ चंद्रप्रभासम ठेवा ॥ विवाहाकारणें नेमावा ॥ कन्या दिधली संतोषें ॥ ४० ॥ सकळ राजे मांडलिक देखा ॥ पाचारिले समस्त विवाहिका ॥ लग्न झालें अतिकौतुका ॥ महोत्साह नानापरी ॥४१॥ नानापरी द्रव्यालंकार ॥ वऱ्हाडिकां देई नृपवर ॥ अखिल दानें सोपस्कर ॥ विप्रांलागीं देता झाला ॥४२॥ पाठवणी केली सकळिकां ॥ जामात ठेविला कौतुका ॥ कन्यास्नेह अनेका ॥ ह्मणोनि राहविलें जामाता ॥४३॥ राजपुत्र श्वशुरगृहीं ॥ पत्निस्नेहें राहिला पाही ॥ काळ क्रमितां एके समयीं ॥ जलक्रीडेसी निघाला ॥४४॥ गेला कालिंदी नदीसीं ॥ राजपुत्र परियेसीं ॥ सर्व दळ समागमेंसी ॥ नदीतिरीं पावला ॥४५॥ राजपुत्र निघे नदींत ॥ सर्वे निघाले सेवक बहुत ॥ विनोद करीत पहात ॥ अतिहर्षे जलक्रीडा ॥ ४६ ॥ ऐशी नौका फिरतां देखा ॥ बुडाली ते अकस्मात ऐका ॥ आकांत झाला सकळिकां ॥ काढा काढा ह्मणताती ॥४७॥ सर्वे सेवक सैन्य प्रबळ ॥ एक पिटिती वक्षस्थळ ॥ उदकीं शोधितां सकळ ॥ न दिसे कोठें बुडाला ॥ ४८ ॥ उभय तटीं पडिलें मौन ॥ धांवत गेले राजप्रधान ॥ व्यवस्था सांगती संपूर्ण ॥ जामात तुमचा बुडाला

॥ ४९ ॥ कालिंदी नदीच्या डोहांत ॥ बुडोन गेला अकस्मात ॥ अदृश्य झाला त्वरित ॥ न दिसे गंगेंत शोधितां ॥ ५० ॥ ऐकोनि ऐसी मात ॥ राजा पडिला मूर्च्छित ॥ कन्या ऐकोनी त्वरित ॥ त्यजूं पाहे प्राणातें ॥ ५१ ॥ राजकन्या आली धांवत ॥ नदीतीरीं झाला आकांत ॥ शोकाशीं नाहीं अंत ॥ स्त्रिया सकळ शोक करिती ॥ ५२ ॥ सीमंतिनी करी शोका ॥ ह्मणे देवा त्रिपुरांतका ॥ शरणागत रिघालिया देखा ॥ मरण कैसें दिधलें ॥५३॥ मृत्यु चवदा वर्षीं जाणून ॥ ह्मणूनि धरिले तुमचे चरण ॥ वृथा गेलें व्रताचरण ॥ सोमवार शिवाचे ॥५४॥ तव देणें अढळ सकळां ॥ उपेक्षिलें कां ज्ञाध्नीळा ॥ अपकीर्तीतें केवळा ॥ कैसी देवा करिसी तूं ॥ ५५ ॥ स्मरण करी श्रीगुरूसी ॥ याज्ञवल्क्य मुनीचे पत्नीसी ॥ सांगितलें व्रत आह्मासी ॥ सौभाग्यवर्धन ह्मणोनियां ॥ ५६ ॥ तिचिया वाक्यें करूनी ॥ पूजिली शिवभवानी ॥ वृथा झाली माझे मनीं ॥ शीघ्र विनवी शिवासी ॥ ५७ ॥ ऐसें दुःखें प्रलापत ॥ सीमंतिनी जाय त्वरित ॥ गंगाप्रवेश करीन ह्मणत ॥ तीतें वारिती वेधवां ॥ ५८ ॥ पिता देखोनि नयनीं ॥ गेला त्वरें धांवोनी ॥ कन्येलागीं बोधोनी ॥ समाधान करीत ॥५९॥ सकळ मंत्री पुरोहित ॥ दुःखार्णवीं विलापत ॥ बोलाविले नावाडी त्वरित ॥ गंगाशोधाकारणें ॥ ६० ॥ गंगा सकळ शोधिती ॥ त्याची न लाभे कवणा गती ॥ शोक करीतसे सीमंती ॥ राजा संबोखी तियेसी ॥ ६१ ॥ राजपुत्राचे सेवक ॥ करूं लागले अति दुःख ॥ सांगों गेले सहायक ॥ इंद्रसेनाकारणें ॥ ६२ ॥ वार्ता ऐकोनियां इंद्रसेन ॥ दुःखें मूर्च्छित पडिला जाण ॥ भार्येसहित धांवून ॥ आला तया स्थळासी ॥ ६३ ॥ दोघे रात्र मिळोन ॥ शोक करिती दारुण ॥ अहा कुमारा ह्मणोन ॥ ऊर शीर बडविती ॥ ६४ ॥

अहा पुत्रा तात बोलत ॥ राव गडबडा असे लोळत ॥ मंत्रि राजकुल समस्त ॥ नगरलोक दुःख करिती ॥ ६५ ॥ कोठें गेला राजसुत ॥ ह्मणूनि सीमंतिनी रडत ॥ खिन्न झाले समस्त ॥ माता पितर श्वशुरादि ॥६६॥ कोणे स्थानीं पति गेले ॥ म्हणोनि सीमंतिनी लोळे ॥ ललाट हस्तें पिटिलें ॥ पार नाहीं शोकासी ॥ ६७ ॥ सीमंतिनी ह्मणे पितयासी ॥ जीव त्यजीन निश्चयेंसी ॥ वांचूनियां संसारासीं ॥ वैधव्य कोण भोगिल ॥ ६८ ॥ पुसे सकळ द्विजांसी ॥ करावें कीं सहगमनासी ॥ विप्र सांगती तियेसी ॥ प्रेतावेगळें घडेना ॥ ६९ ॥ प्रेत शोधावें नदींत ॥ दहन करावें कन्येसहित ॥ न दिसे बुडाला गंगेंत ॥ केवीं सहगमन होईल ॥७०॥ आतां ऐसें एक करणें ॥ प्रेत सांपडे तों रहाणें ॥ ऐसीं नानावचनें ॥ तियेलागीं बोधिती ॥ ७१ ॥ व्याकूळ होऊनि दुःखें करिती ॥ मंत्री पुरोहित ह्मणती ॥ जे असेल होणार गती ॥ ब्रह्मादिकां चुकेना ॥ ७२ ॥ होणार दैवाची करणी ॥ काय कराल दुःख मानूनी ॥ ऐसें तियेसी बोधूनी ॥ निजस्थानाप्रति आणिती ॥ ७३ ॥ निघाले राजे उभयतां ॥ घरा पातले करीत चिंता ॥ इंद्रसेन पुत्रममता ॥ आठवूनी शोक करी ॥ ७४ ॥ निजस्थानीं आले त्वरित ॥ राजादिक सर्व शोक करित ॥ इंद्रसेन महादुःखित ॥ न विसरे पुत्रशोकातें ॥७५॥ राज्य व्यवहार सोडून ॥ दुःख करीत इंद्रसेन ॥ गोत्रजीं राज्य हिरून ॥ कपटें घेतलें तयाचें ॥ ७६ ॥ सहभार्या तयासी ॥ ठेविते झाले कारागृहासी ॥ पुत्रशोकें तयासी ॥ राजकार्या चाड नाहीं ॥ ७७ ॥ चित्रवर्मा राव देखा ॥ कन्या ठेविली मगरिवका ॥ प्राण त्यजूं पाहे कन्यका ॥ लोक निंदिती ह्मणोनि ॥ ७८ ॥ राव ह्मणे कन्येसी ॥ पुत्र नाहीं आमुचे वंशीं ॥ कन्या एक तूं आह्मांसी ॥ पुत्रापरी रहाटावें ॥७९॥

लोक निंदिती आम्हांसी ॥ वैधव्याचार नाहीं इसी ॥ वर्ष एक क्रमिलियासी ॥ पुढें विचार सांगेन ॥८०॥ पित्याचें वचन ऐकोन ॥ करी शिवाचें चिंतन ॥ म्हणे देवा जगज्जीवन ॥ केवीं मातें गांजिलें ॥ ८१ ॥ ऐसें विचारूनी मानसीं ॥ व्रत आचरे नेमेंसीं ॥ सोमवार उपवासासी ॥ व्रत निश्चळ करीत ॥८२॥ इकडे तो राजकुमार ॥ बुडाला होता गंगातीर ॥ गेला जेथें पाताळनगर ॥ वासुकी राजा सर्पांचा ॥ ८३ ॥ नागलोकींचिया नारी ॥ आल्या होत्या नदीतीरीं ॥ त्यांणीं तो नेला तात्काळ मंदिरीं ॥ अतिसुंदर देखोनी ॥ ८४ ॥ पावोनियां समाधान ॥ मिळालें म्हणती हें रत्न ॥ अमृतपान करवून ॥ सावध केला तयातें ॥ ८५ ॥ कन्या मिळूनि तयासी ॥ नेवोनि दाविलें तक्षकासी ॥ विचित्र नगर परियेसी ॥ राजपुत्र पहात ॥ ८६ ॥ पाहे पाताळ नगररचना ॥ जैशी शोभा इंद्रभुवना ॥ गोपुरें रत्नजडित नाना ॥ विद्युल्लतेचियेपरी ॥ ८७ ॥ इंद्र नीळ वैडूर्येंसी ॥ माणिक्य मुक्ताफळांसीं ॥ महारम्यपुरी ऐसी ॥ सूर्यकांतीनें मिरवित ॥ ८८ ॥ चंद्रकांतीसरसी भूमी ॥ कीं द्वारकाचि ते हेमी ॥ अनेक रत्नें नाहीं उपमीं ॥ ऐशी शोभा मिरवे पैं ॥ ८९ ॥ पुढें देखे सभा थोर ॥ बैसले सर्व सर्पाकार ॥ आश्चर्य पावला राजकुमार ॥ परम अद्भुत देखोनी ॥ ९० ॥ परम सभा शोभत ॥ मध्यें बैसला पन्नगनाथ ॥ जैशी सूर्यप्रभा फांकत ॥ अति उन्नत बैसला ॥ ९१ ॥ अनेक शतफणांचे दिसती ॥ सुवर्णासमान अंगकांती ॥ पीतांबरें वेष्टिती ॥ रत्नमुगुटें मंडित ॥ ९२ ॥ अनेक रत्नजडित देखा ॥ गळां भूषणें अनेका ॥ सहस्रफणीं मिरवे तक्षका ॥ ऐसी सभा बैसली ॥ ९३ ॥ रूप यौवन नागकन्या ॥ नानाभरणें लेवोनियां ॥ अनेक सहस्र येवोनियां ॥

सेवा करीती तक्षकाची ॥९४॥ ऐशा सभास्थानीं देख ॥ राव बैसला तक्षक ॥ देखोनियां
राजकुमारक ॥ नमन करी साष्टांगीं ॥ ९५ ॥ तक्षक पुसे नागकन्यांसी ॥ कैंचा कुमार
आणिलासी ॥ सुलक्षण गुणराशी ॥ कवणे स्थानीं मिळाला ॥ ९६ ॥ नागकन्या ह्मणती
त्यासी ॥ नाहीं ठावें आह्मासी ॥ वाहात येतां यमुनेसीं ॥ तुह्मांजवळी आणिला ॥ ९७ ॥
तक्षक पुसे तयासी ॥ नाम काय कवणें वंशीं ॥ काय कारणें आलासी ॥ कवण देश
तुमचा ॥ ९८ ॥ सांगे कुमारक तक्षका ॥ भूमंडळीं राहणें देखा ॥ नैषध राजा ऐका ॥
नळ नामें पुण्यात्मा ॥९९॥ त्याचा पुत्र इंद्रसेन ॥ जन्म आमुचा त्यापासून ॥ केलें श्वशु-
रगृहीं गमन ॥ चित्रांगद नाम माझें ॥ २०० ॥ जळक्रीडा करावयासी ॥ गेलों होतों यमु-
नेसी ॥ विधिवशें आह्मांसी ॥ बुडतां आणिलें या स्थळीं ॥ १ ॥ वाहत असतां नदींत ॥
नागकन्यांनीं धरोनी त्वरित ॥ घेवोनि आल्या येथ ॥ पूर्वभाग्येंकरूनी ॥ २ ॥ पूर्वार्जित
आलें उदयासी ॥ भेटी झाली श्रीचरणासी ॥ धन्य माझे जीवित्वासी ॥ कृतार्थ झालों
निश्चयें ॥ ३ ॥ करुणावचन ऐकोनी ॥ तक्षक बोले संतोषोनी ॥ नको भिऊं ह्मणोनी ॥
धैर्य तया दीधलें ॥४॥ शेष ह्मणे रे बाळा ॥ तूं आहेसी निर्मळा ॥ तुमचे घरीं सार्वकाळा ॥
दैवत कवण पूजितां ॥५॥ ऐसें ऐकतां राजपुत्र ॥ हर्षें झाला निर्भर ॥ सांगे तया विस्तार ॥
शिवलीला तेधवां ॥ ६ ॥ सकळ देवांचा देव ॥ नाम ज्याचें सदाशिव ॥ वामांगीं उमा
अपूर्व ॥ त्यालागीं पूजितों ॥ ७ ॥ ज्याचे तेजें जनित ब्रह्मा ॥ सृष्टी रचिली अनुपमा ॥
तो सदाशिव आह्मां ॥ निजदैवत निर्धारें ॥ ८ ॥ तयाच्या सत्वगुणें सृष्टीसीं ॥ विष्णु
उपजला परियेसीं ॥ जीव पाळी निश्चयेसीं ॥ तो सदाशिव आराधितों ॥ ९ ॥ ज्याच्या

तामसगुणें जाण ॥ एकादश रुद्रगण ॥ उपजले प्रलयाकारण ॥ उत्पत्ति स्थिति नाशातें ॥२१०॥ धाता विधाता आपण ॥ उत्पत्ती स्थिती लया कारण ॥ तेजासी तेज असे कोण ॥ तोचि ईश्वर पूजितों ॥ ११ ॥ पृथ्वी आप तेजासीं ॥ जो पूर्ण वायु आकाशीं ॥ तैसा पूजितों शिवासी ॥ ऐसें राजपुत्र बोलिला ॥ १२ ॥ सर्वांभूतीं असे संपूर्ण ॥ चिन्मय आपण निरंजन ॥ जो रूपें असे अचिंतन ॥ तो ईश्वर पूजितों ॥ १३ ॥ ज्याची कंथा व्याघ्राची ॥ तक्षक शेष कुंडलें ज्याचीं ॥ त्रिनेत्रें सूर्य चंद्राग्नीचीं ॥ मौळीं चंद्र शोभत॥१४॥ ऐसें ऐकोनि वचन ॥ संतोषला तक्षक जाण ॥ राजकुमारा आलिंगोन ॥ संतोषलों ह्म-तणसे ॥ १५ ॥ तक्षक बोले तये वेळीं ॥ तुज देईन राज्य सकळी ॥ तुवां रहावें पाताळीं ॥ भोग भोगीत अपार ॥ १६ ॥ माझ्या लोकीं जें जें रत्न ॥ तें तें देईन तुजकारण ॥ पावो-नियां समाधान ॥ सुखें येथें रहावें ॥ १७ ॥ पाताळलोकींच्या रचना ॥ पहावया तुवां अनुपमा ॥ कल्पवृक्ष मनोरमा ॥ आहेत माझ्या नगरांत ॥ १८ ॥ अमृत न देखती कोणी ॥ तें भरलें असे जैसें पाणी ॥ तळीं बावी पोखरणी ॥ अमृताच्या ह्या-रांत ॥ १९ ॥ नाहीं मरणभय येथें ॥ रोगपीडादि समस्त ॥ नेणती कोणी स्वभावस्थें ॥ ऐसें नगर कोठें नसे ॥२२०॥ सुखें रहावें येथें स्वस्थ ॥ तक्षक कुमारका सांगत ॥ राजपुत्र असे विनवीत ॥ करुणावचनें अवधारा ॥ २१ ॥ राजपुत्र विनवी तक्षकासी ॥ मी एक-लाची पितयाचे कुशीं ॥ भार्या चतुर्दश वर्षी ॥ शिवपूजनीं रत सदां ॥ २२ ॥ नूतन माझें पाणिग्रहण ॥ गुंतलें तेथें अंतःकरण ॥ पाहीन मातापिताचरण ॥ तेणें सर्वस्व पावलों ॥ २३ ॥ आपण बुडालों नदींत ॥ पिता माता दुःख करीत ॥ पत्नी जीव त्यागील सत्य ॥ हत्या

मज घडेल ॥ २४ ॥ देखिलें तव चरण आपण ॥ तेणें झालों धन्य धन्य ॥ रक्षिला आपण माझा प्राण ॥ दर्शन देऊनि दयाळा ॥२५॥ तक्षक झाला संतोषित ॥ नानारत्नें त्यासी देत ॥ अमृत पाजिलें बहुत ॥ आणीक देत स्त्रियेसी ॥२६॥ कल्पवृक्षाचीं फळें देती ॥ नानावस्त्रें परम दीप्ति ॥ जें अपूर्व असे क्षितीं ॥ अमोल्य देता जहाला ॥२७॥ इतुकें देवोनि तयासी ॥ तक्षक बोले कृपेसीं ॥ जे काळीं आह्मां स्मरसी ॥ तव कार्य सिद्धि पावेल ॥ २८ ॥ आणीक संतोषोनि चित्तीं ॥ वस्त्रें वाहनें मागुती ॥ तुरंग दिधले मनोगती ॥ सर्वे देत कुमार आपुला ॥ २९ ॥ चित्रांगद कुमारासी ॥ इतुकें दिधलें आनंदेंसीं ॥ निरोप दिधला परियेसीं ॥ चतुरंग सेना देवोनी ॥ २३० ॥ तक्षका नमूनि त्वरित ॥ वारूवरी आरूडे राजसुत ॥ मनोवेगें क्रमित ॥ मार्ग तेव्हां भूमीचा ॥ ३१ ॥ जे स्थानीं बुडाला होता ॥ तेथें पावला अवचिता ॥ निघाला तो त्वरित ॥ सर्वे असे नागकुमार ॥ ३२ ॥ सोमवार त्या दिवशीं ॥ सीमंतिनी आली स्नानासी ॥ सर्वे सखिया सेवेसी ॥ नदीतीरीं ॥ उभी असे ॥ ३३ ॥ सीमंतिनी ह्मणे सखियांसी ॥ आश्चर्य वाटे मानसीं ॥ ॥ उदकांतूनि परियेसीं ॥ कोणी एक येतसे ॥ ३४ ॥ राक्षस असेल वेषधारी ॥ रूप धरिलें मनोहारी ॥ तुरंगारूढ वे[illegible]री ॥ कोठें येतो कळेना ॥३५॥ कैसें पहाहो रूप यासी ॥ जैंवी सूर्य प्रकाशी ॥ दि[illegible]ाल्यांबरें कैसीं ॥ सुगंध येतो परिमळ ॥३६॥ दश योजनेंपर्यंत ॥ सुवास येतसे अ[illegible] ॥ पूर्वीं देखिलें ऐसें ह्मणत ॥ रूप असे तयाचें ॥३७॥ स्थीर स्थीर भीत भीत ॥ रूप त्याचें असे पहात ॥ पतिसादृश्य दिसत ॥ आठवी रूप पतीचें ॥३८॥ राजपुत्र पाहे तियेसी ॥ ह्मणे स्वरूपें माझी वधू ऐशी ॥ गळसरि नसे कंठासी ॥ हार नसे मुक्ताफळांचा ॥ ३९ ॥ वळखिली

रूप खूण ॥ नाहीं हळदी कंकण ॥ चित्तीं व्याकुळ जाण ॥ सादृश्य हे प्राणेश्वरी ॥२५०॥ मनीं विचारी मागुता ॥ रूप तिचें आणीत चित्ता ॥ तुरगावरूनि खाल-ता ॥ नदीतीरीं बैसलासे ॥ ४१ ॥ बोलावोनि तियेसी ॥ पुसतसे अति हर्षी ॥ तव जन्म कवण देशीं ॥ पुरुष तुझा कोण सांगे ॥ ४२ कां कोमाइलीस बाळपणीं ॥ दिससी शोकें म्लानलक्षणीं ॥ सांगावें मजलागोनी ॥ स्नेहें वर्तमान पुसतसे ॥ ४३ ॥ एकोनि ऐसिया बोला ॥ विस्मित झाली तेवेळां ॥ सखियांसी ह्मणे येवेळां ॥ वृत्तांत सांगा समस्त ॥ ४४ ॥ सखिया सांगती तयासी ॥ नामें सीमंतिनी परियेसीं ॥ चित्रां-गदाची महिषी ॥ चित्रवर्म्याची हे कन्या ॥ ४५ ॥ इचा पति अति सुंदर ॥ चित्रांगद नामें थोर ॥ जळक्रीडा करितां सत्वर ॥ येथें बुडाला नदींत ॥ ४६ ॥ तेणें शोक करितां इसी ॥ वैधव्य आलें परियेसीं ॥ दुःख झालें तीन वर्षीं ॥ लावण्य इचें हारपलें ॥ ४७ ॥ सोमवार व्रत करित ॥ उपवास पूजादि आचरत ॥ आज स्नाननिमित्त ॥ या स्थळासी पातली ॥४८॥ इच्या श्वशुराची स्थिति देखा ॥ पुत्रशोकें विकळ ऐका ॥ राज्य घेतलें दायादिकां ॥ कारागृहीं घातलें ॥ ४९ ॥ त्याकारणें सीमंतिनी ॥ नित्य पूजी शूल-पाणी ॥ सोमवार उपोषणीं ॥ पूजीतसे तो देव ॥ २५० ॥ इतुकें सखिया सांगतां ॥ मग बोले सीमंती ॥ क्रिमर्थ पुसतां आह्मांप्रती ॥ आपण कोण कंदर्परूपी ॥ ५१ ॥ गंधर्व किंवा तुह्मी देव ॥ नर अथवा किन्नर अपूर्व ॥ सिद्ध अथवा पन्नग सर्व ॥ वर्तमान सांगावें ॥५२॥ स्नेहभावें करोनी ॥ कां पुसतां आह्मालागुनी ॥ पूर्वीं देखिलें होतें नयनीं ॥ न कळे खूण आपुली ॥ ५३ ॥ आप्तभाव माझ्या मनीं ॥ स्वजन ऐसे दिसतां नयनीं ॥ नाम सांगा ह्म-

णोनी ॥ आठवी रूप पतीचें ॥ ५४ ॥ आठवोनी पतीचें रूप ॥ करूं लागली अति
प्रलाप ॥ धरणी पडली रुदित बाष्प ॥ टाकीतसे नेत्रांतुनी ॥ ५५ ॥ तियचें दुःख देखोनि
नयनीं ॥ कुमार विलोकी तटस्थपणीं ॥ मुहूर्त एक सांवरोनी ॥ आपण दुःख करीतसे
॥ ५६ ॥ दुःखें करोनियां देखा ॥ प्रक्षाळिलें आपुल्या मुखा ॥ उगी राहे ह्मणे ऐका ॥ ह्मणे
आमुचें नाम सिद्धमुनी ॥ ५७ ॥ सीमंतिनी करितां शोक अपार ॥ जवळी आला राज-
कुमार ॥ हातीं धरिली सत्वर ॥ संबोखित प्रेमभावें ॥ ५८ ॥ एकांत सांगे तियेसी ॥ ह्मणे
तुझ्या भ्रताराशी ॥ देखिलें आह्मी दृष्टीसीं ॥ तूं सुखी आतां असावें ॥ ५९ ॥ तव व्रत
पुण्यें करोनी ॥ पति शीघ्र पाहसी नयनीं ॥ चिंता करूं नको म्हणोनी ॥ तृतीय दिवा
भेटेल ॥ ६० ॥ तव पती माझा सखा ॥ मम प्राण तोचि ऐका ॥ संदेह न करी वो बाळिका ॥
आण शिवचरणाची ॥ ६१ ॥ ऐसें एकांतीं सांगून ॥ प्रगट न करी म्हणून ॥ दुःख आठवलें
ऐकून ॥ सीमंतिनी बाळिकेसी ॥ ६२ ॥ सुटल्या धारा लोचनीं ॥ प्रेमें रडे स्फुंदोनी ॥
विचार करी सीमंतिनी ॥ हाचि होय मम पती ॥ ६३ ॥ सारिखें वाटे मुखकमळ ॥ नयन
सुंदर अति कोमळ ॥ ध्वनी बोलतां ज्याची मंजूळ ॥ अति गंभीर बोलतसे ॥ ६४ ॥ मृदु-
वाणी पतिसरसी ॥ तैसाचि बोले सुहास्य हर्षी ॥ धरितां माझिया करासी ॥ अति मृदु
लागला ॥ ६५ ॥ माझे पतीचें लक्षण ॥ मीं जाणें सर्व खूण ॥ हाचि होय माझा प्राण ॥
समस्त चिन्हें असती ॥ ६६ ॥ यास देखोनि नयनीं ॥ धारा सुटल्या प्रेम जीवनीं ॥ नव-
लपरी विचारूनी ॥ मागुती अनुमान करीत ॥ ६७ ॥ दैवहीन असें आपण ॥ कैसा जोडे
पतिनिधान ॥ पावला नदींत बुडून ॥ मागुती कैसा प्रकटेल ॥ ६८ ॥ मेला येई मागुता ॥

ऐशी न ऐकिली कानीं कथा ॥ स्वप्न देखिलें कीं भ्रांता ॥ काय वसे माझे मनीं ॥ ६९ ॥ धूर्त होय कीं वेषधारी ॥ राक्षस यक्ष किंवा किन्नरी ॥ कपटें प्रगटला नदीतीरीं ॥ ह्मणोनि कल्पना करीतसे ॥७०॥ किंवा पावला शिवव्रतें ॥ कीं धाडिला गिरिजानाथें ॥ संकट जाणोनि आमुचें येथें ॥ मैत्रीकारणें धाडिला ॥ ७१ ॥ ज्यास प्रसन्न शंकर ॥ त्यास कैंचा दुःखविकार ॥ चिंतिलें पाविजे निर्धार ॥ ऐसें चिंती सीमंतिनी ॥ ७२ ॥ ऐसें असतां राजकुमार ॥ आरूढला वारूवर ॥ निरोप मागे प्रीतिकर ॥ सीमंतिनी नारीसी ॥ ७३ ॥ निघाला अश्व मनोवेगें ॥ पातला स्वनगरा शीघ्रें ॥ वासुकीपुत्र होता संगें ॥ तया पाठवी नगरांत ॥ ७४ ॥ त्वां जावोनी वैरियांसी ॥ सांगावें कीं वेगेंसीं ॥ न ऐकतां तव बोलासी ॥ संहारीन ह्मणावें ॥७५॥ ऐसें वचन ऐकोनी ॥ त्वरित पावला राजभुवनीं ॥ उभा राहोनी कठोर वचनीं ॥ बोलतसे सत्वर ॥ ७६ ॥ चला शीघ्र कुटुंबेसीं ॥ चित्रांगदाचे भेटीसी ॥ तक्षकाचे दर्शनासी ॥ गेला होता पाताळीं ॥ ७७ ॥ कालिंदी नाम नदींत ॥ बुडाला हे ऐकोनि मात ॥ तुह्मीं केला स्वामिघात ॥ राज्य घेतलें इंद्रसेनाचें ॥ ७८ ॥ आतां सांगतों तुह्मांसी ॥ चाड असे जरी प्राणांसी ॥ शरण जावें तयासी ॥ इंद्रसेना स्थापोनी ॥७९॥ तक्षकासारखा मैत्र जोडला ॥ दिधलें नवनागसहस्रबळा ॥ शीघ्र लागा चरणकमळा ॥ चित्रांगदाचे जाऊनी ॥ ८० ॥ न ऐकाल माझ्या वचना ॥ तरी आतांचि घेतों प्राणा ॥ तक्षकें पाठविलें आपणा ॥ पारिपत्याकारणें हो ॥ ८१ ॥ ऐसें वचन ऐकोनी ॥ शत्रू भयाभीत मनीं ॥ केली बुद्धी जाणोनी ॥ शरणागत रिघावें ॥८२॥ जरी करूं बलात्कार ॥ तरी होईल संहार ॥ लोकांत

निंदा होईल फार ॥ प्राण जाईल आपुला ॥ ८३ ॥ ऐसें विचारोन मानसीं ॥ बाहेर आणिती इंद्रसेनासी ॥ नानावस्त्रें आभरणेंसीं ॥ सिंहासनीं बैसविला ॥८४॥ सकळ विनविती त्यासी ॥ अपराध घडला आह्मांसी ॥ प्राण राखा वेगेंसीं ॥ ह्मणोनि चरणीं लागले ॥ ८५ ॥ राया इंद्रसेनासी ॥ तक्षकपुत्र सांगे त्यासी ॥ तुमचा पुत्र आला हर्षीं ॥ वासुकीनें तारिला ॥८६॥ ऐकोनि राव संतोषी ॥ आठवूनि अधिक दुःखासी ॥ मूर्च्छा येवोनी धरणीसी ॥ पत्नीसहित पडियेला ॥ ८७ ॥ नागकुमारें उठविलें त्यांसीं ॥ दुःख कासया करा हर्षीं ॥ येईल पुत्र भेटीसी ॥ त्वरें करोनी आतांची ॥ ८८ ॥ मग राव अतिहर्षीं ॥ बोलावित मंत्रियांसी ॥ नगर शृंगारावयासी ॥ निरोप दिधला तयेवेळीं ॥ ८९ ॥ ऐसा निरोप देवोनी ॥ भेटी निघाले स्वसैन्यीं ॥ सकळ दायाद स्वजनीं ॥ मनोभावें करोनियां ॥९०॥ मंत्री पुरोहितांसहित ॥ निघाले लोक समस्त ॥ कौतुक पाहों ह्मणत ॥ मेला पुत्र कैसा आला ॥ ९१ ॥ आनंद झाला सकळिकां ॥ राव मानी महा हरिखा ॥ पाहीन ह्मणे पुत्रमुखा ॥ अति आवडीनें अवधारा ॥ ९२ ॥ वाद्ययंत्रांचा अतिगजर ॥ नगरलोकां संतोष थोर ॥ करिताती जयजयकार ॥ अतिउल्हासें करूनियां ॥ ९३ ॥ ऐशापरी पुत्रासी ॥ भेटी झाली रायासी ॥ चित्रांगद पितयासी ॥ नमस्कारी साष्टांगें ॥९४॥ अतिप्रेमें पुत्रासी ॥ आलिंगी राव त्वरेसीं ॥ सद्गदित कंठासी ॥ नेत्रीं अश्रु वाहती ॥ ९५ ॥ पुत्रासी ह्मणे इंद्रसेन ॥ आलासी बाळा माझा प्राण ॥ श्रमलों होतों तुजविण ॥ ह्मणोनि सांगे दुःख आपुलें ॥९६॥ माता तया आलिंगोन ॥ दुःख करी दारुण ॥ विनवी तो तिये कर जोडून॥ मजनिमित्त कष्टलीसी ॥९७॥ पुत्र नव्हे मी यथार्थ ॥ दुःखसमुद्र निभ्रांत ॥ तुह्मां दुखविलें

कीं बहुत ॥ न दिलें सुख तुह्मांतें ॥९८॥ आपण जावोनी पाताळीं ॥ राहिलों सुखें शेषाज-
वळी ॥ तुह्मीं कष्टलीत शोकानळीं ॥ दैवें केलें विपरीत ॥९९॥ काष्ठासरी अंतःकरण ॥ माझें
असे कीं सत्य पूर्ण ॥ मातापिता त्यजिती प्राण ॥ पुत्रशोकें करोनि ॥ ३०० ॥ मातापित-
यांचें दुःख ॥ जो नेणें तोचि शतमूर्ख ॥ उत्तीर्ण व्हावया अशक्य ॥ स्तनपान एक घडीचें
॥ १ ॥ मातेविण देव देखा ॥ पुत्रांसी नाहीं विशेखा ॥ ऋण उत्तीर्ण नव्हे ऐका ॥ माता
केवळ मृडानी ॥२॥ दुःख देत जननीसी ॥ तो जाय यमपुरीसी ॥ पुत्र नोहे त्याचे वंशीं॥
सप्तजन्मीं दरिद्री ॥ ३ ॥ ऐसें मातेसी विनवूनी ॥ भेटतसे तो भाऊ बहीणी ॥ इष्ट सोय-
रियां लागोनी ॥ प्रधानासमवेत नागरिकां ॥४॥ इतुकें झालियावरी ॥ प्रवेश केला नगरा-
भीतरीं ॥ समारंभ केला अति थोरी ॥ पावले निजमंदिरा ॥ ५ ॥ तक्षकाचे पुत्रासी ॥
गौरविलें सन्मानेंसीं ॥ वस्त्रें भूषणें रत्नेंसीं ॥ इंद्रसेनें अतिप्रीतीं ॥६॥ चित्रांगद सांगे पित-
यासी ॥ तक्षकें वांचविलें आह्मांसी ॥ रक्षूनियां प्राणांसी ॥ द्रव्य दिधलें अपार ॥७॥ सुंदर
वस्त्रें आभरणें ॥ दिधलीं होतीं तक्षकानें ॥ पिता देखोनि संतोषानें ॥ ह्मणे धन्य तक्षक
॥ ८ ॥ निरोपिलें नागकुमारासी ॥ बोळविलें तयासी ॥ भृत्य पाठविले वेगेंसीं ॥ चित्रव-
र्म्याचे नगरांत ॥ ९ ॥ राव ह्मणे तयेवेळीं ॥ सून माझी दैवें आगळी ॥ तिचे धर्में वांचला
बळी ॥ पुत्र माझा अवधारा ॥ १० ॥ तिणें आराधिला शंकर ॥ तेणें कंकणें चुडे स्थिर ॥
तेणें वांचला माझा पुत्र ॥ शंकरकृपें करोनी ॥ ११ ॥ ह्मणोनि पाठविलें वेगेंसी ॥ लिहो-
नियां वर्तमानासी ॥ चित्रवर्मरायासी ॥ इंद्रसेन रायानें ॥ १२ ॥ हेर निघाले सत्वरीं ॥
चित्रवर्म्याचिया नगरीं ॥ व्यवस्था सांगितली बरी ॥ चित्रांगदाची शुभवार्ता ॥ १३ ॥

संतोषोनियां तो राजा ॥ करिता झाला महावोजा ॥ दानें दिधलीं अपार द्विजां ॥ रत्नें भूषणें हेरांसीं ॥१४॥ इंद्रसेन राजा सत्वर ॥ पुनरपि करावया वऱ्हाड थोर ॥ चित्रांगद बडिवार ॥ सेना घेवोनि निघाला ॥ १५ ॥ महोत्साह झाला थोर ॥ वऱ्हाड केलें धुरंधर॥ चित्रांगद प्रीतिकर ॥ सीमंतिनीसी भेटला ॥ १६ ॥ पाताळींची अमौल्य वस्त ॥ प्राणेश्वरीसी लेववीत ॥ पाजिता झाला अमृत ॥ महानंद प्रवर्तला ॥१७॥ कल्पवृक्षफळ देखा॥ देवोनि तोषविली नायका ॥ अमौल्य वस्त्राभरणीं देखा ॥ दश योजनें तेज फांके ॥१८॥ ऐसा उत्साहें विवाह केला ॥ आपुले पुरीसी निघाला ॥ सीमंतिनीचे वैभवाला ॥ जोडा नसे त्रिभुवनीं ॥ १९ ॥ मग जावोनी नगरासी ॥ राज्यीं स्थापिलें पुत्रासी ॥ दहा सहस्र पूर्ण वर्षीं ॥ राज्य केलें चित्रांगदें ॥ २० ॥ सीमंतिनी करी व्रतासी ॥ उपवास सोमवारासी ॥ पूजिलें गौरीहरासी ॥ ह्मणोनि पावली इष्टार्थ ॥ २१ ॥ ऐसें विचित्र असे व्रत ॥ ह्मणोनि सांगे श्रीगुरुनाथ ॥ ऐक सुवासिनी ह्मणत ॥ अतिप्रीति निरूपिलें ॥ २२ ॥ ऐसें करी वो आतां व्रत ॥ चुडे कंकणें अखंडित ॥ कन्या पुत्र होती प्राप्त ॥ आमुचें वाक्य अवधारी ॥ २३ ॥ दंपत्य विनवी गुरूसी ॥ तव चरण शरणांगतासी ॥ पुरविती मनोरथासी॥आह्मां व्रत कायसें॥२४॥आमुचा तूं प्राणनायक॥तुजवांचूनि नेणों आणिक॥ तव स्मरणें सकळिक ॥ ह्मणोनि चरणां लागलीं ॥ २५ ॥ श्रीगुरु ह्मणती तयांसी ॥ आमुचे निरोपें करा ऐसीं॥व्रत आचरा सोमवारासी॥तेंचि सेवा आह्मां पावे॥२६॥ निरोप घेऊनी श्रीगुरूचा ॥ नेम धरिला सोमवाराचा ॥ भेटीलागीं तयाच्या ॥ मातापिता पावलीं ॥२७॥ ऐकोनियां कन्यापुत्रवार्ता ॥ संतोषली त्याची माता ॥ द्रव्य वेंचिलें अपरमिता ॥ समाराधना ब्राह्म-

णांसी ॥२८॥ पूजा करिती श्रीगुरूसी ॥ आनंद अति मानसीं ॥ समारंभ दिवानिशीं ॥ बहुत करिती भक्तीनें ॥ २९ ॥ ऐशापरी वंदोनी ॥ श्रीगुरूचा निरोप घेऊनी ॥ गेलीं ग्रामा परतोनी ॥ ख्याती झाली चहूं राष्ट्रीं ॥ ३० ॥ पुढें त्या दंपत्यासी ॥ पांच पुत्र दालासुषी ॥ झाले आशीर्वादेंसीं ॥ श्रीगुरूरायाच्या ॥ ३१ ॥ प्रतिवर्षीं दर्शनासी ॥ दंपत्यें येती आनंदेंसीं ॥ ऐसें शिष्या परियेसीं ॥ श्रीगुरूचें महात्म्य ॥ ३२ ॥ ऐसें श्रीगुरुचरित्र ॥ सिद्ध सांगे पवित्र ॥ नामधारक प्रीतिपात्र ॥ ऐकतसे अवधारा ॥ ३३ ॥ गंगाधराचा नंदन ॥ सरस्वती विनवी भक्तीनें ॥ माझी परंपरा जाण ॥ नरसिंहसरस्वती ॥३४॥ ऐसा वरदमूर्ती देखा ॥ सकळ जन तुह्मी ऐका ॥ प्रसन्न होईल तात्काळिका ॥ न धरावा संदेह मनीं ॥३५॥ साखर खाद्य ह्मणावयासी ॥ उपमा द्यावी कायसी ॥ मनगटाचे कंकणासी ॥ आरसा कासया पाहिजे ॥ ३६ ॥ प्रत्यक्ष पहातां दृष्टांतेंसीं ॥ प्रमाण कासया परियेसी ॥ ख्याती असे भूमंडळासी ॥ कीर्ति श्रीगुरु यतीची ॥३७॥ ऐकाहो जन समस्त ॥ सांगतों मी उत्तम हित ॥ सेवा करितां श्रीगुरुनाथ ॥ सिद्ध करी मनकामना ॥३८॥ अमृताची ही पोवया ॥ घातली असे प्यावया ॥ पान करी घेवोनियां ॥ धणिवरी सकळिक ॥३९॥ श्रीगुरुचरित्र कामधेनू ॥ ऐकतां होय पतीत पावनू ॥ नाम ज्याचें कामधेनू ॥ तो चिंतिलें पुरवीत ॥४०॥ इति श्रीगुरुचरित्रामृत ॥ सीमंतिनी आख्यान विख्यात ॥ पंचत्रिंशत अध्यायांत ॥ कथासार सांगितली ॥४१॥ इति श्रीगुरुचरित्रपरमकथाकल्पतरौ श्रीनृसिंहसरस्वत्युपाख्याने सिद्धनामधारकसंवादे सीमंतिन्याख्यानकथनं नाम पंचत्रिंशोऽध्यायः ॥ ओंव्या ॥ ३४१ ॥

॥ श्रीगणेशाय नमः ॥ शिष्योत्तम नामकरणी ॥ लागे सिद्धाचे चरणीं ॥ विनवितसे कर जोडोनी ॥ भक्तिभावें करूनियां ॥ १ ॥ जयजयाजी सिद्धमुनी ॥ तूंचि तारक या भवार्णी ॥ तूंचि होसी ब्रह्मज्ञानी ॥ अविद्यातिमिर भास्कर ॥ २ ॥ मायामोह रजनींत ॥ होतों आपण निद्रिस्थ ॥ कृपासागर श्रीगुरुनाथ ॥ जागृत केलें आह्मांसी ॥ ३ ॥ तिमिरहरणभास्करू ॥ तूं भेटतांचि गेला अज्ञानअंधारू ॥ कडे केलें भवसागरू ॥ चिन्मयात्मा सिद्धमुनी ॥ ४ ॥ ऐसें ह्मणोनि सिद्धासी ॥ विनवी शिष्य भक्तीसीं ॥ गुरुमूर्ती संतोषी ॥ अभयकर देतसे ॥ ५ ॥ पुढें चरित्र केविं झालें ॥ विस्तारावें स्वामी वहिलें ॥ मजला स्वामींनीं कृतार्थ केलें ॥ ज्ञानामृत प्राशवून ॥ ६ ॥ कथामृत ऐकतां श्रवणीं ॥ तृप्ति न होय अंतःकरणीं ॥ निरोपावें विस्तारोनी ॥ ह्मणोनि चरणीं लागला ॥ ७ ॥ सिद्ध ह्मणे नामधारका ॥ पुढील कथा झाली ऐका ॥ एकचित्तें तुह्मीं भाविका ॥ ज्ञान होय समस्तांसी ॥ ८ ॥ गाणगापुरीं असतां श्रीगुरु ॥ महिमा वाढली अपरंपारू ॥ बोलत असे विस्तारू ॥ तावन्मात्र सांगतसों ॥ ९ ॥ महिमा एकेक सांगतां ॥ विस्तार होईल बहु कथा ॥ अवतार श्रीहरी साक्षाता ॥ कवण शक्रे वर्णावया ॥ १० ॥ तया गाणगापुरांत ॥ होता विप्र वेदरत ॥ विरक्त असे बहुत ॥ कर्ममार्गें वर्ततसे ॥ ११ ॥ नघे प्रतिग्रह तेणें ॥ पराान्नासी जावों नेणें ॥ असत्यवाद मिथ्या भाषणें ॥ अनुवाद आपण न करीच ॥ १२ ॥ नित्य शुष्क भिक्षा करी ॥ तेणें आपण उदर भरी ॥ तयाची असे घरीं नारी ॥ क्रोधवंत परियेसा ॥ १३ ॥ याचकवृत्ती तो ब्राह्मण ॥ कंठी संसार सामान्यपणें ॥ अतीत अभ्यागताविणें ॥ न घेई अन्न सर्वदा ॥ १४ ॥ तया ग्रामीं प्रतिदिवशीं ॥ विप्र येती समाराधनेसी ॥ सहस्र

संख्या ब्राह्मणांसी ॥ मिष्टान्न घालिती परोपरी ॥ १५ ॥ तया ग्रामीं विप्रदंपत्य ॥ सुखें जावोनी भोजन करीत ॥ येउनि सर्व सदनीं स्तवित ॥ अनेकपरीचीं पक्वान्नें ॥ १६ ॥ ऐकोनी तया विप्राची नारी ॥ नानापरी दुःख करी ॥ परमेश्वरा श्रीहरी ॥ ह्मणोनि चिंती मनांत ॥ १७ ॥ कैसें दैव आपुलें हीन ॥ नेणें स्वप्नीं ऐसें अन्न ॥ दरिद्री पतीसी वरून ॥ सदा कष्ट भोगीतसे ॥ १८ ॥ पूर्वजन्मींचें आराधन ॥ तैसा आपणासी पती हीन ॥ सदां पाहे दरिद्रपण ॥ वर्ततसों देवराया ॥ १९ ॥ समस्त विप्र स्त्रियांसहित ॥ मिष्ट परान्न भोजन करीत ॥ पूर्वजन्मींचें सुकृत ॥ केलें होतें समस्तीं ॥ २० ॥ आपुला पती दैव-हीन ॥ कदां नेणें परान्नभोजन ॥ काय करावें नारायण ॥ ह्मणोनि चिंती मनांत ॥ २१ ॥ वर्ततां ऐसें तया स्थानीं ॥ आला विप्र महाधनी ॥ अपरपक्ष करणें मनीं ॥ ह्मणोनि आला परियेसी ॥ २२ ॥ तया स्थानीं विप्रांसी ॥ आमंत्रण दिलें परियेसीं ॥ सर्वे त्यांच्या स्त्रियांसी ॥ आवंतिलें तिहीं परिसा ॥ २३ ॥ देखोनी ते विप्रवनिता ॥ पतीजवळी आली त्वरिता ॥ सांगती झाली विस्तारता ॥ आमंत्रण ब्राह्मणांचें ॥ २४ ॥ अनेक तऱ्हेचीं पक्वान्नें ॥ देती वस्त्रें परिधानें ॥ अपार दक्षिणा द्रव्यदानें ॥ देताति ऐकें प्राणेश्वरा ॥ २५ ॥ यास्तव स्वामी अंगिकारणें ॥ अथवा आपणा निरोप देणें ॥ कांक्षा करितें माझें मन ॥ अपूर्व अन्न जेवावें ॥ २६ ॥ ऐकोनि तियेचें वचन ॥ निरोप दिला त्या ब्राह्मणें ॥ सुखें जावें करी भोजन ॥ आपणा न घडे ह्मणतसे ॥ २७ ॥ निरोप घेऊनी तया वेळीं ॥ गेली तया गृहस्थाजवळी ॥ आपण येऊं भोजनकाळीं ॥ ह्मणोनि पुसे तयासी ॥ २८ ॥ विप्र ह्मणे तियेसी ॥ आह्मीं सांगूं दंपतीसी ॥ बोलावी आपुल्या पतीसी ॥ तरीच आपु-

2

ल्या गृहा यावें ॥ २९ ॥ ऐकोनि तयाचें वचन ॥ झाली नारी खेदें खिन्न ॥ विचार करी
आपुलें मन ॥ काय करावें ह्मणोनियां ॥ ३० ॥ ह्मणे आतां काय करणें ॥ कैसें दैव आपु-
लें उणें ॥ बरवें अन्न स्वप्नीं नेणें ॥ पतीकरितां आपणासी ॥ ३१ ॥ विचार करूनी मा-
नसीं ॥ आली नृसिंहगुरुपासीं ॥ नमन करी साष्टांगेंसी ॥ अनेकपरी विनवीतसे ॥ ३२ ॥
ह्मणे स्वामी एक करणें ॥ बरवें अन्न कधीं नेणें ॥ आपुल्या पतीसी सांगणें ॥ भोजना
जावें विप्राघरीं ॥ ३३ ॥ सांगूं ह्मणती दंपतीसी ॥ माझा पती नायके वचनासीं ॥ नवचे
कधीं परान्नासी ॥ काय करूं ह्मणतसे ॥३४॥ स्वामी आतां कृपा करणें ॥ माझ्या पतीतें
सांगणें ॥ बरवीं येत तीं आमंत्रणें ॥ अन्नवस्त्र देताती ॥ ३५ ॥ ऐकोनि तियेचें वचन ॥
श्रीगुरुमूर्ती हास्यवदन ॥ बोलावूनियां तत्क्षण ॥ सांगती तया द्विजासी ॥ ३६ ॥
श्रीगुरु ह्मणती तयासी ॥ जावें तुह्मी आमंत्रणेंसी ॥ तुझे स्त्रियेचे मानसीं ॥ असे मिष्टान्न
जेवावें ॥ ३७ ॥ तिचे मनींची वासना ॥ तुवां पुरवावी कारणा ॥ सदां दुश्चित अंतःकर-
णा ॥ कुलस्त्रियेसी असों नये ॥३८॥ ऐकोनि श्रीगुरूचें वचन ॥ नमन करी तो ब्राह्मण ॥
विनवीतसे कर जोडून ॥ ह्मणे आपणा नेम असे ॥ ३९ ॥ गुरुवचन जो न करी ॥
तो पडे रौरव घोरीं ॥ निरोप तुमचा माझ्या शिरीं ॥ जाईन त्वरित ह्मणतसे ॥ ४० ॥
पुसोनियां श्रीगुरूसी ॥ आलें दंपत्य आमंत्रणासी ॥ आनंद झाला बहुवसीं ॥ तया विप्र-
स्त्रियेतें ॥ ४१ ॥ पितृनाम उच्चारोन ॥ संकल्प करी तो ब्राह्मण ॥ अनेकपरीचें मिष्टान्न ॥
वाढिती तया दंपतीसी ॥ ४२ ॥ भोजन करितां समयासी ॥ दिसे विपरीत तियेसी ॥
श्वानसूकर येऊनी हर्षीं ॥ समागमें जेविताती ॥ ४३ ॥ कंटाळलें तिचें मन ॥ उठे आ-

पण त्यजूनि पान ॥ जेवीत होते ब्राह्मण ॥ समस्तांसी सांगतसे ॥ ४४ ॥ ऐसेपरी पतीस-
हित ॥ आली नारी चिंताक्रांत ॥ पतीस सांगे वृत्तांत ॥ श्वानउच्छिष्ट जेविलेती ॥ ४५ ॥
स्त्रियेसी ह्मणे तो ब्राह्मण ॥ तुझेनि आपुलें दैवहीन ॥ घडलें आपणासी परान्न ॥ उच्छिष्ट
श्वान सूकरांचें ॥ ४६ ॥ ऐसें बोलोनि स्त्रियेसी ॥ आलीं दोघें श्रीगुरुपासीं ॥ नमन करि-
ती भक्तीसीं ॥ ऐका श्रोते एकचित्तें ॥ ४७ ॥ श्रीगुरु ह्मणती तियेसी ॥ कैसें दुःख परा-
न्नासी ॥ सदा दुःखविसी पतीसी ॥ पुरले तुझे मनोरथ ॥ ४८ ॥ ऐसें वचन ऐकोनी ॥ लागे
नारी श्रीगुरुचरणीं ॥ विनवीतसे कर जोडूनी ॥ क्षमा करणें स्वामिया ॥ ४९ ॥ मंदमती
आपणासी ॥ दोष घडविले पतीसी ॥ नेलें आपण परान्नासी ॥ क्षमा करणें स्वामिया
॥ ५० ॥ चिंता करी द्विजवरू ॥ ह्मणे स्वामी काय करूं ॥ दोष घडला अपारू ॥ व्रतभंग
झाला ह्मणोनी ॥ ५१ ॥ परान्न मी न घेई ह्मणोनी ॥ संकल्प होता माझे मनीं ॥ मिळाली
स्त्री वैरिणी ॥ दोष आपणा घडविले ॥ ५२ ॥ ऐकोनी तयाचें वचन ॥ श्रीगुरु ह्मणती
हांसोन ॥ पुरविली स्त्रियेची वासना ॥ आतां तिचें मन धालें ॥ ५३ ॥ कधीं न वचे परान्नासीं ॥
वर्तेल तुझ्या वाक्यासरसी ॥ न करी चिंता मानसीं ॥ दोष तुज नाहीं जाण ॥ ५४ ॥
आणीक एक सांगेन तुज ॥ जेणें धर्म घडती सहज ॥ अडला असेल एखादा द्विज ॥ देव-
पितृकर्मविषें ॥ ५५ ॥ कोणी न मिळे विप्र त्यासी ॥ जावें तेथें भोजनासी ॥ जरी तेथें तूं
न जासी ॥ अनंत दोष असे जाण ॥ ५६ ॥ श्रीगुरुचें वचन ऐकोन ॥ साष्टांगीं करी
नमन ॥ विनवीतसे कर जोडून ॥ विनंती माझी परियेसा ॥ ५७ ॥ अन्न घ्यावें कवणे घरीं ॥
घडती दोष कवण्यापरी ॥ जाऊं नये कवण्या द्वारीं ॥ निरोपावें स्वामिया ॥ ५८ ॥

विप्रवचन ऐकोनी ॥ श्रीगुरु सांगती विस्तारोनी ॥ सावध मन करोनी ॥ ऐका श्रोते सकळिक ॥ ५९ ॥ श्रीगुरु ह्मणती विप्रासी ॥ अन्न घ्यावया घरें पुससी ॥ गुरुभुवनादिकीं हर्षी ॥ जावें शिष्यवर्गांघरीं ॥ ६० ॥ वैदिकादि द्विजवर ॥ मातुळांश आपुला श्वशुर ॥ सहोदर साधुजन थोर ॥ तयां गृहीं अन्न जेवावें ॥६१॥ अडला विप्र ब्राह्मणाविणें ॥ त्याचें घरीं घ्यावें अन्न ॥ करावें गायत्रीजपन ॥ दोष जाती अवधारा ॥ ६२ ॥ विप्र ह्मणे श्रीगुरूसी ॥ विनंती माझी परियेसी ॥ निषिद्ध अन्न सांगा आह्मांसी ॥ कवण्या घरीं घेऊं नये ॥ ६३ ॥ श्रीगुरु सांगती ब्राह्मणासी ॥ अन्नवर्जित घरें ऐसीं ॥ अपार असे स्मृतिचंद्रिकेसी ॥ ऋषिसंमतें सांगेन ॥६४॥ नित्य मातापितयांसी ॥ सेवा घेती जे अति दोषी ॥ जेवूं नये त्या सदनासी ॥ धनलोभिष्ट द्विजाघरीं ॥ ६५ ॥ कलत्र पुत्र कष्टवोनी ॥ धर्म करी विप्रालागोनी ॥ अन्ननिषेध तया भुवनीं ॥ दोष घडती जेविल्या ॥ ६६ ॥ गर्विष्ठ चित्रिक शस्त्रधारी ॥ विप्र होवोनी मल्लयुद्ध करी ॥ वीणावाद्य ज्याचे घरीं ॥ न घ्यावें अन्न ब्राह्मणानें ॥ ६७ ॥ बहिष्कारी विप्राघरीं ॥ याचकवृत्तीनें उदरपूर्ती करी ॥ अन्न वर्जावें तयाघरीं ॥ आत्मस्तुती परनिंदक ॥ ६८ ॥ बहुजन एक अन्न करिती ॥ पृथक् वैश्वदेव न करिती ॥ वर्जावीं अन्नें विप्रजाती ॥ महादोष बोलिजे ॥ ६९ ॥ गुरु होवोनी समस्तांसी ॥ आपण मंत्र उपदेशी ॥ शिष्य रहाटे दुर्वृत्तीसीं ॥ त्या गुरुघरीं जेवूं नये ॥७०॥ क्रोधवंत ब्राह्मण असे ॥ अन्न न घ्यावें गृहीं ऐसें ॥ स्त्रियेसी वर्जिता पुरुष असे ॥ जेवूं नये तया घरीं ॥७१॥ धनगर्वी तामसाघरीं ॥ क्रूर निर्दय व्यभिचारी ॥ दांभिक दुराचारी विप्राघरीं ॥ अन्न तुह्मीं वर्जावें ॥७२॥ पुत्र पितयातें सोडोनी ॥ वेगळा असे जो ब्राह्मणी ॥

वर्जावें अन्न साधुजनीं ॥ महादोष बोलिजे ॥ ७३ ॥ स्त्रीजित असे एकादा जरी ॥ विप्र सुवर्णकार करी ॥ लटिकें बोले चोरी करी ॥ तयाघरीं न जेवावें ॥ ७४ ॥ खळ राजसेवकाघरीं ॥ लोह काष्ठ छेदन करी ॥ वस्त्र धूत रजकाघरीं ॥ तया घरीं न जेवावें ॥ ७५ ॥ रोगी सेवकाचे घरीं ॥ मद्यपान करी त्या नराघरीं ॥ वेश्या असे जया नारी ॥ दान विप्रें न घ्यावें ॥ ७६ ॥ तस्करविद्या असे ज्यासी ॥ द्वारपाळ व्यापारिता घरासी ॥ न घ्यावें अन्न कुटिलासी ॥ महादोष बोलिजे ॥ ७७ ॥ द्रव्य घेवोनी शूद्राघरीं ॥ अध्ययन सांगे द्विजवरी ॥ अन्न वर्जावें तयाघरीं ॥ घोडीं विकिती ब्राह्मण जे ॥ ७८ ॥ भागवत-कीर्तन नाहीं घरीं ॥ जे द्यूतकर्मी अतिनिष्ठुरी ॥ स्नानाविण भोजन करी ॥ तयाघरीं जेवूं नये ॥ ७९ ॥ न करी संध्या सायंकाळीं ॥ दान न करी कदां काळीं ॥ पितृकर्म वर्जितां कुळीं ॥ तयाघरीं न जेवावें ॥ ८० ॥ दंभार्थानें जो जप करी ॥ अथवा काम्यरूपें जरी ॥ द्रव्य घेवोनी जप करी ॥ तयाघरीं जेवूं नये ॥ ८१ ॥ ऋण देऊन एकाद्यासी ॥ उपकार करी परियेसी ॥ द्रव्य सांचवी कालांतरेसी ॥ तयाघरीं जेऊं नये ॥८२॥ विश्वासघातकी नराघरीं ॥ अनीति पक्षपात करी ॥ स्वधर्म सांडी दुराचारी ॥ पूर्वजमार्ग सोडिल्यासी ॥ ८३ ॥ विद्वज्जन ब्राह्मणासी ॥ एकादा मूर्ख अति द्वेषी ॥ अन्न वर्जावें तुह्मीं त्यासी ॥ परनिंदा नित्य करी ॥८४॥ कुळदैवत मातापिता ॥ सोडूनि जाय जो परता ॥ आपुल्या गुरूसी दूर त्यागितां ॥ जेवूं नये तया घरीं ॥ ८५ ॥ गोब्राह्मणवध करी ॥ स्त्रीमारक असे नर जरी ॥ अन्न घेतां दोष भारी ॥ श्रीगुरु ह्मणती विप्रासी ॥ ८६ ॥ आशाबद्ध सदा नर ॥ करोनि धरी एकाचें द्वार ॥ दान देतां वर्जी नर ॥ तयाघरीं वर्जावें

॥ ८७ ॥ समस्त जातीस शरण ॥ तोचि चांडाळ होय जाण ॥ घेऊं नये त्याचें अन्न॥ नमन करी विप्रासी ॥ ८८ ॥ आपुल्या कन्या जामातेसी ॥ क्रोधें करून सदां द्वेषी ॥ न जेवावें अन्न त्या घरासीं ॥ निपुत्रिकाचे घरीं देखा ॥ ८९ ॥ पंच महायज्ञ करी आपण ॥ जेवी आणिकाचे घरीं अन्न ॥ परपाक करी तया नाम जाण ॥ तयाघरीं जेवूं नये ॥९०॥ विवाह झाला असतां आपण ॥ पंच महायज्ञ न करी ब्राह्मण ॥ स्थालीपाक निवृत्ती नव जाणे ॥ न जेवावें तया घरीं ॥ ९१ ॥ घरच्या अन्नाचें दूषण करी॥ परान्नाची स्तुती करी ॥ अन्न वर्जावें तया घरीं ॥ श्वपच नाम तयाचें ॥ ९२ ॥ भाणसपणें उदर भरी ॥ अन्न घेतां तया घरीं ॥ डोळे जाती अवधारी ॥ आंधळा होय अल्पायुषी ॥९३॥ बधिर होय शरीरहीन ॥ स्मृति मेधा जाय जाण ॥ धृति शक्ति होय हीन ॥ भाणसाचे घरीं जेवूं नये ॥ ९४ ॥ गृहस्थधर्मी असे आपण ॥ दानधर्म न करी जाण ॥ अद्वैत शास्त्र बोलूं जाणे ॥ तया घरीं जेवूं नये ॥ ९५ ॥ परगृहीं वास करी आपण ॥ परान्न जेवी जो ब्राह्मण ॥ त्याचें जितुकें असे पुण्य ॥ यजमानासी जाय देखा ॥ ९६ ॥ तया यजमानाचे दोष ॥ लागती त्वरित भोजनस्पर्शें ॥ त्याचिकारणें निषिद्ध असे ॥ परान्न तुह्मीं वर्जावें ॥ ९७ ॥ भूमी सुवर्ण गोदान ॥ गज वाजी रत्नदान ॥ घेतां नाहीं अति दूषण ॥ अन्न घेतां महादोष असे ॥ ९८ ॥ समस्त दोष परान्नासी ॥ घडती देखा ब्राह्मणासी ॥ तैसेंचि जाण परस्त्रियेसी ॥ संग केलिया नरक होय ॥ ९९ ॥ परगृहीं वास करितां ॥ जाय आपुली लक्ष्मी त्वरिता ॥ अमावास्या दिनीं परान्न जेवितां ॥ मास पुण्य जाय देखा ॥ १०० ॥ अगत्य जाणें परान्नासी ॥ न बोलावितां जात संतोषीं ॥ जातां होती महादोषी ॥ शूद्रें बोलावितां जाऊं

नये ॥ १ ॥ आपुल्या कन्येच्या घरासी ॥ जाऊं नये भोजनासी ॥ पुत्र झालिया कन्येसी ॥ सुखें जावें अवधारा ॥ २ ॥ सूर्यचंद्रग्रहणासी ॥ दान घेऊं नये परियेसी ॥ जात अथवा मृत सूतकेसी ॥ जाऊं नये परियेसा ॥ ३ ॥ ब्राह्मणपणाचा आचार ॥ कवण रहाटे द्विजवर ॥ तैसें जरी करिती नर ॥ त्यांसी कैचें दैन्य असे ॥ ४ ॥ समस्त देव त्याचे हातीं ॥ अष्ट सिद्धी साधती ॥ ब्राह्मणकर्में जे आचरती ॥ कामधेनू तया घरीं ॥ ५ ॥ विप्र मदें बहु व्यापिले ॥ आचारकर्म सांडिलें ॥ त्याचिकारणें दरिद्री झाले ॥ स्वधर्मनष्ट होऊनियां ॥ ६ ॥ विप्र विनवी स्वामीसीं ॥ आमुची विनंती परियेसी ॥ सकळ आचारधर्मासी ॥ निरोपावें दातारा ॥ ७ ॥ गुरुमूर्ती कृपासागरा ॥ त्रिमूर्तीच्या अवतारा ॥ भक्तजनांच्या आधारा ॥ निरोपावे आचार ॥ ८ ॥ श्रीगुरु म्हणती तयासी ॥ ब्राह्मणाचा आचार पुससी ॥ सांगेन आतां विस्तारेंसी ॥ पूर्वीं ऋषी आचरले जो ॥ ९ ॥ नैमिषारण्यीं समस्त ऋषी ॥ तप करिती बहु दिवसीं ॥ आला तेथें पराशर ऋषी ॥ समस्त तयासी वंदिती ॥ १० ॥ समस्त ऋषी मिळोनी ॥ विनविताती कर जोडुनी ॥ ब्राह्मणाचा आचार गुणी ॥ कैंवि करावा म्हणती ते ॥ ११ ॥ आतां आह्मी आचार करितों ॥ तेणें संशय मनीं येतो ॥ ब्रह्मऋषी तुह्मी ह्मणूनि पुसतों ॥ तुमचा उपदेश आह्मां व्हावा ॥ १२ ॥ गुरुमुखावीण मंत्र ॥ ग्राह्य नव्हे अपवित्र ॥ तैसा श्रीगुरु तूं पवित्र ॥ आचार आह्मां सांगावे ॥ १३ ॥ पराशर ह्मणे ऋषींसी ॥ सांगेन आचार तुह्मांसी ॥ जेणें होय अप्रयासीं ॥ स्वर्गसिद्धी पावती ॥ १४ ॥ ब्राह्ममुहूर्तीं उठोनी ॥ श्रीगुरुस्मरण करोनी ॥ मग ध्याव्या मूर्ति तिन्ही ॥ ब्रह्मा विष्णू महेश्वर ॥ १५ ॥ मग स्मरावे नवग्रह ॥ पुण्यश्लोक निःसंदेह ॥ सन-

त्कुमार सनकसनंदनसह ॥ स्मरावे तयेवेळीं ॥ १६ ॥ सहनारद तुंबर देखा ॥ स्मरावे सिद्ध योगी ऐका ॥ सप्तसमुद्र पर्वतादिकां ॥ स्मरावें सप्त पितृदेवतां ॥ १७ ॥ सप्त ऋषींतें स्मरोनी ॥ सप्त द्वीपें सप्त भुवनीं ॥ समस्त नामें घेऊनी ॥ ऐसें ह्मणावें प्रातःस्मरण ॥ १८ ॥ मग उठावें शयनाहूनी ॥ आचमन करोनी दोनी ॥ लघुशंकेसी जाऊनी ॥ शौचाचमन करावें ॥ १९ ॥ पराशर ह्मणे ऋषींसी ॥ ऐका आचमनविधीसी ॥ सांगतसे विस्तारेंसी ॥ जे जे समयीं करणें ऐका ॥ २० ॥ स्नानापूर्वी नंतर दोनी ॥ उदक प्राशितां येणेंचि गुणीं ॥ निजतां उठतां समयीं दोनी ॥ आचमनें करावीं ॥ २१ ॥ अधोवायु शब्द झालिया ॥ ओखटें दृष्टी देखिलिया ॥ दोन्ही वेळां आचमूनियां ॥ शुद्ध व्हावें परियेसीं ॥ २२ ॥ भोजनापूर्वीं अपर दोनी ॥ जांभयी शिंकलिया दोन्ही ॥ लघुशंका शौचीं दोनी ॥ आचमन करावें ॥ २३ ॥ जवळी उदक नसे जरी ॥ श्रोत्राचमन करा निर्धारीं ॥ स्पर्श करावा चक्षुःश्रोत्रीं ॥ येणें पवित्र परियेसा ॥२४॥ ब्राह्मणाच्या उजवे कानीं ॥ सप्त देवता असती निर्गुणी ॥ त्यांसी स्पर्शितां तत्क्षणीं ॥ आचमनफळ असे देखा ॥ २५ ॥ श्लोक ॥ अग्निरापश्च चंद्रश्च वरुणार्केंद्रवायवः ॥ विप्रस्य दक्षिणे कर्णे नित्यं तिष्ठंति देवताः ॥ २६ ॥ टीका ॥ त्या देवतांचीं नांवें ऐका ॥ सांगेन ऋषी सकळिका ॥ अग्नि आप वरुणार्का ॥ वायु इंद्र चंद्र असती ॥ २७ ॥ लघुशंकाचमन करोनी ॥ मानसिक स्नान करूनी ॥ बैसावें शुची आसनीं ॥ अरुणोदय होय तंव ॥ २८ ॥ गायत्रीजपाव्यतिरिक्त ॥ वरकड जपावे पवित्र ॥ प्रकट होतां अरुणोदित ॥ बहिर्भूमीसी जाइजे ॥ २९ ॥ यज्ञोपवीत कानीं ठेवोनी ॥ डोईस पल्लव बांधोनी ॥ जावें नैर्ऋत्य कोनीं ॥ अधोमुखीं बैसावें ॥ ३० ॥

दिवसा बसावें उत्तरमुखीं ॥ ॥ रात्रीस दक्षिणमुखीं ॥ मौन असावें अति विवेकीं ॥ चहूंकडे पाहूं नये ॥ ३१ ॥ सूर्य चंद्र नक्षत्रांसी ॥ पाहूं नये नदी आकाशीं ॥ स्त्रीजन लोकपरिवारासी ॥ पाहूं नये कवणातें ॥ ३२ ॥ शौचाविणें कांस घाली जरी ॥ कांस न काढितां लघुशंका करी ॥ त्यासी होय यमपुरी ॥ नरक भोगी अवधारा ॥ ३३ ॥ जे ब्राह्मण उभे मुतती ॥ त्यांसी ऐका कवण गती ॥ त्यांचे अंगीं रोमें किती ॥ तावत्काळ वर्षें नरकीं पडती ॥ ३४ ॥ अगत्य घडे उदकाविण ॥ करूनियां गंगास्मरण ॥ मृत्तिकेनें शौच करणें ॥ भक्षणादि वर्जावें ॥ ३५ ॥ बहिर्भूमी बैसावयासी ॥ स्थळ सांगेन परियेसीं ॥ ऐका तात्पर्य ऋषी ॥ ह्मणे पराशर सर्वांस ॥ ३६ ॥ न बैसावें पृथ्वीवरी ॥ बैसिजे पान गवतावरी ॥ हिरवीं पर्णें करावीं दूरीं ॥ वाळल्या पानीं बैसावें ॥ ३७ ॥ मलविसर्जन करूनी ॥ उठावें हातीं शिश्न धरूनी ॥ जळपात्रापासीं जाऊनी ॥ शौच करावें परियेसा ॥ ३८ ॥ मृत्तिकाशौच करावयासी ॥ मृत्तिका न आणावी तुह्मीं ऐसी ॥ वारूळ मूषक गृहासी ॥ नदीमधील आणूं नये ॥ ३९ ॥ ज्या मार्गीं लोक चालती ॥ अथवा वृक्षाखालील माती ॥ देवालय क्षेत्र तीर्थीं ॥ मृत्तिका आपण वर्जावी ॥ ४० ॥ वापी कूप तडागांत ॥ मृत्तिका आणितां पुण्य बहुत ॥ उदक करीं घेऊनी प्रोक्षित ॥ मृत्तिका घ्यावी शौचासी ॥४१॥ आंवळ्या एवढे गोळे करावे ॥ लिंगस्थानीं एक लावावें ॥ अपानद्वारीं पांच स्वभावें ॥ एकैक हस्तासी तीन सप्तें ॥ ४२ ॥ एकैक पायासीं सात गोळे ॥ मृत्तिका लावावी सकळा ॥ आणीक सांगेन वेळा ॥ ऋषी समस्त परियेसा ॥ ४३ ॥ मृत्तिका शौचविधान ॥ मूत्रसंकेसी एक गुण ॥ बहिर्भूमीसीं द्विगुण ॥ मैथुनांतीं त्रिगुण देखा

॥ ४४ ॥ आणीक प्रकार असे देखा ॥ करावे येणेंप्रमाणें निका ॥ जितुके करी गृहस्थ एका ॥ द्विगुण करावें ब्रह्मचारी ॥ ४५ ॥ त्रिगुण करावें वानप्रस्थें ॥ चतुर्गुण करावें यती समस्तें ॥ न्यून करितां आचारातें ॥ धर्म निषिद्ध होय देखा ॥ ४६ ॥ येणें प्रकारें दिवसाशीं ॥ रात्रीं याच्या अर्धेंसी ॥ संकटसमयीं या अर्धेंसी ॥ मार्गस्थ अर्ध त्याहूनी ॥ ४७ ॥ व्रतबंध झालिया ब्राह्मणासी ॥ हाच आचार परियेसी ॥ हाचि उपदेश चहूं वर्णांसीं ॥ शौचविधी बोलिला ॥ ४८ ॥ शौच झालिया नंतरी ॥ चूळ भरावी येणेंपरी ॥ ब्राह्मण आठ भरी ॥ सहा भरावे क्षत्रियांनीं ॥ ४९ ॥ वैश्यें चार शुद्रें दोन वेळां ॥ येणें विधि भरा चुळा ॥ शुद्धस्थानीं बसोनि निर्मळा ॥ कुलदैवत स्मरावें ॥ ५० ॥ तुष्णीं आचमन करावें ॥ नाम घेतां चोवीस आतळावे ॥ पुनः आचमन करावें ॥ त्याचा विधि सांगेन ॥५१॥ विप्र दक्षिणहस्तीं ॥ पांच तिर्थें विख्यात असती ॥ जैसे बोलिलें असे स्मृतीं ॥ सांगेन तीर्थें अवधारा ॥ ५२ ॥ अंगुष्ठमूळ तळहातेसी ॥ ब्रह्मतीर्थ परियेसी ॥ तर्जनी अंगुष्ठ मध्येसीं ॥ पितृतीर्थ असे जाण ॥ ५३ ॥ चतुरंगुळ तळहस्तावरी ॥ देवतीर्थ असे निर्धारी ॥ कनिष्ठिका भागोत्तरीं ॥ ऋषितीर्थ परियेसा ॥ ५४ ॥ तर्पण देव पितृऋषी ॥ जे स्थानीं तीर्थें करावीं हर्षीं ॥ आचमन ब्रह्मतीर्थेंसीं ॥ करा ब्राह्मण विद्वज्जन ॥ ५५ ॥ ब्रह्मतीर्थें आचमनें तिन्ही ॥ केशव नारायण माधव ह्मणोनी ॥ देवतीर्थें उदक सांडोनी ॥ गोविंद नाम उच्चारा ॥ ५६ ॥ विष्णू मधुसूदना हस्त धुवोनी दोन्ही ॥ त्रिविक्रम वामन गाला स्पर्शोनी ॥ बिंबोष्ठ तळहस्त स्पर्शोनी ॥ श्रीधर नाम उच्चारा ॥ ५७ ॥ पुनरपि हस्ता हृषीकेशी ॥ पद्मनाम पादद्वय स्पर्शी ॥ सव्य हस्त पंचांगुळेंसीं ॥ दामोदर शिरस्थान ॥५८॥

चतुरंगुळ पृष्ठेसी ॥ संकर्षण घ्राणासी ॥ तर्जनी आणि अंगुष्ठेसी ॥ म्हणा वासुदेव प्रद्युम्न ॥ ५९ ॥ अंगुष्ठ अनामिकेसी ॥ नेत्रें श्रोत्रमंत्रेंसी ॥ कनिष्ठिका अंगुष्ठेंसी ॥ अच्युत नाभीं म्हणावें ॥ ६० ॥ पंचांगुळें उपेंद्र देखा ॥ हरी श्रीकृष्ण भुजा एकेका ॥ पांच अंगुळीं विधिपूर्वका ॥ येणेंपरी स्पर्शावें ॥ ६१ ॥ येणेंविधी संध्याकाळीं ॥ आणी करावें वेळोवेळीं ॥ अशौच्य अथवा संकटकाळीं ॥ असती विधानें ऐक पां ॥ ६२ ॥ देवतीर्थें तिन्ही घ्यावें ॥ हस्त प्रक्षाळा गोविंद नांवें ॥ मुख प्रक्षाळोनी मंत्र म्हणावे ॥ संध्या व्यतिरिक्त येणें गुणें ॥ ६३ ॥ विधान आणीक सांगेन ॥ देवतीर्थ घेऊन ॥ गोविंदनामें हस्त धुऊन ॥ चक्षुश्रोत्र स्पर्शावे ॥ ६४ ॥ शूद्रादि ओवळीयासी ॥ स्पर्श होतां परियेसी ॥ आचमनविधि ऐसी ॥ गुरु म्हणती ब्राह्मणांतें ॥ ६५ ॥ भिजोनि आलिया पर्जन्यांत ॥ द्विराचमनें होय पुनीत ॥ स्नान भोजनांतीं निश्चित ॥ द्विराचमन करावें ॥ ६६ ॥ फलाहार भक्षण करितां ॥ अथवा आपण उदक घेतां ॥ आला असेल स्मशान हिंडतां ॥ द्विराचमनें शुद्ध होय ॥ ६७ ॥ उदक नसे जवळी जरी ॥ श्रोत्राचमन करा निर्धारीं ॥ आणीक असे एक परी ॥ तूष्णीं आचमन करावें ॥ ६८ ॥ श्रीगुरु म्हणती ब्राह्मणासी ॥ आचमन विधि आहे ऐसी ॥ जे करिती भक्तीसीं ॥ दैन्य कैचें तयां घरीं ॥ ६९ ॥ आतां सांगेन विधान ॥ करावया दंतधावन ॥ समस्त पर्वणी त्यजून ॥ प्रतिपदा षष्ठी वर्जावी ॥ ७० ॥ न करावे नवमी द्वादशीसी ॥ शन्यर्कमंगळवारेसी ॥ श्राद्धकाळीं विवाहदिवशीं ॥ करूं नये दंतधावन ॥ ७१ ॥ कंटक वृक्षशाखेसीं ॥ ताड माड केतकीसीं ॥ खर्जूर नारिकेल शाखेसीं ॥ केल्या जन्म चांडाळयोनीं ॥ ७२ ॥ खदिर करंज अघाडेसीं ॥ औदुंबरार्क वटशाखेसीं ॥ अथवा

वृक्ष करवंदेसी ॥ पुण्यवृक्ष ऐका तुह्मी ॥ ७३॥ विप्रें द्वादशांगुलेंसी ॥ नवांगुलें क्षत्रियांसीं ॥ अष्टांगुलें वैश्यशूद्रांसीं ॥ दंतधावनकाष्ठ आणावें ॥ ७४ ॥ दंतधावनकाष्ठेंसीं ॥ तोडितां म्हणावें मंत्रासी ॥ आयुर्बल नाम परियेसी ॥ ह्मणोनि काष्ठ तोडावें ॥ ७५ ॥ दंतधावन करोनि ऐसें ॥ काष्ठ टाकावें नैर्ऋत्य दिशे ॥ चूळ भरोनि द्वादश ॥ द्विराचमन करावें ॥७६॥ मग करावें प्रातःस्नान ॥ तेणें होय सर्वसाधन ॥ तेजोबल आयुष्यवर्धन ॥ प्रातःस्नान केलिया ॥ ७७ ॥ प्रज्ञा वाढे दुःस्वप्न नासे ॥ सकळ दैवतें होती वश ॥ सौभाग्यसुख होती हर्षें ॥ दरिद्रचिंता शोकहरण ॥७८॥ यती तापसी संन्यासी ॥ त्रिकाळ करावें स्नानासीं ॥ ब्रह्मचारी विधीसी ॥ एक वेळ करावें ॥७९॥ नित्य केलिया पापनाश असे ॥ करावें याचिकारणें हर्षें ॥ गृहस्थें वानप्रस्थें विशेषें ॥ प्रातर्मध्यान्हीं करावें ॥ ८० ॥ अशक्य संकट झालें जरी ॥ अथवा न मिळे निर्मळ वारी ॥ स्नान करावयाची परी ॥ सांगेन ऐका ब्राह्मण हो ॥८१॥ अग्निस्नान भस्मस्नान ॥ अथवा करावें वायुस्नान ॥ करा विधीनें मंत्रस्नान ॥ आपोहिष्ठा मंत्रानें ॥ ८२ ॥ आणीक स्नानफळें असती ॥ ज्यास असेल भावभक्ती ॥ गुरुदेवता दर्शनमात्रीं ॥ तीर्थस्नानफळ असे ॥ ८३ ॥ अथवा दर्शन मातापिता ॥ चरणतीर्थ भक्तीनें घेतां ॥ अंगावरी प्रोक्षितां ॥ तीर्थस्नानफळ असे ॥ ८४ ॥ अथवा भिजेल पर्जन्यांत ॥ उभा राहोनि वारा घेत ॥ किंवा बैसावें धुळींत ॥ स्नानफळ असे देखा ॥ ८५ ॥ स्पर्शास्पर्श चांडाळासीं ॥ जळस्नानें होय शुचीसीं ॥ अथवा स्पर्श होय शूद्रादिकांसी ॥ उपस्नान करावें ॥ ८६ ॥ दृढ असेल तनु आपुलें ॥ स्नान मुख्य करावें जळें ॥ संधिविग्रह संकट मांडलें ॥ उपस्नान करावें ॥ ८७ ॥ प्रातःस्नान करावयासीं ॥ शीतोदक उत्त-

13

मेसी ॥ अशक्तता असेल देहासी ॥ उष्णोदकें करावें ॥ ८८ ॥ स्वभावें पवित्र असे उदक ॥ झालिया अग्निसंपर्क ॥ पवित्र झालें उदक अधिक ॥ गृहस्थासी मुख्य असे ॥८९॥ उष्णोदकें स्नान करितां ॥ शीतोदक करा मिश्रिता ॥ मध्यें करावें आचमन तत्वतां ॥ संकल्प तेथें ह्मणावा ॥ ९० ॥ घरीं स्नान करितां देखा ॥ अघमर्षण करूं नका ॥ वस्त्र पिळूं नये ऐका ॥ आपुलें हस्तें करूनियां ॥ ९१ ॥ पुत्रोत्साह संक्रांतीसी ॥ श्राद्धकाळ मृतदिवसीं ॥ न करावें स्नान उष्णोदकेसीं ॥ अमावास्या पौर्णिमा ॥ ९२ ॥ स्नान करितां बांधा शिखा ॥ दर्भ हस्तीं सूर्याभिमुखा ॥ मौनस्नान असे मुख्य ॥ कवणासवें न बोलावें ॥९३ ॥ आपोहिष्ठा मंत्रेंसी ॥ गायत्री तीन ह्मणा हर्षी ॥ येणेंपरी स्नानोदकासी ॥ अभिमंत्रावें ब्राह्मणें ॥ ९४ ॥ प्रथम शीतोदक घालोनी ॥ पश्चात् उष्णोदक मिळवोनी ॥ स्नान करावें प्रतिदिनीं ॥ गृहस्थांनीं घरीं देखा ॥९५॥ अवधूत मंत्र ह्मणोनी ॥ अंगींचा मळ काढोनी ॥ शुचिष्मंत स्नान करोनी ॥ गंगा भागीरथी स्मरावी ॥ ९६ ॥ आचमन करूनि आपण ॥ देवस्यत्वा मंत्र जपोन ॥ धूत वस्त्रें नेसून ॥ आर्णाक मंत्र जपावे ॥९७॥ अवधूत मंत्र ह्मणतां ॥ वस्त्र उकलावें त्वरितां ॥ उद्वंनद्य मंत्र ह्मणतां ॥ वस्त्र सूर्यासीं दाखवावें ॥ ९८ ॥ अवहंतीवितन्वती मंत्रें ॥ वस्त्रें नेसावीं पवित्रें ॥ द्विराचमन करावें तंत्रें ॥ वस्त्रें पिळोनी आचमन कीजे ॥ ९९ ॥ आतां मंत्रस्नान करणें ॥ सांगेन त्याचीं विधानें ॥ आपोहिष्ठादि मंत्रानें ॥ प्रोक्षावें शरीरावरी ॥२००॥ पाद मूर्धा हृदय प्रक्षालूनी ॥ हृदय पाद शिरस्थानीं ॥ करावें तुह्मीं मार्जनीं ॥ आपोदेवता मंत्रेंसी ॥ १ ॥ ऐसें स्नान करोनी ॥ पुनः आचमन करोनी ॥ मानसस्नानविधीनीं ॥ करावें ऐका भक्तीनें ॥२॥ नारायणाचे मूर्तीसी ॥ ध्यान

करावें भक्तीसी ॥ चतुर्भुज अलंकारेंसी ॥ ध्याता होय मानसीं ॥ ३ ॥ अपवित्रः पवित्रो
वा ॥ येणें मंत्रें हरी ध्यावा ॥ उदकें देह प्रोक्षावा ॥ स्नानफळ असे अवधारा ॥ ४ ॥ मंग-
ळस्नानविधान ॥ सांगेन ऐका तुह्मी ब्राह्मण ॥ रविवारीं निषेध जाण ॥ ज्वर होय अंगा-
सी ॥ ५ ॥ नदीतीरीं असे नर ॥ अशक्त असेल शरीर ॥ गंगास्मरणें निर्धार ॥ आर्द्र-
वस्त्रें अंग पुसावें ॥ ६ ॥ कांतिहानि सोमवारासी ॥ मंगळवारीं मृत्यु परियेसी ॥ लक्ष्मी
पावे बुधवारेंसीं ॥ धनहानी होय गुरुवारीं ॥ ७ ॥ शुक्रवारीं पुत्रघात ॥ शनिवारीं अखिल
संपत ॥ जाणा ऐसें निश्चित ॥ मंगळस्नान करावें ॥८॥ नदीस्नान प्रवाहमुखीं ॥ घरीं प्रातः-
सूर्याभिमुखीं ॥ संध्याकाळीं पश्चिममुखीं ॥ स्नान करावें अवधारा ॥ ९ ॥ स्नान करितां
नदीसीं ॥ अघमर्षण करावें परियेसी ॥ नमोऽग्नयेप्सुमते मंत्रेंसी ॥ नमस्कारावें नदीसी ॥१०॥
यदपांक्रूर मंत्रेंसी ॥ उदक लोटावें द्विहस्तेंसी ॥ तीन वेळां लोटोनि हर्षी ॥ इमं मे गंगे ज-
पावे ॥ ११ ॥ ऋतंचसत्यंच मंत्र जपत ॥ स्नान करावें गंगेंत ॥ नदीस्नानविधि विख्यात ॥
करा तुह्मी विप्रवर्ग ॥१२॥ रोदनांतीं वमनांतीं ॥ मैथुन दुःस्वप्न शांति ॥ स्नानावेगळे शुद्ध न
होती ॥ स्नान करावें अवधारा ॥१३॥ आतां वस्त्राचें विधान ॥ सांगेन ऐका ऋषिजन ॥
ओलें वस्त्र काषाय जाण ॥ नेसूं नये गृहस्थानें ॥१४॥ रक्तादि वस्त्र जीर्ण धौत्र ॥ नेसूनि जे
आचरत ॥ तें पुण्य जाय राक्षसांप्रत ॥ एक धौत्र असलिया ॥१५॥ श्वेत वस्त्र ब्राह्मणासी ॥
मुख्य असे परियेसी ॥ असावें उपवस्त्र बहिर्वासी ॥ उत्तरवस्त्र ह्मणिजे तया ॥१६॥ धौत्रें
नेसलियानंतरीं ॥ विभूती लावावी परिकरी ॥ मंत्रविधान पुरःसरी ॥ भस्मधारण करावें
॥१७॥ भस्म शुद्ध न मिळे जरी ॥ गोपीचंदन लावावें परी ॥ द्वारावती मुख्य धरीं ॥ वरकड

गु. च.

मृत्तिका अग्राह्य ॥१८॥ न मिळे द्वारावती देखा ॥ करा धारण गंगामृत्तिका ॥ ऊर्ध्वपुंड्र असे निका ॥ विष्णुसायुज्य होय तयां ॥१९॥ पुष्टिकाम असे ज्यासी ॥ लावावें तेणें अंगुष्ठेंसी ॥ ज्यासीं काम आयुष्यासी ॥ मध्यांगुळीं लावावें ॥२०॥ अन्नकामीं अनामिकेसीं ॥ तर्जनीं काम्य मुक्तीसीं ॥ जे लाविती नखेंसीं ॥ महापातक घडे तयां ॥ २१ ॥ उत्तम रुंदी दशांगुळी ॥ मध्यम नव अष्ट अंगुळी ॥ सप्त सहा पंचांगुळी ॥ शूर्पाकार लावावें ॥ २२॥ चतुर्थ त्रीणी द्वयांगुळी ॥ अधमपक्ष असे बोली ॥ द्वादश नामें करा भलीं ॥ विष्णुनाम उच्चारित ॥२३॥ केशव म्हणावें ललाटस्थानीं ॥ नाभीं नारायण म्हणोनी ॥ माधवनाम हृदयस्थानीं ॥ कमळ पुष्पाकार देखा ॥२४॥ गोविंदनामें कंठेंसीं ॥ विष्णुनाम कटिप्रदेशीं ॥ दक्षिणभुजा मधुसूदनेंसीं ॥ नाभीं उत्तर त्रिविक्रम ॥ २५ ॥ वामननामें बाहु देखा ॥ श्रीधर दक्षिण कर्णिका ॥ हृषीकेश वामकर्णिका ॥ पद्मनाभ पश्चिम कटीं ॥२६॥ दामोदर शिरस्थान ॥ ऐका ऊर्ध्वपुंड्र विधान ॥ पापें जाती जळोन ॥ गोपीचंदन लावितां ॥ २७ ॥ द्वारावती लावोनी ॥ लावा भस्म त्रिपुंड्रानीं ॥ हरिहर संतोषोनी ॥ साधे भक्तीमुक्ति देखा ॥ २८ ॥ विवाहादि शोभनदिवसीं ॥ देवताकृत्य श्राद्धदिवसीं ॥ अभ्यंगानंतर सूतकेसी ॥ गोपीचंदन वर्जावें ॥२९॥ ब्रह्मयज्ञ तर्पणासी ॥ कुश सांगेन विस्तारेंसीं ॥ आहेती दश प्रकारेंसी ॥ नामें सांगेन विख्यात ॥३०॥ दूर्वा उसीर कुश काश ॥ सकुद गोधूम व्रीहि मौंजिष ॥ नागरमोथा दर्भ परियेसा ॥ दश दर्भ मुख्य असती ॥ ३१ ॥ नित्य आणावें दूर्वेसी ॥ जरी न साधे आपणासी ॥ श्रावण भाद्रपद मासीं ॥ संग्रह संवत्सरीं करावा ॥ ३२ ॥ चारी दूर्वा विप्रासीं ॥ त्रीणी क्षत्रिय वैश्यासी ॥ एक नेमिली शूद्रासी ॥ चतुर्विध येणेंपरी ॥ ३३ ॥

दूर्वेची महिमा ॥ सांगतसे अनुपमा ॥ अग्रस्थानीं असे ब्रह्मा ॥ मुळीं रुद्र मध्यें हरी ॥३४॥ अग्रभाग चतुरंगळ ॥ ग्रंथीं मूळ द्वयांगुळ ॥ धारण करावें ब्रह्मकुळें ॥ याची महिमा थोर असे ॥ ३५ ॥ चक्र धरोनि विष्णु देखा ॥ दैत्य पराभवी ऐका ॥ ईश्वर त्रिशूळ धरितां देखा ॥ राक्षसांतक केवीं होय ॥ ३६ ॥ इंद्र वज्रायुध धरितां ॥ दैत्यगिरी विभांडी त्वता ॥ तैसें ब्राह्मण दूर्वा धरितां ॥ सकळ दुरितें पराभवती ॥ ३७ ॥ तृणाच्या पर्वतासी ॥ अग्नि स्पर्शे तात्काळेंसी ॥ तेविं आलिया पापराशी ॥ दर्भस्पर्शें जळती देखा ॥ ३८ ॥ ब्रह्मयज्ञ जपसमयीं ॥ ग्रंथी बांधावी कुशासहीं ॥ वर्तुळाकार भोजनसमयीं ॥ धरावी ब्राह्मणें भक्तीनें ॥ ३९ ॥ कर्म आचरतां दूर्वेसी ॥ ग्रंथी बांधावी परियेसी ॥ अग्निस्पर्श कापुरासी ॥ पाप नाशी येणेंपरी ॥ ४० ॥ एकादशांगुळें पवित्र ॥ द्विदल प्रादेशमात्र नित्य ॥ कर्मासी हेंच पवित्र ॥ द्विदळ जाणा मुख्य असे ॥ ४१ ॥ जप होम दानासी ॥ स्वाध्याय पितृकर्मांसी ॥ सुवर्ण रजत मुद्रिकेसी ॥ कुशावेगळें न करावें ॥ ४२ ॥ देव पितृकर्मांसी देख ॥ रजत करावें सुवर्णयुक्त ॥ तर्जनी स्थानीं रजतमुद्रिका ॥ सुवर्ण धरावें अनामिकेसीं ॥ ४३ ॥ मुद्रिका असावी खड्गपात्रीं ॥ कनिष्ठिकांगुळीं पवित्रीं ॥ ग्राह्य नव्हे जिवंतपित्री ॥ तर्जनांगुळीं मुद्रिका ॥४४॥ योगपट्टादि उत्तरी देखा ॥ तर्जनी स्थानीं रौप्य मुद्रिका ॥ पायीं न घाली पादुका ॥ गयाश्राद्ध न करावें ॥ ४५ ॥ नवरत्न मुद्रिका ज्याचे हातीं ॥ पापें त्यासी न लागती ॥ एकादें रत्न असतां हातीं ॥ मुद्रिका पवित्र ब्राह्मणासी ॥ ४६ ॥ प्रातःसंध्येचें विधान ॥ सांगेन ऐका ऋषिजन ॥ नक्षत्र असतांचि प्रारंभून ॥ अर्घ्य सूर्योदयीं द्यावें ॥ ४७ ॥ सूर्योदय होय तंव ॥ जप करीत

उभें असावें ॥ उदयसमर्थी अर्घ्य द्यावे ॥ तत्पूर्वी देणें सर्व व्यर्थ ॥ ४८ ॥ ऋषी पुसती पराशरासी ॥ संध्या करावया विधी कैसी ॥ विस्तारोनी आह्मांसी ॥ सांगावेंजी स्वामिया ॥४९॥ श्रीगुरु ह्मणती ब्राह्मणांसी ॥ सांगेन संध्याविधीसी ॥ ऐका तुह्मीं तत्पर-तेसीं ॥ पराशरस्मृतींसीं असे ॥ ५० ॥ गायत्री मंत्र जप करितां ॥ शिखा बांधावी तत्वतां ॥ आसन घालावें उन्नतां ॥ दर्भ पाणीं घेऊनियां ॥ ५१ ॥ देवतीर्थ द्विराचमन ॥ विष्णुनाम स्मरोन ॥ प्राणायाम विस्तारोन ॥ न्यासपूर्वक करावा ॥ ५२ ॥ प्रणवाचा परब्रह्मऋषी ॥ गायत्री नाम छंदासी ॥ परमात्मा देवता परियेसी ॥ ह्मणा प्राणायामे विनियोगः ॥ ५३ ॥ ओं व्याहृती सत्य ज्ञानिया ॥ नाभि हृदयमूर्ध्नि स्पर्शावया ॥ व्याहृती सप्त अतिशया ॥ प्रत्येक देवता ऋषि सांगेन ॥ ५४ ॥ व्याहृती सप्त स्थानासी ॥ ऐका असे प्रजापति ऋषी ॥ प्रत्येक्ष देवता परियेसी ॥ सप्त नामें देवांचीं ॥ ५५ ॥ अग्निर्वायु गुरुः सूर्य ॥ वरुणेंद्र विश्वेदेव ॥ सप्त व्याहृती सप्त देव ॥ छंद सप्त सांगेन ॥ ५६ ॥ गायत्री आणि उष्णिका ॥ अनुष्टुप् बृहस्पती पंक्ति पंचम ऐका ॥ त्रिष्टुप्जगती छंद विशेखा ॥ प्राणायामे विनियोगः ॥५७॥ ओं भूः पादन्यास ॥ भुवः जानु स्वः गुह्य ॥ ओं महः नाभि-स्थान स्पर्शा ॥ जनो हृदय तपो कंठ ॥ ५८ ॥ सत्यं भ्रूर्ललाट जाणा ॥ गायत्री छंदेसी ह्मणा ॥ विश्वामित्र ऋषि खुणा ॥ प्राणायामे विनियोगः ॥५९ ॥ ओंभूर्हृदयाय नम इति ॥ ओंभुवः शिरसि नम इति ॥ ओंस्वः शिखायै नम इति ॥ अस्त्रायफट् शिरसि ॥ ६० ॥ ओंतत्स... ण्यंकवचायहुं ॥ ओंभर्गो... हिनेत्रत्रयायवौषट् ॥ धियो...तअस्त्रायफट् ॥ शिरसे स्वाहा ॥ ६१ ॥ प्राणायाम करावयासीं ॥ प्रजापती ह्मणती ऋषी ॥ देवता नामें परियेसीं ॥

गु. च.

ब्रह्माग्निर्वायु सूर्य असे ॥ ६२ ॥ प्राणायामे विनियोग ह्मणूनी ॥ आपस्तनय स्पर्शोनी ॥ ज्योतिर्नेत्र स्पर्शस्थानीं ॥ रसोंजिव्हामृत ललाटे ॥ ६३ ॥ ब्रह्मभूर्भुवःस्व ह्मणूनी ॥ प्राणायाम करा तिन्ही ॥ त्रिपदागायत्री जप कोणी ॥ जपणारासी सर्व सिद्धी ॥ ६४ ॥ गायत्रीची अधिदेवता ॥ ब्रह्माग्निर्वायुः सविता ॥ ऋषी ह्मणा असे ख्याता ॥ सप्तलोक न्यास सांगेन ॥ ६५ ॥ पादन्यास भूर्लोक ॥ भुवः जानु अति विशेख ॥ स्वः गुह्य असे लोक ॥ नाभिन्यास महर्लोक ॥ ६६ ॥ जनोहृदय तपो ग्रीवे ॥ भ्रुवोर्ललाट लोक ह्मणावे ॥ ऐसें शिरस्थान बरवें ॥ सत्यलोक ह्मणती तयासी ॥ ६७ ॥ गायत्रीची प्रार्थना करूनी ॥ प्राणायाम करा विधीनीं ॥ ब्रह्मचारी गृहस्थांनीं ॥ पंचांगुळीं धरा परमेष्ठी ॥ ६८ ॥ वानप्रस्थ संन्यासी ॥ अनामिका कनिष्ठिकांगुष्ठेसीं ॥ ओंकारादि वायुपूरकेसी ॥ दक्षिण नासापुटें चढवावें ॥ ६९ ॥ वामनासापुटीं विसर्जोनी ॥ करा प्राणायाम तिन्हीं ॥ येणेंचि विधि करा मुनी ॥ त्रिकाळ संध्याकर्मीं ॥ ७० ॥ आतां करा मार्जनेंसीं ॥ सांगेन ऐका समस्त ऋषी ॥ जैसें असे स्मृतिचंद्रिकेसी ॥ तेणें विधी सांगतों ॥ ७१ ॥ आपोहिष्ठेति सूक्तेसीं ॥ सिंधुद्वीप ऋषी गायत्री छंदेंसीं ॥ आपोदेवता मार्जनेंसीं ॥ हा ह्मणावा विनियोग ॥ ७२ ॥ येणें मंत्रें ह्मणोन ॥ कुशपवित्रें करा मार्जन ॥ यस्य क्षयाय मंत्र जाण ॥ आपुले पाद प्रोक्षावे ॥ ७३ ॥ आपोजन असे मंत्रेसी ॥ प्रोक्षावे आपुल्या शरीरासीं ॥ सूर्यश्चेति मंत्रेसीं ॥ उदक प्राशन करावें ॥ ७४ ॥ हिरण्यवर्णसूक्तेसीं ॥ मार्जन करावें परियेसीं ॥ द्रुपदादिवेति मंत्रेसीं ॥ घ्राणोनि उदक सोडावें ॥ ७५ ॥ आचमनें करूनि दोन ॥ मार्जनविधान सांगेन ॥ वामहस्तें पाय धरून ॥ मार्जन करा विशेषीं ॥ ७६ ॥ औदुंबर सुवर्ण रजत ॥ दारुकाष्ठ असे पवित्र ॥ ऐसें पात्र न मिळे यत्र ॥

अ. ३६

पा. ३३९

वामहस्तीं उदक घ्यावें ॥ ७७ ॥ मृन्मयपात्र अथवा द्विमुखपात्र ॥ भिन्नभांडें त्याज्य अपवित्र ॥ तें अग्राह्य देवपितरां ॥ श्रीगुरु ह्मणती ब्राह्मणांसी ॥ ७८ ॥ मार्जनसंख्या सांगेन ऐका ॥ शिरसीं अष्ट पादे नवका ॥ यस्य क्षयाय स्थानभूमिका ॥ येणेंपरी मार्जन ॥ ७९ ॥ आपःपुनंतु मंत्रेंसी ॥ प्राशनोदक माध्यान्हेसी ॥ अग्निश्चेति मंत्रेसी ॥ सायं संध्या करावी ॥ ८० ॥ प्राशनांतीं तुह्मी ऐका ॥ द्विराचमन करा निका ॥ अघ्राण करूनि सांडिजे ऐका ॥ एक आचमन करावें ॥ ८१ ॥ अर्घ्य द्यावयाचें विधान ॥ सांगेन ऐका ऋषिजन ॥ गोशृंगाइतुकें उंचोन ॥ अर्घ्य द्यावे अवधारा ॥ ८२ ॥ गायत्री मंत्र जपोनी ॥ सायंप्रातर्द्यावी तिन्ही ॥ हंसः शुचिषेति माध्यान्हीं ॥ अर्घ्य द्यावे मनोभावें ॥ ८३ ॥ प्रातर्मध्यान्हीं उभें बरवें ॥ सायं अर्घ्य बैसोनि द्यावे ॥ आचमन त्रिवार करावे ॥ करी प्रदक्षिणा असावादित्य ॥ ८४ ॥ अर्घ्य द्यावयाचें कारण ॥ सांगेन विधि विस्तारेंन ॥ राक्षस महादारुण ॥ तीस कोटी आहेती देखा ॥ ८५ ॥ सूर्यासवें युद्धासी ॥ नित्य येती परियेसीं ॥ संदेह पडे देवांसी ॥ सूर्या होईल अपजय ॥ ८६ ॥ अपजय येतां सूर्यासी ॥ उदयास्तमान न होय परियेसीं ॥ कर्में न चालती ब्राह्मणांसी ॥ स्वधास्वाहाकार न चाले ॥ ८७ ॥ स्वाहास्वधाकार रहाती ॥ समस्त देवांस उपवास होती ॥ सृष्टि राहिली न होय उत्पत्ती ॥ ह्मणोनि उपाय रचियेला ॥ ८८ ॥ याचिकारणें अर्घ्य देती ॥ तेंचि वज्रायुधें होती ॥ जावोनि दैत्यांसी लागती ॥ पराभविती प्रतिदिवसीं ॥ ८९ ॥ दैत्य असती ब्रह्मवंश ॥ त्यांसीं वधिलिया घडती दोष ॥ प्रदक्षिणा करितां जाती दोष ॥ असावादित्य ह्मणोनियां ॥ ९० ॥ ब्रह्महत्येचिया पातकासी ॥ भूमिप्रदक्षिणा दोष नाशी ॥ चार पावलें फिरतां कैसी ॥

भूमिप्रदक्षिणा पुण्य असे ॥ ९१ ॥ संध्या करावयाचें स्थान ॥ सांगेन ऐका फलनिधान ॥
घरीं करितां प्रतिदिन ॥ एकचि फल अवधारा ॥९२॥ दश फल ग्रामाबाहेर देखा ॥ नदीस
केलिया शताधिका ॥ पुष्पकतीर्थीं सहस्र ऐका ॥ गंगासुरनदी कोटीफल ॥९३॥ सुरापान
दिवामैथुन ॥ अनृतादि वाक्यें पापें जाण ॥ संध्या बाहेर करितां क्षण ॥ जळती दोष ता-
त्काळीं ॥९४॥ स्थानें असती जप करावयासी ॥ विस्तार सांगेन तुम्हांसी ॥ श्रीगुरु म्हणती
ब्राह्मणांसी ॥ एकचित्तें परियेसा ॥ ९५ ॥ जप केलिया घरीं ऐका ॥ एकचि फळ असे
देखा ॥ बाहेर द्विगुणफळ अधिका ॥ नदीतीरीं त्रिगुणफळ ॥९६॥ गोस्थळ वृंदावन देखा ॥
दशगुण फळ अधिका ॥ अग्निहोत्रस्थानीं निका ॥ शतगुण फळ अधिक असे ॥९७॥ तीर्थ
देवता सन्निधानीं ॥ सहस्रफल असे निर्गुणी ॥ शतकोटी फल हरिसंनिधानी ॥ ईश्वरसन्नि-
धानीं अनंतफल ॥ ९८ ॥ जप करितां आसनासी ॥ विधिनिषेध आहे परियेसी ॥ सांगेन
ऐका तात्पर्येंसी ॥ पुण्यपाप बोललें असे ॥ ९९ ॥ काष्ठावरी बैसोनि जरी ॥ जप करितां
मनोहरी ॥ दुःख भोगी निरंतरीं ॥ अभागी पुरुष तो होय ॥३००॥ पल्लव शाखांवरी बसतां ॥
सदां होय दुश्चिता ॥ वस्त्रासनीं दरिद्रता ॥ पाषाणासनीं व्याधि होय ॥ १ ॥ भस्मासनीं
व्याधिनाश ॥ कंबलासनीं सुख विशेष ॥ कृष्णाजिनीं ज्ञानप्रकाश ॥ व्याघ्रचर्मीं मोक्षश्री
॥ २ ॥ कुशासनीं वशीकरण ॥ सर्व रोगांचें अपहरण ॥ पापें जाती पळोन ॥ आयुः प्रज्ञा
अधिक होय ॥ ३ ॥ ओमित्येकाक्षर मंत्र ॥ जपावा तुम्हीं पवित्र ॥ ध्यान करावें गायत्री
मंत्र ॥ समस्त पापें हरती देखा ॥ ४ ॥ गायत्रीचें स्वरूप आतां ॥ अभिनव असे वर्णितां ॥
रक्तांगी वस्त्र रक्ता ॥ हंसवाहन असे देखा ॥५॥ अकारब्रह्मा अधिदेवता ॥ चतुर्भुजा चतु-

वक्त्रा ॥ कमंडलु अक्षसूत्रा ॥ चाटू धरिला असे करीं ॥६॥ ऋग्वेद असे समागमीं ॥ अग्नि-होत्र फल आवाहयामि ॥ मग आयातु वरदादेवी ॥ ह्मणावें ऐका ब्राह्मणानें ॥७॥ त्या मंत्रासि ऋषि देवता ॥ गायत्री सादृश्य असे ख्याता ॥ प्रातःसंध्या तुह्मीं करितां ॥ विधी तुम्हां सांगेन ॥ ८ ॥ गायत्री देवता अनुष्टुप् छंद ॥ ओज आदित्य देवता ॥ हे प्रातःसंध्या म्हणता भेद ॥ सावित्री देवता गायत्री छंद ॥९॥ सावित्री आवाहने विनियोग ॥ ही माध्याह्न संध्या म्हणावी ॥ सरस्वतीदेवता गायत्री छंद ॥ सरस्वती आवाहने विनियोगः ॥१०॥ प्रातः-संध्येचें ध्यान ॥ सांगेन ऐका तुह्मीं गहन ॥ रक्तांगी रक्तवसन ॥ हंसासनीं आरूढ असे ॥११॥ चतुर्बाहु चतुर्मुखी ॥ कमंडलू धरिला विशेखीं ॥ अक्षसूत्र चाटू हस्तकीं ॥ ऋग्वेद-सहित अग्निहोत्र ॥१२॥ ऐसें ध्यान करोनी ॥ मग ह्मणावें अक्षरज्ञानी ॥ एकचित्तें असा ध्यानीं ॥ श्रीगुरु म्हणती ब्राह्मणांसी ॥१३॥ ओंकारशिखामावाहयामि ॥ छंदऋषिमावाह-यामि ॥ श्रियमावाहयामि ॥ बलमावाहयामि ॥ १४ ॥ ऐसें म्हणोनि प्रातःकाळीं ॥ संध्या करावी सुवेळीं ॥ आतां सांगेन माध्यान्हकाळीं ॥ ध्यान आवाहनपूर्वक ॥ १५ ॥ अग्नि-भूरोम् सावित्रीध्यान ॥ यौवनस्था माध्यान्ह ॥ सांगेन ऐका ऋषिजन ॥ एकचित्तें परि-येसी ॥ १६ ॥ श्वेतांगी श्वेतवस्त्र ॥ वाहन असे वृषभ पवित्र ॥ उकाररुद्रगण दैवत ॥ पंचमुखा असे देखा ॥ १७ ॥ वरद अभय हस्त देखा ॥ रुद्राक्षमाला त्रिशूलधारका ॥ यजुर्वेदसहित देखा ॥ अग्निष्टोमफल जाणा ॥ १८ ॥ ओंकार शिखामावाहयामि ॥ छंद-ऋषीमावाहयामि ॥ श्रियमावाहयामि ॥ ह्रियमावाहयामि ॥ १९ ॥ आतां सायंसंध्या-ध्यान ॥ सांगेन ऐका विधान ॥ एकचित्तें ऐका वचन ॥ ध्यानपूर्वक सांगेन ॥ २० ॥

अग्निभूरोम् सरस्वती वृद्धा ॥ जाणावी तुह्मीं सायंसंध्या ॥ कृष्णांगी कृष्णवस्त्र परि-
धाना ॥ गरुड वाहन असें देखा ॥ २१ ॥ मकार विष्णुदेवता ॥ चतुर्भुज शंखचक्रधृता ॥
गदा पद्म धारणहस्ता ॥ सामवेदसहित जाणा ॥ २२ ॥ वाजपेय फल जाण ॥ सायंसंध्या
असें ध्यान ॥ करावें ऐका तुह्मीं ब्राह्मण ॥ म्हणोनि सांगती श्रीगुरु ॥ २३ ॥ ओंका-
रशिखामावाहयामि ॥ छंदऋषीमावाहयामि ॥ श्रियमावाहयामि ॥ बलमावाहयामि
॥ २४ ॥ पंचशीर्षोपनयने विनियोगः ॥ प्रणवस्य परब्रम्हऋषिः ॥ परमात्मा देवता ॥
गायत्री छंदः ॥ २५ ॥ उदात्त स्वरः अग्निर्वायुःसूर्यऋषयः ॥ गायत्री त्रिष्टुपूजगती छंदः ॥
ब्रम्हा विष्णु महेश्वर देवताः ॥ ऋग्यजुःसामानि स्वरूपाणि ॥ २६ ॥ आहवनीया गार्ह-
पत्याग्नि ॥ दक्षिणाग्नि उपस्थानानि ॥ पृथिव्यंतरिक्षं द्यौस्तत्वानि ॥ उदात्त अनुदात्त स्वरित
स्वराः ॥ २७ ॥ पीत विद्युत श्वेतवर्णी ॥ प्रातर्मध्यान्ह तृतीय सवनानि ॥ विश्वतैज-
सप्राज्ञस्वरूपाणि ॥ जाग्रति स्वप्न सुषुप्त्यवस्था ॥ २८ ॥ ऐसें त्रिपदा गायत्रीसी ॥ सांगि-
तलें त्रिविध ध्यानासी ॥ आतां विधान जपासी ॥ सांगेन ऐका एकचित्तें ॥ २९ ॥
ममोपात्तदुरित क्षयद्वारा ॥ श्रीपरमेश्वरप्रीत्यर्थं जपे विनियोगः ॥ ओं अं नाभौ ॥ वं
हृदयं मं कंठे ॥ ३० ॥ भूः अक्षर मंत्रासीं ॥ गायत्री असे छंदेसीं ॥ अग्नि देवता परियेसी ॥
विश्वामित्र ऋषी देखा ॥ ३१ ॥ षड्जस्वर श्वेतवर्ण ॥ पादस्पर्श उच्चारोन ॥ प्राणायामे
विनियोगोन ॥ दुसरी व्याहृती म्हणावी ॥ ३२ ॥ भुवः अक्षर मंत्रासी ॥ उष्णिक्नाम
छंदासी ॥ वायु देवता परियेसी ॥ भृगुऋषी असे जाणा ॥ ३३ ॥ असे रूप श्यामवर्ण ॥
पादस्पर्श रूप उच्चारोन ॥ करा तुम्हीं ऐसें ध्यान ॥ जानूमध्यें न्यासावें ॥ ३४ ॥ प्राणा-

यामे विनियोग म्हणोनी ॥ न्यास करावे भक्तिभावनीं ॥ स्वः व्याहृती म्हणोनी ॥ ध्यान करा भक्तीनें ॥ ३५ ॥ स्वः व्याहृती मंत्रासी ॥ म्हणा अनुष्टुप् छंदासी ॥ सविता देवता परियेसी ॥ भारद्वाज ऋषी जाणा ॥ ३६ ॥ स्वर गांधार पीतवर्णा ॥ कंठीं स्पर्शोनि मंत्र म्हणा ॥ प्राणायामे विनियोग जाणा ॥ तृतीय व्याहृती मंत्रासी ॥ ॥ ३७ ॥ ओं महः मंत्रासी ॥ बृहती छंदासी ॥ बृहस्पती देवता परियेसी ॥ वसिष्ठ ऋषि निर्धारें ॥ ३८ ॥ मध्यम स्वर पिशंग वर्ण ॥ ऐसें करा तुम्हीं ध्यान ॥ वेगें म्हणा नाभी स्पर्शोन ॥ प्राणायामे विनियोगः ॥ ३९ ॥ जनः मंत्र उच्चाराशीं ॥ ह्मणा पंक्ति छंदासी ॥ वरुण देवता गौतम ऋषी ॥ पंचम स्वर असे जाणा ॥ ४० ॥ रूप असे नीळवर्ण ॥ करा न्यास हृदयस्थान ॥ प्राणायामे विनियोगोन ॥ जनः पंच न्यास ऐसे ॥ ४१ ॥ तपः मंत्रन्यासासी ॥ त्रिष्टुपूछंद परियेसी ॥ ईश्वर देवता कश्यप ऋषी ॥ धैवत स्वर परियेसा ॥४२॥ असे आपण लोहवर्ण ॥ स्पर्श करावे कंठस्थान ॥ प्राणायामे विनियोग ॥ न्यास करावा ब्राम्हणहो ॥ ४३ ॥ सत्यं म्हणतसे मंत्रासी ॥ करावे जगती छंदासी ॥ विश्वेदेव अंगिरस ऋषी ॥ निषाद स्वर जाणावा ॥ ४४ ॥ रूप असे कृष्णवर्ण ॥ भुवोर्ल्ललाटा स्पर्शोन ॥ प्राणायामे विनियोगोन ॥ न्यास करावा भक्तीनें ॥४५॥ इतुके न्यास करोनी ॥ हस्त ठेवा शिरस्थानीं ॥ ध्यान करा विधानीं ॥ सांगेन ऐका ब्राह्मणहों ॥ ४६ ॥ शिरस्थान स्पर्शासी ॥ ह्मणा अनुष्टुप् छंदासी ॥ उच्चार प्रजापति ऋषि ॥ परमात्मा देवता जाणा ॥ ४७ ॥ प्राणायामे विनियोगोन ॥ मग करावें गायत्रीध्यान ॥ ओं आपोज्योति ह्मणोन ॥ मंत्र ह्मणा भक्तीनें ॥ ४८ ॥ ओं आपो-ज्योतिरसोमृतं ॥ ब्रह्मभूर्भुवस्वरों ॥ शिरसी येणेंविधी ॥ अंगन्यास करावे ॥४९॥ चोवीस

अक्षरें मंत्रासी ॥ न्यास सांगेन एकएकासी ॥ एकचित्तें परियेसी ॥ ह्मणे पराशर ऋषि ॥ ५० ॥ या त्रिपदा गायत्रीसी ॥ असे विश्वामित्र ऋषि ॥ देवी गायत्री छंदेसी ॥ वर्ण देवता सांगेन ॥ ५१ ॥ ऐसें त्रिपदा गायत्री मंत्रासी ॥ चोवीस अक्षरें परियेसीं ॥ पृथक् न्यास परियेसी ॥ सांगेन ऐका द्विजोत्तमा ॥ ५२ ॥ तवर्णाक्षर मंत्रासी ॥ जाणा विश्वामित्र ऋषी ॥ अग्नि देवता परियेसीं ॥ गायत्री छंद ह्मणावा ॥ ५३ ॥ अतसी पुष्पें वर्णें जैसीं ॥ तद्रूप वर्ण असे परियेसीं ॥ वायव्य कोण स्थान त्यासी ॥ गुल्फ न्यास करावा ॥५४॥ त्सवर्णाक्षर मंत्रासी ॥ असे विश्वामित्र ऋषी ॥ वायु देवता परियेसीं ॥ देवी गायत्री छंद देखा ॥ ५५ ॥ जंघास्थानीं असे न्यास ॥ सौम्यरूप पिंवळें सुरस ॥ सर्व पापें दहतीं परियेस ॥ त्सवर्णाचें लक्षण ॥ ५६ ॥ विवर्णनाम अक्षरासी ॥ जाणा विश्वामित्र ऋषी ॥ सोम देवता परियेसीं ॥ देवी गायत्री छंद देखा ॥ ५७ ॥ न्यास करावया जानुस्थान ॥ इंद्रनीळ विद्युद्वर्ण ॥ ऐसें अक्षरविधान ॥ महारोग हरती देखा ॥ ५८ ॥ तुवर्णनाम अक्षरासी ॥ असे विश्वामित्र ऋषी ॥ विद्युद्देवता परियेसीं ॥ देवी गायत्री छंद देखा ॥ ५९ ॥ न्यास करा जानुस्थानीं ॥ दीप्ति असे जैसा वन्ही ॥ रूप असे सौम्यवर्णी ॥ भ्रूणहत्या पापनाशी ॥ ६० ॥ ववर्ण अक्षरासी ॥ असे विश्वामित्र ऋषी ॥ सोम देवता परियेसीं ॥ देवी गायत्री छंद देखा ॥६१॥ सुवर्ण स्फटिक कांती ॥ गुह्यस्थानीं न्यास बोलती ॥ समस्त अघौघ नाशती ॥ रूपवर्ण स्थाना उत्तम ॥ ६२ ॥ रेवर्ण नाम अक्षर मंत्रासी ॥ असे विश्वामित्र ऋषी ॥ वरुण देवता परियेसी ॥ देवी गायत्री छंद देखा ॥ ६३ ॥ णिकार वृषणस्थान जाण ॥ विद्युत्प्रकाश रूपधारणा ॥ बार्हस्पत्य नाम खुणा ॥ अभक्ष्य पापक्षालन

॥ ६४ ॥ णिवर्णाक्षर मंत्रासी ॥ जाणा विश्वामित्र ऋषी ॥ बृहस्पति देवता परियेसी ॥ देवी गायत्री छंद देखा ॥ ६५ ॥ यं कटिस्थान शांताकार वर्ण ॥ देवहत्या पापज्वलन ॥ न्यास करावे सगुण ॥ विद्वज्जन ब्राह्मणीं ॥ ६६ ॥ यं अक्षर ह्मणावयासीं ॥ असे विश्वामित्र ऋषी ॥ तारका दैवत परियेसी ॥ देवी गायत्री छंद असे ॥ ६७ ॥ भकारानाभीं करा न्यास ॥ कृष्णमेघवर्ण सुरस ॥ पर्जन्य देवता संकाश ॥ गुरुहत्या पापनाशी ॥ ६८ ॥ भवर्णनाम अक्षरासी ॥ असे विश्वामित्र ऋषी ॥ पर्जन्य देवता परियेसीं ॥ देवी गायत्री छंद जाणा ॥ ६९ ॥ र्गो अक्षरा उदर न्यास ॥ ध्यान रक्तवर्ण सुरस ॥ इंद्र देवता परियेस ॥ गोहत्येचें पाप जाय ॥ ७० ॥ र्गोवर्णनाम अक्षरासी ॥ जाणावा विश्वामित्र ऋषी ॥ इंद्र देवता परियेसीं ॥ देवी गायत्री छंद जाणा ॥ ७१ ॥ देकार न्यास स्तनासी ॥ गंधर्व नाम देव परियेसी ॥ स्त्रीहत्या पापनाशी ॥ एकचित्तें परियेसा ॥ ७२ ॥ देवर्णनाम अक्षरासी ॥ जाणा विश्वामित्र ऋषी ॥ गंधर्व देवता परियेसीं ॥ देवी गायत्री छंद देखा ॥ ७३ ॥ वकार हृदयस्थान न्यास ॥ शुक्लवर्ण रूप परियेस ॥ पूषा देवता असे ख्यास ॥ वाणीजात पापनाशी ॥ ७४ ॥ ववर्णाक्षर मंत्रासी ॥ जाणावा विश्वामित्र ऋषी ॥ रुद्र देवता परियेसीं ॥ देवी गायत्री छंद जाणा ॥ ७५ ॥ स्य अक्षरा कंठन्यास ॥ कांचनवर्ण रूप सुरस ॥ मित्र देवता परियेस ॥ मार्जारकुक्कुटपाप जाय ॥ ७६ ॥ स्यवर्ण अक्षर मंत्रासी ॥ असे विश्वामित्र ऋषी ॥ मित्र देवता परियेसी ॥ देवी गायत्री छंद जाणा ॥ ७७ ॥ धीकाराक्षर मंत्र दंतीं न्यास ॥ शुक्लकुमुदसंकाश ॥ त्वष्टा देवता परियेस ॥ पितृहत्यापाप जाय ॥ ७८ ॥ धीवर्णनाम अक्षरासी ॥ जाणा विश्वामित्र ऋषी ॥ विष्णु देवता परियेसी ॥ देवी गायत्री

छंद जाणा ॥ ७९ ॥ मकारन्यास तालुस्थान ॥ पद्म तेजोमय जाण ॥ वासुदेव असे खूण ॥ सर्वजन्मपाप जाय ॥ ८० ॥ मकारवर्णाक्षर मंत्रासी ॥ असे विश्वामित्र ऋषी ॥ वासुदेव देवता परियेसी ॥ देवी गायत्री छंद जाणा ॥ ८१ ॥ हिकारा नासिकीं करा न्यास ॥ शंख वर्णरूप असे त्यास ॥ वासुदेव देवता परियेस ॥ सर्व पाप हरण होय ॥ ८२ ॥ हिवर्ण नाम मंत्रासी ॥ जाणा विश्वामित्र ऋषी ॥ मेरु देवता परियेसी ॥ देवी गायत्री छंद जाणा ॥ ८३ ॥ धिकारा नेत्रस्थानीं न्यास ॥ पांडुराभास संकाश ॥ सोमदेवता परियेसा ॥ पाणिग्रहण-पाप नाशी ॥ ८४ ॥ धिवर्णनाम अक्षरासी ॥ तोचि विश्वामित्र ऋषी ॥ सोमदेवता परिये-सीं ॥ देवी गायत्री छंद जाणा ॥ ८५ ॥ योकाराक्षरमंत्रासी ॥ भ्रुवोर्मध्ये न्यासिजे त्यासी ॥ रक्तगौरवर्ण रूपेंसी ॥ प्राणिवधपाप जाय ॥ ८६ ॥ योकाराक्षर नामाक्षरासी ॥ जाणा विश्वामित्र ऋषी ॥ यम देवता परियेसी ॥ देवी गायत्री छंद जाणा ॥ ८७ ॥ यो-कारा ललाटस्थानीं न्यास ॥ रूप रुक्माभसंकाश ॥ सर्व पापा होय नाश ॥ भक्तिपूर्वक न्यासावें ॥८८॥ योवर्णाक्षरमंत्रासी ॥ तोचि विश्वामित्र ऋषी ॥ विश्वेदेव देवता परियेसी ॥ देवी गायत्री छंद जाणा ॥८९॥ नकारा उदित प्राङ्मुखा ॥ सूर्यासमान तेज देखा ॥ अश्वि-नौ देवता असे निका ॥ विराजमान परियेसा ॥९०॥ नकाराक्षर वर्णासी ॥ जाणा विश्वामि-त्र ऋषी ॥ अश्विनौ देवता परियेसीं ॥ देवी गायत्री छंद जाणा ॥ ९१ ॥ प्रकाराक्षर न्यास दक्षिणे ॥ रूप असे नीळवर्ण ॥ प्रजापती देवता जाण ॥ विष्णु सायुज्य पावि-जे ॥ ९२ ॥ प्रवर्णाक्षर मंत्रासी ॥ असे विश्वामित्र ऋषी ॥ प्रजापती देवता परियेसी ॥ देवी गायत्री छंद जाणा ॥ ९३ ॥ चोकाराक्षर मंत्रासी ॥ न्यासिजे तया पश्चिम भागा-

सी ॥ कुंकुमरूपवर्ण त्यासी ॥ सर्व देव पदवि पाविजे ॥ ९४ ॥ चोकारवर्ण मंत्राक्षरा-
सी ॥ जाणा विश्वामित्र ऋषी ॥ सर्व देवता परियेसी ॥ देवी गायत्री छंद जाणा ॥ ९५ ॥
दकाराक्षर उत्तरन्यास ॥ शुक्लवर्ण रूप सुरस ॥ करावे तुह्मीं ऐसे न्यास ॥
कैलासपद पाविजे ॥ ९६ ॥ दकाराक्षर मंत्रासी ॥ जाणा विश्वामित्र ऋषी ॥ रुद्र
देवता परियेसी ॥ देवी गायत्री छंद जाणा ॥ ९७ ॥ याकारा मूर्धस्थानीं न्यास ॥
सुवर्णरूप सुरस ॥ ब्रह्मस्थानीं होय वास ॥ श्रीगुरु ह्मणती ब्राह्मणांसी ॥ ९८ ॥ या-
वर्णाक्षर मंत्रासी ॥ असे विश्वामित्र ऋषी ॥ ब्रम्हदेवता परियेसी ॥ देवी गायत्री छंद जाणा
॥९९॥ तकारन्यास शिखास्थानीं ॥ निरुपम वैष्णवभुवनीं ॥ विष्णुरूप धरोनी ॥ वैकुं-
ठवास होय जाणा ॥ ४०० ॥ तकारवर्णाक्षर मंत्रासी ॥ जाणा विश्वामित्र ऋषी ॥ विष्णु
देवता परियेसी ॥ देवी गायत्री छंद जाणा ॥ १ ॥ ऐसें चोवीस अक्षरांसी ॥ न्यास
करावे विधीसीं ॥ हस्त ठेवोनियां शिरसीं ॥ आणीक न्यास करावे ॥ २ ॥ शिरस्थानीं
न्यासासी ॥ म्हणावें अनुष्टुप् छंदासी ॥ प्रख्यात प्रजापति ऋषी ॥ परमात्मा देवता जाणा
॥ ३ ॥ प्राणायामे विनियोग ह्मणोनी ॥ ओं आपोस्तन स्पर्शोनी ॥ ज्योतिर्नेत्र स्पर्शोनी ॥
रसोजिव्हा न्यासावे ॥४॥ अमृतेति ललाटेशीं ॥ मूर्ति स्पर्शोनी ऐसीं ॥ ब्रम्हभू०स्वरोमासीं ॥
न्यास करा येणें विधी ॥ ५ ॥ इतुके न्यास करोनी ॥ गायत्री त्रिवार म्हणोनी ॥ व्यापक
न्यास करोनी ॥ करशुद्धि करा तीन वेळां ॥ ६ ॥ भूःस्व विन्यसोनि ॥ गायत्रीच्या
दशपदांनीं ॥ दशांगुळीं न्यासोनी ॥ पादप्रमाण करावें ॥ ७ ॥ अंगुष्ठमुळ धरोनी ॥ कनि-
ष्ठिका स्पर्शोनी ॥ उभय हस्त न्यासोनी ॥ दशपादांगुळीं न्यासावें ॥ ८ ॥ चोवीस अक्ष-

रमंत्रासी ॥ अंगुलीन्यास करा हर्षी ॥ तर्जनी मूलादारभ्येसी ॥ कनिष्ठिकापर्यंत ॥ ९ ॥
द्वादशाक्षरीं एकैक हस्त ॥ करावे न्यास सुनिश्चित ॥ षडंगन्यास समस्त ॥ प्रणवासहित
करावे ॥ ॥ १० ॥ ओंभूःहिरण्यात्मने ॥ अंगुष्ठाभ्यां नमः ॥ ओंभुवःप्रजापत्यात्मने ॥ तर्ज-
नीभ्यां नमः ॥ ११ ॥ ओंस्वःसूर्यात्मने मध्यमाभ्यां नमः ॥ ओंमहः ब्रह्मात्मने अनामि-
काभ्यां नमः ॥ ओं जनः सोमात्मने कनिष्ठिकाभ्यां नमः ॥ ओंतपः सत्यं सवित्रात्मने
करतलकरपृष्ठाभ्यां ॥ १२ ॥ ओंत०तुःअंगुष्ठाभ्यां हृदयाय नमः ॥ वरेण्यं तर्जनीभ्यां शि-
रसेस्वाहा ॥ भ०ह्य मध्यमाभ्यां शिखायै वषट् ॥ धी०हि अनामिकाभ्यां कवचायहुं ॥१३॥
धि०नः कनिष्ठिकाभ्यां नेत्रत्रयाय वौषट् ॥ प्र०त् करतलकरपृष्ठाभ्यां अस्त्रायफट् ॥ उभ-
यहस्तांगुलिन्यासं कुर्यात् ॥ अथ षडंगन्यासः ॥ १४ ॥ ओंभूः हिरण्यात्मने हृदयाय
नमः ॥ ओंभुवः प्रजापत्यात्मने शिरसे स्वाहा ॥ ओं स्वः सूर्यात्मने शिखायै वषट् ॥ ओंमहः
ब्रह्मात्मने कवचायहुं ॥ १५ ॥ ओंजनः ओंतपः ओंसत्यं सोमात्मने नेत्रत्रयाय वौषट् ॥
प्रचोदयात्सर्वात्मने अस्त्रायफट् ॥ ओंतत्स०हृदयाय नमः ॥ ओंवरे० शिरसे स्वाहा ॥१६॥
भर्गो० शिखायै वौषट् ॥ ॥ धीम० कवचा० ॥ धियो० नेत्रत्र० ॥ प्रचोदया० अस्त्रा० ॥१७॥
षडंगन्यास करोनी ॥ अंगन्यास दशस्थानीं ॥ त्यांचीं नांवें सांगेन कानीं ॥ एकचित्तें
अवधारा ॥ १८ ॥ पाद जानु कटिस्थानीं ॥ नाभि हृदय कंठभुवनीं ॥ तालु नेत्र स्पर्शोनी ॥
ललाटशिरीं दश स्थानें ॥ १९ ॥ गायत्री मंत्राच्या दहा पदांसी ॥ दशस्थाना अंगन्यासा-
सी ॥ तत्स०वरेण्येसी ॥ भर्गोदेवस्य पंचमस्थान ॥ २० ॥ धीमहि ह्मणजे षष्ठस्थान ॥ धि-
यो० सप्तम स्थान जाण ॥ योकारा अष्टम अंगन्यास पूर्ण ॥ श्रीगुरु ह्मणती ब्राह्मणांसी

॥ २१ ॥ नकार नवम मंत्रस्थान ॥ प्र०तू दहावें जाण ॥ अंगन्यास येणें गुण ॥ करा तुह्मीं द्विजोत्तमा ॥ २२ ॥ चतुर्विंशति अक्षरांसी ॥ करावें अंगन्यासासी ॥ पादांगुष्ठ स्पर्श हर्षी ॥ शिखामारभ्य न्यासावें ॥ २३ ॥ तं अंगुष्ठाभ्यां नमः ॥ त्सं गुल्फयोर्नमः ॥ विं जंघयोर्नमः ॥ तुं जानुभ्यां नमः ॥ २४ ॥ व उरुभ्यां नमः ॥ रें गुह्याय नमः ॥ णिं वृषणाय नमः ॥ यं कटिभ्यां नमः ॥२५॥ भं नाभ्यै नमः ॥ गौं उदराय नमः ॥ दें स्तनाभ्यां नमः ॥ वं हृदयाय नमः ॥२६॥ स्यं कंठाय नमः ॥ धीं दंतेभ्यो नमः ॥ मं तालवे नमः ॥ हिं नासिकायै नमः ॥२७॥ धिं नेत्राभ्यां नमः ॥ यों भ्रुवोर्मध्याय नमः ॥ यों ललाटाय नमः ॥ नं प्राङ्मुखाय नमः ॥ २८ ॥ प्रं दक्षिणमुखाय नमः ॥ चों पश्चिममुखाय नमः ॥ दं उत्तरमुखाय नमः ॥ यां मूर्ध्ने नमः ॥ तं शिखायै वौषट् ॥ २९ ॥ ऐसे न्यास करोनी ॥ पुनः पादांगुष्ठ धरोनी ॥ कटिपर्यंत न्यासोनी ॥ ऊर्ध्वन्यास करावे ॥ ३० ॥ तकारा अंगुष्ठस्थान ॥ त्सकार गुल्फ असे स्थान ॥ विकार जंघास्थान ॥ ऐका ब्राह्मण ह्मणती गुरू ॥ ३१ ॥ तुकार जानू रकार ऊरू ॥ वकार गुह्यपूर्वक स्पर्श ॥ णिकारा वृषणस्थान बरवें ॥ यकार कटिस्थानन्यास ॥ ३२ ॥ शिखा धरोनी पादपर्यंत ॥ करावे न्यास उतरत ॥ त्यांतें सांगेन आदिअंत ॥ एकचित्तें परियेसा ॥ ३३ ॥ तं नमः शिखायैविन्यस्य ॥ यां नमः मूर्ध्नि विन्यस्य ॥ दं नमः उत्तरशिखायांन्यस्य ॥ चों नमः पश्चिमशिखायां ॥३४॥ प्रं नमः दक्षिणशिखायां ॥ नं नमः प्राङ्मुखे ॥ यों नमः ललाटे ॥ यों नमः भ्रूवोर्मध्ये ॥ ३५ ॥ धिं नमः नेत्रत्रये ॥ हिं नमः नासिकयोः ॥ मं नमः तालौ ॥ धिं नमः दंतेषु ॥ ३६ ॥ स्यं नमः कंठे ॥ वं नमः हृदये ॥ दें नमः स्तनयोः ॥ गौं नमः उदरे ॥३७॥ भं नमः नाभौ ॥ यं नमः कट्योः ॥

गु. च.

णिं नमः वृषणे ॥ रें नमः गुह्ये ॥ ३८ ॥ वं नमः अपाने ॥ तुं नमः जान्वोः ॥ विं नमः जंघ-
योः त्सं नमः गुल्फयोः ॥ तं नमः पादयोः ॥ ३९ ॥ प्रणवादिनमोंते न्यास करावे ॥
अकार नाभीं उकार हृदये ॥ मकार मुखे नकार ललाटे ॥ मकार शिरसि हस्तेन नमस्कृ-
त्वा ॥ ४० ॥ अथ मुद्रासंपुट प्रकारी ॥ चतुर्विंशति अक्षधारी ॥ सांगेन त्यांचा विस्तार
परी ॥ ऐका ब्राह्मण एकचित्तें ॥ ४१ ॥ श्लोक ॥ सुमुखं संपुटं चैव विततं विस्तृतं तथा ॥
द्विमुखं त्रिमुखं चैव ॥ चतुः पंचमुखं तथा ॥ ४२ ॥ षण्मुखाधोमुखं चैव व्यापकांजलिकं
तथा ॥ शकटं यमपाशं च ग्रंथितं चोल्मुकोल्मुकं ॥ ४३ ॥ प्रलंबं मुष्टिकं चैव मत्स्यकूर्मो-
वराहकं ॥ सिंहाक्रांतं महाक्रांतं मुद्गरं पल्लवं तथा ॥ ४४ ॥ एता मुद्रा न जानाति गायत्री
निष्फला भवेत् ॥ एता मुद्रास्तु कर्तव्या गायत्री सुप्रतिष्ठिता ॥ ४५ ॥ अस्यार्थः ॥ सुमुखं
॥ १ ॥ संपुटं ॥ २ ॥ विततं ॥ ३ ॥ विस्तृतं ॥ ४ ॥ द्विमुखं ॥ ५ ॥ त्रिमुखं ॥ ६ ॥ चतुर्मुखं ॥ ७ ॥
पंचमुखं ॥ ८ ॥ षण्मुखं ॥ ९ ॥ अधोमुखं ॥ १० ॥ व्यापकांजलिकं ॥ ११ ॥ शकटं ॥ १२ ॥
यमपाशं ॥ १३ ॥ ग्रंथितं ॥ १४ ॥ चोल्मुकोल्मुकं ॥ १५ ॥ प्रलंबं ॥ १६ ॥ मुष्टिकं ॥ १७ ॥
मत्स्यः ॥ १८ ॥ कूर्मः ॥ १९ ॥ वराहः ॥ २० ॥ सिंहाक्रांतं ॥ २१ ॥ महाक्रांतं ॥ २२ ॥ मुद्गरं
॥ २३ ॥ पल्लवं ॥ २४ ॥ मुद्राविण गायत्रीमंत्र ॥ जप करितां सर्व व्यर्थ ॥ याकारणें करा-
वा पवित्र ॥ मुद्रापूर्वक जप देखा ॥ ४६ ॥ गौप्य करावा मुद्रायुक्त ॥ प्राणायाम करा
निश्चित ॥ समस्त पापक्षयार्थ ॥ ह्मणोनि अष्टोत्तरीय संकल्पावें ॥ ४७ ॥ या गायत्री प्रथ-
म पादासी ॥ ह्मणा ऋग्वेद असे ऋषी ॥ भूमि तत्त्व परियेसी ॥ ब्रह्म देवता त्रिष्टुप्छंद
॥ ४८ ॥ द्वितीय पाद गायत्रीसी ॥ यजुर्वेद असे ऋषी ॥ रुद्र देवता प्राणापान व्यान

अ. ३६

३१

पा. ३५१

तत्वेंसी ॥ जगती ह्मणा अहर्निशीं ॥४९॥ गायत्री तृतीय पादासी ॥ ऋग्यजुःसाम तत्व परियेसी ॥ विष्णुदेवता त्रिष्टुप्छंदेंसी ॥ समस्त पापक्षयार्थ विनियोग ॥ ५० ॥ भूमिस्तंभ परियेसी ॥ गायत्री छंदासी ॥ ह्मणावें ब्रह्म पदासी ॥ ब्रह्मा दैवत जाणावें ॥५१॥ गायत्रीचें ध्यान ॥ सांगेन तुह्मां विधान ॥ एकचित्तें करा पठण ॥ श्रीगुरु ह्मणती ब्राह्मणांसी ॥ ५२ ॥ श्लोक ॥ मुक्ताविद्रुमहेमनीलधवलच्छायैर्मुखैस्त्रीक्षणैर्युक्तामिंदुकलानिबद्धमुकुटां तत्वार्थवर्णात्मिकां ॥ गायत्रीं वरदाभयांकुशकशां शुभ्रं कपालं गुणं शंखं चक्रमथारविं- दयुगुलं हस्तैर्वहंतीं भजेत् ॥ ५३ ॥ ऐसें ध्यान करोनी ॥ जप करावा नासिकाग्रनयनीं ॥ अंतीं षडंग न्यासोनी ॥ जप करा येणेंपरी ॥ ५४ ॥ गायत्री मंत्राची प्रशंसा ॥ एकचित्तें परियेसा ॥ मंत्रनाम असे विशेषा ॥ अक्षरें दोनी पाप हरे ॥ ५५ ॥ मकार ह्मणजे आपुलें मन ॥ त्रकार नाम आपुला प्राण ॥ मन प्राण एकवटोन ॥ जप करावा एकचित्तें ॥ ५६ ॥ जप ह्मणजे अक्षरें दोनी ॥ प्रख्यात असती त्रिभुवनीं ॥ जकार जन्म विच्छेदोनी ॥ पका- रें जन्मपाप दूरी ॥ ५७ ॥ चारी वेदांस मूळ एका ॥ गायत्री नाम नाशी पातका ॥ याचि कारणें करावा निका ॥ वेदपठण फल असे ॥ ५८ ॥ ऐसा मंत्र न जरी जपे नर ॥ वृथा जन्म जैसा सूकर ॥ जप कराहो निर्धार ॥ चिंतिलें फळ पाविजे ॥ ५९ ॥ न करावा उदकीं बैसोन ॥ त्वरित होय प्रज्ञाहीन ॥ याचि कारणें सांगेन विस्तारोन ॥ अग्नि तीनि विप्रमुखीं ॥ ६० ॥ आहवनीय गार्हपत्य ॥ दक्षिणाग्नि असे विख्यात ॥ अग्नि उदकसंपर्कें त्वरित ॥ तेज जाय अग्नीचें ॥ ६१ ॥ याकारणें उदक वर्जोनी ॥ बैसिजे उत्तम आसनीं ॥ हस्तस्पर्शा नाभिस्थानीं ॥ जपावा माळ धरोनियां ॥ ६२ ॥ उभेनी जपावा प्रातःकाळीं ॥ बैसोन

32

गु. च.

अ. ३६

कीजे माध्याह्नकाळीं ॥ अथवा उभा ठाकोनी ॥ उभयपक्षीं करावा ॥ ६३ ॥ माध्यान्हीं
हृदयस्थानीं ॥ जपावा माळ धरोनी ॥ हस्तमुखें स्पर्शोनी ॥ सायंकाळीं जपावा ॥ ६४ ॥
बैसोन जपावा सायंकाळीं ॥ पहावा वृक्ष निर्मळी ॥ जरी वृक्ष नसे जवळी ॥ नासाग्रनय-
नीं जपावा ॥६५॥ ब्रह्मचारी गृहस्थासी ॥ जप नेमिला अष्टोत्तरेसी ॥ वानप्रस्थ संन्यासी
यासी ॥ सहस्र मुख्य करावा ॥ ६६ ॥ संधिविग्रह होय जरी ॥ तरी अष्टाविंशति
करी ॥ अशक्त होय जरी ॥ दहा वेळ जपावा ॥ ६७ ॥ उत्तम पक्ष मानसीं ॥ मध्यम गौप्य
सुमुखेसीं ॥ अक्षरें प्रगट वाक्येंसीं ॥ कनिष्ठ प्रकार परियेसा ॥ ६८ ॥ त्रिपाद असती
गायत्रीसी ॥ मिळोनी न ह्मणावी परियेसी ॥ ह्मणतां होय महादोषी ॥ महानरक अव-
धारा ॥ ६९ ॥ पृथक् करोनी त्रिपादासी ॥ जपावा मंत्र अतिहर्षीं ॥ ब्रह्महत्यादि पापें
नाशी ॥ अनंत पुण्य लाधिजे ॥७०॥ अंगुष्ठजपें एक पुण्य ॥ पूर्वांगुलीनें दशगुण ॥ शंख-
मणीनें होय शतगुण ॥ प्रवालमाला सहस्र फळ ॥७१॥ स्फटिकमणी दहा सहस्र ॥ मौक्तिकय
पुण्य लक्षविध ॥ पद्माक्षीं निर्गुण जप ॥ दशलक्ष पुण्य असे ॥ ७२ ॥ कोटिगुणें
सुवर्ण माळा ॥ कुश रुद्राक्ष अनंतफळा ॥ जप करा नित्य काळा ॥ गौप्य माळा धरो-
नियां ॥ ७३ ॥ गौप्य माळा करकमळीं ॥ जप करा मन निश्चळीं ॥ सौख्य पावे अनंत
फळी ॥ श्रीगुरु ह्मणती ब्राह्मणांतें ॥ ७४ ॥ जप करितां नुल्लंघिजे मेरू ॥ उल्लंघितां पाप
बोलिलें अपारू ॥ प्राणायाम केलिया त्रिवारू ॥ मेरूलंघन पाप जाय ॥ ७५ ॥ गायत्री
जप तीन दिवस ॥ प्रत्यहीं करावा एकादश ॥ सर्व पातकें होती नाश ॥ त्रिरात्रीचें पाप
जाय ॥ ७६ ॥ अष्टोत्तरशत जप करितां ॥ अघोर पातक जाय त्वरिता ॥ करोनि

33

सहस्र जप एकाग्रता ॥ उपपातकें नासती ॥ ७७ ॥ महापातकादि दोषासी ॥ कोटिजप
करावा परियेसी ॥ जें जें कार्य इच्छिसी ॥ त्वरित होय अवधारा ॥ ७८ ॥ जप करावा
मन दृढें ॥ न पहावें मार्गेंपुढें ॥ शूद्रादिक यातीकडे ॥ संभाषण न करावें ॥ ७९ ॥ द्रव्य
वेचोनी एकाद्यासी ॥ जपतां होय अनंत दोषी ॥ चांडाळ योनींत भरंवसीं ॥ जन्म पावे
परियेसा ॥ ८० ॥ कंडू नये शरीर आपुलें ॥ नेणतां जरी इतुकें वडलें ॥ श्रोत्राचमन
करा वहिलें ॥ दोष नाहीं अवधारा ॥ ८१ ॥ ॥ ब्राह्मणाचे दक्षिणकर्णीं ॥ सप्त देवता ऐका
निर्गुणी ॥ स्पर्श करितां तत्क्षणीं ॥ पापें जाती परियेसा ॥८२॥ दृष्टी पडतां चांडाळासी ॥
द्विराचमनें शुद्ध होसी ॥ संभाषण झालिया पतितासी ॥ आचमनस्नान करावें ॥ ८३ ॥
जपतां निद्रा येई जरी ॥ अधोवायु जांभई आलियावरी ॥ क्रोधरूपें जपतां जरी ॥
पापरूप अवधारा ॥ ८४ ॥ मौनें करावें हें उत्तम ॥ अगत्य घडे संधिविषमीं ॥ तद्विष्णो
मंत्र जपताक्षणीं ॥ पापें जाती सकळिक ॥ ८५ ॥ नेणतां घडे इतुकें जरी ॥ आच-
मन करावें श्रोत्रीं ॥ अग्नि सूर्य धेनू दर्शन करीं ॥ विष्णुमंत्र जपावा ॥ ८६ ॥ ऐसा जप
करावा विधीनें ॥ मनकामना होय पूर्ण ॥ ऐकती समस्त ऋषिजन ॥ ह्मणोनि सांगे
पराशर ॥ ८७ ॥ गायत्री जपावी ऐशी ॥ प्रातःकाळीं ह्मणा मित्रस्यऋषी ॥ उदुत्यं मंत्र
माध्यान्हेसी ॥ इमंमेवरूण सायंकाळीं ॥ ८८ ॥ शाखापरत्वें मंत्र असती ॥ ह्मणावें विधि
जैसे असती ॥ गोत्र प्रवर ह्मणा भक्तीं ॥ वृद्धाचाराप्रमाणें ॥ ८९ ॥ चारी दिशा नमोनी ॥
प्रदक्षिणा करावी सगुणी ॥ गोत्र प्रवर उच्चारोनी ॥ नमस्कार करावे परियेसा ॥ ९० ॥
ऐसी संध्या करून ॥ मग करावें औपासन ॥ त्याचें सांगेन विधान ॥ श्रीगुरू ह्मणती

ब्राह्मणांसी ॥ ९१ ॥ सायं प्रातर्वेळा दोन्ही ॥ औपासन करावें सगुणी ॥ मिळोनि न करावें द्विजजनीं ॥ पृथक् करणें मुख्य असे ॥ ९२ ॥ न करावें वेळणी आळद्यांत ॥ भूमीवरी करी नित्य ॥ स्थंडिलीं करावें विहित ॥ अथवा उदकें सारवावें ॥ ९३ ॥ कुंडीं स्थापोनी अग्नीसी ॥ करावें नित्य उपासनेसी ॥ वारा घालों नये मुखेसी ॥ हातें पर्णीं आणि सुपें ॥ ९४ ॥ व्याधिष्ट पर्णवातें होय ॥ सुपें दरिद्र धनक्षय ॥ मुखें फुंकलिया आयुष्य जाय ॥ हस्तमुळीं होय मृत्यु ॥ ९५ ॥ फुंकणी अथवा विंझण्यासी ॥ वायु घालावा अग्नीसी ॥ काष्ठें समृद्धी परियेसा ॥ ज्वलित असावा अग्नी देखा ॥ ९६ ॥ ज्वाळा निघती जये स्थानीं ॥ आहुती घालावी तया वदनीं ॥ समिधा आणाव्या ब्राह्मणीं ॥ शूद्रहस्तें घेऊं नये ॥ ९७ ॥ समिधा पुष्पें दूर्वादिकीं ॥ आणों नये शूद्राहस्तकीं ॥ होमद्रव्यें असती विशेखी ॥ सांगेन नांवें परियेसा ॥ ९८ ॥ साळी सांवे नीवार ॥ तंडुल असती मनोहर ॥ गोधूम जव निर्धार ॥ यावनाळ मुख्य असे ॥ ९९ ॥ साठी दाणे मिति प्रमाण ॥ आहुती मुख्य करणें ॥ अधिक न किजे अथवा न्यून ॥ घृतसंपर्क करावें ॥ ९०० ॥ घृत नसेल समयासी ॥ तिळ पवित्र होमासी ॥ तिळाचें तैल परियेसीं ॥ तेंही पवित्र असे देखा ॥ १ ॥ औपासन केलियावरी ॥ ब्रह्मयज्ञ तर्पणाचिये परी ॥ सांगेन विधि अवधारी ॥ श्रीगुरू ह्मणती ब्राह्मणांसी ॥ २ ॥ मुख्य सकळ प्रातःकर्म सारोनी ॥ ब्रह्मयज्ञ करावा माध्यान्हीं ॥ उपासनादि कर्में करोनी ॥ मग करावा ब्रह्मयज्ञ ॥ ३ ॥ उदकसन्निध मुख्यस्थानीं ॥ करावें तर्पण ब्राह्मणीं ॥ प्राणायाम तीन करोनी ॥ विद्युदसि मंत्र जपावा ॥ ४ ॥ दूर्वा घेऊन दक्षिण करीं ॥ पूर्वमुख अथवा उत्तरीं ॥ बसावें वाम पादा-

वरी ॥ दक्षिण पाद ठेवोनी ॥ ५ ॥ उभय हस्त संपुटेंसी ॥ ठेवावे दक्षिण जानुवासीं ॥
ह्मणावें तीन प्रणवांसी ॥ मग ह्मणावें ऋचाक्षर ॥ ६ ॥ भूः ... ऐसें ह्मणोनी ॥ त्रिपदा गा-
यत्री उच्चारोनी ॥ तत्स ... ह्मणोनी ॥ जपावी दश वेळ ॥ ७॥ स्वाध्याय दिवसासी ॥ ह्म-
णावा वेद शक्तीसी ॥ अनध्याय होय तया दिवसीं ॥ एक ऋचा ह्मणा पन्नास ॥ ८ ॥
तोही नये एखाद्यासी ॥ मंत्र ह्मणावा विशेषी ॥ नमो ब्रह्मणे मंत्रासी ॥ तीन वेळां जपावा
॥ ९ ॥ वृष्टिरसि मंत्रासी ॥ जपोनि स्पर्शावें उदकासी ॥ तर्पण करावें परियेसी ॥ ऐक
ब्राह्मणा एकचित्तें ॥ १० ॥ ब्रह्मयज्ञ करावयासीं ॥ द्रव्य दर्भ परियेसीं ॥ वसुरुद्र आदि-
त्यांसीं ॥ तृप्त समस्त देवपितर ॥११॥ एखादे दिवसीं न घडे जरी ॥ अथवा होय समय रात्री ॥
जप करावा गायत्री ॥ वेदपठण फल असे ॥ १२ ॥ देवतर्पण कुशाग्रेसी ॥ मध्य स्थानानें
तृप्त ऋषी ॥ मूळानें पितृवर्गासी ॥ तर्पण करावें परियेसा ॥ १३ ॥ न करावें तर्पण
पात्रांत ॥ न द्यावें आपण उदकांत ॥ भूमिवरी घरीं नित्य ॥ निषिद्ध असे करूं
नये ॥ १४ ॥ दर्भ ठेवोनि भूमीवरी ॥ तर्पण करावें अवधारी ॥ विधियुक्त भक्तिपुरस्सरीं ॥
श्रीगुरु ह्मणती ब्राह्मणांसी ॥ १५ ॥ तीळ धरोनि आपुल्या करीं ॥ तर्पण करावें अवधारी ॥
ठेवों नये शिळेवरी ॥ भूमीं काष्ठपात्रीं देखा ॥ १६ ॥ रोम कूपादिस्थानीं देखा ॥ तीळ ठे-
वितां पावती दुःखा ॥ तीळ होती कृमि ऐका ॥ निषिद्ध बोलिलीं स्थानें पांच ॥ १७ ॥
घरीं तर्पण करावयासी ॥ तीळ अग्राह्य परियेसीं ॥ करावें आपण उदकासी ॥ ऐका
समस्त ऋषिजन ॥ १८ ॥ श्वेततीळ देवांसी ॥ धूम्र वर्ण ऋषिजनासीं ॥ कृष्णवर्ण पितरां-
सीं ॥ तीळतर्पण करावें ॥ १९ ॥ यज्ञोपवीती सव्य देवांसी ॥ निवीति करावी ऋषींसीं ॥

अपसव्य पितरांसी ॥ तर्पण करावें येणें रीती ॥ २० ॥ देवांसी अंजुळी एक ॥ ऋषीसीं अंजुळी द्वय सम्यक ॥ पितरांसी अंजुळी त्रिक ॥ तर्पण ऐसें करावें ॥ २१ ॥ स्त्रियांसी अंजुळी एक देखा ॥ व्यतिरिक्त माता बंधूसीं ऐका ॥ सपत्नी आचार्यपत्नी नामिका ॥ द्वयांजुळी करावें ॥ २२ ॥ देवब्रह्मऋषीश्वरांसी ॥ अक्षता मुख्य तर्पणासी ॥ कृष्णतिल-तर्पण पितरांसी ॥ अनंतपुण्यें परियेसा ॥ २३ ॥ आदित्य शुक्रवारेसी ॥ प्रतिपदा मघा नक्षत्रासीं ॥ षष्ठी नवमी एकादशीसी ॥ तिळतर्पण करूं नये ॥ २४ ॥ अथवा विवाह उप-नयनासी ॥ जन्मनक्षत्र जन्मदिवसीं ॥ आपुल्या घरीं शुभ दिवशीं ॥ तिळतर्पण करूं नये ॥ २५ ॥ जरी करावें तर्पण ॥ उदकें मुख्य आपण ॥ मुद्रिका हस्तीं सुवर्ण ॥ दर्भ पवित्रें करावें ॥ २६ ॥ पाय न धुतां मंगळस्नान ॥ तिळाविण करितां तर्पण ॥ श्राद्ध करी दक्षिणेविण ॥ निष्फल असे अवधारीं ॥ २७॥ निषिद्ध बोलिले ज्या दिवशीं ॥ तर्पण न करावें परियेसी ॥ दिपवाळी चतुर्दशीसी ॥ करावें तर्पण परियेसा ॥ २८ ॥ अंगारक कृष्णचतुर्दशीसीं ॥ करावें तर्पण विशेषीं॥ यमाचें नांवें संतोषीं ॥ यज्ञोपवीत सव्यानें ॥२९॥ एकेक तीळ घेऊनी ॥ त्रिवार अंजुळी देऊनी ॥ यमाचें नाम उच्चारोनी ॥ तर्पण करावें भक्तीनें ॥ ३० ॥ यमाचीं नामें त्रयोदश ॥ सांगेन ऐका विस्तारास ॥ यम धर्मराजा नामें परियेस ॥ मृत्यु अंतक चवथा जाणा ॥ ३१ ॥ वैवस्वत काळ देखा ॥ सर्वभूतक्षयकर ऐका ॥ आठवा औदुंबर नामका ॥ नीलयाःपरमेष्ठी दहा जाणा ॥३२॥ वृकोदर चित्र देखा ॥ चित्रगुप्त त्रयोदशिका ॥ प्रत्येक नामें ह्मणोनि एकेका ॥ नदींत द्यावें परियेसा ॥३३॥ समस्त पातकें नाशती ॥ रोगराई न पीडती ॥ अपमृत्यु कधीं न येती ॥ ग्रहपीडा न बाधे ॥३४॥ शुक्र-

पक्षीं माघमासीं ॥ तर्पण करावें अष्टमीसीं ॥ भीष्मनामें परियेसीं ॥ वर्षपातकें परिहरती॥३५॥ ऐसें तर्पण करोनि ॥ सूर्यनामें अर्घ्यें तिन्ही ॥ द्यावीं समस्त द्विजजनीं॥ह्मणे नृसिंह सरस्वती ॥३६॥ सिद्ध ह्मणे नामधारकासी ॥ कृपामूर्ती स्वामी कर्मविधीसी ॥ सांगता झाला ब्राह्मणांसी ॥ येणेपरी विहिताचार ॥ ३७॥ ह्मणे सरस्वतीगंगाधर ॥ ऐसा ब्राह्मणांचा आचार ॥ वर्तता होय मनोहर ॥ सर्वाभिष्टें साधतील ॥ ३८॥ इति श्रीगुरुचरित्रामृत ॥ नामधारक शिष्य संवादत ॥ वेदोपनिषदमथितार्थ ॥ आचार निरुपणाऽध्याय हा ॥ ३९ ॥ इति श्रीगुरुचरित्रपरमकथाकल्पतरौ श्रीनृसिंहसरस्वत्युपाख्याने सिद्धनामधारकसंवादे आन्हिकनिरूपणं नाम षट्त्रिंशोऽध्यायः ॥ ओंव्या ९३९ ॥



॥ श्रीगणेशाय नमः ॥ नामधारक विनवी सिद्धासी ॥ पुढें कथा वर्तली कैसी ॥ श्रीगुरु सांगती विस्तारेंसी ॥ काय निरूपिलें यानंतर ॥ १ ॥ ऐक नामधारका सगुणा ॥ जाणे सर्व आचार खुणा ॥ श्रीगुरु अवतार नारायणा ॥ सांगतसे कृपेसी ॥ २ ॥ त्रैमूर्तीच्या अवतारास ॥ आचार सांगतां काय प्रयास ॥ ज्ञान देऊनि पतितास ॥ वेद ह्मणविले कवणेपरी ॥३॥ ऐसे गुरुमूर्ती दातारू ॥ भक्तजना कल्पतरू ॥ सांगते झाले आचारू ॥ कृपा करोनि विप्रांसी ॥४॥ श्रीगुरु ह्मणती ब्राह्मणांसी ॥ गृहरक्षणार्थ कारणासी ॥ अग्निमंथन काष्ठासी ॥ संपादावें कृष्ण मार्जार ॥५॥ श्रीखंडादि मणिघृत ॥ तिळ कृष्णाजिन छागवस्त्र ॥ इतकीं असावीं पवित्र ॥ दुरितें बाधा करूं न शकती ॥६॥ शुक्लपक्षीं सारसाशीं ॥ असावें घरीं परियेसी ॥ समस्त पापविनाशी ॥ धेनू असावी आपुले घरीं ॥७॥ देवपूजेचें विधान ॥ सांगेन ऐका एकमन ॥ गृहा बरवें संमार्जन ॥ देवगृह असावें ॥८॥ हिरण्य रौप्य ताम्रेसी ॥ अथवा मृत्तिका पात्रेंसी ॥ संमार्जन करी विधीसी ॥ निषिद्ध पात्रें सांगेन ॥९॥ कांस्यपात्रीं कन्यका हस्तीं ॥ नोवरी अथवा शूद्र जाती ॥ न करावें उदक वस्त्र धरोनि हातीं ॥ दक्षिण हस्तीं सारवावें ॥१०॥ प्रारंभ करावा नैर्ऋत्य कोनीं ॥ रात्रीं न करावें उदक घेवोनी ॥ अगत्य करणें घडे मनीं ॥ भस्में करोनी सारवावें ॥ ११ ॥ रंगमाळिका घालोनी ॥ निर्मळ असावें देवताभुवनीं ॥ मग बैसोनि शुभासनीं ॥ देवपूजा करावी ॥ १२ ॥ जैसी संध्या ब्राह्मणांसी ॥ देवपूजा करावी तैसी ॥ त्रिकाळ करावें अर्चनासी ॥ एकचित्तें मनोभावें ॥ १३ ॥ त्रिकाळीं न घडे ज्यासी ॥ प्रातःकाळीं करावी हर्षी ॥ तेंही न साधे परियेसी ॥ मध्यान्हकाळीं करावें ॥१४॥ सायंकाळीं मंत्रेंसी ॥ पुष्पें वाहोनि भक्तीसी ॥

तैसें न साधे जयासी ॥ भोजनकाळीं करावें ॥ १५ ॥ देवपूजा न करी नर ॥ पावे त्वरित यमपुर ॥ नरक भोगी निरंतर ॥ ऐक ब्राह्मणा एकचित्तें ॥ १६ ॥ विप्रकुळीं जन्म जयासी ॥ पूजा न करितां जेवी हर्षी ॥ तोचि भोगी पातकासी ॥ वैश्वदेव न करी नर ॥ १७ ॥ देवपूजा करावयासी ॥ सहा प्रकार परियेसी ॥ उदकीं नारायण विशेषीं ॥ पूजितां तृप्ति जगन्नाथा ॥ १८ ॥ दुसरा प्रकार सांगेन ऐका ॥ अग्निदेवता पूजा अधिका । मानसपूजा अति विशेखा ॥ एकचित्तें परियेसा ॥ १९ ॥ सूर्यपूजा करितां जाण ॥ संतुष्ट होय नारायण ॥ सामान्यपक्षें स्थंडिलीं जाण ॥ प्रतिमापूजा स्वल्पबुद्धी ॥ २० ॥ ज्ञाता असेल बुद्धिवंत ॥ यज्ञपूजा करावी त्वरित ॥ स्वर्गापवर्ग पूजा करितां ॥ यज्ञपुरुषपूजा मुख्य जाणा ॥२१॥ अथवा पूजावें धेनूसी ॥ ब्राह्मणा पूजावें विशेषीं ॥ गुरुपूजा मनोभावेंसी ॥ प्रत्यक्ष तुष्टे त्रयमूर्ती ॥ २२ ॥ गुरु त्रैमूर्ति ह्मणोनी ॥ बोलती समस्त वचनीं ॥ सकळाभीष्टें तयापासूनी ॥ पाविजे चारी पुरुषार्थ ॥ २३ ॥ कलिप्रवेश करितां नर ॥ न करिती अंतःकरण स्थिर ॥ उत्पत्ती केली शार्ङ्गधरें ॥ समस्त लोक उद्धरावया ॥ २४ ॥ शालिग्राम चक्रासी ॥ प्रकाश केला हृषीकेशी ॥ तीर्थ घेतां परियेसी ॥ समस्त पापें नासती ॥ २५ ॥ आज्ञा घेऊनी श्रीगुरूची ॥ पूजा करावी प्रतिमेची ॥ वेदोक्त मंत्रें करोनी वाचीं ॥ विधिपूर्वक पूजावें ॥ २६ ॥ स्त्रीजनादि शूद्रांसी ॥ न ह्मणावें वेदमंत्रेसी ॥ आगमोक्त मार्गेसीं ॥ गुरुनिरोपें करावें ॥२७॥ श्रीगुरुच्या निरोपानें ॥ पूजिजे काष्ठें पाषाणें ॥ तेचि होती देव जाण ॥ होती प्रसन्न परियेसा ॥ २८॥ शुचि आसनीं बैसोनी ॥ करावें प्राणायाम तिन्ही ॥ येभ्योमाता ह्मणोनी ॥ चेतवावा परमात्मा ॥२९॥ प्रणव मंत्रोनी द्वादश ॥

उदक प्रोक्षावें आपुल्या शरीरास ॥ संकल्प करोनी अंगन्यास ॥ कलशपूजा करावी
॥३०॥ देवाच्या दक्षिण भागासीं ॥ कलश ठेवावा परियेसीं ॥ पूजा करोनी अंगन्यासीं ॥
शंखपूजा करावी ॥ ३१ ॥ निर्माल्य काढोनी विनयेसीं ॥ टाकावें तेथोनि नैर्ऋ-
त्येसीं ॥ धौत वस्त्र हांतरा हर्षीं ॥ दीप प्रज्वलित करावा ॥ ३२ ॥ स्मरावें मनीं श्रीगु-
रूसी ॥ मनसा वाचा कायेसीं ॥ अर्चन करावें पीठासी ॥ विधिपूर्वक अवधारा ॥ ३३ ॥
चारी द्वारें पूजोनी ॥ दिशा पूजाव्या अर्चूनी ॥ शांताकार करा ध्यानीं ॥ मग आवाहा-
नावें मंत्रोक्त ॥३४॥ सहस्त्रशीर्षा आवाहनीं ॥ पुरुषएवेदं आसनीं ॥ एतावानस्य ह्मणोनी ॥
पाद्य द्यावें अवधारा ॥३५॥ मंत्र म्हणोनी त्रिपादूर्ध्व ऐसा ॥ अर्घ्य द्यावें परियेसा ॥
तस्माद्विराळ म्हणा ऐसा ॥ देवासीं आचमन समर्पावें ॥ ३६ ॥ यत्पुरुषेण इति मंत्रेसीं ॥
स्नपन करावें देवासी ॥ पंचामृतादि विधीसी ॥ स्नपन पूजा करावी ॥ ३७॥ पुरुषसूक्तादि
मंत्रेंसी ॥ श्रुतिमार्गें करोनि न्यासासीं ॥ स्नपन करावें परियेसी ॥ एकचित्तें अवधारा
॥ ३८ ॥ स्नपन करोनि देवासी ॥ बैसवावें शुभासनेसीं ॥ तंयज्ञेति मंत्रेसी ॥ वस्त्रें द्यावीं
परियेसा ॥३९॥ तस्माद्यज्ञेति मंत्रेंसी ॥ यज्ञोपवीत द्यावें देवासी ॥ येणेंच मंत्रें गंधाक्षतेसी॥
वाहावें अनन्य भक्तीनें ॥ ४० ॥ तस्मादश्वा अजायंत ॥ ऐसा तुम्ही मंत्र ह्मणत ॥ पुष्पें
वाहावीं एकचित्त ॥ मनःपूर्वक देवासी ॥४१॥ पुष्पें वहावयाचें विधान ॥ सांगेन ऐका
ऋषिजन ॥ आपण पेरिलें कुसुम सगुण ॥ उत्तम पक्ष परियेसा ॥ ४२ ॥ पुष्पें असतीं
अरण्यांत ॥ तीं मध्यम प्रकार बोलिजेत ॥ क्रय करूनी आणितां ॥ अधम पुष्पें जाणिजे
॥४३॥ उत्तम न मिळतां घ्यावी विकत ॥ उत्तम पक्ष पुष्पें श्वेत ॥ रक्त मध्यम अधम पति ॥

कृष्ण चित्र अधमाधम ॥ ४४ ॥ वर्जावें शिळें पुष्प देख ॥ सच्छिद्र अथवा कृमिभक्षक ॥ भूमीवरी पडे ऐक ॥ पुष्प त्यजावें देवासी ॥ ४५ ॥ शिळें नव्हे सच्छिद्र जाण ॥ बिल्वपत्रें तुळसी आपण ॥ सहस्रपत्रें कमळें जाण ॥ सदा ग्राह्य देवासी ॥ ४६ ॥ शतपत्रै बकुल चंपकासी ॥ पाटली कमल पुन्नागेसी ॥ मल्लिकादि करविरासी ॥ कल्हार पुष्पें अर्पावीं ॥ ४७ ॥ विष्णुपूजा करावयासी ॥ वर्जावीं पुष्पें तुह्मीं ऐसीं ॥ धत्तूर अर्क कांचनेसी ॥ रक्त करवीरें त्यजावीं ॥ ४८ ॥ गिरिकर्णिका निर्गुंडेसी ॥ सेवगा कपित्थ करंजेसी ॥ अमर पुष्प कुष्मांड हर्षी ॥ पुष्पें विष्णूसी वर्जावीं ॥४९॥ हीं वाहिल्या होय दोषी ॥ सांगेन ऐका समस्त ऋषी ॥ पूजा करितां विष्णूसी ॥ त्यजावीं याचि कारणें ॥ ५० ॥ अर्कपुष्प वाहिलेंसी ॥ विनाश होय आपणांसी ॥ धत्तूर पुष्पें प्रज्ञा नाशी ॥ कोविदारें दरिद्रता ॥ ५१ ॥ श्रीकर्णिका पुष्पें वाहत ॥ कुलक्षय होय त्वरित ॥ कंटकादि पुष्पें वाहत ॥ शोक होय परियेसा ॥ ५२ ॥ कुंदपुष्पें बहु दुःख ॥ शाल्मलीपुष्पें रोग अधिक ॥ त्याचि कारणें विवेकें ॥ पुष्पें वाहावीं विष्णूसीं ॥ ५३ ॥ वर्ज्य पुष्पें ईश्वरासी ॥ सांगेन नांवें परियेसीं ॥ कपित्थ केतकी सशांकेसीं ॥ श्याम पुष्प वर्जावें ॥ ५४ ॥ कृष्ण पिंगल करंज देखा ॥ बकुळ दाडिंब केतका ॥ धातकी निंबादि पंचका ॥ माधवी पुष्पें वर्जावीं ॥ ५५ ॥ चूत कुंद यूथिका जाती ॥ रक्त पुष्पें वर्जावीं निगुती ॥ ईश्वरार्चनें दोष घडती ॥ श्वेतपुष्पें निर्दोष ॥ ५६ ॥ पूजा करितां गणेशासी ॥ वर्ज करा तुह्मी तुळशी ॥ नित्य पूजा दूर्वेसी ॥ दूर्वा वर्ज शक्तीदेवीतें ॥ ५७ ॥ येणें विधी पुष्प वाहतां ॥ काम्य होईल तुह्मां त्वरितां ॥ चतुर्विध पुरुषार्था ॥ लाधाल तुह्मी अवधारा

॥ ५८ ॥ यत्पुरुषेति मंत्रेसीं ॥ सुगंध धूपादि परिमळेसी ॥ ब्राह्मणोस्येति मंत्रासीं ॥ एका-
तिक्य करावें ॥ ५९ ॥ चंद्रमामेति मंत्रेसी ॥ नैवेद्य अर्पावा देवासी ॥ तांबूल अर्पितां
ह्मणा मंत्रासी ॥नाभ्या आसिदिति ह्मणावें ॥ ६० ॥ सुवर्णपुष्पें निरांजन ॥ सप्तास्येति मंत्रें-
करून ॥ पुष्पांजळी घेऊन ॥ यज्ञेनयज्ञेति मंत्रें अर्पावीं ॥ ६१ ॥ धातापुरस्तात् मंत्रेसी ॥
नमस्कार करावा देवासी ॥ अतिसान्निध पृष्ठ देशीं ॥ गर्भगृहीं करूं नये ॥ ६२ ॥ नमस्का-
राचें विधान ॥ सांगेन ऐका विद्वज्जन ॥ सव्य देवप्रदक्षिण ॥ करूनि नमन करावें ॥६३॥
आपला गुरु मातापिता ॥ सन्मुख जावें बाहेरुनि येतां ॥ अथवा उत्तम द्विज देखतां ॥
सन्मुख जावोनि वंदावें ॥ ६४ ॥ सभा असेल द्विजांची ॥ नमस्कार करा तुह्मी एकच्चि ॥
देवार्चनीं तैसेंची ॥ नमस्कार पावे समस्ता ॥ ६५ ॥ माता पिता श्रीगुरूसी ॥ नमस्कारा-
ची रीति ऐसी ॥ उभय हस्तें कर्ण स्पर्शी ॥ एक भावें वंदावें ॥ ६६ ॥ सव्य पादावरी देखा ॥
सव्य हस्त स्पर्शोनि निका ॥ वामहस्तीं वाम पादुका ॥ धरूनि नमन करावें ॥ ६७ ॥ गुरु-
स्थानाचीं नांवें ॥ सांगेन ऐका भावें ॥ विचारोनियां बरवें ॥ नमस्कारावें येणें विधि ॥ ६८ ॥
मातामह गुरु माता पिता ॥ भयहर्ता अन्नदाता ॥ व्रतबंध केल्या पुरोहिता ॥ सहपत्नी ते
गुरुस्थान ॥६९ ॥ ज्येष्ठ भ्राता अथवा चुलता ॥ सापत्न असेल ज्याची माता ॥ वयोधिक
इष्टमित्रा ॥ नमस्कारावें तयांसी ॥ ७० ॥ निषिद्ध स्थानें नमावयासी ॥ सांगेन ऐका तु-
ह्मांसी ॥ उणें असेल वय ज्यासी ॥ नमूं नये विद्वज्जनीं ॥७१॥ अग्निसमिधा पुष्पें कुशा ॥
धरिलें असेल अक्षता तशा ॥ स्वहस्तीं असतां दोषा ॥ अशस्त्रवध होईजे नमस्कारितां
॥ ७२ ॥ जप अथवा होम करितां ॥ दूर देखिला द्विज येतां ॥ स्नानाकरितां जळीं अस-

तां ॥ नमन करितां दोष घडे ॥ ७३ ॥ एकादा विप्र असतां धांवत ॥ नेणता अथवा धनगर्वित ॥ क्रोधवंत किंवा मंगळस्नान करित ॥ नमस्कार करूं नये ॥ ७४ ॥ एक हस्तें ब्राह्मणासीं ॥ नमूं नये परियेसीं ॥ सूतकिया मूर्ख जनासी ॥ करूं नये नमस्कार ॥ ७५ ॥ गीतवाद्यादि नृत्येसी ॥ संतुष्ट करावें देवासी ॥ प्रार्थना करावी भक्तीसीं ॥ मग अर्चावें सनकादिकां ॥ ७६ ॥ पूजा अर्पूनि देवांसी ॥ हस्त ठेवूनि पीठेसीं ॥ उत्तर पूजा करावी हर्षी ॥ मग करावें उद्वासन ॥ ७७ ॥ ऐसेपरी देवपूजा ॥ करावी भक्तीनें ऐक द्विजा ॥ संस्कृत अन्न व्हावया काजा ॥ वैश्वदेव करावा ॥ ७८ ॥ अग्नि अलंकार करूनी ॥ अन्न अग्निकुंडीं दाखवूनी ॥ घृतसंमिश्र करूनी ॥ पांच भाग करावे ॥ ७९ ॥ एका भागाच्या दहा आहुती ॥ दुसरा भाग बळिहरणीं योजिती ॥ अन्नदान तिसरा करिती ॥ चौथ्या भागें पितृयज्ञ ॥८०॥ मनुष्ययज्ञ पांचव्यासी ॥ वैश्वदेव करावा मंत्रेसी ॥ अन्न नाहीं ज्या दिवशीं ॥ तंदुलांनीं करावा ॥ ८१ ॥ वैश्वदेवसमयासी ॥ अतिथी आलिया घरासी ॥ चोर चांडाल होय हर्षी ॥ पूजा करावी मनोभावें ॥ ८२ ॥ यम सांगे दूतांसी ॥ वैश्वदेव करितां नरासी ॥ जाऊं नका तयापासीं ॥ विष्णु आज्ञा आह्मां असे ॥ ८३ ॥ माता पिता घातकियासी ॥ शुनि श्वपच चांडाळासीं ॥ अतिथि आलिया समयासी ॥ अन्न द्यावें परियेसीं ॥ ८४ ॥ न विचारावें गोत्रकुळ ॥ अन्न घालावें तात्काळ ॥ विमुख झालिया पितृकुळ ॥ वर्ष न येती घरासी ॥ ८५ ॥ प्रवासी असेल आपण जरी ॥ औषधी घृत दधि क्षीरी ॥ कंदमूळें फळें तरी ॥ देवयज्ञ करावा ॥ ८६ ॥ अन्नदानाविणें ग्रहण ॥ अन्न करूं नये साधुजनें ॥ पंचमहायज्ञ न करी ब्राह्मण ॥ चांद्रायण आचरावें ॥८७॥ न होतां वैश्व-

देव आपुल्या घरीं ॥ भिक्षेसि आला नर जरी ॥ भिक्षा घालितां पाप दुरी ॥ वैश्वदेव फल असे ॥ ८८ ॥ बळिहरण घालोनि काढी आपण ॥ त्याणें आचरावें चांद्रायण ॥ आपण काढितां दोष जाण ॥ आणिकाकरवीं काढवावें ॥ ८९ ॥ बळिहरण न काढितां जेवी जरी ॥ सहा प्राणायाम त्वरित करी ॥ तेणें होय पाप दुरी ॥ श्रीगुरु ह्मणती ब्राह्मणांसी ॥ ९० ॥ गृहपूजा करोनि देखा ॥ गोग्रास द्यावा विशेखा ॥ नित्य श्राद्ध करणें ऐका ॥ करूनि अन्न समर्पावें ॥ ९१ ॥ स्वधाकार पिंडदान ॥ करूं नये अग्नौकरण ॥ ब्रह्मचारी-यासी तांबूलदान ॥ दक्षिणा वर्ज परियेसा ॥ ९२ ॥ वैश्वदेव झालियावरी ॥ उभा राहोनि आपुल्या द्वारीं ॥ अतिथिमार्ग पहावा निर्धारीं ॥ आलिया पूजन करावें ॥ ९३ ॥ श्रमोनि आलिया अतिथीसी ॥ पूजा करावी भक्तीसी ॥ अथवा अस्तमान समयासी ॥ आलि-या पूजन करावें ॥ ९४ ॥ वर्णानां ब्राह्मणो गुरु ॥ ऐसें बोलती वेदशास्त्र ॥ अतिथि जाणा परम गुरु ॥ वैश्वदेवसमयासी ॥ ९५ ॥ वैश्वदेवसमयीं अतिथीसी ॥ पूजा करितां परियेसी ॥ ती पावे देवासी ॥ तुष्ट ब्रह्मा इंद्र वन्ही ॥ ९६ ॥ वायुगण अर्यमादि देव ॥ तृप्ति पावे सदाशिव ॥ पूजा करावी एकभावें ॥ सर्व देवता संतुष्ट ॥ ९७ ॥ अतिथि पाद प्रक्षालिती ॥ पितर सकळ तृप्त होती ॥ अन्नदानें होय तृप्ती ॥ विष्णु महेश्वर अवधारा ॥ ९८ ॥ यती-श्वरादि ब्रह्मचारी ॥ जे समयीं येती आपुल्या घरीं ॥ अन्न द्यावें निर्धारीं ॥ महापुण्य असे देखा ॥ ९९ ॥ ग्रास मात्र दिधला एक ॥ मेरूसमान पुण्य अधिक ॥ बरवें द्यावें त्यासी उदक ॥ समुद्रासमान दान असे ॥ १०० ॥ अतिथि आलिया घरासी ॥ जेवी आपण त्यजूनि त्यासी ॥ श्वानयोनी पावे हर्षीं ॥ गर्दभयोनी पुढें उपजे ॥ १ ॥ ऐसें

अतिथि पूजोन ॥ मग करावें भोजन आपण ॥ सर्वथा न करावें अन्न भिन्न ॥ प्रपंच कारि-
तां दोष असे ॥ २ ॥ सायंप्रातर्गृहस्थांसीं ॥ भोजन करणें संतोषी ॥ प्रक्षालन करोनि पा-
दांसी ॥ ओले पायीं असावें ॥ ३ ॥ ओलीं असावीं पांच स्थानें ॥ हस्त पाद उभय जाण ॥
मुख ओलें पंचम स्थान ॥ शतायुषी पुरुष होय ॥ ४ ॥ पूर्वाभिमुख बैसोन ॥ भोजनसमयीं
धरा मौन ॥ पाद उभे जोडोन ॥ बैसावें ऐका एकचित्तें ॥ ५ ॥ मंडल करावें चतुष्कोनी ॥
वरी भस्म प्रोक्षोनी ॥ क्षत्रियासीं मंडल त्रिकोनी ॥ वर्तुळ वैश्यासी परियेसी ॥ ६ ॥ शूद्रें
अर्ध चंद्राकार॥ मंडल करावें परिकर ॥ आवाहनावें सुंदर॥ आदित्य वसु रुद्र ब्रह्मा॥७॥
पितामहादि देवता॥ तया मंडलीं उपजविता ॥ याचिकारणें तत्वता॥ मंडलाविण जेवूं नये
॥ ८ ॥ न करितां मंडल जेवी जरी ॥ अन्न नेती निशाचरी ॥ पिशाच असुर राक्षसपरी॥
अन्नरस नेती अवधारा ॥९॥ उत्तम पूर्वाभिमुखीं देख ॥ पश्चिम मध्यम ऐक ॥ पितृकार्यां
उत्तरमुख ॥ सदा दक्षिणाभिमुख जेवावें ॥ १० ॥ जेवितां धरावें पात्र ॥ सुवर्ण रजत ताम्र
पात्रें ॥ पद्मपत्र पालाशपात्रें ॥ पुण्य पात्रें परियेसा ॥ ११ ॥ वर्जावें गृहस्थांनीं ताम्रपात्र ॥
यतींनीं सुवर्ण रजत ॥ ताम्रयुक्तीं शंखज पात्र ॥ स्फटिक पाषाण यतीसी ॥ १२ ॥ कर्द-
लीगर्भ पत्रेसी ॥ पद्मपत्र जळें स्पर्शी ॥ वर्जी पालाशपत्रेंसीं ॥ जेवितां चांद्रायण आच-
रावें ॥ १३ ॥ वट अश्वत्थ अर्क पटोल ॥ कदंब कोविदारपर्णें कोमळ ॥ भोजन करितां
तात्काळ ॥ चांद्रायण आचरावें ॥ १४ ॥ लोहपात्र आपुलें करी ॥ ताम्र मृण्मय पर्णपृष्ठा-
वरी॥ कार्पास पत्रीं वस्त्रावरी॥ जेवितां नरकाप्रती जाय॥१५॥ कांस्यपात्रीं जेविल्यासी॥
यश बळ प्रज्ञा आयुष्यासी॥ वाढे नित्य अधिकेसी॥ गृहस्थासी नित्य कांस्यपात्र

॥ १६ ॥ असावें पात्र पांच शेर ॥ नसावें उणें अधिक थोर ॥ उत्तमोत्तम षट्शेर ॥ सुवर्ण पात्रासमान देखा ॥ १७ ॥ कांस्यपात्रींचें भोजन ॥ तांबूलासहित अभ्यंगन ॥ यती ब्रह्मचारी जाण ॥ विधवा स्त्रियांनीं वर्जावें ॥ १८ ॥ श्वानाच्या चर्माहूनी ॥ निषेध असे एरंडपानीं ॥ निषेध अधिक त्याहुनी ॥ आणीक जेविल्या भिन्नताटीं ॥ १९ ॥ फुटकें कांस्यपात्रेंसीं ॥ जेवितां होय महादोषी ॥ संध्याकाळीं जेवितां हर्षी ॥ महापातकी होय जाणा ॥२०॥ जवळी असतां पतित जरी॥ जेवूं नये अवधारी॥ शूद्र जेविल्या शेषावरी॥ जेऊं नये ब्राह्मणानें ॥ २१ ॥ सर्वें घेऊनी बाळासीं ॥ जेवूं नये श्राद्धदिवशीं ॥ आसन आपुले आपणासी ॥ घालूं नये ब्राह्मणानें ॥ २२ ॥ आपोशन आपुले हातीं ॥ घेऊं नये मंदमती ॥ तैल घालूनी स्वहस्तीं ॥ आपण अभ्यंग करूं नये ॥ २३ ॥ भोजनकाळीं मंडळ देखा ॥ करूं नये स्वहस्तका ॥ आयुष्यक्षय पुत्रघातका ॥ ह्मणावें नाम तयासी ॥ २४ ॥ नमस्कारावें वाढितां अन्न ॥ अभिघारावें पहिलेंचि जाण ॥ प्राणाहुती घेतां तत्क्षण ॥ घृत घालावें स्वहस्तानें ॥ २५ ॥ उदक घेऊनी व्याहृती मंत्र ॥ प्रोक्षोनि अन्न करा पवित्री ॥ परिषिंचावें तेंचि रीतीं ॥ मग नमावें चित्रगुप्ता ॥२६॥ बळी घालोनि चित्रगुप्तासी॥ काढवावें सर्वेंची परियेसी ॥ वामहस्तक धुवोनि सरसी ॥ पात्र दृढ धरावें ॥ २७ ॥ अंगुष्ठ तर्जनीं मध्यमांगुलीसीं ॥ धरावें पात्र वामहस्तेसीं ॥ आपोशन करावें सव्य करेसीं ॥ आणिका करवीं घालावें ॥ २८ ॥ आपोशन उदक सोडोनि जरी ॥ आणिक घेती उदक तरी ॥ श्वानमूत्र घेतल्यापरी ॥ एकचित्तें परियेसा ॥२९॥ धरिलें आपोशन ब्राह्मणासी ॥ नमस्कारितां महादोषी ॥ आशीर्वाद घेऊं नये तयापासी ॥ उभयतां दोष घडती देखा

॥ ३० ॥ मौनें असावें ब्राह्मणें देख ॥ बोलूं नये शब्दादिक ॥ आपोशन घ्यावें मंत्रपूर्वक ॥ मग घ्याव्या प्राणाहुती ॥ ३१ ॥ आपोशनाविण भोजन करी ॥ पापविमोचन करा तरी ॥ अष्टोत्तरशत मंत्र गायत्री ॥ जपतां दोष परिहरे ॥ ३२ ॥ प्राणाहुतींचें विधान ॥ सांगेन ऐकिजे ब्राह्मणें ॥ प्राणाग्निहोत्र करणें ॥ समस्त पापें जाती देखा ॥ ३३ ॥ जैसा कार्पासराशीसी ॥ अग्नि लागतां परियेसी ॥ जळोनि जाय त्वरितेंसी ॥ तैसीं पापें दहन होतीं ॥ ३४ ॥ प्राणाहुतीचें लक्षण ॥ चतुर्विध पुरुषार्थ जाण ॥ अन्न स्पर्शोन मंत्र ह्मणा ॥ गीता श्लोक प्रख्यात ॥ ३५ ॥ श्लोक ॥ अहं वैश्वानरो भूत्वा प्राणिनां देहमाश्रिता ॥ प्राणापानसमायुक्तः पचाम्यन्नं चतुर्विधं ॥ ३६ ॥ अन्नं ब्रह्मरसो विष्णु ॥ भोक्ता देव गिरिजारमणु ॥ ऐसा तुह्मी मंत्र म्हणोन ॥ अग्निरस्मि मंत्र जपावा ॥ ३७ ॥ मग घ्याव्या प्राणाहुती ॥ आहुती पंच मंत्र प्रख्याती ॥ तर्जनी मध्यम अंगुष्ठधृती ॥ प्राणाहुती पै घ्याव्या ॥ ३८ ॥ मध्यम अनामिका अंगुष्ठेसी ॥ आपानायस्वाहा ह्मणा हर्षी ॥ व्यानायस्वाहा ह्मणायासी ॥ कनिष्ठिका अनामिका अंगुष्ठेसी ॥ ३९ ॥ अंगुष्ठ तर्जनी कनिष्ठिकेसी ॥ उदानायस्वाहा ह्मणा हर्षी ॥ पंचांगुलीनें परियेसी ॥ समानायस्वाहा ह्मणावें ॥ ४० ॥ प्राणाहुती घेतां अन्न ॥ दंतांसी स्पर्शों नये जाण ॥ जिव्हें गिळावें तत्क्षण ॥ मग धरावें मौन देखा ॥ ४१ ॥ मौन धरावयाचीं स्थानें ॥ सांगेन ऐका अति उत्तमें ॥ स्नानसमयीं धरा निर्गुणें ॥ न धरितां फल असेना ॥ ४२ ॥ होम करितां न धरी मौन ॥ लक्ष्मी जाय तत्क्षण ॥ जेवितां मौन न धरितां आपण ॥ अपमृत्यु घडे त्यासी ॥ ४३ ॥ अशक्य असेल मौनासी जरी ॥ प्राणाहुती घेई तववरी ॥ मौन धरावें अवधारी ॥ श्रीगुरु ह्मणती ब्राह्मणांसी ॥ ४४ ॥ पिता

जिवंत असे त्यासी ॥ ज्येष्ठ बंधु परियेसी ॥ धरूं नये मौनासी ॥ श्राद्धान्न जेवितां धरावें ॥ ४५ ॥ पंच प्राणाहुती घेतां ॥ सर्वांसी मौन आह्मता ॥ असेल पिता वडील भ्राता ॥ मौन धरिल्या अधःपात ॥ ४६ ॥ जेवितां प्रथम मधुरान्न ॥ भोजन करावें नरें जाण ॥ भक्षूं नये कोद्रवान्न ॥ कठिणांश परियेसा ॥ ४७ ॥ भोजनांतीं समयासी ॥ जेऊं नये द्रवान्नासी ॥ बळ जाय परियेसीं ॥ शीघ्र भोजन करावें ॥ ४८ ॥ धेनूसी उदक प्याव्यासी ॥ जितका वेळ लागेल त्यासी ॥ भोजन करावें परियेसीं ॥ शीघ्र भोजन सुखी जाणा ॥ ४९ ॥ भोजन करावयाची स्थिति ॥ सांगेन ऐका एक मतीं ॥ संन्यासी मुनीश्वर यती ॥ अष्ट ग्रास द्यावे जाणा ॥५०॥ षोडश ग्रास अरण्यवासी ॥ द्वात्रिंशत् गृहस्थासी ॥ मिति नाहीं ब्रह्मचाऱ्यांसी ॥ एकचित्तें परियेसा ॥ ५१ ॥ जितुका मावेल आपुल्या मुखीं ॥ तितुका ग्रास घ्यावा विशेखीं ॥ अधिक घेतां ग्रास मुखीं ॥ उच्छिष्ट भक्षिलें फल देखा ॥ ५२ ॥ अर्धा ग्रास भक्षूनी ॥ उरलें ठेविती आपुल्या पानीं ॥ चांद्रायण आचरावें त्यांनीं ॥ उच्छिष्ट भोजन तया नांव ॥ ॥ ५३ ॥ न बैसावें सहभोजनासी ॥ इष्ट सोयरे इत्यादिकांसी ॥ व्रतबंधाविणें पुत्रासी ॥ कन्या कुमारासी दोष नाहीं ॥ ५४ ॥ भोजन संपेपर्यंत ॥ पात्र धरावें वामहस्तें ॥ जरी सोडील अजाणत ॥ अन्न वर्जोनी उठावें ॥ ५५ ॥ याकारणें द्विजजनें ॥ सोडूं नये पात्र जाण ॥ अथवा न धरावें पूर्वींच आपण ॥ दोष नाहीं परियेसा ॥ ५६ ॥ सांडूं नये अन्न देखा ॥ घृत पायस विशेष ऐका ॥ सांडावे थोडे ग्रास एका ॥ जेवूं नये सर्व अन्न ॥ ५७ ॥ वस्त्र गुंडाळोनी डोईसी ॥ अथवा संमुख दक्षिणेसी ॥ वामपादावर ठेवि हस्तेसी ॥ जेवितां अन्न राक्षस नेती ॥ ५८ ॥ वामहस्त भूमी-

वरी ॥ ठेवूनि नर भोजन करी ॥ रोग होय शरीरीं ॥ अंगुली सोडोनी जेवूं नये ॥ ५९ ॥
अंगुली सोडून जेवी जरी ॥ दोष गोमांस भक्षिल्यापरी ॥ दोष असती नानापरी ॥
स्थानें असती भोजनासी ॥ ६० ॥ अश्व गजारूढ होऊनी ॥ अथवा बैसोनी स्मशानीं ॥
देवालयीं शयनस्थानीं ॥ जेवूं नये परियेसा ॥ ६१ ॥ निषिद्ध जेवण करपात्रेसी ॥ ओलें
नेसोनी आर्द्रकेशीं ॥ बहिर्हस्त बहिःकेशी ॥ जेवितां दोष परियेसीं ॥ ६२ ॥ यज्ञोपवी-
ताच्या उपवीतीसीं ॥ भोजन करावें परियेसीं ॥ जेवितां आपुल्या संमुखेसीं ॥ पादरक्षा
असूं नये ॥ ६३ ॥ ग्रास उदक कंद मूळ ॥ इक्षुदंडादि केवळ ॥ भक्षोनि पात्रीं ठेवितां
सकळ ॥ उच्छिष्ट होय अवधारा ॥ ६४ ॥ भोजन करी वैश्वदेवाविण ॥ न करितां होम
जेवी कवण ॥ अन्न नव्हे कृमि जाण ॥ ह्मणे पराशरऋषी ॥ ६५ ॥ पर्णपृष्ठावरी रात्रीसी ॥
दीपाविण जेविल्यासी ॥ महादोष असे तयासी ॥ कृमि भक्षिल्यासमान होय ॥ ६६ ॥
दीप जाय भोजन करितां ॥ पात्र धरावें स्मरोनि सविता ॥ पुनरपि आणोनि लावितां ॥
मग भोजन करावें ॥६७॥ पात्रीं असेल जितुकें अन्न ॥ तितुकेंचि जेवा परिपूर्ण ॥ आणीक
घेतां दोष जाण ॥ श्रीगुरु ह्मणती ब्राह्मणांसी ॥ ६८ ॥ स्पर्शों नये जेवितां केश ॥ कथा
सांगतां महादोष ॥ दिसूं नये व्योम आकाश ॥ अंधःकारीं जेवूं नये ॥ ६९ ॥ न ठेवितां
शेष स्त्रियेसी ॥ जेवितां होय अत्यंत दोषी ॥ ठेविलें न जेवितां स्त्रिया दोषी ॥ महा-
पातकें घडती जाणा ॥ ७० ॥ शून्य देव देवालयीं ॥ देवस्थान आपुले गृहीं ॥ जळ
समीप संध्यासमयीं ॥ जेवूं नये परियेसा ॥७१॥ पात्रें ठेवूनि दगडावरी ॥ जेवूं नये अव-
धारीं ॥ अवलोकूं नये मुखावरी ॥ स्त्रीजनाचे परियेसीं ॥ ७२ ॥ न करावें सहभोजन ॥

जेवितां होय उच्छिष्ट भक्षण ॥ कुलस्त्रियेसीं करितां भोजन ॥ निर्दोष असे परियेसा ॥ ७३ ॥ प्राशन शेष उदकासी ॥ घेऊं नये उच्छिष्टासी ॥ अगत्य घडे संधीसी ॥ किंचित् सांडूनी घेईजे ॥ ७४ ॥ वस्त्रोदक घेतल्यासी ॥ अपार दोष घडती तयासी ॥ जन्म पावे श्वानयोनीसी ॥ पडे मागुती नरकांत ॥ ७५ ॥ शब्द होय उदक पितां ॥ अथवा क्षीरघृत सेवितां ॥ आपोशनोदक प्राशितां ॥ सुरापान समान असे ॥ ७६ ॥ महाजळीं रिघोन ॥ उदक घेती मुखानें ॥ अथवा पीती उभ्यानें ॥ सुरापान समान जाणा ॥ ७७ ॥ द्वय हस्तांजुली करूनी ॥ घेऊं नये उदक ज्ञानीं ॥ घ्यावें एक हस्तेंकरूनी ॥ वामहस्त लावूं नये ॥ ७८ ॥ सभे बैसोनि एकासनीं ॥ अथवा आपले हांतुरणीं ॥ प्राशन करूं नये पाणी ॥ महादोष असे परियेसा ॥ ७९ ॥ वाढों नये भिन्न पात्रेसीं ॥ पाहूं नये आणीक यातीसी ॥ रजस्वला स्त्रियांसी ॥ चांडाळ श्वान पाहूं नये ॥ ८० ॥ दृष्टी पाहे इतुकियांसी ॥ जरी ध्वनी ऐकिजे कर्णांसीं ॥ त्यजावें अन्न त्वरितेसीं ॥ जेवितां दोष परियेसा ॥ ८१ ॥ कलहशब्द कांडण दळण ॥ ऐकतां जेवूं नये अन्न ॥ अपशब्द स्पृष्टास्पृष्ट जाण ॥ त्यजावें अन्न परियेसा ॥८२॥ नेणते लोक पंक्तीसीं ॥ घेऊं नये परियेसीं ॥ अगत्य घडे संधीसीं ॥ उदक भस्में करीं पृथक ॥ ८३ ॥ अथवा स्तंभ असेल मध्य ॥ द्वारमार्ग असेल शुद्ध ॥ उदक न घालितां मध्यें ॥ दोष नाहीं परियेसा ॥ ८४ ॥ कृष्णवस्त्र नेसोनि आपण ॥ जेवितां दोष अपार जाण ॥ स्त्रीजन वाढिती कांसेवीण ॥ उच्छिष्ट अन्न परियेसा ॥ ८५ ॥ ऐसा विचार करूनी भोजनीं ॥ करावें भोजन द्विजजनीं ॥ विकिरिदविलोहित ह्मणोनी ॥ अभिमंत्रावें शेष अन्न ॥ ८६ ॥ विकिरिदेति मंत्रासी ॥ ह्मणावा अघोर ऋषी ॥

रुद्र देवता परियेसीं ॥ अन्नाभिमंत्रणे विनियोगः ॥ ८७ ॥ ऐसा मंत्र जपोन ॥ हातीं द्यावें शेषान्न ॥ यमाच्या नांवें बळी घालोन ॥ उत्तरापोशन मग द्यावें ॥ ८८ ॥ उच्छिष्ट सर्व पात्रींचें ॥ घेऊनि हातीं ह्मणा वाचे ॥ रौरव मंत्र असे त्याचे ॥ पात्राजवळी ठेवावें ॥ ८९ ॥ उठोनि जावें प्रक्षालनासी ॥ गंडूष करोनि स्वहस्तेसी ॥ न करितां गंडूष प्रक्षाळी हस्तासी ॥ आत्मघातकी तया नांव ॥ ९० ॥ मुख प्रक्षालितां परियेसी ॥ मध्यमांगुलीं दांत घासी ॥ तर्जनी अंगुष्ठें महादोषी ॥ रौरव नरक परियेसा ॥ ९१ ॥ बरवें हस्त प्रक्षालोन ॥ करावें दंतशोधन ॥ हातींचें पवित्र सोडून ॥ टाकावें दंतकाष्ठपै ॥ ९२ ॥ अंगुष्ठमात्रपुरुषा ॥ ह्मणावा मंत्र परियेसा ॥ हस्त घांसोनि चक्षुषा ॥ उदक लावावें अवधारा ॥ ९३ ॥ ऐसा जरी न ह्मणे मंत्र ॥ चक्षुरोगी होय निश्चित ॥ याकारणें होऊनि स्थित ॥ हस्तोदकें आरोग्यता ॥ ९४ ॥ द्विराचमनें करोनी ॥ आयंगौ मंत्र ह्मणोनी ॥ द्रुपदादिवेन्मुमुचा ह्मणोनी ॥ पादप्रक्षालन करावें ॥ ९५ ॥ ऐसा तुह्मी मंत्र जपतां ॥ भोजनठायीं जाऊनि बैसतां ॥ द्विराचमन करूनि निरुता ॥ नाभिस्पर्श मग करावा ॥ ९६ ॥ स्मरावें मग अगस्त्यासी ॥ कुंभकर्ण वडवाग्नीसी ॥ वृकोदर शनी त्यासी ॥ इल्वल वातापि जीर्य ह्मणावें ॥ ९७ ॥ हस्त दाखवावे अग्नीसी ॥ आणिक सांगेन परियेसीं ॥ बंधुवर्ग असती जयासी ॥ पुसूं नये वस्त्रें कर ॥ ९८ ॥ मग स्मरावें श्रीगुरूसीं ॥ आणीक स्मरावें कुलदेवतेसी ॥ येणेंपरी विधीसीं ॥ भोजन करावें द्विजोत्तमें ॥ ९९ ॥ विप्र विनवी श्रीगुरूसीं ॥ भोजनप्रकार सांगितला आह्मांसी ॥ विधिनिषिद्ध अन्नें कैसीं ॥ निरोपावें दातारा ॥ २०० ॥ विप्रवचन ऐकोनी ॥ निरोपिती श्रीगुरु संतोषोनी ॥ ऐक ब्राह्मणा ह्मणोनी ॥ अतिप्रेमें निरोपिती ॥ १ ॥

ह्मणे सरस्वती गंगाधर ॥ ब्राह्मणाचा आचार ॥ निरोपिला गुरुनाथें समग्र ॥ ह्मणोनी विनवी संतोषें ॥२॥ वैश्वदेवाविणें अन्न ॥ अथवा गणान्न परिपूर्ण ॥ घातलें असेल बहु लवण ॥ बहु मिश्रितान्न जेवूं नये ॥ ३ ॥ लशुन गाजर कंद मुळा ॥ वृंताक श्वेत भोपळा ॥ छत्राकार शाखा सकळा ॥ वर्जाव्या तुह्मी परियेसा ॥ ४ ॥ धेनु अजा महिषी क्षीर ॥ प्रसूतीचें वर्जावें दशरात्र ॥ नूतनोदक पर्जन्यपूर ॥ त्रिरात्रींचें वर्जावें ॥ ५ ॥ कुष्मांड डोरलीं पडवळेसीं ॥ मुळा तेल आंवळेसीं ॥ न भक्षावें प्रतिपदेसीं ॥ भक्षितां पाप परियेसा ॥ ६ ॥ स्वर्गापवर्ग चाड ज्यासी ॥ अष्टमी वर्जावी औदुंबरासी ॥ आमलकफळ रात्रीसी ॥ वर्जावें भानुवारीं ॥ ७ ॥ बेलफळ वर्ज शुक्रवारीं ॥ शमीफळ मंदवारीं ॥ भक्षितां लक्ष्मी जाईल दुरी ॥ वर्जावें ते दिवशीं परियेसा ॥ ८ ॥ धात्रीफळ रात्रीसी ॥ भक्षितां हानी प्रज्ञेसीं ॥ नाश करी वीर्यासीं ॥ धात्रीफळ वर्जावें ॥ ९ ॥ नख केश पडलिया अन्ना ॥ स्पर्श केलिया मार्जार जाणा ॥ वायस घारी कुक्कुट जाणा ॥ स्पर्श केलिया अन्न त्यजावें ॥ १० ॥ धेनू मूषक मुखस्पर्शें ॥ अथवा स्पर्शें अधःकेश ॥ त्यजावें अन्न भरंवसें ॥ असेल उच्छिष्ट अन्नाजवळी ॥ ११ ॥ एकहातीं वाढिलें अन्ना ॥ शिळें असेल शीत जाणा ॥ वर्जावें तुह्मीं ब्राह्मणा ॥ निषिद्ध बोलिजे आचारी ॥ १२ ॥ घृत तैल मिश्रित ॥ शिळें अन्न अपवित्र ॥ तळिलें असेल सर्वत्र ॥ शिळें नव्हे सर्वथा ॥ १३ ॥ विप्र विकिती गोरस ॥ घृत क्षीर परियेस ॥ घेतां घडती महादोष ॥ साक्षात वन्हिपाक जेवूं नये ॥ १४ ॥ माषान्नाचे वटक देखा ॥ शिळे न होती कधीं ऐका ॥ जैसें लाह्या पीठ देखा ॥ शिळें नव्हे परियेसा ॥ १५ ॥ कंदमूळादि मसुरान्न ॥ जवांचें असेल परमान्न ॥ गुडयुक्त अलवण ॥

शिळें नव्हे परियेसा ॥१६॥ ऐशा शिळया अन्नासीं ॥ दोष नाहीं परियेसीं ॥ विटाळ होतां महादोषी ॥ श्रीगुरु ह्मणती ब्राह्मणातें ॥ १७ ॥ भोजन केलियानंतर ॥ तांबूल द्यावें परिकर ॥ क्रमुक चूर्ण सत्वर ॥ द्यावें द्यावें ब्राह्मणांसीं ॥ १८ ॥ तिलमिश्रित भक्ष्यासीं ॥ जेवूं नये रात्रीसीं ॥ जेविलां होय महादोषी ॥ श्रीगुरु ह्मणती ब्राह्मणातें ॥ १९ ॥ क्रमुक एक सुखारोग्य ॥ द्वय देतां निश्चल आरोग्य ॥ त्रीणि द्यावीं महाभाग्य ॥ चतुर्थें दुःख होय जाणा ॥२०॥ पांच क्रमुक देतां जरी ॥ आयुष्य प्रज्ञा वाढे भारी ॥ देऊं नये सहा सुपारी ॥ मरण सांगे परियेसा ॥ २१ ॥ पर्ण मूळ न काढि जरी ॥ व्याधी संभवे अवधारी ॥ अग्र भक्षितां पाप भारी ॥ पर्णचूर्णें आयुष्य क्षीण ॥२२॥ पर्णपृष्ठीं बुद्धि नाश ॥ द्विपर्ण खातां महादोष ॥ ऐश्वर्याचा होय विनाश ॥ ऋषिसंमत असे जाण ॥ २३ ॥ पर्णाविणें क्रमुक मुखीं ॥ घालितां आपण होय असुखी ॥ सप्तजन्म दरिद्री दुःखी ॥ अज्ञानी होय अंतकाळीं ॥२४॥ यतीश्वरादि ब्रह्मचारी ॥ रजस्वला स्त्री विधवा जरी ॥ तांबूल भक्षितां मांसापरी ॥ रस त्याचा सुरापानसम ॥ २५ ॥ तांबूल भक्षिल्यानंतरें ॥ सायंसंध्या करावी विप्रें ॥ सूर्य अर्धमंडळ उरे ॥ अर्घ्यें द्यावीं परियेसा ॥२६॥ बैसोनि द्यावीं अर्घ्यें तिन्ही ॥ चारी द्यावीं काळ क्रमूनी ॥ गायत्रीमंत्र जपूनी ॥ इमंमेवरुण ह्मणावा ॥ २७ ॥ गोत्र प्रवर उच्चारोन ॥ मग करावें औपासन ॥ करावें निशीं भोजन ॥ क्षीरमिश्रित मुख्य असे ॥ २८ ॥ रात्रीं करितां परिषिंचना ॥ ऋतंत्वासत्यं मंत्र ह्मणा ॥ येणेंविधी करा भोजना ॥ पूर्वीं जैसें बोलिलें असे ॥ २९ ॥ भोजन झालियानंतर ॥ वेदाभ्यास एक प्रहर ॥ मग जावें शयनघरा ॥ येणेंविधी आचरावें ॥ ३० ॥ शयन करावयाचें विधान ॥ सांगेन ऐका विद्व-

ज्जन ॥ पराशर सांगे वचन ॥ तेंच विधान सांगतसें ॥ ३१ ॥ खट्वा असावी निर्मळ जाण ॥ वर्जावी त्रिपाद भिन्नदूषण ॥ औदुंबर अश्वत्थ पिंपरीची निर्गुण ॥ न करावी खाट परियेसा ॥३२॥ निषिद्ध जांबुळ काष्ठाची ॥ वर्जावी प्रेत गजदंताची ॥ भिन्नकाष्ठ त्यजावी साची ॥ बरवी असावी खाट देखा ॥ ३३ ॥ सुमुहूर्तें विणावी खाट देखा ॥ धनिष्ठा भरणी मृगशीरा दूषका ॥ वार सांगेन विशेखा ॥ शुभाशुभ फळ असे ॥ ३४ ॥ आदित्यवारीं लाभ देखा ॥ चंद्रवारीं महासुखा ॥ भौमवारीं पाविजे दुःखा ॥ बुधवारीं सांगे महापीडा ॥ ३५ ॥ गुरुवारीं विणल्यासी ॥ सहा पुत्र होती त्यासी ॥ शुक्रवारीं अति विशेषीं ॥ मृत्यु पावे मंदवारीं ॥ ३६ ॥ स्वगृहीं शयन पूर्व शिरेसी ॥ श्वशुरालयीं दक्षिणेसी ॥ प्रवासकाळीं पश्चिमेसी ॥ शयन करावें परियेसी ॥ ३७ ॥ सदा निषिद्ध उत्तर दिशा ॥ वरचीं फळें सांगेन परियेसा ॥ विप्रें आचरावा ऐसा ॥ ऋषिमार्ग शुभाचार ॥३८॥ पूर्ण कुंभ ठेवूनी उशीं ॥ मंगळद्रव्य घालावें बहुवशीं ॥ रात्रिसूक्त ह्मणावें परियेसीं ॥ विष्णुस्मरण करावें ॥ ३९ ॥ मग स्मरावा अगस्त्यऋषी ॥ माधव मुकुंद परियेसीं ॥ आस्तिक कपिल महाऋषी ॥ सर्पस्तुती करावी ॥ ४० ॥ निषिद्ध स्थानें निजावयासी ॥ सांगेन सर्व परियेसीं ॥ जीर्ण देवालयीं स्मशानाशीं ॥ एकवृक्षातळीं वर्जावें ॥ ४१ ॥ चारीविदीं चोहाटेसीं ॥ ईश्वरस्थान परियेसीं ॥ मातापिता निजले स्थळाशीं ॥ निजूं नये परियेसा ॥४२॥ वर्जावें वारुळाजवळी ॥ आणीक तळयाचे पाळीं ॥ नदीतीरीं नसतां वस्ती जवळी ॥ घोरस्थळीं निजूं नये ॥ ४३ ॥ वर्जावें शयन धान्यावरी ॥ निजूं नये मोडके घरीं ॥ वडील खालीं निजतील तरी ॥ खाट वर्जावी त्यापुढें ॥ ४४ ॥ नेसून ओलें अथवा नग्न ॥

निजूं नये शिर वेष्टून ॥ आकाशाखालीं वर्जावें शयन ॥ दीप असतां निजूं नये ॥ ४५ ॥ पूर्वरात्रीं अपरात्रीसीं ॥ निजूं नये परियेसी ॥ असूं नये स्त्रियेपासीं ॥ रजस्वला चतुर्थ-दिनीं ॥ ४६ ॥ असावें जानवें उपवीतीसी ॥ दृष्टी न पडावें योनीसी ॥ आयुष्य क्षीण परियेसीं ॥ दीप वर्जावा याकारणें ॥४७॥ नीळ वस्त्र नेसले स्त्रियेसीं ॥ करितां संग परि-येसीं ॥ पुत्र उपजे चांडाळवेषी ॥ शुभ्र वस्त्र विशेष ॥ ४८ ॥ रजस्वला न होतां स्त्रियेसी ॥ न करावा संग परियेसीं ॥ संग करितां महादोषी ॥ आणीक प्रकार एक असे ॥ ४९ ॥ दश वर्षें होतां कन्येसी ॥ रजस्वला सर्वत्रांसी ॥ ऐका तुह्मी सर्व ऋषी ॥ पराशर सांग-तसे ॥ ५० ॥ ऋतुकाळ असतां स्त्रियेसी ॥ गांवासी जातां परियेसी ॥ भ्रूणहत्या होय दोषी ॥ प्रख्यात असे परियेसा ॥ ५१ ॥ वृद्ध अथवा वांझेसी ॥ मरत असती पुत्र जीसी ॥ बहु कन्या होतीं जियेसीं ॥ चुकतां ऋतु दोष नाहीं ॥ ५२ ॥ ऋतु देतां चतुर्थ दिवसीं ॥ पुत्र उपजे अल्पायुषी ॥ कन्या होय पांचवे दिवशीं ॥ सहावे दिनीं पुत्र परियेसा ॥ ५३ ॥ विषम दिवशीं कन्या जाण ॥ सम दिवसीं पुत्र सगुण ॥ दहा दिवस ऋतुकाळ खुण ॥ चंद्रबळ असावें ॥ ५४ ॥ मूळ मघा रेवतीसी ॥ संग न करावा परियेसीं ॥ कोप नसावा उभयतांसी ॥ संतोषरूपें असावें ॥ ५५ ॥ ऋतुकाळीं स्त्रीपुरुषांसी ॥ जें जें असेल मानसीं ॥ सत्व रज तमो गुणेंसीं ॥ तैसा पिंड उपजे देखा ॥ ५६ ॥ ब्राह्मणाचा आचार ॥ सांगता झाला पराशर ॥ ऐकोनी समस्त ऋषीश्वर ॥ येणेंपरी आचरती ॥५७॥ श्रीगुरु ह्मणती ब्राह्मणासी ॥ ऐसा आचार परियेसीं ॥ जे आचरती विधींसीं ॥ दैन्य कैचें तयांघरीं ॥ ५८ ॥ ते वंद्य होत देवासी ॥ कामधेनु येईल घरासी ॥ लक्ष्मी राहे अखं-

डेसी ॥ पुत्रपौत्रीं नांदती ॥ ५९ ॥ होय आपण शतायुषी ॥ न घडती दोष कांहीं त्यासी ॥ तो न भिई कळिकाळासी ॥ ब्रह्मज्ञानी होय जाण ॥ ६० ॥ काळ मृत्यू चुके देखा ॥ अपमृत्यु घडे कैंचा ऐका ॥ ऐसा आचार आहे निका ॥ नित्य राहणें येणेंपरी ॥ ६१ ॥ ऐसें ऐकोनियां वचना ॥ विप्र लागे श्रीगुरुचरणा ॥ झाला उपदेश उद्धारणा ॥ कृपासागर गुरुमूर्ती ॥ ६२ ॥ भक्तजन तारावयासी ॥ अवतरलासी हृषीकेशी ॥ परिहरिलें अंधकारासी ॥ ज्ञानज्योती प्रकाश केला ॥ ६३ ॥ ऐसें विनवोनि ब्राह्मणें ॥ पुनरपि धरिले श्रीगुरुचरण ॥ श्रीगुरुमूर्ती संतोषोन ॥ प्रसन्न झाले तये वेळीं ॥ ६४ ॥ ह्मणती श्रीगुरु तयासी ॥ आचार सांगितला तुज हर्षीं ॥ न जावें आतां भिक्षेसी ॥ आचार करूनी सुखी असे ॥ ६५ ॥ जे जे इच्छिसी कामना ॥ होईल निरुती सत्य जाण ॥ कन्या पुत्र नांदती सगुणा ॥ संदेह न धरावा मानसीं ॥ ६६ ॥ ऐसा वर लाधोनी ॥ विप्र गेला संतोषोनी ॥ होता तैसा आचरोनी ॥ सकळाभीष्टें लाधला ॥ ६७ ॥ सिद्ध ह्मणे नामधारकासी ॥ श्रीगुरुचरित्र ऐसें परियेसी ॥ ऐकतां ज्ञान समस्तांसी ॥ मूढ होय ब्रह्मज्ञानी ॥ ६८ ॥ अज्ञानतिमिर अंधकारासी ॥ ज्योतिरूप कथा ऐसी सुरसी ॥ जें जें इच्छिलें मानसीं ॥ पाविजे त्वरित अवधारा ॥ ६९ ॥ ह्मणे सरस्वती गंगाधरू ॥ श्रीगुरुचरित्र असे सुरतरू ॥ ऐकतां होय संतोष फारू ॥ सकळाभीष्टें साधती ॥७०॥ इति श्रीगुरुचरित्रामृत ॥ नामधारक शिष्य सांगत ॥ आचार जो का समस्त ॥ निरोपिला श्रीगुरुनाथें ॥ २७१ ॥ इति श्रीगुरुचरित्रपरमकथाकल्पतरौ श्रीनृसिंहसरस्वत्युपाख्याने सिद्धनामधारकसंवादे आन्हिककर्मनिरूपणं नाम सप्तत्रिंशत्तमोऽध्यायः ॥ ओंव्या २७१ ॥

॥ श्रीगणेशाय नमः ॥ नामधारक विनवी सिद्धासी ॥ पुढें कथा वर्तली कैसी ॥ विस्तारावी जी कृपेसी ॥ ह्मणोनि चरणीं लागला ॥ १ ॥ आर्त झालों मी तृषेचा ॥ घोट भरवीं गा अमृताचा ॥ प्रताप वर्णूनी श्रीगुरूचा ॥ माझें मन निववी वेगीं ॥ २ ॥ सिद्ध ह्मणे नामधारकासी ॥ जों जों मज तूं पुससी ॥ संतोष होतो आह्मांसी ॥ श्रीगुरुचरित्र आठवितां ॥ ३ ॥ तुजकरितां आह्मांसीं ॥ लाभ जाहला परियेसी ॥ आठवली कथा सुरसी ॥ विचित्र एक झालें असे ॥ ४ ॥ चरित्र मागें सांगितलें ॥ जें भक्तानें द्रव्य आणिलें ॥ स्वामीनीं तें नाहीं अंगिकारिलें ॥ समाराधना करा ह्मणती ॥ ५ ॥ नित्य समाराधना देख ॥ करीत होते भक्त अनेक ॥ कधीं नव्हे आराधणूक ॥ नाहीं ऐसा दिवस नाहीं ॥ ६ ॥ ऐसें असतां एके दिवशीं ॥ दुर्बळ द्विज आला परियेसी ॥ असे काश्यप गोत्र त्यासी ॥ नाम तयाचें भास्कर ॥ ७ ॥ अति क्षीण तो ब्राह्मण ॥ आला दर्शना म्हणोन ॥ साष्टांग नमस्कार करोन ॥ भक्तिपूर्वक विनविलें ॥ ८ ॥ ते दिवशीं भक्तजन ॥ करीत होते समाराधन ॥ उठविती तया ब्राह्मणा ॥ भोजन करा म्हणोनी ॥ ९ ॥ संकल्प करोनी तो ब्राह्मण ॥ गुरुभिक्षा करीन आपण ॥ सर्वें सोपस्कर घेऊन ॥ आला होता परियेसा ॥ १० ॥ त्रिवर्गांपुरतें देख ॥ होते तंडूल आणि कणीक ॥ वरकड त्या प्रामाणिक ॥ असे सोपस्कार त्यापाशीं ॥ ११ ॥ सर्व असे वस्त्रीं बांधिलें ॥ नेऊनी मठांत ठेविलें ॥ भक्तें आपणासी बोलाविलें ॥ म्हणोनि गेला भोजनासी ॥ १२ ॥ भोजन करितां झाली निशी ॥ आपण आला मठासी ॥ गांठोडी ठेविली आपुल्या उशीं ॥ मग निद्रा करी देखा ॥ १३ ॥ नित्य घडे ऐसें तयासी ॥ भक्त येती समाराधनेसी ॥ आराधणूक न होय त्यासी ॥ नित्य जेवी समारा-

धनीं ॥ १४ ॥ समस्त लोक त्यासी हांसती ॥ पहा समाराधनेची आयती ॥ घेऊनि आला अति भक्तीं ॥ आपण जेवी समाराधनीं ॥ १५ ॥ एकासी न होय पुरतें अन्न ॥ श्रीगुरुशिष्य बहुत जाण ॥ काय करील हा ब्राह्मण ॥ समाराधना करीन ह्मणतो ॥ १६ ॥ लाज न वाटे तया कैसी ॥ समाराधना ह्मणावयासी ॥ देगा सामोग्री आह्मासी ॥ तूं आजि करी माधुकरी ॥ १७ ॥ नानाप्रकारें त्या ब्राह्मणासी ॥ विनोद करिती परियेसी ॥ मासत्रय ऐशिया विधीसीं ॥ क्रमिले तेथें ब्राह्मणें ॥ १८ ॥ नित्य होतसे समाराधन ॥ त्यांचि घरीं जेवी आपण ॥ गांठोडी उशेसी घेऊन ॥ निद्रा करी प्रतिदिवशीं ॥ १९ ॥ मासत्रय क्रमिलियावरी ॥ समस्त मिळोनी द्विजवरीं ॥ परिहास करितां परोपरी ॥ श्रीगुरुमूर्तीनें ऐकिलें ॥ २० ॥ बोलाविती त्या ब्राह्मणासी ॥ आजि भिक्षा करावयासी ॥ स्वयंपाक करी वेगेसी ॥ श्रीगुरु ह्मणती कृपासिंधु ॥ २१ ॥ ऐकोनियां श्रीगुरूच्या बोला ॥ संतोष अपार द्विजासी झाला ॥ चरणावरी माथा ठेविला ॥ हर्षें गेला आइतीसी ॥ २२ ॥ आणिलें द्वय शेर घृता ॥ शाका दोनीं त्या पुरत्या ॥ स्नान करोनी शुचिर्भूता ॥ स्वयंपाक केला तये वेळीं ॥ २३ ॥ समस्त ब्राह्मण तये वेळीं ॥ मिळोन आले श्रीगुरुजवळी ॥ ह्मणती आमुची आजि पाळी ॥ यावनाल अन्न घरीं ॥ २४ ॥ नित्य होतसे समाराधन ॥ आह्मी जेवितों मिष्टान्न ॥ कैचा आला हा ब्राह्मण ॥ आजि समाराधना राहिली ॥२५॥ श्रीगुरु ह्मणती तयांसी ॥ नका जाऊं आपुल्या घरांसी ॥ शीघ्र जावें स्नानासीं ॥ येथेंचि जेवा तुह्मी आज ॥ २६ ॥ ब्राह्मण मनीं विचारिती ॥ मठीं असे सामुग्री आइती ॥ स्वयंपाक आतां करविती ॥ आह्मां निरोपिती याचिगुणें ॥ २७ ॥ समस्त गेले स्नानासी ॥ श्रीगुरु बोलती

ब्राह्मणासी ॥ शीघ्र करींगा होईल निशी ॥ ब्राह्मण अपार सांगितले ॥ २८ ॥ स्वयंपाक झाला तत्क्षण ॥ सांगतसे श्रीगुरूसी ब्राह्मण ॥ श्रीगुरू निरोपिती जाय धांवोन ॥ ब्राह्मण समस्त पाचारीं ॥ २९ ॥ ब्राह्मण गेले गंगेसी ॥ पाचारितसे ब्राह्मण त्यांसी ॥ स्वामी बोलाविती तुह्मांसी ॥ शीघ्र यावें ह्मणोनियां ॥ ३० ॥ ब्राह्मण ह्मणती विप्रासी ॥ स्वयंपाक करावया होय निशी ॥ तुवां शीघ्र श्रीगुरूसी ॥ भिक्षा करींगा जाय वेगीं ॥ ३१ ॥ ऐसें ऐकोनि ब्राह्मण ॥ गेला श्रीगुरूजवळी आपण ॥ ह्मणे न येती ब्राह्मण ॥ रात्रीं आपण जेवूं ह्मणती ॥ ३२ ॥ श्रीगुरु ह्मणती ब्राह्मणासी ॥ नेम असे आह्मांसी ॥ सहपंक्तीनें ब्राह्मणांसीं ॥ जेवूं आह्मी निर्धारीं ॥ ३३ ॥ ब्राह्मणांसहित आह्मांसी ॥ जेवूं वाढींगा परियेसीं ॥ जरी तूं अंगिकार न करिसी ॥ न जेवूं तुझे घरीं आह्मी ॥ ३४ ॥ ब्राह्मण ह्मणे श्रीगुरूसी ॥ जो निरोप द्याल मजसीं ॥ तोचि निरोप माझे शिरसीं ॥ ब्राह्मणांसहित जेवूं घालीन ॥ ३५ ॥ ब्राह्मण मनीं विचारी ॥ श्रीगुरु असती पुरुषावतारी ॥ न कळे बोले कवणेपरी ॥ आपुलें वाक्य सत्य करितील ॥ ३६ ॥ मग काय करी तो ब्राह्मण ॥ विनवीतसे कर जोडून ॥ मज न येती ब्राह्मण ॥ विनोद करिती माझ्या बोला ॥ ३७ ॥ श्रीगुरु आणिक शिष्यासी ॥ निरोपिती जावें वेगेंसीं ॥ बोलावुनि आणावें ब्राह्मणांसी ॥ भोजन करावया ह्मणोनियां ॥ ३८ ॥ शिष्य गेला धांवत ॥ समस्त ब्राह्मणांतें बोलावित ॥ स्नानें करोनि आले त्वरित ॥ श्रीगुरुमठाजवळिक ॥ ३९ ॥ श्रीगुरु निरूपिती तयांसी ॥ पत्रावळी करा वेगेंसी ॥ जेवा आज सहकुटुंबेंसीं ॥ ब्राह्मण करितो समाराधना ॥ ४० ॥ चारी सहस्र पत्रावळी ॥ कराव्या तुह्मीं तात्काळीं ॥ उभा होता ब्राह्मण जवळी ॥ तयासी स्वामी

निरोपिती ॥ ४१ ॥ या समस्त ब्राह्मणांसी ॥ विनंती करा तुह्मीं ऐसी ॥ तुह्मीं यावें सहकुटुंबेंसी ॥ आपण करितों समाराधना ॥ ४२ ॥ श्रीगुरूचा निरोप घेऊन ॥ विनवीतसे तो ब्राह्मण ॥ द्विज ह्मणती त्यास हांसोन ॥ काय जेवा ह्मणतोसि आह्मां ॥ ४३ ॥ आह्मा इतुकिया ब्राह्मणांसी ॥ एकेक शीत नये वांट्यासी ॥ आमंत्रण सांगावया न लाजसी ॥ विनंती करितोसि ब्राह्मणा ॥४४॥ वृद्ध ब्राह्मण ऐसें ह्मणती ॥ निंदा न करावी गुरु ऐकती॥ जैसें श्रीगुरु निरूपिती ॥ तैसें बोलतसे ब्राह्मण ॥ ४५ ॥ होका बरवें बरवें ह्मणती ॥ सर्व पत्रावळी करिती ॥ ब्राह्मण श्रीगुरुपूजा त्वरिती ॥ करिता झाला उपचारें ॥ ४६ ॥ मनःपूर्वक करी भक्ती ॥ बरवी केली मंगल आरती ॥ तेणें श्रीगुरु संतोषती ॥ ठाय घाला ह्मणती वेगें ॥ ४७ ॥ स्वयंपाक आणूनि आपल्याजवळी ॥ ठेवी ह्मणती तयेवेळीं ॥ आणोनियां तात्काळीं ॥ श्रीगुरुजवळी ठेविला ॥ ४८ ॥ श्रीगुरु ह्मणती ब्राह्मणांसी ॥ आपुलें वस्त्र घेऊनि अन्नासी ॥ झांकोनि ठेवी आह्मापासी ॥ देती वस्त्र त्याजवळी ॥४९॥ झांकिलें वस्त्र अन्नावरी ॥ कमंडलु उदक घेऊनी करीं ॥ श्रीगुरु प्रोक्षिती अन्नावरी ॥ अभिमंत्रोनि तये वेळीं ॥ ५० ॥ मग ह्मणती ब्राह्मणासी ॥ उघडूं नको अन्नासी ॥ काढूनी नेऊनि समस्तांसी ॥ वाढी वेगीं अन्नातें ॥ ५१ ॥ तूप घालिती घटांत ॥ ओतूनि घेऊनी आणिक्रांत ॥ वाढा वेगीं ऐसें म्हणत ॥ निरोप देती श्रीगुरू ॥ ५२ ॥ ठाय घातले समस्तांसी ॥ वाढीतसे ब्राह्मण परियेसी ॥ लोक पहाती कौतुकासी ॥ महदाश्चर्य ह्मणताती ॥ ५३ ॥ श्रीगुरु म्हणती ब्राह्मणासी ॥ वाढूं लागा या ब्राह्मणासी ॥ आणीक उठिले बहूतेसी ॥ वाढूं लागले तये वेळीं ॥ ५४ ॥ भरोनी नेती जितुकें अन्न ॥ पुनः मागुती परिपूर्ण ॥

घृत भरिलें परिपूर्ण ॥ घट ओतूनि नेताती ॥ ५५ ॥ वाढिलें समस्त पंक्तीसी ॥ सहपंक्तीं श्रीगुरूसी ॥ जेविताती अतिहर्षी ॥ द्विजवर पुसतसे ॥ ५६ ॥ जें जें मागती तें वाढा ह्मण-त ॥ परिपूर्ण जेवा असें प्रार्थित ॥ भागलेत क्षुधाक्रांत ॥ क्षमा करणें ह्मणतसे ॥ ५७ ॥ घृत असे आपुले करीं ॥ वाढितसे महापूरीं ॥ विप्र ह्मणती पुरे करी ॥ आकंठभरीं जेविलों ॥ ५८ ॥ भक्ष्य परमान्न पत्रशाखा ॥ ब्राह्मण वाढिताती अनेका ॥ शर्करा लवण दधि शाखा ॥ अनेकपरि जेविले ॥ ५९ ॥ तृप्त झाले ब्राह्मण देखा ॥ हस्तप्रक्षालन करिती ऐका ॥ उच्छिष्टें काढिताती तात्कालिका ॥ आश्चर्य ह्मणती तये वेळीं ॥ ६० ॥ तांबूल देती समस्तांसी ॥ गुरु बोलावूनि ह्मणती त्यांसी ॥ पाचारा आपुल्या कलत्रपुत्रांसी ॥ समस्त येउनि जेविती ॥ ६१ ॥ आलें विप्रकुल समस्त ॥ जेवूनि गेले पंचामृत ॥ श्रीगुरु मागुती निरोपित ॥ शूद्रादि ग्रामलोकां पाचारा ॥ ६२ ॥ त्यांच्या स्त्रिया पुत्रांसहित ॥ बोलावी शीघ्र ऐसें ह्मणत ॥ पाचारिल्या समस्त यात ॥ जेवूनि गेली तये वेळीं ॥ ६३ ॥ श्रीगुरु ह्मणती ब्राह्मणांसी ॥ आतां कोण उरले ग्रामवासी ॥ ते सांगती स्वामियांसी ॥ अंत्यज जाती उरली असे ॥ ६४ ॥ पाचारावें समस्तांसी ॥ अन्न वांटून द्यावें तयांसी ॥ जितुकें मागती त्वरीसी ॥ तितुकें द्यावें अन्न वेगीं ॥ ६५ ॥ सर्वही तृप्त झाले देखा ॥ प्राणिमात्र नाहीं भुका ॥ सांगती श्रीगुरु द्विजलोकां ॥ डांगोरा पिटा गांवांत ॥ ६६ ॥ कोणी असतां क्षुधाक्रांत ॥ तयासी पाचारावें त्वरित ॥ ऐसें श्रीगुरु निरोपित ॥ हिंडती ग्रामीं तये-वेळीं ॥ ६७ ॥ प्राणिमात्र नाहीं उपवासी ॥ सर्व जेविले परियेसीं ॥ मग निरोपिती त्या द्विजासी ॥ भोजन तुवां करावें ॥ ६८ ॥ श्रीगुरुनिरोपें भोजन केलें ॥ मागुती जाऊनी

अन्न पाहिलें ॥ आपण जितुकें होतें केलें ॥ तितुकें अन्न उरलें असे ॥ ६९ ॥ ऐकोनी श्रीगुरु म्हणती ॥ घेऊनि जावें अन्न त्वरिती ॥ घालावें जळीं जळचरें खाती ॥ तृप्त होती तेही जीव ॥ ७० ॥ ऐसें तया दिवशीं विचारिती ॥ चारी सहस्र झाली मिति ॥ भूमीवरी झाली ख्याती ॥ लोक मानिती आश्चर्य ॥ ७१ ॥ इतुकें झालियावरी ॥ श्रीगुरु द्विजातें पाचारी ॥ वर देती दरिद्र दुरी ॥ पुत्रपौत्र होती तुज ॥ ७२ ॥ समस्त तटस्थ झाले लोक ॥ म्हणती देखिलें आजि कौतुक ॥ अन्न केलें होतें स्वल्पक ॥ चारी सहस्र केवीं जेविले ॥ ७३ ॥ एक ह्मणती श्रीगुरुकरणी ॥ स्मरला असेल अन्नपूर्णी ॥ अवतार पुरुष परिपूर्णी ॥ झाला नृसिंहसरस्वती ॥ ७४ ॥ एक ह्मणती अपूर्व देखिलें ॥ पूर्व कथानक होतें ऐकिलें ॥ पांडवगृहीं दुर्वास गेले ॥ ऋषीश्वरांसमवेत ॥ ७५ ॥ सत्वभंग होईल ह्मणोन ॥ कृष्ण आला धांवून ॥ तेणें केलें अन्न पूर्ण ॥ दुसरें आजि देखिलें ॥ ७६ ॥ नर दिसे तो दंडधारी ॥ सत्य त्रिमूर्ती अवतारी ॥ न कळे महिमा असे अपारी ॥ ह्मणती लोक अनेक ॥ ७७ ॥ यातें नर जे ह्मणती ॥ ते जाती अधोगती ॥ वर्णावया आह्मां नाहीं मती॥ परब्रह्ममूर्ती श्रीगुरु ॥७८॥ नव्हे हा जरी ईश्वर ॥ केवीं केलें अन्न पूर ॥ होतें तीन अडीच शेर ॥ चारी सहस्र जेविले केवीं ॥ ७९ ॥ आणीक एक नवल झालें ॥ आह्मीं समस्तीं देखिलें ॥ प्रेताचें संजीवन केलें ॥ शुष्ककाष्ठासी आले पल्लव ॥ ८० ॥ आणीक ऐक त्याची महिमा ॥ कोणाची देऊं आतां उपमा ॥ कुमसीस होता त्रिविक्रमा ॥ तयासी दाखविलें विश्वरूप ॥ ८१ ॥ ग्रामांत होती वांझ महिषी ॥ क्षीर काढिलें भिक्षेसीं ॥ वेद ह्मणविले पतितमुखासीं ॥ अभिमंत्रितां श्रीगुरूंनीं ॥ ८२ ॥ आणीक झालें एक नवल ॥

कुष्ठी आला विप्र केवळ ॥ दर्शनमात्रें झाला निर्मळ ॥ आम्हीं देखिला दृष्टीनें ॥८३॥ वि-
कर होता एक भक्त ॥ तयासी दाविला श्रीशैल्यपर्वत ॥ काशी क्षेत्र क्षण न लागतां ॥
एका भक्तासीं दाविलें ॥८४॥ आणीक अपार चरित्रें ॥ सांगतां आहेत अपारें ॥ क्षिती-
वरी समस्त दैवतें ॥ तयांचें नव्हे सामर्थ्य ॥८५॥ समस्त देवांतें आराधितां ॥ आयासें होय
मनकाम्यता ॥ दर्शनमात्रें गुरुनाथा ॥ सकळाभीष्टें होताती ॥८६॥ ऐसें ह्मणती विप्रलोक ॥
अपूर्व झालें कौतुक ॥ ख्याती ऐकती समस्त लोक ॥ येती अनेक दर्शना ॥ ८७ ॥
सिद्ध ह्मणे नामधारकासी ॥ श्रीगुरुचरित्र ऐसें परियेसीं ॥ याचि निमित्तें बहुवसीं ॥
शिष्य झाले गुरूचे ॥ ८८ ॥ नानाराष्ट्रींचे भक्त येती ॥ श्रीगुरूची सेवा करिती ॥
अंतःकरणीं एक चित्तीं ॥ भजणारासीं प्रसन्न ॥ ८९ ॥ गंगाधराचा सुत ॥ सरस्वती विन-
वीत ॥ जनहो ऐका तुह्मी समस्त ॥ भजा श्रीगुरूसीं ॥ ९० ॥ इति श्रीगुरुचरित्रामृत ॥
अन्नपूर्ति गुरु करीत ॥ चार सहस्र जेवित ॥ अष्टत्रिंशोत्तमोऽध्याय हा ॥९१॥ इति श्रीगुरु-
चरित्रपरमकथाकल्पतरौ श्रीनृसिंहसरस्वत्युपाख्याने सिद्धनामधारक संवादे अन्नपूर्ति-
काद्विजचतुःसहस्रभोजनं नाम अष्टत्रिंशत्तमोऽध्यायः ॥ ओंव्या ९१ ॥

गु. च

॥ श्रीगणेशाय नमः ॥ सिद्ध ह्मणे नामधारका ॥ पुढें अपूर्व वर्तलें ऐका ॥ साठी वर्षी वांझेसी ऐका ॥ कन्या पुत्र झाली परियेसा ॥ १ ॥ आपस्तंब शाखेसी ॥ ब्राह्मण एक परियेसी ॥ शौनक गोत्री प्रवरेसी ॥ नाम तयाचें सोमनाथ ॥ २ ॥ गंगा नामें तयाची पत्नी ॥ पतिव्रता शिरोमणी ॥ वेदशास्त्र जाणें सगुणी ॥ असतां झालीं उभयतां ॥ ३ ॥ वर्षें झालीं साठ तियेसी ॥ पुत्र नाहीं तिये कुशीं ॥ वांझ ह्मणोनि ख्याती ऐसी ॥ होती तया गाणगापुरीं ॥ ४ ॥ पतिसेवा निरंतरीं ॥ करीतसे भक्तिपुरस्सरीं ॥ नित्य नेम असे नारी ॥ गुरुदर्शना येतसे ॥ ५ ॥ नीरांजन प्रति दिवशीं ॥ आणोनि करी श्रीगुरूसी ॥ येणेंपरी बहुत दिवशीं ॥ वर्तत होती परियेसा ॥ ६ ॥ ऐसें असतां वर्तमानीं ॥ संतुष्ट झाले श्रीगुरु मुनी ॥ पृच्छा करिती हांसोनी ॥ तया द्विजस्त्रियेसी ॥७॥ श्रीगुरु पुसती तियेसी ॥ काय अभीष्ट असे मानसीं ॥ आणिरयेसी प्रतिदिवसीं ॥ नीरांजन परोपरी ॥ ८ ॥ तुझ्या मनीं अभीष्ट कोण ॥ त्वरित सांग विस्तारोन ॥ सिद्धि पाववील नारायण ॥ गौरी-रमण गुरुप्रसादें ॥ ९ ॥ ऐकोनी श्रीगुरूचें वचन ॥ करी साष्टांग नमन ॥ विनवीतसे कर जोडून ॥ नापुत्रस्य लोक नास्ति ॥ १० ॥ पुत्राविणें स्त्रियेसी ॥ न पहावें तिच्या मुखासी ॥ पापरूपी महादोषी ॥ ह्मणती मातें स्वामिया ॥ ११ ॥ जियेचे पोटीं नाहीं फळ ॥ तिचा जन्म निष्फळ ॥ वाट पहाती उभय कुळ ॥ बेचाळिस पितृलोकीं ॥ १२ ॥ पितर चिंतिती मनांत ॥ ह्मणती एकादे समर्थी वंशांत ॥ पुत्र झाल्या आह्मां हित ॥ तो उद्धरील सकळांतें ॥ १३ ॥ पुत्रावेगळें जें घर ॥ तें सदाकाळीं अतिघोर ॥ अरण्य नाहीं तयासी दूर ॥ यथारण्यं तथा गृहम् ॥ १४ ॥ नित्य गंगास्नानासी ॥ आपण जातसे परि-

अ. ३९

पा. ३८५

येसी ॥ घेवोनि येती बाळकांसी ॥ समस्त स्त्रिया कौतुकें ॥ १५ ॥ कडिये घेवोनियां बाळां ॥ खेळविती स्त्रिया सकळा ॥ तैसें नाहीं माझे कपाळा ॥ मंदभाग्य असें देखा ॥ १६ ॥ जळो माझें वक्षस्थळ ॥ कडे घ्यावया नाहीं बाळ ॥ जन्मोनियां संसारीं निष्फळ ॥ नव्हे पुरुष अथवा सती ॥ १७ ॥ पुत्रपौत्र असती जयासी ॥ परलोक लाभे तयासी ॥ अधोगती निपुत्रिकासी ॥ लुप्तपिंड होय देखा ॥ १८ ॥ आतां पुरे जन्म मज ॥ साठी वर्षें झालीं सहज ॥ आह्मां आतां वर दिजे ॥ उत्तम जन्म पुढें होय ॥१९॥ पुत्रवंती व्हावें आपण ॥ अंतःकरणीं वासना पूर्ण ॥ ऐसा वर द्यावा म्हणोन ॥ विनवीतसे तये वेळीं ॥ २० ॥ ऐकोनि तियेचें वचन ॥ श्रीगुरु म्हणती हांसोन ॥ पुढील जन्म जाणें कवण ॥ तूतें स्मरण सांग कैचें ॥ २१ ॥ नित्य आरती आम्हांसी ॥ भक्तिपूर्वक अह-र्निशीं ॥ करितां झालों संतोषी ॥ कन्यापुत्र तूतें होती ॥ २२ ॥ इहजन्मीं तूतें जाण ॥ कन्यापुत्र सुलक्षण ॥ होती निश्चयें मानी वचन ॥ श्रीगुरु म्हणती तियेसी ॥ २३ ॥ श्रीगु-रूचें वचन ऐकोनी ॥ पल्लवीं बांधी गांठी शकुन ॥ विनवीतसे कर जोडूनी ॥ ऐकें स्वामी कृपासिंधु ॥ २४ ॥ साठी वर्षें जन्मासी ॥ झालीं स्वामी परियेसी ॥ होत नाहीं विटाळसी ॥ मातें कैचें पुत्र होती ॥२५॥ नानाव्रतें नानातीर्थें ॥ मीं हिंडलें पुत्रार्थें ॥ अनेक ठायीं पूजिलीं दैवतें ॥ मनोभावें स्वामियां ॥ २६ ॥ लोक सांगती मजलागीं जाण ॥ कराव्या अश्वत्थप्रदक्षिणा ॥ तेणें पुरतील मनकामना ॥ होतील पुत्र ह्मणती मज ॥ २७ ॥ चिरकाळ अश्वत्थाला ॥ सेवा करितां जन्म गेला ॥ विश्वास आपण बहु केला ॥ पुत्र होतील ह्मणोनी ॥२८॥ साठी वर्षें येणेंपरी ॥ कष्ट केले अपरंपारी ॥ सेवा करीतसें अश्वा-

पिवरी ॥ अश्वत्थासी प्रदक्षिणा ॥ २९ ॥ पुत्र न होती या जन्मीं ॥ पुढें होतील ऐसीया कामीं ॥ सेवा करीतसें मी स्वामी ॥ अश्वत्थाची परियेसा ॥ ३० ॥ आतां स्वामी प्रसन्न होसी ॥ इहजन्मीं पुत्र देसी ॥ अन्यथा न होय बोलासी ॥ तुमच्या स्वामी नरहरी ॥३१॥ स्वामींनीं दिधला मातें वर ॥ माझे मनीं हाचि निर्धार ॥ हास्य न करी स्वामी गुरुवर ॥ शकुन गांठी बांधिली म्यां ॥ ३२ ॥ पुढील जन्मकाम्यासी ॥ करीतसें सेवा अश्वत्थासी ॥ स्वामी आतांच वर देसी ॥ इहजन्मीं कन्यापुत्र ॥ ३३ ॥ अश्वत्थसेवा बहुत दिवसीं ॥ करितां झालें मीं प्रयासी ॥ काय देईल आह्मासी ॥ अश्वत्थ सेवित्यें मूर्खपणें ॥ ३४ ॥ ऐकोनि तियेचें वचन ॥ श्रीगुरू ह्मणती हांसोन ॥ अश्वत्थसेवा महापुण्य ॥ वृथा न होय परियेसीं ॥ ३५ ॥ निंदा न करी अश्वत्थासी ॥ अनंत पुण्य परियेसीं ॥ सेवा करीं वो आह्मांसरसी ॥ तूतें पुत्र होतील ॥ ३६ ॥ आतां आमुचें वचन धरीं ॥ नित्य जाई संगमातीरीं ॥ अमरजा वाहे निरंतरीं ॥ भीमरथी समागमें ॥ ३७ ॥ तेथें अश्वत्थ असे गहन ॥ करतों आह्मीं अनुष्ठान ॥ सेवा करीं एकमन ॥ आह्मासहित अश्वत्थाची ॥ ३८ ॥ अश्वत्थाचें महिमान ॥ सांगेन ऐका परिपूर्ण ॥ अश्वत्थनामा नारायण ॥ आमुचा वास तेथें असे ॥३९॥ ऐकोनि श्रीगुरूचें वचन ॥ विनवीतसे कर जोडून ॥ अश्वत्थ वृक्षाचें सेवन ॥ विस्तारोनी सांगा ह्मणे ॥ ४० ॥ कैसें माहात्म्य असे तयाचें ॥ स्वामी निरोपावें मज साचें ॥ स्थिरत्व होय मनाचें ॥ सेवा करीन भक्तीनें ॥ ४१ ॥ श्रीगुरु ह्मणती तियेसी ॥ अश्वत्थवृक्ष तूं निंदिसी ॥ सांगतां महिमा अपारेसीं ॥ समस्त देव तेथें असती ॥४२॥ अश्वत्थाचें महिमान ॥ ब्रह्मांडपुराणीं निरूपण ॥ नारदमुनीतें विस्तारोन ॥ ब्रह्मदेवें सांगितलें

॥४३॥ ब्रह्मकुमार नारदमुनी ॥ ज्याचें गमन त्रिभुवनीं ॥ ब्रह्मयासी पुसोनी ॥ आला ऋषी-
आश्रमासी ॥ ४४ ॥ नारदातें देखोनी ॥ अर्घ्यपाद्य देवोनी ॥ पूजा केली उपचारोनी ॥
पुसते झाले तयेवेळीं ॥ ४५ ॥ ऋषी म्हणती नारदासी ॥ विनंती एक परियेसीं ॥ अश्वत्थ-
महिमा आहे कैसी ॥ विस्तारावी स्वामिया ॥४६॥ ऋषिवचन ऐकोनी ॥ सांगतसे नारद
मुनी ॥ गेलों होतों आजिच्या दिनीं ॥ ब्रह्मलोका हिंडत ॥ ४७ ॥ आपण पुसिलें ब्रह्म-
यासी ॥ अश्वत्थमहिमा आहे कैसी ॥ समस्त मानती तयासी ॥ विष्णुरूप म्हणोनी ॥४८॥
ऐसा वृक्ष असेल जरी ॥ सेवा करिजे कवणेपरी ॥ कैसी महिमा विस्तारीं ॥ निरोपावी
दातारा ॥ ४९ ॥ ब्रम्हा सांगे आम्हांसीं ॥ अश्वत्थमूळीं आपण वासी ॥ मध्यें वास हृषी-
केशी ॥ अग्नि रुद्र वसतसे ॥ ५० ॥ शाखापल्लव अधिष्ठानीं ॥ दक्षिणशाखे शूलपाणि ॥
पश्चिमशाखे विष्णु निर्गुणी ॥ आपण उत्तरे वसतसें ॥ ५१ ॥ इंद्रादि देव परियेसीं ॥
वसती पूर्व शाखेसीं ॥ आदित्य देव अहर्निशीं ॥ समस्त शाखे वसती जाणा ॥ ५२ ॥
गोब्राह्मण समस्त ऋषी ॥ वेदादि यज्ञ परियेसीं ॥ समस्त मूळांकुरेसीं ॥ असती
देखा निरंतर ॥ ५३ ॥ समस्त नदीतीर्थें देखा ॥ सप्तसागर लवणादिका ॥ वसती
जाणा पूर्वशाखा ॥ ऐसा अश्वत्थ वृक्ष असे ॥ ५४ ॥ अकार शब्द मुलस्थान ॥ स्कंदशा-
खा उकार जाणा ॥ फलपुष्प मकारवर्ण ॥ अश्वत्थ ऐसा ओंकाररूपी ॥ ५५ ॥ एकादश
रुद्रादिक ॥ अष्टवसु आहेत अनेक ॥ जे स्थानीं त्रयमूर्ती देख ॥ समस्त देव तेथें वसती
॥ ५६ ॥ ऐसा अश्वत्थ नारायण ॥ महिमा वर्णूं शके कवण ॥ कल्पवृक्ष याचिकारण ॥
ब्रह्मा ह्मणे नारदासी ॥५७॥ नारद ह्मणे ऋषींसी ॥ त्रिमूर्ती असे वृक्षापासीं ॥ किती वर्णूं

त्याचे महिमेसीं ॥ भजतां कार्यसिद्धि त्वरित होय ॥ ५८ ॥ ऐकोनियां समस्त ऋषी ॥ विनविताती नारदासी ॥ आचरावया विधी कैसी ॥ कवणेपरी भजावें ॥ ५९ ॥ पूर्वीं आह्मी एके दिवसीं ॥ पुशिलें होतें अथर्वणासीं ॥ त्याणें सांगितलें आह्मांसी ॥ अश्वत्थसेवा करावया ॥ ६० ॥ तूं नारद ब्रह्मऋषी ॥ समस्त धर्मांतें जाणसी ॥ विस्तारोनि आह्मांसी ॥ विधिपूर्वक निवेदावें ॥ ६१ ॥ नारद ह्मणे मुनिवरा ॥ सांगेन ऐका तत्परा ॥ चित्त करोनियां स्थिरा ॥ विधान असे ब्रह्मवचनीं ॥ ६२ ॥ आषाढ पौष चैत्रेसी ॥ अस्तंगत शुक्रासी ॥ चंद्रबळ नसतां दिवसीं ॥ करूं नये प्रारंभा ॥६३॥ या व्यतिरिक्त आणीक मासीं ॥ बरवा पाहोनियां दिवसीं ॥ प्रारंभ करावा उपवासीं ॥ शुचिर्भूत होवोनियां ॥ ६४ ॥ भानु सोमवार दिवसीं ॥ स्पर्शों नये अश्वत्थासीं ॥ भृगुवार संक्रांति दिवसीं ॥ स्पर्शों नये सर्वथा ॥ ६५ ॥ संधिरात्रीं रिक्तातिथीं ॥ पर्वणीसीं व्यतीपातीं ॥ दुर्दिनादि वैधृतीं ॥ अपराण्हसमयीं स्पर्शूं नये ॥ ६६ ॥ अनृत द्यूतकर्म संभाषेसीं ॥ निंदा पाखांड वर्जनेसीं ॥ प्रातःकाळीं मौन्यें हर्षीं ॥ आरंभावें परियेसा ॥ ६७ ॥ सचैल स्नान करोनी ॥ निर्मळ वस्त्र नेसोनी ॥ गंगायमुना कलश दोनी ॥ आणोनी ठेवणें पारावरी ॥ ६८ ॥ पूजा करावीं कलशासी ॥ पुण्याहवाचन कर्मेसीं ॥ संकल्पावें विधीसी ॥ काम्यार्थ आपुले उच्चारिजे ॥ ६९ ॥ मग कलश घेवोनी ॥ सात वेळां भरोनी ॥ स्नपन करावें आणोनी ॥ अश्वत्थवृक्षासी अवधारा ॥ ७० ॥ पुनरपि करोनियां स्नान ॥ मग करावें वृक्षस्नपन ॥ पुरुषसूक्त ह्मणोन ॥ पूजा करावी षोडशोपचारें ॥ ७१ ॥ मग ध्यावी विष्णुमूर्ती ॥ अष्टभुजा आहेति ख्याती ॥ शंख चक्र उभय हस्तीं ॥ वरदहस्त असे जाणा ॥ ७२ ॥ खड्ग खेटक एके

करीं ॥ धनुष्य बाणातें विस्तारी ॥ अष्टभुजीं येणेंपरी ॥ आयुधें असतीं परियेसा ॥ ७३ ॥
पीतांबर प्रावरण ॥ सदा लक्ष्मी सन्निधान ॥ ऐसी मूर्ति ध्याऊन ॥ पूजा करावी परियेसा
॥ ७४ ॥ त्रैमूर्तीचें असें ध्यान ॥ शिवशक्तीवीण नाहीं जाण ॥ समस्त दैवता आवाहन
करून ॥ षोडशोपचारें पूजावें ॥ ७५ ॥ वस्त्रें अथवा सुतासीं ॥ वेष्टावें तया वृक्षासी ॥
पुनरपि संकल्पेंसीं ॥ प्रदक्षिणा करावी ॥ ७६ ॥ अथवा सहस्र नामेसीं ॥ कराव्या
प्रदक्षिणा हर्षीं ॥ अथवा करा मौन्येसीं ॥ तयाचें फळ अनंत देखा ॥ ७७ ॥ मनसा
वाचा कर्मेसीं ॥ भक्तिपूर्वक भावेंसीं ॥ प्रदक्षिणा कराव्या हर्षीं ॥ पुरुषसूक्त ह्मणत
देखा ॥ ७८ ॥ चाले जैसी स्त्री गर्भिणी ॥ कीं उदककुंभ घेऊनी ॥ तैसी पहा मंद गती-
नीं ॥ प्रदक्षिणा करावी परियेसा ॥ ७९ ॥ पदोपदीं अश्वमेध ॥ पुण्य जोडे फळप्रद ॥
प्रदक्षिणा समाप्त मध्य ॥ नमस्कार करावा ॥ ८० ॥ ब्रह्महत्यादि पापांसी ॥ प्रायश्चित्त
नाहीं परियेसीं ॥ प्रदक्षिणा द्विलक्षांसीं ॥ ब्रह्महत्यादि पापें जाती ॥ ८१ ॥ त्रिमूर्ती वसती
जया स्थानीं ॥ फळ काय सांगूं प्रदक्षिणीं ॥ समस्त पापा होय धुणी ॥ गुरुतल्पादि दोष
जाती ॥ ८२ ॥ नानाव्याधि हरती दोष ॥ प्रदक्षिणा करितां होय निःशेष ॥ कोटी ऋण
असेल ज्यास ॥ परिहरेल परियेसा ॥ ८३ ॥ जरा मृत्यु व्याधि उत्पत्ती ॥ संसारताप भयें
नासती ॥ ग्रहपीडा बाधा न करिती ॥ सहस्र प्रदक्षिणा केलिया ॥ ८४ ॥ पुत्रकाम असे
ज्यासी ॥ पुत्र होती भरंवसीं ॥ मनोवाक्काय कर्मेंसी ॥ एकभावें करावें ॥ ८५ ॥ चतुर्विध
पुरुषार्थ ॥ देता होय अश्वत्थ ॥ पुत्रकाम पावती त्वरित ॥ न धरावी शंका ऋषीहो ॥८६॥
शनिवारीं वृक्ष धरोनी ॥ जप करावा मृत्युंजयनी ॥ काळ मृत्यूतें जिंकोनी ॥ राहे नर

अवधारा ॥ ८७ ॥ ते अपमृत्यु न पावती ॥ पूर्णायुषी होती निश्चिती ॥ शनिग्रहानें जे पीडिती ॥ प्रार्थावें अश्वत्थासी ॥ ८८ ॥ श्लोक ॥ कोणस्थकों रौद्र यमश्च बभ्रुः कृष्णः शनिः पिंगल एव मंदः ॥ नित्यं स्मरेत् व्याहरते च पीडां तस्मै नमस्ते रविनंदनाय ॥८९॥ टीका ॥ शनिनामें घेवोनी ॥ उच्चारावें स्वकीय वदनीं ॥ बभ्रु पिंगल ह्मणोनी ॥ कोणस्थ कृष्ण ह्मणावें ॥९०॥ अंतक यम महारौद्री ॥ मंद शनैश्चर शौरी ॥ जप करावा येणेंपरी ॥ शनि-पीडा न होय ॥ ९१ ॥ ऐसें दृढ करोनि मन ॥ अश्वत्थ सेवितां कामना पूर्ण ॥ पुत्रकाम्य तत्क्षण ॥ होय निरुतें अवधारा ॥९२॥ अमावास्या गुरुवारेसीं ॥ अश्वत्थछायेंत जळासी ॥ स्नान करितां नरांसी ॥ ब्रह्महत्या पापें जाती ॥ ९३ ॥ अश्वत्थतळीं ब्राह्मणासीं ॥ अन्न घालितां एकासी ॥ कोटी ब्राह्मणां परियेसी ॥ भोजन दिधलें फळ असे ॥ ९४ ॥ अश्व-त्थतळीं बैसोन ॥ एकादा मंत्र जपती तत्क्षण ॥ फळ होय अनंतगुण ॥ वेदपठण केलिया ॥ ९५ ॥ नर एकादा अश्वत्थासी ॥ स्थापन करी भक्तीसी ॥ सह बेचाळीस पितरांसी ॥ स्वर्गी स्थापी परियेसा ॥ ९६ ॥ छेदितां अश्वत्थवृक्षासीं ॥ महापापें परियेसी ॥ पितरांस-हित नरकासी ॥ जाय देखा तो नर ॥ ९७ ॥ अश्वत्थतळीं बैसोन ॥ होम करितां महा यज्ञ ॥ अक्षय सुकृत असे जाण ॥ पुत्रकाम त्वरित होय ॥ ९८ ॥ ऐसें अश्वत्थमहिमान ॥ नारदासी सांगे चतुरानन ॥ ह्मणोनि ऐकती ऋषिजन ॥ तया नारदापासूनी ॥ ९९ ॥ नारद ह्मणे ऋषीश्वरांसी ॥ प्रदक्षिणेच्या दहावे अंशीं ॥ हवन करावें परियेसी ॥ आग-मोक्त विधीनें ॥ १०० ॥ हवनाच्या दहावे अंशीं ॥ ब्राह्मणभोजन करावें हर्षी ॥ ब्रह्मचर्य-हविष्यान्नेंसी ॥ व्रत आपण करावें ॥ १ ॥ येणेंपरी आचरोन ॥ मग करावें उद्यापन ॥

शक्तयनुसार सौवर्ण ॥ अश्वत्थवृक्ष करावा ॥ २ ॥ तो द्यावा ब्राह्मणासी ॥ विधिपूर्वक प-
रियेसीं ॥ श्वेत धेनु सवत्सेसीं ॥ द्यावीं ब्राह्मणाकारणें ॥ ३ ॥ वृक्षातळीं तिळरासी ॥ क-
रावी यथाशक्तीसीं ॥ वरी झांकोनी श्वेतवस्त्रासी ॥ द्विजालागीं द्यावें ॥ ४ ॥ ऐसें अ-
श्वत्थविधान ॥ सांगे नारद ऋषिजनां ॥ यापरी मुनी आचरोन ॥ अभीष्टें लाधले सर्व
॥ ५ ॥ श्रीगुरु ह्मणती वंध्येसी ॥ अश्वत्थमहिमा आहे ऐसी ॥ भावभक्ति असे ज्यासी ॥
त्यासी होय फलश्रुती ॥ ६ ॥ आचार करीहो येणेंपरी ॥ संशय आतां चित्तीं न
धरी ॥ वृक्ष असे भीमातीरीं ॥ जेथें अमरजासंगम ॥ ७ ॥ तेंचि आमुचें स्थान ॥
सेवा करावी एकमनें ॥ होईल कामना शीघ्र पूर्ण ॥ कन्यापुत्र तूतें होतीं ॥ ८ ॥ ऐको-
नियां श्रीगुरुच्या वचना ॥ नमस्कार करीतसे अंगना ॥ विनवी कर जोडोनि जाणा ॥
भक्तिभावें करोनियां ॥ ९ ॥ आपण वांझ वर्षें साठी ॥ कैंचे पुत्र माझे पोटीं ॥ वाक्य
असे तुमचें शेवटीं ॥ म्हणोनि आपण अंगीकारिन ॥ १० ॥ गुरुवाक्य सुरभीसमान ॥ ऐसें
सांगती वेदपुराण ॥ आतां नाहीं अनुमान ॥ करीन सेवा स्वामिया ॥ ११ ॥ चाड नाहीं
अश्वत्थासी ॥ निर्धार तुमच्या बोलासी ॥ सेवा करीन तुमची ऐसी ॥ म्हणोनि चरणीं
लागली ॥ १२ ॥ ऐसा निरोप घेवोनि ॥ जावोनियां संगमस्थानीं ॥ षट्कुळांत स्थान
करूनी ॥ सेवा करी अश्वत्थाची ॥ १३ ॥ श्रीगुरुचा निरोप जेणेंपरी ॥ तैसीच सेवा करी
नारी ॥ येणेंपरी तीन रात्रीं ॥ आराधिला परियेसा ॥ १४ ॥ श्रीगुरुनिरोपें अश्वत्थासी ॥
सेवा करी रात्रंदिवशीं ॥ तिसरे रात्रीं स्वप्न तियेसी ॥ झालें ऐका एकचित्तें ॥ १५ ॥
स्वप्नामध्यें विप्र एक ॥ येवोनि देतो तिसी भाक ॥ कार्य तुझें झालें ऐक ॥ सांगेन एक तें

करी म्हणे ॥१६॥ जावोनि गाणगापुरांत ॥ तेथें असे श्रीगुरुनाथ ॥ प्रदक्षिणा करीवो सात ॥ नमन करी भक्तीसीं ॥ १७ ॥ जें काय देतील तुजसी ॥ भक्षण करीहो वेगेंसी ॥ निर्धार करीं वो मानसीं ॥ त्वरित जावें म्हणे विप्र ॥ १८ ॥ ऐसें देखोनि सुषुप्तांत ॥ सवेंचि झाली जागृत ॥ कल्पवृक्ष असे अश्वत्थ ॥ कल्पिलें फळ त्वरित होय ॥१९॥ सेवा करोनि चवथे दिवसीं ॥ आली आपण मठासी ॥ प्रदक्षिणा करूनियां हर्षी ॥ नमन केलें तयेवेळीं ॥२०॥ हासोनियां श्रीगुरु मुनी ॥ फळें देती तिसीं दोनी ॥ भक्षण करीवो संतोषोनी ॥ कार्य झालें तुझें आतां ॥ २१ ॥ भोजन करी आतां त्वरित ॥ काम्य होईल तुझें सत्य ॥ कन्यापुत्र दोनी तूतें ॥ दिल्हे आज परियेसा ॥ २२ ॥ पारणें करोनि विधीसीं ॥ मग भक्षावें यांसी ॥ दान द्यावें ब्राह्मणांसीं ॥ जें कां पूर्वी निरोपिलें ॥२३॥ व्रत संपूर्ण करोनी ॥ करी दान ती भामिनी ॥ त्याच दिवशीं अस्तमानीं ॥ झाली आपण विटाळसी ॥ २४ ॥ मौनी दिवस तीनवरी ॥ हविष्यान्न भोजन करी ॥ श्वेतवस्त्र नेसोनि नारी ॥ कोणाकडे न पाहेची ॥ २५ ॥ येणेंपरी तिन्ही निशी ॥ क्रमिल्या नारीनें परियेसी ॥ सुस्नात होवोनि चवथे दिवशीं ॥ आली श्रीगुरुदर्शना ॥ २६ ॥ पतिसमवेत येवोनी ॥ पूजा करी एकाग्र मनीं ॥ श्रीगुरु ह्मणती संतोषोनी ॥ पुत्रवंती व्हावें तुवां ॥ २७ ॥ ऐसें नमूनी श्रीगुरूसी ॥ आली आपुल्या घरासी ॥ ऋतु दिधला पांचवे दिवशीं ॥ ह्मणोनि कन्या परियेसी ॥२८॥ येणेंपरी ते नारी ॥ झाली ऐका गरोदरी ॥ ग्रामस्थ लोक विस्मय करी ॥ काय नवल ह्मणतसे ॥ २९ ॥ ह्मणती पहा नवल वर्तलें ॥ वांझेसी गर्भधारण झालें ॥ सोमनाथ विप्रें भलें ॥ मनीं मानिलें सुखातें ॥३०॥ सातवे मासीं ओटी भरिती ॥ अक्षयवाणें ओंवाळिती ॥

गुरूसी विनोदावरी प्रीती ॥ वाणें द्यावीं ह्मणतसे ॥ ३१ ॥ आठवे मासीं ते ब्राह्मणी ॥ करी सीमंतविधानी ॥ गुरुनिरोपें संतोषोनी ॥ देववी वाणें ग्रामांत ॥ ३२ ॥ अभिनव करिती सकळ जन ॥ ह्मणती वांझेसी गर्भधारण ॥ पांढरे केश ह्मातारपण ॥ वाणें देतसे कौतुकें ॥ ३३ ॥ एक म्हणती गुरुप्रसाद ॥ नृसिंहमूर्ती भक्तवरद ॥ त्याची सेवा करितां आनंद ॥ लाभे चारी पुरुषार्थ ॥ ३४ ॥ त्रैमूर्तीचा अवतार ॥ झाला नृसिंहसरस्वती नर ॥ भक्तजनां मनोहर ॥ प्रगटला भूमंडळीं ॥ ३५ ॥ ऐसें नानापरी देखा ॥ स्तोत्र करिती गुरुनायका ॥ वाणें देतसे बाळिका ॥ अति उल्हास तिच्या मनीं ॥ ३६ ॥ वाणें देवोनि समस्तांसी ॥ येवोनि नमिती श्रीगुरूसी ॥ भक्तवत्सल परियेसी ॥ आशीर्वाद देतसे ॥ ३७ ॥ संतोषोनी विप्रवनिता ॥ साष्टांग नमस्कारी दंडवता ॥ नानापरी स्तोत्र करितां ॥ विनवीतसे गुरुनाथा ॥ ३८ ॥ जयजय परमपुरुषा ॥ तूं ब्रम्हा विष्णु महेशा ॥ तुझ्या वाक्यपरिसें ऐका ॥ सुवर्ण केला माझा देह ॥ ३९ ॥ तारावया विश्वासी ॥ म्हणोनि तूं अवतरलासी ॥ त्रिमूर्ती तूंचि होसी ॥ अन्यथा नव्हे स्वामिया ॥ ४० ॥ तुझी स्तुती करावयासी ॥ अशक्यता या वाचेसी ॥ अपार तुझे महिमेसी ॥ नाहीं साम्यता कृपासिंधु ॥ ४१ ॥ येणेंपरी स्तोत्र करोनीं ॥ श्रीगुरुचरण वंदोनी ॥ गेली निरोप घेवोनी ॥ आपुल्या गृहासी परियेसा ॥ ४२ ॥ ऐसे नवमास क्रमोनी ॥ झाली प्रसूत शुभदिनीं ॥ कन्या प्रसवली तत्क्षणीं ॥ आनंदलीं मातापिता ॥ ४३ ॥ ज्योतिषी म्हणती तयेवेळीं ॥ होईल कन्या मननिर्मळी ॥ अष्टपुत्रा वाढेल कुळीं ॥ पुत्रपौत्रीं नांदेल ॥ ४४ ॥ येणेंपरी ज्योतिषी ॥ जातक वर्तविलें परियेसी ॥ सोमनाथ आनंदेसी ॥ दानधर्म करिता झाला ॥ ४५ ॥ दहा दिवस क्रमोनी ॥ सुस्नात झाली

भामिनी ॥ कडिये बाळ घेवोनी ॥ आली श्रीगुरुदर्शना ॥ ४६ ॥ बाळ आणोनि भक्तीसीं ॥ ठेवी श्रीगुरुचरणापासीं ॥ नमन करी साष्टांगेंसी ॥ एकभावें करोनियां ॥ ४७ ॥ आश्वासोनी श्रीगुरुमूर्ती ॥ उठी बाळे पुत्रवंती ॥ बहुतापरी संतोषविती ॥ प्रेमभावें करोनियां ॥४८॥ उठोनि विनवी श्रीगुरुमूर्तीसी ॥ पुत्र न होय आमुचे कुशीं ॥ सरस्वती आली घरासी ॥ बोल आपुला सांभाळिजे ॥४९॥ ऐकोनी तियेचें वचन ॥ श्रीगुरु म्हणती हांसोन ॥ न करी मनीं अनमान ॥ तूतें पुत्र होईल ॥ ५० ॥ ह्मणोनि तिये कुमारीसी ॥ कडिये घेती प्रीतीसीं ॥ सांगतात समस्तांसी ॥ तये कन्येचें लक्षण ॥ ५१ ॥ पुत्र होतील बहु इसी ॥ होईल आपण शतायुषी ॥ पुत्रपौत्र नयनेंसीं ॥ पाहील आपण अहेवपणें ॥ ५२ ॥ होईल इसी ज्ञानी पती ॥ तयातें चारी वेद येती ॥ अष्टैश्वर्यें नांदती ॥ प्रख्यात होईल भूमंडळीं ॥ ५३ ॥ पतिव्रता होईल सत्य ॥ पुण्यशील स्वधर्मरत ॥ इची ख्याती होईल बहुत ॥ समस्त ईतें वंदिती ॥ ५४ ॥ दक्षिण देशीं महाराजा ॥ येईल इच्या दर्शनकाजा ॥ आणीक पुत्र होईल दुजा ॥ ज्ञानवंत ह्मणती गुरू ॥ ५५ ॥ येणेंपरी श्रीगुरुमूर्ती ॥ कन्यालक्षण सांगती ॥ विप्रवनिता विनयवृत्ती ॥ पुत्र व्हावा ह्मणे ती ॥ ५६ ॥ श्रीगुरु ह्मणती तियेसी ॥ पुत्र व्हावा कैसा तुजसी ॥ योग्य पाहिजे वर्षें तीसी ॥ अथवा मूर्ख शतायुषी पैं ॥५७॥ ऐकोनी श्रीगुरूच्या वचना ॥ विनवीतसे विप्रांगना ॥ योग्य पाहिजे पुत्र जाणा ॥ तयासी पुत्र पांच व्हावे ॥५८॥ भक्तवत्सल श्रीगुरुमूर्ती ॥ वर देती तेणें रीती ॥ संतोषोनी घरा जाती ॥ परमानंदें दंपत्यें ॥५९॥ पुढें तियेसी पुत्र झाला ॥ वेदशास्त्रीं विख्यात भला ॥ पांच पुत्र तो लाधला ॥ नामकरणी श्रीगुरूची ॥ ६० ॥ कन्यालक्षण श्रीगुरुमूर्ती ॥

निरोपिलें होतें जेणें रीतीं ॥ प्रख्यात झाली नामें सरस्वती ॥ महा आनंद वर्तला ॥६१॥ यज्ञ करोनी तिचा पति ॥ दीक्षित नाम मिरवी क्षितीं ॥ चोहों राष्ट्रीं त्याची ख्याती ॥ ह्मणूनि सांगे सिद्धमुनी ॥६२॥ साठी वर्षें वांझेसी ॥ पुत्र झाला परियेसी ॥ सिद्ध ह्मणे नामधारका-सी ॥ ऐसी कृपा श्रीगुरूची ॥६३॥ निर्धार असे ज्याचे मनीं ॥ वर देती तत्क्षणीं ॥ एकभा-वें कायामनीं ॥ भक्ति करावी श्रीगुरूची ॥६४॥ ह्मणोनी सरस्वती गंगाधर ॥ सांगे गुरुच-रित्रविस्तार ॥ भजतां भावें श्रीगुरु उदार ॥ सकळाभीष्टें लाधती ॥६५॥ जो भजे श्रीगुरू-सी ॥ एकभावें भक्तीसी ॥ दैन्य काय बाधेल त्यासी ॥ जें जें मागेल तें देईल ॥६६॥ श्रीगुरु ह्मणजे कामधेनू ॥ अंतःकरणीं नको अनमानू ॥ जें जें इच्छिती भक्तजनू ॥ समस्त देईल परियेसा ॥६७॥ इति श्रीगुरुचरित्रामृत ॥ विप्रस्त्रियेसी झाला सुत ॥ तेंचि कथा अद्भुत ॥ एकुणचाळिसाव्यांत निवेदिली ॥६८॥ इति श्रीनृसिंहसरस्वत्युपाख्याने सिद्धनामधारक-संवादे वृद्धवंध्याप्रसवोनाम एकोनचत्वारिंशत्तमोऽध्यायः ॥ ओंव्या १६८ ॥

॥ श्रीगणेशाय नमः ॥ सिद्ध ह्मणे नामधारका ॥ अपूर्व वर्तलें आणीक ऐका ॥ वृक्ष झाला
काष्ठ शुष्का ॥ विचित्र कथा ऐकपां ॥ १ ॥ गाणगापुरीं असतां श्रीगुरु ॥ आला एक
कुष्टी नरू ॥ आपस्तंब गार्ग्य गोत्रु ॥ नाम तयाचें नरहरी ॥ २ ॥ येवोनियां गुरुमूर्ती-
पाशीं ॥ नमन करी भक्तीसीं ॥ करी स्तोत्र बहुवसी ॥ करसंपुट जोडोनियां ॥ ३ ॥ जय-
जयाजी गुरुमूर्ती ॥ ऐकोनि आलों तुझी ख्याती ॥ भक्तवत्सला परंज्योती ॥ परमपुरुषा
जगद्गुरू ॥ ४ ॥ आपण जन्मोनि संसारीं ॥ वृथा झालों दगडापरी ॥ निंदा करिताती द्वि-
जवरी ॥ कुष्टी म्हणोनि स्वामियां ॥ ५ ॥ वाचिला वेद यजुःशाखा ॥ निंदा करिती माझी
लोका ॥ ब्राह्मणार्थीं न सांगती देखा ॥ अंगहीन ह्मणोनियां ॥ ६ ॥ प्रातःकाळीं उठोनि
लोक ॥ न पाहती माझें मुख ॥ तेणें होतें मना दुःख ॥ जन्म पुरे आतां मज ॥ ७ ॥ पाप
केलें आपण बहुत ॥ जन्मांतरीं असंख्यात ॥ तेणें हा भोग भोगित ॥ आतां न साहे स्वा-
मिया ॥ ८ ॥ नानातीर्थें नानाव्रतें ॥ हिंडोनी आलों आचरत ॥ म्यां पूजिले देव समस्त ॥
माझी व्याधि नवचेची ॥ ९ ॥ आतां धरोनि निर्धारू ॥ आलों स्वामी जगद्गुरू ॥ तुझा
न होतां कृपावरू ॥ प्राण आपुला त्यजीन ॥ १० ॥ ह्मणोनियां निर्वाणेसीं ॥ विनवीतसे
श्रीगुरूसी ॥ एकभावें भक्तीसीं ॥ करुणा भाकी द्विजवर ॥ ११ ॥ ह्मणोनि मागुती नम-
स्कारी ॥ नानापरी स्तुति करी ॥ लोह परिसा भेटी बरीं ॥ तुझ्या दर्शनमात्रेंसीं ॥ १२ ॥
करुणावचन ऐकोनी ॥ भक्तवत्सल श्रीगुरुमुनी ॥ निरोप देती कृपा करोनी ॥ ऐक
शिष्या नामधारका ॥ १३ ॥ श्रीगुरु म्हणती द्विजासी ॥ पूर्वजन्मीं महादोषांसी ॥ तुवां
केलें बहुवसीं ॥ ह्मणोनि कुष्टी झालास ॥ १४ ॥ आतां सांगेन तें करीं ॥ तुझीं पापें जाती

दुरी ॥ होसील दिव्यशरीरीं ॥ एकभावें आचरावें ॥ १५ ॥ इतुकिया अवसरी ॥ काष्ठ
एक औदुंबरी ॥ शुष्क होतें वर्षं चारी ॥ घेवोनि आला नर एक ॥ १६ ॥ तें देखिलें
श्रीगुरुमूर्ती ॥ तया विप्रा निरोप देती ॥ एकभाव करोनी चित्तीं ॥ घेई हें काष्ठ झडकरी
॥ १७ ॥ काष्ठ घेवोनी संगमासी ॥ त्वरित जाय भावेंसी ॥ संगमनाथ पूर्वभागेसीं ॥
भीमातीरीं रोवीपां ॥ १८ ॥ तुवां जावोनियां संगमांत ॥ स्नान करोनियां त्वरित ॥ पूजा
करोनियां अश्वत्थ ॥ पुनरपि जाय स्नानासी ॥ १९ ॥ हातीं धरोनियां कलश दोन्ही ॥
आणी उदक तत्क्षणीं ॥ शुष्क काष्ठा वेळ तिन्ही ॥ स्नपन करी मनोभावें ॥ २० ॥
ज्या दिवसीं काष्ठासी ॥ पर्णें येतील संजीवेसीं ॥ दोष गेले तुझे परियेसी ॥ अंग तुझें
होय बरवें ॥ २१ ॥ येणेंपरी श्रीगुरुमूर्ती ॥ तया विप्रासी निरोप देती ॥ विश्वास झाला
त्याचे चित्तीं ॥ धांवत गेला काष्ठाजवळी ॥ २२ ॥ काष्ठ उचलोनि डोईवरी ॥ घेवोनि
आला भीमातीरीं ॥ संगमेश्वरासमोरीं ॥ रोविता झाला द्विजवर ॥२३॥ जेणें रीतीं श्रीगु-
रुमूर्ती ॥ तया विप्रा निरोप देती ॥ आचरतसे एकचित्तीं ॥ भावभक्ती करोनियां ॥ २४ ॥
येणेंपरी सात दिवस ॥ द्विजें केले उपवास ॥ तया काष्ठा दोनी कलश ॥ भरोनि घाली
वेळोवेळीं ॥ २५ ॥ देखोनि ह्मणती सकळ जन ॥ तया विप्रा बोलावोन ॥ सांगताती
विवंचून ॥ गुरुनिरोपलक्षण ॥ २६ ॥ ह्मणती तूतें काय झालें ॥ शुष्क काष्ठ कां रोविलें ॥
याचें तुवां संजीवन योजिलें ॥ मग तूतें काय होय ॥ २७ ॥ यातें तुवां सजीव करिसी ॥
मागुतीं काय येती पल्लव यासी ॥ ऐसें पाहिलें नाहीं भूमीसीं ॥ श्रीगुरुची इच्छा कळेना
॥ २८ ॥ श्रीगुरुमूर्ती कृपासिंधू ॥ भक्तजनां असे वरदू ॥ यासी कृपा असे अगाधू ॥

समस्तांतें कृपा करी ॥२९॥ नसेल निष्कृती तुझिया पापा ॥ ह्मणोनि दिधलें काष्ठ बापा॥ वायां कष्ट करिसी कांपां ॥ तूंतें श्रीगुरूंनीं निरोपिलें ॥ ३० ॥ ऐकोनि तयांचे वचना ॥ विप्रवर करी नमना ॥ गुरुवाक्य माझी भावना॥ अन्यथा केवीं होईल ॥३१॥ सत्यसंकल्प श्रीगुरुनाथ ॥ तयांचें वाक्य होय कैसें असत्य ॥ माझे मनीं निर्धार सत्य ॥ होईल काष्ठाचा वृक्ष जाणा ॥ ३२ ॥ माझ्या मनीं निर्धारू ॥ सत्य होय वाक्य सद्गुरू ॥ प्राण वेंचीन साचारू ॥ गुरुवाक्य कारण आपणा ॥ ३३ ॥ येणेंपरी समस्तांसी ॥ विप्र सांगे परियेसी ॥ सेवा करितो भक्तीसीं ॥ तया शुष्क काष्ठाची ॥ ३४ ॥ एके दिवसीं गुरुमूर्तीसी ॥ शिष्य सांगती परियेसी ॥ स्वामिनीं निरोपिलें द्विजासी ॥ शुष्क काष्ठा भजे ह्मणोनी ॥ ३५ ॥ सात दिवस उपवासी ॥ सेवा करितो काष्ठासी ॥ एकभावें भक्तीसीं ॥ निर्धार केला गुरुवचनीं ॥ ३६ ॥ किती रीतीं आह्मीं त्यासी ॥ सांगितलें सर्व हितासी ॥ वायां कांगा कष्ट करिसी ॥ मूर्खपणें ह्मणोनी ॥३७॥ विप्र आह्मांतें ऐसें ह्मणे ॥ चाड नाहीं काष्ठाविणें ॥ गुरुवाक्य मजकारणें ॥ करील आपुले बोल साच ॥ ३८ ॥ निर्धार धरोनी मानसीं ॥ सेवा करितो काष्ठासी ॥ सात दिवस उपवासी ॥ उदक तेंही घेत नाहीं ॥३९॥ ऐकोनी शिष्यांचें वचन॥निरोप देती श्रीगुरु आपण॥जैसा भाव अंतःकरण ॥तैसी सिद्धी पावेल ॥४०॥ गुरुवाक्य शिष्यासी कारण ॥ सर्वथा न होय निर्वाण॥ जैसें भक्ताचें अंतःकरण ॥ तैसी सिद्धी पावेल ॥४१॥ याकारणें तुह्मांसी ॥ सांगेन कथा इतिहासीं॥सांगे सूत ऋषीश्वरांसी ॥ स्कंदपुराणीं परियेसा॥४२॥गुरुभक्तीचा प्रकार॥पुसती सूतासी ऋषीश्वर॥ सांगे सूत सविस्तार ॥ तेंचि कथा सांगतसें ॥ ४३ ॥ सूत ह्मणे ऋषीश्वरांसीं ॥ गुरुभक्ती

असे विशेषीं ॥ तारावया संसारासी ॥ आणीक नाहीं उपाय ॥ ४४ ॥ अयोग्य अथवा ज्ञानवंत ॥ ह्मणोनि न पाहिजे अंत ॥ गुरुमूर्ती मनीं ध्यात ॥ सेवा करणें भक्तिभावें ॥४५॥ एक-दृढभक्ति असे जयापासीं ॥ सर्व धर्म साधती त्यासी ॥ संदेह न धरावा मानसीं ॥ गुणदोष न चित्तें भजावें ॥ ४६ ॥ श्रीगुरु नरू न ह्मणावा ॥ त्रैमूर्ती तोचि जाणावा ॥ जे जे भजती श्रीगुरु-विचारावा ॥ ह्मणावा तोचि ईश्वर ॥ ४७ ॥ येणेंपरी धरोनि मनीं ॥ मंत्रे तीर्थे रुचरणीं ॥ प्रसन्न होय शूलपाणी ॥ तात्काळिक परियेसा ॥ ४८ ॥ श्लोक ॥ मंत्रे तीर्थे द्विजे देवे दैवज्ञे भेषजे गुरौ ॥ यादृशीं भावनां कुर्यात् सिद्धिर्भवति तादृशी ॥ ४९ ॥ टीका ॥ मंत्र तीर्थ द्विजस्थानीं ॥ देहभक्ती औषधगुणीं ॥ गुरूसी पाहे शिवसमानीं ॥ भाविल्यासारिखें फल होय ॥ ५० ॥ ह्मणे सूत ऋषीश्वरांसी ॥ गुरुभक्ति ह्मणिजे आहे कैसी ॥ सांगेन साक्ष तुह्मांसी ॥ अपूर्व एक वर्तलेंसे ॥ ५१ ॥ पूर्वी पांचाळ नगरांत ॥ होता राजा सिंहकेत ॥ तयासी होता एक सुत ॥ नाम तयाचें धनंजय ॥ ५२ ॥ एके दिवशीं राजपुत ॥ गेला पारधीसी अरण्यांत ॥ जेथें नसती मनुष्यमात्र ॥ संगें होते शबर दूत ॥ हिंडतसे अरण्यांत ॥ उदकवर्जित स्थानासी ॥ ५३ ॥ राजकुमार तृषाक्रांत ॥ हिंडत होता वनांत ॥ श्रमले बहुत अवधारा ॥५४॥ तेथें एक शबरसुत ॥ देखता झाला अवचित ॥ जीर्ण एक शिवालय ॥ ५५ ॥ भिन्न लिंग तया स्थानीं ॥ पडिलें होतें मेदिनीं ॥ शबरें घेतलें उचलोनी ॥ ह्मणे लिंग बरवें असे ॥५६॥ हातीं घेवोनि लिंगासी ॥ पहात होता शबर हर्षी ॥ राजसुत तया संधीसी ॥ आला तया जवळिक ॥ ५७ ॥ राजकुमार ह्मणे तयासी ॥ भिन्न लिंग काय करिसी ॥ पडिलीं असती भूमीसी ॥

लिंगाकार अनेक ॥ ५८ ॥ शबर ह्मणे राजसुतातें ॥ माझ्या मनीं ऐसें येतें ॥ लिंगपूजा करावयातें ॥ ह्मणोनि घेतलें परियेसा ॥ ५९ ॥ ऐकोनि तयाचें वचन ॥ राजपुत्र सुहास्यवदन ॥ ह्मणे पूजीं एकमनें ॥ लिंग बरवें असे सत्य ॥ ६० ॥ ऐसें ह्मणतां राजकुमार ॥ तयासी करी नमस्कार ॥ कोण विधी पूजाप्रकार ॥ निरोपावें ह्मणतसे ॥ ६१ ॥ तुवां व्हावें मातें गुरू ॥ तुझा असें किंकरू ॥ नेणें पूजेचा प्रकारू ॥ विस्तारावें ह्मणतसे ॥ ६२ ॥ राजपुत्र ह्मणे तयासी ॥ न्यावा पाषाण घरासी ॥ पूजा करावी भक्तीसीं ॥ पत्र पुष्पें अर्चोनियां ॥ ६३ ॥ दंपत्य दोघेंजण ॥ पूजा करणें मनें पूर्ण ॥ हेंचि लिंग गिरिजारमण ॥ ह्मणोनि मनीं निर्धारीपां ॥ ६४ ॥ नानापरी पुष्पजाती ॥ आणाव्या तुवां शिवाप्रती ॥ धूप दीप नैवेद्य आरती ॥ नैवेद्यासीं भस्म जाण ॥ ६५ ॥ भस्म असेल जें स्मशानीं ॥ आणावें तुवां प्रतिदिनीं ॥ द्यावा नैवेद्य सुमनीं ॥ प्रसाद आपण भक्षावा ॥ ६६ ॥ आणीक जें जें जेवी आपण ॥ तेंही द्यावा नैवेद्य जाण ॥ ऐसें आहे पूजाविधान ॥ ह्मणोनी सांगे राजकुमार ॥ ६७ ॥ येणेंपरी राजकुमारू ॥ तया शबरासी झाला गुरू ॥ विश्वासें केला निर्धारू ॥ शबरें आपुले मनांत ॥ ६८ ॥ संतोषोनी शबर देखा ॥ नेलें लिंग गृहांतिका ॥ स्त्रियेसी सांगे कौतुका ॥ ह्मणे लिंग प्रसन्न झालें ॥ ६९ ॥ गुरुनिरोप जेणें रीती ॥ पूजा करीन एकचित्तीं ॥ चिताभस्म अतिप्रीतीं ॥ आणोनि नैवेद्या देतसे ॥ ७० ॥ क्वचित्काळ येणेंपरी ॥ पूजा करी शबरशबरी ॥ एके दिवशीं तया नगरीं ॥ चिताभस्म न मिळेचि ॥ ७१ ॥ हिंडोनि पाहे गांवोगांवीं ॥ चिताभस्म न मिळे कांहीं ॥ येणेंपरी सात गांवीं ॥ हिंडोनि आला घरासी ॥ ७२ ॥ चिंता लागली शबरासी ॥ पुसता झाला स्त्रियेसी ॥

काय करूं ह्मणे तिसी ॥ प्राण आपुला त्यजीन ह्मणे ॥ ७३ ॥ पूजा राहिली लिंगासी ॥ भस्म न मिळे नैवेद्यासी ॥ हिंडोनि आलों दाही दिशीं ॥ चिताभस्म न मिळेची ॥ ७४ ॥ जैसे गुरू आज्ञापिलें ॥ त्या विधीनें पाहिजे अर्चिलें ॥ नाहीं तरी वृथा गेलें ॥ शिवपूजन परियेसा ॥ ७५ ॥ गुरुचें वाक्य जो न करी ॥ तो पडेल रौरवघोरीं ॥ तयातें पाप नाहीं दूरी ॥ सदां दरिद्री होय नर ॥ ७६ ॥ त्यासी होय अधोगती ॥ अखंड नरकीं तया वस्ती ॥ जो करी गुरूची भक्ती ॥ तोचि तरेल भवार्णवीं ॥७७॥ सकळ शास्त्रें येणेंपरी ॥ बोलताती वेद चारी ॥ याचि कारणें ऐक हो शबरी ॥ प्राण आपुला त्यजीन ॥ ७८ ॥ ऐकोनि पतीचें वचन ॥ बोले शबरी हांसोन ॥ चिंता करितां काय कारण ॥ चिताभस्म देईन मी ॥ ७९ ॥ मज घालोनि गृहांत ॥ अग्नि लावा तुह्मीं त्वरित ॥ काष्ठें असती बहुत ॥ दहन करा आपणासी ॥ ८० ॥ तेंचि भस्म ईश्वरासी ॥ उपहारावें तुह्मीं हर्षी ॥ व्रतभंग न करावा भरंवसीं ॥ संतोषरूपें बोलतसे ॥ ८१ ॥ कधीं तरी शरीरासी ॥ नाश असे परियेसीं ॥ ऐसें कार्यकारणासी ॥ देह आपुला समर्पीन ॥ ८२ ॥ ऐकोनि स्त्रियेचें वचन ॥ शबर झाला मनीं खिन्न ॥ प्राणेश्वरी तुझा प्राण ॥ केवीं घ्यावा ह्मणतसे ॥ ८३ ॥ रूपें दिससी रतीसरसी ॥ अद्यापि तूं पूर्ववयासी ॥ पुत्र अपत्य न देखिलेंसी ॥ या संसारासीं येउनी ॥ ८४ ॥ मन नाहीं तुझें धालें ॥ संसारसुख नाहीं देखिलें ॥ तुझे मातापित्यानें मज निरविलें ॥ प्राणप्रिया रक्ष ह्मणोनी ॥ ८५ ॥ चंद्र सूर्य साक्षीसीं ॥ तुज वरिलें म्यां संतोषीं ॥ प्राण रक्षीन ह्मणोनि हर्षी ॥ घेवोनि आलों मंदिरांत ॥ ८६ ॥ आतां दहन करितां तूतें ॥ घडती पापें असंख्यातें ॥ स्त्रीहत्या महादोषातें ॥ केवीं करूं ह्मणतसे ॥८७॥

तूं माझी प्राणेश्वरी ॥ तूतें मारूं कवणेंपरी ॥ कैसा तुष्टेल त्रिपुरारी ॥ पुण्य जावोनि पाप पडे ॥ ८८ ॥ दुःखें तुझीं मातापिता ॥ मातें ह्मणती स्त्रीघातका ॥ अजूनि तुझी लावण्यता ॥ दिसतसे प्राणप्रिये ॥ ८९ ॥ नानाव्रतें नानाभक्ती ॥ या शरीरालागीं करिती ॥ दहन करूं कवणें रीतीं ॥ पापें मातें घडतील ॥ ९० ॥ ऐकोनि पतीचें वचन ॥ विनवीतसे सती आपण ॥ कैसें असे तुह्मां अज्ञान ॥ मिथ्या बोल बोलतसां ॥ ९१ ॥ शरीर ह्मणजे स्वप्नापरी ॥ जैसा फेण गंगेवरी ॥ स्थीर न राहे क्षणभरीं ॥ मरणें सत्य परियेसा ॥ ९२ ॥ आमुचे मायबापें जाण ॥ तुह्मां दिधलें मातें दान ॥ तुमची अर्धांगी मी पूर्ण ॥ भिन्न भावना कोठें असे ॥९३॥ मी ह्मणजे तुमचा देह ॥ विचार करोनि मनीं पाहे ॥ आपुलें अर्ध शरीर आहे ॥ काय दोष दहन करितां ॥ ९४ ॥ जें जें उपजे भूमीवरी ॥ तें तें नाश पावे निर्धारीं ॥ माझा देह संकल्प करी ॥ ईश्वरार्पित होईन ॥ ९५ ॥ संदेह सोडोनि आपणासी ॥ दहन करींवो वेगेंसीं ॥ आपण होवोनि संतोषीं ॥ निरोप देतें परियेसा ॥ ९६ ॥ नानापरी पतीसी ॥ बोधी शबरी परियेसीं ॥ घरांत जावोनि पतीसी ॥ ह्मणे अग्नि लावीं आतां ॥९७॥ संतोषोनि तो शबर ॥ बांधिता झाला गृहाचें द्वार ॥ अग्नि लाविता धुरंधर ॥ ज्वाळा व्यापिती गगनासीं ॥ ९८ ॥ दहन झालें शबरीसीं ॥ भस्म घेतलें परियेसीं ॥ पूजा करोनि शिवासी ॥ नैवेद्य दिधला अवधारा ॥ ९९ ॥ पूजा करितां ईश्वरासी ॥ आनंद झाला बहुवसीं ॥ स्त्री दिधली हुताशीं ॥ स्मरण ऐसें त्यासी नाहीं ॥ १०० ॥ ऐसी भक्तीभावेंसीं ॥ पूजा केली महेश्वरासी ॥ प्रसाद घेवोनि हस्तेंसी ॥ पाचारिलें स्त्रियेतें ॥ १ ॥ जैसी पूजा नित्य करोन ॥ प्रसाद हातीं घेऊन ॥ आपुले स्त्रियेतें बोलावोन ॥ देत होता

तो शबर ॥ २ ॥ तया दिवशीं त्याचपरी ॥ आपुल्या स्त्रियेतें पाचारी ॥ कृपासागर त्रिपुरारी ॥ प्रसन्न झाला परियेसा ॥ ३ ॥ तेचि शबरी येवोनी ॥ उभी ठाकली हास्यवदनीं ॥ घेतला प्रसाद मागोनी ॥ घेवोनि गेली घरांत ॥ ४ ॥ जैसें तैसेंचि घर दिसे ॥ शबर विस्मय करीतसे ॥ ह्मणे दग्ध केलें स्त्रियेसरिसें ॥ घर कैसें दिसताहे ॥ ५ ॥ बोलावोनि स्त्रियेसी ॥ शबर पुसतसे तियेसी ॥ दहन केलें मीं तुजसी ॥ पुनरपि कैसी आलीस ॥ ६ ॥ शबरी सांगे पतीसी ॥ आपणास आठवण आहे ऐसी ॥ अग्नि लावितां घरासी ॥ निद्रिस्थ झालें परियेसीं ॥ ७ ॥ महाशीतें पीडित ॥ आपण होतें निद्रिस्थ ॥ तुमचे बोल ऐकोनि सत्य ॥ उठोनि आल्यें परियेसा ॥८॥ ही होईल देवकरणी ॥ प्रसन्न झाला शूलपाणी ॥ ऐसें ह्मणतां तत्क्षणीं ॥ निजस्वरूपीं उभा ठाकला ॥ ९ ॥ नमन करिती लोटांगणीं ॥ धांवोनि लागती दोघें चरणीं ॥ प्रसन्न झाला शूलपाणी ॥ मागा वर ह्मणतसे ॥ १० ॥ होईल सुख संसारीं ॥ राज्य दिधलें धुरंधरी ॥ गती होईल त्यानंतरीं ॥ कल्पकोटि स्वर्गवास ॥११॥ यापरी ऋषीश्वरांसी ॥ सूत सांगे विस्तारेंसी ॥ गुरुचरणीं विश्वास असे ज्यासी ॥ तैसें फळ होय जाण ॥ १२ ॥ ह्मणोनि श्रीगुरु शिष्यांसीं ॥ सांगता झाला परियेसीं ॥ विश्वासें करोनि द्विज हर्षीं ॥ शुष्क काष्ठ सेवितसे ॥ १३ ॥ जैसा भाव तैसी सिद्धी ॥ होईल सत्य हे त्रिशुद्धी ॥ श्रीगुरुनाथ कृपानिधी ॥ सहज निघाले संगमासी ॥१४॥ जावोनि करिती अनुष्ठान ॥ पाहावया येती ब्राह्मण ॥ देखोनि त्याचें अंतःकरण ॥ प्रसन्न झाले तत्क्षणीं ॥ १५ ॥ होता कमंडलु करकमळीं ॥ भरला तदा गंगाजळीं ॥ उचलोनियां हस्तकमळीं ॥ घालिती उदक काष्ठासी ॥ १६ ॥ तेचक्षणीं काष्ठासी ॥ पल्लव

आले परियेसीं ॥ औदुंबर वृक्ष ऐसी ॥ दिसतसे समस्तां ॥ १७ ॥ जैसा चिंतामणी-स्पर्शे ॥ सुवर्ण करी लोहास ॥ तैसा श्रीगुरु सुधारस ॥ काष्ठ झाला औदुंबर ॥ १८ ॥ काष्ठ दिसे औदुंबर ॥ सुदेही झाला तो विप्र ॥ दिसे सुवर्णकांति नर ॥ गेलें कुष्ट तात्काळीं ॥ १९ ॥ संतोषोनी द्विजवर ॥ करी साष्टांग नमस्कार ॥ करिता झाला महास्तोत्र ॥ श्रीगुरूचें तये वेळीं ॥ २० ॥ श्लोक ॥ इंदुकोटितेजकीर्णसिंधुभक्तवत्सलं ॥ नंदनात्रिसूनुदत्तमिंदिराक्षश्रीगुरुम् ॥ गंधमाल्यअक्षतादिवृंददेववंदितं ॥ वंदयामि नारसिंह सरस्वतीश पाहि माम् ॥ २१ ॥ मोहपाश अंधकारछायदूरभास्करं ॥ आयताक्ष पाहि श्रीवल्लभेशनायकम् ॥ सेव्य भक्तवृंदवरद भूय भूय नमाम्यहम् ॥ वंदयामि नारसिंह सरस्वतीश पाहि माम् ॥ २२ ॥ चित्तजादि वर्गषट्क मत्तवारणांकुशम् ॥ सत्वसारशोभितात्मदत्तश्रीयवल्लभम् ॥ उत्तमावतारभूत कर्तृभक्तवत्सलम् ॥ वंदयामि नारसिंह सरस्वतीश पाहि माम् ॥ २३ ॥ व्योम वायु तेज आप भूमि कर्तृमीश्वरम् ॥ कामक्रोध मोहरहित सोमसूर्यलोचनम् ॥ कामितार्थदात भक्तकामधेनु श्रीगुरुम् ॥ वंदयामि नारसिंह सरस्वतीश पाहि माम् ॥ २४ ॥ पुंडरीक आयताक्षकुंडलेंदुतेजसम् ॥ चंडदुरितखंडनार्थ दंडधारि श्रीगुरुम् ॥ मंडलीकमौलिमार्तंड भासिताननम् ॥ वंदयामि नारसिंह सरस्वतीश पाहि माम् ॥ २५ ॥ वेदशास्त्रस्तुत्यपादमादिमूर्ती श्रीगुरुम् ॥ नादबिंदुकलातीतकल्प पादसेव्ययम् ॥ सेव्यभक्तवृंदवरद भूय भूय नमाम्यहम् ॥ वंदयामि नारसिंह सरस्वतीश पाहि माम् ॥ २६ ॥ अष्टयोगतत्वनिष्ठ तुष्ट ज्ञानवारिधिम् ॥ कृष्णावेणितीरवास पंचनदीसंगमम् ॥ कष्टदैन्यदूरभक्ततुष्टकाम्यदायकम् ॥ वंदयामि नारसिंह सरस्वतीश पाहि माम् ॥ २७ ॥ नारसिंह सरस्वतीय नामअष्ट-

धारणीकदेव दीक्ष गुरुमूर्तींतो-
मौक्तिकम् ॥ हारकृत्यशारदेन गंगाधराख्य आत्मजम् ॥ नारसिंह सरस्वतीय अष्टकं च यः पठेत् ॥
षितम् ॥ परमानंद श्रीय पुत्रपौत्रदायकम् ॥२८॥ सारज्ञान दीर्घआयुरारोग्यादि संपदाम् ॥ चारुव-
घोरसंसारसिंधुतारणाख्यसाधनम् ॥ स्तोत्र केलें येणेंपरी ॥ आणीक विनवी परोपरी ॥
र्गकामलाभ नित्यमेव यः पठेत् ॥ २९ ॥ ह्मणोनि मागुती नमस्कारी ॥ श्रीगुरुनाथ
ह्मणे देवा श्रीहरी ॥ कृपा केली स्वामियां ॥ ३० ॥ ज्ञानराशी ह्मणोनियां ॥ ३१ ॥ समस्त लोक
अभय करीं ॥ उठविता झाला अवधारी ॥ नानापरी स्तोत्रें करिती ॥ भक्तिभावें करो-
विस्मय करिती ॥ श्रीगुरुतें नमस्कारिती ॥ समस्त शिष्यादि द्विजांसरसीं ॥ ग्रामलोक आनंदें-
नियां ॥ ३२ ॥ मग निघाले मठासी ॥ जावोनि बैसती मठांत ॥ शिष्यांसहित श्रीगुरुनाथ ॥
सीं ॥ घेउनि येती आरत्या ॥ ३३ ॥ तया विप्रा बोलावोनी ॥ सद्गुरु
समाराधना असंख्यात ॥ झाली ऐका ते दिनीं ॥ ३४ ॥ तुझी संतति वाढेल ॥ ३५ ॥ तुझें नाम
ह्मणती संतोषोनी ॥ कन्या पुत्र धन गोधनीं ॥ तूंचि आमुचा भक्त जाण
योगेश्वर ॥ आह्मीं ठेविलें निर्धार ॥ समस्त शिष्यांमाजि थोर ॥ होतील पुरुष निर्माण ॥ ह्मणोनि देती
॥ ३६ ॥ वेदशास्त्रीं संपन्न ॥ तुझ्या वंशोवंशीं जाण ॥ जावोनि आणी कलत्रासी ॥ तुह्मीं रहावें आ-
निरोप ॥ ३७ ॥ श्रीगुरु म्हणती तयासी ॥ ह्मणोनि तया द्विजासी ॥ श्रीगुरु मंत्र उपदेशी ॥
पणापाशीं ॥ याचि ग्रामीं नांदत ॥ ३८ ॥ तूतें होतील तिघे सुत ॥ एका-
विद्या सरस्वती या मंत्रासी ॥ उपदेशिलें परियेसा ॥ ३९ ॥ वंशोवंशीं माझे दास ॥ ४० ॥
चें नांव योगी विख्यात ॥ आमुची सेवा करील बहुत ॥ ह्मणोनि सिद्धें सांगितलें ॥ नामधा-
जैसें श्रीगुरूंनीं निरोपिलें ॥ तयापरी त्यासी झालें ॥

रक शिष्यासी ॥ ४१ ॥ ह्मणोनि सरस्वती गंगाधर ॥ सांगे श्रीगुरुचरित्र विस्तार ॥ उत-
रावया पैलपार ॥ कथा ऐका एकचित्तें ॥ ४२ ॥ इति श्रीगुरुचरित्रामृत ॥ कुष्टी उद्धरला
भक्त ॥ गुरुमहिमा अत्यद्भुत ॥ प्रकट झाला येणेंपरी ॥ ४३ ॥ इति श्रीगुरुचरित्रपरमकथा-
कल्पतरौ श्रीनृसिंहसरस्वत्युपाख्याने सिद्धनामधारकसंवादे शुष्ककाष्ठसंजीवनं नाम
चत्वारिंशत्तमोऽध्यायः ॥ ओंव्या १४३ ॥

॥ श्रीगणेशाय नमः ॥ नामधारक शिष्य देखा ॥ उभा राहोनि संमुखा ॥ कर जोडूनी
कौतुका ॥ नमन करी साष्टांगीं ॥ १ ॥ जयजयाजी सिद्धमुनी ॥ तूं तारक भवार्णीं ॥ ना-
नाधर्म विस्तारोनी ॥ गुरुचरित्र निरोपिलें ॥ २ ॥ तेणें धन्य झालों आपण ॥ प्रकाश केलें
महाज्ञान ॥ सुधारस गुरुस्मरण ॥ प्राशविला दातारा ॥ ३ ॥ एक असे माझी विनंती ॥ नि-
रोपावें मजप्रती ॥ आमुच्या पूर्वजें कवणे रीती ॥ सेवा केली श्रीगुरूची ॥ ४ ॥ तुह्मी
सिद्ध महाज्ञानी ॥ होता श्रीगुरुसान्निधानीं ॥ शिष्य झाले कवणे गुणीं ॥ निरोपावें दातारा
॥ ५ ॥ ऐकोनि शिष्याचें वचन ॥ सिद्ध सांगे विस्तारोन ॥ एकचित्तें करोनी मन ॥ ऐक
शिष्या नामधारका ॥ ६ ॥ पूर्वीं कथानक सांगीतलें ॥ जे कां श्रीगुरूसी भेटलें ॥ वोसर
ग्रामीं होते भले ॥ पूर्वज तुमचे परियेसा ॥ ७ ॥ तयाचें नांव सायंदेव ॥ केली पूजा भक्ती-
भावें ॥ त्यावरी प्रीती अति स्नेह ॥ आमुचे श्रीगुरुमूर्तीची ॥ ८ ॥ तेथून आले दक्षिण
दिशीं ॥ गाणगापुरीं परियेसी ॥ ख्याती झाली दशदिशीं ॥ कीर्ति वाढली बहुवस ॥ ९ ॥
ऐकोनि येती सकळ जन ॥ करिती श्रीगुरुदर्शन ॥ जे मनीं करिती चिंतन ॥ पूर्ण होय
तयांचें ॥ १० ॥ येणेंपरी श्रीगुरुमूर्ती ॥ होते गाणगापुरीं ख्याती ॥ नाम नृसिंहसरस्वती ॥
भक्तवत्सल निर्धारीं ॥ ११ ॥ तुमचा पूर्वज जो का होता ॥ सायंदेव भक्त विख्याता ॥
त्याणें ऐकिलें वृत्तांता ॥ महिमा श्रीगुरु यतीचा ॥ १२ ॥ भक्तिपूर्वक वेगेंसी ॥ आला
गाणगापुरासी ॥ आनंद बहू मानसीं ॥ हर्षें निर्भर होऊनी ॥ १३ ॥ दुरूनि देखिलें गाण-
गाभुवन ॥ आपण घाली लोटांगण ॥ करी दंडप्राय नमन ॥ ऐशापरी चालिला ॥ १४ ॥
ऐसा दंडप्रणाम करीत ॥ गेला विप्र मठांत ॥ देखिले तेथें मूर्तिमंत ॥ परात्पर श्रीगुरू

॥ १५ ॥ साष्टांग नमस्कार करीत ॥ असे चरणावरी लोळत ॥ केशीं करूनि पाय झाडी-
त ॥ भक्तिभावें करूनियां ॥ १६ ॥ करसंपुट जोडोनी ॥ स्तुति करी एकाग्र मनीं ॥ त्रैमूर्ती
तूंचि ज्ञानी ॥ गुरुमूर्ती स्वामियां ॥ १७ ॥ धन्य धन्य जन्म आपुलें ॥ कृतार्थ माझे पितर
झाले ॥ कोटि जन्मांचें पाप गेलें ॥ ह्मणोनि चरणीं लागला ॥ १८ ॥ जयजयाजी श्रीगु-
रुमूर्ती ॥ त्राही त्राही विश्वपती ॥ परमात्मा परंज्योती ॥ नृसिंहसरस्वती स्वामियां ॥ १९ ॥
तुझे चरण वर्णावयासी ॥ शक्ति कैंची आह्मांसी ॥ परमात्मा तूंचि होसी ॥ भक्तवत्सला
स्वामियां ॥ २० ॥ तुमचे चरणाचिये प्रौढी ॥ वसती तेथें तीर्थकोटी ॥ वर्णिती श्रुती घडो-
घडी ॥ चरण पवित्र येणेंपरी ॥ २१ ॥ त्रैमूर्तीचा अवतार ॥ मज दिससी साक्षात्कार ॥
भासत असे निरंतर ॥ त्रैमूर्ती तूंचि होसी ॥ २२ ॥ परब्रह्म तुह्मी केवळु ॥ हातीं दंड कमं-
डलु ॥ अमृत भरलें सोज्वळु ॥ प्रोक्षितां प्रेत उठतसे ॥ २३ ॥ दंड धरिला याकारणें ॥ श-
रणागतातें रक्षणें ॥ दुरित दैन्य निवारणें ॥ निजभक्त रक्षावया ॥ २४ ॥ रुद्राक्षमाला
भस्मधारण ॥ व्याघ्रचर्माचें आसन ॥ अमृतदृष्टी इंदुनयन ॥ क्रूरदृष्टी अग्निसूर्य ॥ २५ ॥
चतुर्विध पुरुषार्थासी ॥ भक्तजनां तूंचि होसी ॥ तूंचि रुद्र सत्य होसी ॥ तूं नरसिंह
जगद्गुरू ॥ २६ ॥ विष्णुरूपें करिसी रक्षण ॥ पीतांबर पांघरुण ॥ तीर्थें समस्त
तुझे चरण ॥ भक्ताभिमानी विष्णु तूंची ॥ २७ ॥ वांझेसी कन्यापुत्र देसी ॥ शुष्क
काष्ठा जीव आणिसी ॥ दुभाविली वांझ महिषी ॥ अन्न पुरविलें ब्राह्मणां ॥ २८ ॥ विष्णु-
मूर्ती तूंचि जाण ॥ त्रिविक्रमभारती ऐसी खूण ॥ साक्ष दिधली अंतःकरण ॥ विश्वरूप
दाखविलें ॥ २९ ॥ ह्मणविले वेद पतिताकरवीं ॥ अपार महिमा झाला पूर्वी ॥ नरहरी-

अवतारमूर्ती बरवी ॥ आलेती भक्त तारावया ॥ ३० ॥ ऐसी नानापरी स्तुती करीत ॥
पुनः पुनः नमन करीत ॥ सद्गदित कंठ होत ॥ रोमांच अंगीं उठले ॥३१॥ आनंदाश्रु लोचनीं ॥
निघती संतोषें बहु मनीं ॥ नवविधा भक्ती करोनी ॥ स्तुति केली श्रीगुरुची ॥ ३२ ॥
संतोषोनी श्रीगुरुमूर्ती ॥ तया विप्रा आश्वासिती ॥ माथां हस्त ठेवोनी ह्मणती ॥ परमभक्त
तूंचि आह्मां ॥ ३३ ॥ तुवां जें कां स्तोत्र केलें ॥ तेणें माझें मन धालें ॥ तुजला वरदान
दिधलें ॥ वंशोवंशीं माझा दास ॥३४॥ ऐसा वर देऊनी ॥ गुरुमूर्ती संतोषोनी ॥ मस्तकीं हस्त
ठेवोनी ॥ ह्मणती जाय संगमासी ॥३५॥ स्नान करून संगमासी ॥ पूजा करी अश्वत्थासी ॥
त्वरित यावें मठासी ॥ पंक्तीं करीगा भोजन ॥ ३६ ॥ येणेंपरी श्रीगुरुमूर्ती ॥ तया
विप्रा निरोप देती ॥ गुरुनिरोप जेणें रीतीं ॥ आला स्नान करोनियां ॥३७॥ षोडशोपचारें
श्रीगुरुसी ॥ पूजा करी भक्तीसीं ॥ अनेकपरी पक्वान्नेंसी ॥ भिक्षा करवी परियेसा ॥३८॥
भक्तवत्सल गुरुमूर्ती ॥ तया विप्रा आपुले पंक्तीं ॥ समस्त शिष्यांहूनि प्रीति ॥ ठाव देती
आपुल्या जवळी ॥ ३९ ॥ भोजन झालें श्रीगुरुसी ॥ शिष्यांसहित विप्रांसी ॥ संतोषोनी
आनंदेंसीं ॥ बैसले होते मठांत ॥४०॥ तया सायंदेव विप्रासी ॥ श्रीगुरु पुसती प्रीतीसीं ॥
तुझें स्थान कोणे देशीं ॥ कलत्र पुत्र कोठें असती ॥ ४१ ॥ पुसती क्षेमसमाधान ॥ कैसें
तुमचें वर्तमान ॥ कृपा असे परिपूर्ण ॥ ह्मणोनि पुसती संतोषें ॥ ४२ ॥ ऐकोनी श्रीगुरूचें
वचन ॥ सांगे सायंदेव विस्तारोन ॥ कन्या पुत्र बंधुजन ॥ समस्त क्षेम असती स्वामियां
॥ ४३ ॥ उत्तरकांची ह्मणोनि ग्रामीं ॥ तेथें वसोनि असतों आह्मी ॥ तुझ्या कृपें समस्त
क्षेमी ॥ असों देवा कृपासिंधु ॥ ४४ ॥ पुत्रवर्ग बंधुवर्ग जाणा ॥ करिती संसारयातना ॥

आपुले मनींची वासना ॥ करीन सेवा श्रीगुरूसी ॥ ४५ ॥ करूनि सेवा श्रीगुरूची ॥ असेन स्वामि परियेसीं ॥ ऐसा माझे मानसीं ॥ निर्धार असे देवराया ॥ ४६ ॥ ऐकोनि तयाचें वचन ॥ श्रीगुरू ह्मणती हांसोन ॥ आमुची सेवा असे कठिण ॥ आह्मा वास बहुता ठायीं ॥४७॥ एके समयीं अरण्यांत ॥ अथवा राहूं गांवांत ॥ आह्मांसवें कष्ट बहूत ॥ तुह्मी केवीं राहूं शका ॥ ४८ ॥ येणेंपरी श्रीगुरुमूर्ती ॥ तया विप्रा निरोपिती ॥ ऐकोनि विनवी मागुती ॥ ह्मणे स्वामी अंगिकारा ॥ ४९ ॥ गुरूची सेवा करी नर ॥ तोचि उतरेल पैलपार ॥ तयासी कैसें दुःख घोर ॥ सदां सुखी तोचि होय ॥ ५० ॥ चतुर्विध पुरुषार्थ ॥ देऊं शके श्रीगुरुनाथ ॥ त्यासी नाहीं यमपंथ ॥ गुरुभक्ती मुख्य कारण ॥५१॥ येणेंपरी श्रीगुरूसी ॥ सायंदेव भक्तीसीं ॥ विनवीतसे परियेसीं ॥ संतोषी झाले श्रीगुरु-मूर्ती ॥ ५२ ॥ श्रीगुरु तया विप्रा ह्मणती ॥ जैसें असे तुझे चित्तीं ॥ दृढ असेल मनीं भक्ती ॥ तरीच करी अंगिकार ॥ ५३ ॥ स्थिर करोनी अंतःकरण ॥ करितां सेवा गुरु-चरण ॥ झाले मास तीन जाण ॥ ऐक शिष्या नामकरणी ॥ ५४ ॥ वर्ततां ऐसें एके दिवसीं ॥ श्रीगुरु निघाले संगमासी ॥ सवें घेतलें सायंदेवासी ॥ समस्तांतें वारूनी ॥५५॥ भक्ताचें अंतःकरण ॥ पहावया गेले श्रीगुरु आपण ॥ पूर्वज तुमचा भोळा जाण ॥ जात असे संगमासी ॥ ५६ ॥ भक्तासहित संगमासी ॥ गेले श्रीगुरू स्वस्थळासी ॥ बैसते झाले अश्वत्थासीं ॥ सुखगोष्टी करिताती ॥ ५७ ॥ दिवस गेला अस्तमानीं ॥ श्रीगुरु विचार करिती मनीं ॥ दृढ याचे अंतःकरणीं ॥ कैसें असे पाहूं ह्मणती ॥ ५८ ॥ उठविती वारा अवचित ॥ तेणें वृक्ष पडों पहात ॥ पर्जन्य झाला बहुत ॥ मुसळधारा वर्षतसे

गु. च.

अ. ४१

॥ ५९ ॥ सायंदेव होता जवळी ॥ सेवा केली तयेवेळीं ॥ केला आश्रय वृक्षातळीं ॥ वस्त्रें-
करूनि श्रीगुरुसी ॥ ६० ॥ पर्जन्य वारा समस्त देखा ॥ साहिलें आपण भावें ऐका ॥
उभा राहोनी संमुखा ॥ सेवा करी एकभावें ॥ ६१ ॥ येणेंपरी याम दोन ॥ पर्जन्य आला
महा क्षोभोन ॥ आणीक वारा उठोन ॥ वाजे शीत अत्यंत ॥ ६२ ॥ श्रीगुरु ह्मणती ब्राह्म-
णासी ॥ सीत झालें बहुवशी ॥ तुवां जाउनी मठासी ॥ अग्नि आणावा शेकावया ॥ ६३ ॥
निवाला शिष्य देखोनी ॥ श्रीगुरु म्हणती हांसोनी ॥ नको पाहूं आपुले नयनीं ॥ उभय
पार्श्व भागातें ॥ ६४ ॥ गुरुनिरोपें येणेंपरी ॥ निघता झाला झडकरी ॥ न दिसे वाट अंध-
कारीं ॥ खुणे खुणे जातसे ॥ ६५ ॥ अंधकार महाघोर ॥ पाऊस पडे धुरंधर ॥ न दिसे
वाटेचा प्रकार ॥ जात असे भक्तिपूर्वक ॥ ६६ ॥ मनीं ध्याय श्रीगुरूसी ॥ जातसे तैसा
मार्गेसीं ॥ लवतां वीज संधीसी ॥ तेणें तेजें जातसे ॥ ६७ ॥ येणेंपरी द्विजवर ॥ पावला
त्वरित गाणगापूर ॥ वेशीपासीं जाऊनि थोर ॥ हांक मारिली द्वारपाळा ॥ ६८ ॥ तयासी
सांगे वृत्तांत ॥ आणोनि दिला अग्नि त्वरित ॥ घालूनियां भांड्यांत ॥ घेवोनि गेला
परियेसा ॥ ६९ ॥ नसे मार्ग अंधकार ॥ विजेचे तेजें जातसे नर ॥ मनीं करीतसे विचार ॥
श्रीगुरुनीं मातें निरोपिलें ॥ ७० ॥ इहींकडे न पाहे निगुती ॥ श्रीगुरु मातें निरोपिती ॥
याची कैसी आहे स्थिती ॥ ह्मणोनि पाहे तयेवेळीं ॥ ७१ ॥ आपुले दक्षिण दिशेसी ॥
पहातां देखे सर्पासी ॥ भिऊनि पळतां उत्तरेसी ॥ अद्भुत दिसे महानाग ॥ ७२ ॥ पांच-
फणी दिसती दोनी ॥ सवेंचि येताती धांवोनी ॥ विप्र भ्याला आपुले मनीं ॥ धांवत
जातसे भिउनियां ॥ ७३ ॥ वाट सोडून जाय रानीं ॥ सवेंचि येताती सर्प दोनी ॥ जातां

पा. ४१२

गु. च.

भयभीत होउनी ॥ अतिशीघ्र धांवतसे ॥ ७४ ॥ स्मरता झाला श्रीगुरुसी ॥ एकभावें धैर्यैंसीं ॥ पळतसे श्वासोच्छ्वासीं ॥ पातला संगमाजवळिक ॥ ७५ ॥ दुरूनि देखे श्रीगुरूसी ॥ सहस्रदीप ज्योतीसरसी ॥ दिसती विप्र बहुवशी ॥ वेदध्वनी ऐकतसे ॥ ७६ ॥ जवळीं जातां द्विजवरू ॥ एकला दिसे श्रीगुरू ॥ गेला समस्त अंधकारू ॥ दिसे चंद्र पौर्णिमेचा ॥ ७७ ॥ प्रज्वलित केलें अग्नीसी ॥ उजेड झाला बहुवशी ॥ झाला विप्र सावधेसी ॥ पाहातसे श्रीगुरूतें ॥ ७८ ॥ दोनी सर्प येवोनी ॥ श्रीगुरुतें वंदोनी ॥ सवेंचि गेले निघोनी ॥ विप्र पूर्वींचि भ्यालासे ॥ ७९ ॥ श्रीगुरू पुसती तयासी ॥ कांगा भयाभीत झालासी ॥ आम्हीं तूंतें रक्षावयासी ॥ सर्प दोन पाठविले ॥ ८० ॥ न धरी आतां भय कांहीं ॥ आम्हांची सेवा कठिण पाहीं ॥ विचार करूनि आपुल्या देहीं ॥ अंगिकारी मुनिसेवा ॥ ८१ ॥ गुरुभक्ती असे कठिण ॥ दृढभक्तीनें सेवा करणें ॥ कळिकाळाचें नाहीं भेणें ॥ तया शिष्या परियेसा ॥ ८२ ॥ साष्टांग तयेवेळीं ॥ लागतसे श्रीगुरुचरणकमळीं ॥ विनवीतसे करुणा बाहाळीं ॥ कृपा करीं ह्मणोनियां ॥८३॥ गुरुभक्तीचा प्रकारू ॥ निरोपावा मातें श्रीगुरू ॥ जेणें माझें मन स्थिरू ॥ होवोनि राहे तुझांजवळी ॥८४॥ श्रीगुरु ह्मणती विप्रासी ॥ सांगेन कथा तुरसी ॥ नगमे वळे रात्रीसीं ॥ ब्राह्ममुहूर्त होय तंव ॥ ८५ ॥ पूर्वी कैलासशिखरासी ॥ बैसला होता व्योमकेशी ॥ अर्धांगी पार्वतीसी ॥ कथा एकांतीं सांगतसे ॥ ८६ ॥ गिरिजा पुसे ईश्वरासी ॥ गुरुभक्ति ह्मणिजे अहे कैसी ॥ विस्तारोनि आह्मांसी ॥ सांगा ह्मणे तयेवेळीं ॥८७॥ शिव सांगे गिरिजेसी ॥ सर्व साध्य गुरुभक्तीसीं ॥ करावें एक भावेंसीं ॥ शिव जो तोचि गुरु होय ॥ ८८ ॥ याचें एक आख्यान ॥ सांगेन तुज विस्तारोन ॥ एकचित्तें क-

अ. ४१

पा. ४१३

रूनि मन ॥ ऐंक गिरिजे ह्मणतसे ॥ ८९ ॥ गुरुभक्ति ह्मणिजे सुलभपणें ॥ तत्काळीं साध्य न होय जाणें ॥ अनेक जप अनुष्ठानें ॥ करितां विलंब परियेसी ॥ ९० ॥ नानातपें अनुष्ठानें ॥ करिती यज्ञ महादानें ॥ त्यांतें होतीं महाविघ्नें ॥ साध्य होतां दुर्लभ ॥ ९१ ॥ जो गुरुभक्ति करी निर्मळ ॥ साध्य होईल तात्काळ ॥ यज्ञ दान तप फळ ॥ सर्व सिद्धि त्यासी होतीं ॥ ९२ ॥ सुलभ असे अभ्यास ॥ जो जाणे गुरुकुलवास ॥ एकभावें करोनि आस ॥ आराधावें श्रीगुरूसी ॥९३॥ याचा एक दृष्टांत ॥ सांगेन ऐक एकचित्त ॥ ब्रह्मयाचा अवतार व्यक्त ॥ त्वष्टब्रह्मा परियेसा ॥९४॥ तयासी जाहला एक कुमार ॥ अति लावण्य सुंदर ॥ सर्व धर्म कुशळ धीर ॥ योग्य झाला उपनयना ॥९५॥ त्वष्टब्रह्मा पुत्रासी ॥ व्रतबंध करी युक्तीसीं ॥ करावया विद्याभ्यासासी ॥ गुरूचे घरीं राहविला ॥९६॥ गुरूची सेवा नानापरी ॥ करीतसे ब्रह्मचारी ॥ वर्ततां ऐशियापरी ॥ अपूर्व एक वर्तलें ॥९७॥ वर्ततां ऐसें एके दिवसीं ॥ आला पर्जन्य बहुवशी ॥ पर्णशाळा परियेसी ॥ गळतसे गुरूची॥९८॥तयेवेळीं शिष्यासी॥ निरोपिती गुरू त्यासी ॥ त्वरित करावें आह्मांसी ॥ एक गृह दृढ ऐसें ॥ ९९ ॥ पर्णशाळा प्रतिवर्षीं ॥ जीर्ण होतसे परियेसी ॥ गृह करावें दृढतरेसी ॥ कधीं जीर्ण नोहे ऐसें ॥१००॥ न तुटे कधीं राहे स्थिर ॥ दिसावें रम्य मनोहर ॥ असावें सर्वपरिकर ॥ करी शीघ्र गृह ऐसें ॥ १ ॥ ऐसें गुरू निरोपिती ॥ तेच समयीं गुरूची सती ॥ सांगतसे अतिप्रीतीं ॥ मातें कंचुकी आणावी ॥ २ ॥ नसावी विणली अथवा शिवली ॥ विचित्र रंग पाहिजे केली ॥ माझ्या अंगप्रमाण वहिली ॥ त्वरित आणी ह्मणतसे ॥ ३ ॥ गुरुपुत्र ह्मणे शिष्यासी ॥ मागेन तें आणीं वेगेसीं ॥ पादुका पाहिजेत आह्मांसी ॥ उदकावरूनि

चालती ऐशा ॥४॥ अथवा चिखल न लागे त्यांसी ॥ न व्हाव्या अधिक पायांसी ॥ जेथें चिंतूं मानसीं ॥ तेथें घेऊनि जाती ऐशा ॥ ५ ॥ इतुकिया अवसरीं ॥ गुरुकन्या काय करी ॥ जातां तयाचा पल्लव धरी ॥ आपणा कांहीं आणावें ॥६॥ उंच तानवडे आपणासी ॥ घेऊनि यावें परियेसी ॥ आणीक आणा खेळावयासी ॥ घरकुल एक आपणा ॥ ७ ॥ कुंजरदंताचें बरवें ॥ घरकुल तुवां आणावें ॥ एकस्तंभी असावें ॥ कधीं न तुटे न होय जीर्ण ॥ ८ ॥ जेथें नेईन तेथें यावें ॥ सोपस्करासहित असावें ॥ पाट ठाणवी असावें ॥ तया घराभीतरीं ॥ ९ ॥ सदां दिसावें नूतन ॥ वावरत असावें आपें आपण ॥ करावया पाकनिष्पन्न ॥ मडक्ीं करूनि आणिपां ॥ १० ॥ आणीक एक सांगेन तुज ॥ रांधण करावया शिकवी मज ॥ पाक केलिया उष्ण सहज ॥ असों नये अन्न जाणा ॥ ११ ॥ पाक करितां मडकियेसी ॥ न लागे काजळ परियेसी ॥ आणोनि देगा भांडीं ऐसीं ॥ आणिक सर्व सोपस्कार ॥ १२ ॥ गुरुकन्या ऐसें ह्मणे ॥ अंगिकारिलें शिष्यराणें ॥ निघता झाला तत्क्षणें ॥ महा अरण्यांत प्रवेशला ॥ १३ ॥ मनीं चिंता बहु करी ॥ आपण बाळ ब्रह्मचारी ॥ काय ह्मणे त्यांची परी ॥ केवीं करूं म्हणतसे ॥ १४ ॥ पत्रावळी करूं नेणें ॥ इतुकें मातें कधीं होणें ॥ स्मरतसे एकाग्र मनें ॥ श्रीगुरुचरण देखा ॥ १५ ॥ आतां कैसें काय करूं ॥ मातें कोणचा आधारू ॥ बोल ठेवील माझा गुरू ॥ शीघ्र इतुकें न करितां ॥ १६ ॥ कवणापाशीं जाऊं शरण ॥ कवण राखेल माझा प्राण ॥ कृपानिधि गुरुवीण ॥ ऐसा कवण असे दुजा ॥ १७ ॥ जरी नायकें गुरूचा बोल ॥ शाप देईल तत्काळ ॥ ब्रह्मचारी आपण बाळ ॥ ॥ ह्मणोनि अंगिकार कां केला ॥ १८ ॥ काय गति आपणासी ॥

आतां जाऊं कवणापाशीं ॥ अशक्त बाळ मी अज्ञानासीं ॥ अंगिकार कां केला ॥ १९ ॥ गुरुवाक्य मज कारण ॥ मातें करी निर्वाण ॥ वेंचीन आतां आपुला प्राण ॥ गुरुनिरोप करीन मी ॥ २० ॥ ऐसें महा अरण्यांत ॥ जातसे बाळ चिंता करीत ॥ श्रमोनियां अत्यंत ॥ निर्वाण मनें जातसे ॥ २१ ॥ पुढें जात मार्ग क्रमित ॥ तंव भेटला एक अवधूत ॥ तेणें बाळ देखिला तेथ ॥ पुसता झाला तयेवेळीं ॥ २२ ॥ कवणाचा बाळ कोठें जासी ॥ चिंताव्याकुळ दिससी मानसीं ॥ विस्तारोनि आह्मांसी ॥ सांग ह्मणे तये वेळीं ॥ २३ ॥ ऐसें म्हणतां ब्रह्मचारी ॥ जाऊनियां नमस्कारी ॥ ह्मणे स्वामी तारी तारी ॥ चिंतासागरीं बुडतसें ॥ २४ ॥ भेटलासी तूं निधानू ॥ जैशी वत्सालागीं धेनू ॥ दुःखी झालों होतों आपणू ॥ देखतां मन निवालें ॥ २५ ॥ जैसें चकोर पक्षियातें ॥ चांदणें देखतां मन हर्षतें ॥ तैसें तुझ्या दर्शनमात्रें ॥ आनंद झाला स्वामियां ॥ २६ ॥ माझें पूर्वार्जित्त पुण्य ॥ कांहीं होतें ह्मणोन ॥ तुह्मी भेटलेती निधान ॥ कृपासिंधु परमपुरुषा ॥ २७ ॥ सांगा आपुलें नाम कवण ॥ आगमन झालें कोठून ॥ पहा हें निर्मनुष्य अरण्य ॥ येथें तुह्मी भेटलेती ॥ २८ ॥ व्हाल तुह्मी ईश्वरू ॥ मातें कृपा केली गुरू ॥ तुह्मां देखतां मनोहरू ॥ अंतःकरण स्थिर झालें ॥ २९ ॥ कीं होसील कृपाळू ॥ सत्यप्रिय भक्तवत्सलू ॥ मी दास तुझा करी सांभाळू ॥ ह्मणोनि चरणीं लागला ॥ ३० ॥ नमितां तया बाळकासी ॥ उठवीत असे तापसी ॥ आलिंगोनि महा हर्षीं ॥ आश्वासीतसे तये वेळीं ॥ ३१ ॥ मग पुसे त्यासी वृत्तांत ॥ बाळ सांगे समस्त ॥ गुरूंनीं जी जी मागितली वस्त ॥ कवणेपरी साध्य होय ॥ ३२ ॥ आपण बाळ ब्रह्मचारी ॥ न होय कार्य तें अंगिकारीं ॥ आतां पडिलों चितासा-

गरीं ॥ तारीं स्वामी ह्मणतसे ॥ ३३ ॥ मग अभय देऊनि अवधूत ॥ तया बाळातें म्हणत ॥ सांगेन तुज एक हित ॥ जेणें तुझें कार्य साधे ॥ ३४ ॥ विश्वेश्वरआराधन ॥ असे एक निधान ॥ काशीपूर महास्थान ॥ सकळाभीष्टें साधती ॥ ३५ ॥ पंचक्रोश असे क्षितीं ॥ तया आगळी विख्याती ॥ विष्णु मुख्य प्रजापती ॥ तेथें वर लाधले ॥ ३६ ॥ ब्रह्मा सृष्टि रचावयासी ॥ वर लाधला त्या स्थळासी ॥ वर दिधला विष्णूसी ॥ समस्त सृष्टि पाळावया ॥ ३७ ॥ काशीपूर महास्थान ॥ तुवां तेथें जातांचि जाण ॥ होईल तुझी कामना पूर्ण ॥ संदेह न धरी मनांत ॥ ३८ ॥ तुवां जावें त्वरितेसीं ॥ जें जें वसे तव मानसीं ॥ समस्त विद्या लाधसी ॥ विश्वकर्मा तूंचि जाण ॥ ३९ ॥ चतुर्विध पुरुषार्थ ॥ साध्य होतील त्वरित ॥ यापरीस आणीक स्वार्थ ॥ काय असे सांग मज ॥ ४० ॥ तोचि देव असे दयाळ ॥ विचित्र असे त्याचा खेळ ॥ उपमन्यु ह्मणुनि होता बाळ ॥ तयातें दिधला क्षीरसिंधु ॥ ४१ ॥ नामें आनंदकानन ॥ विख्यात असे महास्थान ॥ समस्तांची कामना पूर्ण ॥ तये ठायीं होतसे ॥ ४२ ॥ नाम असे पुरी काशी ॥ समस्त धर्मांची हे राशी ॥ सकळ जीव जंतूंसी ॥ मोक्षस्थान परियेसा ॥४३॥ जे वास करिती तये स्थानीं ॥ त्यांतें देखतांचि नयनीं ॥ जाती दोष पळोनी ॥ स्थानमहिमा काय सांगूं ॥ ४४ ॥ ऐसें काशीस्थान असतां ॥ कां बाळा करिसी तूं चिंता ॥ तेथील महिमा वर्णितां ॥ अशक्य माझे जिव्हेसी ॥४५॥ तया काशी नगरांत ॥ जे जन तीर्थीं हिंडत ॥ एकेक पाउलीं पुण्य बहुत ॥ अश्वमेध फळ असे ॥ ४६ ॥ धर्म अर्थ काम मोक्ष ॥ जी जी मनीं असे कांक्ष ॥ जातांचि होईल प्रत्यक्ष ॥ संदेह न धरी मनांत ॥ ४७ ॥ ऐकोनियां ब्रह्मचारी ॥ साष्टांगीं

नमस्कारी ॥ कोठें असे काशीपुरी ॥ आपण असे अरण्यांत ॥४८॥ आनंदकानन ह्मणसी ॥
स्वर्गीं असे कीं भूमीसी ॥ अथवा जाऊं पाताळासी ॥ कोठें असे सांग मज ॥ ४९ ॥
या संसारसागरासी ॥ तूंची तारक जगा होसी ॥ ज्ञान मातें उपदेशी ॥ तारी मातें
स्वामिया ॥ ५० ॥ ऐसिया काशीपुरासी ॥ मातें कोण नेईल हर्षीं ॥ विनवूं जरी तुह्मासी ॥
घेवोनि जावें ह्मणोनियां ॥ ५१ ॥ कार्य असलिया तुह्मांसी ॥ आह्मां कैसी बुद्धि देसी ॥
मी बाळक तुह्मांसी ॥ ह्मणोनि चरणीं लागला ॥ ५२ ॥ ऐसें ह्मणतां तापसी ॥ आपण
नेईन ह्मणे हर्षीं ॥ तुजकरितां आपणासी ॥ यात्रालाभ घडे थोर ॥५३॥ यापरतें आह्मांसी ॥
काय लाभ विशेषीं ॥ वृथा जन्म मानवासी ॥ काशीवास न करितां ॥ ५४ ॥ तुजकरितां
आपणासी ॥ दर्शन घडे पुरी काशी ॥ चला जाऊं त्वरितेसी ॥ ह्मणोनि दोघे निघाले
॥ ५५ ॥ मनोवेगें तात्काळीं ॥ पातले विश्वेश्वराजवळी ॥ तापसी ह्मणे तयेवेळीं ॥ बाळका
आतां यात्रा करी ॥ ५६ ॥ बाळ ह्मणे तयासी ॥ स्वामी मातें निरोप देशी ॥ नेणें यात्रा
आहे कैसी ॥ कवणेपरी रहाटावें ॥ ५७ ॥ आपण बाळ ब्रह्मचारी ॥ नेणें तीर्थ कवणे-
परी ॥ कवणे विधी पुरःसरीं ॥ विस्तारोनी सांग मज ॥ ५८ ॥ तापसी ह्मणे तयासी ॥
सांगेन यात्रा विधीसी ॥ तुवां करावें भावेंसीं ॥ नेमें भक्तिपूर्वक ॥ ५९ ॥ पहिलें मणिक-
र्णिकेसी ॥ स्नान करणें नेमेंसी ॥ जाऊनियां विनायकासी ॥ पांचाळेश्वरा नमावें ॥६०॥
मग जावें महाद्वारा ॥ विश्वेश्वरदर्शन करा ॥ पुनरपि यावें गंगातीरा ॥ मणिकर्णिकास्नान
करावें ॥ ६१ ॥ मणिकर्णिकेचा ईश्वर ॥ पुजूनियां निर्धार ॥ जाऊनियां कमळेश्वरा ॥
पूजा करीं मा भावेंसीं ॥ ६२ ॥ पुढें ईश्वर वासुकीसी ॥ पूजा करी भक्तींसीं ॥ पर्वतेश्वर

पूजोनि हर्षी ॥ गंगाकेशव पूजी मग ॥ ६३ ॥ ललितादेवी पूजोनी ॥ मग जावें तेथूनी ॥ जरासंधेश्वर सगुणी ॥ पूजा करी गा भक्तीसीं ॥ ६४ ॥ सोमनाथ असे थोर ॥ पूजावा शूळकंठेश्वर ॥ तयापुढें वाराहेश्वर ॥ पूजा करीगा ब्रह्मेश्वरी ॥ ६५ ॥ अगस्तेश्वर कश्यपासी ॥ पूजा करी हरिहरेश्वरासी ॥ वैजनाथ महाहर्षी ॥ ध्रुवेश्वर पूजावा ॥ ६६ ॥ गोकर्णेश्वर असे थोर ॥ पूजा करी गा हाटकेश्वर ॥ अस्थिक्षेपतटाकेश्वर ॥ किंकरेश्वर पूजावा ॥ ६७ ॥ भारभूतेश्वरासी ॥ पूजा करीं गा भावेंसीं ॥ चित्रगुप्तेश्वरासी ॥ चित्रघंट पूजावा ॥ ६८ ॥ पशुपतेश्वर निका ॥ पूजा करोनि तेथें बालका ॥ पितामह असे जो का ॥ ईश्वरातें पूजावें ॥ ६९ ॥ कलेश्वरातें वंदूनी ॥ पुढें जावें एकमनीं ॥ चंद्रेश्वरातें पूजोनी ॥ पूजा करीं गा विश्वेश्वरा ॥ ७०॥ पुढें पूजी विघ्नेश्वर ॥ त्यानंतर अग्नीश्वर ॥ मग पूजी नागेश्वर ॥ हरिश्चंद्रेश्वर पूजी जाणा ॥ ७१ ॥ चिंतामणी विनायक ॥ सोमनाथ विनायका देखा ॥ पूजा करूनि ऐका ॥ वसिष्ठ वामदेव पूजावा ॥ ७२ ॥ पुढें पूजी त्रिसंध्येश्वर ॥ पूजी लिंग असे थोर ॥ विशालाक्ष मनोहर ॥ धर्मेश्वर पूजावा ॥ ७३ ॥ विश्वबाहू पूजा निका ॥ पुढें असे विनायका ॥ वृद्धादित्य असे जो का ॥ पूजा करी मनोभावें ॥ ७४ ॥ चतुर्वक्त्रेश्वर असे थोर ॥ लिंग असे मनोहर ॥ पूजा करी गा ब्रह्मेश्वर ॥ अनुक्रमें करूनियां ॥ ७५ ॥ पुनः प्रकामेश्वर असे खूण ॥ पुढें ईश्वर ईशान ॥ चंडीचंडेश्वरा जाण ॥ पूजा करी भक्तीसी ॥ ७६ ॥ पूजी भवानी शंकर ॥ धुंडिराज मनोहर ॥ अर्ची राजराजेश्वर ॥ लांगूलेश्वर पूजी मग ॥ ७७ ॥ नकुलेश्वर पूजेसी ॥ तुवां जावें भक्तीसी ॥ परान्नपरद्रव्येश्वरासी ॥ असुरेश्वर पूजी मग ॥ ७८ ॥ गंगेश्वर पूजोन ॥ ज्ञानवापीं करी स्नान ॥

ज्ञानेश्वर अर्चून ॥ नंदिकेश्वर पूजी मग ॥ ७९ ॥ निष्कलंकेश्वर लिंग मनोहर ॥ पूजी मार्कंडेयेश्वर ॥ पूजी मग सुरेश्वर ॥ भाव धरी तयाच्चरणीं ॥ ८० ॥ तारकेश्वर असे थोर ॥ लिंग बहु मनोहर ॥ पूजा महाकाळेश्वर ॥ दंडपाणी पूजीं मग ॥ ८१ ॥ महेश्वरातें पूजोनी ॥ अर्ची मोक्षेश्वर ध्यानीं ॥ वीरभद्रेश्वर सुमनीं ॥ पूजा करी गा बाळका ॥ ८२ ॥ अविमुक्तेश्वरापासीं ॥ ॥ तुवां जाउनियां हर्षी ॥ पूजा करी भावेंसीं ॥ मोदादि पंच विनायका ॥ ८३ ॥ आनंद भैरवपूजा करी ॥ पुनरपि जाय महाद्वारीं ॥ जेथें असे मन्मथारी ॥ विश्वनाथ पूजावा ॥ ८४ ॥ बाळा तुवां येणेंपरी ॥ अंतर्गृहयात्रा करी ॥ मुक्तिमंडपाभीतरीं ॥ जाऊनि मंत्र ह्मणावा ॥ ८५ ॥ श्लोक ॥ अंतर्गृहेषु यात्रेयं यथावद्या मया कृता न्यूनातिरिक्तया शंभो प्रीयतामनया विभो ॥ १ ॥ इति मंत्रं समुच्चार्य क्षणं वै मुक्तिमान्भवेत् ॥ विश्रम्यथा-याद्भवने निष्पापः पुण्यभाग्भवेत् ॥ २ ॥ ऐसा मंत्र जपोन ॥ विश्वनाथातें नमून ॥ मग निघावें तेथून ॥ दक्षिण मानसयात्रेसी ॥ ८६ ॥ मणिकर्णिकेशीं जाऊनी ॥ स्नान उत्तरवाहिनी ॥ विश्वनाथातें पूजोनी ॥ संकल्पावें यात्रेसी ॥ ८७ ॥ तेथोनि निघावें हर्षी ॥ मोदादि पंच विनायकांसी ॥ पूजा करी भक्तींसीं ॥ धुंडिराज पूजी मग ॥ ८८ ॥ पूजा भवानीशंकरा ॥ दंडपाणी नमन करा ॥ विशालाक्षा अवधारा ॥ पूजा तुह्मी भक्तींसीं ॥ ८९ ॥ स्नान धर्मकूपेसीं ॥ श्राद्धविधि करा हर्षी ॥ पूजा धर्मेश्वरासी ॥ गंगाकेशव पूजी मग ॥ ९० ॥ पूजावी देवी ललिता ॥ जरासंधेश्वर नमितां ॥ पूजा मग सोमनाथा ॥ वाराहेश्वरा भक्तींसीं ॥ ९१ ॥ दशाश्वमेधतीर्थेसी ॥ स्नान करी श्रद्धेसी ॥ प्रयागतीर्थी परियेसी ॥ स्नान श्राद्ध करावें ॥ ९२ ॥ पूजोनियां प्रयागेश्वरासी ॥ दशाश्वमेध ईश्वरासी ॥ पूजा करी गा

भक्तीसीं ॥ शीतलेश्वर अर्ची मग ॥९३॥ अर्ची मग वंदि देवी ॥ सर्वेश्वर मनोभावीं ॥ धुंडीराज भक्तिपूर्वीं ॥ पूजा करी गा ब्रह्मचारी ॥ ९४ ॥ तीळभांडेश्वर देखा ॥ पूजा करोनि पुढें ऐका ॥ रेवाकुंडीं स्नान निका ॥ मानससरोवरीं मग स्नान ॥९५॥ श्राद्धादि पितृतर्पण ॥ मानसेश्वर मग पूजोन ॥ मनकामना पावे जाण ॥ ऐक बाळा ब्रह्मचारी ॥ ९६ ॥ केदारकुंडीं स्नान ॥ करावें तेथें तर्पण ॥ केदारेश्वर पूजोन ॥ गौरीकुंडीं स्नान करा ॥ ९७ ॥ पूजी वृद्धकेदारेश्वर ॥ पूजी मग हनुमंतेश्वर ॥ पूजोनियां रामेश्वर ॥ स्नानश्राद्ध कृमिकुंडीं ॥ ९८ ॥ सिद्धेश्वरा करी नमन ॥ करूनि स्वप्नकुंडीं स्नान ॥ स्वप्नेश्वर पूजोन ॥ स्नान करा संगमांत ॥ ९९ ॥ संगमेश्वर पूजोन ॥ लोलार्ककूपीं करी स्नान ॥ श्राद्धकर्म आचरोन ॥ गतिप्रद ईश्वरासी ॥२००॥ पूजाअर्कविनायका ॥ पराशरेश्वर आदिका ॥ पूजा करोनि बाळका ॥ सन्निहत्यकुंडीं स्नान करी ॥ १ ॥ कुरुक्षेत्र कुंड देखा ॥ स्नान करावें विशेखा ॥ सुवर्णादि दानादिका ॥ तेथें तुह्मीं करावें ॥ २ ॥ अमृतकुंडीं स्नान निका ॥ पूजी दुर्गाविनायका ॥ दुर्गादेवीसी बाळका ॥ पूजा करी मनोभाव ॥ ३ ॥ पुढें चौसष्ट योगिनी ॥ पूजा करी गा मनकामनीं ॥ कुक्कुटद्विजातें वंदूनि ॥ मंत्र तेथें जपावा ॥ ४ ॥ श्लोक ॥ वाराणस्यां दक्षिणे भागे कुक्कुटो नाम वै द्विजः ॥ तस्य स्मरणमात्रेण दुःस्वप्नः सुस्वप्नो भवेत् ॥ ५ ॥ पुढें मासोपवासासी ॥ पुजिजे गौरी अंबेसी ॥ सात कवड्या घालूनियां तिसीं ॥ नमन भावें करावें ॥ ६ ॥ पूजा करी रेणुकेसी ॥ पुढें स्नान करी हर्षीं ॥ शंखोद्धारकुंडेंसी ॥ शंखविष्णु पूजिजे ॥ ७ ॥ कामाक्षीकुंडीं करी स्नान ॥ कामाक्षीदेवी पूजोन ॥ अयोध्या कुंडीं करी स्नान ॥ लक्ष्मी पूजावी भक्तीसीं ॥ ८ ॥ लवांकुशकुंडीं करी स्नान ॥ लवांकुशातें पूजोन ॥

लक्ष्मीकुंडीं करीं स्नान ॥ लक्ष्मीनारायण पूजावा ॥ ९ ॥ सूर्यकुंडीं करी स्नान ॥ श्राद्ध कर्म आचरोन ॥ सांबादित्य पूजोन ॥ जावें पुढें बाळका ॥ १० ॥ वैजनाथकुंड बरवें ॥ तेथें स्नान तुवां करावें ॥ वैजनाथातें पूजावें ॥ एकभावें करूनियां ॥११॥ गोदावरीकुंडे-सीं ॥ स्नान करा भक्तीसीं ॥ गौतमेश्वर लिंगासी ॥ पूजी बाळा ब्रह्मचारी ॥१२॥ अगस्ती-कुंडीं जावोनी ॥ अगस्तीश्वरा नमूनी ॥ स्नान करा मनापासोनी ॥ पूजा करी भक्तिभावें ॥ १३ ॥ शुक्रकुपीं करी स्नान ॥ करी शुक्रेश्वर अर्चन ॥ मग पुढें अन्नपूर्णा नमून ॥ पूजा करी भावेसीं ॥ १४ ॥ धुंडिराजातें पूजोन ॥ ज्ञानवापीं करी स्नान ॥ ज्ञानेश्वर अर्चोन ॥ दंडपाणी पूजावा ॥ १५ ॥ आनंदभैरव वंदोनी ॥ महाद्वारा जाऊनी ॥ साष्टांगेसीं नमोनी ॥ विश्वनाथ अर्चिजे ॥ १६ ॥ ऐसें दक्षिणमानस ॥ यात्रा असे विशेष ॥ ब्रह्मचारी मनीं करीं हर्ष ॥ योगीराज सांगतसे ॥ १७ ॥ आतां उत्तरमानसासी ॥ सांगेन विधी आहे कैसी ॥ संकल्प करोनियां हर्षी ॥ निघावें तुवां बाळका ॥ १८ ॥ जावें पंचगंगेसीं ॥ स्नान करी महाहर्षी ॥ कोटिजन्मपापनाशी ॥ प्रख्यात असे पुराणीं ॥ १९ ॥ पंचगंगा प्रख्यात नामें ॥ सांगेन असती उत्तमें ॥ किरणा धूतपाप नामें ॥ तिसरी पुण्यसर-स्वती ॥ २० ॥ गंगा यमुना मिळोनी ॥ पांच ही ख्याती जाणोनी ॥ नामें असती सगुणी ॥ ऐक बाळा एकचित्तें ॥ २१ ॥ कृतयुगीं त्या नदीसी ॥ धर्मनदी ह्मणती हर्षी ॥ धूतपाप नाम तिसी ॥ त्रेतायुगीं अवधारा ॥ २२ ॥ बिंदूतीर्थ द्वापारासी ॥ नाम जाणा विस्तारेसीं ॥ कलियुगाभीतरीं तिसीं ॥ नाम झालें पंचगंगा ॥२३॥ प्रयागासी माघमासीं ॥ स्नान करितां फळें जैसीं ॥ कोटिगुण पंचगंगेसी ॥ त्याह्नि पुण्य अधिक असे ॥ २४ ॥

ऐशापरी पंचगंगेसी ॥ स्नान करी गा भावेंसीं ॥ बिंदुमाधव पूजेसी ॥ सवेंचि जावें केशवा ॥ २५ ॥ गोपाळकृष्णा पूजोनी ॥ जावें नृसिंहभुवनीं ॥ मंगळागौरी वंदोनी ॥ गभस्तेश्वर पूजावा ॥ २६ ॥ मथुरादित्य पूजेसी ॥ तुवां जावें भक्तीसीं ॥ पुनरपि जावें हर्षी ॥ विश्वेश्वरदर्शना ॥ २७ ॥ मागुती मुक्तिमंडपासी ॥ तुवां जावें भक्तीसीं ॥ संकल्पावें विधीसीं ॥ निघावें उत्तरमानसा ॥२८॥ मग निघावें तेथून ॥ आदित्यातें पूजोन ॥ केदारेश्वर अर्चोन ॥ पापभक्षेश्वरा पूजिजे ॥२९॥ नवग्रहांतें पूजोनी ॥ काळभैरवातें वंदूनी ॥ क्षेत्रपाळातें अर्चोनी ॥ कालकूपीं स्नान करी ॥३०॥ पूजा करोनी काळेश्वरा ॥ हंसतीर्थी स्नान करा ॥ श्राद्धपितृकर्मसारा ॥ ऐक बाळा एकचित्तें ॥ ३१ ॥ कृत्तिवासेश्वरा देखा ॥ पूजा करोनी बाळका ॥ पुढें जावोनी ऐका ॥ शंखवापींत स्नान करी ॥ ३२ ॥ तेथें आचमन करोनी ॥ रत्नेश्वरातें पूजोनी ॥ सत्येश्वरा अर्चोनी ॥ दक्षेश्वर पूजी मग ॥ ३३ ॥ चतुर्वक्त्रेश्वरीं पूजा ॥ करीं वो बाळा तूं वोजा ॥ पुढें स्नान करणें काजा ॥ वृद्धकाळकूपा जावें ॥ ३४ ॥ काळेश्वराचे पूजेसी ॥ तुवां जावें भक्तीसीं ॥ अपमृत्युवीश्वरा हर्षी ॥ पूजा करीगा बाळका ॥ ३५ ॥ मंदाकिनीं स्नान करणें ॥ मध्यमेश्वरातें पूजणें ॥ तेथोनि मग पुढें जाणें ॥ जंबुकेश्वर पूजावया ॥ ३६ ॥ वक्रतुंडपूजेसी ॥ तुवां जावें भक्तीसीं ॥ दंडखातकूपेसी ॥ स्नान श्राद्ध तूं करी ॥३७॥ पुढें भूतभैरवासी ॥ पूजिजे ईशानेश्वरासी ॥ जैगीषव्यगुहेसी ॥ नमन करूनी पुढें जावें ॥ ३८ ॥ घंटाकुंडीं स्नान करी ॥ व्यासेश्वरातें अर्चन करी ॥ कंदुकेश्वरातें अवधारी ॥ पूजा करीगा भक्तीसीं ॥ ३९ ॥ ज्येष्ठ वापीं स्नान करणें ॥ ज्येष्ठेश्वरातें पूजणें ॥ सवेंचि तुवां पुढें जाणें ॥ स्नान सप्तसागरांत ॥ ४० ॥ तेथोनी वाल्मीकि-

श्वरासी ॥ पूजा करी गा भक्तींसीं ॥ भीमोटजा जाऊनि हर्षीं ॥ भीमेश्वर पूजावा ॥ ४१ ॥ मार्तंडकुंडेसी ॥ करणें श्राद्धविधीसी ॥ पिशाचमोचनतीर्थैसीं ॥ पुढें जावें अवधारा ॥ ४२ ॥ पुढें कपर्दैश्वरासीं ॥ पूजा करी गा भक्तींसीं ॥ कर्कोटक वापीसी ॥ स्नान करी गा बाळका ॥ ४३ ॥ कर्कोटकेश्वरासी ॥ पूजा करी गा भक्तींसीं ॥ पुढें ईश्वरगंगेसी ॥ स्नान दान करावें ॥४४॥ अग्नीश्वराचे पूजेसी ॥ चक्रकुंडीं स्नानासी ॥ तुवां जावें भक्तींसीं ॥ श्राद्धकर्म करावें ॥ ४५ ॥ उत्तरार्क पूजोन ॥ मत्स्योदरीं करी स्नान ॥ ओंकारेश्वर अर्चोन ॥ कपिलेश्वर पूजी मग ॥ ४६ ॥ ऋणमोचनतीर्थैसी ॥ श्राद्धादि करावीं भक्तींसीं ॥ पापविमोचन तीर्थैसी ॥ स्नानादि श्राद्धें करावीं ॥ ४७ ॥ तीर्थकपालमोचन ॥ स्नान श्राद्ध तर्पण ॥ कुलस्तंभाप्रती जाऊन ॥ पूजा करीगा भक्तींसीं ॥ ४८ ॥ असे तीर्थ वैतरणी ॥ श्राद्ध करावें तेथें स्नानीं ॥ विधिपूर्वक गोदानीं ॥ देतां पुण्य बहु असे ॥ ४९ ॥ मग जावें कपिलधारा ॥ स्नान श्राद्ध तुह्मीं करा ॥ सवत्सेसी द्विजवरा ॥ गोदान द्यावें परियेसा ॥ ५० ॥ वृषभध्वजातें पूजोन ॥ मग निघावें तेथून ॥ ज्वालानृसिंह वंदून ॥ वरुणासंगमीं तुह्मीं जावें ॥ ५१ ॥ स्नान श्राद्ध करोनी ॥ केशवादित्य पूजोनी ॥ आदिकेशव अर्चोनी ॥ पुढें जावें परियेसा ॥ ५२ ॥ प्रल्हादतीर्थ असे बरवें ॥ स्नान श्राद्ध तुवां करावें ॥ प्रल्हादेश्वरातें पूजावें ॥ एकभावें परियेसा ॥५३॥ कपिलधारा तीर्थ थोर ॥ स्नान करावें मनोहर ॥ पूजोनि त्रिलोचनेश्वर ॥ असंख्यातेश्वरा पूजिजे ॥ ५४ ॥ पुढें जावें महादेवासी ॥ पूजा करीगा भक्तींसीं ॥ द्रुपदेश्वर सादरेसी ॥ एकभावें अर्चावा ॥ ५५ ॥ गंगायमुना सरस्वतीसीं ॥ तिनी लिंगें विशेषीं ॥ पूजा करी गा भक्तींसीं ॥ काम्यतीर्थ पाहें मग ॥ ५६ ॥

कामेश्वरातें पूजोनी ॥ गोप्रकारतीर्थस्नानीं ॥ पंचगंगेसी जाऊनी ॥ स्नान मागुती करावें ॥ ५७ ॥ मणिकर्णिका स्नान करणें ॥ जलशायीतें पूजणें ॥ हनुमंतातें नमन करणें ॥ मोदादि पंच विनायकासी ॥ ५८ ॥ पूजा अन्नपूर्णेसी ॥ धुंडिराज परियेसीं ॥ ज्ञानवापीं स्नानेसी ॥ ज्ञानेश्वर पूजावा ॥ ५९ ॥ ॥ पूजी दंडपाणीसी ॥ मोक्षलक्ष्मीविलासासी ॥ पूजा पंच पांडवांसी ॥ द्रुपदी द्रुपद विनायका ॥ ६० ॥ पूजा आनंदभैरवासी ॥ अविमुक्तेश्वर हर्षी ॥ पूजोनियां संभ्रमेसीं ॥ विश्वनाथ संमुख जावें ॥ ६१ ॥ श्लोक ॥ उत्तरमानसयात्रेयं यथावद्या मया कृता ॥ न्यूनातिरिक्तया शंभो प्रीयतामनया विभो ॥ ६२ ॥ ऐसा मंत्र जपोनी ॥ साष्टांगें नमस्कारुनी ॥ मग निघावें तेथोनी ॥ पंचक्रोशयात्रेसीं ॥ ६३ ॥ सिद्ध ह्मणे नामधरकासी ॥ गुरुचरित्र ऐकतां संतोषीं ॥ येणेंच तूं पावशी ॥ चारी पुरुषार्थ इहसौख्य ॥ ६४ ॥ ह्मणोनि सरस्वती गंगाधर ॥ सांगे गुरुचरित्र विस्तार ॥ ऐकतां होय मनोहर ॥ सकळाभीष्टें साधिजे ॥ ६५ ॥ इति श्रीगुरुचरित्रामृत ॥ काशीखंडयात्रा निरूपित ॥ कथा असती पुराणविख्यात ॥ एकचत्वारिंशत्तमोध्याय हा ॥ ६६ ॥ इति श्रीनृसिंहसरस्वत्युपाख्याने सिद्धनामधारकसंवादे काशीमहायात्रानिरूपणं नाम एकचत्वारिंशत्तमोऽध्यायः ॥ ओं० २६७ ॥

॥ श्रीगणेशाय नमः ॥ संकल्प करोनियां मनीं ॥ जावें स्वर्गद्वारभुवनीं ॥ गंगाकेशव पूजो-
नी ॥ हरिश्चंद्रमंडपा जावें ॥ १ ॥ स्वर्गद्वार असे जाण ॥ मणिकर्णिका तीर्थ विस्तीर्ण ॥
तुवां जावें तेथोन ॥ संकल्पावें विधीनें ॥ २ ॥ हविष्यान्न पूर्व दिवशीं ॥ करोनि असावें
शुचीसीं ॥ प्रातःकाळीं गंगेसी ॥ स्नान आपण करावें ॥ ३ ॥ धुंडिराजातें प्रार्थोनी ॥ मा-
गावें करुणावचनीं ॥ पुनर्दर्शन दे ह्मणोनी ॥ विनवावें परियेसा ॥ ४ ॥ मग गंगेतें नमोनी ॥
जावें विश्वनाथभुवनीं ॥ मग तयातें पूजोनी ॥ भवानीशंकर पूजावा ॥ ५ ॥ मग जावें मु-
क्तिमंडपासी ॥ नमोनि निघावें संतोषीं ॥ धुंडिराजाचे पूजेसी ॥ पुनरपि जावें परियेसा
॥ ६ ॥ मागुती यावें महाद्वारा ॥ विश्वेश्वरपूजा करा ॥ मोदा पंच विघ्नेश्वरा ॥ नमन करावें
दंडपाणीसी ॥ ७ ॥ पूजा आनंदभैरवासी ॥ मागुती यावें मणिकर्णिकेसी ॥ पूजोनि-
यां ईश्वरासी ॥ सिद्धिविनायक पूजावा ॥ ८ ॥ गंगाकेशव पूजोनी ॥ ललिता देवीसी न-
मोनी ॥ राजसिद्धेश्वर आणा ध्यानीं ॥ दुर्लभेश्वर पूजावा ॥ ९ ॥ सोमनाथा पूजा करी ॥
पुढें शूल कंटेश्वरी ॥ मग पूजा वाराहेश्वरी ॥ दशाश्वमेध पूजी मग ॥ १० ॥ बंदी देवातें पू-
जोनी ॥ सर्वेश्वरातें नमोनी ॥ केदारेश्वर धरा ध्यानीं ॥ हनुमंतेश्वर पूजावा ॥ ११ ॥ मग
पूजा संगमेश्वरीं ॥ लोलार्कातें अवधारी ॥ अर्क विनायका पूजा करी ॥ दुर्गाकुंडीं स्नान
मग ॥ १२ ॥ आर्या दुर्गादेवी पूजोनी ॥ दुर्गागणेश ध्याऊनी ॥ पुनर्दर्शन दे ह्मणोनी ॥
प्रार्थावें तयासी ॥ १३ ॥ विष्वक्सेन ईश्वरासी ॥ कर्दमतीर्थीं स्नान हर्षीं ॥ कर्दमेश्वर पूजे-
सी ॥ तुवां जावें बाळका ॥१४॥ जावें कर्दमकूपासी ॥ पूजी गा सोमनाथासी ॥ मग वि-
रूपाक्षलिंगासी ॥ पूजा करी ब्रह्मचारी ॥१५॥ पुढें जावें नीलकंठासी ॥ पूजा करी गा भा-

वेंसी ॥ कर जोडोनि भक्तीसी ॥ कर्दमेश्वर पूजावा ॥ १६ ॥ पुनर्दर्शन आह्मांसी ॥ दे ह्म-
णावें भक्तीसी ॥ मग निघावें वेगेंसी ॥ नागनाथाचे पूजेतें ॥ १७ ॥ पुढें पूजी चामुंडेसी ॥ मो-
क्षेश्वरा परियेसी ॥ वरुणेश्वर भक्तीसी ॥ पूजा करी गा बाळका ॥१८॥ वीरभद्र पूजेसी ॥
जावोनि द्वितीय दुर्गेसी ॥ अर्चावें विकटाक्षा देवीसी ॥ पूजा करी मनोभावें ॥ १९ ॥
पूजी भैरव उन्मत्त ॥ विमळार्जुन प्रख्यात ॥ काळकूट देवाग्रत ॥ पूजा करीगा बाळका
॥ २० ॥ पूजा करी महादेवासी ॥ नंदिकेश्वर भैरवासी ॥ भृंगेश्वर विशेषीं ॥ पूजा करी म-
नोहर ॥ २१ ॥ गणप्रियासी पूजोनी ॥ विरूपाक्षातें नमोनी ॥ यज्ञेश्वर अर्चोनी ॥ विमले-
श्वर पूजी मग ॥ २२ ॥ भीमचंडी शक्तीसी ॥ पूजी चंडी विनायकासी ॥ रवि रक्ताक्ष
गंधर्वासी ॥ पूजा करी मनोभावें ॥ २३ ॥ ज्ञानेश्वर असे थोर ॥ पूजा पुढें अमृतेश्वर ॥ गं-
धर्वसागर मनोहर ॥ पूजा करीगा भक्तीसी ॥ २४ ॥ नरकार्णव तरावयासी ॥ पूजी भीम-
चंडीसी ॥ विनवावें तुह्मीं त्यासी ॥ पुनर्दर्शन दे म्हणावें ॥ २५ ॥ एकपाद विनायकासी ॥
पुढें पूजी भैरवासी ॥ संगमेश्वरा भरंवसी ॥ पूजा करीगा ब्रह्मचारी ॥ २६ ॥ भूतनाथ
सोमनाथ ॥ कालनाथ असे विख्यात ॥ पूजा करीगा त्वरित ॥ कपर्देश्वर लिंगाची
॥ २७ ॥ नागेश्वर कामेश्वर ॥ पुढें पूजी गणेश्वर ॥ पूजा करी विश्वेश्वरा ॥ चतुर्मुख विना-
यका ॥ २८ ॥ पूजी देहली विनायकासी ॥ पूजी गणेश षोडशीं ॥ उदंड गणेश षोडशीं ॥
पूजा करी मनोहर ॥२९॥ उत्कलेश्वर महाथोर ॥ असे लिंग मनोहर ॥ पुढें एकादश रुद्र ॥
तयांचें पूजन करावें ॥ ३० ॥ जावें तपोभूमीसी ॥ पूजा करीगा भक्तीसी ॥ रामेश्वर महा-
हर्षीं ॥ पूजीं मग सोमनाथ ॥ ३१ ॥ भरतेश्वर असे थोर ॥ लक्ष्मणेश्वर मनोहर ॥ पूजीं

मग शत्रुघ्नेश्वर ॥ भूमिदेवी अर्ची मग ॥३२॥ नहुषेश्वर पूजोन ॥ करीं रामेश्वरध्यान ॥ पुनर्दर्शन दे ह्मणोन ॥ विनवावें परियेसा ॥ ३३ ॥ असंख्यात तीर्थ वरुण ॥ तेथें करा तुह्मी नमन ॥ असंख्यात लिंगें जाण ॥ पूजा करावी भक्तीसी ॥ ३४ ॥ पुढें असे लिंग थोर ॥ नामें देव सिद्धेश्वर ॥ पूजा करी गा मनोहर ॥ पशुपाणि विनायक ॥ ३५ ॥ याची पूजा करोनी ॥ पृथ्वीश्वरातें नमोनी ॥ शरयूकूपीं स्नान करोनी ॥ कपिलोद्धारीं स्नान करीं ॥३६॥ वृषभध्वजा पूजोनी ॥ ज्वालानृसिंहाचे वंदी चरणीं ॥ वरुणासंगमीं स्नान करोनी॥ श्राद्धादि कर्में करावीं ॥ ३७ ॥ संगमेश्वर पूजावा ॥ सर्व विनायक बरवा ॥ पुढें पूजी तूं केशवा ॥ भावें करूनी ब्रह्मचारी ॥ ३८ ॥ पूजा प्रल्हादेश्वरासी ॥ स्नान कपिलातीर्थासी ॥ त्रिलोचनेश्वरासी ॥ पूजा करीं गा भक्तीनें ॥ ३९ ॥ पुढें असे महादेव ॥ पंचगंगा तरि ठाव ॥ पूजा करींगा भक्तिभावें ॥ तया बिंदुमाधवासी ॥ ४० ॥ पूजी मंगळागौरीसी ॥ गभस्तीश्वरा परियेसी ॥ वसिष्ठ वामदेवासी ॥ पर्वतेश्वर पूजावा ॥४१॥ महेश्वराचे पूजेसी ॥ पुढें सिद्धिविनायकासी ॥ पूजा सप्तवर्णेश्वरासी ॥ सर्वगणेश पूजावा ॥ ४२ ॥ मग जावें मणिकर्णिके ॥ स्नान करावें विवेकें ॥ विश्वेशातें स्मरोनि निकें ॥ महादेव पूजावा ॥ ४३ ॥ मग जावें मुक्तिमंडपासी ॥ नमन करावें विष्णूसी ॥ पूजी दंडपाणीसी ॥ धुंडिराज अर्चावा ॥४४॥ आनंदभैरव पूजोनी ॥ आदित्येशा नमोनी ॥ पूजा करीगा भक्तीनीं ॥ मोदादि पंच विनायका ॥४५॥ पूजा करी विश्वेशासी ॥ मोक्ष लक्ष्मी विलासासी ॥ नमोनि देवा संमुखेसी ॥ मंत्र ह्मणावा येणेंपरी ॥ ४६ ॥ श्लोक ॥ जय विश्वेश विश्वात्मन् काशिनाथ जगत्पते ॥ त्वत्प्रसादान्महादेव कृता क्षेत्रप्रदक्षिणा ॥ ४७ ॥ अनेकजन्मपापानि

गु. च.

कृतानि मम शंकर ॥ गतानि पंचक्रोशात्मा कृता लिंगप्रदक्षिणी ॥४८॥ ऐसा मंत्र जपोन ॥ पुढें करावें शिवध्यान ॥ मुक्तिमंडपा येवोन ॥ आठां ठायीं वंदावें ॥ ४९ ॥ प्रथम मुक्तिमंडपासी ॥ नमन करावें परियेसी ॥ वंदोनि स्वर्गमंडपासी ॥ जावें ऐश्वर्यमंडपा ॥ ५० ॥ ज्ञानमंडपा नमोनी ॥ मोक्षलक्ष्मीविलासस्थानीं ॥ मुक्तिमंडपा वंदोनी ॥ आनंदमंडपा जावें तुवां ॥ ५१ ॥ पुढें वैराग्यमंडपासी ॥ तुवां जावें भक्तीसी ॥ येणेंपरी यात्रेसी ॥ करी गा बाळा ब्रह्मचारी ॥ ५२ ॥ आणीक एक प्रकार ॥ सांगेन ऐक विचार ॥ नित्य यात्रा मनोहर ॥ ऐक बाळका गुरुदासा ॥ ५३ ॥ सचैल शुची होऊनी ॥ चक्रपुष्करणीं स्नान करोनी ॥ देवपितर तर्पोनी ॥ ब्राह्मणपूजा करावी ॥ ५४ ॥ मग निघावें तेथोनी ॥ द्रुपदादित्येश्वर पूजोनी ॥ ईपस्येश्वर नमोनी ॥ श्रीविष्णूतें पूजावें ॥५५॥ मग नमावा दंडपाणि ॥ महेश्वरातें पूजोनी ॥ मग निघावें तेथोनी ॥ धुंडिराज अर्चिजे ॥ ५६ ॥ ज्ञानवापींत करीं स्नान ॥ नंदिकेश्वर अर्चोन ॥ तारकेश्वर पुजोन ॥ पुढें जावें मग तुवां ॥ ५७ ॥ महाकाळेश्वर देखा ॥ पूजा करी भावें एका ॥ दंडपाणि विनायका ॥ पूजा करी मनोहर ॥ ५८ ॥ मग यात्रा विश्वेश्वर ॥ करी गा बाळका मनोहर ॥ लिंग असे ओंकारेश्वर ॥ प्रतिपदेसी पूजावा ॥ ५९ ॥ मत्स्योदरीतीर्थासी ॥ स्नान करावें प्रतिपदेसी ॥ त्रिलोचन महादेवासी ॥ दोनी लिंगें असती जाण ॥ ६० ॥ तेथें बीज तिजेसी ॥ जावें तुवां यात्रेसी ॥ यात्रा जाण चतुर्थीसी ॥ कांचीवास लिंग जाण ॥६१॥ रत्नेश्वर पंचमेसी ॥ चंद्रेश्वर पूजेसी ॥ षष्ठी जावें परियेसी ॥ ऐक शिष्या एकचित्तें ॥ ६२ ॥ सप्तमी केदारेश्वर ॥ अष्टमी लिंगधूमेश्वर ॥ विश्वेश्वर लिंग थोर ॥ नवमी यात्रा महापुण्य ॥ ६३ ॥ कामेश्वर दशमीसी ॥ एकादशी वि-

श्वेश्वरासी ॥ द्वादशी मणिकर्णिकेसी ॥ मणिकेश्वर पूजावा ॥ ६४ ॥ त्रयोदशी प्रदोषेसीं ॥ पूजा अविमुक्तेश्वरासी ॥ चतुर्दशी विशेषीं ॥ विश्वेश्वर पूजावा ॥ ६५ ॥ जे कोणी काशी-वासी ॥ असती नर परियेसीं ॥ त्यांणीं करावी यात्रा ऐसी ॥ नाहीं तरी विघ्न घडे॥६६॥ शुक्लपक्षीं येणेंपरी ॥ यात्रा करीं मनोहरी ॥ कृष्णपक्ष आलियावरी ॥ यात्रा करा सांगेन ॥ ६७ ॥ चतुर्दशी धरोनी ॥ यात्रा करा प्रतिदिनीं ॥ सांगेन ऐका विधानीं ॥ एकचित्तें परियेसा ॥ ६८ ॥ वरुणानदींत करा स्नान ॥ करा शैल्येश्वर दर्शन ॥ संगमेश्वर पूजोन ॥ संगमीं स्नान तये दिवशीं ॥ ६९ ॥ स्वर्गतीर्थ स्नानेंसी ॥ स्वर्गेश्वर पूजा हर्षीं ॥ मंदाकिनी येरे दिवशीं ॥ मध्यमेश्वर पूजावा ॥ ७० ॥ मणिकर्णिकास्नानेंसी ॥ पूजा ईशानेश्वरासी ॥ हिरण्यगर्भ परियेसीं ॥ दोनी लिंगें पूजिजे ॥ ७१॥ स्नान धर्मकूपेसी ॥ करीं पूजा गोप-श्नेश्वरासी ॥ पूजा करी तया दिवसीं ॥ एकचित्तें परियेसा ॥ ७२ ॥ कपिलधारातीर्थासी ॥ स्नान करा भक्तीसी ॥ वृषभध्वजलिंगासी ॥ सप्तमी दिवसीं पूजी पैं ॥ ७३ ॥ उपशांति-कूपेसी ॥ स्नान करा भक्तीसी ॥ उपशांतेश्वरासी ॥ पूजा करी तया दिनीं ॥ ७४ ॥ पंच-कुंड डोहांत ॥ स्नान करा शिव ध्यात ॥ ज्येष्ठेश्वरा त्वरित ॥ पूजावें तया दिनीं ॥ ७५ ॥ चतुःसमुद्र कूपासी ॥ स्नान करी भावेंसी ॥ समुद्रेश्वर हर्षी ॥ पूजा करी तया दिनीं ॥७६॥ देवापुढें कूप असे ॥ स्नान करावें संतोषें ॥ शुक्रेश्वर पूजा हर्षें ॥ पूजा करी तया दिनीं ॥ ७७ ॥ दंडखात तीर्थेसी ॥ स्नान करोनी देवासी ॥ व्याघ्रेश्वर पूजेसी ॥ तुवां जावें तये दिनीं ॥ ७८ ॥ शौनकेश्वर तीर्थेसीं ॥ स्नान तुम्ही करा हर्षीं ॥ तीर्थ नामें लिंगासी ॥ पूजा करा मनोहर ॥७९॥ जंबुतीर्थ मनोहर ॥ स्नान करा शुभाचार ॥ पूजावा भावें जंबुकेश्वर ॥

चतुर्दश लिंगें येणेंपरी ॥ ८० ॥ शुक्लपक्ष कृष्णेसी ॥ अष्टमी तिथी विशेषीं ॥ पूजावें तुह्मीं लिंगासी ॥ सांगेन ऐका महापुण्य ॥ ८१ ॥ मोक्षेश्वर पर्वतेश्वर ॥ वीरा पशुपतेश्वर ॥ गंगेश्वर नर्मदेश्वर ॥ पूजा करी मनोभावें ॥ ८२ ॥ आणिक भक्तेश्वर गभस्तीश्वर ॥ मध्यमेश्वर असे थोर ॥ तारकेश्वर नामें निर्धार ॥ नवलिंगें पूजावीं ॥ ८३ ॥ आणीक लिंगें एकादश ॥ नित्य यात्रा विशेष ॥ लिंग असे अग्निध्रुवेश ॥ यात्रा तुह्मीं करावी ॥ ८४ ॥ दुसरा असे ऊर्वशीश्वर ॥ नकुलेश्वर मनोहर ॥ चौथा असे आषाढेश्वर ॥ भारभूतेश्वर पंचम ॥ ८५ ॥ लांगुलेश्वरीं करी पूजा ॥ करा त्रिपुरांतका ओजा ॥ मनःप्रकामेश्वर काजा ॥ तुह्मीं जावें परियेसा ॥ ८६ ॥ प्रीतेश्वर असे देखा ॥ मंदालेश्वर ऐका ॥ तिळपर्णेश्वर निका ॥ पूजा करी भावेंसी ॥८७॥ आतां शक्तियात्रेसी ॥ सांगेन ऐका विधीसी ॥ शुक्लपक्ष तृतीयेसी ॥ आठ यात्रा कराव्या ॥ ८८ ॥ गोप्रेक्षतीर्थ देखा ॥ स्नान करोनि ऐका ॥ पूजा मुख्य भाळनेत्रा ॥ भक्तिभावें करोनी ॥ ८९ ॥ ज्येष्ठवापींत स्नानेसीं ॥ ज्येष्ठागौरी पूजा हर्षीं ॥ स्नान करा ज्ञानवापीसीं ॥ शृंगारसौभाग्य गौरीपूजा ॥ ९० ॥ विशाळगंगास्नानासी ॥ पूजा विशाळ गौरीसी ॥ ललितातीर्थस्नानेसी ॥ ललितादेवी पूजावी ॥ ९१ ॥ स्नानपावन तीर्थेंसी ॥ पूजा करा भवानीसी ॥ बिंदुतीर्थस्नानासी ॥ मंगलागौरी पूजावी ॥ ९२ ॥ पूजा इतुके शक्तींसी ॥ मग पूजिजे लक्ष्मीसी ॥ येणें विधि भक्तीसीं ॥ यात्रा करी मनोहर ॥ ९३ ॥ यात्रातीर्थ चतुर्थीसी ॥ पूजा सर्व गणेशांसी ॥ मोदक द्यावे गौरीपुत्रासी ॥ विघ्न न करी तीर्थवासियांतें ॥ ९४ ॥ मंगळ अथवा रविवारेसी ॥ यात्रा करा भैरवासी ॥ षष्ठी तिथी परियेसीं ॥ जावें तुह्मीं मनोहर ॥९५॥ रविवारीं सप्तमीसी ॥ यात्रा

करावी देवासी ॥ नवमी अष्टमी चंडीसी ॥ यात्रा तुझी करावी ॥ ९६ ॥ अंतर्गृहया-त्रेसी ॥ करावी तुझीं प्रतिदिवशीं ॥ विस्तार काशीखंडासीं ॥ ऐक शिष्या ब्रह्मचारी ॥ ९७ ॥ ऐसी काशीविश्वेश्वर ॥ यात्रा करावी तुझी परिकर ॥ आपुल्या नामीं सोमेश्वर ॥ लिंगप्रतिष्ठा करावी ॥ ९८ ॥ इतुकें ब्रह्मचारियासी ॥ यात्रा सांगितली परियेसीं ॥ आ-चरण करी येणें विधीसीं ॥ तुझी वासना पुरेल ॥ ९९ ॥ तुझे चित्तीं असे गुरू ॥ प्रसन्न होईल शंकरू ॥ मनीं धरीं गा निर्धारू ॥ गुरुस्मरण करी निरंतर ॥१००॥ इतुकें सांगोनि तापसी ॥ अदृश्य झाला परियेसीं ॥ ब्रह्मचारी ह्मणे हर्षी ॥ हाचि माझा गुरु सत्य ॥ १ ॥ अथवा होईल ईश्वर ॥ मग कृपाळु झाला सत्वर ॥ कार्य साधेल निर्धार ॥ ह्मणोनि मनीं धरियेलें ॥ २ ॥ न आराधितां आपोआप ॥ भेटला मातें मायबाप ॥ गुरुभक्तीनें अ-मूप ॥ सकळाभीष्टें पाविजे ॥ ३ ॥ समस्त देवांची ऐसी स्थिति ॥ दिल्यावांचून न देती ॥ ईश्वर भोळा चक्रवर्ती ॥ गुरुप्रसादें भेटला ॥ ४ ॥ यज्ञ दान तप सायास ॥ कांहीं न करि-तां बहुवस ॥ भेटला मज विशेष ॥ गुरुकृपेंकरोनियां ॥ ५ ॥ ऐसें गुरुस्मरण करीत ॥ ब्रह्म-चारी जाय त्वरित ॥ विधिपूर्वक आचरत ॥ यात्रा केली भक्तीनें ॥ ६ ॥ यात्रा करितां भक्तीसीं ॥ प्रसन्न झाला व्योमकेशी ॥ निजस्वरूपें संमुखेसी ॥ उभा राहिला शंकर ॥ ७ ॥ प्रसन्न होवोनि शंकर ॥ ह्मणे दिधला माग वर ॥ संतोषोनि त्वष्टृकुमार ॥ निवेदिता झाला वृत्तांत ॥ ८ ॥ जें जें मागितलें गुरुवर्यें ॥ आणीक त्याचे कन्याकुमारें ॥ सांगता झाला विस्तारें ॥ शंकराजवळी देखा ॥ ९ ॥ संतोषोनी ईश्वर ॥ देता झाला अखिल वर ॥ ह्मणे बाळा माझ्या कुमारा ॥ सकल विद्याकुशल होसी ॥ १० ॥ तुवां केली गुरुभक्ति ॥ तिणें

झाली आपणा तृप्ति ॥ अखिल विद्या तुज होती ॥ विश्वकर्मा तूंचि होसी ॥ ११ ॥ चतु-
र्विध पुरुषार्थ ॥ लाधला तुज परमार्थ ॥ सृष्टि रचावया समर्थ ॥ होसी जाण त्वष्टपुत्रा
॥ १२ ॥ ऐसा वर लाधोन ॥ त्वष्टा ब्रह्मनंदन ॥ केलें लिंगस्थापन ॥ आपुले नामीं परियें-
सा ॥ १३ ॥ मग निघाला तेथोनी ॥ केली आयती तत्क्षणीं ॥ प्रसन्न होतां शूलपाणी ॥
काय नोहे तयासी ॥१४॥ जें जें मागीतलें श्रीगुरुवरें ॥ सकळ वस्तु केल्या चतुरें ॥ घेऊ-
नियां सत्वरें ॥ आला श्रीगुरुसंमुख ॥१५॥ सकळ वस्तु देऊनी ॥ लागतसे श्रीगुरुचरणीं ॥
अनुक्रमें गुरुरमणी ॥ पुत्र कन्येसी वंदिलें ॥ १६ ॥ उल्हास झाला श्रीगुरुसी ॥ अलिंगी-
तसे महाहर्षी ॥ शिष्यताता ज्ञानराशी ॥ तुष्टलों तुझे भक्तीनें ॥ १७ ॥ सकल विद्याकुशल
होसी ॥ अष्टैश्वर्यें नांदसी ॥ त्रैमूर्ती तुझिया वंशीं ॥ होतील एक शिष्योत्तमा ॥ १८ ॥ घर
केलें तुवां आम्हांसी ॥ आणिक वस्तु विचित्रेसी ॥ चिरंजीव तूंचि होसी ॥ आचंद्रार्क
तुझें नाम ॥ १९ ॥ स्वर्ग मृत्यु पाताळासी ॥ पसरवी तुझे चातुर्यासी ॥ रचिसी तूंचि
सृष्टीसी ॥ चौदा चौसष्ट तूंचि ज्ञाता ॥२०॥ तुज वश होतील अष्टसिद्धी ॥ होतील जाण
नवनिधी ॥ चिंता कष्ट न होती कधीं ॥ ह्मणोनि वर देतसे ॥ २१ ॥ ऐसा वर लाधोनी ॥
गेला शिष्य महाज्ञानी ॥ येणेंपरी विस्तारोनी ॥ सांगे ईश्वर पार्वतीसी ॥ २२ ॥ ईश्वर
ह्मणे गिरिजेसी ॥ गुरुभक्ती आहे ऐसी ॥ एक भाव असे ज्यासी ॥ सकलाभीष्टें पावती
॥ २३ ॥ भवरूप हा सागर ॥ उतरावया पैलपार ॥ समर्थ असे एक गुरुवर ॥ त्रैमूर्तीचा
अवतार ॥ २४ ॥ याकारणें त्रैमूर्ती ॥ गुरुचरणीं भजती ॥ वेद शास्त्रें बोलती ॥ गुरुविणें
सिद्धी नाहीं ॥ २५ ॥ श्लोक ॥ यस्य देवे परा भक्तिर्यथा देवे तथा गुरौ ॥ तस्यैते कथिता

ह्यर्थाः प्रकाशंते महात्मनः ॥ २६ ॥ ऐसें ईश्वर पार्वतीसी ॥ सांगता झाला विस्तारेंसी ॥
ह्मणोनि श्रीगुरु प्रीतीसीं ॥ निरोपिलें द्विजातें ॥२७॥ इतुकें होतां रजनीसी ॥ उदय झाला
दिनकरासी ॥ चिंता अंधकारासी ॥ गुरुकृपा ज्योति जाणा ॥ २८ ॥ संतोषोनी द्विजवर ॥
करिता झाला नमस्कार ॥ ऐसी बुद्धि देणार ॥ तूंचि स्वामी कृपानिधि ॥ २९ ॥ नमन
करूनी श्रीगुरूसी ॥ विनवीतसे भावेंसीं ॥ स्वामी कथा निरोपिलीसी ॥ अपूर्व मातें वाटलें
॥ ३० ॥ काशियात्राविधान ॥ निरोपिलें मज विस्तारोन ॥ तयावेळीं होतों आपण ॥
तुह्मांसहित तेथेंची ॥ ३१ ॥ पाहिलें आपण दृष्टांतीं ॥ स्वामी काशीपुरीं असतां ॥ जागृती
किंवा सुषुप्ती ॥ नकळे मातें स्वामिया ॥ ३२ ॥ ह्मणोनि विप्र तयेवेळीं ॥ वंदी श्रीगुरु-
चरणकमळीं ॥ विनवीतसे करुणा बहाळी ॥ भक्तिभावें करोनियां ॥ ३३ ॥ जयजया
परमपुरुषा ॥ परात्परा परमहंसा ॥ भक्तजनमानसहंसा ॥ श्रीनृसिंहसरस्वती ॥ ३४ ॥
ऐसें तया अवसरीं ॥ पूर्वज तुझा स्तोत्र करी ॥ सांगेन तुज अवधारीं ॥ एकचित्तें करू-
नियां ॥ ३५ ॥ श्लोक ॥ आदौ ब्रह्मत्वमेकमेवजगतां वेदात्ममूर्ति विभो पश्चात् क्षोणितले
विनाशि दितिजे कृत्वावतारं प्रभो ॥ हत्वा दैत्यमनेकधर्मरचिता भूत्वात्मजोऽत्रेर्गृहे वंदेऽहं
नरकेसरी सरस्वती श्रीपादयुग्मांबुजम् ॥ ३६ ॥ भूदेवाखिलमानुषं विदुर्जनाबाधायमानः
कलिं वेदायुष्यमनेकवर्णमनुजाभेदादिभूतोन्नतिं ॥ छेत्ताऽधर्मतमांधकारहरणज्ञानप्रदी-
पोज्वलं वंदेऽहं नरकेसरी सरस्वती श्रीपादयुग्मांबुजम् ॥ ३७ ॥ ध्यातस्त्वं हरिमनेकयाति-
गुरवो जाताग्रजन्माविभोहेतुःसर्व विभोजनाय हरणं ज्योतिःस्वरूपं जगत् ॥ चातुर्था-
श्रमस्थापितं क्षितितले पातुः सदा सेव्ययं वंदेऽहं नरकेसरी सरस्वती श्रीपादयुग्मांबुजम्

॥ ३८ ॥ चरितं चित्रमनंतकीर्तिमतुलं परिभूत भूमंडले मूकं वाक्य दिवांधकस्य नयनं वंध्यांच पुत्रं ददत् ॥ सौभाग्यं विधवाचदायकश्रियं दत्वाच भक्तंजनं वंदेऽहं नरकेसरी सरस्वती श्रीपादयुग्मांबुजम् ॥ ३९ ॥ दुरिताघोरदरिद्रदावतिमिरहरणं जगज्ज्योतिषं सुरधेनुखुरपादपारतजनाकरुणादिभक्तार्तिहा ॥ नरसिंहसरस्वतीश्वरविभो शरणागतं रक्षणं वंदेऽहं नरकेसरी सरस्वती श्रीपादयुग्मांबुजम् ॥ ४० ॥ गुरुमूर्तिचरणारविंदयुगुलस्मरणे कृते नित्यंसौ चरितं क्षेत्रमनेकतीर्थसफलं सरिदादिभागीरथीं ॥ तुरगादिमेध सहस्रगोविदुर्जनाः सम्यक ददंस्तत्फलं वंदेऽहं नरकेसरी सरस्वती श्रीपादयुग्मांबुजम् ॥४१॥ नोशक्यं तव नाम मंगलस्तेवं वेदागमागोचरं पादद्वंद्वहृदयाब्जमंतरदलं निधाय त्वां भूमिपं ॥ भूयो भूयः स्मरन्नमामि मनसा श्रीसद्गुरुं पाहि मां वंदेऽहं नरकेसरी सरस्वती श्रीपादयुग्मांबुजम् ॥ ४२ ॥ भक्तानां तरणार्थ सर्वजगतां दीक्षां ददन्योगिनां सुक्षेत्रं पुरगाणगस्थितप्रभो दत्वा चतुष्कामदा ॥ स्तुत्वाभक्तिसरस्वतीगुरुपदं जिव्हायदोषादिकं वंदेऽहं नरकेसरी सरस्वती श्रीपादयुग्मांबुजम् ॥ ४३ ॥ एवं श्रीगुरुनाथमष्टकमिदं स्तोत्रं पठेन्नित्यशस्तेजोवर्चबलोन्नतिश्रियधकरमानंदवर्धंवपुः ॥ पुत्रापत्यमनेकसंपदलभं दीर्घायुरारोग्यतां वंदेऽहं नरकेसरी सरस्वती श्रीपादयुग्मांबुजम् ॥४४॥ येणेपरी स्तोत्र करीत ॥ मागुती करी दंडवत ॥ सद्गदित कंठ होत ॥ रोमांच अंगीं उठियेले ॥४५॥ ह्मणे त्रैमूर्ती अवतारू॥तूंचि देवा जगद्गुरू॥ आह्मां दिसतोसी नरू ॥ कृपानिधी स्वामिया ॥ ४६ ॥ मज दाखविला परमार्थ ॥ लाधले चारी पुरुषार्थ ॥ तूंचि सत्य विश्वनाथ ॥ काशीपुर तुजपासीं ॥४७॥ ऐसे परी श्रीगुरुसी॥ विनवीतसे परियेसी ॥ संतोषोनी महाहर्षी ॥ निरोप देती तयेवेळीं ॥४८॥ श्रीगुरु ह्मणती

द्विजासी ॥ दाखविली तुज काशी ॥ पुढें तुझ्या वंशीं एकविसांसीं ॥ यात्राफळ तयां असे ॥ ४९ ॥ तूंचि आमुचा निजभक्त ॥ दाखविला तुज दृष्टांत ॥ आम्हांपासीं सेवा करीत ॥ राहें भक्ता ह्मणती तया ॥५०॥ जरी रहासी आम्हांपासीं ॥ तरी त्वां न वंदिजे म्लेंछासी ॥ आणोनियां स्त्रीपुत्रासी ॥ भेटी करी आम्हांतें ॥ ५१ ॥ निरोप देऊनी द्विजासी ॥ गेले गुरु मठासी ॥ आनंद झाला मानसीं ॥ श्रीगुरुदर्शनीं भक्तजनां ॥ ५२ ॥ नामधारक शिष्य-राणा ॥ लागे सिद्धाचिया चरणा ॥ विनवीतसे कर जोडोनि जाणा ॥ भक्तिभावें करो-नियां ॥ ५३ ॥ मागें कथानक निरोपिलें ॥ सायंदेव शिष्य भले ॥ श्रीगुरूंनीं त्यातें निरो-पिलें ॥ कलत्र आणी ह्मणत ॥५४॥ पुढें तया काय झालें ॥ विस्तारोनि सांगा वहिलें ॥ पाहिजे आतां अनुग्रहिलें ॥ ह्मणोनि चरणीं लागला ॥५५॥ संतोषोनी सिद्धमुनी ॥ सांगतसे विस्ता-रोनीं ॥ सायंदेव महाज्ञानी ॥ गेला श्रीगुरुनिरोपें ॥ ५६ ॥ जाऊनि आपुले स्त्रियेसी ॥ सांगता झाला पुत्रांसी ॥ आमुचा गुरु परियेसी ॥ असे गाणगापुरांत ॥५७॥ आह्मीं जावें भेटीसी ॥ समस्त कन्या पुत्रांसी ॥ ह्मणोनि निघाला वेगेंसीं ॥ महानंदें करोनियां ॥ ५८ ॥ पावला गाणगापुरासी ॥ भेटी जाहली श्रीगुरूसी ॥ नमन करी भक्तीसीं ॥ साष्टांगीं तये-वेळीं ॥ ५९ ॥ कर जोडूनी तयेवेळीं ॥ स्तोत्र करी वेळोवेळीं ॥ ओंनमोजी चंद्रमौळी ॥ त्रैमूर्ती तूंचि होसी ॥ ६० ॥ तूं त्रैमूर्तीचा अवतार ॥ अज्ञानदृष्टीं दिससी नर ॥ वर्णावया न दिसे पार ॥ तुझी महिमा स्वामिया ॥ ६१ ॥ तुझी महिमा वर्णावयासी ॥ शक्ति कैंची आह्मांसी ॥ आदिपुरुष भेटलासी ॥ कृपानिधि स्वामिया ॥ ६२ ॥ जैसा चंद्र चकोरासी ॥ उदय होतां संतोष त्यासी ॥ तैसा आनंद आह्मांसी ॥ तुझे चरण लक्षितां ॥ ६३ ॥ पूर्व-

जन्मीं पापराशी ॥ केल्या होत्या बहुवर्शीं ॥ श्रीगुरूचे दर्शनेंसीं ॥ पुनित झालों ह्मणतसे ॥ ६४ ॥ जैसा चिंतामणीस्पर्शी ॥ हेमत्व होय लोहासी ॥ मृत्तिका पडतां जंबूनदीसी ॥ उत्तम सुवर्ण होतसे ॥ ६५ ॥ जातां मानससरोवरासी ॥ हंसत्व येई वायसासी ॥ तैसें तुझे दर्शनेंसी ॥ पुनित झालों स्वामियां ॥ ६६ ॥ श्लोक ॥ गंगा पापं शशी तापं दैन्यं कल्पतरुस्तथा ॥ पापं तापं च दैन्यंच गुरुर्हरति दर्शनात् ॥ १ ॥ टीका ॥ गंगा स्नानानें पापें नाशी ॥ ताप निवारी देखा शशी ॥ कल्पवृक्षच्छायेसी ॥ कल्पिलें फळ पाविजे ॥ ६७ ॥ एकेकाचे एकेक गुणें ॥ असती ऐसीं हीं लक्षणें ॥ दर्शन होतां श्रीगुरुचरणें ॥ तिन्ही फळें पाविजे ॥ ६८ ॥ पापें हरती तात्काळीं ॥ पापचिंता जाती सकळी ॥ दैन्यकानन समूळ जाळी ॥ श्रीगुरुचरणदर्शनें ॥ ६९ ॥ चतुर्विध पुरुषार्थ ॥ देता होय गुरुनाथ ॥ ऐसा बोले वेदसिद्धांत ॥ तोचि आह्मीं देखिला ॥७०॥ ह्मणोनियां आनंदेंसीं ॥ गायन करी संतोषीं ॥ अनेक रागें परियेसीं ॥ कर्नाटकभाषें करोनी ॥ ७१ ॥ ॥ राग श्रीराग ॥ कंडे निंदुभक्तजनराभाग्यनिधियभूमंडलदोलगेनारसिंहसरस्वतीया ॥ ७२ ॥ कंडे निंदुउंडेनिंदुवारिजादोळपादवाराजाकमळांदोळदंतध्यानिसी ॥ ७३ ॥ सुख सुवाजनारगळा ॥ भोरगेलान्नेकामिफळफळा ॥ नित्यसकळाहुवा ॥ धीनार सिंहसरस्वतीवरानना ॥ ७४ ॥ वाक्यकरुणानेनसुवा ॥ जगदोळगदंडकमंडलु धराशी ॥ सगुणनेनीशीसुज्जनरिगे ॥ वगादुनीवासश्रीगुरुयतिवरांन ॥ ७५ ॥ धरगेगाणगापुरडोलकेलाशीहरी ॥ दासिसोनुनादयाकरुणादल्ली ॥ वरावी तुंगसुनाहोराववनुभनुविना ॥ नारसिंहसरस्वतीगुरुचरणावन्न ॥ ७६ ॥ राजगखंडीकंडीनेनमाइंदुकंडेनेनमा ॥ मंडलादोलगेयतीकुलराये ॥ चंद्रमन्ना ॥ ७७ ॥ तत्वबोधाया-

उपनिषदतत्वचरित ॥ नाव्यक्तवादपरब्रह्ममूर्तीयनायना ॥ शेषशयनापरवेशकायना ॥
लेशकृपयनीवनेवभवासौपालकाना ॥ ७८ ॥ गंधपरिमळादिशोभितानंदासरन्नाछंदालयो-
गेंदेगोपीवृंदवल्लभना ॥७९॥करीयनीयानां पाप ॥ गुरु ॥ नवर सगुसायन्नीं ॥ नारसिंहसर-
स्वत्यन्ना ॥ नादपुरुषावादना ॥ ८० ॥ यापरी स्तोत्रें श्रीगुरूसी ॥ स्तुती केली बहुवसीं ॥
संतोषोनी महाहर्षीं ॥ आश्वासिताती तयेवेळीं ॥ ८१ ॥ प्रेमभावें समस्तांसी ॥ जैसा ह्मण-
ती समीपेसी ॥ जैसा लोभ मायेसी ॥ बालकावरी परियेसा ॥ ८२ ॥ आज्ञा घेवोनि सह-
ज ॥ गेला तुमचा पूर्वज ॥ सकळ पुत्रांसहित द्विज ॥ आला श्रीगुरुदर्शना ॥ ८३ ॥ भाद्रपद
चतुर्दशीसी ॥ शुक्लपक्ष परियेसीं ॥ आला शिष्य भेटीसी ॥ एकभावें करोनियां ॥ ८४ ॥
येती शिष्य लोटांगणीं ॥ एकभावें तनुमनीं ॥ येऊनि लागती चरणीं ॥ सद्गदित कंठ
झाला ॥ ८५ ॥ स्तोत्र करिती तिहीं काळीं ॥ कर जोडोनि तयेवेळीं ॥ ओं नमोजी चंद्र-
मौळी ॥ त्रैमूर्ती तूंचि होसी ॥८६॥ त्रैमूर्तींचा अवतारू ॥ झालासि तूं जगद्गुरू ॥ धेरा दि-
सतोसि नरू ॥ न कळे पार तुझा स्वामिया ॥ ८७ ॥ सिद्ध ह्मणे नामकरणी ॥ काय सांगूं
तये दिनीं ॥ कैशी कृपा अंतःकरणीं ॥ तया श्रीगुरुयतीची ॥८८॥ आपुले पुत्र कलत्रेंसी॥
जैसा लोभ परियेसीं ॥ तैसा तुमचे पूर्वजांसी ॥ प्रेमभावें पुसताती ॥८९॥ गृहवार्ता ह्मुरसी ॥
क्षेम पुत्रकलत्रेंसीं ॥ द्विज सांगे मनोहर्षीं ॥ सविस्तारीं परियेसा ॥ ९० ॥ पुत्रकलत्रेंसहित
नमोन ॥ सांगे क्षेम समाधान ॥ होते पुत्र चौघेजण ॥ चरणावरी घातले ॥ ९१ ॥ ज्येष्ठ सुत
नागनाथ ॥ तयावरी कृपा बहुत ॥ कृपानिधि गुरुनाथ ॥ माथां हस्त ठेविती ॥ ९२ ॥ श्रीगुरु
ह्मणती द्विजासी ॥ तुझ्या ज्येष्ठ सुतासी ॥ आयुष्य पूर्ण असे त्यासी ॥ संतति बहु याची

वाढेल ॥ ९३ ॥ हाच भक्त आह्मांसी ॥ असेल श्रियायुक्तेसीं ॥ तुवां आतां म्लेंछासी ॥ सेवा न करावी ह्मणतसे ॥ ९४ ॥ आणीक तूतें असे नारी ॥ पुत्र होती तीस चारी ॥ नांदतील श्रेयस्कारी ॥ तुवां सुखें असावें ॥ ९५ ॥ जया दिवशीं म्लेंछासी ॥ तुवां जावोनि वंदिसी ॥ हानी असे जिवासी ॥ ह्मणोनि सांगती तयेवेळीं ॥ ९६ ॥ तुझा असे वडिल सुत ॥ तोचि आमुचा निजभक्त ॥ त्याची कीर्ति वाढेल बहुत ॥ ह्मणती श्रीगुरु तयेवेळीं ॥ ९७ ॥ मग ह्मणती द्विजासीं ॥ जावें त्वरित संगमासी ॥ स्नान करोनि त्वरितेसीं ॥ यावें ह्मणती तयेवेळीं ॥ ९८ ॥ ग्रामलोक तया दिवशीं ॥ पूजा करितां अनंतासी ॥ येऊनिया श्रीगुरूसी ॥ पूजा करिती परियेसा ॥ ९९ ॥ पुत्रमित्रकलत्रेसीं ॥ गेले स्नाना संगमासी ॥ विधिपूर्वक अश्वत्थासी ॥ पूजूनि आले मठातें ॥ २०० ॥ श्रीगुरु ह्मणती द्विजासी ॥ आजि व्रत चतुर्दशी ॥ पूजा करी अनंतासी ॥ समस्त द्विज मिळोनि ॥ १ ॥ ऐसें ह्मणतां द्विजवरू ॥ करितां होय नमस्कारू ॥ आमुचा अनंत तूंचि गुरू ॥ व्रतसेवा तुमचे चरण ॥ २ ॥ तयेवेळीं श्रीगुरू ॥ सांगता झाला विस्तारू ॥ कौंडिण्य महाऋषीश्वरू ॥ केलें व्रत प्रख्यात ॥ ३ ॥ ऐसें ह्मणतां द्विजवरू ॥ करिता होय नमस्कारू ॥ कैसें व्रत आचरावें साचारू ॥ पूर्वीं कोणीं केलें असे ॥ ४ ॥ ऐसें व्रत प्रख्यात ॥ व्रतदैवत अनंत ॥ जेणें होय माझें हित ॥ कथामृत निरोपिजे ॥ ५ ॥ येणें पुण्य काय झालें ॥ काय लाभतसे रोकडें ॥ ऐसें मनींचें साकडें ॥ फेडावें माझें स्वामिया ॥ ६ ॥ ऐसें विनवीतसे द्विजवर ॥ संतोषोनी गुरुदातार ॥ सांगते झाले व्रताचार ॥ सिद्ध ह्मणे नामधारका ॥ ७ ॥ ह्मणोनि सरस्वती गंगाधर ॥ सांगे गुरुचरित्र विस्तार ॥ ऐकतां भवसागर ॥ पैलपार

पाववी श्रीगुरू ॥८॥ इति श्रीगुरुचरित्रामृत ॥ काशीयात्रा समस्त करीत ॥ श्रोते ऐकती आनंदीत ॥ तेणें सफळ जन्म होय ॥९॥ इति श्रीगुरूचरित्रामृत ॥ सांगतसे नामधारका विख्यात ॥ जेणें होय मोक्ष प्राप्त ॥ द्विचत्वारिंशोऽध्यायः ॥ २१० ॥ इति श्रीनृसिंहसरस्वत्युपाख्याने सिद्धनामधारकसंवादे काशीक्षेत्रमहिमावर्णनं नाम द्विचत्वारिंशोऽध्यायः ॥ ओंव्या २१० ॥



॥ श्रीगणेशाय नमः ॥ श्रीगुरु ह्मणती द्विजासी ॥ या अनंत व्रतासी ॥ भक्तिपूर्वक निश्च-
येंसी ॥ पूर्वीं बहुतीं आराधिलें ॥१॥ युधिष्ठिर पंडुसुत ॥ तयानें आचरिलें हें व्रत ॥ राज्य
लाधला त्वरित ॥ ऐसें व्रत हें उत्तम ॥ २ ॥ ऐसें ह्मणतां द्विजवर ॥ करिता झाला नम-
स्कार ॥ पूर्वींचा राजा पंडुकुमार ॥ आणीक राज्य केवीं केलें ॥ ३ ॥ श्रीगुरु ह्मणती
द्विजासी ॥ होतें राज्य पांडवांसी ॥ द्यूतकर्म कौरवांसी ॥ करूनि राज्य हारविलें ॥ ४ ॥
मग निघाले वनांतरा ॥ कष्टत होते वर्षें बारा ॥ ऐसें तया युधिष्ठिरा ॥ राज्य त्यजिलें
परियेसा ॥ ५ ॥ तया घोर अरण्यांत ॥ युधिष्ठिर बंधूंसहित ॥ असे चिंताव्याकुळित ॥
सदा ध्याय श्रीहरीसी ॥ ६ ॥ समस्त राज्य सांडूनी ॥ वास केला तिहीं वनीं ॥ कौरव
कपट करोनी ॥ नानापरी विघ्नें करिती ॥ ७ ॥ सत्व याचें टाळावयासी ॥ पाठविलें दुर्वा-
सासी ॥ त्यांसी सहाय हृषीकेशी ॥ राखितसे सर्वदां ॥ ८ ॥ नानातीर्थें नानाव्रतें ॥
आचरले तेथें बहुते ॥ कष्टत होते वनीं ते ॥ निर्वाणरूप होऊनियां ॥ ९ ॥ भक्तवत्सल
नारायण ॥ तयांचे कष्ट पाहून ॥ आला तेथें ठाकोन ॥ जेथें होते पंडुकुमार ॥१०॥ कृष्ण
येतां देखोनी ॥ धर्म जाय लोटांगणीं ॥ दंडप्रणाम करूनी ॥ वंदितसे तये वेळीं ॥ ११ ॥
केश आपुले मोकळी ॥ झाडी कृष्ण चरणधुळी ॥ सर्वोपस्कार पूजा तये वेळीं ॥ करीतसे
विनयेंसी ॥ १२ ॥ अर्घ्य पाद्य देवोनी ॥ गंधाक्षता लावूनी ॥ जीं का पुष्पें होतीं रानीं ॥
त्यांहीं पूजा करीतसे ॥ १३ ॥ पूजोनियां भक्तीसीं ॥ विनवीतसे परियेसीं ॥ जयजयाजी
हृषीकेशी ॥ भक्तवत्सला कृष्णनाथा ॥ १४ ॥ जयजया अनंतनारायणा ॥ भवसागरोद्धु-
रणा ॥ कृपाळुवा लक्ष्मीरमणा ॥ क्षीराब्धिवासा वासुदेवा ॥ १५ ॥ परमात्मा परंज्योती ॥

तूंचि करिसी उत्पत्ति स्थिति ॥ लय करविशी तूंचि अंतीं ॥ त्रैमूर्ती तूंचि देवा ॥ १६ ॥ विश्वाचा जिव्हाळा ॥ होऊनि रक्षिसी सकळां ॥ वास तुझा सूक्ष्मस्थळां ॥ अणुरेणु तृण-काष्ठीं ॥ १७ ॥ नमन तुझे चरणांसीं ॥ त्रिगुणात्मक हृषीकेशी ॥ रजोगुणें सृष्टीसीं ॥ तुवां रचियेली संयोगें ॥ १८ ॥ दुष्टांचा निग्रह करणें ॥ साधुजनां संरक्षणें ॥ ऐसें सामर्थ्य वेद-पुराणें ॥ बोलताती प्रसिद्ध ॥ १९ ॥ फेडावया भूमिभार ॥ घेतला तुवां अवतार ॥ जड झाला युधिष्ठिर ॥ तरी कां तुवां ठेविला ॥ २० ॥ आपुले प्राण आह्मांसी ॥ ह्मणवोनि जगीं वानिसी ॥ पाठवूनि अरण्यासी ॥ कष्टविलें नानापरी ॥२१॥ तुझी कृपा होय जया-सी ॥ तयासी तूं रक्षिसी ॥ उपेक्षूनि आह्मांसी ॥ अरण्यांत कां ठेविलें ॥२२॥ तुजवांचो-नी आह्मीं हृषीकेशी ॥ दुःख सांगावें कवणापाशीं ॥ जरी आह्मां उपेक्षिसी ॥ काय कोणा जीवालें ॥२३॥ इतुकियावरी भीमसेन ॥ येऊनि धरी कृष्णचरण ॥ उपेक्षावया काय का-रण ॥ कृपा करोनी सांगा ह्मणे ॥२४॥ धनंजय तये वेळीं ॥ वंदितसे चरणकमळीं ॥ विन-वीतसे करुणा बहाळी ॥ कृपाळुवा मुरारी ॥२५॥ तुझे कृपादृष्टीसी ॥ होतों आम्ही अरण्यवा-सी ॥ घडले कष्ट सायासी ॥ उबगलों स्वामी बहुत ॥२६॥ आतां आमुचें कष्टहरण ॥ पांडवांचा तूंचि प्राण ॥ शरीर राखे नारायणा ॥ ह्मणतसे तयेवेळीं ॥२७॥ माद्रीदेवीचे कुमार ॥ करोनियां नमस्कार ॥ द्रौपदी येऊनि सत्वर ॥ पाय वंदी तयेवेळीं ॥२८॥ तूं आमुचा कैवारी ॥ आह्मीं असों अरण्यघोरीं ॥ आमुचा बंधू राज्य करी ॥ काय उपयोग आह्मांसी ॥ २९ ॥ तुज-सारिखें छत्र असतां ॥ आह्मां कष्ट अपरिमिता ॥ कवणे प्रकारें स्वस्थचित्तता ॥ राज्य-प्राप्ति आह्मांसी ॥ ३० ॥ असा उपाय आह्मांसी ॥ सांगा स्वामी हृषीकेशी ॥ ऐसें ह्मणतां

कृष्णासी ॥ कृपा उपजे मनांत ॥ ३१ ॥ कृष्ण ह्मणे पंडुसुता ॥ सांगेन तुह्मां एक व्रता ॥
तात्काळिक तुह्मां प्रसन्नता ॥ राज्य होईल जाणपैं ॥ ३२ ॥ व्रतामध्यें उत्तम व्रत ॥ अनंत
नाम विख्यात ॥ आचरावें तुह्मीं त्वरित ॥ राज्य तुह्मां होईल ॥ ३३ ॥ आतां सांगेन
तुह्मांसी ॥ अनंत कवण ह्मणसी ॥ सर्वांठायीं आपण वासी ॥ अनंतनाम आह्मां असे
॥ ३४ ॥ कळा काष्ठा मुहूर्त आपण ॥ दिन रात्री शरीर जाण ॥ पक्ष मास वर्ष आपण ॥
युग कल्प आदिकरोनी ॥ ३५ ॥ अवतरलों मी नारायण ॥ भूभार उतरावयालागोन ॥
दानव दुष्ट निर्दाळोन ॥ जन्मलों वसुदेवकुळीं ॥ ३६ ॥ अनंत मीच जाणसी ॥ संशय न
धरीं या मानसीं ॥ त्रैमूर्ती अवतरलों सर्वांशीं ॥ ब्रह्मा विष्णु महेश्वर ॥ ३७ ॥ आपण सूर्य-
शशी देखा ॥ चतुर्दश भुवनें मी ऐका ॥ अष्टवसु आहेत निका ॥ द्वादशार्क आपणची
॥ ३८ ॥ रुद्र असती एकादश ॥ सप्त समुद्र परियेस ॥ ऋषी सप्त विशेष ॥ पर्वतादिक
आपणची ॥ ३९ ॥ जितुके वृक्ष आहेति क्षितीं ॥ आकाशीं नक्षत्रें दिसतीं ॥ दशदिशा
आहेत ख्याती ॥ भूमि आपण ह्मणे देखा ॥ ४० ॥ असती सप्त पाताळ ॥ भूर्भुवादि लोक
सकळ ॥ अणु रेणु तृण काष्ठ सकळ ॥ विश्वात्मा आपणची ॥ ४१ ॥ न धरीं संशय युधि-
ष्ठिरा ॥ अनंत ह्मणजे मी निर्धारा ॥ विधिपूर्वक पूजा करा ॥ व्रत तुह्मांसी बरवें असे ॥ ४२ ॥
विनवी युधिष्ठिर कर जोडोनी ॥ स्वामी सांगा विस्तारोनी ॥ व्रत करावें कवणे
विधानीं ॥ कवण दान कवण पूजा ॥ ४३ ॥ करावें व्रत कवणे दिवसीं ॥ विस्तारोनि सांगा
आह्मांसी ॥ निरोपावें वेगेसीं ॥ पूर्वीं कवणें आचरिलें ॥ ४४ ॥ कृष्ण ह्मणे युधिष्ठिरासी ॥
तुवां पुशिलें आह्मांसी ॥ शुक्लपक्ष भाद्रपद मासीं ॥ चतुर्दशी परियेसा ॥ ४५ ॥ आरा-

गु.
च.

धितां अनंतासी ॥ त्वरित राज्य पावसी ॥ पूर्वीं कोणीं केलें ह्मणसी ॥ सांगेन ऐका तत्पर ॥४६॥ असे पूर्वीं कृतयुगेसी ॥ सुमंतु नामा विप्र परियेसी ॥ उत्पन्न झाला वासिष्ठ गोत्रासी ॥ भृगुकन्या दीक्षा नामें ॥४७॥ तेचि झाली सुमंतूची भार्या ॥ पतिव्रता औदार्या ॥ कन्या तिसी झाली सुतनया ॥ नाम तिचें सुशीला ॥४८॥ सुशीला कन्या सुमंतूघरीं ॥ नित्य भक्ती सदाचारी ॥ करीतसे विचित्रपरी ॥ सर्व मंगळ स्वरूपें ॥४९॥ गृहशोभा करी बहुत ॥ नाना पत्रें तोरणें करित ॥ पंचवर्ण चूर्ण युक्त ॥ रंगमाळिका सहित देखा ॥५०॥ स्वस्तिकादि शंखपद्म ॥ चक्र गदादि उत्तम ॥ नमस्कारादि मनोधर्म ॥ देवतार्चन सोपस्कारी ॥५१॥ वर्ततां ऐसें एके दिवशीं ॥ विचित्र घडलें दैववशीं ॥ सुमंतुपत्नी पंचत्वासी ॥ पावती झाली तये वेळीं ॥५२॥ सुमंतूसी भार्याहीनत्व झालें ॥ समस्त कर्म राहिलें ॥ पुनःसंधान पाहिजे केलें ॥ ह्मणोनि नारी आणीक केली ॥५३॥ तिचें नांव असे कर्कशी ॥ दुःशीलाचरणी परियेसी ॥ नित्य कलह करी बहुवसीं ॥ कन्या पतीसवें देखा ॥५४॥ सुशीला कन्या झाली उपवर ॥ सुमंतु चिंती वारंवार ॥ इशीं एकादा मिळतां वर ॥ कन्यादान करीन ह्मणे ॥५५॥ ऐसें चिंतितां एके दिवशीं ॥ तेथें आला कौंडिण्य ऋषी ॥ विचारितां कन्येसी ॥ सुमंतूनें अंगिकारिलें ॥५६॥ कन्यादान गृह्योक्तेसी ॥ देता झाला कौंडिण्यासी ॥ मिळोनि होतीं दोन मासीं ॥ आषाढ आणि श्रावण ॥५७॥ माता करी कन्येसीं वैर ॥ सापत्नपणाचा हाचि प्रकार ॥ कौंडिण्य पुसे सुमंता विचार ॥ जाऊं आश्रमा आणिका ठायां ॥५८॥ सुमंतु बहु दुःख करी ॥ ह्मणे स्त्री नव्हे माझी वैरी ॥ कन्या झाली आतां दुरी ॥

अ.
४३

पा.
४४४

कैंची पापिणी वरिली मीं ॥५९॥ शांत पत्नी नाहीं ज्याचे घरीं ॥ तयासीं अरण्य नाहीं
दुरी ॥ ऐक स्वामी त्रिपुरारी ॥ संसारसागरीं बुडालों ॥ ६० ॥ न चाले माझें कर्मतापस ॥
नायके हित बोले कर्कश ॥ कन्या असतां संतोष ॥ नित्य दर्शन जामाता ॥ ६१ ॥ ऐसा
सुमंतु चिंता करी ॥ कौंडिण्य ऋषि त्यासी वारी ॥ दोघे तापसी एके घरीं ॥ असूं नये
धर्महानि ॥ ६२ ॥ जाऊं आह्मी आणीक स्थाना ॥ तप करोनि अनुष्ठाना ॥ भेटी होईल
पुनः पुनः ॥ जवळी करूं आश्रम ॥६३॥ सुमंतु ह्मणे कौंडिण्यास ॥ आणीक रहावें बारा
दिवस ॥ सर्वसिद्धा त्रयोदशीस ॥ प्रस्थान तुह्मीं करावें ॥६४॥ सुमंतूची विनंति ऐकोन ॥
आणीक राहिले तेरा दिन ॥ सुमुहूर्त बरवा पाहून ॥ येरे दिवशीं निघाला ॥ ६५ ॥
सुमंतू ह्मणे कर्कशेसी ॥ कन्या जाईल पतीसरसी ॥ भोजन घालावें जामातासी ॥ व्रीहि
गोधूम दे ह्मणे ॥ ६६ ॥ पती सांगतांचि काय केलें ॥ धांवत गृहांत गमन केलें ॥ दृढ
कवाड लाविलें ॥ पाषाण लावी द्वारवंटा ॥ ६७ ॥ कांहीं केलिया न उघडी द्वार ॥ सुमंतु
विनवी आपटी शिर ॥ सुशीला कन्या धरी कर ॥ जाऊं ह्मणे तैसींची ॥६८॥ पाहूं गेला
स्वयंपाकघरा ॥ होता कोंडा गोधूम खरा ॥ देता झाला कन्यावरा ॥ निरोप दिधला
दोघांसीं ॥ ६९ ॥ दोघें बैसोनि रथावरी ॥ निघालीं कौंडिण्य संतोष करी ॥ माध्यान्ह
काळीं नदीतीरीं ॥ अनुष्ठानालागीं उतरले ॥७०॥ ऋषि बैसला अनुष्ठाना ॥ सुशीला होती
तये स्थाना ॥ तीरीं पाहतसे रम्य वना ॥ स्त्रीसमुदाय बहु असे ॥७१॥ रक्तांबर वस्त्रेंसीं ॥
परिधान केलें बहुवसीं ॥ व्रत ह्मणती चतुर्दशी ॥ करती पूजा पृथक् पृथक् ॥७२॥ पाहूनि
सुशीला हळू हळू ॥ गेली तया सुवासिनीजवळू ॥ पुसती झाली वेल्हाळू ॥ काय व्रत

करितां तुह्मी ॥७३॥ स्त्रियां ह्मणती सुशीलेसी ॥ अनंतव्रत आहे परियेसी ॥ पूजितां होय तात्काळेसीं ॥ सकलाभीष्टें पावती ॥ ७४ ॥ सुशीला ह्मणे नारीसी ॥ कवण विधान सांगा मजसी ॥ कृपा करोनि विस्तारेंसीं ॥ निरोपावें मजलागीं ॥७५॥ समस्त नारी मिळोनी ॥ सांगताती विस्तारोनी ॥ ऐक सुशीले बैस ह्मणोनी ॥ व्रत आद्यंतेसी निरोपिली ॥ ७६ ॥ भाद्रपद शुक्ल चतुर्दशीसी ॥ व्रत करावें परियेसीं ॥ सांगूं तुज विस्तारेंसीं ॥ ऐक सुशीले ह्मणताती ॥७७॥ रक्तपट सूत्रेंसीं ॥ अनंत करावा परियेसीं ॥ घेऊनी जावें नदीसीं ॥ स्नान करावें विधीनें ॥७८॥ दिव्यांबर परिधानूनी ॥ हळदी कुंकुम लावूनी ॥ आणावे कलश नूतन दोन्ही ॥ गंगा यमुना ह्मणोनियां ॥ ७९ ॥ उदक भरोनी तयांत ॥ पंचपल्लव रत्नसहित ॥ घालोनि पूजावें त्वरित ॥ षोडशोपचारें करूनी ॥ ८० ॥ नानाप्रकारें आरती ॥ कराव्या गंगायमुनाप्रती ॥ मग पूजावा दर्भग्रंथी ॥ शेषरूपें करोनियां ॥ ८१ ॥ दोनी कलशांवरी देखा ॥ नूतन वस्त्रें ठेवूनि निका ॥ पद्म लिहूनि अष्टदलिका ॥ कलशांवरी ठेवावें ॥ ८२ ॥ तयां कलशांपुढें देखा ॥ पंचवर्ण चूर्णें देखा ॥ शंखपद्मादि अनेका ॥ रंगमाळिका घालाव्या ॥ ८३ ॥ शेष पूजावा दर्भाचा ॥ षोडशोपचारीं बरवा साचा ॥ ध्यानीं ध्यास विष्णूच्या ॥ शेषशायी ह्मणोनियां ॥ ८४ ॥ सप्तफणी शेषासी ॥ सदां विष्णु त्यापासीं ॥ याचिकारणें नाम तयासी ॥ अनंत ऐसें ध्यान करावें ॥ ८५ ॥ पिंगलाक्ष चतुर्भुजेसी ॥ शंखपद्म सव्यकरेंसी ॥ चक्र गदा वामहस्तेसी ॥ ऐसी मूर्ति तुवां ध्यावी ॥ ८६ ॥ ओं नमो भगवते मंत्रेंसीं ॥ षोडशोपचारें दर्भग्रंथीसी ॥ आणोनि नव्या दोरकासी ॥ ध्यान करावें मग तेथें ॥ ८७ ॥ अनंतगुणरत्नाय मंत्रेंसीं ॥ नवे दोरक ठेवावे कलशासी ॥

पूजा करावी पुरुषसूक्तेसी ॥ अतोदेवा मंत्रें साहित ॥ ८८ ॥ षोडशोपचारें पूजोन ॥
संसारीति मंत्रें दक्षिणकरीं बांधोन ॥ नमस्ते वासुदेव मंत्रें करून ॥ जीर्णदोरक विस-
र्जावे ॥ ८९ ॥ दाताचविष्णुर्भगवान् ह्मणत ॥ वायन द्यावें गोधूम घृत ॥ प्रस्थ गोधु-
माचें सघृत ॥ फळासह वायन द्यावें ॥ ९० ॥ अपूपादि पायसेसीं ॥ सदक्षिण तांबूलेसीं ॥
अर्धें द्यावें ब्राह्मणासीं ॥ अर्धें आपण भक्षावें ॥ ९१ ॥ ऐसें चौदा वर्षें देखा ॥ व्रत
आचरावें विशेखा ॥ उद्यापन करावें निका ॥ चतुर्दश कलश द्यावे ॥ ९२ ॥ ब्राह्मणभो-
जन करोन ॥ भक्तीनें करावें उद्यापन ॥ कामना होईल संपूर्ण ॥ चतुर्विध पुरुषार्थ ॥ ९३ ॥
ऐसें सांगती सुशीलेसी ॥ व्रत आचरावें त्वरितेसी ॥ आजचि असे चतुर्दशी ॥ व्रत
करी आह्मांसवें ॥ ९४ ॥ समस्त नारी मिळोनि तिसी ॥ तंतु देती अनंतासी ॥ ग्रंथि बांधो-
नि चतुर्दशी ॥ पूजा करविती आपणांसवें ॥ ९५ ॥ कोंडा होता गोधूमाचा ॥ आणोनि
देतसे अर्ध साचा ॥ वाण देऊन सुवाचा ॥ निरोप स्त्रियांचा घेतला ॥ ९६ ॥ समस्त स्त्रि-
यांसी वंदोनि बाळी ॥ आली आपुले रथाजवळी ॥ अनुष्ठान सारूनि ऋषी तयेवेळीं ॥
येता झाला झडकरी ॥ ९७ ॥ चला ह्मणोनि पुढें जाती ॥ दोघे बैसोनि गोरथी ॥ जातां
पुढें देखती ॥ अमरावती ऐसें नगर ॥ ९८ ॥ नगरलोक सामोरे येती ॥ चला स्वामी ऐसें
ह्मणती ॥ तुह्मी या नगरीचे अधिपति ॥ तपोनिधि महाराजा ॥ ९९ ॥ नाना समारंभें देखा ॥
नगरीं प्रवेशली दंपती ऐका ॥ ऐश्वर्यें भोगिलीं बहुसुखा ॥ श्रीमदनंतप्रसादें ॥ १०० ॥ ऐसें
कितीक दिवसांवरी ॥ होता कौंडिण्य सहनारी ॥ बैसला असतां संतोषें करीं ॥ देखता
झाला अनंता ॥ १ ॥ ऋषी पुसे स्त्रियेसी ॥ काय बांधिलें हस्तासी ॥ वशीकरण

केलें आह्मांसी ॥ रक्तदोरा बांधिला ॥ २ ॥ सुशीला बोले भ्रतारासी ॥ अनंतदोरा परि-
येसीं ॥ याचिया प्रसादें तुह्मांसी ॥ अष्टैश्वर्य प्राप्त झालें ॥ ३ ॥ म्यां जे दिवशीं व्रत केलें ॥
तेणेंकरोनि दैव तुह्मां आलें ॥ पहा दैवत प्रसन्न झालें ॥ ह्मणोनि बोले सुशीला ॥ ४ ॥ ऐसें
वचन ऐकोनी ॥ ऋषि कोपला बहु मनीं ॥ दोरक घेतला हिरोनी ॥ अग्नीमध्यें टाकिला
॥ ५ ॥ मग ह्मणे कैंचा अनंत ॥ आपण केलें असे तप बहुत ॥ तेणेंकरोनि ऐश्वर्य अनंत ॥
प्राप्त झालें आह्मांसी ॥ ६ ॥ वशीकरण केलें आह्मांसी ॥ दोरा बांधूनि अनंत ह्मणशी ॥
रागें भरोनि कौंडिण्यें तिसी ॥ हिरोनि अग्नींत टाकिला ॥ ७ ॥ हा हा सुशीला ह्मणोनी ॥
धांवत गेली अग्निस्थानीं ॥ क्षीरांत घातला काढोनी ॥ विझविती झाली दोरक ॥ ८ ॥
अनंत टाकिला अग्नीसी ॥ हानि झाली ऐश्वर्यासी ॥ दरिद्री झाला परियेसी ॥ द्विजवर
कौंडिण्य तत्क्षणीं ॥ ९ ॥ नगरीं झाले सर्व शत्रू ॥ गोधनादि आभरण वस्त्रू ॥ समस्त नेते
झाले तस्करू ॥ दरिद्र झालें तात्काळ ॥ १० ॥ गृह दग्ध झालें देखा ॥ अवकृपा होतां
रमानायका ॥ उरलें नाहीं वस्त्र एक ॥ सर्व गेलें तत्क्षणीं ॥ ११ ॥ मग विचारी मानसीं ॥
ह्मणे अनंत रुसला आह्मांसी ॥ वायां घातलें अग्नीसीं ॥ मदांधें वेष्टिलों ॥ १२ ॥ आतां
करीन नेम एक ॥ जंव भेटेल लक्ष्मीनायक ॥ श्रीमदनंत देखेन मुख ॥ तंव अन्नोदक न
घेईं ॥१३॥ ह्मणोनि निर्वाण करोनी ॥ निघता झाला घोरकाननीं ॥ भार्येसहित कौंडिण्य
मुनी ॥ निघता झाला परियेसा ॥ १४ ॥ हा हा अनंत अनंत ह्मणत ॥ शीघ्र जातसे अर-
ण्यांत ॥ तंव देखिला वृक्ष चूत ॥ पुष्पीं फळीं भरला असे ॥ १५ ॥ कीटकादि पक्षी
[illegible] ॥ कोणी त्यासीं नातळती ॥ कौंडिण्य पुसे तयाप्रती ॥ अनंतासी देखिलें कीं

॥ १६ ॥ वृक्ष ह्मणे ब्राह्मणासीं ॥ दृष्टि न पडेची आह्मांसीं ॥ तुवां जरी देखिला असशी ॥ तरी आह्मां सांगावें ॥ १७ ॥ ऐसें ऐकोनी पुढें जात ॥ धेनु देखिली वत्सासहित ॥ हिंडतसे तृणांत ॥ तोंडा नये भक्षावया ॥ १८ ॥ द्विज ह्मणे धेनूसी ॥ जरी तूं अनंत देखिलासी ॥ कृपा करोनि आह्मांसीं ॥ सांग ह्मणे द्विजवर ॥ १९ ॥ नाहीं देखिलें अनंतासीं ॥ तुह्मां भेटला जरी तयासी ॥ मजविषयीं सांगा त्यासी ॥ अवस्था ऐसी धेनु ह्मणे ॥ २० ॥ ऐसें ऐकोनि द्विजवर ॥ पुढें जातां देखिला वृषभ थोर ॥ तयातें पुसे मुनीश्वर ॥ तुवां अनंतातें देखिलें कीं ॥ २१ ॥ वृषभ ह्मणे तयासी ॥ नेणों आह्मीं अनंतासी ॥ जरी तुह्मीं देखिला त्यासी ॥ आह्मांविषयीं विनवावें ॥ २२ ॥ पुढें जातां देखे कौंडिण्य ॥ सरोवरें रम्य दोन ॥ उदक मिळालें अन्योन्य ॥ हंसादि पक्षी न सेविती ॥ २३ ॥ कमल कुमुदादि पुष्पेंसीं ॥ मिरवती सरोवरें ऐसीं ॥ द्विज पुसे तयांसी ॥ अनंतातें देखिलें कीं ॥ २४ ॥ सरोवरें म्हणती तयासी ॥ नेणों कैंचा अनंतासी ॥ भेटी होईल जरी तुह्मांसी ॥ आह्मांविषयीं सांगावें ॥ २५ ॥ पुढें जातां द्विजवर ॥ देखिले गर्दभ कुंजर ॥ पुसतसे तया विचार ॥ ते न बोलती तयासी ॥ २६ ॥ निर्वाण झाला तो ब्राह्मण ॥ त्यजूं पाहे आपुला प्राण ॥ अनंत अनंत ह्मणोन ॥ धरणीवरी पडियेला ॥ २७ ॥ इतुकिया अवसरी ॥ वृद्ध ब्राह्मण वेषधारी ॥ जवळी येवोनी हांक मारी ॥ उठीं उठीं ह्मणतसे ॥ २८ ॥ ऊठ विप्रा काय पुससी ॥ श्रीमदनंत कोठें असे विचारिसी ॥ दाखवीन चल आह्मासरसी ॥ म्हणोनि धरिलें उजवे करीं ॥ २९ ॥ उठवूनियां कौंडिण्यासी ॥ घेऊनि जाई गव्हरासी ॥ नगरी पाहे अपूर्व तैसी ॥ महदाश्चर्य पहातसे ॥ ॥ ३० ॥ घेऊनि गेला नगरांत ॥ सिंहासन रत्न-

खचित ॥ नेऊनि तेथें बैसवीत ॥ आपण दाखवी निजस्वरूप ॥ ३१ ॥ रूप देखोनि कौंडिण्य ॥ स्तोत्र करी अतिगहन ॥ चरणांवरी माथा ठेवून ॥ कर जोडूनी विनवी-लसें ॥ ३२ ॥ नमो नमस्ते गोविंदा ॥ श्रीवत्सला सच्चिदानंदा ॥ तुझे स्मरणमात्रें दुःख-मदा ॥ हरोनि जाती सर्व पापें ॥ ३३ ॥ तूं वरेण्य यज्ञपुरुष ॥ ब्रह्मा विष्णु महेश ॥ तुझे दर्शनमात्रें समस्त दोष ॥ हरोनि जाती तात्काळीं ॥ ३४ ॥ नमो नमस्ते वैकुंठवासी ॥ नारायण लक्ष्मी निवासी ॥ जगद्व्यापी प्रतिपाळिसी ॥ अनंतकोटी ब्रह्मांडें ॥ ३५ ॥ पापी आपण पापकर्मी ॥ नेणों तुझी भक्तिधर्मी ॥ पापात्मा पापसंभव अधर्मी ॥ क्षमा करी गोविंदराया ॥ ३६ ॥ तुजवांचोनि आपण ॥ अनाथ असे दीन ॥ याचिकारणें धरिले चरण ॥ शरणागत मी तुम्हांसी ॥ ३७ ॥ आजि माझें जन्म सफळ ॥ धन्य माझें जिणें सकळ ॥ तुझें देखिलें चरणकमळ ॥ भ्रमर होवोनि वास घेतों ॥ ३८ ॥ ऐसें स्तवितां कौंडिण्य ॥ प्रसन्न झाला लक्ष्मीरमण ॥ भक्तजनचिंतामणिरत्न ॥ वरत्रय देता झाला ॥ ३९ ॥ धर्मबुद्धि दारिद्र्यनाश ॥ शाश्वत वैकुंठनिवास ॥ वरत्रय देत हृषीकेश ॥ ऐक युधिष्ठिरा कृष्ण ह्मणे ॥ ४० ॥ पुनरपि द्विज विनवी देख ॥ म्यां देखिलें आश्चर्य एक ॥ अरण्यांत वृक्ष एक ॥ महाफलित आम्र देखिला ॥ ४१ ॥ त्या फळासी पक्षि जाती ॥ कोणी प्राणी नातळती ॥ पुढें येतां मागुती ॥ देखिली धेनु सवत्स ॥ ४२ ॥ तृण तेथें असे प्रबळ ॥ परी तिचे तोंडा न ये कवळ ॥ आणिक देखिलीं निर्मळ ॥ सरोवरें दोनी तेथें ॥४३॥ अन्योन्यें एकमेकां ॥ मिसळती तेथें दोनी उदका ॥ पुढें पाहिलें अपूर्व ऐका॥ वृषभ एक महाथोर॥ ४४ ॥ त्याचे मुखा नये ग्रास ॥ सर्वकाळीं उपवास ॥ पुढें देखिला

सुरस ॥ कुंजर एक मदोन्मत्त ॥ ४५ ॥ सर्वें देखिलें गर्दभासीं ॥ ऐका स्वामी मार्गेसीं ॥ हिंडतसे वनासी ॥ देखिला वृद्ध ब्राह्मण ॥ ४६ ॥ नकळे याचा अभिप्राय ॥ विस्तारोनि मज सांगा भाव ॥ जगन्नाथा केशवा ॥ ह्मणोनि चरणीं लागला ॥ ४७ ॥ कृपानिधि नारायण ॥ सांगतसे विस्तारोन ॥ ऐकतसे भक्त कौंडिण्य ॥ वृक्ष तुवां जो देखिला ॥४८॥ पूर्वीं होता द्विजवर ॥ तयासी येतां वेदशास्त्र ॥ उन्मत्तपणें गर्वं थोर ॥ शिष्यवर्गा न सांगेची ॥४९॥ तेणें पापें वृक्ष झाला ॥ तुवां देखिलें धेनुवत्साला ॥ पूर्वीं भूमि निष्फला ॥ दिली होती ब्राह्मणासीं ॥ ५० ॥ देखिला तुवां वृषभ एक ॥ पूर्वीं विप्र महाधनिक ॥ केलें नाहीं दानादिक ॥ तेणें पापें ऐशी गति ॥ ५१ ॥ सरोवरें तुवां दोनी ॥ ह्मणसी देखिलीं नयनीं ॥ पूर्वीं होत्या दोघी बहिणी ॥ घेतलें दान आपणांत ॥ ५२ ॥ खर ह्मणिजे तुझा क्रोध ॥ कुंजर तो जाण तव मद ॥ पश्चात्तापें झालें तुझें मन शुद्ध ॥ भेटलों ब्राह्मण आपणची ॥५३॥ जें जें तुवां देखिलें ॥ त्या त्या समस्तांस मुक्त केलें ॥ अखिल ऐश्वर्य भोगीं वहिलें ॥ अंतीं जाय स्वर्गासी ॥ ५४ ॥ तुवां करावा तेथें वास्तु ॥ नक्षत्रामाजी पुनर्वसू ॥ ऐसा वर देतां हर्षू ॥ जाहला तया कौंडिण्या ॥ ५५ ॥ ऐसा वर लाधोनी ॥ राज्य केलें बहु दिनीं ॥ अंतीं गेला स्वर्गभुवनीं ॥ ऐक राया युधिष्ठिरा ॥५६॥ ऐशी कथा धर्मासी ॥ सांगता झाला हृषीकेशी ॥ आचरिलें भक्तीसीं ॥ अनंतव्रत तयेवेळीं ॥ ५७ ॥ युधिष्ठिर दंपत्येंसीं ॥ व्रत आचरला भक्तीसीं ॥ श्रीमदनंतप्रसादें त्वरितेसीं ॥ पांडव राज्य पावले ॥५८॥ आणीक हेंचि भूमीवरी ॥ व्रत केलें ऋषीश्वरीं ॥ आचरावें नरनारी ॥ लाधे चारी पुरुषार्थ ॥ ५९ ॥ व्रतांमध्यें उत्तम व्रत ॥ प्रख्यात असे अनंत ॥ तुवां आचरावें सतत ॥

द्यावें तुझे ज्येष्ठ सुतासी ॥ ६० ॥ व्रत कौंडिण्य आचरला ॥ अखिल सौख्य लाधला ॥ आचरावें या व्रताला ॥ ॥ अनंतपुण्यफल असे ॥ ६१ ॥ अनंतव्रत महापुण्य ॥ आमुचे निरोपें करणें ॥ व्रत करा एकभावपणें ॥ एक भक्ती करोनियां ॥ ६२ ॥ आमुचें गोत्र कौंडिण्य ॥ करितां जोडे बहु पुण्य ॥ निरोपी आमुचें कारण ॥ व्रत तुह्मीं करावें ॥ ६३ ॥ ऐसें गुरुनिरोपेंसी ॥ व्रत केलें संतोषीं ॥ पूजा केली श्रीगुरुसी ॥ नानापरी अवधारा ॥ ६४ ॥ निरांजन बहुवसी ॥ गीत वाद्य नृत्येंसी ॥ पूजा करिती श्रीगुरुसी ॥ भक्तिभावें करोनियां ॥ ६५ ॥ समाराधना ब्राह्मणांसी ॥ भोजन करविलें श्रीगुरुसी ॥ आनंद झाला बहुवसी ॥ श्रीगुरुमूर्ती संतोषे ॥ ६६ ॥ येणेंपरी श्रीगुरुसी ॥ आराधोनि संतोषीं ॥ गेला आपुले ग्रामासी ॥ ऐक शिष्या एकचित्तें ॥ ६७ ॥ विप्र जो कां सायंदेव ॥ कलत्र पुत्रांतें पाठवोनी ठाव ॥ मागुती आला असे भावें ॥ श्रीगुरुचरणसेवेसीं ॥ ६८ ॥ राहोनियां गुरूपाशीं ॥ सेवा केली बहुवसी ॥ ऐसे तुझे पूर्वजासीं ॥ प्रसन्न झाले श्रीगुरू ॥ ६९ ॥ सिद्ध ह्मणे शिष्यासी ॥ येणेंपरी तुह्मासी ॥ निधान लाधलें परियेसी ॥ ॥ श्रीनृसिंहसरस्वती ॥ ७० ॥ ह्मणोनी सरस्वती गंगाधर ॥ सांगे गुरुचरित्र विस्तार ॥ ऐकतां होय मनोहर ॥ लाधे चारी पुरुषार्थ ॥ ७१ ॥ इतिश्रीगुरुचरित्रामृत ॥ अनंतव्रतकथा विख्यात ॥ नामधारक सांगत ॥ त्रिचत्वारिंशोऽध्याय हा ॥ ७२ ॥ इति... त्रिचत्वारिंशोऽध्यायः ॥ ओं० १७२ ॥

॥ श्रीगणेशाय नमः ॥ नामधारक ह्मणे सिद्धासी ॥ पुढें चरित्रें झालीं कैसीं ॥ विस्तारावें आह्मांसी ॥ कृपा करीं गा दातारा ॥ १ ॥ सिद्ध सांगे शिष्याप्रती ॥ समस्त भक्त सेवा करिती ॥ त्यांत एक विणकर जाती ॥ अत्यंत करितसे भक्ति ॥ २ ॥ तीन प्रहर संसारयात्रा ॥ करोनि येतसे पवित्रा ॥ राजांगणा झाडी विचित्रा ॥ नमस्कारी दुरोनी ॥ ३ ॥ ऐसे कित्येक दिवस क्रमिले ॥ शिवरात्रीचें व्रत आलें ॥ समस्त यात्रेसी निघाले ॥ मातापितादि तंतुकाचे ॥४॥ त्यासी बोलाविती यात्रेसी ॥ तो ह्मणतसे तयांसीं ॥ तुह्मीं मूर्ख असा पिसीं ॥ माझा श्रीपर्वत येथेंचि असे ॥ ५ ॥ श्रीगुरु माझा मल्लिकार्जुन ॥ पर्वत ह्मणजे श्रीगुरुभवन ॥ आपण न येचि येथून ॥ चरण सोडोनि श्रीगुरुचे ॥६॥ समस्त लोक त्यासी हांसती ॥ पिसें लागलीं यासी ह्मणती ॥ चला जाऊं ह्मणोनि निघती ॥ भ्राता माता पिता त्याचे ॥७॥ नगरलोक समस्त गेला ॥ आपण एकला राहिला ॥ श्रीगुरूचे मठासी आला ॥ दर्शनालागीं परियेसा ॥ ८ ॥ श्रीगुरु ह्मणती तयासी ॥ कां गा यात्रेसी न जासी ॥ तंतुक ह्मणे स्वामीसी ॥ माझी यात्रा तुमचे चरणीं ॥ ९ ॥ नाना तीर्थें यात्रा देखा ॥ तुमचे चरणीं असती ऐका ॥ वायां जाती मूर्ख लोक ॥ पाषाणदर्शन करावया ॥१०॥ ऐसें ह्मणोनि तंतुक ॥ नमस्कारी नित्य देख ॥ तंव पावली शिवरात्रि ऐक ॥ माघ वद्य चतुर्दशी ॥ ११ ॥ श्रीगुरु होते संगमासी ॥ दोन प्रहर होतां परियेसीं ॥ आपण गेला स्नानासी ॥ उपवास असे शिवरात्रीचा ॥ १२ ॥ संगमीं स्नान करोनी ॥ श्रीगुरूतें नमस्कारोनी ॥ उभा ठेला कर जोडोनी ॥ भक्तिपूर्वक एकभावें ॥ १३ ॥ श्रीगुरु ह्मणती तयासी ॥ तुझे समस्त गेले यात्रेसी ॥ तूं एकलाचि राहिलासी ॥ पहासी विनोद

गु. च.

श्रीपर्वताचा ॥ १४॥ पुसिलें कधीं आहे देखिलेंसी॥ ह्मणे स्वामी नेणें कैसी॥ तुमचे चरण आह्मांसी ॥ पर्वतयात्रा सदां असती ॥ १५ ॥ त्याचा भाव पाहोनी ॥ जवळ बोलाविती श्रीगुरुमुनि ॥ बैस ह्मणती कृपा करोनी ॥ तुज दाखवूं श्रीपर्वत ॥ १६ ॥ नयन झांकोनी पादुकेसी ॥ दृढ धरीं गा वेगेंसी ॥ ऐसें ह्मणोनि तयासी ॥ मनोवेगें घेवोनी गेले ॥ १७ ॥ क्षण न लागतां श्रीगिरीसी ॥ घेऊनि गेले भक्तासी ॥ तीरीं बैसले पाताळगंगेसी ॥ नयन उघडीं ह्मणती श्रीगुरू ॥ १८ ॥ क्षण एक त्यासी निद्रावस्था ॥ ह्मणतां झाला जागृता ॥ अवलोकितां दिसे पर्वता ॥ स्वप्न किंवा सत्य ह्मणे ॥ १९ ॥ श्रीगुरु निरोपिती तयासी ॥ कां गा भ्रांतपणें पहासी ॥ वेगीं जाई दर्शनासी ॥ स्नान क्षौर करोनियां ॥ २० ॥ श्रीगुरु निरोप देतां ॥ शीघ्र गेला स्नानाकरितां ॥ तेथें देखिले माता पिता॥ भ्राता ग्रामलोक सकळ ॥ २१ ॥ ते पूसती तयासी ॥ तूं कवणें मार्गें आलासी ॥ आमुची भेट कांगा न घेसी ॥ येकला येणें हा कोण धर्म ॥ २२ ॥ विनवीतसे मातापितयांसी ॥ आह्मी निघालों आजि दोन प्रहरेसी ॥ एक घटका लागली वाटेसी ॥ आतां आलों गुरुसमागमें ॥ २३ ॥ एक हांसती मिथ्या ह्मणत॥ आह्मांसवेंचि आला लपत॥ ऐसें बडिवारें बोलत॥ असंबद्ध हें ह्मणती सकळ ॥ २४ ॥ तो कोणासवें न बोले ॥ शीघ्र स्नान क्षौर केलें ॥ पुष्पें अक्षता बिल्वदळें ॥ घेऊनि गेला पूजेसी ॥२४॥ पूजा करितां लिंगस्थानीं ॥ तेथें देखिले श्रीगुरुमुनि ॥ मनीं विस्मय करोनी ॥ पूजा केली मनोभावें ॥ २६ ॥ समस्त लोक पूजा करिती ॥ श्रीगुरु सर्व पूजा घेती ॥ तंतुकार म्हणतसे चित्तीं ॥ गुरुमूर्ति आपणाचि शंकर ॥ २७ ॥ ऐसा निर्धार करोनी ॥ दवणा प्रसाद घेवोनी ॥ मग आला गुरुसन्निधानी ॥ एक-

गु. चि.

चित्तें परियेसा ॥ २८ ॥ श्रीगुरु पुसती तयासी ॥ एथवां राहसी कीं जासी ॥ तंतुकार विनवी स्वामियासी ॥ एक देखिलें नवल आजी ॥ २९ ॥ समस्त लोक जाऊनी ॥ देवालयाभीतरीं बैसोनी ॥ पूजा करितां तुमचे चरणीं ॥ लिंग न देखें तुह्मीच तेथें ॥ ३० ॥ श्रीगुरु जवळी असतां ॥ इतुके दूरी कां कष्टत ॥ लोक येताती बहुत ॥ काय कारण या स्थानासी ॥ ३१ ॥ तूं तरी केवळ परमेश्वर ॥ दिसतोसी आह्मां नर ॥ न कळे तुझा महिमा अपार ॥ गौप्यरूपी गुरुनाथा ॥ ३२ ॥ सर्वजन मूढ होऊनी ॥ नेणती तुझा महिमा कोणी ॥ कांहो येती या स्थानीं ॥ विस्तारोनी सांगा मज ॥ ३३ ॥ श्रीगुरु म्हणती ऐक भक्ता ॥ सर्वत्र ईश्वर पूर्णता ॥ स्थानमहिमा असे पूज्यता ॥ जे अपार त्रिभुवनीं ॥३४॥ तंतुक ह्मणे स्वामियासी ॥ तूं पूर्ण ब्रह्म होसी ॥ हा स्थानमहिमा वानिसी ॥ विस्तारोनी सांग आम्हां ॥ ३५ ॥ श्रीगुरु निरोपिती भक्तासी ॥ येथील महिमा पुससी ॥ सांगेन ऐक विस्तारेंसी ॥ स्कंद पुराणीं असे कथा ॥ ३६ ॥ माघ वद्य चतुर्दशी ॥ अपार महिमा पर्वतासी ॥ सांगेन ऐक विस्तारेंसी ॥ ह्मणोनि श्रीगुरु सांगतसे ॥ ३७ ॥ पूर्वीं विख्यात किरात देशीं ॥ विमर्षण राजा परियेसी ॥ शूर असे पराक्रमेंसी ॥ समस्त शत्रु जिंकिले तेणें ॥ ३८ ॥ आणीक त्या एक बुद्धी असे ॥ पारधी करी बहुवसें ॥ बलाढ्य असे विशेष ॥ चंचळ सकळ स्त्रियांरत ॥३९॥ सर्व मांस भक्षण करी ॥ भाह्य अभाह्य न विचारी ॥ ऐसा वर्ते दुराचारी ॥ ईश्वर पूजी भक्तिभावें ॥ ४० ॥ नित्य पूजा करी अपार ॥ शिवरात्र आलिया हर्षनिर्भर ॥ गीत नृत्य वाद्य परिकर ॥ भक्तिपूर्वक करी पूजा ॥ ४१ ॥ आचार तरी बरवा नसे ॥ शिवपूजा करी बहुवसे ॥ पत्नी एक त्यासी असे ॥ सुलक्षण नाम

कुमुद्वती ॥ ४२ ॥ सुशील सगुणी पतिव्रता ॥ मनीं करी बहु चिंता ॥ पुरुष आपुला परदाररता ॥ ईश्वरभक्ती करितसे ॥ ४३ ॥ ऐसें क्रमितां एके दिवशीं ॥ पुसों लागली भ्रतारासी ॥ म्हणे प्राणेश्वरा परियेसी ॥ विनंती माझी एक असे ॥ ४४ ॥ क्षमा करावे माझे बोल ॥ विस्तारोनी सांगा सकळ ॥ तूं दुराचारी भक्षिसी सकळ ॥ परदारी निरंतर ॥ ४५ ॥ तुझी या ईश्वरावरी ॥ भक्ती उपजली कवणेपरी ॥ सांगावें मज विस्तारीं ॥ कोप न धरीं प्राणनाथा ॥ ४६ ॥ राजा ह्मणे स्त्रियेसी ॥ बरवें पुसिलें तुवां आम्हासी ॥ ज्ञान झालें आतां मानसीं ॥ पूर्वजन्म माझें सांगेन ॥ ४७ ॥ पूर्वीं पंपानगरीं आपण ॥ श्वानयोनीं जन्मोन ॥ होतों तेथें काळ क्रमोन ॥ शिवरात्री आली एके दिवशीं ॥ ४८ ॥ त्या नगरीं होतें एक शिवालय ॥ समस्त लोक आले पूजावया ॥ आपण हिंडत गेलों तया ठाया ॥ भक्षण कांहीं मिळेल म्हणोनी ॥ ४९ ॥ उत्साहें लोक पूजा करिती ॥ नाना वाद्यें वाजविती ॥ गर्भगृहीं प्रदक्षिणा करिती ॥ धरोनि आरती सकळिक ॥ ५० ॥ आपण गेलों द्वारांत ॥ विनोदें पाहीन म्हणत ॥ मज देखोनि आले धांवत ॥ काष्ट पाषाण घेवोनी ॥ ५१ ॥ आपण पौळीमध्यें होतां ॥ द्वारपाळ पातले मारूं ह्मणतां ॥ धरा धरा मारा ह्मणतां ॥ मारूं लागले पाषाण ॥ ५२ ॥ वाट पाहीं बाहेर जावयासी ॥ पळतसें देवालयासीं ॥ साभिलाष असे जीवासी ॥ मार्ग नाहीं कोठें देखा ॥ ५३ ॥ बाहेर जाईन ह्मणत ॥ द्वाराकडे मागुती येत ॥ सर्व लोक पाठी लागत ॥ सव्य प्रदक्षिणा पळतसें॥५४॥ पळावयासी ठाव नाहीं ॥ पौळींत वेष्टिलों न दिसे कांहीं ॥ पाठी लागले सकळ तेही ॥ मागुती पळतसें तैसाचि ॥ ५५ ॥ उच्छिष्ट मिळेल म्हणोनी ॥ गेलों होतों तेथें भामिनी ॥

काकुळती बहु मनीं ॥ प्राण वांचवीन ह्मणतसें ॥५६॥ ऐसा तीन्ही वेळां पळालों ॥ मारतील म्हणोनि भ्यालों ॥ अंतर्गृहीं रिघालों ॥ पूजा देखिली शिवाची ॥ ५७ ॥ द्वार धरोनि समस्त लोक ॥ शस्त्रें मारिती मज अनेक ॥ ओढोनि टाकिती सकळिक ॥ शिवालया बाहेरी ॥ ५८ ॥ मज पुण्य घडलें प्रदक्षिणीं ॥ पूजा देखिली नयनीं ॥ तेणें पुण्यें राजा होऊनी ॥ जन्मलों ऐक प्राणेश्वरी ॥ ५९ ॥ शिवरात्री होती ते दिवशीं ॥ न मिळे उच्छिष्ट भक्षावयासी ॥ प्राण त्यजिला उपवासीं ॥ तेणें पुण्य मज घडलें ॥ ६० ॥ आणीक घडलें पुण्य एक ॥ दीप उजळितां अनेक ॥ ते म्यां डोळां देखिले ऐक ॥ प्राण त्यजिला शिवद्वारीं ॥ ६१ ॥ तेणें पुण्यें झालें ज्ञान ॥ ऐक शिवरात्रीचें महिमान ॥ ह्मणसी दुराचारी आपण ॥ त्याचा संदेह सांगेन ॥ ६२ ॥ पूर्व जन्म माझा श्वान ॥ त्याचा स्वभाव सर्व भक्षण ॥ सर्वांठायीं जाय मन ॥ तोचि स्वभाव मज असे ॥६३॥ ऐसें स्त्रियेसी सांगितलें॥ पुनः तिणें विचारिलें ॥ ह्मणे स्वामी जें सांगितलें ॥ आपुला जन्म पुरातन ॥ ६४ ॥ तूं असमी सर्व ज्ञानी ॥ माझा जन्म सांग विस्तारोनी ॥ ह्मणोनि लागतसे चरणीं ॥ कृपा करींगा प्राणेश्वरा ॥ ६५ ॥ ऐके वधू ज्ञानवंती ॥ तुझा पूर्वजन्म कपोती ॥ करीत होतीस उदरपूर्ती ॥ एके दिवशीं अवधारीं ॥ ६६ ॥ पडिला होता मांस गोळा ॥ तो तुवां चोंचीं धरियेला ॥ उडत होतीस आकाशमंडळा ॥ तो देखिला घारीनें ॥ ६७ ॥ कवळ घेईन ह्मणोनी ॥ घार आली धांवोनी ॥ तूं गेलीस पळोनी ॥ महा अरण्य क्रमित ऐका ॥ ६८ ॥ पाठीं लागली ते घारी ॥ मागें पुढें न विचारी ॥ तूं पळालीस वनांतरीं ॥ श्रीगिरिपर्वतीं गेलीस ॥ ६९ ॥ सवेंचि आली ते घारी ॥ तूं गेलीस देवालय शिखरीं ॥ भोंवीं लागलीस

प्रदक्षिणाकारी ॥ श्रम पावलीस तेवेळां ॥ ७० ॥ दुरोनि आलीस धांवत ॥ प्राण होतां कंठगत ॥ श्रमोनि तूं शिखरीं बैसत ॥ घारीनें येऊनि मारिलें चोंचीं ॥७१॥ घेऊनि गेली मांसगोळा ॥ तुझा देह पंचत्व पावला ॥ प्रदक्षिणा पुण्य फळा ॥ झालीस वो राजपत्नी ॥ ७२ ॥ इतुकिया अवसरीं ॥ पुनः पतीस प्रश्न करी ॥ आतां तुझे निरोपावरी ॥ ईश्वर-पूजा करीन ॥ ७३ ॥ पुढें माझें काय होईल ॥ तुह्मीं कवणें स्थानीं असाल ॥ तें भविष्य सांगा सकळ ॥ प्राणप्रिया राजेंद्रा ॥७४॥ राजा सांगे सतीसी ॥ पुढील जन्म मज पुससी॥ आपण राजा सिंधु देशीं ॥ जन्मा पावेन अवधारी ॥ ७५ ॥ माझी भार्या तूंचि होसी ॥ जन्म होईल सृंजय देशीं ॥ तेथील राजा पवित्र वंशीं ॥ त्याची कन्या होशील ॥ ७६ ॥ तिसरा जन्म आपणासी ॥ राजा होईन सौराष्ट्रदेशीं ॥ तूं उपजशील कलिंग राजवंशीं ॥ माझी पत्नी होशील ॥७७॥ चवथा जन्म आपणासी ॥ राजा होईन गांधारदेशीं ॥ तूं उप-जशील मगधकुळेसीं ॥ तैं माझी प्राणेश्वरी ॥ ७८ ॥ पांचवा जन्म आपणासी ॥ राजा होईन अवंतिदेशीं ॥ तूं दशार्ण राजकुळीं जन्मशी ॥ माझी भार्या तूं होसी ॥ ७९ ॥ सहा-वा जन्म आपणासी ॥ अनंतनाम राजा परियेसी ॥ ययाति राजकन्या होसी ॥ तैं माझी तूंचि प्राणेश्वरी ॥ ८० ॥ सातवा जन्म आपणासी ॥ राजा होईन पांड्य देशीं ॥ रूप लावण्य मजसरसीं ॥ न देखे कवण संसारीं ॥ ८१ ॥ ज्ञानी सर्व गुणी होईन ॥ सूर्य-कांती चंद्रवदन ॥ जैसा रूपें असे मदन ॥ नाम माझें पद्मवर्ण ॥ ८२ ॥ तूं जन्मशील वैद-र्भकुळीं ॥ रूपें सौंदर्य आगळी ॥ जैसी सुवर्णाची पुतळी ॥ अति लावण्य सुख सुरस ॥ ॥ ८३ ॥ सुमती असें नाम पावसी ॥ तुज वरीन मी स्वयंवरेसी ॥ दमयंती नळा जैसी ॥

स्वयंवर होईल तुज मज ॥ ८४ ॥ राज्य करीन बहुत दिवस ॥ यज्ञ करीन मासमास ॥ जिंकीन सर्व देशांस ॥ मंत्रशास्त्र शिकेन बहुत ॥ ८५ ॥ देव द्विज अर्चन करीन ॥ नाना अग्रहारें दान देईन ॥ ऐसें वार्धक्य पावोन ॥ राज्यीं स्थापीन पुत्रासी ॥ ८६ ॥ मग आपण आश्रम घेईन ॥ अगस्त्य ऋषीपाशीं जाईन ॥ ब्रह्मज्ञानोपदेश शिकोन ॥ अंतीं होईल मोक्षप्राप्ती ॥ ८७ ॥ देहावसान समय येतां ॥ तुज घेईन सांगातां ॥ दिव्य विमानीं बैसोनि तत्वतां ॥ स्वर्गाप्रती जाऊं बाळे ॥ ८८ ॥ ईश्वरपूजेचा महिमा ॥ शिवरात्री व्रत उत्तमा ॥ श्रीशैल्यपर्वताचा महिमा ॥ विशेष पुण्य कोण वर्णी ॥ ८९ ॥ यापरी सांगोनि स्त्रियेतें ॥ आतां पाहूं श्रीशैल्यपर्वतातें ॥ ह्मणोनि राजा घेऊनि स्त्रीतें ॥ यात्रा करी शिवरात्री ॥ ९० ॥ श्रीगुरु ह्मणती तंतुकासी ॥ शिवरात्री महिमा आहे ऐसी ॥ ऐसा तो राजा राणी परियेसीं ॥ सप्त जन्मीं राज्य पावलीं ॥ ९१ ॥ अंतीं पावला स्वर्गलोक ॥ पर्वत महिमा यापरी ऐक ॥ तुज झालें गुरुमुख ॥ ईश्वरी पूजा करी बरवी ॥ ९२ ॥ गाणगाग्रामीं भीमातीर ॥ तेथें असे कल्लेश्वर ॥ पूजा करी निरंतर ॥ मल्लिकार्जुनासमान ॥ ९३ ॥ मग जावें संगमेसीं ॥ पूजा करी अहर्निशीं ॥ मल्लिकार्जुन तोचि परियेसी ॥ न धरीं मानसीं संदेह ॥ ९४ ॥ तंतुक ह्मणे स्वामियासी ॥ किमर्थ मातें चाळविसी ॥ पूजायासी गेलों मल्लिकार्जुनासी ॥ लिंगस्थानीं तुह्मां देखिलें ॥ ९५ ॥ सर्वां ठायीं तूंचि एक ॥ झाला असती व्यापक ॥ कल्लेश्वर संगम नामक ॥ हें काय सांगसी मजपुढें ॥ ९६ ॥ ऐकोनि श्रीगुरु हांसती ॥ येरे पादुका धरीं ह्मणती ॥ नयन तयाचे झांकिती ॥ संगमा आले तात्काळीं ॥ ९७ ॥ इतुकिया अवसरीं ॥ मागें भक्त गाणगापुरीं ॥ श्रीगुरुसी पहाती गंगा-

तीरीं ॥ कोठें गेले ह्मणोनी ॥ ९८ ॥ एक ह्मणती संगमीं होते ॥ एक ह्मणती नाहींत तेथें ॥ कोठें गेले पहा ह्मणत ॥ चुकर होती भक्तजन ॥ ९९ ॥ श्रीगुरु आले संगमासी ॥ तंतुका पाठविलें मठासी ॥ बोलवावया शिष्यांसी ॥ आपण आले संगमीं ॥ १०० ॥ तंतुक आला गांवांत ॥ लोक समस्त पहात ॥ कांरे क्षौर केलें ह्मणत ॥ तंतुक ह्मणे श्रीपर्वतासीं गेलों होतों ॥ १ ॥ घेऊनि आलों प्रसाद विभूती ॥ नानापरींचे हार दाविती ॥ लोक विस्मय करिती ॥ ह्मणती दोनप्रहरीं घरीं होता ॥ २ ॥ एक ह्मणती सत्य मिथ्या ॥ त्यासी ह्मणती सांग सत्या ॥ तंतुक ह्मणे सर्वे गुरुनाथा ॥ गेलों होतों वायुवेगें ॥ ३ ॥ श्रीगुरु आले संगमासीं ॥ मज पाठविलें मठासीं ॥ बोलाविलें शिष्यांसीं ॥ राहूं ह्मणती आजि संगमीं ॥४॥ एक ह्मणती होईल सत्य॥ मूर्ख ह्मणती नव्हे मिथ्या ॥ तंतुक गेला त्वरित ॥ शिष्यवर्गा जाणविलें ॥ ५ ॥ सांगितला सर्व वृत्तांत ॥ समस्त गेले संगमा त्वरित॥ पूजा झाली संगमीं बहुत॥ सिद्ध ह्मणे नामधारका ॥ ६ ॥ मिथ्या ह्मणती जे जे लोक ॥ त्यांसीं होईल महापातक ॥ पंधरा दिवशीं यात्रिक॥ लोक आले ग्रामासीं ॥ ७ ॥ मग पुसती तयासीं ॥ त्यांणीं सांगितलें भरंवसीं ॥ आनंद झाला भक्तांसी ॥ ह्मणे सरस्वती गंगाधर ॥ ८ ॥ सिद्ध ह्मणे नामधारकासी ॥ जें मी सांगतसें परियेसीं ॥ श्रीगुरुमहिमा अपारेसीं ॥ अमृत सेवितां निरंतर ॥ ९ ॥ यापरी सरस्वती गंगाधर॥ सांगे श्रीगुरुचरित्र विस्तार ॥ भावें ऐके जो नर॥ अमृत निरंतर सेवितसे ॥ १० ॥ इति श्रीगुरुचरित्रामृत ॥ कथा वर्णिली अद्भुत ॥ सिद्ध नामधारका सांगत ॥ श्रीशैल्य गमनमहिमाऽध्याय हा ॥ १११ ॥ इति ... चतुश्चत्वारिंशोऽध्यायः ॥ ओंव्या १११॥

॥ श्रीगणेशाय नमः ॥ नामधारक ह्मणे सिद्ध मुनी ॥ श्रीगुरुचरित्र तुह्मीं देखिलें नयनीं ॥ तुमचें भाग्य काय वर्णूं वाणी ॥ परब्रह्म देखिलें असे ॥ १ ॥ तुमचेनि प्रसादेंसी ॥ अमृतपान झालें आम्हांसी ॥ आतां कष्ट आम्हां कासयासी ॥ सकलाभीष्ट लाधलों ॥ २ ॥ तूं भेटलासी मज तारक ॥ दैन्य गेलें सकळिक ॥ सर्वाभिष्ट लाधलें सुख ॥ गुरुचरित्र ऐकतां ॥ ३ ॥ मागें कथानक सांगितलें ॥ श्रीगुरु संगमीं राहिले ॥ पुढें काय वर्तलें ॥ तें सांगावें दातारा ॥ ४ ॥ सिद्ध ह्मणे नामधारकासी ॥ ऐक वत्सा विस्तारेंसीं ॥ विचित्र झालें थोरें दिवशीं ॥ एकचित्तें परियेसी ॥ ५ ॥ नंदीनामा एक ब्राह्मण ॥ सर्वांगीं श्वेतकुष्ट जाण ॥ अंबा तुळजापुरा जाऊन ॥ वर्षें तीन आराधिलीं ॥ ६ ॥ संवत्सर तीन उपवास ॥ द्विज कष्टला बहुवस ॥ निरोप झाला स्वप्नीं त्यास ॥ जाय चंदला परमेश्वरीसी ॥ ७ ॥ जगदंबेचा निरोप घेऊनी ॥ आला चंदला परमेश्वरी स्थानीं ॥ मास सात पुरश्चरणीं ॥ पुनरपि केले उपवास ॥ ८ ॥ नानापरी कष्टत ॥ स्वप्न झालें अवचित ॥ तुवां जावें त्वरित ॥ गाणगापुर ग्रामासी ॥ ९ ॥ तेथें असे श्रीजगद्गुरू ॥ त्रयमूर्तीचा अवतारू ॥ वेष धरिला असे नरू ॥ तेथें होसी उत्तमांगी ॥ १० ॥ ऐसें देवीनें निरोपिलें ॥ विप्र ह्मणे भलें केलें ॥ सहा मास कां कष्टविलें ॥ जरी तुझे हातीं नोहेची ॥ ११ ॥ जगन्माता तुळजाभवानी ॥ तिचा निरोप घेऊनी ॥ आलों तुजपासी टाकोनी ॥ तूं दैवत म्हणोनियां ॥ १२ ॥ देवत्व ठाउकें झालें ॥ आह्मांसी निरोप दिधले ॥ मनुष्यापाशीं जा ह्मणितलें ॥ तुझेनि नोहे कांहींच ॥ १३ ॥ विश्वासें पातलों तुजपासीं ॥ तूं मनुष्यासन्निध धाडिशी ॥ सीमा झाली देवपणासी ॥ भाग्य माझें ह्मणतसे ॥ १४ ॥ मनुष्यापाशीं जा ह्मणावयासी ॥ लाज नये तुम्हां कैसी ॥ बळखिलें म्यां देवपणासी ॥ उपवासी सात महिने ॥ १५ ॥

पहिलेंच जरी निरोप देत ॥ इतकें कष्ट कासया होत ॥ दुराशा धरिली चित्तें ॥ परमेश्वरी म्हणोनी ॥ १६ ॥ ऐसें अनेक प्रकारें कष्टोन ॥ दुःख करितसे ब्राह्मण ॥ मागुतीं पुरश्चरण ॥ करीन ह्मणे तो द्विज ॥ १७ ॥ ह्मणे मज बरवें होणें ॥ अथवा आपुला प्राण देणें ॥ ऐसें बोलोनि निर्वाणें ॥ विप्र धरणें बैसला ॥१८॥ पुनरपि स्वप्न तयासी ॥ तैसेंचि होय परियेसी ॥ आणीक समस्त भोपियांसी ॥ तेणेंचिपरी निरोप होय ॥१९॥ समस्त भोपी ह्मणती तयासी ॥ आजि स्वप्न झालें आह्मांसी ॥ छळ न करी गा देवीसी ॥ निरोपासरिसा जाय वेगें ॥२०॥ तूं जरी आतां न जासी ॥ आह्मां आज्ञा झाली ऐशी ॥ बाहेर घालूं तुजसी ॥ देवालयांत येऊं न देऊं ॥२१॥ इतुकें झालियावरी ॥ पारणें केलें द्विजवरी ॥ पूजा करोनी नानापरी ॥ निरोप घेऊनी निघाला ॥२२॥ गाणगग्रामासीं आला ॥ मठांत पुसूं लागला ॥ भक्तजन सांगती त्याला ॥ संगमीं आहेती श्रीगुरु ॥ २३ ॥ भक्त ह्मणती तयासी ॥ श्रीगुरु येतील पारणेसी ॥ काल शिवरात्री उपवासी ॥ आतां येतील परियेसा ॥ २४ ॥ इतुकिया अवसरीं ॥ श्रीगुरु आले साक्षात्कारीं ॥ ग्रामलोक द्विजातें वारी ॥ दूर राहे संमुख ॥ २५ ॥ श्रीगुरु आले मठांत ॥ द्विज उभा होता तेथ ॥ भक्तजन सांगती मात ॥ विप्र एक आला असे ॥ २६ ॥ सर्वांगीं कुष्ट असे श्वेत ॥ स्वामीदर्शना आलों म्हणत ॥ श्रीगुरु म्हणती आपण जाणत ॥ संदेहरूपें आला असे ॥ २७ ॥ म्हणती बोलवा मठांत ॥ भक्त गेला धांवत ॥ तया द्विजा पाचारित ॥ आला विप्र आंगणीं ॥ २८ ॥ दुरोनी देखिलें श्रीगुरूसी ॥ नमस्कारीत लोळे भूमीसी ॥ श्रीगुरु म्हणती तयासी ॥ संदेहरूपें आलासि कां ॥२९॥ देवीपासीं कां न गेलासी ॥ मनुष्यापासीं येणें कायसी ॥ संदेह धरितां मानसीं ॥

काय होय कार्यसिद्धी ॥ ३० ॥ ऐसें वचन ऐकोनी ॥ साक्ष आली आपुले मनीं ॥
क्षमा करणें स्वामी म्हणोनी ॥ लोटांगणीं येतसे ॥ ३१ ॥ म्हणे स्वामी आपण तमांध ॥
स्वामीचे दर्शनें झालों शुद्ध ॥ अज्ञानें वेष्टिलों मतिमंद ॥ नेणें सोय परब्रह्मीं ॥ ३२ ॥ तूं
साक्षात् वस्तु म्हणोनी ॥ नेणों आपण तमोगुणीं ॥ आजि दिवस माझा सुदिनी ॥ दर्शनें
झालों पुनीत ॥ ३३ ॥ पापकर्मै पापी आपण ॥ पापात्मा मी नेणें खूण ॥ पापें संभवलों
निर्गुण ॥ शरण आलों तुजपासीं ॥३४॥ तूं भक्तजनांचा आधार ॥ शरणागता वज्रपंजर॥
ब्रीद वानिती सचराचर ॥ हे नृसिंह सरस्वती ॥ ३५ ॥ आजि माझें कर्म गेलें ॥ परब्रह्म
डोळां देखिलें ॥ मनोरथ माझे पुरले ॥ कृपासागरा यतिराया ॥ ३६ ॥ तूं भक्तजनां काम-
धेनू ॥ मनुष्यदेहीं अवतरोन ॥ तुझा पार जाणें कवणू ॥ त्रैमूर्ती तूंचि होसी ॥ ३७ ॥
जैसी सगराकारणें गंगा ॥ पावन करावया आली जगा ॥ तैसे भक्तसेवकवर्गा ॥ तारा-
वया अवतरलासी ॥ ३८ ॥ कां अहिल्या झाली पाषाण ॥ दिव्य देही झाली लागतां
चरण ॥ तैसा मी आजि देखोनि दीन ॥ केलें तुवां गुरुनाथा ॥ ३९ ॥ व्रतबंध विवाह
झालियावरी ॥ उद्भवली व्याधी आपुले शरीरीं ॥ स्त्री राहिली माहेरीं ॥ स्पर्शूं नये शरीर
ह्मणे ॥ ४० ॥ आपुले असती मातापिता ॥ सकळ ह्मणती जाई परता ॥ दुःख झालें
अपरिमिता ॥ संसार त्यजूनि निघालों ॥ ४१ ॥ गेलों होतों तुळजापुरीं ॥ उपवासी
कष्टलों अपारीं ॥ मज ह्मणे ती तूं पापी भारी ॥ न होय बरवें तुज आतां ॥ ४२ ॥ निरोपी
तुळजादेवी प्रीती ॥ जेथें चंदला परमेश्वरी वसती ॥ तेथें होय पापनिवृत्ती ॥ जाईल
रोग ह्मणोनियां ॥ ४३ ॥ तेथें कष्ट केले बहुत ॥ न होयचि कांहीं उबगत ॥ निरोप झाला

जा ह्मणत ॥ कृपामूर्ती तुजपाशीं ॥४४॥ ऐसें माझें दैवहीन ॥ उबगताती देव आपण ॥ मज
देखोनि निर्वाण ॥ बाहेर घाला म्हणताती ॥ ४५ ॥ देव मातें उबगताती ॥ मनुष्य कैसे
मज देखती ॥ निर्वाणी आलों तुह्मांप्रती ॥ निर्धार केला मरणासी ॥ ४६ ॥ ऐसा पापी
असोनि आपण ॥ आतां काय करावें अंगहीन ॥ तोंड न पहाती कुष्टी ह्मणोन ॥ मरण
बरवें यापरतें ॥४७॥ आतां असे एक विनंती ॥ होय अथवा नहो निश्चिती ॥ शीघ्र निरो-
पावें निभ्रांती ॥ आशापाशीं न गोंविजे ॥ ४८ ॥ मज चाड नाहीं या देहाची ॥ प्राण
देईन साक्ष तुमची ॥ तूं रक्षक माऊली शरणागताची ॥ निरोपावें दातारा ॥ ४९ ॥ जैसें
दैवीं चाळविलें ॥ आशाबंधांत गोंविलें ॥ निदानीं मज सोडिलें ॥ तैसें न करीं दातारा
॥ ५० ॥ ऐसें करुणावचन ऐकोन ॥ गुरु बोलती हांसोन ॥ बोलाविला सोमनाथ ब्राह्मण ॥
निरोप देती यातें न्या संगमासीं ॥ ५१ ॥ त्वरेनें संकल्प सांगोनी ॥ स्नान करावें पुष्कर-
जीवनीं ॥ अश्वत्थ प्रदक्षिणा करवोनी ॥ वस्त्रें टाका दूर त्याचीं ॥ ५२ ॥ नवीं वस्त्रें द्यावीं
यासी ॥ शीघ्र आणा पारणेसी ॥ ऐसा निरोप देती त्यासी ॥ दोघे गेले झडकरी ॥ ५३ ॥
स्नान करोनि बाहेर आला ॥ शरीरवर्ण पालटला ॥ अश्वत्थप्रदक्षिणा केल्या ॥ सुवर्ण
झालें सर्वांग ॥ ५४ ॥ वस्त्रें देई ब्राह्मणासीं ॥ जीर्णवस्त्र टाकी दूरदेशीं ॥ जेथें टाकिलीं
भूमीसी ॥ क्षारभूमी ती होय त्वरित ॥ ५५ ॥ सांगातें घेऊनि द्विजासी ॥ सोमनाथ
आला मठासी ॥ चरणावरी घातलें तयासी ॥ लोक सर्व विस्मित ॥ ५६ ॥ नंदीनामें केला
नमस्कार ॥ संतोषें स्तोत्र करी अपार ॥ हर्षें झाला असे निर्भर ॥ लोळतसे पादुकांवरी
॥ ५७ ॥ श्रीगुरु पुसती तयासी ॥ तुझी मनकामना झाली परियेसीं ॥ सर्वांग आहे कैसें

त्यासी ॥ अवलोकूनी पाहे ह्मणती ॥ ५८ ॥ सर्वांग पहातां बरवें झालें ॥ तावन्मात्र जंघे-
सी राहिलें ॥ पाहतां मन त्याचें भ्यालें ॥ ह्मणे स्वामी असे कीं थोडें ॥ ५९ ॥ तुझी कृ-
पादृष्टी झाली असतां ॥ थोडें राहिलें केवीं अर्था ॥ करीतसे दंडवता ॥ कृपा करीगा
महात्मया ॥ ६० ॥ गुरुमूर्ती निरोपिती त्यासी ॥ तूं संशय धरोनि आलासी ॥ मनुष्य काय
देईल ह्मणसी ॥ तेणें गुणें राहिलें शेष ॥ ६१ ॥ यासी असे एक प्रकार ॥ तुवां कवित्व
करावें अपार ॥ आमुची स्तुती करी निरंतर ॥ जाईल त्वरित निश्चयें ॥ ६२ ॥ नंदीनामा
ह्मणे स्वामियासी ॥ लिखित नेणें वाचावयासी ॥ कैसें करूं कवित्वासी ॥ मंदमती आ-
पण ॥ ६३ ॥ काय जाणे कवित्व रीती ॥ नाहीं मज काव्यव्युत्पत्ती ॥ स्वामी ऐसा नि-
रोप देती ॥ ह्मणोनि चरणीं लागला ॥ ६४ ॥ श्रीगुरु ह्मणती त्या द्विजासी ॥ मुख उघडी
काढीं जिव्हेसी ॥ विभुती प्रोक्षितां तयासी ॥ ज्ञान उपजलें ब्राह्मणातें ॥ ६५ ॥ चरणावरी
ठेविला माथा ॥ उभा ठेला स्तोत्र करितां ॥ ह्मणे स्वामी मी नेणता ॥ सेवेसी नव्हे आरा-
णूक ॥ ६६ ॥ मायापाशीं वेष्टोनी ॥ बुडत होतों संसारगहनीं ॥ स्वामी आठवण करीं कधीं
मनीं ॥ तुझे चरण विसरलों ॥ ६७ ॥ संसार ह्मणजे मायाजाळ ॥ योनि जन्मोनि चौ-
ऱ्यायशीं कुळ ॥ आठवलें नाहीं तुझें नाम केवळ ॥ मंदमती झाली स्वामिया ॥ ६८ ॥ स्वे-
दज अंडज उद्भिजेंसीं ॥ जन्म पावलों पशुयोनीसीं ॥ ज्ञान कैचें आह्मांसी ॥ स्थावर-
जंगम जें होतों ॥ ६९ ॥ नाना योनींत मनुष्य विशेष ॥ शूद्रादि याती बहुवस ॥ जरी
होतों त्या जन्मास ॥ काय जाणे तुझी सोय ॥ ७० ॥ समस्त जन्मांमध्यें एक ॥ ब्राह्मणा-
चा जन्म विशेख ॥ काय करावें होऊनि मूर्ख ॥ गुरुसोय नेणता नर ॥ ७१ ॥ मातेचें

शोणित पित्याचें रेत ॥ संपर्क झाला जननीगर्भांत ॥ जैसें सुवर्ण असे कढत ॥ दिवस पांच बुदबुदाकार ॥ ७२ ॥ पंधरा दिवस होय थोर ॥ एकरस होऊनि निर्धार ॥ तधीं मी काय जाणें पामर ॥ पंचतत्त्वें झालीं मग ॥ ७३ ॥ मासें एक पिंड होय ॥ द्वय मासीं शिर पाद द्वय ॥ त्रय मासीं सर्व अवयव ॥ नव द्वारें झालीं मग ॥ ७४ ॥ पंचतत्वें होतीं एक ॥ पृथ्वी वायु तेज आकाश उदक ॥ प्राण आला तात्कालिक ॥ ॥ तधीं स्मरण कैचें मज ॥ ७५ ॥ पांचवे मासीं त्वचा रोम ॥ सहावे मासीं उश्वास स्तोम ॥ सातवे मासीं श्रोत्र जिव्हा घ्राण ॥ मेद मज्जा दृढ झाली ॥ ७६ ॥ ऐसा नव मास कष्टत ॥ होतों जननीगर्भांत ॥ रुधिर विष्टा मूत्रांत ॥ कष्टलों फार स्वामिया ॥ ७७ ॥ माता भक्षी उष्ण क्षार ॥ कटु तीक्ष्ण असे अपार ॥ तेणें कष्टतसे फार ॥ दुःख कोणा सांगूं तेव्हां ॥ ७८ ॥ मनास आलें तें भक्षण करी ॥ दुःख होय मज अपारी ॥ ऐसें नव मासा-वरी ॥ मातागर्भीं कष्टलों ॥ ७९ ॥ तधीं कैचें तुझें स्मरण ॥ वेष्टिलों होतों मायेंकरून ॥ देखिले नाहीं तुझे चरण ॥ मग योनिद्वारें जन्मलों ॥ ८० ॥ उपजलांचि आपणासी ॥ आयुष्य लिहिलें ललाटेसी ॥ अर्ध गेलें वृथा निद्रेसीं ॥ रात्रीं निद्रा मानवा ॥ ८१ ॥ उरल्या आयुष्यांत देखा ॥ तीन भाग केले ऐका ॥ बाल यौवन वार्धक्य निका ॥ निर्माण केलें तये वेळीं ॥ ८२ ॥ बाळपणीं आपणासी ॥ कष्ट झाले बहुवसीं ॥ मज घालिती पाळण्यासी ॥ मलमूत्रांत लोळतसें ॥ ८३ ॥ बाळपणींचें दुःख आठवितां ॥ हृदयस्फोट होय आतां ॥ काय सांगूं गुरुनाथा ॥ नाना आपदा भोगिल्या ॥ ८४ ॥ शयनस्थळीं मल-मूत्र ॥ तेथें लोळतसें निरंतर ॥ आपली विष्टा आपणासी आहार ॥ अज्ञानतिमिरें वेष्टिलों

॥ ८५ ॥ एखादे समयीं आपणासी ॥ पोट दुखे बहुवसीं ॥ रुदन करितां परियेसीं ॥ स्तनपान करविती ॥८६॥ क्षुधाक्रांत होय बहुत ॥ मग ह्मणती पोट याचें दुखत ॥ अंगुली घालोनियां मुखांत ॥ औषध मज पाजिती ॥ ८७ ॥ ऐसें क्षुधेनें पीडित बहुत ॥ मज घालिती पाळण्यांत ॥ हालविती पर्यंदें गात ॥ क्षुधाक्रांत रुदन करीं ॥ ८८ ॥ ह्मणती रुदन करितें बाळ ॥ मुखीं शिंपिती कांजी तेल ॥ रक्षा बांधिती मंत्रवोनी केवळ ॥ नेणें माता भूक माझी ॥ ८९ ॥ पाळण्या घालिती कौतुक ॥ प्रावरणांत होता वृश्चिक ॥ मारीतसे पाठीसीं डंख ॥ प्रलाप मी करीतसें ॥ ९० ॥ आणीक पाळण्या घालिती ॥ राहें राहें उगा ह्मणती ॥ स्तनपान मज करविती ॥ वृश्चिकाविष नेणतां ॥ ९१ ॥ तेणें दुःखें स्तनपान न करीं ॥ मागुती घालिती पाळण्याभीतरीं ॥ वृश्चिक मज डंख मारी ॥ प्राणांतिक मज होय ॥ ९२ ॥ माता खाय आम्लतीक्ष्णखार ॥ स्तनपान करविती मज अपार ॥ क्षीर आंबट आणि मधुर ॥ आपण खोकें सर्वकाळीं ॥९३॥ नाना औषधें मज देती ॥ तेणें माझे डोळे दुखती ॥ कुंकूं लवण क्षार घालिती ॥ डोळे आले ह्मणोनी ॥९४॥ ऐसे कष्ट धुरंधर ॥ बाळपणीं साहिले अपार ॥ वाढलों कष्ट करितां फार ॥ वर्षें बारा लोटलीं ॥ ९५ ॥ तधीं कैंचें तुझें चरणस्मरण ॥ मजला कैंची आठवण ॥ कष्टलों मी यान्विगुणें ॥ पूर्वजन्म नाठवेची ॥ ९६ ॥ दोन भाग उरले आयुष्यासी ॥ मदनें व्यापिलें शरीरासी ॥ जैसा पतंग दीपासीं ॥ भ्रमित तैसा उन्मत्त ॥ ९७ ॥ नेणे गुरु मातापिता ॥ समस्तांतें निंदा करितां ॥ अभिलाषितसें वनिता ॥ कुळाकुळ न विचारीं ॥ ९८ ॥ ब्राह्मणनिंदा परोपरी ॥ वृद्ध देखोनि विनोद करीं ॥ जारकर्म करी भारी ॥ मदनें नाठवे तुझे चरण ॥ ९९ ॥

मांसाचे कवळाकारणें ॥ मत्स्य जाय जेवीं प्राणें ॥ तैसा आपण मदनबाणें ॥ वश झालों इंद्रियांस ॥ १०० ॥ नानावर्ण स्त्रियांतें अंगिकारिलें ॥ परद्रव्य अपहारिलें ॥ सिद्ध महंतां निंदिलें ॥ दृष्टीं न दिसे माझे कांहीं ॥ १ ॥ ऐसा मदनें व्यापूनी ॥ पुढें मागें न पाहें नयनीं ॥ पतंग जाय धांवोनी ॥ दीपावरी पडे जैसा ॥ २ ॥ ऐसा वेष्टोनी मदनबाणीं ॥ नायकें सुबुद्धि श्रवणीं ॥ सोय न धरीं तुझे चरणीं ॥ यौवनपण ऐसें गेलें ॥ ३ ॥ वृद्धपण आलें शरीरासी ॥ उबग होय स्त्रीपुत्रासी ॥ श्वासोच्छ्वास कफेसीं ॥ सदां खोकला होय मज ॥४॥ अवयव सर्व कांपती ॥ कृष्ण केश पांडरे होती ॥ दंतहीन भक्ष्य न चावती ॥ श्रवणीं नायकें दृष्टी नाहीं ॥ ५ ॥ ऐसा नानापरी कष्टतां ॥ तुमची सेवा न घडे आतां ॥ स्वामी तारका गुरुनाथा ॥ संसारसागराचे कडे लावीं ॥६॥ ऐसा मंदमती आपण ॥ न ओळखें-चि तुझे चरण ॥ तूंचि केवळ नारायण ॥ अवतार श्रीगुरुमूर्ती ॥ ७ ॥ तूंचि विश्वाचा तारक ॥ धरोनियां नरवेश देख ॥ त्रयमूर्ती तूंचि एक ॥ परब्रह्म गुरुनाथा ॥ ८ ॥ दिवांध नेणती तुज लोक ॥ तूंचि विश्वाचा पालक ॥ मी किंकर तुझा सेवक ॥ संसारसागरीं तारीं मज ॥ ९ ॥ ऐसें नानापरी स्तोत्र ॥ करीतसे नंदीनामा पवित्र ॥ जन पाहती विचित्र ॥ त्यांसी ह्मणे नंदीनामा ॥ १० ॥ ऐका हो जन समस्त ॥ श्रीगुरु परब्रह्म वस्त ॥ आपण पाप केलें बहुत ॥ दर्शनमात्रें सर्व गेलें ॥ ११ ॥ बणगी लागतां तृणासी ॥ जळोनि जाय परियेसी ॥ गुरुकृपा होय जयासी ॥ पाप जळे तेणेंपरी ॥ १२ ॥ चरणं पवित्रं विततं पुराणं ॥ ऐसें बोले वेद आपण ॥ सेवा करणें हो गुरुचरण ॥ गुरुवेगळा देव नाहीं ॥ १३ ॥ ब्रह्मदेवें आपण देखा ॥ दुष्टाक्षरें कपाळीं लिहिलीं ऐका ॥ ती सुष्टाक्षरावळी होय निका ॥

श्रीगुरुचरणीं लागतां ॥ १४ ॥ जवळी असतां निधान ॥ कां न ओळखा तुह्मी जन ॥ नृसिंहसरस्वती कामधेनू जाण ॥ भजा भजा हो ह्मणतसे ॥ १५ ॥ इहसौख्यदाता अनेक ॥ अंतीं पावे वैकुंठलोक ॥ संदेह नाहीं होईल सुख ॥ सत्य सत्य बोल माझे ॥१६॥ नंदीनामा स्तोत्र करित ॥ श्रीगुरु संतोषती अत्यंत ॥ भक्तांतें ऐसा निरोप देत ॥ कवीश्वर ह्मणावें यासीं ॥१७॥ कवीश्वर नाम तयासी ॥ निर्धार केला भरंवसीं ॥ ऐसें कृपेनें बोलती त्यासी॥ ऐकोनि चरणीं लागला ॥ १८ ॥ शेष होतें जंघेवरी ॥ तें तत्काळ गेलें दुरी ॥ नंदीनामा आनंद करी ॥ राहिला सेवा करीत देखा ॥ १९ ॥ सिद्ध म्हणे नामधारकासी ॥ गुरुचरित्र ऐसें परियेसीं ॥ ऐसा राहिला गुरुसेवेसी ॥ कवीश्वर स्वभावें ॥ २० ॥ नामधारक म्हणे सिद्धमुनी ॥ दुसरा कवी नृसिंह म्हणोनी ॥ केवीं झाला श्रीगुरुभवनीं ॥ कवीश्वर सांग मज ॥२१॥ तें विस्तारोनि आम्हांसी ॥ सांगा स्वामी कृपेसीं ॥ वांछा असे मानसीं ॥ गुरुचरित्र ऐकावया ॥२२॥ म्हणे सरस्वती गंगाधर ॥ पुढील कथेचा विस्तार ॥ ऐकतां होय मनोहर ॥ नामस्मरण कामधेनू ॥२३॥ इति श्रीगुरुचरित्रामृत ॥ सिद्धमुनी शिष्य संवादत ॥ कवीश्वराख्यान येथ ॥ निरोपिलें प्रेमळ ॥२४॥ इति श्रीगुरुचरित्रामृते नृसिंहसरस्वत्युपाख्याने सिद्धनामधारकसंवादे द्विजकुष्टपरिहारोनाम पंचचत्वारिंशोऽध्यायः ॥ ओंव्या १२४ ॥

॥ श्रीगणेशाय नमः ॥ नामधारक विनवी सिद्धासी ॥ मागें कथा निरोपिलीसी ॥ नंदीनामा
कवी ऐसी ॥ दुसरा कवि आला म्हणोनी ॥१॥ कवणेपरी झाला शिष्य ॥ तें सांगावें जी आ-
म्हांस ॥ विस्तारावें अतिसुरस ॥ कृपा करोनी दातारा ॥२॥ सिद्ध ह्मणे नामधारका ॥ सांगे-
न विचित्र ऐका ॥ आश्चर्य झालें असे देखा ॥ श्रीगुरुचरित्र अलौकिक ॥३॥ गाणगापुरीं
असतां गुरू ॥ ख्याती झाली अपरंपारू ॥ लोक येती थोरथोरू ॥ भक्तजन बहु झाले॥४॥
नंदीनामा कवि होता ॥ कवित्व केलें अपरमिता ॥ समस्त लोक शिकतां ॥ प्रकाश झाला
चहूं राष्ट्रीं॥५॥ ऐसें असतां एके दिवशीं देखा ॥ श्रीगुरु नेलें भक्तें एका ॥ आपुले घरीं शो-
भनदायका ॥ म्हणोनि नेले आपुले ग्रामीं ॥६॥ हिपरगे नाम ग्रामासी ॥ नेले आमुचे श्रीगु-
रूसी ॥ पूजा केली बहुवसी ॥ समारंभ थोर केला ॥ ७ ॥ तया ग्रामीं शिवालय एक ॥ नाम
कल्लेश्वर ऐक ॥ प्रख्यात असतां तेथें एक ॥ द्विज सेवा करीतसे ॥८॥ तया नाम नरकेसरी ॥
लिंगसेवा बहु करी ॥ नित्य पांच कवित्वें करी ॥ आणीक नवीं निरंतर ॥९॥ कल्लेश्वरावां-
चूनी ॥ आणीक देव मनांत नाणी ॥ एकाग्रनिष्ठा धरूनी ॥ शिवसेवा करीतसे ॥१०॥ समस्त
लोक तयासी ह्मणती ॥ तुझे कवित्वाची असे ख्याती ॥ श्रीगुरूची कवित्वावरी प्रीति ॥ गु-
रुस्मरण करीं ऐका ॥११॥ तयांसी ह्मणे तो नर ॥ कल्लेश्वरासी विकलें जिव्हार ॥ अन्यत्र देव
अपार ॥ नरस्तुति न करी ह्मणे ॥१२॥ ऐसें बोलोनियां आपण ॥ गेला देवपूजेकारण ॥ पूजा
करितां तत्क्षण ॥ निद्रा आली तया द्विजा ॥१३॥ नित्यपूजा करोनि आपण ॥ कवित्व करी
पार्वतीरमण ॥ ते दिवसीं अपरिमाण ॥ निद्रा आली तया द्विजा ॥ १४ ॥ निद्रा केली देवाल-
यांत ॥ विचित्र देखिलें स्वप्नांत ॥ लिंगावरी श्रीगुरु बैसत ॥ आपण पूजा करीतसे ॥१५॥ लिंग

न दिसे श्रीगुरूच्चि असे ॥ आपण तयासि पुसती हर्षें ॥ नरावरी तुझी भक्ती न असे ॥ कांगा आम्रुतें पूजितोसी ॥१६॥ षोडशोपचारें आपण ॥ पूजा करी स्थीरमनें ॥ ऐसें देखोनियां स्वप्न ॥ जागृत झाला तो द्विज ॥१७॥ विस्मय करी आपुले मनीं ॥ ह्मणे नृसिंह सरस्वती मुनी ॥ आला असे अवतरोनी ॥ आपण निंदा त्याची केली ॥१८॥ हाच्चि होय श्रीजगद्गुरू ॥ त्रयमूर्तींचा अवतारू ॥ भेट घ्यावी हा निर्धारू ॥ धरूनि आला गुरूपासीं ॥१९॥ आला विप्र लोटांगणेंसीं ॥ विनवूं लागला गुरुचरणापाशीं ॥ कृपा करीं गा अज्ञानासी ॥ नेणों तुझें स्वरूप आपण ॥२०॥ प्रपंचमायेनें वेष्टोन ॥ न ओळखूं आपण अज्ञान ॥ तूंच्चि साक्षात् शिवनिर्गुण ॥ निर्धार झाला आजि मज ॥२१॥ कल्लेश्वर कर्पूरगौरू ॥ तूंच्चि होसी श्रीजगद्गुरू ॥ माझें मन झालें स्थिरू ॥ तुझे चरणीं नटलों ॥२२॥ तूंच्चि विश्वाचा आधार ॥ शरणागताचा व्रजपंजर ॥ चरणकमळीं मी भ्रमर ॥ होवोनि ठेलों स्वामिया ॥२३॥ जवळी असतां निधानू ॥ कां हिंडावें रानोरानू ॥ घरा आलिया कामधेनू ॥ दैन्य काय आम्हांसी ॥ २४ ॥ पूर्वीं समस्त ऋषी देखा ॥ तप करिती नसे लेखा ॥ तूं न पावसी तयासंमुखा ॥ अनेक कष्ट करितांही ॥२५॥ न करितां तप अनुष्ठान ॥ आह्मां भेटलासी निधान ॥ झाली आमुची कामना पूर्ण ॥ कल्लेश्वर प्रसन्न झाला ॥ २६ ॥ तूंच्चि सत्य कल्लेश्वरू ॥ ऐसा माझे मनीं निर्धारू ॥ कृपा करी गा जगद्गुरू ॥ ह्मणोनि चरणीं लागला ॥२७॥ श्रीगुरु ह्मणती तयासी ॥ नित्य आमुची निंदा करिसी ॥ आजि कैशी तुझे मानसीं ॥ भक्ति उपजोनि आलासी ॥२८॥ विप्र ह्मणें स्वामियासी ॥ अज्ञानांधकारीं आह्मासी ॥ कैसा भेटलासी परियेसीं ॥ ज्योतिर्मय आनंदमूर्ति ॥२९॥ म्यां कल्लेश्वराची पूजा केली ॥ तेणें पुण्यें तुह्मां भेटी झाली ॥ आजि आपुली पूजा

केली ॥ लिंगस्थानीं तुह्मां देखिलें ॥३०॥ स्वप्नामध्यें लिंगस्थानीं आपण ॥ प्रत्यक्ष देखिले तुझे चरण ॥ स्थिर झालें अंतःकरण ॥ मिळवावें शिष्यवर्गांत ॥३१॥ ऐसें विनवी द्विजवर ॥ स्तोत्र करीतसे अपार ॥ स्वामीची पूजा षोडशोपचार ॥ कैसें कवित्व केलें देखा ॥३२॥ मानसपूजेचें विधान ॥ पूजा व्यक्त केली जाण ॥ श्रीगुरू ह्मणती तत्क्षण ॥ आइका स्वप्न लोकांसी ॥३३॥ प्रत्यक्ष आह्मीं असतां देखा ॥ स्वप्न अवस्थे कवित्व ऐका ॥ त्याणें केलें वरकड निका ॥ स्वप्नीं भेटलों ह्मणोनि ॥ ३४ ॥ ऐसें सांगोनि समस्तांसी ॥ वस्त्रें देवविती त्या कवीसी ॥ लागला श्रीगुरुचरणासी ॥ ह्मणें आपण शिष्य होईन ॥३५॥ श्रीगुरु ह्मणती तयासी ॥ कल्लेश्वर श्रेष्ठ आह्मासी ॥ पूजा करींगा नित्य त्यासी ॥ आह्मीं तेथें सदा वसों ॥ ३६ ॥ विप्र ह्मणें स्वामीसी ॥ प्रत्यक्ष सांडोनि तुह्मांसी ॥ काय पूजूं कल्लेश्वरासी ॥ तेथें तुह्मांसी म्यां देखिलें ॥३७॥ तूंचि स्वामी कल्लेश्वर ॥ त्रयमूर्तीचा अवतार ॥ हाचि माझा सत्य निर्धार ॥ न सोडी आतां तुझे चरण ॥३८॥ ऐसें विनवी स्वामियासी ॥ आला सवें गाणगापुरासी ॥ कवित्व केलें बहुवर्सी ॥ सेवा करीत राहिला ॥ ३९ ॥ सिद्ध ह्मणे नामधारकासी ॥ कवीश्वर दोघे शिष्य गुरूपासीं ॥ आले येणें रीतीसीं ॥ भक्ति करीत राहिले ॥४०॥ ह्मणे सरस्वती गंगाधरू ॥ ज्यासि प्रसन्न होय गुरू ॥ तयाचे घरीं कल्पतरू ॥ चिंतिलें फळ देतसे ॥ ४१ ॥ कथा कवीश्वराची ऐसी ॥ सिद्ध सांगे नामधारकासी ॥ पुढील कथा विस्तारेंसीं ॥ एकचित्तें परियेसा ॥ ४२ ॥ इति श्रीगुरूचरित्रामृत ॥ सिद्धमुनि संवाद होत ॥ भक्त ज्ञानी परिसोत ॥ नरहरिकवि उद्धारण ॥ ४३ ॥ इति श्रीगुरुचरित्रामृते नृसिंहसरस्वत्युपाख्याने सिद्धनामधारकसंवादे कल्लेश्वरमहिमानाम षट्चत्वारिंशोऽध्यायः ॥ ओंव्या ४३ ॥

॥ श्रीगणेशाय नमः ॥ नामधारक ह्मणे सिद्धासी ॥ पुढें कथा वर्तली कैसी ॥ ते विस्तारोनी आह्मांसी ॥ कृपा करोनी सांगावी ॥ १ ॥ नामधारका श्रीमंता ॥ ऐकेन ह्मणसी श्रीगुरुचरित्रा ॥ तुज होतील पुत्रपौत्रा ॥ सदा श्रीयायुक्त होसील ॥ २ ॥ सांगेन कथा एक विचित्र ॥ जेणें होती पतित पवित्र ॥ ऐसें श्रीगुरुचरित्र ॥ तत्परेसीं परियेसा ॥ ३ ॥ गाणगापुरीं असतां गुरू ॥ सण दिपवाळी आला थोरू ॥ शिष्य आले पाचारूं ॥ आपुले घरीं यावें भिक्षेसी ॥ ४ ॥ सप्त शिष्य बोलाविती ॥ एकाहूनि एक अधिक प्रीति ॥ सातही जण पायां पडती ॥ यावें आपुल्या घरासी ॥ ५ ॥ एकेक ग्राम एकेक देशीं ॥ श्रीगुरु ह्मणती शिष्यांसी ॥ समस्तां घरीं यावें कैसी ॥ तुह्मी मनीं विचार करा ॥ ६ ॥ तुह्मीं वांटावें आपणांतें ॥ कोठें आधीं यावें निरूपा तें ॥ तेथें जाऊं निश्चितें ॥ शिष्याधीन आह्मी असों ॥ ७ ॥ आपणांत आपण पुसती ॥ समस्त आधीं नेऊं ह्मणती ॥ एकमेकां झगडती ॥ आपुला स्वामी ह्मणोनियां ॥ ८ ॥ श्रीगुरु वारिती तयांसी ॥ तुह्मीं भांडतां कासयासी ॥ आह्मीं गुरु सातांसी ॥ एका घरीं येऊं आह्मी ॥ ९ ॥ ऐसें वचन ऐकोनी ॥ समस्त विनविती कर जोडोनी ॥ स्वामी प्रपंच न करावा मनीं ॥ समर्थ दुर्बळ ह्मणूं नये ॥ १० ॥ समस्तांसी पहावें समान ॥ न विचारावें न्यून पूर्ण ॥ उपेक्षिसी दुर्बल ह्मणोन ॥ गंगाप्रवेश करूं आह्मी ॥ ११ ॥ विदुराचिया घरासी ॥ श्रीकृष्ण जाय भक्तीसी ॥ कौरवराजमंदिरासी ॥ न जाय भक्तवत्सल ॥ १२ ॥ आह्मीं समस्त तुझे दास ॥ कोणासी न करावें उदास ॥ जो निरोप द्याल आह्मांस ॥ तेंचि करूं आपण ह्मणती ॥ १३ ॥ ऐसें ह्मणोनियां समस्त ॥ करिती साष्टांग दंडवत ॥ समस्त आह्मां पहाहो ह्मणत ॥ ऐसें विनविती श्रीगु-

रूसी ॥ १४ ॥ श्रीगुरु ह्मणती समस्तांसी ॥ येऊं तुमचे घरासी ॥ चिंता न धराहो मानसीं ॥ भाक आमुची द्या ह्मणती ॥ १५ ॥ ऐसें ऐकोनि गुरुवचन ॥ विनविताती सातही जण ॥ समस्तांसी म्हणतां येईन ॥ कोणी धरावा भरंवसा ॥ १६ ॥ श्रीगुरु मनीं विचारिती ॥ अज्ञानलोक हे नेणती ॥ आतां सांगूं एकांतीं ॥ एकएकातें बोलावून ॥ १७ ॥ जवळीं बोलावोनि एकासी ॥ कानीं सांगती तयासी ॥ आम्ही येतों तुझे ग्रामासी ॥ कोणाजवळीं न सांगावें ॥ १८ ॥ ऐसी भाक त्यासी देती ॥ रात्रीं येऊं तव गृहाप्रती ॥ त्या भक्तातें पाठवोनि दुसऱ्यातें ह्मणती ॥ येऊं तुझे ग्रामासी ॥ १९ ॥ ऐसें सांगोनि तयासी ॥ पाठविलें ग्रामासी ॥ बोलाविती तिसऱ्यासी ॥ येणेंचि रीतीं सांगितलें ॥ २० ॥ ऐसे सातही जणां देखा ॥ समजावोनि गुरूनें ऐका ॥ त्यांचा भाव असे निका ॥ महदाश्चर्य वर्तलें ॥ २१ ॥ एकमेकां न सांगत ॥ श्रीगुरु आले मठांत ॥ गेले सातही भक्त ॥ अतिविनोद प्रवर्तला ॥ २२ ॥ ग्रामांतील भक्तजन ॥ ऐसें कौतुक ऐकोन ॥ विनविताती कर जोडोन ॥ आह्मां सांडोनी जातां स्वामी ॥ २३ ॥ तयांसी ह्मणती श्रीगुरुनाथ ॥ राहूं आह्मी नाहीं जात ॥ न करा चिंता मनांत ॥ आह्मीं एथेंचि असों देखा ॥ २४ ॥ ऐशा संधी श्रीगुरूंसी ॥ होऊं आली जवळी निशी ॥ दिपवाळीची त्रयोदिशी ॥ रात्रीं मंगलस्नान करावें ॥ २५ ॥ आठरूप झाला आपण ॥ अपार महिमा नारायण ॥ सातांच्याही ग्रामासी गेले जाण ॥ गाणगापुरींही होतेची ॥ २६ ॥ ऐसी दिपवाळी झाली ॥ समस्तांठायीं पूजा घेतली ॥ पुनः एकचि मूर्ति ठेली ॥ गौप्यरूपें कोणी नेणें ॥ २७ ॥ कार्तिकमासीं पौर्णिमेसीं ॥ करावया दीपाराधनेसी ॥ समस्त आले परियेसीं ॥ गाणगापुरीं गुरूजवळी ॥ २८ ॥ समस्तही नम-

स्कार करिती ॥ भेटतां दहावे दिवशीं ह्मणती ॥ एकमेकांतें झगडती ॥ ह्मणती आपुले घरीं गुरु होते ॥ २९ ॥ एक सत्य मिथ्या ह्मणत ॥ समस्त शिष्य खुणा दाखवित ॥ आपण दिल्हें तें हें वस्त्र ॥ श्रीगुरूजवळी असे ॥ ३० ॥ समस्तही राहिले तटस्थ ॥ ग्रामस्थ लोक असत्य ह्मणत ॥ आह्मांजवळी गुरु होते सत्य ॥ दिपवाळी येथेंची केली ॥ ३१ ॥ विस्मय करिती सकळही जन ॥ ह्मणती त्रैमूर्ति हाची आपण ॥ अपार महिमा नारायण ॥ अवतार असे श्रीगुरूचा ॥ ३२ ॥ ऐशा मिळोनि भक्तपंक्ति ॥ नानापरी स्तोत्रें करिती ॥ न कळे महिमा तुमचा ह्मणती ॥ वेदमूर्ति गुरुनाथा ॥ ३३ ॥ तूंचि विश्वव्यापक होसी ॥ महिमा न कळे आह्मांसी ॥ काय वर्णूं चरणासी ॥ त्रैमूर्ति तूंचि एक ॥ ३४ ॥ नानापरी स्तुति करिती ॥ दीपाराधना अतिप्रीतीं ॥ ब्राह्मणभोजन अतिभक्तीं ॥ करिते झाले भक्तजन ॥ ३५ ॥ श्रीगुरुमहिमा झाला जगतीं ॥ सिद्ध सांगे नामधारकाप्रती ॥ भूमंडळीं झाली ख्याती ॥ श्रीनृसिंहसरस्वतींची ॥ ३६ ॥ ह्मणे सरस्वतीगंगाधरू ॥ जवळी असतां कल्पतरू ॥ न ओळखती अंध बधिरू ॥ वायां कष्टत दैवयोगें ॥ ३७ ॥ भजा भजाहो श्रीगुरूसी ॥ जें जें काम्य तुमचे मानसीं ॥ सिद्ध होईल त्वरितेंसीं ॥ आह्मा प्रचीती आली असे ॥ ३८ ॥ अमृत मिळतां पानासी ॥ क्षार कडु आवडे मूर्खासी ॥ ज्ञानवंत भक्तजनांसी ॥ नामामृत गुरूचें ॥ ३९ ॥ श्रीगुरुसेवा कराहो करा ॥ मारीतसें मी डांगोरा ॥ सांगताती सचराचरा ॥ गुरु तोचि त्रैमूर्ती ॥ ४० ॥ गुरुवेगळीं गती नाहीं ॥ जे निंदिती नरदेहीं ॥ वेदशास्त्रें बोलती पाहीं ॥ सूकरयोनींत जन्मती ॥ ४१ ॥ तुह्मीं ह्मणाल मज ऐसें ॥ आपुले इच्छें लिहिलें कैसें ॥ वेदशास्त्रीं सांगितलें ऐसें ॥ असेल तरी अंगिकारा ॥ ४२ ॥

संसारसागरधुरंधर ॥ उतरावया पैलपार ॥ गुरुविणें निर्धार ॥ तारक कोण त्रिजगीं ॥ ४३ ॥ निर्जल संसार अरण्यांत ॥ पवई घातली असे अमृत ॥ सेवा सेवा तुह्मीं समस्त ॥ अमरत्व तुह्मां होईल ॥ ४४ ॥ श्रीगुरु नृसिंहसरस्वती ॥ अवतार असे त्रिमूर्ती ॥ गाणगग्रामीं असे ख्याती ॥ आतां असे प्रत्यक्ष ॥४५॥ जे जाती तया स्थाना ॥ तात्काळ होती मनकामना ॥ कांहीं न कराहो अनुमाना ॥ प्रत्यक्ष देव तेथें असे ॥ ४६ ॥ आह्मी सांगतों तुह्मां हित ॥ प्रशस्त झालिया तुमचें चित्त ॥ गाणगापुरीं जावें त्वरित ॥ ह्मणे सरस्वती गंगाधर ॥ ४७ ॥ इति श्रीगुरुचरित्रामृत ॥ सिद्धमुनि संवादत ॥ अष्टरूपें श्रीगुरु धरित ॥ सप्तचत्वारिंशोऽध्याय हा ॥ ओंव्या ४८ ॥

॥ श्रीगणेशाय नमः ॥ सिद्ध ह्मणे नामधारकासी ॥ अपूर्व झालें परियेसीं ॥ गुरुचरित्र वि-
स्तारेंसीं ॥ सांगतां संतोष होतसे ॥ १ ॥ गाणगापुरीं असतां गुरु ॥ ख्याति झाली अपरं-
पारू ॥ भक्त होता एक शूद्र ॥ तयाची कथा ऐकपां ॥ २ ॥ श्रीगुरु नित्य संगमासी ॥
जात असतां अनुष्ठानासी ॥ मार्गीं तो शूद्र परियेसीं ॥ आपुले शेतीं उभा असे ॥ ३ ॥
श्रीगुरूतें नित्य देखोनी ॥ धांवत येवोनि शेतांतुनी ॥ आपण साष्टांगीं नमोनी ॥ पुनरपि
जाय आपुले स्थाना ॥ ४ ॥ गुरु माध्यान्हकाळीं मठासी येतां ॥ पुनरपि चरणीं ठेवी
माथा ॥ ऐसें कितीएक दिवस होतां ॥ शूद्राची भक्ति वाढली ॥ ५ ॥ श्रीगुरु तयासी न
बोलती ॥ नमन केलिया उगेचि बैसती ॥ येणेंविधि बहुकाळ क्रमिती ॥ आला शूद्र नम-
स्कारा ॥ ६ ॥ नमन करितां शूद्रासी ॥ श्रीगुरु पुसती संतोषी ॥ कां गा नित्य तूं कष्ट-
तोसी ॥ नमन करिसी येउनियां ॥ ७ ॥ तुझे मनीं काय वासना ॥ सांग त्वरित आह्मां
जाणा ॥ शूद्र ह्मणे आवड मना ॥ शेत अधिक पिकावें ॥ ८ ॥ तयासी पुसती गुरुनाथ ॥
काय पेरिलें शेतांत ॥ शूद्र ह्मणे यावनाल बहुत ॥ पीक आलें तुझे धर्मीं ॥ ९ ॥ नमस्का-
रितां तुम्हां नित्य ॥ पीक आलें असे अत्यंत ॥ पोटरीस आलें असे त्वरीत ॥ आतां
तुझेनि धर्में जेवूं ॥ १० ॥ स्वामी यावें शेतापासीं ॥ पहावें अमृतदृष्टीसीं ॥ तूं सनस्तां प्रति-
पाळिसी ॥ शूद्र ह्मणोनि न उपेक्षावें ॥ ११ ॥ श्रीगुरु गेले शेतापासीं ॥ पाहुनी ह्मणती
त्या शूद्रासी ॥ सांगेन तें जरी ऐकसी ॥ विश्वास होईल बोलाचा ॥ १२ ॥ जें सांगेन मी
तुजसीं ॥ जरी भक्तीनें अंगिकारिसी ॥ तरीच सांगूं परियेसी ॥ एकभावें तुवां करावें
॥ १३ ॥ शूद्र विनवी स्वामियासी ॥ गुरुवाक्य कारण आह्मांसी ॥ दुसरा भाव आह्मा-

गु. च.

पाशीं ॥ नाहीं स्वामी ह्मणे तो ॥ १४ ॥ मग निरोपिती श्रीगुरु तयासी ॥ आह्मी जातों संगमासी ॥ परतोनि येऊं माध्यान्हीसी ॥ तंव कापावें सर्व पीक ॥ १५ ॥ ऐसें सांगोनि शूद्रासी ॥ श्रीगुरु गेले संगमासी ॥ शूद्र विचारी मानसीं ॥ गुरुवाक्य आपणा कारण ॥ १६ ॥ शीघ्र आला ग्रामांत ॥ अधिकारियासी विनवीत ॥ खंडोनि द्यावें मला शेत ॥ गतसंवत्सराप्रमाणें धान्य देईन ॥ १७ ॥ अधिकारी ह्मणती तयासी ॥ पीक झालें असे बहुवसी ॥ याकारणें उक्ते मागसी ॥ अंगिकार न करिती ॥ १८ ॥ नानाप्रकारें विनवी त्यांसी ॥ द्विगुण देईन गतसंवत्सरेसी ॥ अंगिकारिलें संतोषी ॥ वचनपत्र लिहून घेती ॥ १९ ॥ आपण अभयपत्र घेऊनी ॥ लोक मिळवोनि तत्क्षणीं ॥ गेला शेतांत संतोषोनी ॥ ह्मणे कापा तयांसी ॥ २० ॥ कापूं लागतां शेतासी ॥ स्त्रीपुत्र वर्जिती तयासी ॥ पाषाण घेऊनि स्त्रियेसी ॥ मारूं आला तो शूद्र ॥ २१ ॥ पुत्रातें मारी येणेंपरी ॥ पळत आले गांवाभीतरीं ॥ आड पडती राजद्वारीं ॥ पिसें लागलें पतीसी ॥ २२ ॥ पीक असे बहुवसीं ॥ इतक्यांत कापितो मूर्ख राशी ॥ वर्जितां पहा आह्मांसी ॥ पाषाण धांवूनी मारिले ॥ २३ ॥ संन्याशी महात्म्याचे बोलें ॥ पीक सर्वही कापिलें ॥ आमुचें जीविचें भाणें गेलें ॥ आणीक भक्षितों एक मासा ॥ २४ ॥ अधिकारी ह्मणती तयांसी ॥ कापिना कां आपुल्या शेतासी ॥ पत्र असे आह्मांपासी ॥ गतसंवत्सरा द्विगुण धान्य द्यावें ॥ २५ ॥ वर्जावया माणसें पाठविती ॥ शूद्र न ऐके कवणे गतीं ॥ शूद्र म्हणे अधिकारी कां भीती ॥ पेंवींचे कण आतां देईन ॥ २६ ॥ दूत सांगती अधिकारियासी ॥ आम्हीं सांगितलें शूद्रासी ॥ सांगोनि पाठविलें तुम्हासी ॥ विनोद असे परियेसा ॥ २७ ॥ जरी

भितील अधिकारी ॥ तरी देईन आतांचि घरीं ॥ गुरें बांधीन तयांचे द्वारीं ॥ पत्र आपण दिलें असे ॥ २८ ॥ दूत सांगती ऐशा रीतीं ॥ पुढें वर्तली काय स्थिति ॥ राजा अधिकारी तयांप्रती ॥ काय उत्तर बोलतसे ॥ २९ ॥ अधिकारी म्हणती तयांसी ॥ आम्हां चिंता कायसी ॥ पेवें दाडकें आहेत आम्हांसी ॥ धान्य आहे अपार ॥ ३० ॥ इतुकें होतां शूद्रें देखा ॥ पीक कापिलें मनःपूर्वका ॥ उभा असे मार्गीं ऐका ॥ श्रीगुरु आले परतोनी ॥ ३१ ॥ नमन करोनि गुरूसी ॥ शेत दाखविलें कापिलें ऐसी ॥ श्रीगुरु म्हणती तयासी ॥ वायां कापिलें म्हणोनी ॥३२॥ विनोदें तुज सांगितलें ॥ तुवां निर्धारें कापिलें ॥ शूद्र ह्मणे तुमचें वाक्य भलें ॥ तेंचि मज कामधेनू ॥ ३३ ॥ ऐसें ऐकोनि श्रीगुरु म्हणती ॥ निर्धार असे तुझे चित्तीं ॥ होईल अत्यंत फलप्राप्ती ॥ चिंता न करीं मानसीं ॥ ३४ ॥ ऐसें सांगोनि गुरुनाथ ॥ आले आपण ग्रामांत ॥ सवें शूद्र असे येत ॥ आपुले घराप्रती गेला ॥ ३५ ॥ पुसावया येती समस्त ॥ तयाचे घरीं होतो आकांत ॥ स्त्री पुत्र सर्व रुदन करीत ॥ ह्मणती आपुला ग्रास गेला ॥ ३६ ॥ शूद्र समस्तांतें संबोखी ॥ न करा चिंता रहा सुखी ॥ गुरु सोय नेणती मूर्खीं ॥ कामधेनु वाक्य तयाचें ॥ ३७ ॥ एकेकाचे सहस्र गुण ॥ अधिक लाभ तुह्मां जाण ॥ स्थिर करा अंतःकरण ॥ हानि नव्हे निर्धार पैं ॥ ३८ ॥ गुरुकृपा होय ज्यासी ॥ दैन्य कैचें होय त्यासी ॥ निधान जोडलें आम्हांसीं ॥ म्हणोनि शूद्र सांगतसे ॥ ३९ ॥ नर ह्मणूं नये श्रीगुरूसी ॥ शिवस्वरूप जाणा भरंवसीं ॥ असे कारण पुढें आम्हांसी ॥ ह्मणोनी निरोपिलें असे मज ॥४०॥ नानापरी स्त्रीपुत्रांसी ॥ संबोधितसे शूद्र अतिहर्षीं ॥ इष्टजन बंधुवर्गासी ॥ येणेंचि रीतीं

सांगतसे ॥ ४१ ॥ समस्त राहिले निवांत ॥ ऐसे आठ दिवस क्रमित ॥ वायु झाला अति-शीत ॥ समस्त पिकें नासलीं ॥ ४२ ॥ समस्त ग्रामींचीं पिकें देखा ॥ शेतें नासलीं सकळिका ॥ पर्जन्य पडला अकाळिका ॥ मूळ नक्षत्रीं परियेसा ॥ ४३ ॥ ग्राम राहिला पिकावीण ॥ शूद्रशेत वाढलें शतगुण ॥ वाढला यावनाल सगुण ॥ एकेका अठरा फडगरेसी ॥४४॥ तें शूद्रस्त्री संतोषोनी ॥ शेता आली पूजा घेऊनी ॥ अवलोकितसे आपुले नयनीं ॥ महानंद करीतसे ॥ ४५ ॥ पीक झालें अत्यंत ॥ देखोनियां समस्त ॥ येऊनि जन समस्त तेथ ॥ महदाश्चर्य करिती देखा ॥ ४६ ॥ येऊनि लागे पतिचरणीं ॥ विनवीतसे कर जोडोनी ॥ बोले मधुर करुणावचनीं ॥ क्षमा करी ह्मणतसे ॥ ४७ ॥ अज्ञानमदें अति वेष्टिलें ॥ नेणतां तुह्मांतें निंदिलें ॥ गुरु कैंचा काय ह्मणितलें ॥ क्षमा करणें प्राणनाथा ॥ ४८ ॥ ऐसें पतीसी संबोधोनी ॥ शेताचा देव पूजोनी ॥ विचार केला दोघांनीं ॥ गुरुदर्शनालागीं जावें ॥ ४९ ॥ ह्मणोनि सांगे स्त्रियेसी ॥ पूजा आली श्रीगुरुसी ॥ स्वामी पुसती तयांसी ॥ काय वर्तमान ह्मणोनी ॥ ५० ॥ चरणीं लागलीं तेव्हां दोन्ही ॥ हस्तद्वय जोडोनी ॥ स्वामीदर्शनें उल्हासोनी ॥ उभीं ठाकलीं संमुख ॥ ५१ ॥ दोघेंजणें स्तोत्र करिती ॥ जयजयाजी श्रीगुरुमूर्ती ॥ कामधेनु कुळदैवत ह्मणती ॥ तूंचि आमुचा गुरुराया ॥ ५२ ॥ तुझें अमृतवचन आह्मां ॥ चिंतामणी प्रकार महिमा ॥ पूर्ण केलें आमुच्या कामा ॥ शरण आलों तुज आह्मीं ॥ ५३ ॥ भक्तवत्सल ब्रीदख्याती ॥ ऐसें जगीं तुज वानिती ॥ आह्मीं देखिलें दृष्टांतीं ॥ ह्मणोनि चरणीं लागलों ॥ ५४ ॥ नानाप्रकारें पूजा आरती ॥ शूद्रस्त्री करीतसे भक्ती ॥ श्रीगुरु बोलती अतिप्रीति ॥ लक्ष्मी

अखंड तुझे घरीं ॥ ५५ ॥ निरोप घेऊनि दोघेंजण ॥ गेलीं आपुले आश्रमीं जाण ॥ क-
रितां मास कालक्रमण ॥ पीक आलें अपार ॥ ५६ ॥ गतसंवत्सराहोनी देखा ॥ शतगुणी
झालें धान्य अधिका ॥ शूद्र ह्मणतसे ऐका ॥ अधिकारियांतें बोलावोनी ॥ ५७ ॥ शूद्र
ह्मणे अधिकारियांसी ॥ पीक गेलें सर्व गांवासी ॥ वोस दिसे कोठारासी ॥ आपण देऊं
अर्धभाग ॥ ५८ ॥ गतवर्षं द्विगुण तुह्मांसी ॥ अंगिकारिलें मीं परियेसीं ॥ धान्य झालें
बहुवसीं ॥ शतगुणें अधिक देखा ॥ ५९ ॥ परी देईन अर्ध संतोषीं ॥ संदेह न धरा हो
मानसीं ॥ अधिकारी ह्मणती तयासी ॥ धर्महानि केवीं करूं ॥ ६० ॥ गुरुकृपा होतां
तुजवरी ॥ पीक झालें बहुता परि ॥ नेऊनियां आपुले घरीं ॥ राज्य करा ह्मणती तया
॥ ६१ ॥ संतोषोनि शूद्र देखा ॥ विप्रासी वांटी धान्य अनेका ॥ घेऊनि गेला सकळिका ॥
राजधान्य देऊनी ॥ ६२ ॥ सिद्ध ह्मणे नामधारकासी ॥ श्रीगुरुचरित्र महिमा परियेसी ॥
दृढभक्ति असे ज्यासी ॥ दैन्य कैचें तयाघरीं ॥ ६३ ॥ सकलाभीष्टें त्यासी होती ॥ लक्ष्मी
राहे अखंडिती ॥ गुरुसेवा हो निश्चिती ॥ ह्मणे सरस्वती गंगाधर ॥ ६४ ॥ इति श्रीगुरुच-
रित्रामृत ॥ गुरुशिष्यसंवाद विख्यात ॥ भक्ता शूद्रा वर प्राप्त ॥ अष्टचत्वारिंशोध्याय हा
॥ ६५ ॥ इति श्रीगुरुचरित्रपरमकथाकल्पतरौ श्रीनृसिंहसरस्वत्युपाख्याने सिद्धनामधार-
कसंवादे शूद्रोत्कृष्टधान्यमहिमानाम अष्टचत्वारिंशोऽध्यायः ॥ ओंव्या ६५ ॥

॥ श्रीगणेशाय नमः ॥ नामधारक शिष्य सगुण ॥ सिद्ध मुनीतें नमन करून ॥ विनवीतसे कर जोडून ॥ भक्तिभावें करूनियां ॥१॥ त्रैमूर्तीचा अवतार ॥ झाला वेषधारी नर ॥ राहिला प्रीतीं गाणगापुरा ॥ कवण क्षेत्र ह्मणोनियां ॥२॥ भूमीवरी प्रख्यात ॥ तीर्थें असती असंख्यात ॥ समस्त सांडोनियां येथ ॥ काय कारण वास केला ॥ ३ ॥ या स्थानाचें महिमान ॥ सांगा स्वामी विस्तारोन ॥ ह्मणोनि धरी सिद्धाचे चरण ॥ नामधारक तयेवेळीं ॥४॥ ऐकोनि तयाचें वचन ॥ सिद्धमुनी संतोषोन ॥ सांगतसे विस्तारून ॥ ऐका श्रोते एकचित्तें ॥५॥ आश्विन वद्य चतुर्दशीसीं ॥ दिपवाळी पर्वणीसीं ॥ श्रीगुरु ह्मणती शिष्यांसी ॥ स्नान करावें त्रिस्थ-लींचें ॥६॥ गया प्रयाग वाराणशीसी ॥ चला यात्रे पुत्रकलत्रेंशीं ॥ विप्र ह्मणती श्रीगुरुसी ॥ आइती करणें ह्मणोनियां ॥ ७ ॥ ऐकोनि श्रीगुरु हांसती ॥ ग्रामाजवळी तीर्थें असती ॥ करणें न लागे तुह्मां आइती ॥ चला नेईन तुह्मांसी ॥८॥ ऐसें ह्मणोनि भक्तांसीं ॥ गेले अमर-जासंगमासी ॥ स्नान केलें महाहर्षीं ॥ शिष्यांसहित श्रीगुरूंनीं ॥९॥ गुरु ह्मणती शिष्यांसी ॥ महिमा अपार संगमासी ॥ प्रयागासमान परियेसीं ॥ षट्कुळामध्यें स्नान करणें ॥१०॥ विशेष नदी भीमातीर ॥ अमरजासंगमीं महिमा थोर ॥ गंगा यमुना वाहे निर्धार ॥ तीर्थ बरवें परियेसा ॥११॥ विशेषें आपण उत्तरे वाहे ॥ याचें पुण्य अपार आहे ॥ शताधिक पुण्य पाहें ॥ काशीहूनी परियेसा ॥१२॥ आणिक अष्टतीर्थें असती ॥ तयांचा महिमा विख्यात जगतीं ॥ सांगेन ऐका एकचित्तीं ॥ श्रीगुरु ह्मणती शिष्यांसीं ॥ १३ ॥ ऐकोनि श्रीगुरूचें वचन ॥ विनविताती भक्तजन ॥ अमरजानदी नाम कोण ॥ कोणापासाव उत्पत्ती ॥ १४ ॥ श्रीगुरु ह्मणती भक्तांसीं ॥ बरवें पुसिलें आह्मांसीं ॥ जालंधर पुराणासीं ॥ असे कथा प्रख्यात ॥१५॥

जालंधर नामें निशाचर ॥ समस्त जिंकिले त्याणें सुरवर ॥ आपुलें केलें इंद्रपूर ॥ समस्त देव
पळाले ॥१६॥ देवां दैत्यां झालें युद्ध ॥ सुरवर मारिले बहुविध ॥ इंद्रें जाऊनि दुःख खेद ॥
ईश्वराप्रती सांगीतला ॥१७॥ इंद्र ह्मणे ऐक शिवा ॥ दैत्यें मारिलें असे देवां ॥ शीघ्र प्रतीकार
करावा ॥ ह्मणोनि चरणीं लागला ॥ १८ ॥ आह्मी मारितों दैत्यांसीं ॥ रक्त पडतसे भूमीसीं ॥
अखिल दैत्यबिंदूंसीं ॥ अधिक उपजती भूमीवरी ॥ १९ ॥ स्वर्ग मृत्यु पाताळ ॥ सर्वत्र भरिलें
दैत्यकुळ॥ मारिले आमुचे देव सकळ ॥ ह्मणोनि आलों तुह्मांपासीं ॥२०॥ ऐसें वचन ऐकोनी ॥
ईश्वर प्रज्वाळला मनीं ॥ निघाला नंदी आरूढ होऊनी ॥ दैत्यनिर्दाळण करावया ॥ २१ ॥
इंद्र विनवी ईश्वरासीं ॥ वधावया दैत्यांसी ॥ जीवन आणावया देवांसीं ॥ ऐसा प्रतीकार
करावा ॥ २२ ॥ संतोषोनी गिरिजारमण ॥ अमृतमंत्रें उच्चारोन ॥ घट दिधला तत्क्षण ॥
संजीवनी उदक देखा ॥ २३ ॥ तें उदक घेवोनि इंद्रराव ॥ शिंपतांचि समस्त देव ॥ उठोनि
अमर सर्व ॥ स्वर्गास जाती तये वेळीं ॥२४॥ उरलें अमृत घटीं होतें ॥ घेऊनि जातां अमर-
नाथें ॥ पडिलें भूमीं अवचितें ॥ प्रवाह आला क्षितीवरी ॥२५॥ ते संजीवनी नामें नदी ॥ उद्ध-
वली भूमीं प्रसिद्धी ॥ अमरजा नाम याचि विधि ॥ प्रख्यात झाली अवधारा ॥ २६ ॥ याका-
रणें या नदीसी ॥ जे स्नान करिती भक्तींसीं ॥ काळमृत्यु न बाधे त्यांसी ॥ अपमृत्यु घडे
केवीं ॥२७॥ शतायुषी पुरुष होती ॥ रोगराई न पीडिती ॥ अपस्मारादि रोग जाती ॥ ब्रह्म-
हत्या जाती तात्काळ ॥२८॥ अमृतनदी नाम तियेसी ॥ संगम झाला भीमरथीसीं ॥ तीर्थ
झालें प्रयागासरसी ॥ त्रिवेणीचा संगम ॥ २९ ॥ कार्तिकादि माघमासीं ॥ स्नान करिती
भक्तींसीं ॥ इहसौख्य परलोकासी ॥ मोक्षस्थाना पावती ॥३०॥ सोमसूर्यग्रहणासी ॥ संक्र-

मण सोम अमावास्येसी ॥ पुण्यतिथी एकादशीसी ॥ स्नान करावें अनंतपुण्य ॥३१॥ साधितां प्रतिदिवस जरी ॥ सदां करावें मनोहरी ॥ समस्त दोष जाती दुरी ॥ शतायुषी श्रियायुक्त होय ॥३२॥ ऐसा संगममहिमा ऐका ॥ पुढें सांगतसे तीर्थ विशेखा ॥ दिसे अश्वत्थ संमुखा ॥ मनोहर तीर्थ असे ॥ ३३ ॥ या तीर्थी स्नान केलिया ॥ मनोहर पाविजे काया ॥ कल्पवृक्षस्थानीं अनुपम्या ॥ कल्पिलें फळ पाविजे ॥ ३४ ॥ अश्वत्थ नव्हे हा कल्पतरू ॥ जाणावें तुह्मीं निर्धारू ॥ जें जें चिंतिती मनीं नरू ॥ पावती काम्यें अवधारा ॥३५॥ ऐसें मनोहर तीर्थ ॥ ठावें असे प्रख्यात ॥ संमुख असे अश्वत्थ ॥ सदा वसती याचिया गुणें ॥ ३६ ॥ जे जन येऊनि सेवा करिती ॥ तयांचे मनोरथ पुरती ॥ न धरावा संदेह आतां चित्तीं ॥ ऐसें ह्मणती श्रीगुरुनाथ ॥३७॥ आह्मी वसतों सदां येथें ॥ ऐसें जाणा तुह्मी निरुतें ॥ दृष्टीं पडती श्रीगुरुनाथ ॥ खूण तुह्मां सांगेन ॥३८॥ कल्पवृक्षातें पूजोनी ॥ मग जावें शंकरभुवनीं ॥ संगमेश्वर असे त्रिनयनी ॥ पूजा करावी मनोभावें ॥३९॥ जैसा पर्वतीं मल्लिकार्जुन ॥ तैसा संगमीं रुद्र आपण ॥ भक्तिपूर्वक प्रदक्षिण ॥ करावी तुह्मी अवधारा ॥ ४० ॥ नंदिकेश्वरातें नमोनी ॥ जाऊनि नमावें चंडस्थानीं ॥ पुनः नंदीस नमन करोनी ॥ मग जावें सोमसूत्रासी ॥ ४१ ॥ सवेंचि परतोनि वृषभासी ॥ नमोनि जावें चंडीपासीं ॥ पुनः जावें सोमसूत्रासी ॥ येणेंविधी प्रदक्षिणा ॥४२॥ ऐसी प्रदक्षिणा देखा ॥ तीन वेळ करोनि ऐका ॥ वृषभस्थानीं येऊनि निका ॥ अवलोकावें शिवासी ॥४३॥ वामहस्तीं वृषण धरोनी ॥ तर्जनी अंगुष्ठ शृंगीं ठेवोनी ॥ पूजा पहाती समलोचनीं ॥ इंद्रासमान होय नर ॥४४॥ धनधान्यादि संपत्ती ॥ लक्ष्मी राहे अखंडिती ॥ पुत्रपौत्र त्यासी होती ॥ संगमेश्वर पूजिलिया ॥ ४५ ॥

गु. च.

अ. ४९

पुढें तीर्थ वाराणसी ॥ अर्धकोश परियेसीं ॥ ग्राम असे नागेशीं ॥ तेथोनि उद्भव असे जाण ॥ ४६ ॥ याचें असे आख्यान ॥ कथा नव्हे प्रत्यक्ष जाण ॥ होता एक ब्राह्मण ॥ भारद्वाज गोत्राचा॥४७॥विरक्त असे ईश्वरभक्त ॥ सर्वसंग त्याग करित ॥ आपण रत अनुष्ठानांत ॥ सदां ध्यायी शिवासी॥४८॥प्रसन्न झाला चंद्रमौळी ॥ सदाशिव दिसे जवळी ॥ विप्रा आल्हाद सर्वकाळीं ॥ देहभान विसरोनि हिंडत ॥ ४९ ॥ लोक ह्मणती पिसा त्यासी ॥ निंदा करिती बहुवसीं ॥ दोघे बंधू असती तयासी ॥ नामें त्यांचीं अवधारा॥५०॥एका नाम असे ईश्वर॥ दुसरा नामें असे परमेश्वर ॥ बंधु एकला करोनि अव्हेर ॥ आपण निघाले काशीसी ॥५१॥ करोनियां सर्व आइती ॥ समागमें निघाले त्वरिती ॥ तया पिशाचातें पाचारिती ॥ चला जाऊं ह्मणोनियां ॥ ५२ ॥ ब्रह्मज्ञानी द्विज निका ॥ पिसा ह्मणती मूर्ख लोका ॥ बंधूंसी ह्मणे द्विज ऐका ॥ नका जाऊं काशीसी ॥ ५३ ॥ विश्वेश्वर असे जवळी ॥ दावीन तुह्मां तात्काळीं ॥ आश्चर्य करिती सकळी ॥ दावीं म्हणती बंधुजन ॥५४॥ काशीस जावें अतिप्रयासें ॥ येथें भेटे तरी जावें कां सायासें ॥ म्हणोनि बोलताती हर्षें ॥ तयेवेळीं अवधारा ॥५५॥ इतुकिया अवसरीं ॥ विप्र गंगास्नान करी ॥ ध्यानस्थ होता साक्षात्कारी ॥ ईश्वर होता तयाजवळी ॥ ५६ ॥ विनवीतसे शिवासी ॥ आह्मां नित्य पाहिजे काशी ॥ दर्शन होय विश्वेश्वरासी ॥ ह्मणोनि चरणीं लागला ॥५७॥ ईश्वर भोळा चक्रवर्ती ॥ प्रसन्न झाला अति प्रीतीं ॥ दिसे तीच काशी त्वरिती ॥ मणिकर्णिकाकुंड झालें ॥ ५८ ॥ विश्वेश्वराची मूर्ति एक ॥ निघाली कुंडीं विशेख ॥ नदी उत्तरे दिसे निक ॥ एकबाण प्रमाण असे ॥ ५९ ॥ उदक निघालें कुंडांतून ॥ जैसें भागीरथीजीवन ॥ ज्या ज्या असती

काशींत खुणा ॥ समस्त असती तयासी ॥ ६० ॥ संगम झाला नदीभीमा ॥ तीर्थ असे काशी उत्तमा ॥ आचार करिती सप्रेमा ॥ बंधु ज्ञानी ह्मणती मग ॥ ६१ ॥ ह्मणे ब्राह्मण बंधूंसी ॥ काशीस न जावें आह्मुचे वंशीं ॥ समस्तें आचरावें ही काशी ॥ आह्मां शंकरें सांगीतलें ॥ ६२ ॥ आपुलें नाम ऐसें जाणा ॥ गोसावी नाम निर्धारी खुणा ॥ तुह्मी बंधु दोघेजण ॥ आराधावें ऐसें निरोपिलें ॥ ६३ ॥ तुह्मीं जावें पंढरपुरा ॥ तेथें असे पुंडलीकवरा ॥ सदां तुह्मी पूजा करा ॥ आराध्य नामें विख्यात ॥ ६४ ॥ प्रतिवर्षीं कार्तिकीसी ॥ येथें यावें निर्धारेंसी ॥ तीर्थ असे विशेषीं ॥ ऐसें म्हणे तो ब्राह्मण ॥ ६५ ॥ श्रीगुरु म्हणती भक्तांसी ॥ काशीतीर्थ प्रकटलें ऐसी ॥ न धरावा संशय तुम्हीं मानसीं ॥ वाराणसी प्रत्यक्ष ही ॥ ६६ ॥ ऐकोनि समस्त द्विजवर ॥ करिती स्नान निर्मळ आचार ॥ तेथोनि पुढें येती गुरुवर ॥ सिद्ध सांगे नामधारका ॥ ६७ ॥ श्रीगुरु म्हणती सकळिकांसी ॥ तीर्थ दाविती पापविनाशी ॥ स्नानमात्रें पाप नाशी ॥ जैसा तृणा अग्नि लागे ॥ ६८ ॥ आपुले भगिनी रत्नाईसी ॥ दोष असे बहुवसीं ॥ बोलावोनी त्या समयासी ॥ पुसताती श्रीगुरुमूर्ती ॥६९॥ ऐक पूर्वदेह भगिनी ॥ तूं आलीस आमुचे दर्शनीं ॥ जन्मांतरीं दुष्कर्म आचरोनी ॥ पापसंग्रह बहु केला ॥७०॥ ऐकोनि श्रीगुरूच्या बोला ॥ पायां पडे वेळोवेळां ॥ अज्ञान आपण मूढ केवळा ॥ इतुकें कैचें ज्ञान मज ॥७१॥ तूं जगदात्मा विश्वव्यापक ॥ तूंचि ज्ञानज्योति प्रकाशक ॥ सर्व जाणसी तूंचि एक ॥ विस्तारोनी सांग मज ॥७२॥ श्रीगुरु म्हणती तियेसी ॥ आपुलें पाप मज पुससी ॥ वधिलें पांच मार्जारांसी ॥ नेणसी खूण धरी आपुली ॥७३॥ होती मार्जारी गर्भिणी ॥ प्रसूति झाली भांड्यामधूनी ॥ न पहातां उदक घालूनी ॥

झांकोनि ठेविली अग्नीवरी ॥७४॥ पांच मार्जारांचा घात ॥ केला असे दोष बहुत ॥ ऐसें ऐकोनियां त्वरित ॥ श्वेतकुष्ट झालें तिसी ॥७५॥ देखोनियां भयाभीत झाली ॥ श्रीगुरुचरणा येऊनि लागली ॥ विनवीतसे करुणाबहाळी ॥ कृपा करींगा गुरुमूर्ती ॥७६॥ करोनी समस्त पापराशी ॥ तीर्थी जाती वाराणसी ॥ मीं आलें तुझे दर्शनासी ॥ पापावेगळी होईन ह्मणोनी ॥७७॥ श्रीगुरु पुसती तियेसी ॥ तुज राहे पापराशी ॥ पुढिल जन्मीं जरी भोगिसी ॥ तरी कुष्ट जाईल आतां ७८॥ रत्नाई विनवी स्वामियासी ॥ उबगलें बहुत जन्मासी ॥ याच्चि कारणें तुझे दर्शनासी ॥ पापावेगळें होऊं म्हणतसे ॥७९॥ आतां पुरे जन्म आपण ॥ ह्मणोनि वरिले तुझे चरण ॥ याच्चि जन्मीं भोगीन जाणा ॥ पापाचें फळ म्हणतसे ॥८०॥ इतुकें ऐकोनि गुरुमूर्ती ॥ रत्नाईस निरोप देती ॥ पापविनाशतीर्थी जाय त्वरितीं ॥ स्नानमात्रें जाईल कुष्ट ॥८१॥ नित्य करींहो येथें स्नान ॥ सप्तजन्मींचे दोषदहन ॥ संदेह न करितां होय न अनुमान ॥ ह्मणोनि सांगती श्रीगुरू ॥ ८२ ॥ सिद्ध ह्मणे नामधारकासी ॥ आह्मीं देखिलें दृष्टीसी ॥ स्नान करितां त्रिरात्रीसी ॥ कुष्ट तिचें परिहरिलें ॥ ८३ ॥ ऐसें प्रख्यात तीर्थ देखा ॥ नाम पापविनाशी ऐका ॥ जे करिती स्नान भक्तिपूर्वका ॥ सप्तजन्मींचीं पापें जाती ॥ ८४ ॥ तीर्थमहिमा देखोन ॥ रत्नाबाई संतोषोन ॥ राहिली मठासीं येऊन ॥ तीर्थसन्निध अवधारा ॥ ८५ ॥ पुढें कोटितीर्थ देखा ॥ श्रीगुरु दाविती सकळिकां ॥ स्नानमात्रें होय निका ॥ याचें आख्यान बहुत असे ॥ ८६ ॥ जंबुद्वीपीं जितुकीं तीर्थें ॥ एकैकाचा महिमा अपरिमितें ॥ इतुकियां वास कोटितीर्थें ॥ विस्तार असे सांगतां ॥ ८७ ॥ सोमसूर्यग्रहणासी ॥ अथवा संक्रांति पर्वणीसी ॥ अमावास्या पौर्णिमा प्रतिपदेसी ॥ स्नान तेथें करावें ॥८८॥

प्रतिसंवत्सरीं देखा ॥ सालंकृत करोनि धेनु निका ॥ दान द्यावें द्विजा देखा ॥ एकैक दान कोटीसरिसें ॥८९॥ तीर्थमहिमा आहे कैसी ॥ स्नान केलिया अनंत फळ पावसी ॥ एकैक दान कोटीसरसी ॥ दान तीर्थी करावें ॥९०॥ पुढें तीर्थ रुद्रपद ॥ कथा असे अतिविनोद ॥ गयातीर्थ सप्तपद ॥ येथें असे अवधारा ॥ ९१ ॥ जे जे आचार गयेसी ॥ करा तेथें परियेसी ॥ पूजा करा रुद्रपदासी ॥ कोटि जन्मींचीं पापें जाती ॥ ९२॥ पुढें असे चक्रतीर्थ ॥ अतिविशेष पवित्र ॥ केशवदेव सन्निध तत्र ॥ पुण्यराशी स्थान असे ॥ ९३ ॥ या तीर्थी स्नान करितां ॥ ज्ञान होय पतितां ॥ अस्थि होती चक्रांकिता ॥ द्वारावतीसमान देखा ॥९४॥ या तीर्थी स्नान करोनी ॥ पूजा करावी केशवचरणीं ॥ द्वारावती चतुर्गुणीं ॥ पुण्य असे अवधारा ॥ ९५ ॥ ऐकोनि श्रीगुरूचें वचन ॥ समस्त करिती स्नानदान ॥ पुढें असे मन्मथदहन ॥ तीर्थ सांगती श्रीगुरू ॥ ९६ ॥ ग्राम पूर्वभागेसी ॥ कल्लेश्वर देव परियेसीं ॥ जैसें गोकर्णमहाबळेश्वरासी ॥ समान क्षेत्र परियेसा ॥ ९७ ॥ मन्मथतीर्थी स्नान करावें ॥ कल्लेश्वरातें पूजावें ॥ पूजावृद्धीनें होय बरवें ॥ अष्टैश्वर्यै पाविजे ॥ ९८ ॥ अखंड श्रावणमासीं ॥ अभिषेक करावा देवासी ॥ दीपाराधना कार्तिकमासीं ॥ अनंत पुण्य अवधारा ॥ ९९ ॥ ऐसी अष्टतीर्थमहिमा ॥ सांगती श्रीगुरुपुरुषोत्तमा ॥ संतोषोनि भक्त उत्तमा ॥ अति उल्हास करिताती ॥ १०० ॥ ह्मणती समस्त भक्तजन ॥ नेणों तीर्थांचें महिमान ॥ स्वामींनीं निरोपिलें कृपेनें ॥ पुनीत केलें आह्मांसी ॥ १॥ आतां समस्त तीर्थें ॥ कां जावें दूर यात्रेतें ॥ स्थान असे हें पवित्र येथें ॥ ह्मणोनि समस्त आचरती ॥ २ ॥ अष्टतीर्थें सांगुनि निगुती ॥ श्रीगुरु गेले मठाप्रती ॥ समाराधना करीती ॥ महानंद प्रवर्तला ॥ ३ ॥ सिद्ध ह्मणे

नामधारकासी ॥ तीर्थमहिमा आहे ऐसी ॥ श्रीगुरु सांगती आह्मांसी ॥ ह्मणोनि तुज नि-
रोपिलें ॥ ४ ॥ ह्मणे सरस्वतीगंगाधर ॥ क्षेत्र थोर गाणगापुर ॥ तीर्थें असती अपरंपार ॥
आचरा तुह्मी भक्तीनें ॥ ५ ॥ इति श्रीगुरुचरित्रामृत ॥ सिद्धमुनीशिष्यसंवाद बहुत ॥ गा-
णगापुरमाहात्म्य विख्यात ॥ एकुणपन्नासाव्यांत कथियेलें ॥ ६ ॥ इति श्रीनृसिंहसरस्व-
त्युपाख्याने सिद्धनामधारकसंवादे अमरजासंगमगाणगापुरक्षेत्रमहिमावर्णनंनाम एको-
नपंचाशत्तमोऽध्यायः ॥ ओंव्या १०६ ॥

... ध्द म्हण ... ॥ पुढें अपूर्व झालें ऐका ॥ पूर्वी रजकाक्र-
थानका ॥ तूत आपण निरोपिलें ॥ १ ॥ तयानें मागीतला वर ॥ राज्यपद धुरंधर ॥ प्रसन्न
झाले तयासी गुरुवर ॥ दिधला वर परियेसा ॥ २ ॥ उपजला तो म्लेच्छजातींत ॥
वैदुरी नगरीं राज्य करीत ॥ पुत्रपौत्रीं नांदत ॥ महानंदें परियेसा ॥ ३ ॥ ऐसा राजा तो
यवन ॥ होता आपण संतोषोन ॥ अश्व गज अपार धन ॥ पायदळा मिती नाहीं ॥ ४ ॥
आपण तरी यातिहीन ॥ पुण्यवासना अंतःकरण ॥ दानधर्म करी जाण ॥ समस्त यातीं
एकभावें ॥ ५ ॥ विशेष भक्ती विप्रांवरी ॥ असे पूर्वसंस्कारीं ॥ असती देवालयें भूमी-
वरी ॥ उपद्रव नेदी तयांसी ॥ ६ ॥ तयाचे घरचे पुरोहित ॥ तया रायातें शिकवीत ॥
आपण होऊन म्लेच्छजात ॥ देवद्विज निंदावे ॥ ७ ॥ तयांतें तुह्मी सेवितां देख ॥ त्याणें
होय अपार पातक ॥ जातिधर्म करणें सुख ॥ अनंत पुण्य असे जाणा ॥ ८ ॥ मंदमती
द्विजजाती ॥ देखा पाषाणपूजा करिती ॥ समस्तांतें देव ह्मणती ॥ काष्ठ वृक्ष पाषाणासी
॥ ९ ॥ धेनूसी ह्मणती देवता होय ॥ पृथ्वी सोम अग्नि सूर्य ॥ तीर्थयात्रा नदीतोय ॥ सम-
स्तांतें देव ह्मणताती ॥ १० ॥ ऐसे विप्र मंदमती ॥ निराकारा साकार ह्मणती ॥ तयांतें
म्लेच्छ जे भजती ॥ ते पावती अधःपात ॥ ११ ॥ ऐसे यवनपुरोहित ॥ रायापुढें सांगती
हित ॥ ऐकोनि राजा उत्तर देत ॥ कोपेंकरोनि परियेसा ॥१२॥ राजा ह्मणे पुरोहितांसी ॥
निरोपिलें तुह्मीं आह्मांसी ॥ अणू रेणु तृण काष्ठेसीं ॥ सर्वेश्वर पूर्ण असे ॥ १३ ॥ समस्त
सृष्टी ईश्वराची ॥ स्थावरजंगम रचिली साची ॥ सर्वत्र देव असे एकची ॥ तर्कभेद
असंख्य ॥ १४ ॥ समस्त जातींची उत्पत्ती ॥ जाणावी तुह्मीं पंचभूतीं ॥ पृथ्वी आप तेज

वायु निगुती ॥ आकाशापासाव परियेसा ॥ १९ ॥ समस्तांसीं पृथ्वी एक ॥ आणिती मृत्तिका कुलाललोक ॥ नानापरीचीं करीती अनेक ॥ भांडीं भेद परोपरी ॥ १६ ॥ नानापरींच्या धेनू असती ॥ क्षीर असे एकचि रीतीं ॥ सुवर्ण जाणा तेचि रीतीं ॥ परोपरीचे अलंकार ॥ १७ ॥ तैसे देह भिन्न जाण ॥ परमात्मा एकचि पूर्ण ॥ जैसा नभीं मृगलांछन ॥ नानाघटीं दिसतसे ॥ १८ ॥ दीप असे एक घरीं ॥ वाती लाविल्या सहस्र जरी ॥ समस्त होती दीपापरी ॥ भिन्नभाव कोठें असे ॥ १९ ॥ एकचि सूत्र आणोनि ॥ नानापरीचे ओंविती मणी ॥ सूत्र एकचि जाणोनि ॥ न पाविजे भाव भिन्न ॥२०॥ तैशा जाती नानापरी ॥ असताती वसुंधरीं ॥ समस्तांसी एकचि हरी ॥ भिन्नभाव करूं नये ॥२१॥ आणीक तुह्मीं ह्मणाल ऐसें ॥ पुजिती पाषाण देव कैसे ॥ सर्वांठायीं पूर्ण भासे ॥ जो विश्वात्मा आहेची ॥२२॥ प्रतिमापूजा स्वल्पबुद्धी ॥ ह्मणोनि सांगती प्रसिद्धी ॥ आत्माराम पूजिती विधीं ॥ त्यांचे मतीं ऐसें असे ॥ २३ ॥ स्थिर नव्हे अंतःकरण ॥ ह्मणोनि सांगती प्रतिमा खूण ॥ नाम ठेवोनि नारायण ॥ तयानामें पूजिताती ॥ २४ ॥ तयातें तुह्मी निंदा करितां ॥ तरी सर्वांठायीं पूर्ण कां ह्मणतां ॥ प्रतिष्ठाव्या आपुले मतां ॥ द्वेष आह्मीं न करावा ॥ २५ ॥ याकारणें ज्ञानवंतीं ॥ करूं नये निंदास्तुती ॥ असती नानापरी जाती ॥ आपुले रहाटीं रहाटती ॥ २६ ॥ ऐशापरी पुरोहितांसी ॥ सांगे राजा विस्तारेंसीं ॥ करी पुण्य बहुवसीं ॥ विश्वास देवद्विजांवरी ॥ २७ ॥ राजा देखा येणेंपरी ॥ होता तया वैदुरी नगरीं ॥ पुढें त्याचे मांडीवरी ॥ स्फोटक एक उद्भवला ॥ २८ ॥ नानापरीचे वैद्य येती ॥ तया स्फोटकासीं लेप करिती ॥ शमन न होय कवणें रीतीं ॥

महादुःखें कष्टतसे ॥२९॥ ऐसें असतां वर्तमानीं ॥ श्रीगुरु असतां गाणगाभुवनीं ॥ विचार करिती आपुले मनीं ॥ राजा येईल ह्मणोनियां ॥ ३० ॥ येथें येती म्लेच्छलोक ॥ होईल द्विजां उपबाधक ॥ प्रकट झालों आतां ऐका ॥ आम्हीं येथें असूं नये ॥ ३१ ॥ प्रकट जहाली महिमाख्याती ॥ पहावया येती म्लेच्छजाती ॥ आतां रहावें आह्मीं गुप्तगतीं ॥ लौकिकार्थ परियेसा ॥ ३२ ॥ आला ईश्वरनाम संवत्सरू ॥ सिंहासीं आला असे गुरु ॥ गौतमीतीर्थ असे थोरू ॥ यात्राप्रसंगें जावें आतां ॥ ३३ ॥ ह्मणती समस्त शिष्यांसी ॥ उठा बा करा आइती वेगेंसीं ॥ येतो राजा बोलावयासी ॥ जावें त्वरित गंगेला ॥ ३४ ॥ ऐसें ऐकोनि शिष्यजन ॥ विचार करिती आपआपण ॥ जरी येईल राजा यवन ॥ केवीं होईल ह्मणताती ॥ ३५ ॥ ऐसा मनीं विचार करिती ॥ काय होईल पहा म्हणती ॥ असे नरसिंहसरस्वती ॥ तोचि रक्षील आपणातें ॥ ३६ ॥ येणेंपरी श्रीगुरुमूर्ती ॥ असतां गाणगापुरीं ख्याती ॥ राजा यवना झाली मती ॥ पूर्वसंस्कारीं परियेसा ॥ ३७ ॥ स्फोटकाचे दुःखें राजा ॥ अपार कष्टला सहजा ॥ नानापरी औषधें वोजा ॥ करितां न होय तया बरवें ॥ ३८ ॥ मग मनीं विचार करी ॥ स्फोटकें व्यापिलें अपरंपारीं ॥ वैद्याचेनि नोहे दुरी ॥ काय करावें म्हणतसे ॥३९॥ बोलावोनी विप्रांसीं ॥ पुसे काय उपाय यासी ॥ विप्र ह्मणती रायासी ॥ सांगतों ऐका एकचित्तें ॥४०॥ पूर्वजन्मीं पापें करिती ॥ व्याधिरूपें होऊनि पीडिती ॥ दानधर्में तीर्थीं हिंडतां ॥ व्याधि जाय परियेसा ॥ ४१ ॥ अथवा भल्या सत्पुरुषासीं ॥ शरण जाऊनि भावेंसीं ॥ तयाचे दृष्टीसुधारसीं ॥ बरवें होईल परियेसा ॥ ४२ ॥ सत्पुरुषाचे कृपादृष्टीं ॥ पापें जाती जन्मसाठीं ॥ मग रोग कैचा पोटीं ॥

स्फोटकादि त्वरित जाय ॥ ४३ ॥ ऐकोनियां विप्रवचन ॥ राजा करितसे नमन ॥ मातें तुह्मी न म्हणा यवन ॥ दास आपण विप्रांचा ॥ ४४ ॥ पूर्वजन्मीं आपण ॥ केली सेवा गुरुचरण ॥ स्वल्प पापास्तव झालों जाण ॥ यवनाचे कुळीं देखा ॥ ४५ ॥ एखादा पूर्ववृत्तांत ॥ मातें निरोपावा त्वरित ॥ महानुभावदर्शन होत ॥ कवणाचा रोग गेला असे ॥४६॥ रायाचें वचन ऐकोनी ॥ विचार करिती विप्र मनीं ॥ सांगूं नये या स्थानीं ॥ एकांत स्थळ पाहिजे ॥४७॥ तुह्मी राव म्लेच्छजाती ॥ समस्त तुम्हां निंदा करिती ॥ आह्मी असों द्विजजाती ॥ केवीं करावें म्हणताती ॥४८॥ विप्रवचन ऐकोन ॥ विनवीतसे तो यवन ॥ चाड नाहीं जातीविण ॥ आपणास तुह्मी उद्धरावें ॥ ४९ ॥ ऐसें रायाचें अंतःकरण ॥ अनुतप्त झालें असे जाण ॥ मग निरोपिती ब्राह्मण ॥ तया रायातें परियेसा ॥ ५० ॥ विप्र म्हणती रायासी ॥ स्थान बरवें पापविनाशी ॥ जावें तुह्मी सहजेसीं ॥ विनोदार्थ परियेसा ॥ ५१ ॥ तेथें असे स्थळ बरवें ॥ एकांतस्थान पहावें ॥ स्नान करावें मनोभावें ॥ एकचित्तें परियेसा ॥ ५२ ॥ ऐकोनियां विप्रवचन ॥ संतोषला राजा आपण ॥ निघाला त्वरित तेथोन ॥ आला पापविनाश तीर्थासी ॥ ५३ ॥ समस्तांतें रहावुनी ॥ एकला गेला तया स्थानीं ॥ स्नान करितां तये क्षणीं ॥ आला एक यती तेथें ॥ ५४ ॥ राजा देखोनि यतीसी ॥ नमन करी भावेंसी ॥ दावीतसे स्फोटकासी ॥ ह्मणे उपशमन केवीं होय ॥ ५५ ॥ ऐकोनि तयाचें वचन ॥ सांगता झाला विस्तारोन ॥ महानुभावाच्या दर्शनें ॥ तुतें बरवें होय जाणा ॥ ५६ ॥ पूर्वीं याचें आख्यान ॥ सांगेन ऐक विस्तारोन ॥ एकचित्तें करोनि मन ॥ ऐक म्हणती तये वेळीं ॥ ५७ ॥ अवंतीनामें नगरी ॥

तेथें होता एक दुराचारी ॥ जन्मोनियां विप्रउदरीं ॥ अन्य रहाटी रहाटतसे ॥५८॥ आपण असे मदोन्मत्त ॥ समस्त स्त्रियांपाशीं रमत ॥ स्नानसंध्या त्यजूनी निश्चित ॥ अन्यमार्गें वागतसे ॥ ५९ ॥ ऐसें दुराचारीपणें ॥ रहाटतसे तो ब्राह्मण ॥ पिंगला म्हणोनि वेश्या जाण ॥ तयेसवें वर्ततसे ॥ ६० ॥ न करी कर्म संध्यास्नान ॥ रात्रंदिवस करीं वेश्यागमन ॥ तिचे घरीं भक्षी अन्न ॥ तिचे संगें क्रीडतसे ॥ ६१ ॥ ऐसें असतां वर्तमानीं ॥ ब्राह्मण होता वेश्यासदनीं ॥ तेथें आला एक मुनी ॥ ऋषभनामा महायोगी ॥ ६२ ॥ तया देखोनि दोघेंजण ॥ करिती साष्टांगनमन ॥ भक्तिभावें करोन ॥ घेवोनि आली मंदिरांत ॥ ६३ ॥ बैसवोनियां पीठावरी ॥ पूजा करिती षोडशोपचारीं ॥ अर्घ्यपाद्य देवोनि पुढारी ॥ गंधाक्षता लाविती ॥ ६४ ॥ नानापरिमळ पुष्पजाती ॥ तया योगियासी समर्पिती ॥ परिमळद्रव्यें अनेक रीतीं ॥ समर्पिलीं तया योगेश्वरा ॥६५॥ चरणतीर्थ घेऊन ॥ पान करिती दोघेंजण ॥ त्यातें करविती भोजन ॥ नानापरी पक्वान्नेंसीं ॥ ६६ ॥ करवूनियां भोजन ॥ केलें हस्तप्रक्षालन ॥ बरवें पाणी आणोन ॥ देती तया योगियासी ॥ ६७ ॥ तया मंचकीं निजवोन ॥ तांबूल देती आणोन ॥ करिती पादसंवाहन ॥ भक्तिभावें दोघेंही ॥ ६८ ॥ निद्रिस्थ झाला योगेश्वर ॥ दोघे करिती नमस्कार ॥ उभें राहोनि चारी प्रहर ॥ सेवा केली भावेंसीं ॥६९॥ उदय झाला दिनकरासी ॥ संतोषला तो तापसी॥ निरोप घेवोनि संतोषी ॥ गेला आपुल्या स्वस्थाना ॥ ७० ॥ ऐसें विप्रें वेश्याघरीं ॥ क्रमितां किंचित दिवसावरी ॥ तारुण्य जाऊनी शरीरीं ॥ वार्धक्य पातलें तयासी ॥७१॥ पुढें तया विप्रासी ॥ मरण आलें परियेसी ॥ पिंगलानाम वेश्येसी ॥ दोघें पंचत्व पावलीं

॥ ७२ ॥ पूर्वकर्मानुबंधेसीं ॥ जन्म झाला राजकुळासी ॥ दशार्णाधिपतीचे वंशीं ॥ वज्रबाहूवनिता उदरांत ॥ ७३ ॥ तया वज्रबाहूची पत्नी ॥ नाम जिचें असे सुमती ॥ जन्मास आला तिचे पोटीं ॥ तो विप्र परियेसा ॥७४॥ तया वज्रबाहूसी ॥ ज्येष्ठ राणीच्या गर्भैसीं ॥ उद्भवला विप्र परियेसी ॥ राजा समारंभ करितसे ॥ ७५ ॥ देखोनि तिचे सव-तीसी ॥ क्रोध आला बहुमानसीं ॥ गर्व झाला सपत्नीसी ॥ ह्मणोनि द्वेष मनीं धरी ॥ ७६ ॥ सर्पगरळ आणोनी ॥ दिल्हें सवतीस नानायत्नीं ॥ गरळें भेदिलें तये कामिनी ॥ तया राया ज्येष्ठ स्त्रियेसी ॥ ७७ ॥ दैवयोगें नये मरण ॥ सर्व शरीरीं झाले व्रण ॥ विष असे अतिगहन ॥ महाकष्ट भोगितसे ॥ ७८ ॥ ऐशापरी राजयुवती ॥ कष्टें झाली प्रसूती॥ उपजतां बाळका मातेप्रती ॥ सर्वांग स्फोट वाहत ॥ ७९ ॥ विषें व्यापिलें सर्वांगासी ॥ ह्मणोनि आक्रंदती दिवानिशीं ॥ दुःख करी राजा क्लेशी ॥ ह्मणे काय करूं आतां ॥ ८० ॥ देशोदेशींच्या वैद्यांसी ॥ बोलाविती चिकित्सेसीं ॥ वेंचिती द्रव्य अपारेंसीं ॥ कांहीं केलिया बरवें नोहे ॥ ८१ ॥ तया माताबाळकासी ॥ व्रण झाले बहु-वसी ॥ निद्रा नाहीं दिवारात्रीसीं ॥ सर्वांगीं कृमि पडले असती ॥ ८२ ॥ त्यांतें देखोनि रायासी ॥ दुःख झालें बहुवसीं ॥ निद्रा नाहीं दिवानिशीं ॥ त्यांचे कष्ट देखोनियां ॥ ८३ ॥ व्यर्थंकरोनि मातासुत ॥ अन्नउदक नवचे किंचित ॥ शरीरीं सर्व क्लेश होत ॥ क्षीण झालें येणेंपरी ॥ ८४ ॥ राजा येऊनि एके दिवशीं ॥ पाहे आपुले स्त्रीसुतासी ॥ देखोनि-यां महाक्लेशीं ॥ दुःख करीतसे परियेसा ॥ ८५ ॥ ह्मणे आतां काय करूं ॥ केवीं करणें प्रतीकारू ॥ नाना औषधें उपचारू ॥ करितां स्वस्थ नव्हेचि ॥ ८६ ॥ स्त्रीपुत्राची ऐशी

गु. च.

गती ॥ जिवंत शव झालीं असती ॥ यांच्या रोगासी न होय शांति ॥ केवीं पाहूं ह्मणतसे ॥८७॥ आतां यांतें पहावयासी ॥ कंटाळा येतो आह्मांसी ॥ बरवें नव्हे सत्य यासी ॥ काय कारण ह्मणतसे ॥ ८८ ॥ यांतें देखतां आह्मांसी ॥ श्रम होती देहासी ॥ नेवोनियां अरण्यासी ॥ यांतें त्यजूं ह्मणतसे ॥ ८९ ॥ जे जे असती पापीजन ॥ त्यांतें जीवन अथवा मरण ॥ भोगिल्यावांचोनि न सुटे जाण ॥ आपुलें आपण भोगिजे ॥ ९० ॥ विचार करोनि मानसीं ॥ बोलाविलें कोळियासी ॥ सांगतसे विस्तारेंसी ॥ ऐका श्रोते एकचित्तें ॥ ९१ ॥ राजा ह्मणे सूतासी ॥ माझे बोल परियेसीं ॥ नेऊनि माझे स्त्रीपुत्रांसी ॥अरण्यांत ठेवावें ॥९२॥ मनुष्यांचा संचार ॥ जेथें नसेल निर्धार ॥ तेथें ठेवीं वेगवत्तर ॥ ह्मणे राजा सूतासी ॥ ९३ ॥ येणेंपरी सूतासी ॥ राजा सांगें विस्तारेंसीं ॥ रथ दिधला संजोगेंसीं ॥ घेऊनी गेला झडकरी ॥ ९४ ॥ तिचे दासदासी सकळ ॥ दुःख करिती महाप्रबळ ॥ मातापिता बंधू सकळ ॥ समस्त प्रलाप करिताती ॥ ९५ ॥ दुःख करिती नरनारी ॥ हा हा पापी दुराचारी ॥ स्त्रीसुतासी कैसेंपरी ॥ केवीं यांतें मारविलें ॥ ९६ ॥ रथावरी बैसवोनी ॥ घेवोनि गेला महारानीं ॥ जेथें नसती मनुष्य कोणी ॥ तेथें ठेविलीं परियेसा ॥ ९७॥ सूत आला परतोनी ॥ सांगे रायासी विस्तारोनी ॥ महा अरण्य दुर्गमवनीं ॥ तेथें ठेविलीं ह्मणतसे ॥ ९८ ॥ ऐकोनि राजा संतोषला ॥ दुसरे स्त्रियेसीं सांगता झाला ॥ दोघांसी आनंद झाला ॥ वनीं राहिलीं मातासुत ॥ ९९ ॥ मातापुत्र दोघेंजण ॥ पीडताती दुःखेंकरून ॥ कष्टती अन्नउदकाविण ॥ महाघोर वनांत ॥ १०० ॥ उभयतां रोगी दोघेंजण ॥ जातील वनीं तीं मरोन ॥ कष्टें कष्टतां प्राण ॥ तयांचा निघेल वाटतें ॥१॥ राज-

पत्नी सकुमार ॥ तया शरीरीं व्रण थोर ॥ चालूं न शके पृथ्वीवर ॥ महाकंटक भूमीवरी ॥ २ ॥ कडिये घेवोनि बाळकासी ॥ जाय ती मंदगमनेसीं ॥ आठवी आपुले कर्मासी ॥ ह्मणे आतां काय करूं ॥३॥ तया वनीं मृगजाती ॥ व्याघ्र सिंहादिक असती ॥ सर्प थोर अपरिमिती । हिंडताती वनांत ॥ ४ ॥ मातें जरी व्याघ्र मारी ॥ पापापासून होईन दूरी ॥ पुरे आतां जन्मसंसारीं ॥ वांचोनि काय व्यर्थ जिणें ॥ ५ ॥ ह्मणोनि जाय पुढें रडत ॥ क्षणोक्षणीं असे पडत ॥ पुत्रासहित चिंता करीत ॥ जात असे वनामाजी ॥ ६ ॥ उदका-विणें तृषाक्रांत ॥ देह व्रणें असे पीडित ॥ व्याघ्र सर्पादि देखत ॥ भयें चकित होतसे ॥ ७ ॥ देखे वेताळ ब्रह्मराक्षस ॥ वनगज भालुका बहुवस ॥ केश मोकळे पायांस ॥ कांटे धोंडे लागताती ॥ ८ ॥ ऐशी महा अरण्यांत ॥ राजस्त्री असे हिंडत ॥ पुढें जातां देखिलें वनांत ॥ गुरें चरती वाणियांचीं ॥ ९ ॥ तयांपासीं जावोनी ॥ पुसतसे करुणावचनीं ॥ गोरक्षांतें विनवोनी ॥ मागे उदक कुमारकासी ॥ १० ॥ गोरक्षक ह्मणती तियेसीं ॥ जावें तुवां मंदिरासी ॥ तेथें उदक बहुवसी ॥ अन्न तूतें मिळेल ॥११॥ ह्मणोनि मार्ग दाखविती ॥ हळू हळू जाय ह्मणती ॥ राजपत्नी मार्ग क्रमिती ॥ गेली तया ग्रामांत ॥१२॥ तया ग्रामीं नरनारी ॥ दिसताती अपरंपारी ॥ देखोनि आली मनोहरी ॥ पुसे तया स्त्रियांसी ॥ १३ ॥ ह्मणे कवण येथें राजा ॥ संतोषी दिसे समस्त प्रजा ॥ ऐकोनी सांगती वैश्यराजा ॥ महा धनिक पुण्यात्मा ॥ १४ ॥ त्याचें नांव पद्माकर ॥ पुण्यवंत असे थोर ॥ तूतें रक्षील सा-चार ॥ ह्मणोनि सांगती तियेसी ॥ १५ ॥ इतुकिया अवसरीं ॥ तया वैश्याचे घरीं ॥ दासी होत्या मनोहरी ॥ त्याही आल्या तियेजवळी ॥ १६ ॥ येवोनि पुसती वृत्तांत ॥ घे-

वोनि गेल्या मंदिरांत ॥ आपुल्या स्वामीसी सांगत ॥ आद्यंतेसी विस्तारें ॥ १७ ॥ तीस देखोनियां वैश्यनाथ ॥ कृपा करी अत्यंत ॥ नेऊनियां मंदिरांत ॥ दिल्हें एक गृह तिसी ॥ १८ ॥ पुसोनियां वृत्तांत ॥ वाणी होय कृपावंत ॥ दिल्हें अन्नवस्त्र बहुत ॥ नित्य तिसी रक्षितसे ॥ १९ ॥ ऐशी तया वैश्याघरीं ॥ होती रायाची अंतुरी ॥ वर्धत असे पीडा भारी ॥ व्रण नवेचे परियेसा ॥२०॥ येणेंपरी राजसती ॥ तया वैश्याचे घरीं होती ॥ वाढले व्रण तयांसी बहुती ॥ प्राणांतक होतसे ॥२१॥ वर्ततां ऐसें एके दिवशीं ॥ मरण आलें कुमारकासीं ॥ प्रलाप करी बहुवसीं ॥ राजपत्नी तये वेळीं ॥ २२ ॥ मूर्च्छा येऊनि तयेक्षणीं ॥ राजपत्नी पडे धरणी ॥ आपुलें कर्म आठवोनी ॥ महाशोक करीतसे ॥ २३ ॥ त्या वाणियाच्या स्त्रिया देखा ॥ संबोधिताती ती बाळिका ॥ कोण्यापरी तिचे दुःखा ॥ शमन नोहे परियेसा ॥ २४ ॥ नानापरीचें दुःख करी ॥ आठवीतसे पूर्वापारीं ॥ ह्मणे ताता गुणकेसरी ॥ कोठें गेलासी बाळका ॥ २५ ॥ राजकुमारा पूर्णचंद्रा ॥ माझ्या आनंदसमुद्रा ॥ मातें धरिसी मौनमुद्रा ॥ तूतें काय बरवें असे ॥ २६ ॥ मातापिता बंधुजन ॥ सोडोनि आल्यें सकळ जाण ॥ तुझा भरंवसा होता पूर्ण ॥ मातें रक्षिसी म्हणोनियां ॥२७॥ मातें अनाथ करोनी ॥ तूं जातोसी सोडोनी ॥ मज रक्षिता नसे कोणी ॥ प्राण त्यजीन ह्मणतसे ॥२८॥ येणेंपरी राजनारी ॥ दीर्घस्वरें रुदन करी ॥ देखोनियां नरनारी ॥ दुःख करिती परियेसा ॥ २९ ॥ समस्तही दुःखाहुनी ॥ पुत्रशोक केवळ वन्ही ॥ मातापितरांतें दाहोनी ॥ भस्म करी परियेसा ॥ ३० ॥ येणेंपरी दुःख करितां ॥ ऋषभ योगी आला त्वरिता ॥ पूर्वजन्मींच्या उपकारार्था ॥ पातला तेथें महाज्ञानी ॥३१॥ योगियातें देखोनी ॥

वंदिता झाला तो वाणी ॥ अर्घ्यपाद्य देऊनी ॥ उत्तमासनीं बैसविला ॥ ३२ ॥ योगी पुसे त्या अवसरीं ॥ रुदन करी कोण नारी ॥ शोक करीतसे अपरंपारीं ॥ काय आहे ह्मणतसे ॥३३॥ सविस्तर वैश्यनाथ ॥ सांगता झाला वृत्तांत ॥ योगेश्वर कृपावंत ॥ आला धांवोनी जवळी पैं ॥३४॥ ह्मणे योगी तियेसी ॥ मूढपणें कां दुःख करिसी ॥ कवण जन्मला भूमीसी ॥ कवण मेला सांग मज ॥३५॥ देह ह्मणजे विनाशी जाण ॥ जैसा गंगेंत दिसे फेण ॥ व्यक्ताव्यक्त सर्वेचि होणें ॥ जलबुद्बुदापरी देखा ॥३६॥ पृथ्वी तेज वायु आप ॥ आकाश मिळोनि शरीरव्याप ॥ पंच गोठलीं शरीररूप ॥ दिसत असे परियेसा ॥३७॥ पंचभूतें पांचांठायीं ॥ निघोनि जातां शून्य पाही ॥ दुःख करितां अवकाश नाहीं ॥ वृथा कां तूं दुःख करिसी ॥३८॥ गुणापासाव उत्पत्ति ॥ निजकर्में होय निरुती ॥ काळ नाचवी दृष्टि विकृतीं ॥ वासना तयापरी जाणा ॥ ३९ ॥ मायेपासोनि माया उपजे ॥ होय गुणें सत्व रजें ॥ तमोगुणें तेथें सहजें ॥ देहलक्षण येणेंपरी ॥ ४० ॥ या तीन गुणापासाव ॥ उपजताती मनुष्यभाव ॥ सत्वगुणें असती देव ॥ रजोगुण मनुष्यांचा ॥४१॥ तामस तोचि राक्षस ॥ जैसा गुण असे त्यास ॥ तैसा जन्मे पिंडाभास ॥ कधीं स्थिर नव्हेची ॥४२॥ या संसारवर्तमानीं ॥ उपजती नर कर्मानुगुणीं ॥ जैसें अर्जन असे पूर्वपुण्यीं ॥ सुखदुःखें तैसीं घडती देखा ॥४३॥ कल्पकोटी वर्षोवरी ॥ जिवंत असती सुर जरी ॥ तेही न रहाती स्थिरी ॥ मनुष्यांचा काय पाड ॥४४॥ याकारणें ज्ञानीजनें ॥ उपजतांच संतोष न मानणें ॥ मेलिया दुःख न करणें ॥ स्थिर नव्हे देह जाणा ॥ ४५ ॥ गर्भ संभवे त्याचि काळीं ॥ विनाशी ह्मणोनि जाणती सकळी ॥ कोणी मरती यौवनकाळीं ॥ क्वचिद्वार्धक्यपणीं जाणा ॥४६॥

जैसें कर्म पूर्वार्जित ॥ तेणेंपरी असे घडत ॥ मायामोहें पितासुत ॥ ह्मणती देखा नरदेहीं ॥४७॥ जैसें लिहिलें ललाटेसी ॥ ब्रह्मदेवानें परियेसी ॥ काळकर्म उल्लंघावयासी ॥ शक्ति न होय कवणा जाण ॥ ४८ ॥ ऐसें अनित्य देहासी ॥ कांवो माते दुःख करिसी ॥ तुझीं पूर्वकर्मै कैसीं ॥ सांग आह्मां म्हणतसे ॥ ४९ ॥ तूं जन्मांतरीं जाणा ॥ कवणा होतीस अंगना ॥ किंवा झालीसी जननी कोणा ॥ भगिनी कोणाची सांगपां ॥ ५० ॥ ऐसें जाणोनि मानसीं ॥ वायां कांहो दुःख करिसी ॥ जरी बरवें तूं इच्छिसी ॥ शरण जाईं शंकरा ॥ ५१ ॥ ऐसें ऐकोनि राजयुवती ॥ करी ऋषभयोगिया विनंती ॥ आपणासी झाली ऐसी गती ॥ राज्यभ्रष्ट होऊनि आल्यें ॥ ५२ ॥ मातापिता बंधुजनां ॥ सोडोनि प्रवेशिलें मी राना ॥ पुत्र होईल बरवा जाणा ॥ ऐसा भरंवसा मज याचा ॥ ५३ ॥ तयाची झाली ऐसी गती ॥ आपण वांचोनी काय प्रीति ॥ मरण यावें मज निश्चितीं ॥ ह्मणोनि चरणीं लागली ॥ ५४ ॥ ऐसें निर्वाण देखोनी ॥ कृपा उपजली योगियामनीं ॥ पूर्व उपकार स्मरोनी ॥ प्रसन्न झाला तयेवेळीं ॥ ५५ ॥ भस्म मंत्रोनि तात्काळीं ॥ लाविलें प्रेताचे कपाळीं ॥ घालितां तयाचे मुखकमळीं ॥ प्राण आला परियेसा ॥ ५६ ॥ बाळ बैसला उठोनी ॥ सर्वांग झालें सुवर्णवर्णी ॥ मातेचे व्रणही तेचि क्षणीं ॥ जाते झाले तत्काळ ॥ ५७ ॥ राजपत्नी पुत्रासहित ॥ करी योगियासी दंडवत ॥ ऋषभयोगी कृपावंत ॥ आणीक भस्म प्रोक्षीतसे ॥ ५८ ॥ तात्काळ तया दोघांसी ॥ शरीर होय सुवर्णसंकाशी ॥ शोभायमान दिसे कैशी ॥ दिव्य काया उभयतांची ॥ ५९ ॥ प्रसन्न झाला योगेश्वर ॥ तये वेळीं दिधला वर ॥ तुह्मां न होय जरा निर्धार ॥ तारुण्यरूप चिरंजीवी ॥६०॥ तुझा सुत

भद्रायुषी ॥ कीर्ति करील बहुवर्शीं ॥ राज्य करील परियेसी ॥ पित्याहूनि अधिक जाण ॥६१॥
ऐसा वर देऊनी ॥ योगी गेला तये क्षणीं ॥ ऐक राजा एकमनीं ॥ सत्पुरुषाचें महिमान ॥६२॥
सत्पुरुषाची सेवा करितां ॥ तुझा स्फोटक जाईल त्वरिता ॥ तुवां न करावी कांहीं चिंता ॥
दृढ धरीं भाव एक ॥ ६३ ॥ ऐसें यतिवचन ऐकोनी ॥ राजा नमन करी तये क्षणीं ॥
विनवीतसे कर जोडूनी ॥ कोठें असे सत्पुरुष ॥ ६४ ॥ मातें निरोपावें आतां ॥ जाईन
आपण तेथें तत्वतां ॥ मजला त्याचें दर्शन होतां ॥ होईल बरवें ह्मणतसे ॥ ६५ ॥ ऐकोनि
राजाचें वचन ॥ सांगतसे मुनि आपण ॥ भीमातीरीं गाणगाभुवन ॥ असे तेथें सत्पुरुष ॥६६॥
तयापाशीं तुवां जावें ॥ दर्शनमात्रें होईल बरवें ॥ ऐकोनि राजा एकभावें ॥ निघता झाला
तयेवेळीं ॥६७॥ एकभावें राजा आपण ॥ घ्यावया श्रीगुरुदर्शन ॥ प्रयाणावरी करी प्रयाण ॥
आला गाणगापुरासी ॥ ६८ ॥ ग्रामीं पुसे सकळिकांसी ॥ कोण येथें एक तापसी ॥ रूप
धरिलें संन्याशी ॥ कोठें आहे ह्मणतसे ॥ ६९ ॥ भयभीत झाले सकळिक ॥ ह्मणती आतां
न होय सुख ॥ श्रीगुरूसी पुसती ऐक ॥ काय करील नकळे ह्मणती ॥ ७० ॥ कोणी
न बोलती तयासी ॥ राजा कोपला बहुवशीं ॥ ह्मणे आलों भेटीसी ॥ दाखवा आपणासी
ह्मणतसे ॥ ७१ ॥ मग ह्मणती समस्त लोक ॥ अनुष्ठानस्थानीं असे ऐक ॥ अमरजासंगमीं
माध्यान्हिक ॥ करोनि येती ग्रामातें ॥ ७२ ॥ ऐसें ऐकोनि म्लेच्छ देख ॥ समस्तां वर्जूनि
आपण एक ॥ बैसोनियां आंदोलिक ॥ गेला तया स्थानासी ॥७३॥ दुरोनि देखतां श्रीगु-
रूसी ॥ चरणीं चाले म्लेच्छ त्वरेसी ॥ जवळी गेला पहावयासी ॥ नमन करूनि उभा
राहे ॥ ७४ ॥ श्रीगुरु ह्मणती तयासी ॥ कां रे रजका कोठें असशी ॥ बहुत दिवसीं भेट-

लासी ॥ आमुचा दास होवोनियां ॥७५॥ ऐसें वचन ऐकोनी ॥ म्लेंच्छ झाला महाज्ञानी॥ पूर्वजन्म स्मरला मनीं ॥ करी साष्टांग दंडवत ॥ ७६ ॥ पादुकांवरी लोळे आपण ॥ सद्गदित झालें अंतःकरण ॥ अंगीं रोमांच उठोन ॥ आनंदबाष्पें रुदन करी ॥ ७७ ॥ पूर्वजन्म आठवोनी देखा ॥ रुदन करी अतिदुःखा ॥ कर जोडोनि विनवी ऐका ॥ नानापरी स्तुति करी ॥ ७८ ॥ राजा ह्मणे श्रीगुरूसी ॥ कां उपेक्षिलें आह्मांसी ॥ झालों आपण परदेशी ॥ चरणावेगळें केलें मज ॥ ७९ ॥ अंधकारसागरांत ॥ कां घातलें मज येथ ॥ मी होऊनि मदोन्मत्त ॥ विसरलों चरण तुझे ॥ ८० ॥ संसारसागरमायाजळीं ॥ बुडालों आपण दुर्मति केवळी ॥ सेवा न करीं चरणकमळीं ॥ दिवांध झालों आपण ॥ ८१ ॥ होतासी तूं जवळी निधान ॥ न ओळखें आपण मतिहीन ॥ तमांधकारीं वेष्टोन ॥ तुझे चरण विसरलों ॥ ८२ ॥ तूं भक्तजना नुपेक्षिसी ॥ निर्धार होता माझे मानसीं ॥ अज्ञानसागरीं आह्मांसी ॥ कां घातलें स्वामिया ॥ ८३ ॥ उद्धरावें आतां मज ॥ आलों आपण हेंचि काज ॥ सेवोनी तुझे चरणरज ॥ असेन आतां राज्य पुरे ॥ ८४ ॥ ऐसें नानापरी देखा ॥ स्तुति करी राजा ऐका ॥ श्रीगुरु ह्मणती भक्त निका ॥ तुझी वासना पुरेल ॥८५॥ राजा ह्मणे श्रीगुरुसी ॥ झाला स्फोटक आपणासी ॥ व्यथा होतसे प्रयासी ॥ कृपा दृष्टीं पहावें ॥ ८६ ॥ ऐसें वचन ऐकोन ॥ श्रीगुरु करिती हास्यवदन ॥ स्फोटक नाहीं दावीं ह्मणोन ॥ पुसताती यवनासी ॥८७॥ राजा पाहे स्फोटकासी ॥ न दिसे स्फोटक अंगासी ॥ विस्मय करीतसे मानसीं ॥ पुनरपि चरणीं माथा ठेवी ॥ ८८ ॥ राजा ह्मणे स्वामियासी ॥ तुझे प्रसन्नत्वें आह्मांसी ॥ राज्य पावलों संतोषीं ॥ अष्टैश्वर्यें भोगिलीं ॥ ८९ ॥ पुत्रपौत्र

देखिले नयनीं ॥ पूर्ण निवालों अंतःकरणीं ॥ संकल्प असे माझे मनीं ॥ अष्टैश्वर्य माझें अवलोकावें ॥ ९० ॥ भक्तवत्सल ब्रीद तुझें ॥ वासना पुरवावी जी माझे ॥ इंद्रियसंसार उतरी ओझें ॥ लीन होईन तुझे चरणीं ॥ ९१ ॥ श्रीगुरु ह्मणती तयासी ॥ आह्मीं तापसी संन्यासी ॥ येऊं नये तुझे नगरासी ॥ महापातकें होती तेथें ॥ ९२ ॥ नगरीं नित्य धेनु-हत्या ॥ यवनजाति करिती अकृत्या ॥ जीवहिंसा मद्यपि कृत्या ॥ वर्जावें आतां निर्धारें ॥ ९३ ॥ सर्व अंगीकार करोनी ॥ राजा लागे दोनी चरणीं ॥ ह्मणे मी दास पुरातनीं ॥ पूर्वापारी दृष्टि देणें ॥ ९४ ॥ पूर्व माझा जन्म रजक ॥ स्वामीचा मी निजसेवक ॥ राज्य पावोनी देखिलें सुख ॥ उणें एक म्लेच्छ जाति ॥ ९५ ॥ दर्शन होतां तुझे चरण ॥ संतुष्ट झालें अंतःकरण ॥ पुत्रपौत्र दृष्टीं पाहोन ॥ मग मी राहीन तुझे सेवे ॥ ९६ ॥ ऐसें नाना-परी देखा ॥ राजा विनवी विशेखा ॥ पायां पडे क्षणक्षणिका ॥ अतिकाकुळती येतसे ॥९७॥ श्रीगुरु मनीं विचार करिती ॥ पुढें होणार ऐसी गति ॥ कलियुगीं असे दुर्जनजाती ॥ गौप्य असतां पुढें बरवें ॥ ९८ ॥ सहज जावें सिंहस्थासीं ॥ महातीर्थ गौतमीसी ॥ जावें तेथें हें भरंवसीं ॥ आतां आह्मीं गुप्त व्हावें ॥ ९९ ॥ ऐसें मनीं विचारूनी ॥ श्रीगुरु निघाले संगमाहूनी ॥ राजा आपुले सुखासनीं ॥ बैसवी प्रीती करोनियां ॥२००॥ पादुका घेतल्या आपुले करीं ॥ सांगातें येतसे पादचारी ॥ श्रीगुरु ह्मणती आरोहण करीं ॥ लोक-निंदा तुज करिती ॥ १ ॥ राष्ट्राधिपति तुज ह्मणती ॥ जन्म तुझा म्लेच्छजाति ॥ ब्राह्म-णसेवें तुज हांसती ॥ जाती दूषण करतील ॥ २ ॥ राजा ह्मणे स्वामी ऐक ॥ कैंचा राजा मी रजक ॥ तुझे दृष्टीं असे चोख ॥ लोह सुवर्ण होतसे ॥ ३ ॥ मी राजा समस्त लोकांत ॥

परी रजक तुझा भक्त ॥ पूर्ण झाले मनोरथ ॥ तुझें झालें दर्शन मज ॥ ४ ॥ इतुकिया अवसरीं ॥ समस्त दळ मिळालें भारी ॥ मदोन्मत्त अति कुंजरी ॥ अश्वावरी कित्येक ॥ ५ ॥ उभा राहोनि राजा देखा ॥ समस्त दाखवी सैन्यका ॥ संतोष मनीं अतिहर्खा ॥ आपुलें ऐश्वर्य दावितसे ॥ ६ ॥ श्रीगुरु निरोपिती यवनासी ॥ आरोहण करी वारुवेसी ॥ दूर जाणें असे नगरासी ॥ निरोप आमुचा नको मोडूं ॥ ७ ॥ श्रीगुरुवचन ऐकोन ॥ समस्त शिष्यांतें आरोहण ॥ देता झाला तो यवन ॥ आपण वाजीं आरूढला ॥ ८ ॥ आनंद बहु यवनाचे मनीं ॥ हर्ष न समाये गगनीं ॥ श्रीगुरुभेट झाली ह्मणोनी ॥ अतिउल्हास करीतसे ॥ ९ ॥ श्रीगुरुमूर्ति बोलती यवनासी ॥ ह्मणती झालों अति संतोषी ॥ तूं भक्त केवळ गुणराशी ॥ संतुष्ट झालों आपण आजी ॥ १० ॥ आह्मी संन्यासी तापसी ॥ नित्य करावें अनुष्ठानासी ॥ तुह्मां समागमें मार्गासी ॥ न घडे वेळीं संध्यादिक ॥ ११ ॥ यासी उपाय सांगेन ॥ अंगीकार करावा जाण ॥ पुढें आह्मी जाऊं त्वरेनें ॥ स्थिर यावें तुह्मीं मागें ॥ १२ ॥ पापविनाशितीर्थासी ॥ भेटी होईल तुह्मांसी ॥ ऐसें ह्मणोनि रायासी ॥ अदृश्य झाले गुरुमूर्ती ॥ १३ ॥ समस्त शिष्यांसहित ॥ श्रीगुरु गुप्त झाले त्वरित ॥ मनोवेगें मार्ग क्रमित ॥ गेले वैदुरपुरासी ॥ १४ ॥ पापविनाशितीर्थाशी ॥ श्रीगुरु पातले त्वरितासी ॥ राहिले तेथें अनुष्ठानासी ॥ समस्त येती भेटावया ॥ १५ ॥ साकरे सायंदेवाचा सुत ॥ भेटीस आला तेथें नागनाथ ॥ नानापरी पूजा करीत ॥ समाराधना आरंभिली ॥ १६ ॥ श्रीगुरु नेऊनी आपुले घरा ॥ पूजा केली षोडशोपचारा ॥ आरती करोनी एक सहस्रा ॥ समाराधना घालित ॥ १७ ॥ इतुकें होतां झाली निशी ॥ श्रीगुरु ह्मणती

नागनाथासी ॥ सांगोनि आलों म्लेच्छासी ॥ पापविनाशीं भेटूं ह्मणोनि ॥ १८ ॥ जाऊं आतां तया स्थानासी ॥ रहातां यवन येईल परियेसीं ॥ उपद्रव होईल ब्राह्मणांसी ॥ विप्रघरा म्लेच्छ येती ॥१९॥ ऐसें सांगोनि आपण ॥ गेले पापविनाशीलागोन ॥ शुभासनिं बैसोन ॥ अनुष्ठान करीत होते ॥ २० ॥ इतुकिया अवसरीं ॥ राजा मनीं विचार करी ॥ गुरुनाथ न दिसती दळभारीं ॥ मनीं चिंता बहु वर्तली ॥२१॥ ह्मणे कटकटा काय झालें ॥ गुरुनाथें मज उपेक्षिलें ॥ काय माझें अंतर पडलें ॥ तेणें गेले निघोनियां ॥ २२ ॥ मागुती मनीं विचारी ॥ पुढें जातों ह्मणोनि त्वरीं ॥ पापविनाशतीर्थातीरीं ॥ भेटी देतों ह्मणितलें ॥ २३ ॥ नकळे महिमान श्रीगुरुचें ॥ कोण जाणें मनोगत त्यांचें ॥ दैव बरवें होतें आमुचें ॥ ह्मणोनि चरणाचें दर्शन झालें ॥ २४ ॥ कीं स्फोटक होता मज ॥ आलों मनीं धरूनी काज ॥ कृपानिधि श्रीगुरुराज ॥ भेटी झाली पुण्य माझें ॥ २५ ॥ पुढें गेले निश्चित ॥ ह्मणोनि मनीं विचारीत ॥ दिव्य वारू आरूढोनि त्वरित ॥ निघाला राजा परियेसा ॥ २६ ॥ चतुश्चत्वारिंशत् कोश देखा ॥ राजा पातला दिवसें एका ॥ पापविनाशतीर्थी देखा ॥ अवलोकितसे श्रीगुरूसी ॥ २७ ॥ विस्मय करी अति मानसीं ॥ येऊनि लागला चरणासी ॥ विनवीतसे भक्तीसीं ॥ गृहाप्रती यावें ह्मणतसे ॥ २८ ॥ नगर सर्व शृंगारिलें ॥ प्रवाळ मोतियां तोरण केलें ॥ गुडिया मखरें उभारलें ॥ समारंभ थोर नगरांत ॥ २९ ॥ बैसवोनियां पालखींत ॥ आपण चरणचालीं येत ॥ नवरत्नें असे ओंवाळित ॥ नगरलोक आरत्या आणिती ॥ ३० ॥ ऐशा समारंभें राजा देखा ॥ घेऊनि गेला गुरुनायका ॥ विस्मय झाला सकळ लोकां ॥ महदाश्चर्य ह्मणताती ॥ ३१ ॥ लोक

ह्मणती म्लेंछजाती ॥ पहाहो विप्रपूजा करिती ॥ राजा अनाचारी ह्मणती ॥ जातिधर्म
सांडिला आजी ॥ ३२ ॥ ज्याचें पाहूं नये मुख ॥ त्याची सेवा करी देख ॥ राजा नष्ट
ह्मणोनि सकळिक ॥ म्लेंछजाति बोलती ॥ ३३ ॥ विप्रकुळ समस्त देख ॥ संतोषें करिती
अति कौतुक ॥ राजा झाला विप्रसेवक ॥ आतां बरवें राज्यवासी ॥ ३४ ॥ ऐसा हा
राव असतां ॥ महाराष्ट्रधर्मीं वर्ततां ॥ आपला द्वेष तत्त्वतां ॥ न करील कीं जाणपां ॥३५॥
ऐसा राजा असतां बरवें ॥ ज्ञानवंत असे स्वभावें ॥ ब्रह्मद्वेषी नव्हे पहावें ॥ पुण्यश्लोक
म्हणती ऐसा ॥३६॥ नगरलोक पहावया येती ॥ गुरूसीं नमस्कार करिती प्रीतीं ॥ राजे
चरणचालीं येती ॥ लोक ह्मणती आश्चर्य ॥ ३७ ॥ एक म्हणती हा होय देव ॥ ह्मणोनि
भजतो म्लेच्छराव ॥ या कलियुगीं अभिनव ॥ देखिलें ह्मणताती सकळिक ॥ ३८ ॥ सर्वें
वाजंत्र्यांचे गजर ॥ बंदिजन वाखाणिती अपार ॥ राजा हर्षें निर्भर ॥ घेऊनि जातो गुरूसी
॥३९॥ नानापरीचीं दिव्य वस्त्रें ॥ वांटीतसे राजा पवित्रें ॥ दिवे ओंवाळिती स्वर्णपात्रें॥ भिक्षु-
क तुष्टले बहुत देखा ॥४०॥ ऐशा समारंभें देखा ॥ घेऊनि गेला राजा ऐका ॥ महाद्वारीं पातले
सुखा ॥ पायघड्या अंथरतां॥४१॥नानापरीचीं दिव्यांबरें॥मार्गीं अंथरती अपारें ॥ वाजती
भेरी वाजंत्रें ॥ राजगृहा पातले ॥ ४२ ॥ महासिंहासनस्थानीं ॥ शृंगार केला अतिगहनीं ॥
जगद्गुरूतें नेऊनी ॥ सिंहासनीं बैसविलें ॥ ४३ ॥ राजमंदिरींच्या नारी ॥ आरत्या घेऊ-
नियां करीं ॥ ओंवाळिती हर्षनिर्भरीं ॥ अनन्यभावें करोनियां ॥ ४४ ॥ समस्त लोक बाहेर
ठेवोन ॥ श्रीगुरु होते एकले आपण ॥ सवें शिष्य चौघेजण ॥ जवळी होते परियेसा
॥ ४५ ॥ अंतःपुरींचे कुलस्त्रियांसी ॥ पुत्रपौत्रीं सहोदरांसी ॥ भेटविलें सकळांसी ॥ साष्टांग

नमस्कार करिती ॥४६॥ राजा विनवी स्वामियांसी ॥ पोर्ष्ये देखिलें चरणांसी ॥ न्याहाळावें कृपादृष्टीसी ॥ म्हणोनि चरणीं लागला ॥ ४७ ॥ संतोषले श्रीगुरुमूर्ती ॥ तयासी आशीर्वाद देती ॥ राजयातें बोलाविती ॥ पुसताती गृहवार्ता ॥ ४८ ॥ श्रीगुरु ह्मणती तयासी ॥ संतुष्ट झालास कीं मानसीं ॥ अजूनि व्हावें कांहीं भावेंसी ॥ विस्तारोनि सांग ह्मणती ॥४९॥ राजा विनवी स्वामियांसी ॥ अंतर पडतें चरणांसी ॥ राज्य केलें बहुवर्सी॥ आतां द्यावी चरणसेवा ॥ ५० ॥ ऐसें ऐकोनि श्रीगुरु ह्मणती ॥ आमुची भेटी श्रीपर्वतीं ॥ तुझे पुत्र राज्य करिती ॥ तुवां यावें भेटीसीं ॥ ५१ ॥ ऐसा निरोप देऊनी ॥ श्रीगुरु निघाले तेथोनी ॥ राजा विनवी चरण धरोनी ॥ ज्ञान मजला असावें ॥ ५२ ॥ कृपासिंधु गुरुनाथ ॥ ज्ञान होईल ऐसें ह्मणत ॥ आपण निघाले त्वरित ॥ गेले गौतमयात्रेसी ॥५३॥ स्नान करोनि गौतमीसी ॥ आले गाणगापुरासी ॥ आनंद झाला समस्तांसी ॥ श्रीगुरुचरणदर्शनें ॥५४॥ संतुष्ट झाले समस्त लोक ॥ पहावया येती कौतुक ॥ वंदिताती सकळिक॥ आरती करिती मनोभावें ॥ ५५ ॥ समस्त शिष्यांतें बोलाविती ॥ श्रीगुरु त्यांसी निरोपिती ॥ प्रगट झाली बहु ख्याती ॥ आतां रहावें गुप्तरूपें ॥ ५६ ॥ यात्रारूपें श्रीपर्वतासी ॥ निघावें आतां परियेसीं ॥ प्रकट बोलें हेंचि स्वभावेंसी ॥ गुप्तरूपें राहूं तेथें ॥५७॥ स्थान आपुलें गाणगापुरीं ॥ येथूनि नवचे निर्धारी ॥ लौकिक मतें अवधारी ॥ बोल करितों श्रीशैलयात्रा॥५८॥प्रकट करोनि यात्रेसी॥ वास निरंतर गाणगाभुवनासी ॥ भक्तजन तारावयासीं ॥ राहूं येथें निर्धार ॥ ५९ ॥ कठिण दिवस युगधर्म ॥ म्लेच्छ राजा क्रूर अधर्म ॥ प्रकटरूपें असतां धर्म ॥ समस्त म्लेच्छ येथें येती॥६०॥राजा आला ह्मणोनी ॥

समस्त यवन ऐकोनी ॥ सकळ येती मनकामनी ॥ ह्मणोनि गुप्त असावें ॥ ६१ ॥ ऐसें ह्मणोनि शिष्यांतें ॥ सांगितलें श्रीगुरुनाथें ॥ सिद्ध सांगे नामधारकातें ॥ चरित्र ऐसें श्रीगुरूचें ॥६२॥ पुढें येतील दुर्दिन ॥ राजा असे यवन ॥ अनाचारी विषयासक्त जन ॥ ह्मणोनि गुप्त राहिले ॥ ६३ ॥ लौकिकार्थ शास्त्रवाक्यासी ॥ निघाले आपण श्रीशैल्यासी ॥ कथा असे विशेषीं ॥ सिद्ध ह्मणे नामधारका ॥ ६४ ॥ गंगाधराचा सुत ॥ सरस्वती असे विनवीत ॥ प्रत्यक्ष असे श्रीगुरुनाथ ॥ देखिला दृष्टांत गाणगापुरीं ॥ ॥ ६५ ॥ सद्भावें भजतील भक्तजन ॥ त्यांची कामना होईल पूर्ण ॥ संदेह न धरी अनुमान ॥ त्वरित सिद्धि असे जाणा ॥ ६६ ॥ न लागतां कष्ट सायास ॥ कामना पुरती गाणगापुरास ॥ भक्तिभावें विशेष ॥ संदेह धरितां कार्य नासे ॥ ६७ ॥ जें जें कल्पिलें उत्तम फळ ॥ त्वरित पावती तें सकळ ॥ धनधान्यादिक विपुळ ॥ पुत्रपौत्रादि शीघ्र होती ॥ ६८ ॥ सिद्ध ह्मणे नामधारकासी ॥ हें गुरुचरित्र दिनीं निशीं ॥ मनोभावें वाचनेसी ॥ सकळ कामना पुरतील ॥६९॥ इति श्रीगुरुचरित्रामृत ॥ सिद्ध नामधारका सांगत ॥ यवनाचा उद्धार येथ ॥ तुह्मांकारणें सांगितला ॥ ७० ॥ इति श्रीगुरुचरित्रामृते सिद्धनामधारकसंवादे सार्वभौमस्फोटकशमनैश्वर्यावलोकन वैदुराप्रवेशोनाम पंचाशत्तमोऽध्यायः ॥ ओंव्या ॥ २७० ॥

॥ श्रीगणेशाय नमः ॥ नामधारक विनवी सिद्धासी ॥ कथा सांगितली आह्मासी ॥ म्लेच्छ-
राजानें श्रीगुरूसी ॥ नगरासी नेलें होतें ॥ १ ॥ तेथूनि आले गाणगाभुवना ॥ पुढील
वर्तल्या निरूपणा ॥ सांगा स्वामी कृपाघना ॥ गुरुचरित्र आह्मांसी ॥ २ ॥ सिद्ध ह्मणे
ऐक वत्सा ॥ कथा असे अतिविशेषा ॥ ऐकतांचि सकळ दोषा ॥ नासूनि इच्छित
पाविजे ॥ ३ ॥ राजाची भेट घेऊनी ॥ श्रीगुरु आले गाणगाभुवनीं ॥ योजना करिती
आपुल्या मनीं ॥ गुप्त रहावें लोकोपचारीं ॥४॥ प्रकट झाले बहुवसीं ॥ राजा आला भेटीसी ॥
उपजली भक्ती म्लेच्छासी ॥ नानाजाती येतील ॥ ५ ॥ ह्मणोनि आतां गुप्त व्हावें ॥
लौकिकमतें निघोनि जावें ॥ पर्वतयात्रेचे नांवें ॥ श्रीगुरु निघाले परियेसीं ॥ ६ ॥ गुप्त
राहिले गाणगापुरीं ॥ प्रकट दाखविलें लोकाचारीं ॥ निघाले स्वामी श्रीपर्वतोदरीं ॥
शिष्यांसहित अवधारा ॥ ७ ॥ भक्तजन बोलाविती ॥ बहुत जन चिंता करिती ॥ श्रीगुरू
संबोखूनी समस्तीं ॥ राहविती अतिप्रीतीनें ॥ ८ ॥ दुःख करिती सकळ जन ॥ धरिती श्रीगु-
रूचे चरण ॥ स्वामी आह्मांसी सोडून ॥ केवीं जातां यात्रेसी ॥९॥ भक्तजनाची तूं कामधेनू ॥
आह्मीं बाळक अज्ञानू ॥ होतासि आह्मां निधानू ॥ सोडूनि जातां श्रीगुरू ॥ १० ॥ नित्य
तुझें करितां दर्शन ॥ दुरितें जाती निरसून ॥ जें जें कामना इच्छी मन ॥ त्वरित पावे
स्वामिया ॥ ११ ॥ बाळकातें केवीं आतां ॥ आव्हेरूनि जाय मातापिता ॥ तैसें तूं स्वामी
तत्वतां ॥ नको अव्हेरूं आह्मांतें ॥ १२ ॥ ऐकोनि नानापरी विनंती ॥ हंसते झाले श्रीगुरु-
मूर्ती ॥ संबोखिती अतिप्रीतीं ॥ न करा चिंता ह्मणोनी ॥ १३ ॥ आह्मीं असतों याचि
ग्रामीं ॥ नित्य स्नान अमरजासंगमीं ॥ वसों माध्यान्हीं मठधामीं ॥ गुप्तरूपें अवधारा

॥ १४ ॥ जे जे असती माझ्या प्रेमीं ॥ त्यांतें प्रत्यक्ष दिसे नयनीं ॥ लौकिकमतें अविद्या-धर्मी ॥ जातों श्रीशैल्ययात्रेसी ॥ १५ ॥ प्रातःस्नान कृष्णातीरीं ॥ पुण्यवृक्ष औदुंबरीं ॥ अनुष्ठान बिंदुक्षेत्रीं ॥ माध्यान्हीं येतों भीमातटीं ॥ १६ ॥ अमरजासंगमीं स्नान करोनी ॥ पूजा घेऊं मठीं निर्गुणी ॥ चिंता न करा अंतःकरणीं ॥ ह्मणोनि सांगती श्रीगुरू ॥ १७ ॥ ऐसें सांगती समस्तांसी ॥ संदेह न धरावा मानसीं ॥ गाणगाभुवनीं अह-र्निशीं ॥ वसों आह्मीं त्रिकाल ॥ १८ ॥ जे जे जन भक्ति करिती ॥ त्यांसीं येईल आमुची प्रचिती ॥ मनकामना पावती त्वरिती ॥ निश्चय वाक्य असे आमुचें ॥ १९ ॥ अश्वत्थ नव्हे कल्पवृक्ष ॥ संगमीं असे प्रत्यक्ष ॥ तुमच्या मनीं जें अपेक्ष ॥ त्वरित होय पूजितां ॥ २० ॥ कल्पवृक्षातें पूजोनी ॥ मग यावें आमुचे स्थानीं ॥ पादुका ठेवितों निर्गुणी ॥ पूजा करा मनोभावें ॥ २१ ॥ विघ्नहर चिंतामणी ॥ त्यातें पूजितां एकमनीं ॥ चिंतिलें फल त्याच क्षणीं ॥ लाभे तुह्मां अवधारा ॥ २२ ॥ समस्त विघ्नांचा अंतक ॥ पूजा तुह्मीं विनायक ॥ अष्टतीर्थें असती विशेष ॥ आचरावीं मनोभावें ॥ २३ ॥ संतोष-कारक आह्मांप्रती ॥ त्रिकाल करावी आरती ॥ भक्तजन जें इच्छिती ॥ त्वरित होय तें अवधारा ॥ २४ ॥ ऐसें सांगोनि तयांसी ॥ निघाले स्वामी पर्वतासी ॥ भक्त परतोनि मठासी ॥ आले चिंतित मनांत ॥ २५ ॥ चिंतोनि पातले मठांत ॥ तेथें दिसती गुरुनाथ ॥ लोक झाले विस्मित ॥ म्हणती त्रैमूर्ती श्रीगुरु ॥ २६ ॥ यासी म्हणती जे नर ॥ ते पावती यमपुर ॥ सत्य बोलिले निर्धार ॥ नकळे महिमा आम्हांसी ॥२७॥ सर्वेचि पहातां न दिसे कोणी ॥ प्रेमळ भक्त देखती नयनीं ॥ यापरी गुप्तरूप धरोनी ॥ राहिले श्रीगुरु मठांत

॥ २८ ॥ दृष्टांत दाखविला भक्तांसी ॥ पातले आपण पर्वतासी ॥ गेले गंगातीरासी ॥ राहिले स्वामी परियेसा ॥ २९ ॥ शिष्यांतें निरोपिती अवधारा ॥ पुष्पांचें आसन त्वरित करा ॥ जाणें असे पैलतीरा ॥ ऐक्य होऊं मल्लिकार्जुनीं ॥ ३० ॥ निरोप देतां श्रीगुरुमूर्ती ॥ आणिलीं पुष्पें सेवंती ॥ कुमुदें कल्हारें मालती ॥ कर्दळीपर्णें वेष्टोनी ॥ ३१ ॥ आसन केलें अति विचित्र ॥ घातलें गंगेमध्यें पात्र ॥ शिष्यां सांगती वेगवत्तर ॥ जावें तुह्मी गृहासी ॥ ३२ ॥ दुःख करिती जन सकळी ॥ सांगती श्रीगुरु त्यां चंद्रमौळी ॥ गाणगग्रामीं असों जवळी ॥ भाव न धरा दुजा तुह्मीं ॥ ३३ ॥ लौकिकमतें आह्मी जातों ॥ ऐसा अभाविकांसी दिसतों ॥ भक्तजनां घरीं असतों ॥ निर्धार धरा मानसीं ॥ ३४ ॥ ऐसें भक्त ऐकोनी ॥ ठेविती माथा श्रीगुरुचरणीं ॥ कृपादृष्टी पाहिलें नयनीं ॥ आशीर्वाद देती अवधारा ॥ ३५ ॥ उठले श्रीगुरु तेथूनी ॥ पुष्पकविमानीं बैसोनी ॥ आनंदोनी आपुल्या मनीं ॥ कल्याण सांगती सकळिकां ॥ ३६ ॥ कन्यागतीं बृहस्पती ॥ बहुधान्य संवत्सरीं ख्याती ॥ सूर्य चाले उत्तरगती ॥ संक्रांती कुंभ परियेसा ॥ ३७ ॥ शिशिरऋतु माघमासीं ॥ असितपक्ष प्रतिपदेसी ॥ शुक्रवारीं पुण्य दिवशीं ॥ श्रीगुरु बैसले निजानंदीं ॥ ३८ ॥ श्रीगुरु ह्मणती शिष्यांसी ॥ जातों आम्ही मठासी ॥ पावती खूण तुह्मांसी ॥ प्रसाद पुष्पें पाठवितों ॥ ३९ ॥ येतील पुष्पें जाती शेवंती ॥ घ्यावा प्रसाद तुह्मीं भक्तीं ॥ पूजा करावी अखंड रीती ॥ लक्ष्मी वसो तुह्मां घरीं ॥ ४० ॥ आणीक सांगेन एक खूण ॥ गायनीं करी जो माझें स्मरण ॥ त्याचे घरीं असे जाण ॥ गायनप्रीती आह्मांसीं ॥ ४१ ॥ नित्य जे जन गायन करिती ॥ त्यांवरी माझी अति प्रीती ॥ तयांचे घरीं अखंडिती ॥ आपण असों

अवधारा ॥४२॥ व्याधी न होय त्यांचे घरीं ॥ दरिद्र जाय त्वरित दूरी ॥ पुत्रपौत्र श्रिया-
करीं ॥ शतायुषी नांदतील ॥४३ ॥ ऐकतील चरित्र माझें जरी ॥ वाचतील नर निरंतरीं ॥
लक्ष्मी राहे त्यांचे घरीं ॥ संदेह न धरावा मनांत ॥ ४४ ॥ ऐसें सांगोन भक्तांसीं ॥ श्रीगुरु
गेले निजस्थानासी ॥ चिंता लागली भक्तांसीं ॥ अवलोकिती गंगेंत ॥ ४५ ॥ ऐशी चिंता
करितां थोर ॥ तटाकीं पातले नावेकर ॥ त्यांणीं सांगितला विचार ॥ श्रीगुरु आह्मीं दे-
खिले ॥ ४६ ॥ शिष्यवर्गासी मनोहर ॥ व्यवस्था सांगती नावेकर ॥ होतों आह्मी
पैलतीर ॥ तेथें देखिले यतीश्वर ॥ ४७ ॥ संन्यास वेषी दंड हातीं ॥ नामें नृसिंहसरस्वती ॥
निरोप दिधला आह्मांप्रती ॥ तुह्मांस सांगा ह्मणोनी ॥ ४८ ॥ आह्मांस आज्ञापिती मुनी ॥
आपण जातों कर्दळीवनीं ॥ सदां वसों गाणगाभुवनीं ॥ ऐसें सांगा ह्मणितलें ॥४९॥ भ्रांत-
पणें दुःख करितां ॥ आह्मीं देखिलें दृष्टांता ॥ जात असतां श्रीगुरुनाथा ॥ सुवर्णपादुका
चरणीं देखिल्या ॥ ५० ॥ निरोप सांगितला तुम्हांसी ॥ जावें आपुल्या स्वस्थानासी ॥
सुखी असावें वंशोवंशी ॥ माझी भक्ती करोनी ॥ ५१ ॥ प्रसादपुष्पें आलिया ॥ शिष्यांसी
घावीं काढोनियां ॥ ऐसें आह्मां सांगोनियां ॥ श्रीगुरु गेले अवधारा ॥ ५२ ॥ ऐसें सांगो-
नि नावेकर ॥ समस्तही राहिले स्थिर ॥ हर्षें असती निर्भर ॥ प्रसादपुष्पें पहाती ॥ ५३ ॥
इतुकिया अवसरीं ॥ आलीं प्रसादपुष्पें चारी ॥ मुख्य शिष्यें प्रीतीकारीं ॥ काढोनि
घेतलीं अवधारा ॥ ५४ ॥ नामधारक ह्मणे सिद्धासी ॥ मुख्य शिष्य ह्मणावें कवणासी ॥
विस्तारोनी सांगा आह्मांसी ॥ पुष्पें कोणासी लाभलीं ॥ ५५ ॥ सिद्ध ह्मणे नामधारकासी
शिष्य बहुत गुरुनायकासी ॥ असती गाणगापुरासी ॥ गेले शिष्य आश्रमा ॥ ५६ ॥

आश्रम घेती संन्यासी ॥ त्यांसी पाठविलें तीर्थासी ॥ तयांचीं नामें परियेसीं ॥ सांगेन ऐका विस्तारोन ॥ ५७ ॥ कृष्णसरस्वती बालसरस्वती ॥ उपेंद्रमाधवसरस्वती ॥ पाठविते झाले प्रीतीं ॥ आपण राहिले संगमीं ॥ ५८ ॥ गृहस्थ धर्मे बहुत शिष्य असती ॥ समस्त ग्रामीं नांदती ॥ त्रिवर्ग आले श्रीपर्वताप्रती ॥ चवथा होतों आपण ॥ ५९ ॥ साकरे नामक सायंदेवें ॥ कवीश्वरयुग्में धूर्वभावें ॥ नंदीनामें नरहरीदेवें ॥ पुष्पें घेतलीं चतुर्वर्गीं ॥ ६० ॥ गुरुप्रसाद घेऊन ॥ आले शिष्य चौघेजण ॥ तींचि पुष्पें मज पूज्यमान ॥ ह्मणोनि पुष्पें दाखविताती ॥ ६१ ॥ ऐसें श्रीगुरूचें माहात्म्य ॥ सांगतसे अनुपम्य ॥ थोडें सांगितलें अगम्य ॥ अपार असे ऐकतां ॥ ६२ ॥ श्रीगुरुचरित्र कामधेनु पूर्ण ॥ सांगितलें तुज विस्तारोन ॥ दुःख दरिद्र गेलें पळोन ॥ ऐसें जाणा निर्धार ॥ ६३ ॥ ऐसें श्रीगुरुचरित्र ॥ श्रवणीं कीर्तनीं अतिपवित्र ॥ सुखें नांदती पुत्रपौत्र ॥ लक्ष्मीवंत होती जाण ॥ ६४ ॥ धर्म अर्थ काम मोक्ष ॥ तयांसी लाभे प्रत्यक्ष ॥ थोर आनंद उभयपक्ष ॥ पुस्तक लिहितां सर्वसिद्धी ॥ ६५ ॥ ऐसें सिद्ध सांगता झाला ॥ नामधारक संतोषला ॥ सकळाभीष्ट लाधला ॥ तात्काळिक अवधारा ॥ ६६ ॥ ह्मणे सरस्वतीगंगाधर ॥ श्रीगुरुचरित्र मनोहर ॥ ऐकतां पावती पैलपार ॥ संसारसागर तरोनियां ॥ ६७ ॥ श्रीगुरुचरित्र ऐकतां ॥ लाभे सकळ परमार्था ॥ या कारणें ऐका ह्मणोनि समस्तां ॥ विनवीतसे नामधारक ॥ ६८ ॥ अमृताची असे माथणी ॥ स्वीकारितां भाविकजनीं ॥ धर्मार्थकाममोक्षसाधनीं ॥ हेचि कथा ऐकावी ॥ ६९ ॥ पुत्रपौत्रांची ज्यासी चाड ॥ तयांसी ही कथा असे गोड ॥ राहे लक्ष्मी स्थीर अखंड ॥ श्रवणमात्रें घरीं नांदे ॥ ७० ॥ चतुर्विध पुरुषार्थ ॥ लाधती श्रवणें

परमार्थ ॥ श्रीनृसिंहसरस्वती गुरुनाथ ॥ रक्षी त्याचे वंशोवंशीं ॥ ७१ ॥ ह्मणे सरस्वती गंगाधर ॥ श्रोतयांसी करी नमस्कार ॥ कथा ऐका मनोहर ॥ सकळाभीष्टें साधती ॥७२॥ मुख्य भाव कारण ॥ प्रेमें करितां श्रवण पठण ॥ निजध्यास आणि मनन ॥ प्रेमेंकरोनि साधिजे ॥ ७३ ॥ नृसिंहसरस्वती शंकर ॥ त्याचे चरणीं अर्पण साग्र ॥ त्याचेचि प्रसादें समग्र ॥ समस्त प्रजा सुखी असती ॥ ७४ ॥ ग्रंथ ठेवावा जतनीं ॥ शुद्धवस्त्रीं शुद्धमनीं ॥ नित्य पूजा करोनी ॥ गृहामाजी ठेवावा ॥ ७५ ॥ इति श्रीगुरुचरित्रामृत ॥ सिद्धनामधारकसंवाद अद्भुत ॥ गुरुसमाधीनाम विख्यात ॥ एकपंचाशत्तमोऽध्यायः ॥ ७६ ॥ इति श्रीगुरुचरित्रे नृसिंहसरस्वत्युपाख्याने सिद्धनामधारकसंवादे श्रीगुरुसमाधियोगोनाम एकपंचाशत्तमोऽध्यायः ॥ ५१ ॥ ओंव्यांची संख्या ७६ ॥



॥ श्रीगणेशाय नमः ॥ नामधारक विनवी सिद्धासी ॥ श्रीगुरु निघाले शैल्ययात्रेसी ॥ पुढें
कथा वर्तली कैसी ॥ तें विस्तारोन मज सांगावें ॥ १ ॥ सिद्ध ह्मणे शिष्योत्तमा ॥ काय
सांगूं सद्गुरुची महिमा ॥ आतां वर्णनाची सीमा ॥ परी गुरुभक्तिप्रेमा नावरे ॥२॥ श्रीगुरु
सिद्ध झाले जावयासी ॥ श्रीपर्वतीं यात्रा उद्देशीं ॥ हा वृत्तांत नागरीक जनांसी ॥
कळला परियेसीं तात्काळ ॥ ३ ॥ समस्त जन आले धांवत ॥ नरनारी सर्व मिळाल्या
बहुत ॥ गुरूसी प्रार्थिती अनेक भक्त ॥ श्रीपर्वतासी स्वामी कां जातां ॥ ४ ॥ आह्मांसी
भासतें व्यक्त ॥ तुह्मी अवतार करितां समाप्त ॥ निरंतर आपण असा अव्यक्त ॥ परी
जनासी सुव्यक्त दिसत होतां ॥५॥ तुमचे चरणाचें होतां दर्शन ॥ पातकांचें होतसे दहन ॥
आतां कैसें करतील जन ॥ ह्मणोनि लोटांगणें घालिती ॥ ६ ॥ पुढें आह्मांस काय गती ॥
आह्मीं तरावें कैशा रीती ॥ स्वामीचे चरण नौका होती ॥ तेणें पार उतरत होतों
॥ ७ ॥ तुह्मीं भक्तांस कामधेनुपरी ॥ कामना पुरवीत होतां बरी ॥ ह्मणोनि जगलों
आजवरी ॥ याउपरी आह्मीं काय करावें ॥ ८ ॥ स्वामीकरितां गाणगापुर ॥ झालें
होतें वैकुंठपुर ॥ आतां दीपाविणें जैसें मंदिर ॥ तैसें साचार होईल हें ॥ ९ ॥ माउली-
विणें जैसें तान्हें बाळ ॥ कीं देवाविणें देऊळ ॥ जळाविणें जैसें कमळ ॥ तैसें सकळ
तुह्मांविणें ॥ १० ॥ माता पिता सकळ गोत ॥ इष्टमित्र कुळदैवत ॥ सर्वही आमुचा गुरु-
नाथ ॥ ह्मणोनी काळ क्रमित होतों ॥११॥ आपुल्या बाळकांसी अव्हेरूनी ॥ कैसें जातां
स्वामी येथूनी ॥ अश्रुधारा लागल्या लोचनीं ॥ तळमळती सकळ जन ॥ १२ ॥ तेव्हां
गुरु समस्त जनांप्रती ॥ हास्यवदन करूनि बोलती ॥ तुह्मी जन हो मानूं नका खंती ॥

सांगतों यथास्थिती तें ऐका ॥ १३ ॥ आम्हीं असतों याचि ग्रामीं ॥ स्नानपान करूं अम-
रजासंगमीं ॥ गौप्यरूपें रहातों नियमीं ॥ चिंता कांहीं तुम्हीं न करावी ॥ १४ ॥ राज्य
झालें म्लेच्छाक्रांत ॥ आह्मीं भूमंडळीं विख्यात ॥ आमुचे दर्शनास बहु येथ ॥ यवन सतत
येतील पैं ॥ १५ ॥ तेणें प्रजेस होईल उपद्रव ॥ आह्मीं अदृश्य रहातों यास्तव ॥ ज्यास
असे दृढभक्ति भाव ॥ त्यास दृश्य स्वभावें होऊं ॥ १६ ॥ लौकिकामध्यें कळावयासी ॥
आह्मीं जातों श्रीशैल्यपर्वतासी ॥ चिंता न करावी मानसीं ॥ ऐसें समस्तांसीं संबोधिलें
॥ १७ ॥ मठीं आमुच्या ठेवितों पादुका ॥ पुरवितील कामना ऐका ॥ अश्वत्थवृक्ष आहे
निका ॥ तो सकळिकांचा कल्पतरू ॥ १८ ॥ कामना पुरवील समस्त ॥ संदेह न धरावा
मनांत ॥ मनोरथ प्राप्त होती त्वरित ॥ ही मात आमुची सत्य जाणा ॥ १९ ॥ संगमीं
करूनियां स्नान ॥ पूजोनि अश्वत्थनारायण ॥ मग करावें पादुकांचें अर्चन ॥ मनकामना
पूर्ण होतील ॥ २० ॥ विघ्नहर्ता विनायक ॥ आहे तेथें वरदायक ॥ तीर्थें असती अनेक ॥
पावाल तुह्मी सुख अपार ॥ २१ ॥ पादुकांची करूनि पूजा ॥ त्रिकाळ आरती करूनि
ओजा ॥ आमुचें वचन यथार्थ समजा ॥ ह्मणोनि द्विजांसी गुरु सांगती ॥ २२ ॥
आह्मीं येथेंच रहातों मठांत ॥ हें वचन जाणावें निश्चित ॥ ऐसें संबोधूनि जना आद्यंत ॥
निघाले त्वरित गुरुराज पैं ॥ २३ ॥ समागमें जे धांवले जन ॥ त्यांचें करूनि समाधान ॥
शिष्यांसहित त्वरित गतीनें ॥ गेले निघून श्रीगुरु ॥ २४ ॥ लोक माघारे परतले ॥ समस्त
गुरूच्या मठासीं आले ॥ तेथें समस्तांनीं गुरु देखिले ॥ बैसले होते निजासनीं ॥ २५ ॥
सर्वेंचि पाहतां झाले गुप्त ॥ जन मनीं परम विस्मित ॥ आह्मीं सोडूनि आलों मार्गांत ॥

येथें गुरुनाथ देखिले ॥ २६ ॥ सर्वव्यापी नारायण ॥ त्रैमूर्ती अवतार पूर्ण ॥ चराचरीं श्रीगुरु आपण ॥ भक्ताकारणें रूप धरिती ॥ २७ ॥ ऐसा दृष्टांत दावूनि जनांसी ॥ आपण गेले श्रीशैलासी ॥ पावले पाताळगंगेसी ॥ राहिले त्या दिवसीं तेथें ॥ २८ ॥ श्रीगुरु शिष्यांसी ह्मणती ॥ मल्लिकार्जुनासी जावोनि शीघ्रगती ॥ पुष्पांचें आसन यथास्थिती ॥ करूनि निगुती आणावें ॥ २९ ॥ शिष्य धांवले अतिशीघ्र ॥ पुन्नागादि कुंद कल्हार ॥ करवीर बकुळ चंपक मंदार ॥ पुष्पें अपार आणिलीं ॥ ३० ॥ त्या पुष्पांचें केलें दिव्यासन ॥ तें गंगाप्रवाहावरी केलें स्थापन ॥ त्यावरी श्रीगुरु आपण ॥ बैसले तेक्षणीं परमानंदें ॥ ३१ ॥ बहुधान्य संवत्सर माघमास ॥ कृष्णप्रतिपदा शुभ दिवस ॥ बृहस्पती होता सिंहराशीस ॥ उत्तरदिशे होता सूर्य पैं ॥ ३२ ॥ शिशिरऋतु कुंभसंक्रमण ॥ लग्नघटिका सुलक्षण ॥ ऐसे शुभ मुहूर्तीं गुरु आपण ॥ आनंदें प्रयाण करिते झाले ॥ ३३ ॥ मध्यें प्रवाहांत पुष्पासनीं ॥ बैसोनि शिष्यांस संबोधोनी ॥ आमुचा वियोग झाला ह्मणोनी ॥ तुह्मी मनीं खेद न मानावा ॥ ३४ ॥ त्या गाणगापुरांत ॥ आह्मी असतों पूर्ववत ॥ भावना दृढ धरा मनांत ॥ तुह्मां दृष्टांत तेथें होईल ॥ ३५ ॥ आम्ही जातों आनंदस्थानासी ॥ तेथें पावल्याची खूण तुह्मांसी ॥ फुलें येतील चवधांसी ॥ तुह्मांस तो प्रसाद ॥ ३६ ॥ पुष्पांचें करितां पूजन ॥ तुह्मां होईल देव प्रसन्न ॥ भक्तिभावें करावें जतन ॥ प्राणासमान मानूनी ॥ ३७ ॥ आणीक एक ऐका युक्ती ॥ जे कोणी माझें चरित्र गाती ॥ प्रीतीनें नामसंकीर्तन करिती ॥ ते मज प्रिय गमती फार ॥ ३८ ॥ मजपुढें करितील गायन ॥ जाणोनि रागरागिणी तनमनें ॥ चित्तीं भक्तिभाव धरून ॥ करिती कीर्तन परमानंदें ॥ ३९ ॥ ते

भक्त मज फार आवडती ॥ जे माझें कथामृत पान करिती ॥ त्यांचे घरीं मी श्रीपती ॥ वसतों प्रीतीनें अखंडित ॥४०॥ आमुचें चरित्र जो पठण करी ॥ त्यास लाभती पुरुषार्थ चारी ॥ सिद्धी सर्वही त्याच्या द्वारीं ॥ दासीपरी तिष्ठतील ॥ ४१ ॥ त्यासीं नाहीं यमाचें भय ॥ त्यास लाभ लाभे निश्चय ॥ पुत्रपौत्रांसहित अष्टैश्वर्य ॥ अनुभवोनि निर्भय पावे मुक्ती ॥ ४२ ॥ हें वचन मानी अप्रमाण ॥ तो भोगील नरक दारुण ॥ तो गुरुद्रोही जाण जन्ममरण ॥ दुःख अनुभवणें न सुटे त्यासी ॥ ४३ ॥ याकारणें असूंद्या विश्वास ॥ सुख पावाल बहुवस ॥ ऐसें सांगोनि शिष्यांस ॥ श्रीगुरु तेथूनि अदृश्य झाले ॥ ४४ ॥ शिष्य अवलोकिती गंगेंत ॥ तों दृष्टीं न देखती श्रीगुरुनाथ ॥ बहुत होवोनि चिंताक्रांत ॥ तेथें उभे तटस्थ झाले ॥ ४५ ॥ इतुकियां आला नावाडी तेथ ॥ तो शिष्यां सांगे वृत्तांत ॥ गंगेचे पूर्वतीरीं श्रीगुरुनाथ ॥ जात असतां म्यां देखिले ॥ ४६ ॥ आहे वेष संन्यासी दंडधारी ॥ काषायांबर वेष्टिलें शिरीं ॥ सुवर्णपादुका चरणामाझारीं ॥ कांति अंगावरी फांकतसे ॥ ४७ ॥ तुह्मांस सांगा ह्मणोनी ॥ गोष्टी सांगितली आहे त्यांनीं ॥ त्यांचें नांव नृसिंहमुनी ॥ ते गोष्टी कानीं आइका ॥ ४८ ॥ कलिकाळास्तव गुप्त होऊनी ॥ आपण असतों गाणगाभुवनीं ॥ तुह्मीं तत्पर असावें भजनीं ॥ ऐसें सांगा ह्मणोनी कथियलें ॥ ४९ ॥ प्रत्यक्ष पाहिलें मार्गांत ॥ तुह्मीं कां झालेत चिंताक्रांत ॥ पुष्पें येतील जळांत ॥ घेऊनि निरंतर रमावें ॥ ५० ॥ नावाडी यानें ऐसें कथिलें ॥ त्यावरूनि शिष्य हर्षले ॥ इतुकियांत गुरुप्रसाद फुलें ॥ आलीं प्रवाहांत वाहत ॥ ५१ ॥ तीं परमप्रसादसुमनें ॥ काढोनि घेतलीं शिष्यवर्गानें ॥ मग परतले आनंदानें ॥ गुरुध्यान मनीं करीत ॥ ५२ ॥ सिद्धासि ह्मणे ना-

मधारक ॥ पुष्पें किती आलीं प्रसादिक ॥ शिष्य किती होते प्रमुख ॥ तें मज साद्यंत सांगावें ॥ ५३ ॥ सिद्ध ह्मणे नामधारका ॥ तुवां भली घेतली आशंका ॥ धन्य ह्या तुझ्या विवेका ॥ होसी साधक समर्थ ॥ ५४ ॥ ख्यूण सांगतों ऐक आतां ॥ श्रीगुरु गाणगापुरीं असतां ॥ बहुत शिष्य होते गणितां ॥ नाठवती ते ये समयीं ॥५५॥ ज्यांनीं केला आश्रम-स्वीकार ॥ ते संन्यासी थोर थोर ॥ तीर्थें हिंडावया गेले फार ॥ कृष्ण बाळ सरस्वती प्रमुख ते ॥ ५६ ॥ जे शिष्य झाले गृहस्थ केवळ ॥ ते आपुल्या गृहीं नांदती सकळ ॥ ता-रक होते श्रीगुरुनाथ प्रबळ ॥ भक्त अपरिमित तारिले ॥५७॥ श्रीजगद्गुरूच्या समागमीं ॥ चौघेजण होतों आह्मी ॥ सायंदेव नंदी नरहरी मी ॥ श्रीगुरूची सेवा करीत होतों ॥५८॥ चौघांनीं घेतलीं पुष्पें चारी ॥ गुरुप्रसाद वंदिला शिरीं ॥ हीं पहा ह्मणोनि पुष्पें करीं ॥ घेऊनि झडकरी दाविलीं ॥ ५९ ॥ चौघांनीं चारी पुष्पांसीं ॥ मस्तकीं धरिलीं भावेंसीं ॥ आनंद वाटला नामधारकासी ॥ गुरुप्रसाद त्याचे दृष्टीं पडला ॥ ६० ॥ इति श्रीगुरुचरि-त्रामृत ॥ सिद्ध नामधारकासी सांगत ॥ श्रीगुरुप्रसाद प्राप्त ॥ द्विपंचाशत्तमोऽध्याय हा ॥ ६१ ॥ इति श्रीगुरुचरित्रामृते नरसिंहसरस्वत्युपाख्याने सिद्धनामधारकसंवादे श्रीगुरु-प्रसादप्राप्तिर्नाम द्विपंचाशत्तमोऽध्यायः ॥ ५२ ॥ ओंव्या ६१ ॥

॥ श्रीगणेशाय नमः ॥ श्रीगुरुदेवदत्तात्रयचरणारविंदाभ्यां नमः ॥ गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुः गुरुर्देवो महेश्वरः ॥ गुरुरेव परं ब्रह्म तस्मै श्रीगुरवे नमः ॥ श्रोते व्हावें सावधान ॥ गुरुचरित्राध्याय बावन ॥ ऐकोनि नामधारकाचें मन ॥ ब्रह्मानंदीं निमग्न पैं ॥ १ ॥ सेवूनि गुरुचरित्रामृत ॥ नामधारक तटस्थ होत ॥ अंगीं घर्म पुलकांकित ॥ रोमांचही उठती ॥ २ ॥ कंठ झाला सद्गदित ॥ गात्रें झालीं सकंपित ॥ विवर्ण भासे लोकांत ॥ नेत्रीं वाहती प्रेमधारा ॥ ३ ॥ समाधिसुखें न बोले ॥ देह अणुमात्र न हाले ॥ सात्विक अष्टभाव उदेले ॥ नामधारक शिष्याचे ॥ ४ ॥ देखोनि सिद्ध सुखावती ॥ समाधि लागली यासी ह्मणती ॥ सावध करावा मागुती ॥ लोकोपकारा कारणें ॥ ५ ॥ ह्मणोनि हस्तें कुरवाळिती ॥ प्रेमभावें आलिंगिती ॥ देहावरी ये ये ह्मणती ॥ ऐक बाळा शिष्योत्तमा ॥ ६ ॥ तूं तरलासी भवसागरीं ॥ रहासी ऐसा समाधिस्थ जरी ॥ ज्ञान राहील तुझ्या उदरीं ॥ लोक तरती कैसे मग ॥ ७ ॥ याकारणें अंतःकरणीं ॥ दृढता असावी श्रीगुरुचरणीं ॥ बाह्य देहाची रहाटणी ॥ शास्त्राधारें करावी ॥ ८ ॥ तुवां विचारिलें ह्मणोनि ॥ आह्मां आठवली अमृताची वाणी ॥ तापत्रयातें करी हानी ॥ ऐशी अनुपम्या प्रगटली ॥ ९ ॥ तुजमुळें आह्मां आठवलें ॥ तुवां आह्मां बरवें केलें ॥ त्वांही एकाग्रत्वें ऐकिलें ॥ आतां हेंचि विस्तारीं ॥ १० ॥ नामधारका ऐशियापरी ॥ सिद्ध सांगती परोपरी ॥ मग तो नेत्रोन्मीलन करी ॥ कर जोडोनी उभा ठाके ॥ ११ ॥ ह्मणे कृपेचें तारूं ॥ तूंचि या विश्वास आधारू ॥ भवसागर पैलपारू ॥ तूंचि करिसी श्रीगुरुराया ॥१२॥ ऐसें नामधारक विनवित ॥ सिद्धाचे चरणीं लागत ॥ ह्मणे श्रीगुरुचरितामृत अवतरणिक ॥ मज सांगा ॥ १३ ॥ या श्रीगुरु-

चरित्रामृतीं ॥ अमृताहूनि परमातृप्ती ॥ भक्तजनाची मनोवृत्ती ॥ बुडी देवोनि स्थिरावली ॥१४॥ मी अतृप्त आहें अजूनी ॥ हेंचि कथा पुनः सुचवोनि ॥ अक्षयामृत पाजूनी ॥ आनंदसागरीं मज ठेवा ॥ १५ ॥ बहु औषधींचें सार काढोन ॥ त्रैलोक्यचिंतामणी रसायण ॥ संग्रह करिती विचक्षण ॥ तैसें सार मज सांगा ॥ १६ ॥ ऐकोनी शिष्याची प्रार्थना ॥ आनंद सिद्धाचिया मना ॥ ह्मणती बालका तुझी वासना ॥ अखंड राहो श्रीगुरुचरित्रीं ॥ १७ ॥ श्रीगुरुचरित्राची ऐका ॥ सांगेन आतां अवतरणिका ॥ प्रथमापासूनि सारांश निका ॥ बावन्नाध्यायपर्यंत ॥ १८ ॥ प्रथमाध्यायीं मंगलाचरण ॥ मुख्य देवतांचें स्मरण ॥ श्रीगुरुमूर्तीचें दर्शन ॥ भक्ताप्रती जाहलें ॥ १९ ॥ द्वितीयाध्यायीं ब्रह्मोत्पत्ती ॥ चारी युगांचे भाव कथिती ॥ श्रीगुरुसेवा दीपकाप्रती ॥ घडली ऐसें कथियेलें ॥ २० ॥ नामधारका अमरजासंगमा ॥ श्रीगुरु नेतील आपुले धामा ॥ अंबरीष दुर्वास यांचा महिमा॥ तृतीयाध्यायीं कथियेला ॥ २१ ॥ चतुर्थाध्यायीं अनसूयेप्रती ॥ छळावया त्रैमूर्ती येती ॥ परी तियेचे पुत्र होती ॥ स्तनपान करिती आनंदें ॥ २२ ॥ पंचमीं श्रीदत्तात्रय धरी ॥ स्वयें अवतार पीठापुरीं ॥ श्रीपाद श्रियावल्लभधारी ॥ तीर्थयात्रेसीं निघाले ॥२३॥ सह्याद्र्यांत लिंग घेऊनी ॥ रावण जातां गोकर्णीं ॥ विघ्नेश्वरें विघ्न करूनी ॥ स्थापना केली तयाची ॥ २४ ॥ गोकर्णमहिमा असंख्यात ॥ रायाप्रती गौतम सांगत ॥ चांडाळी उद्धरिली अकस्मात ॥ सातव्या अध्यायीं वर्णिती ॥ २५ ॥ मातापुत्र जीव देत होतीं ॥ तयांप्रति गुरु कथा सांगती ॥ शनिप्रदोषव्रत देती ॥ ज्ञानी करिती अष्टमीं ॥ २६ ॥ नवमाध्यायीं रजकाप्रती ॥ कृपाळू गुरु राज्य देती ॥ दर्शन देऊं ह्मणती पुढती ॥ गुप्त झाले मग

तेथें ॥ २७ ॥ तस्करीं मारिला भक्त ब्राह्मण ॥ तस्करां वधिती श्रीगुरु येऊन ॥ ब्राह्मणाला
प्राणदान ॥ देती दशमाध्यायांत ॥ २८ ॥ माधव ब्राह्मण करंजपुरीं ॥ अंबा नामें त्याची
नारी ॥ नरसिंहसरस्वती तिचे उदरीं ॥ एकादशीं अवतरले ॥२९॥ द्वादशाध्यायीं मातेप्रती ॥
ज्ञान कथूनी पुत्र देती ॥ काशीक्षेत्रीं संन्यास घेती ॥ यात्रा करिती उत्तरेचीं ॥ ३० ॥
माता पित्यांतें करंजपुरीं ॥ भेटोनी येती गोदातीरीं ॥ कुक्षिव्यथेच्या विप्रावरी ॥ कृपा
करिती त्रयोदशीं ॥ ३१ ॥ क्रूर यवनाचें करूनि शासन ॥ सायंदेवास वरदान ॥ देती श्री-
गुरु कृपा करून ॥ चौदाविया अध्यायीं ॥ ३२ ॥ पंचदशीं श्रीगुरुमूर्ती ॥ तीर्थें सांगती
शिष्याप्रती ॥ यात्रे दवडूनी गुप्त होती ॥ वैजनाथीं श्रीगुरू ॥ ३३ ॥ षोडशीं ब्राह्मणा गुरु-
भक्ती ॥ कथूनी दीधली ज्ञानशक्ती ॥ श्रीगुरु आले भिल्लवडीप्रती ॥ भुवनेश्वरीसन्निध
॥ ३४ ॥ भुवनेश्वरीला मूर्ख ब्राह्मण ॥ जिव्हा छेदोनी करी अर्पण ॥ त्यास श्रीगुरूंनीं
विद्या देऊन ॥ धन्य केला सप्तदशीं ॥ ३५ ॥ घेवडा उपटूनी दरिद्रियाचा ॥ कुंभ दिधला
हेमाचा ॥ वर्णिला प्रताप श्रीगुरूचा ॥ अष्टादशाध्यायांत ॥ ३६ ॥ औदुंबराचें करूनि व-
र्णन ॥ योगिनींस देऊनि वरदान ॥ गाणगापुरास आपण ॥ एकुणविशीं श्रीगुरु गेले ॥३७॥
सिद्ध-
स्त्रियेचा समंध दवडून ॥ पुत्र दिधले तिजला दोन ॥ एक मरतां कथिती ज्ञान ॥ सिद्ध-
रूपें विसाव्यांत ॥ ३८ ॥ तेचि कथा एकविंशीं ॥ प्रेत आणिलें औदुंबरापाशीं ॥ श्रीगुरु
येऊनी जेथें निशी ॥ पुत्र उठविती कृपाळू ॥ ३९ ॥ भिक्षा दरिद्र्याघरीं घेती ॥ त्याची
वंध्या महिषी होती ॥ तीस करून दुग्धवती ॥ बावीसाव्यांत वर दिधला ॥ ४० ॥ तेवीसा-
व्यांत श्रीगुरूस ॥ राजा नेई गाणगापुरास ॥ तेथें उद्धरती राक्षस ॥ त्रिविक्रम करी गु-

रुसिंदा ॥ ४१ ॥ भेटों जाती त्रिविक्रमा ॥ दाविती विश्वरूपमहिमा ॥ विप्र लागे गुरुपादप-
द्मा ॥ चोविसाव्यांत वर देती ॥४२॥ म्लेच्छापुढें वेद ह्मणती ॥ विप्र ते त्रिविक्रमा छळती ॥
त्याला घेऊनी सांगातीं ॥ गुरुपासीं आला पंचविशीं ॥४३॥ सव्विसाव्यांत तया ब्राह्मणा ॥
श्रीगुरु सांगती वेदरचना ॥ त्यागा ह्मणती वादकल्पना ॥ परी ते उन्मत्त नायकती॥४४॥
सत्ताविशीं आणूनि पतिता ॥ विप्रांसी वेदवाद करितां ॥ कुंठित होऊनी शापग्रस्ता ॥ ब्रह्म-
राक्षस त्यां केलें ॥४५॥ अष्टविंशीं तया पतिता ॥ धर्माधर्म सांगोनि कथा ॥ पुनरपि देऊ-
नि पतितावस्था ॥ गृहाप्रती दवडिला ॥४६॥ एकोनत्रिंशीं भस्मप्रभाव ॥ त्रिविक्रम कथितां
गुरुराव ॥ राक्षसा उद्धरी वामदेव ॥ हा इतिहास तयांतची ॥४७॥ त्रिंशाध्यायीं पति मरतां ॥
तयाची स्त्री बहु करी आकांता ॥ तीस श्रीगुरु नाना कथा ॥ कथूनी शांतवूं पाहती ॥ ४८ ॥
एकतिसाव्यांत तेंचि कथा ॥ पतिव्रतेचे धर्म सांगतां ॥सहगमन प्रकार बोधितां ॥ ते स्त्रियेतें
जगद्गुरू॥४९॥सहगमनीं निघतां सती ॥ श्रीगुरूस झाली नमस्कारिती ॥ आशीर्वाद देवोनी
तिचा पती ॥ बत्तिसाव्यांत उठविला ॥ ५० ॥ तेहतिसाव्यांत रुद्राक्षधारण ॥ कथा कुक्कुट
मर्कट दोघेजण ॥ वैश्य वेश्येचें कथन ॥ करिती रायातें परस्पर ॥ ५१ ॥ रुद्राध्याय महि-
मावर्णन ॥ चौतिसाव्यांत निरूपण ॥ राजपुत्र केला संजीवन ॥ नारद भेटले रायातें
॥ ५२ ॥ पंचविंशत्प्रसंगांत ॥ कचदेवयानीकथा वर्तत ॥ आणिक सोमवारव्रत ॥ सीमं-
तिनीच्या प्रसंगें ॥ ५३ ॥ छत्तिशीं ब्रह्मनिष्ठ ब्राह्मण ॥ स्त्रियेनें नेलें परान्नभोजना ॥ कंटा-
ळूनी धरिती श्रीगुरुचरणा ॥ त्याला कर्ममार्ग सांगती ॥ ५४ ॥ सप्तत्रिंशीं नाना धर्म ॥
विप्रां सांगोनि ब्रह्मकर्म ॥ प्रसन्न होऊनि वर उत्तम ॥ देती श्रीगुरु तयातें ॥ ५५ ॥ अष्ट-

निशीं भास्कर ब्राह्मण ॥ तिघांपुरतें शिजवी अन्न ॥ जेविले बहु ब्राह्मण ॥ आणिक गांवचे
शूद्रादी ॥ ५६ ॥ सोमनाथाची गंगा युवती ॥ साठ वर्षांची वंध्या होती ॥ तीस दिधली
पुत्रसंतती ॥ एकुणचाळिसावे अध्यायीं ॥ ५७ ॥ नरहरीकरवीं शुष्ककाष्ठा ॥ अर्चे-
वूनी दवडिलें त्याच्या कुष्टा ॥ शबरकथा शिष्य वरिष्ठा ॥ चाळिसाव्यांत सांगती
॥ ५८ ॥ एकेचाळिशीं सायंदेवा ॥ हस्तें घेती श्रीगुरुसेवा ॥ ईश्वरपार्वतीसंवाद बरवा ॥
काशियात्रा निरूपण ॥ ५९ ॥ पुत्रकलत्रेसीं सायंदेव ॥ येऊनी करितीं श्रीगुरुस्तव ॥
त्याला कथिती यात्राभाव ॥ वरही देती बेचाळिसीं ॥ ६० ॥ त्रेचाळिसीं अनंतव्रत ॥
धर्मराया कृष्ण सांगत ॥ तेंचि कथा सायंदेवाप्रत ॥ सांगोनी व्रत करविती ॥ ६१ ॥
चवेचाळिसीं तंतुकार भक्तांसीं ॥ श्रीपर्वत दावूनी क्षणेंसीं ॥ शिवरात्री पुण्यकथा त्यासी ॥
विमर्षण राजाची कथियेली ॥ ६२ ॥ पंचेचाळिसीं कुष्टी ब्राह्मण ॥ आला तुळजापुरा-
हून ॥ त्याला करवूनी संगमीं स्नान ॥ कुष्ट नासून ज्ञान देती ॥ ६३ ॥ कल्लेश्वर हिपरगे
ग्रामास ॥ श्रीगुरु भेटती नरहरी कवीस ॥ आपुला शिष्य करविती त्यास ॥ शेचाळि-
सावे अध्यायीं ॥ ६४ ॥ सत्तेचाळिसीं दिवाळी सण ॥ गुरूसी आमंत्रिती सातजण ॥
तितुकीं रूपें धरूनि आपण ॥ गेले मठींही राहिले ॥ ६५ ॥ अठ्ठेचाळिशीं शूद्र शेतीं ॥
त्याचा जोंधळा कापूनी टाकिती ॥ शतगुणें पिकवूनी पुढती ॥ आनंदिलें तयातें ॥ ६६ ॥
एकोनपंचाशतीं श्रीगुरुमूर्ती ॥ अमरजासंगम माहात्म्य कथिती ॥ आणिकही तेथें
सांगती ॥ कुष्ट दैवार्जितीं रत्नाबाईचें ॥ ६६ ॥ म्लेच्छाचा स्फोटक दवडिती ॥ भक्तीस्तव
त्याचे नगरा जाती ॥ पुढें श्रीपर्वतीं भेटों ह्मणती ॥ पन्नासावे अध्यायीं ॥ ६८ ॥ एकाव-

त्रयावर्मात गुरुमूर्ती ॥ देखूनियां क्षितीं पापप्रवृत्ती ॥ उपद्रवितील नाना याती ॥ म्हणोनि
गुप्तरूपें रहावें ॥ ६९ ॥ ऐसा करूनि निर्धार ॥ शिष्यांसीं सांगती गुरुवर ॥ आजि
आह्मी जाऊं पर्वतावर ॥ मल्लिकार्जुन यात्रेसीं ॥ ७० ॥ ऐसें ऐकूनि भक्तजन ॥ मनीं होती
अति उद्विग्न ॥ शोक करिती आक्रंदोन ॥ श्रीगुरुचरणीं लोळती ॥ ७१ ॥ इतुकें पाहूनि
गुरुमूर्ती ॥ वरदहस्तें तयां कुरवाळिती ॥ मद्भजनीं धरा आसक्ती ॥ मठधामीं राहोनियां
॥ ७२ ॥ ऐसें बोधूनि शिष्यांसी ॥ गुरु गेले कर्दळीवनासीं ॥ नाविकमुखें सांगूनि
गोष्टीसी ॥ निजानंदीं निमग्न होती ॥ ७३ ॥ ऐसें अपार श्रीगुरुचरित्र ॥ अनंत कथा परम
पवित्र ॥ त्यांतील बावन्न अध्याय मात्र ॥ प्रस्तुत कथिले तुजलागीं ॥ ७४ ॥ सिद्ध म्हणे
नामधारका ॥ तुज कथिली अवतरणिका ॥ श्रीगुरु गेले वाटती लोकां ॥ गुरु गुप्त असती
गाणगापुरीं ॥ ७५ ॥ कलियुगीं अधर्मवृद्धि पावले ॥ म्हणोनि श्रीगुरु गुप्त झाले ॥ भक्तज-
नांला जैसे पहिले ॥ तैसेच भेटती अद्यापि ॥७६॥ हे अवतरणिका सिद्धमाला ॥ श्रीगुरु भे-
टती जपे त्याला ॥ जैसा भावार्थ असे आपुला ॥ तैसीं कार्यें संपादिती ॥७७॥ नामधारका
तूं शिष्य भला ॥ अवतरणिकेचा प्रश्न केला ॥ म्हणोनि इतिहास सारांशाला ॥ पुनः वदलों
सच्छिष्या ॥ ७८॥ पूर्वीं ऐकिलें असेल कानीं ॥ त्यातें तात्काळ येईल ध्यानीं ॥ इतरां इच्छा
होईल मनीं ॥ श्रीगुरुचरित्र श्रवणाची ॥ ७९ ॥ ऐशी हीं अवतरणिका जाण ॥ तुज कथिली
कथांची खूण ॥ इचें सतत करितां स्मरण ॥ कथा अनुक्रमें स्मरतसे ॥ ८० ॥ ऐसें वदे सिद्ध-
मुनी ॥ नामधारक लागे चरणीं ॥ विनवीतसे कर जोडोनी ॥ तुझे वचनीं सर्व सिद्धी ॥८१॥
आतां असे विनवणी ॥ श्रीगुरु सप्ताह पारायणीं ॥ किती वाचावे प्रतिदिनीं ॥ हें मज सांगा

श्रीगुरुराया ॥ ८२ ॥ सिद्ध ह्मणती नामधारका ॥ तुवां प्रश्न केला निका ॥ परोपकार होईल लोकां ॥ तुझ्या प्रश्नें करूनियां ॥८३॥ अंतःकरण असतां पवित्र ॥ सदाकाळ वाचावें गुरुचरित्र ॥ सौख्य होय इहपरत्र ॥ दुसरा प्रकार सांगेन ॥८४॥ सप्ताह वाचावयाची पद्धति ॥ तुज सांगों यथास्थिती ॥ शुचिर्भूत होवोनी शास्त्ररीतीं ॥ सप्ताह करितां बहु पुण्य ॥ ८५ ॥ दिनशुद्धी बरवी पाहून ॥ आवश्यक स्नानसंध्या करून ॥ पुस्तक वाचावयाचें स्थान ॥ रंगवल्यादि शोभा करावी ॥८६॥ देशकालादि संकल्प करून ॥ पुस्तकरूपी श्रीगुरूचें पूजन ॥ यथोपचारें करून ॥ ब्राह्मणासहीं पूजावें ॥८७॥ प्रथम दिवसापासोन ॥ बसावया असावें एक स्थान ॥ अतत्वार्थ भाषणीं धरावें मौन ॥ कामादि नियम राखावे ॥८८॥ दीप असावे शोभायमान ॥ देव ब्राह्मण वडिलां वंदून ॥ पूर्वोत्तर मुख करून ॥ वाचनीं आरंभ करावा ॥ ८९ ॥ नवसंख्या अध्याय प्रथम दिनीं ॥ एकविंशतीपर्यंत द्वितीय दिनीं ॥ एकोनत्रिंशतृतीय दिनीं ॥ चतुर्थ दिवशीं पंचतीस ॥ ९० ॥ अडतीसपर्यंत पांचवे दिनीं ॥ त्रेचाळीसवरी सहावे दिनीं ॥ सप्तमीं बावन्न वाचोनी ॥ अवतरणिका वाचावी ॥ ९१ ॥ नित्य पाठ होतां पूर्ण ॥ करावें उत्तरांग पूजन ॥ श्रीगुरूतें नमस्कारून ॥ उपहार कांहीं करावा ॥९२॥ याप्रकारें सप्त दिन ॥ रात्रीं करावें भूमीशयन ॥ सारांश शास्त्राधारेंकरून ॥ शुचिर्भूत असावें ॥९३॥ एवं होतां सप्त दिन ॥ ब्राह्मण सुवासिनी भोजन ॥ यथाशक्त्या दक्षिणा देऊन ॥ सर्व संतुष्ट करावे ॥९४॥ ऐसें सप्ताह अनुष्ठान ॥ करितां होय श्रीगुरुदर्शन ॥ भूतप्रेतादि बाधानिरसन ॥ होवोनि सौख्य होतसे ॥९५॥ ऐसें सिद्धाचें वचन ऐकोनी ॥ नामधारक लागे चरणीं ॥ ह्मणे बाळाची आळी पुरवोनी ॥ कृतकृत्य केलें गुरुराया ॥ ९६ ॥ श्रोते ह्मणती

वंदूनि पायीं ॥ श्रीगुरु केली बहु नवलाई ॥ बाळका अमृत पाजी आई ॥ तैसें आह्मां पाजिलें ॥ ९७ ॥ प्रति अध्याय एक ओंवी ॥ ओंविली रत्नमाळा बरवी ॥ मनाचे कंठीं घालितां पदवी ॥ सर्वार्थासी पाववीत ॥ ९८ ॥ सिद्धाचें वचन रत्नखाणी ॥ त्यांतलीं नामधारक रत्नें आणी ॥ बावन्न भरोनि रांजणी ॥ भक्तयाचकां तोषविलें ॥ ९९ ॥ किंवा सिद्ध हा कल्पतरू ॥ नामधारकें पसरिला करू ॥ यांचा करोनि परोपकारू ॥ भक्तांकरितां बहु केला ॥ १०० ॥ किंवा सिद्धमुनी बलाहक ॥ नामधारक शिष्यचातक ॥ मुख पसरोनि बिंदु एक ॥ मागतां अपार वर्षला ॥ १ ॥ तेणें भक्तां अभक्तां फुकाचा ॥ सकळां लाभ झाला अमृताचा ॥ हृदयकोशीं खळजनांचा ॥ पाषाण समयीं पाझरे ॥२॥ श्रीगुरुरायाचे धरूं चरण ॥ सिद्धमुनीतें करूं वंदन ॥ नामधारका करूं नमन ॥ ऐसें करी नारायणा ॥ ३ ॥ श्रीगुरुरूपी नारायणा ॥ विश्वंभर दीनोद्धारणा ॥ आपण आपुली दावूनी खुणा ॥ गुरुशिष्यरूपें क्रीडसी ॥ ४ ॥ इति श्रीगुरुचरित्रामृते नृसिंहसरस्वत्युपाख्याने सिद्धनामधारकसंवादे द्विपंचाशदध्यायसारे अवतरणिकानाम त्रिपंचाशत्तमोऽध्यायः ॥ ओंव्या १०४ ॥ श्रीगुरुदत्तात्रेयार्पणमस्तु ॥ श्रीगुरुचरितं समाप्तं ॥ एकंदर ग्रंथसंख्या ७३०० ॥

मिति आषाढ शु. ११ शके १८३८ इंदुवार.
पुणें येथें आर्यभूषण छापखान्यांत हरि नारायण गोखले
यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

॥ आरती ॥

॥ त्रिगुणात्मकत्रैमूर्ती दत्त हा जाणा ॥ त्रिगुण अवतार त्रैलोक्यराणा ॥ नेति नेति शब्द नये अनुमाना ॥ सुरवर मुनिजनयोगी समाधिलें ध्याना ॥ जयदेव जयदेव जय सद्गुरुदत्ता ॥ आरती ओंवाळीतां हरती भवचिंता ॥ जयदेव० ॥१॥ सबाह्य अभ्यंतरीं तूं एक दत्त ॥ अभाग्यासी कैसी नकळे ही मात ॥ परा हीं परतली कैंचा हा हेत ॥ जन्ममरणाचा पुरलासे अंत ॥ जय० ॥ २ ॥ दत्त दत्त ऐसें लागलें ध्यान ॥ हरपलें मन झालें उन्मन ॥ मींतूंपणाची झाली ओंसण ॥ एका जनार्दनीं श्रीदत्तध्यान ॥ जय० ॥ ३ ॥

॥ कृष्णा पंचगंगासंगम निजस्थान ॥ चरित्र दावूनि केलें गाणगापुर गहन ॥ तेथें भक्त श्रेष्ठ त्रिविक्रमयति जाण ॥ विश्वरूपें तया दिधलें दर्शन ॥ जयदेव जयदेव जय सद्गुरुदत्ता ॥ नृसिंहसरस्वत्या जय विश्वंभरिता ॥ जय० ॥१॥ वंध्या साठीवर्षें पुत्रनिधान ॥ मृतब्राह्मण उठविला तीर्थ शिंपून ॥ वांझमहिषी काढवी दुग्ध दोहून ॥ अंत्यजाचे मुखीं निगम संपूर्ण ॥ जय०॥२॥ शुष्ककाष्ठीं पल्लव दावुनि लवलाहीं ॥ कुष्टी ब्राह्मण केला साधू निजदेहीं ॥ अभिनव लीला त्याची वर्णूं मी कायी ॥ म्लेच्छराजा येउनि वंदी तवपायीं ॥ जय० ॥३॥ दिपवाळीचे दिवसीं भक्त येऊनी ॥ आठहिजण मस्तक ठेविति तवचरणीं ॥ आठहि ग्रामीं भिक्षा केली ते दीनीं ॥ निमिषमात्रें तंतुक नेला शिवचरणीं ॥ जय० ॥४॥ ऐसें चरित्र दावुनि जडमूढ उद्धरिले ॥ भक्तवत्सल ऐसें ब्रीद मिरवीलें ॥ अगाधमहिमा ह्मणुनि वेदश्रुति बोले ॥ गंगाधरतनय वंदी पाऊलें ॥ जयदेव जयदेव जय सद्गुरुदत्ता ॥ नृसिंहसरस्वत्या जय० ॥ ५ ॥

॥ श्रीगुरुचरित्र समाप्तः ॥

॥ श्रीगुरुचरित्र समाप्तः ॥

अद्ये॰ र्थं श्रौतस्मार्तकर्मानुष्ठानसि
ध्यर्थं यज्ञोपवीतसंस्कारमहं करिष्ये

१

॥ श्रीगणेशाय नमः ॥ यज्ञोपवीतमंत्रप्रारंभः ॥

ॐ पवमानः सुवर्जनः । पवित्रेण विचर्षणिः । यः
पोता स पुनातु मा । पुनंतु मा देवजनाः । पुनंतु मनवो
धिया । पुनंतु विश्व आयवः । जातवेदः पवित्रवत् । प
वित्रेण पुनाहि मा । शुक्रेण देव दीद्यत् । अग्ने क्रत्वा
क्रतूं ॥ रनु । यत्ते पवित्रमर्चिषि । अग्ने विततमंतरा ।
ब्रह्म तेन पुनीमहे । उभाभ्यां देव सवितः । पवित्रेण स

वेनचा। इदं ब्रह्मपुनीमहे। वैश्वदेवी पुनती देव्यागात्॥
यस्यै बह्वीस्तनुवो वीतपृष्ठाः। तया मदन्तः सधमा
द्येषु। वयꣳ स्याम पतयो रयीणां॥२॥ वैश्वानरो र
श्मिभिर्मा पुनातु। वातः प्राणेनेषिरो मयो भूः। द्या
वापृथिवी पयसा पयोभिः। ऋतावरी यज्ञियेपुनीतां।
बृहद्भिः सवितस्त्रभिः। वर्षिष्ठैर्देवमन्मभिः। अग्ने दक्षैः
पुनाहि मा। येन देवा अपुनत। येनापो दिव्यं कशः
तेन दिव्येन ब्रह्मणा॥३॥

२ इदंब्रह्मपुनीमहे।यःपावमानीरध्येति।ऋषिभिः
संभृतंरसं।सर्वंसपूतमश्नाति।स्वदितंमात
रिश्वना।।पावमानीर्योअध्येति।ऋषिभिःसंभृतंर
सं।तस्मैसरस्वतीदुहे।क्षीरंसर्पिर्मधूदकं।पावमा
नीःस्वस्त्ययनीः।४।सुदुघाहिपयस्वतीः।ऋषिभिः
संभृतोरसः।ब्राह्मणेष्वमृतंहितं।पावमानीर्दिशं
तुनः।इमंलोकमथोअमुं।कामान्समर्धयंतुनः।।

देवीर्देवैः समामृताः। पावमानी स्वस्त्ययनीः ॥ सु
दुघाहिपयस्वुतः। ऋषिभिः संभृतो रसः। ८। ब्रा
ह्मणेष्वमृतं हितं। येन देवाः पवित्रेण। आत्मा
नं पुनते सदा। तेन सहस्रधारेण। पावमान्यः पुन
तु मा। प्राजापत्यं पवित्रं। शतोद्याम हिरण्मयं।
तेन ब्रह्मविदो वयं। पूतं ब्रह्म पुनीमहे। इंद्रः सुनी
तीसह मा पुनातु। सोमः स्वस्त्या वरुणः समीच्या॥

३

यमो राजा जमृणाभिः पुनातु म। जातवेदा मौञ्जि यंत्या पुनातु। ६॥ गायत्र्या चाभिषिच्य वामहस्ते कृत्वा त्रिः संताड्य। भूरग्निं च पृथिवीं च मां च त्रीं श्च लोकान् संवत्सरं च। प्रजापतिस्त्वा सादयतु। तया देवतयांगिरस्वद्ध्रुवासि दं॥ भुवो वायुं चांतरिक्षं च मां च। स्वरादित्यं च दिवं च मां च॥ भूर्भुवः स्वश्चंद्रमसं च दिशश्च मां च। इति चतुर्थे॥

ॐकारं प्रथमं तंतौन्यसामि। ॐअग्निं द्वितीयं तं
तौन्य०। नागान् तृतीयं तंतौन्य०। सोमं चतुर्थं तंतौ
न्य०। पितॄन् पंचमं तंतौन्य०। प्रजापतिं षष्ठं तंतौन्य०
वायुं सप्तमं तंतौन्य० सूर्यं अष्टमं तंतौन्य० विश्वा
न्देवान् नवमं तंतौन्य० देवस्येति आदाय॥
ॐउद्वयं तमसस्परि पश्यंतो ज्योतिरुत्तरं। देवं
देवत्रा सूर्यमगन्म ज्योतिरुत्तमं॥ उदित्यं जातवे

मित्रस्य

४

दसं देवं वहंति केतवः। दृशे विश्वाय सूर्यं॥ चित्रं
देवानामुदगादनीकं चक्षुर्वरुणस्याग्नेः॥ आ
प्रा द्यावापृथिवीअंतरिक्षं सूर्य आत्मा जग
तस्तस्थुषश्च। अद्येऽर्थ श्रौतस्मार्तकर्मानुष्ठा
नसिध्यर्थं यज्ञोपवीतधारणमहं करिष्ये॥ यज्ञो
पवीतं परमं पवित्रं प्रजापतेर्यत्सहजं पुरस्तात्
आयुष्यमग्र्यं प्रतिमुंच शुभ्रं यज्ञोपवीतं बलमस्तु
तेजः

इति यज्ञोपवीतं मंत्रावृत्तिः धारयेत् । दश
गायत्रीजपः शाके १८१० सर्वधारीसंवत्सरे
आश्विने शुद्धे १३ बुधे रामकृष्णपटवर्धनेन
लिखित्वा कृष्णशर्मे भट्टोपनाम्ने समर्पितं ॥
श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ७ ॥ शुभं भवतु श्रीरस्तु

[OrderDescription]
,CREATED=07.08.20 11:44
,TRANSFERRED=2020/08/07 at 14:51:35
,PAGES=540
,TYPE=STD
,NAME=S0003441
,Book Name=M-2511-SHRIGURU CHARITRA
,ORDER_TEXT=
,[PAGELIST]
,FILE1=00000001.TIF
,FILE2=00000002.TIF
,FILE3=00000003.TIF

FILE4=00000004.TIF
,FILE5=00000005.TIF
,FILE6=00000006.TIF
,FILE7=00000007.TIF
,FILE8=00000008.TIF
,FILE9=00000009.TIF
,FILE10=00000010.TIF
,FILE11=00000011.TIF
,FILE12=00000012.TIF
,FILE13=00000013.TIF
,FILE14=00000014.TIF
,FILE15=00000015.TIF

FILE16=00000016.TIF
,FILE17=00000017.TIF
,FILE18=00000018.TIF
,FILE19=00000019.TIF
,FILE20=00000020.TIF
,FILE21=00000021.TIF
,FILE22=00000022.TIF
,FILE23=00000023.TIF
,FILE24=00000024.TIF
,FILE25=00000025.TIF
,FILE26=00000026.TIF
,FILE27=00000027.TIF

FILE28=00000028.TIF
,FILE29=00000029.TIF
,FILE30=00000030.TIF
,FILE31=00000031.TIF
,FILE32=00000032.TIF
,FILE33=00000033.TIF
,FILE34=00000034.TIF
,FILE35=00000035.TIF
,FILE36=00000036.TIF
,FILE37=00000037.TIF
,FILE38=00000038.TIF
,FILE39=00000039.TIF

FILE40=00000040.TIF
,FILE41=00000041.TIF
,FILE42=00000042.TIF
,FILE43=00000043.TIF
,FILE44=00000044.TIF
,FILE45=00000045.TIF
,FILE46=00000046.TIF
,FILE47=00000047.TIF
,FILE48=00000048.TIF
,FILE49=00000049.TIF
,FILE50=00000050.TIF
,FILE51=00000051.TIF

FILE52=00000052.TIF
,FILE53=00000053.TIF
,FILE54=00000054.TIF
,FILE55=00000055.TIF
,FILE56=00000056.TIF
,FILE57=00000057.TIF
,FILE58=00000058.TIF
,FILE59=00000059.TIF
,FILE60=00000060.TIF
,FILE61=00000061.TIF
,FILE62=00000062.TIF
,FILE63=00000063.TIF

FILE64=00000064.TIF
,FILE65=00000065.TIF
,FILE66=00000066.TIF
,FILE67=00000067.TIF
,FILE68=00000068.TIF
,FILE69=00000069.TIF
,FILE70=00000070.TIF
,FILE71=00000071.TIF
,FILE72=00000072.TIF
,FILE73=00000073.TIF
,FILE74=00000074.TIF
,FILE75=00000075.TIF

FILE76=00000076.TIF
,FILE77=00000077.TIF
,FILE78=00000078.TIF
,FILE79=00000079.TIF
,FILE80=00000080.TIF
,FILE81=00000081.TIF
,FILE82=00000082.TIF
,FILE83=00000083.TIF
,FILE84=00000084.TIF
,FILE85=00000085.TIF
,FILE86=00000086.TIF
,FILE87=00000087.TIF

FILE88=00000088.TIF
,FILE89=00000089.TIF
,FILE90=00000090.TIF
,FILE91=00000091.TIF
,FILE92=00000092.TIF
,FILE93=00000093.TIF
,FILE94=00000094.TIF
,FILE95=00000095.TIF
,FILE96=00000096.TIF
,FILE97=00000097.TIF
,FILE98=00000098.TIF
,FILE99=00000099.TIF

FILE100=00000100.TIF
,FILE101=00000101.TIF
,FILE102=00000102.TIF
,FILE103=00000103.TIF
,FILE104=00000104.TIF
,FILE105=00000105.TIF
,FILE106=00000106.TIF
,FILE107=00000107.TIF
,FILE108=00000108.TIF
,FILE109=00000109.TIF
,FILE110=00000110.TIF
,FILE111=00000111.TIF

FILE112=00000112.TIF
,FILE113=00000113.TIF
,FILE114=00000114.TIF
,FILE115=00000115.TIF
,FILE116=00000116.TIF
,FILE117=00000117.TIF
,FILE118=00000118.TIF
,FILE119=00000119.TIF
,FILE120=00000120.TIF
,FILE121=00000121.TIF
,FILE122=00000122.TIF
,FILE123=00000123.TIF

FILE124=00000124.TIF
,FILE125=00000125.TIF
,FILE126=00000126.TIF
,FILE127=00000127.TIF
,FILE128=00000128.TIF
,FILE129=00000129.TIF
,FILE130=00000130.TIF
,FILE131=00000131.TIF
,FILE132=00000132.TIF
,FILE133=00000133.TIF
,FILE134=00000134.TIF
,FILE135=00000135.TIF

FILE136=00000136.TIF
,FILE137=00000137.TIF
,FILE138=00000138.TIF
,FILE139=00000139.TIF
,FILE140=00000140.TIF
,FILE141=00000141.TIF
,FILE142=00000142.TIF
,FILE143=00000143.TIF
,FILE144=00000144.TIF
,FILE145=00000145.TIF
,FILE146=00000146.TIF
,FILE147=00000147.TIF

FILE148=00000148.TIF
,FILE149=00000149.TIF
,FILE150=00000150.TIF
,FILE151=00000151.TIF
,FILE152=00000152.TIF
,FILE153=00000153.TIF
,FILE154=00000154.TIF
,FILE155=00000155.TIF
,FILE156=00000156.TIF
,FILE157=00000157.TIF
,FILE158=00000158.TIF
,FILE159=00000159.TIF

FILE160=00000160.TIF
,FILE161=00000161.TIF
,FILE162=00000162.TIF
,FILE163=00000163.TIF
,FILE164=00000164.TIF
,FILE165=00000165.TIF
,FILE166=00000166.TIF
,FILE167=00000167.TIF
,FILE168=00000168.TIF
,FILE169=00000169.TIF
,FILE170=00000170.TIF
,FILE171=00000171.TIF

FILE172=00000172.TIF
,FILE173=00000173.TIF
,FILE174=00000174.TIF
,FILE175=00000175.TIF
,FILE176=00000176.TIF
,FILE177=00000177.TIF
,FILE178=00000178.TIF
,FILE179=00000179.TIF
,FILE180=00000180.TIF
,FILE181=00000181.TIF
,FILE182=00000182.TIF
,FILE183=00000183.TIF

FILE184=00000184.TIF
,FILE185=00000185.TIF
,FILE186=00000186.TIF
,FILE187=00000187.TIF
,FILE188=00000188.TIF
,FILE189=00000189.TIF
,FILE190=00000190.TIF
,FILE191=00000191.TIF
,FILE192=00000192.TIF
,FILE193=00000193.TIF
,FILE194=00000194.TIF
,FILE195=00000195.TIF

FILE196=00000196.TIF
,FILE197=00000197.TIF
,FILE198=00000198.TIF
,FILE199=00000199.TIF
,FILE200=00000200.TIF
,FILE201=00000201.TIF
,FILE202=00000202.TIF
,FILE203=00000203.TIF
,FILE204=00000204.TIF
,FILE205=00000205.TIF
,FILE206=00000206.TIF
,FILE207=00000207.TIF

FILE208=00000208.TIF
,FILE209=00000209.TIF
,FILE210=00000210.TIF
,FILE211=00000211.TIF
,FILE212=00000212.TIF
,FILE213=00000213.TIF
,FILE214=00000214.TIF
,FILE215=00000215.TIF
,FILE216=00000216.TIF
,FILE217=00000217.TIF
,FILE218=00000218.TIF
,FILE219=00000219.TIF

FILE220=00000220.TIF
,FILE221=00000221.TIF
,FILE222=00000222.TIF
,FILE223=00000223.TIF
,FILE224=00000224.TIF
,FILE225=00000225.TIF
,FILE226=00000226.TIF
,FILE227=00000227.TIF
,FILE228=00000228.TIF
,FILE229=00000229.TIF
,FILE230=00000230.TIF
,FILE231=00000231.TIF

FILE232=00000232.TIF
,FILE233=00000233.TIF
,FILE234=00000234.TIF
,FILE235=00000235.TIF
,FILE236=00000236.TIF
,FILE237=00000237.TIF
,FILE238=00000238.TIF
,FILE239=00000239.TIF
,FILE240=00000240.TIF
,FILE241=00000241.TIF
,FILE242=00000242.TIF
,FILE243=00000243.TIF

FILE244=00000244.TIF
,FILE245=00000245.TIF
,FILE246=00000246.TIF
,FILE247=00000247.TIF
,FILE248=00000248.TIF
,FILE249=00000249.TIF
,FILE250=00000250.TIF
,FILE251=00000251.TIF
,FILE252=00000252.TIF
,FILE253=00000253.TIF
,FILE254=00000254.TIF
,FILE255=00000255.TIF

FILE256=00000256.TIF
,FILE257=00000257.TIF
,FILE258=00000258.TIF
,FILE259=00000259.TIF
,FILE260=00000260.TIF
,FILE261=00000261.TIF
,FILE262=00000262.TIF
,FILE263=00000263.TIF
,FILE264=00000264.TIF
,FILE265=00000265.TIF
,FILE266=00000266.TIF
,FILE267=00000267.TIF

FILE268=00000268.TIF
,FILE269=00000269.TIF
,FILE270=00000270.TIF
,FILE271=00000271.TIF
,FILE272=00000272.TIF
,FILE273=00000273.TIF
,FILE274=00000274.TIF
,FILE275=00000275.TIF
,FILE276=00000276.TIF
,FILE277=00000277.TIF
,FILE278=00000278.TIF
,FILE279=00000279.TIF

FILE280=00000280.TIF
,FILE281=00000281.TIF
,FILE282=00000282.TIF
,FILE283=00000283.TIF
,FILE284=00000284.TIF
,FILE285=00000285.TIF
,FILE286=00000286.TIF
,FILE287=00000287.TIF
,FILE288=00000288.TIF
,FILE289=00000289.TIF
,FILE290=00000290.TIF
,FILE291=00000291.TIF

FILE292=00000292.TIF
,FILE293=00000293.TIF
,FILE294=00000294.TIF
,FILE295=00000295.TIF
,FILE296=00000296.TIF
,FILE297=00000297.TIF
,FILE298=00000298.TIF
,FILE299=00000299.TIF
,FILE300=00000300.TIF
,FILE301=00000301.TIF
,FILE302=00000302.TIF
,FILE303=00000303.TIF

FILE304=00000304.TIF
,FILE305=00000305.TIF
,FILE306=00000306.TIF
,FILE307=00000307.TIF
,FILE308=00000308.TIF
,FILE309=00000309.TIF
,FILE310=00000310.TIF
,FILE311=00000311.TIF
,FILE312=00000312.TIF
,FILE313=00000313.TIF
,FILE314=00000314.TIF
,FILE315=00000315.TIF

FILE316=00000316.TIF
,FILE317=00000317.TIF
,FILE318=00000318.TIF
,FILE319=00000319.TIF
,FILE320=00000320.TIF
,FILE321=00000321.TIF
,FILE322=00000322.TIF
,FILE323=00000323.TIF
,FILE324=00000324.TIF
,FILE325=00000325.TIF
,FILE326=00000326.TIF
,FILE327=00000327.TIF

FILE328=00000328.TIF
,FILE329=00000329.TIF
,FILE330=00000330.TIF
,FILE331=00000331.TIF
,FILE332=00000332.TIF
,FILE333=00000333.TIF
,FILE334=00000334.TIF
,FILE335=00000335.TIF
,FILE336=00000336.TIF
,FILE337=00000337.TIF
,FILE338=00000338.TIF
,FILE339=00000339.TIF

FILE340=00000340.TIF
,FILE341=00000341.TIF
,FILE342=00000342.TIF
,FILE343=00000343.TIF
,FILE344=00000344.TIF
,FILE345=00000345.TIF
,FILE346=00000346.TIF
,FILE347=00000347.TIF
,FILE348=00000348.TIF
,FILE349=00000349.TIF
,FILE350=00000350.TIF
,FILE351=00000351.TIF

FILE352=00000352.TIF
,FILE353=00000353.TIF
,FILE354=00000354.TIF
,FILE355=00000355.TIF
,FILE356=00000356.TIF
,FILE357=00000357.TIF
,FILE358=00000358.TIF
,FILE359=00000359.TIF
,FILE360=00000360.TIF
,FILE361=00000361.TIF
,FILE362=00000362.TIF
,FILE363=00000363.TIF

FILE364=00000364.TIF
,FILE365=00000365.TIF
,FILE366=00000366.TIF
,FILE367=00000367.TIF
,FILE368=00000368.TIF
,FILE369=00000369.TIF
,FILE370=00000370.TIF
,FILE371=00000371.TIF
,FILE372=00000372.TIF
,FILE373=00000373.TIF
,FILE374=00000374.TIF
,FILE375=00000375.TIF

FILE376=00000376.TIF
,FILE377=00000377.TIF
,FILE378=00000378.TIF
,FILE379=00000379.TIF
,FILE380=00000380.TIF
,FILE381=00000381.TIF
,FILE382=00000382.TIF
,FILE383=00000383.TIF
,FILE384=00000384.TIF
,FILE385=00000385.TIF
,FILE386=00000386.TIF
,FILE387=00000387.TIF

FILE388=00000388.TIF
,FILE389=00000389.TIF
,FILE390=00000390.TIF
,FILE391=00000391.TIF
,FILE392=00000392.TIF
,FILE393=00000393.TIF
,FILE394=00000394.TIF
,FILE395=00000395.TIF
,FILE396=00000396.TIF
,FILE397=00000397.TIF
,FILE398=00000398.TIF
,FILE399=00000399.TIF

FILE400=00000400.TIF
,FILE401=00000401.TIF
,FILE402=00000402.TIF
,FILE403=00000403.TIF
,FILE404=00000404.TIF
,FILE405=00000405.TIF
,FILE406=00000406.TIF
,FILE407=00000407.TIF
,FILE408=00000408.TIF
,FILE409=00000409.TIF
,FILE410=00000410.TIF
,FILE411=00000411.TIF

FILE412=00000412.TIF
,FILE413=00000413.TIF
,FILE414=00000414.TIF
,FILE415=00000415.TIF
,FILE416=00000416.TIF
,FILE417=00000417.TIF
,FILE418=00000418.TIF
,FILE419=00000419.TIF
,FILE420=00000420.TIF
,FILE421=00000421.TIF
,FILE422=00000422.TIF
,FILE423=00000423.TIF

FILE424=00000424.TIF
,FILE425=00000425.TIF
,FILE426=00000426.TIF
,FILE427=00000427.TIF
,FILE428=00000428.TIF
,FILE429=00000429.TIF
,FILE430=00000430.TIF
,FILE431=00000431.TIF
,FILE432=00000432.TIF
,FILE433=00000433.TIF
,FILE434=00000434.TIF
,FILE435=00000435.TIF

FILE436=00000436.TIF
,FILE437=00000437.TIF
,FILE438=00000438.TIF
,FILE439=00000439.TIF
,FILE440=00000440.TIF
,FILE441=00000441.TIF
,FILE442=00000442.TIF
,FILE443=00000443.TIF
,FILE444=00000444.TIF
,FILE445=00000445.TIF
,FILE446=00000446.TIF
,FILE447=00000447.TIF

FILE448=00000448.TIF
,FILE449=00000449.TIF
,FILE450=00000450.TIF
,FILE451=00000451.TIF
,FILE452=00000452.TIF
,FILE453=00000453.TIF
,FILE454=00000454.TIF
,FILE455=00000455.TIF
,FILE456=00000456.TIF
,FILE457=00000457.TIF
,FILE458=00000458.TIF
,FILE459=00000459.TIF

FILE460=00000460.TIF
,FILE461=00000461.TIF
,FILE462=00000462.TIF
,FILE463=00000463.TIF
,FILE464=00000464.TIF
,FILE465=00000465.TIF
,FILE466=00000466.TIF
,FILE467=00000467.TIF
,FILE468=00000468.TIF
,FILE469=00000469.TIF
,FILE470=00000470.TIF
,FILE471=00000471.TIF

FILE472=00000472.TIF
,FILE473=00000473.TIF
,FILE474=00000474.TIF
,FILE475=00000475.TIF
,FILE476=00000476.TIF
,FILE477=00000477.TIF
,FILE478=00000478.TIF
,FILE479=00000479.TIF
,FILE480=00000480.TIF
,FILE481=00000481.TIF
,FILE482=00000482.TIF
,FILE483=00000483.TIF

FILE484=00000484.TIF
,FILE485=00000485.TIF
,FILE486=00000486.TIF
,FILE487=00000487.TIF
,FILE488=00000488.TIF
,FILE489=00000489.TIF
,FILE490=00000490.TIF
,FILE491=00000491.TIF
,FILE492=00000492.TIF
,FILE493=00000493.TIF
,FILE494=00000494.TIF
,FILE495=00000495.TIF

FILE496=00000496.TIF
,FILE497=00000497.TIF
,FILE498=00000498.TIF
,FILE499=00000499.TIF
,FILE500=00000500.TIF
,FILE501=00000501.TIF
,FILE502=00000502.TIF
,FILE503=00000503.TIF
,FILE504=00000504.TIF
,FILE505=00000505.TIF
,FILE506=00000506.TIF
,FILE507=00000507.TIF

FILE508=00000508.TIF
,FILE509=00000509.TIF
,FILE510=00000510.TIF
,FILE511=00000511.TIF
,FILE512=00000512.TIF
,FILE513=00000513.TIF
,FILE514=00000514.TIF
,FILE515=00000515.TIF
,FILE516=00000516.TIF
,FILE517=00000517.TIF
,FILE518=00000518.TIF
,FILE519=00000519.TIF

FILE520=00000520.TIF
,FILE521=00000521.TIF
,FILE522=00000522.TIF
,FILE523=00000523.TIF
,FILE524=00000524.TIF
,FILE525=00000525.TIF
,FILE526=00000526.TIF
,FILE527=00000527.TIF
,FILE528=00000528.TIF
,FILE529=00000529.TIF
,FILE530=00000530.TIF
,FILE531=00000531.TIF

FILE532=00000532.TIF
,FILE533=00000533.TIF
,FILE534=00000534.TIF
,FILE535=00000535.TIF
,FILE536=00000536.TIF
,FILE537=00000537.TIF
,FILE538=00000538.TIF
,FILE539=00000539.TIF
,FILE540=00000540.TIF
,